मनोरमा व शब्दरत्न

यांचें विवरणात्मक

मराठी भाषांतर

विवरणकर्ता

कै० रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर, एम्. ए.

सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नागपूर

(परिभाषेन्दुशेखराचे भाषान्तरकर्ते)

★

किंमत ७॥ रु.

भट्टोजी दीक्षितकृत

प्रौढ मनोरमा

व

त्या ग्रंथावरील शब्दरत्ननामक टीका

यांचें स्त्रीप्रत्ययान्त

मराठींत विस्तृत विवरणासह व प्रक्रियेसह

सुबोध भाषांतर

★

विवरणकर्ता

कै० रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर, एम्. ए.

सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नागपूर.

★

किंमत ७॥ रु.

—प्रकाशक—


खं. ना. वाडेगांवकर

रा. ब. वाडेगांवकरांचा बंगला,
धनतोली, नागपूर.

—मुद्रक—

वि. ना. वाडेगांवकर

उद्यम, कमर्शियल प्रेस,
धर्मपेठ, नागपूर.



कै. रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर, एम्. ए.
सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नागपूर.

अर्पणपत्रिका—

कर्तव्यनिष्ठा व न्यायप्रियता यांमुळें पारतंत्र्याच्या काळांतील सरकारी नौकरींतहि सरकार व समाजमान्यता पावलेले, ईश्वरावरील अनन्य विश्वास हें ज्यांच्या जीवननौकेचें एकमेव सुकाणु होतें, ज्यांच्या पराकाष्ठेच्या विद्याभिरुचीनें व्यसनाची मर्यादा गाठली होती अशा माझ्या परमपूज्य कै. ती. ना. दा. वाडेगांवकर यांच्या स्मृतीस त्यांचीच ही कृति अंशात्मक प्रकाशित स्वरूपांत अत्यंत श्रद्धायुक्त अंतःकरणानें व नम्रभावानें समर्पण करीत आहे.

मनोरमा व शब्दरत्न

यांचें

मराठी भाषांतर

अनुक्रमणिका

प्रकाशकाचे दोन शब्द

माझे परमपूज्य वडील कै. रावबहादुर नारायण दाजीबा वाडेगांवकर यांस सरकारी नौकरींतून सेवानिवृत्त झाल्यानंतर एकाग्रतेनें विद्याव्यासंग करायला श्रीपरमेश्वरकृपेनें पुरेसें आयुष्य लाभलें. या काळांत त्यांनीं संस्कृत व मराठी भाषांची जी अनन्य-भावानें व पूज्यबुद्धीनें सेवा केली तिला तपश्चर्या म्हणण्यांत अलंकार किंवा अतिशयोक्ति मुळींच नाहीं. त्यांच्या या ज्ञानयज्ञांतून अमूल्य व शाश्वत महत्वाचे असे दोन ग्रन्थ निष्पन्न झाले. पैकीं नागोजी भट्टांचे परिभाषेन्दुशेखराचें विवरणात्मक भाषांतर त्यांनीं आपल्या हयातींतच १९३७ सालीं प्रसिद्ध केलें. दुसरा ग्रन्थ म्हटला म्हणजे प्रौढमनोरमा व शब्दरत्न यांचें विवरणात्मक भाषांतर हाय. ग्रन्थांचीं नांवें ऐकल्यानंतर मी माझ्या वडिलांच्या या साहित्यिक परिश्रमाला तपश्चर्या म्हणण्यांत कुठल्याहि प्रकारचा औपचारिक गौरव नाहीं याबद्दल विद्वानांची खात्री होण्यास हरकत नाहीं.

माझ्या वडिलानीं केलेल्या भाषांतराची योग्यता पुढें दिलेल्या सुप्रसिद्ध विद्वानांच्या अभिप्रायांवरून लक्षांत येईल. अर्थात् यथार्थ व संपूर्ण कल्पना येण्यास प्रत्यक्ष ग्रन्थाचाच आस्वाद घेतला पाहिजे हें उघड आहे. इतक्या दीर्घ, अविश्रान्त व पुण्यभावनेनें केलेल्या परिश्रमानंतर तयार झालेला हा ग्रन्थ प्रकाशित व्हावा ही लेखकाची इच्छा जितकी स्वाभाविक तितकीच तो प्रसिद्ध करणें माझें पवित्र कर्तव्य आहे ही माझी भावनाहि स्वाभाविकच आहे. पण लेखकाच्या किंवा प्रकाशकाच्या वैयक्तिक इच्छेपेक्षां या ग्रन्थाच्या प्रकाशनानें संस्कृत भाषेची जो भरीव सेवा होईल आणि व्याकरणशास्त्रासारख्या रूक्ष व क्लिष्ट विषयावरील या श्रेष्ठ ग्रन्थाच्या अभ्यासकांची जी सोय होईल ती अनंतपटीनें अधिक आहे.

सांस्कृतिक संजीवनाचा हा काल आहे. त्या दृष्टीनें माझ्या मुनितुल्य वडिलांनीं केलेलें हें वाङमयतप अतीशय महत्वाचें असलें तरी त्याचें प्रकाशन स्वतःच्या जबाबदारीवर करणें माझ्या आवांक्या-बाहेरचें आहे. परिभाषेंदुशेखराचें भाषांतर माझ्या वडिलांनीं अत्यंत पुण्यभावनेनें स्वखर्चानें प्रकाशित केलें. अर्थात् तें सर्व द्रव्य त्यांना

ब्रम्हार्पणच मानावें लागलें. प्रस्तुत समग्र ग्रन्थाचा आकार सुमारें तीन हजार पृष्ठांपर्यंत होणें संभवतें. हा समग्र ग्रन्थ स्वतःच्या खर्चानें प्रकाशित करणें माझ्या आटोक्यांतलें नाहीं.

अशा परिस्थितींत सांस्कृतिक संजीवनाच्या प्रवृत्तीच्या दृष्टीनें केवळ अनमोल असा हा ग्रन्थ प्रकाशित करण्याचे जे व्यवहार्य पर्याय संभवतात त्यांचें विवरण, प्रकाशनाच्या योजनांची रूपरेषा, जनतेकडून माझ्या अपेक्षा इत्यादींची कल्पना एक स्वतंत्र पत्रक काढून दिली आहे. त्यांपैकीं एखादी योजना कार्यान्वित होऊन समग्र ग्रन्थ प्रकाशित होण्याचा योग ईश्वरकृपेनें यावयाचा असेल तेव्हां येईल. पण पितृऋणांतून, अल्पांशानें कां होईना, उतराई होण्याच्या नम्र भावनेनें व संस्कृतप्रेमी अभ्यासकांना या अलभ्य ग्रन्थाचा अल्पसा आस्वाद उपलब्ध करून द्यावा म्हणून तीर्थरूपांच्या प्रथम श्राद्धदिनीं (ता. १०–३–५१ ला) मी सदर भाषांतरित ग्रन्थाचें पहिलें संज्ञा-प्रकरण वडिलांनीं स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करीत आहे. शेष ग्रन्थ प्रसिद्ध होणें ईश्वरकृपेवर अवलंबून आहे. त्या कृपेच्या आविष्काराची उत्कंठेनें प्रतीक्षा करण्याव्यतिरिक्त आज मला दुसरें कांहीं करतां येणें शक्य नाहीं.

या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कामीं संस्कृताचीं प्रुफें तपासण्यांत प्रो. एस्. पी. चतुर्वेदी यांनीं मला जी आपुलकीनें मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. कमर्शिअल प्रेसनें छपाईच्या कामीं केलेल्या मदतीबद्दल मी व्यवस्थापकांचा फार आभारी आहे. तसेंच माझ्या कांहीं मित्रांनीं निवळ स्नेहाखातर मला जी अमूल्य व निरपेक्ष मदत केली तिच्याबद्दल त्यांचा नामनिर्देश करून मी आपल्या कृतज्ञतेचें स्वारस्य घालवूं इच्छित नाहीं. मित्रांचें सहाय्य नसतें तर माझ्यासारख्या पामराला इतकीहि मजल गाठतां आली नसती.

अशेष शब्दब्रम्हाची अनन्यभावें उपासना करण्याच्या बुद्धीनेंच माझ्या वडिलांनीं ही वाङमयसेवा केली व त्यांच्याच प्रेरणेनें हा प्रकाशनाचा योग आला तेव्हां ती त्यांच्याच चरणीं रूजू होवो.

धंतोली, नागपूर }
२२–२–१९५१ }

खं. ना. वाडेगांवकर

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

रा. रा. रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर यांनीं प्रौढ मनोरमा व शब्दरत्न या ग्रन्थांचें जें स्त्रीप्रत्ययान्त विवरण केलें आहे त्याचा ब्राचसा भाग मी वाचला. या ग्रन्थांत प्रथम प्रत्येक पंक्तीचा अक्षरार्थ देऊन पुढें कंसांत त्या पंक्तीचें विस्तृत व मार्मिक विवरण केलें आहे व आवश्यक ठिकाणीं पूर्ण प्रक्रिया दिली आहे. त्यामुळें ग्रन्थाचा बोध होण्यास साधारण बुद्धीच्या विद्यार्थ्याला देखील माझ्या मतें कांही अडचण येऊं नये. या ग्रन्थांत ठिकठिकाणीं भाष्य, प्रदीप, उद्योत, काशिका, पदमञ्जरी इत्यादि ग्रन्थांतून समर्पक उतारे दिले असल्यामुळें हा ग्रन्थ आदर्शभूत झाला आहे व युनिव्हर्सिटीसारख्या संस्थांनी हा माननीय ग्रन्थ संग्रही ठेवण्यास अत्यंत लायक आहे. विद्यार्थिवर्गाच्या हिताकरितां हा ग्रन्थ जितक्या लवकर छापला जाईल तितकें बरें. व या ग्रन्थाचें हिन्दींत भाषान्तर करून तें छापल्यास यू. पी., पंजाब, बंगाल, वगैरे प्रांतांतील विद्यार्थ्यांना फार फायदा होईल. मी हा ग्रन्थ वाचून फार प्रसन्न झालों आहे व एवढे कठिण व्याकरणशास्त्राचे ग्रन्थ महाराष्ट्र भाषेंत उतरविणें दुष्कर असून देखील रा. ब. वाडेगांवकर यांनीं हें जें काम सरळ व सुन्दर भाषा लिहून प्रशंसनीय रीतिनें केलें आहे त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनन्दन करितो.

बनारस — **गोपाल शास्त्री नेने**

ता. ६–१२–४४ — व्याकरणाध्यापक, ग. सं. कॉलेज, बनारस

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

संस्कृत भाषेंतील शास्त्रीय ग्रन्थांचें मराठी भाषेंत यथार्थ भाषान्तर करणें हें कार्य सगळ्यांनाच उत्तम रीतिनें साधतें असें नाहीं. पं. आचार्य भक्त विष्णुशास्त्री बापट, दीक्षित भाऊशास्त्री लेले, म. म. पं. वासुदेव शास्त्री अभ्यंकर प्रभृति दिवंगत व विद्यमान पं. धुण्डिराज शास्त्री ऊर्फ बापू दीक्षित बापट पांचगांवकर प्रभृति ग्रन्थकारांनीं केलेलीं भाषांतरें वजाकरितां बहुतेक भावार्थानुवादात्मकच भाषान्तरें आहेत म्हणावयास हरकत नाहीं. भाषांतरित ग्रन्थांत सुद्धां वेदांतादि शास्त्रीय ग्रन्थांचीं भाषांतरें लोकांत प्रचलित असलेल्या दृष्टांतादिकांनीं सुरुचिरतरी करितां येतात. परंतु सर्वथा नीरस व क्लिष्ट अशा व्याकरण शास्त्रांतील विशिष्ट टीकाग्रन्थांचें भाषांतर सुव्यवस्थित व यथार्थ रीतिनें करणें हें कार्य अति अवघड व फारच कष्टसाध्य असें आहे. म्हणूनच जेथें वेदान्त, धर्मशास्त्र वगैरे शास्त्रांतील दहा दहा ग्रन्थांचीं भाषान्तरें झालेलीं मिळतात, तेथें व्याकरणशास्त्रांतील दोन तीनच ग्रन्थांचीं भाषांतरें झालीं आहेत याचें कारण उघडच आहे. प्रस्तुत ग्रन्थकारांनीं कांहीं वर्षांपूर्वीं श्री. नागोजीभट्ट काळे यांनी केलेल्या परिभाषेन्दुशेखर नांवाच्या ग्रन्थाचें मराठींत सुन्दर भाषांतर केलेलें प्रसिद्ध आहेच. आतां प्रकृत ग्रन्थकारांनी शब्दरत्न मनोरमेचें अव्ययांत भागाचें मराठींत भाषांतर केलें आहे. तें मी बरेच स्थळीं आपाततः व एकाध प्रकरण अक्षरशः संपूर्ण वाचून पाहिलें आहे. त्यामुळें मला निश्चयानें असें सांगतां येतें कीं सदरहू भाषांतर प्राचीन परंपरेला व मुळांतील गंभीर अर्थाला कोठेंहि न सोडतां उत्तम रीतिनें केलेलें आहे. व्याकरणासारख्या नीरस, क्लिष्ट शास्त्रांतील अति कठिण टीकाग्रन्थांचें उत्कृष्ट भाषांतर करितां येतें याकरितां हा ग्रन्थ सर्वदा उत्कृष्ट उदाहरण म्हणून दाखवितां येण्या-

सारखा आहे. अस्तु. ज्यांना व्याकरणशास्त्राचें अध्ययन करण्याची आवड आहे परंतु गुरूकडे जाऊन अध्ययन करितां येणें शक्य नाहीं; तसेंच गुरूजवळ अध्ययन करूनही ग्रन्थ स्पष्ट होण्याकरितां पुनः चिंतनाची आवश्यकता आहे अशा उभयविध जिज्ञासूंना या ग्रन्थानें फार उपयोग होणार आहे.

७५ चें आंतबाहेर वय, इन्द्रियें एका काळीं आपली असूनही आपली नाहींत अशी साक्ष पटवीत आहेत. या कालांतील सांसारिक सुख, अशा परिस्थितींत १५–१५ तास दिवसा तसेंच रात्रीहि व्याकरण-शास्त्रासारख्या नीरस क्लिष्ट विषयांत एकाग्रचित्तानें विचार करीत समाधि स्थितींत असलेल्या श्रीमान् पंडित बाबासाहेब वाडेगांवकरांना पाहिलें म्हणजे प्राचीन विद्वानांचीं वर्णनें प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभी राहतात. असो. हा ग्रन्थ लवकरच प्रसिद्ध होण्याचा योग यावा व मराठी भाषेंत एका उत्कृष्ट भाषांतराची भर पडावी अशी सदिच्छा प्रकट करितो.

पौष वद्य २०६०१ वुधवार
ता. ६–१२–४४ काशी

पं. अनन्त शास्त्री फडके
व्याकरणाचार्य, मोमांसातीर्थ
प्रा. ग. सं. कॉ. काशी

॥ श्री विश्वनाथो विजयते तमाम् ॥

रा. ब. श्री. ना. दा. वाडेगांवकर यांनी ' प्रौढ–मनोरमा आणि शद्बरत्न ' ह्या व्याकरण शास्त्रावरील जटिल दोन ग्रन्थांचें जें महाराष्ट्र भाषेंत विस्तृत विवरण केलें आहे त्याचा काहीं भाग मी वाचला. हा ग्रन्थ सर्वांगसुन्दर जाहला आहे. जसा एखादा वैयाकरणमूर्द्धन्य आपल्या प्रियतम विद्यार्थ्यास प्रत्येक पंक्तीचें विशद विवरण करून ग्रन्थाचें गूढ ग्रन्थिरहस्य एकान्तात सांगतो तसें हें ' भाषान्तर ' वाचकांस चटकन ग्रन्थ प्रमेय सांगतें. यांत प्रत्येक पंक्तीचा अक्षरार्थ प्रथम देऊन नंतर कंसांत त्याचें विस्तृत विवरण केलें आहे व जेथें प्रक्रिया देणें आवश्यक आहे तेथें सूत्रें देऊन सविस्तर प्रक्रिया दिली आहे आणि ठिकठिकाणीं भाष्य, काशिका, प्रदीप, उद्योत, शब्देन्दुशेखर, पदमंजरी इत्यादि ग्रन्थांतील समर्पक उतारे दिले आहेत; त्यायोगें ग्रन्थ समजण्यांत अडचण जात नाहीं. माझी पूर्ण खात्री आहे कीं ज्यानें कौमुदीचें अध्ययन केलें आहे त्याला शिक्षकाच्या सहाय्याशिवाय हा ग्रन्थ वाचल्यानें मनोरमा व शद्बरत्न यांतील पंक्ति उत्तम रीतिनें समजू शकते. असा सर्वोत्कृष्ट ग्रन्थ लिहिल्याबद्दल मी रावबहादुर यांचे सप्रेम हार्दिक अभिनन्दन करितो. महाराष्ट्र प्रान्तात व्याकरणशास्त्राचा प्रचार विरल आहे. उत्तर (हिन्दुस्थानांत) भारतांत व्याकरणशास्त्राचा विशेष प्रचार असल्यामुळें या ग्रंथाचें हिन्दींत भाषान्तर होणें आवश्यक आहे. तसें भाषान्तर केल्यास व्याकरणशास्त्राध्ययन करणाऱ्या छात्रवर्गावर फार उपकार होतील.

बनारस
कार्तिक क्ृ. १३ सोमवार
ता. १३–११–४४

सदाशिव शास्त्री मुसलगांवकर
माजी प्रिन्सिपल, संस्कृत कॉलेज, ग्वाल्हेर

॥ श्री ॥

श्री. रा. ब. ना. दा. वाडेगांवकर यांनीं प्रौढ़ मनोरमा व शब्दरत्न या गहन ग्रन्थांचें महाराष्ट्र भाषेंत जें स्त्रीप्रत्ययान्त विवरण केलें आहे त्याचीं तीन प्रकरणें मी वाचलीं. या विवरणांत प्रत्येक पंक्तीचा प्रथम अक्षरार्थ देऊन पुढ़ें कंसांत विस्तृत विवेचन केलें आहे व अवश्य ठिकाणीं सूत्रें व सूत्राङ्क देऊन पूर्ण प्रक्रिया दिली आहे, आणि तसेंच भाष्य, प्रदीप, उद्योत, शब्देन्दुशेखर, काशिका, पदमञ्जरी इत्यादि ग्रंथांतून आवश्यक स्थलीं समर्पक उतारे दिले असून त्यांचा भावार्थहि दिला आहे. त्यामुळें प्रत्येक पंक्तीचा उत्तम रीतीनें अर्थबोध होतो. हा ग्रंथ सरल व सुंदर भाषेंत लिहिला असल्यामुळें सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्याला देखील ग्रंथबोध होण्यांत कांहीं अडचण येऊ नये. शब्दरत्नाची भाषा फार अवघड आहे व त्या ग्रंथाचा गूढ़ार्थ मराठी भाषेंत पूर्णपणें उतरविणें हें दुष्कर असून देखील या विवरणांत तें उत्तम रीतीनें केलें. सारांश हें विवरण अत्यन्त सुंदर, बोधप्रद व आदर्शभूत झालें आहे व या उतारवयांत शरीर रोगग्रस्त झालें असून देखील वाडेगांवकर साहेबांनी जो एवढा प्रचण्ड व सुंदर ग्रन्थ निर्माण केला आहे त्याबद्दल त्यांचें जितकें कौतुक व अभिनंदन केलें तितकें कमीच आहे.

ता. ६–१२–४४

दिवाकर शास्त्री जोशी
व्याकरणाचार्य
व्याकरण शास्त्राध्यापक गवर्नमेण्ट संस्कृत
कॉलेज व स्था. जैन विद्यालय बनारस.

प्रस्तावना

शुद्ध कसें बोलावें, शुद्ध कसें लिहावें, हें शुद्ध कां व हें अशुद्ध कां, हें व्याकरण शिकल्यानें समजतें असें जें दादोबांच्या लघुव्याकरणांत म्हटलें आहे तेंच व्याकरणाध्ययनाचें मुख्य प्रयोजन आहे. पस्पशान्हिकांत संस्कृत व्याकरणाचें अध्ययन करण्याचीं जीं भाष्यकारांनी अनेक प्रयोजनें सांगितलीं आहेत त्यांपैकीं 'दुष्टाञ्शद्वान्मा प्रयुक्ष्महीत्यध्येयं व्याकरणम्' म्हणजे चूक शब्दांचा आपणांकडून प्रयोग होऊं नये (व चार लोकांत आपली त्यामुळें फजीति होऊं नये) याकरितां व्याकरणाचें अध्ययन करणें आवश्यक आहे, हें एक प्रयोजन सांगितलें आहे. व्याकरणशास्त्राचें अध्ययन न करितां शुद्ध व सुंदर संस्कृत बोलणारे कित्येक शास्त्री आपणांस आढळतात हें खरें. पण व्याकरण शिकलेल्या पुरुषाचा आपल्या भाषणाच्या शुद्धतेसंबंधानें स्वतःचे ठिकाणीं जो आत्मविश्वास असतो तसा त्यांचे ठिकाणीं व्याकरणशास्त्राच्या अध्ययनाच्या अभावामुळें राहूं शकत नाहीं व तुमचा अमुक प्रयोग अशुद्ध आहे असें त्यांना कोणी छेडल्यास, आपल्या प्रयोगाच्या शुद्धाशुद्धतेचा निर्णय करण्याकरितां त्यांना वैयाकरणाचीच मदत घेतली पाहिजे. 'वेदान्नो वैदिकाः शब्दाः सिद्धा लोकाच्च लौकिकाः । अनर्थकं व्याकरणमिति । तेभ्य एवं विप्रतिपन्नबुद्धिभ्योऽध्येतृभ्य आचार्य इदं शास्त्रमन्वाचष्टे,' म्हणजे वेद शिकल्यानें आम्हाला वैदिक शब्दांचे ज्ञान झालें आहे व आमच्या लौकिक व्यवहारामुळें लौकिक शब्दांचेंहि आम्हाला ज्ञान झालें आहे व म्हणून व्याकरण शिकण्याची आम्हास कांहीं गरज नाहीं अशा विपरीत तऱ्हेनें विचार करणाऱ्या व भलत्याच दिशेनें वाहवलेल्या पुरुषांकरितां आचार्य

पाणिनीनें व्याकरणशास्त्र रचलें आहे, असें जें पस्पशाह्निकांत भाष्यकारांनी म्हटलें आहे तें अशाच पुरुषांना उद्देशून वर सांगितलेल्या कारणामुळें म्हटलें आहे. सारांश कोणत्याहि भाषेवर प्रभुत्व संपादन करण्याकरितां जसें त्या भाषेंतील आदर्शभूत ग्रन्थांचें काळजीपूर्वक परिशीलन करणें इष्ट व आवश्यक आहे त्याचप्रमाणें त्या भाषेंतील आदर्शभूत व्याकरणग्रन्थाचें देखील अध्ययन करणें आवश्यक आहे. म्हणूनच मुलांकडून इंग्रजी लिहितांना व बोलतांना चूक होऊं नये व त्यांना शुद्ध इंग्रजी बोलतां व लिहितां यावें याकरितां इंग्रजी शाळांतून पहिलेपासून इंग्रजी व्याकरण शिकविलें जातें. इंग्रजी भाषेंत नामाहून विभक्तिप्रत्यय होत नाहींत व नामाचें रूपान्तर होत नाहीं. जे कांहीं थोडे प्रत्यय त्या भाषेंत होतात ते बोटावर मोजण्याइतके आहेत. त्या भाषेंत समास होत नाहीं व भिन्न शब्दांचा सन्धि होत नाहीं. परंतु संस्कृत भाषेची स्थिति याहून अगदीं भिन्न आहे. या भाषेंत तऱ्हेतऱ्हेचे सन्धि व समास होतात. नामाहून विभक्तिप्रत्यय होतात व ते प्रत्यय होतांना नामाचें मूळ स्वरूप पालटत जातें. एवढेंच नव्हे तर अदन्त, इगन्त, सन्ध्यक्षरान्त, व हलन्त नामांहून आणि तसेंच स्त्रीलिङ्ग व नपुंसकलिङ्ग नामांहून प्रत्यय करितांना प्रत्ययांच्या स्वरूपांत देखील वेळोवेळीं फरक पडत जातो. तसेंच नामाहून अनेक प्रकारचे तद्धित प्रत्यय होतात व ते प्रत्यय होतांना देखील नामाच्या मूळ स्वरूपांत अनेक वेळीं गुण, वृद्धि इत्यादि कार्यें होऊन फरक होतो. ही गोष्ट नामांची झाली. धातूचें रूप तयार करितांना तो कोणत्या प्रकारचा धातु आहे हें माहित असणें आवश्यक आहे. धातु परस्मैपदी असल्यास त्याहून एक प्रकारचे प्रत्यय होत असून तो आत्मनेपदी असल्यास भिन्न प्रकारचे प्रत्यय होतात आणि तो उभयपदी असल्यास दोन्ही प्रकारचे प्रत्यय होऊन पाक्षिक रूपें सिद्ध होतात. तसेंच कांहीं धातु सेट्क, कांही अनिट्क व कांही वेट्क आहेत, त्यांपैकीं सेट्क धातूंना विशिष्ट लकारांत विशिष्ट प्रकारचे प्रत्यय करतेवेळीं त्या प्रत्ययांना इडागम होत असतो. म्हणून धातूहून प्रत्यय

करतेवेळीं वरील सहा प्रकारच्या धातूंपैकीं तो कोणत्या दोन प्रकारचा धातु आहे याचें ज्ञान असणें आवश्यक आहे. तसेंच सर्व धातूंना प्रत्यय होण्यापूर्वी एकाच प्रकारचें विकरण लागत नसून, भिन्न भिन्न धातूंना भिन्न भिन्न प्रकारचीं विकरणें लागतात व त्यामुळेंच धातूंचे दहा गण पाडले आहेत. म्हणून कोणत्याहि धातूहून प्रत्यय करण्यापूर्वी तो धातु कोणत्या गणाचा आहे व त्याला कोणतें विकरण लावलें पाहिजे याचें ज्ञान असणें जरूर आहे. त्याचप्रमाणें संस्कृत भाषेंत दहा लकार–काळ– मानले आहेत व प्रत्येक लकाराचीं रूपें सिद्ध करितांना अनेक स्थलीं प्रत्ययांच्या मूळ स्वरूपांत फरक होतो, तसेंच प्रत्येक धातूचीं णिजन्ताची -प्रयोजकाचीं;–सन्नन्ताचीं, यङन्ताचीं व यङ्लुकाचीं रूपें होतात. या शिवाय धातूहून कृत् प्रत्यय होतात व नामाहून विशिष्ट प्रत्यय केल्यानें नामधातु तयार होतात. हीं जीं सर्व प्रकारचीं रूपें वैदिक कालांतच अत्यंत प्रगल्भ दशेला पोहोचलेल्या संस्कृत भाषेंत आढळतात तीं कशीं सिद्ध झालीं आहेत व इतर शब्दांचीं तशा प्रकारचीं रूपें कशीं होतात या व इतर सर्व विषयांचें यथार्थ ज्ञान होण्याकरितां व संस्कृत भाषेवर प्रभुत्व संपादन करण्याकरितां त्या भाषेच्या व्याकरणाचें ज्ञान असणें आवश्यक आहे व तें ज्ञान संपादन करण्याकरितां वैदिक भाषेंतील व लौकिक भाषेंतील सर्व रूपें लक्षांत घेऊन पाणिनीनें जें सकलरूपव्यापि व सर्वाङ्गपरिपूर्ण अष्टाध्यायीरूप अद्वितीय व्याकरणशास्त्र निर्माण केलें आहे त्याचें काळजीपूर्वक अध्ययन करणें आवश्यक आहे.

पाणिनीच्या पूर्वी अनेक व्याकरणाचार्य होऊन गेले. त्यांपैकीं आपिशलि, काश्यप, गालव, चाक्रवर्मण, भारद्वाज, शाकटायन, शाकल्य, सेनक व स्फोटायन या दहा पूर्वाचार्यांचा नामनिर्देश अष्टाध्यायींत केला आहे. 'इंद्रश्चन्द्रः काशकृत्स्नापिशली शाकटायनः। पाणिन्यमरजैनेन्द्रा जयन्त्यष्टादिशाब्दिकाः' या मुग्धबोधांत दिलेल्या कारिकेवरून हें दिसून येतें कीं, इन्द्र, चन्द्र व काशकृत्स्न हे व्याकर-

णाचार्य देखील पाणिनीच्या पूर्वी झाले होते व पहिल्या दोन आचार्यांचा जरी पाणिनीनें अष्टाध्यायींत साक्षात् नामनिर्देश केला नाहीं तरी, 'प्राचाम्' व 'उदीचाम्' या शब्दांनीं त्यानें त्यांचा अनुक्रमें निर्देश केला आहे. इंद्र हा हिन्दुस्थानच्या पूर्व भागांत कोठें तरी राहत असून पाणिनीय कालीं त्याचा संप्रदाय त्या भागांत चालू होता व चन्द्र हा हिन्दुस्थानच्या उत्तर भागांत राहत असून त्याचा संप्रदाय त्या भागांत पाणिनीय कालीं चालू होता असें दिसून येतें आणि म्हणून पाणिनीनें त्या दोघांना अनुक्रमें 'प्राचाम्, उदीचाम्' असें अन्वर्थक रीतीनें संबोधिलें आहे. बोपदेवाच्या कारिकेंत निर्दिष्ट असलेला चन्द्र हा पाणिनीच्या अनेक शतकांनंतर, म्हणजे ख्रिस्तोत्तर सुमारें पांचव्या शतकांत झालेला बौद्ध वैयाकरण चन्द्रगोमिन् नसून पाणिनीच्या पूर्वी झालेला उत्तरदेशस्थ प्रसिद्ध व्याकरणाचार्य होय. त्याचप्रमाणें वरील कारिकेंत ज्या शाकटायनाचा निर्देश केला आहे तो 'नामच धातुजमाह निरुक्ते, व्याकरणे शकटस्य च तोकम्' या भाष्यांत दिलेल्या कारिकेंत निर्दिष्ट असलेला पूर्वाचार्य असून, ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकाच्या उत्तरार्धांत झालेला जैन वैयाकरण शाकटायन नव्हे. पाणिनीनें जरी काशकृत्स्नाचा अष्टाध्यायींत नामनिर्देश केला नाहीं तरी भाष्यांत त्या पूर्वाचार्यांचा कित्येक ठिकाणीं नामनिर्देश केलेला आढळतो.

पाणिनीनें जी अनुपम व सर्वव्यापि सूत्ररचना केली आहे तीवरून हें दिसून येतें कीं, त्याच्या डोळ्यांसमोर सर्व वैदिक व लौकिक प्रयोग खेळत होते व त्या सकललक्ष्यैकचक्षुष्क अद्वितीय आचार्याचें भाषाज्ञान अगाध असलें पाहिजे. त्यानें सूत्ररचना करतेवेळीं वैदिक अनुक्रमणींचा व पूर्वाचार्यांच्या सूत्रग्रंथांचा कितपत उपयोग केला हें सांगणें अशक्य आहे; कारण पूर्वाचार्यांचे सूत्रग्रंथ अनेक कालापासून उपलब्ध नाहींत. मात्र हें खरें कीं, त्यानें सूत्ररचना करतेवेळीं चतुर्दश माहेश्वर सूत्रांचा प्रत्याहार सिद्ध करण्याकरितां उपयोग

केला आहे. हीं चवदा सूत्रें महेश्वर नामक कोणी तरी पूर्वाचार्यांनीं प्रत्याहाराची सिद्धि करण्याकरितां रचलीं असलीं पाहिजेत व पाणिनीय कालीं तीं सूत्रें प्रसिद्ध असलीं पाहिजेत आणि त्या सूत्रांचा आधार घेऊन पाणिनीनें आपल्या सूत्रांत ठिकठिकाणीं प्रत्याहारांचा निर्देश केला आहे. आख्यायिका अशी आहे कीं, पाणिनीनें उग्र तपश्चर्या करून हीं चवदा सूत्रें महादेवापासून प्राप्त करून घेतलीं. परंतु प्रसिद्ध पुरुषाच्या नांवामागें त्याच्या मरणानंतर ज्या अनेक आख्यायिका जोडल्या जातात त्यांपैकींच ही एक आख्यायिका आहे. सारांश पाणिनीची कृति सर्वोत्तम व सर्वमान्य ठरल्यामुळें व वार्तिककारांनीं त्या कृतीला प्राधान्य देऊन अनेक सूत्रांवर वार्तिकें रचलीं असल्यामुळें भाष्यकारांनीं अष्टाध्यायीवर महाभाष्य लिहून व अनेक वार्तिकांचें खण्डन करून पाणिनीय सूत्रांचें समर्थन केलें असल्यामुळें अष्टाध्यायीला जें लोकोत्तर महत्व व वैशिष्टय प्राप्त झालें त्याचा परिणाम हाच झाला असला पाहिजे कीं, इतर आचार्यांच्या व्याकरणसूत्रांचें जें पठनपाठन पूर्वीं चालू होतें तें हळुहळु बंद पडून अष्टाध्यायीचेंच पठनपाठन सर्वत्र सुरु झालें, व त्यामुळें पूर्वाचार्यांचे सूत्रग्रंथ कालगतीनें नष्ट होऊन त्या आचार्यांचें नामच अवशिष्ट राहिलें.

पाणिनीच्या जीवनचरित्राबद्दल दुर्दैवानें कांहींच माहिती उपलब्ध नाहीं त्याच्या नांवावरून व तसेंच दीक्षितांनीं कौमुदींत (पहा सू. १२७४–७५) जी 'पाणिनि' शद्वाची व्युत्पत्ति दिली आहे तीवरून असें दिसून येतें कीं, तो पणीऋषीच्या कुलांत जन्मला होता व 'सर्वे सर्वपदादेशा दाक्षीपुत्रस्य पाणिनेः' या भाष्यवचनावरून हें ज्ञापित होतें कीं, त्याच्या आईचें नांव दाक्षी होतें दक्षकुलांत उत्पन्न झालेली ती कोणी तरी प्रसिद्ध विदुषी बाई असली पाहिजे. तिच्या पितृवंशांतच पुढें व्याडीचा जन्म झाला. हा पाणिनीच्या मामाचा पुत्र होता असें कित्येक म्हणतात. वार्तिकांत याचा नामनिर्देश आढळतो व लक्षश्लोकात्मक प्रसिद्ध संग्रहनामक ग्रन्थाचा

कर्ता हा होय. सङ्ग्रहाची स्तुति करितांना भाष्यकारांनीं 'शोभना खलु दाक्षायणस्य सङ्ग्रहस्य कृतिः' असें म्हटलें आहे व भाष्यकारांनी भाष्य लिहितांना त्या सङ्ग्रहग्रन्थाचा बराच उपयोग केला असावा असें दिसून येतें. पाणिनीला 'शालातुरीय' असें म्हटलें असल्यामुळें त्यावरून असें दिसून येतें कीं, वायव्य सरहद्द प्रान्तांतील शालातुर या ठिकाणचा पाणिनी रहिवासी होता. हें गांव अटक शहराजवळ असून तें आतां उजाड झालें आहे. परंतु पाणिनीय कालीं तें प्रसिद्ध शहर होतें व हूनशांग या चिनी प्रवाशाच्या वर्णनावरून असें दिसून येतें कीं, खिस्तोत्तर सातव्या शतकांत देखील तें शहर भरभराट-स्थितींत होतें. पाणिनीचा गुरु कोण होता हें कळण्यास कांही साधन नाहीं; परंतु आख्यायिका अशी आहे कीं, प्रसिद्ध आचार्य वर्ष त्याचा गुरु होता. पाणिनीच्या मृत्यूसंबंधानें पञ्चतन्त्रांत 'सिंहो व्याकरणस्य कर्तुरहरत् प्राणान् मुनेः पाणिनेः' असा श्लोक आढळतो. यावरून असें दिसून येतें कीं, पाणिनी कोठें तरी परगांवीं जंगल-मार्गानें जात असतां तो सिंहाकडून मारला गेला. ही जी वर त्रोटक माहिती दिली आहे त्याशिवाय पाणिनीसंबंधीं इतर कोणतीहि माहिती उपलब्ध नाहीं.

पाणिनी कोणत्या काळीं झाला याबद्दल विद्वान् लोकांत बराच मतभेद आहे. प्रो. मॅक्सम्युलरचें असें म्हणणें आहे कीं, 'इंद्रवरुणभव' सू. ५०५ या सूत्रांत 'यवन' असा निर्देश असल्यामुळें व हिंदुस्थानचा यवनांशीं जो व्यवहार सुरू झाला तो खिस्तपूर्व ३२७ मध्यें हिंदु-स्थानावर अलेक्झान्डर बादशहानें स्वारी केल्यानंतर सुरू झाला असल्यामुळें, अलेक्झान्डरच्या स्वारीनंतर अष्टाध्यायी रचली गेली असली पाहिजे. सारांश प्रो. मॅक्सम्युलरच्या मतें खिस्तपूर्व चवथ्या शतकाच्या उत्तरार्धांत पाणिनी झाला असला पाहिजे. या उलट सत्यव्रत सामश्रमीचें असें म्हणणें आहे कीं, पाणिनी खिस्तपूर्व चोविसाव्या शतकांत झाला. डॉ. बेलवलकर व म. म. हरप्रसाद

शास्त्री या दोघांनींहि वरील दोन्ही मतांचें खण्डन केलें आहे व ते म्हणतात कीं प्रो. गोल्डस्टकरनें आपल्या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें पाणिनी ख्रिस्तपूर्व सातव्या किंवा आठव्या शतकांत झाला असला पाहिजे.

पाणिनीनंतर जे अनेक वार्तिककार झाले त्यांत कात्यायन हा प्रमुख होता. हरप्रसाद शास्त्रींचें असें म्हणणें आहे कीं, अलाहबादच्या पश्चिमेस सुमारें तीस मैलांचे अन्तरावर यमुनेच्या कांठीं सध्यां जें कोसमनामक गांव आहे व ज्याला पूर्वीं कौशांबी म्हणत असत त्या ठिकाणचा राहणारा कात्यायन होय. पण पश्पशान्हिकांत 'यथा लौकिकवैदिकेषु' या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकारांनीं 'प्रियतद्धिता दाक्षिणात्याः' असें म्हटलें असल्यामुळें, त्यावरून हें सूचित होतें कीं, त्यांच्या मतें कात्यायन दाक्षिणात्य होता. तो ऐन्द्रसांप्रदायाचा अनुयायी असल्यामुळें त्यानें कित्येक पाणिनीय सूत्रांवर खंडनपर वार्तिकें केलीं आहेत व त्या वार्तिकांत त्यानें पाणिनीचे दोष दाखविले आहेत. तो ख्रिस्तपूर्व चवथ्या किंवा पांचव्या शतकांत झाला असावा. त्याच्यानंतर अनेक वार्तिककार झाले. त्यांपैकीं कित्येकांनीं कात्यायनाच्या कांहीं वार्तिकांचें खंडन करून पाणिनीचेंच म्हणणें बरोबर आहे असें म्हटलें आहे. हीं दोन्ही प्रकारचीं खंडनपर व मंडनपर वार्तिकें भाष्यांत दिलीं आहेत. हीं दोन्ही प्रकारचीं वार्तिकें एकाच वार्तिककारानें केलीं हें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं व पूर्व वार्तिककारानें खंडनपर वार्तिकें करून उत्तर वार्तिककारानें मंडनपर वार्तिकें केलीं आहेत हेंच म्हणणें सयुक्तिक दिसतें. भाष्यांत सौनाग, भारद्वाजीय, कुणि इत्यादि वार्तिककारांचीं सांप्रदायिक नांवें दिलीं आहेत.

महाभाष्यकार पतञ्जलि हा ख्रिस्तपूर्व द्वितीय शतकांत झाला. तो गोनर्द देशांत म्हणजे उज्जयनी व विदिशा–भिलसा–या दोन शहरांच्या मध्यें असलेल्या गोनर्दनामक शहरांत राहणारा असल्यामुळें

त्याला गोनर्दीय असें म्हणत असत. त्याच्या आईचें नांव गोणिका होतें. भाष्यांत कित्येक ठिकाणीं माहिष्मती, उज्जयिनी, पाटलिपुत्र व इतर नगरांचा निर्देश केला आहे. जेव्हां पुष्यमित्रानें आपल्या पाटलीपुत्रनामक राजधानींत अश्वमेध केला तेव्हां याजकवर्गापैकीं पतञ्जलि हा एक होता हें 'इह पुष्यमित्रं याजयाम:' या भाष्यवचनावरून दिसून येतें. पतञ्जलि जीवंत असतांनाच मिनॅन्डरनें साकेत व मध्यमिका या शहरांवर हल्ला करून त्यांना वेढा दिला व पुष्यमित्रानें त्यावेळीं ग्रीक लोकांशीं युद्ध करून त्यांचा पराभव केला. पुष्यमित्र हा ख्रिस्तपूर्व द्वितीय शतकांत झाला असल्यामुळें, भाष्यकार त्याच शतकांत झाले हें सिद्ध होतें. भाष्यकारांचा पाणिनीचे ठिकाणीं अत्यंत आदर व पूज्यभाव होता. त्यांनीं भाष्यांत ठिकठिकाणीं पाणिनीला 'भगवान्' असें संबोधिलें आहे व कित्येक ठिकाणीं 'प्रमाणभूत आचार्यो दर्भपवित्रपाणि: शुचाववकाशे प्राङ्मुख उपविश्य महता प्रयत्नेन सूत्राणि प्रणयति स्म तत्राशक्यं वर्णेनाप्यनर्थकेन भवितुं किं पुनरियता सूत्रेण' असें त्यांनीं भाष्यांत म्हटलें आहे व 'शोभना खलु पाणिने: सूत्रस्य कृति:' असेंहि त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. त्यांनीं भाष्य लिहितांना सङ्ग्रह ग्रन्थाचा बराच उपयोग केला असावा असें दिसून येतें व भर्तृहरीच्या वाक्यपदीय ग्रन्थांत महाभाष्याला 'सङ्ग्रह प्रतिकञ्चुक' असें म्हटलें आहे. भाष्यकारांनीं अत्यंत सुन्दर व सरळ भाषेंत महाभाष्य लिहिलें आहे. पण तें समजण्यास अनेक ठिकाणीं फार कठिण असल्यामुळें त्यावर कैयटानें प्रदीपनामक विस्तृत टीका ख्रिस्तोत्तर सुमारें अकराव्या शतकांत लिहिली व पुढें नागोजी भट्टांनीं प्रदीपावर उद्योतनामक टीका अठराव्या शतकांत लिहिली. या दोन टीकांच्या सहाय्यानेंच भाष्य नीट समजूं शकतें.

भाष्यकारांनीं महाभाष्यांत पाणिनीय सूत्रांचा अर्थ दिला नाहीं. त्या सूत्रांचा अर्थ स्पष्ट आहे असें गृहीत धरून भाष्यकारांनीं अमुक सूत्रांत अमुक शब्द आवश्यक आहे काय व सूत्र असणें आवश्यक आहे

काय आणि तसेंच त्या सूत्रावर रचलेलें वार्तिक असणें आवश्यक आहे काय इत्यादि विषयांची विस्तृत चर्चा केली आहे. पण भाष्य वाचल्यानें सूत्रार्थबोध होत नाहीं. भाष्यकारांच्या वेळीं जरी पाणिनीय सूत्रांचा सर्वांना स्पष्टपणें अर्थ कदाचित् अवगत होत असेल तरी कालान्तरानें त्या सूत्रांचा अर्थ कळणें अत्यन्त कठिण झालें व भाष्यांतील ही उणीव भरून काढण्याच्या हेतूनेंच काश्मीरदेशीय जयादित्य व वामन या बौद्ध पण्डितांनीं पाणिनीय सूत्रांवर काशिका नामक वृत्ति लिहिली. कित्येक असें म्हणतात कीं, जयादित्य हा काश्मीरचा राजा जयापीड असून वामन हा त्याचा प्रधान होता व जयापीड इ. स. ६६० मध्यें वारला असें इट्सिङगचें म्हणणें आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं ख्रिस्तोत्तर सातव्या शतकांत काशिका लिहिली गेली. पहिल्या पांच अध्यायांवरील वृत्ति जयादित्यानें लिहिली असून त्याच्या मरणानंतर बाकीच्या तीन अध्यायांवर वामनानें वृत्ति लिहिली अशी आख्यायिका सर्वत्र प्रसिद्ध आहे व दीक्षितांनीं देखोल मनोरमेंत जयादित्य व वामन या दोहोंमध्यें असणारा मतभेद स्पष्ट केला आहे. ही वृत्ति फारच सरळ व सोपी भाषेंत लिहिली असून प्रत्येक सूत्रांत पूर्व सूत्रांतून कोणतीं पदें अनुवृत्त होतात हें सांगितलें आहे व नंतर सूत्रार्थ देऊन अनेक समर्पक उदाहरणें व प्रत्युदाहरणें दिलीं आहेत व अशा रीतीनें सूत्रार्थ स्पष्ट केला आहे. या वृत्तींत प्रत्येक सूत्राचा अर्थ दिला असून कोणतेंहि सूत्र वगळलें नाहीं. या वृत्तीचाच बहुतेक आधार घेऊन रामचन्द्राचार्यांनीं प्रक्रियाकौमुदी व भट्टोजी दीक्षितांनीं सिद्धान्तकौमुदी लिहिली आहे व दोघांनींहि बहुधा काशिकेंतील उदाहरणें दिलीं आहेत. कौमुदीग्रन्थ तयार होण्यापूर्वीं पाणिनीय सूत्रांचा अर्थ कळण्याकरितां विद्यार्थी काशिकावृत्तीचेंच अध्ययन करीत असत. काशिकेपूर्वीं किंवा सुमारें त्याचकाळीं भर्तृहरीनें वाक्यपदीय नामक ग्रन्थ महाभाष्याच्या आधारें लिहिला होता. परंतु तो ग्रन्थ देखील चर्चात्मक असून त्यांत पाणिनीय

सूत्रांचा अर्थ दिला नसल्यामुळें, विद्यार्थिवर्गाच्या उपयोगाकरितां वामन व जयादित्य यांनीं काशिकावृत्ति लिहिली.

काशिकेवर दोन उत्कृष्ट टीका उपलब्ध आहेत. पहिल्या टीकेचें नांव काशिकाविवरणपञ्जिका किंवा काशिकान्यास असें असून त्या टीकेचा कर्ता श्रीबोधिसत्वदेशीयाचार्य जिनेन्द्रबुद्धि होय. हा बौद्ध पंडित ख्रिस्तोत्तर आठव्या शतकांत झाला असून त्या शतकाच्या पूर्वार्धांत त्यानें ही टीका लिहिली. हरदत्तानें लिहिलेली पदमञ्जरी ही दुसरी टीका होय. हरदत्त आन्ध्रदेशीय ब्राम्हण असून त्याच्या पित्याचें नांव पद्मकुमार व गुरूचें नांव अपराजित होतें. त्यानें आपल्या ग्रन्थांत कित्येक ठिकाणीं कैयटाचा दाखला दिला असल्यामुळें तो कैयटानंतर झाला हें स्पष्ट होतें. प्रदीपकार काश्मीरदेशस्थ कैयट हा जो मम्मटाचा बन्धु व शिष्य होता तो ख्रिस्तोत्तर अकराव्या शतकांत झाला असल्यामुळें, त्या शतकाच्या अखेरीस किंवा बाराव्या शतकाच्या प्रारंभीं हरदत्त झाला असावा.

पण काशिकाग्रन्थ व त्यावर दोन वरील विस्तृत व विद्वत्ताप्रचुर टीका निर्माण झाल्यानें पाणिनीय सूत्रांचा अर्थ पूर्णपणें कळण्याचें उत्कृष्ट साधन जरी उपलब्ध झालें व त्यामुळें सूत्रार्थ कळण्याची अडचण दूर झाली तरी, पाणिनीय शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या साधारण बुद्धीच्या विद्यार्थिवर्गाला त्या काळांत जी एक दुसरी अडचण पदोपदीं भासत होती ती कांहीं हे ग्रन्थ निर्माण झाल्यानें दूर झाली नाहीं. सन्धिकार्य करतेवेळीं व प्रत्येक प्रकारच्या अजन्त व हलन्त प्रातिपदिकांचीं व तसेंच धातूंची अनेक लकारांचीं रूपें सिद्ध करतेवेळीं ज्या अनेक पाणिनीय सूत्रांची गरज पडते तीं सर्व सूत्रें क्रमवार व प्रकरणवार पठित नसल्यामुळें, तशीं रूपें सिद्ध करितांना विद्यार्थ्यांना बराच त्रास पडत असे व ही त्यांची अडचण वरील ग्रथ निर्माण झाल्यावर देखील नाहींशी झाली नाहीं. पाणिनीनें अष्टाध्यायी तयार करतेवेळीं 'अल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतोमुखम् ।

अस्तोभमनवद्यंच सूत्रं सूत्रविदो विदुः' ही सूत्राची व्याख्या व तसेंच 'अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सवं मन्यन्ते वैयाकरणाः' हा प्रसिद्ध न्याय लक्षांत धरून सूत्ररचना केली. पाणिनीय कालांत जरी लिपी व लेखनकला होती तरी लेखनसामग्री फारच अपुरी असल्यामुळें व त्या कालांत जें पठन पाठन होत असे तें पोथीच्या सहायानें होत नसून गुरूनें मुखानें सूत्रोच्चारण करून सूत्रार्थ शिष्याला नीट रीतीनें समजवून देणें व शिष्यानें तें सूत्र पाठ करणें अशा रीतीनें होत असल्यामुळें, पाणिनीला जेवढ्या थोड्या अक्षरांचीं सूत्रें तयार करणें शक्य असेल तशीं सूत्रें करावीं लागलीं व तशीं अल्पाक्षरसूत्रें तयार करण्याकरितां त्याला ठिकठिकाणीं लघु संज्ञा कराव्या लागल्या व गणपाठ आणि धातुपाठ तयार करावा लागला आणि अनुवृत्तीची मदत घ्यावी लागली व कित्येक ठिकाणीं संक्षिप्त लुप्तविभक्तिक व आर्ष प्रयोग देखील करावे लागले. तसेंच 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ व 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ अशीं त्यानें सूत्रें पठित केलीं असल्यामुळें, त्या दोन सिद्धान्तांना धरून त्याला सूत्रपाठक्रम ठरवावा लागला. त्याचप्रमाणें अनेक सूत्रांत एखादें पद किंवा पदसमुदाय उच्चारण्याची गरज न पडावी याकरितां त्यानें कांहीं अधिकारसूत्रें पठित केलीं व ज्या अधिकारांत जेवढीं सूत्रें अन्तर्भूत होत असतील तेवढीं सर्व सूत्रें त्या अधिकारांत पठित केलीं. उदाहरणार्थ 'आ कडारादेका संज्ञा' सू. २३२ व 'असिद्धवदत्राभात्' सू. २१८३ हीं दोन अधिकार सूत्रें आपण घेऊं. प्रथम अधिकारसूत्राखालीं पाणिनीला अशा सर्व संज्ञा पठित कराव्या लागल्या कीं ज्यांपैकीं उत्तरसंज्ञा पूर्वसंज्ञेचा बाध करिते. द्वितीय अधिकार सूत्राखालीं त्याला अशीं सर्व सूत्रें पठित करावीं लागलीं कीं, जेथें समाननिमित्तक उत्तरकार्य करतेवेळीं पूर्वकार्य असिद्ध ठरतें, म्हणजे तें पूर्वकार्य झालेंच नाहीं असें मानून उत्तरकार्य करतां येतें. या सर्व कारणांमुळें पाणिनीला सूत्रपाठ विशिष्ट क्रमानें करावा लागला. पाणिनीय सूत्रपाठक्रम अशा रीतीनें जरी सर्व तऱ्हेनें योग्य ठरतो तरी, एखाद्या रूपाची

सिद्धि करण्याकरितां ज्या अनेक सूत्रांची प्रवृत्ति करावी लागते तीं सर्व सूत्रें अष्टाध्यायींत एके ठिकाणीं क्रमवार पठित नसून भिन्न भिन्न स्थलीं पठित असल्यामुळें, रूपांची सिद्धि करतेवेळीं विद्यार्थिवर्गाला फार अडचण भासत असे. ही अडचण दूर करण्याकरितां कौमुदीग्रन्थ निर्माण झाले. इ. स. अकराव्या शतकांत विमलसरस्वतीनें रूपमाला नामक ग्रन्थ तयार केला व सिंहलद्वीपस्थ धर्मकीर्तीनें रूपावतारनामक ग्रन्थ लिहिला. पण हे दोन्ही ग्रन्थ फारच त्रोटक असल्यामुळें रामचन्द्राचार्यांनीं प्रक्रियाकौमुदी नामक ग्रन्थ तयार केला व त्या ग्रन्थांत इष्ट रूपांची सिद्धि करतेवेळीं ज्या अनेक सूत्रांची प्रवृत्ति करावी लागते तीं सर्व सूत्रें एके ठिकाणीं क्रमवार पठित केलीं व पाणिनीय सूत्रांची प्रकरणवार विभागणी केली. त्या ग्रन्थाच्या सहायानें इष्ट रूपांची सिद्धि करण्यांत विद्यार्थिवर्गाची अडचण दूर झाली व त्या ग्रन्थाचा आधार घेऊनच व सूत्रक्रमांत कांहीं ठिकाणीं फेरबदल करून दीक्षितांनीं अष्टाध्यायींतील कोणतेंहि सूत्र न वगळतां सिद्धान्तकौमुदी तयार केली. सारांश कौमुदीरूपानें अष्टाध्यायी तयार करण्याचें श्रेय प्राधान्येंकरून रामचन्द्राचार्यांनाच आहे हें म्हणण्यांत कांहीं अतिशयोक्ति होत नाहीं.

रामचन्द्राचार्य हा कृष्णाचार्याचा पुत्र होता. याचें उपनांव शेष असून गोत्र कौण्डिन्य होतें व हा ऋग्वेदी ब्राम्हण असून व आंध्र देशांतील श्रेष्ठ कुलांत याचा जन्म झाला असून हा वैष्णवसांप्रदायी तैलंग ब्राम्हण होता. यानें प्रक्रियाकौमुदीच्या प्रारंभीं व अखेरीस विठ्लास प्रणाम केला आहे व याच्या पौत्रानें देखील प्रसादटीकेच्या आरभीं पंढरपूरच्या विठ्ठलाची स्तुति करून विठ्ठलाला 'विशिष्टेष्टदेवता' असें आपल्या टीकेंत म्हटलें आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, पंढरपूरचा विठ्ठल या कुलाचें उपास्य दैवत होतें. रामचन्द्र जरी आंध्रदेशीय होता तरी तो कोणत्या गांवीं राहत होता हें कळत नाहीं. याचा पिता सकलशास्त्रप्रवीण असून यानें आपला पिता व पित्याचा

बन्धु गोपालाचार्य यांच्या जवळ सकलशास्त्राध्ययन केलें होतें. यानें प्रक्रियाकौमुदी, कालनिर्णयदीपिका व वैष्णवसिद्धान्तदीपिका हे तीन ग्रन्थ लिहिले. याचा पुत्र नृसिंह असून प्रसादकर्ता विठ्ठल हा नृसिंहाचा पुत्र होता. रामचन्द्राच्या कालासंबंधानें विद्वान लोकांत बराच मतभेद दिसतो. डॉ. भाण्डारकर म्हणतात कीं, तो इ. स. १४५० मध्यें झाला. रा. ब. के. पी. त्रिवेदी यांचें म्हणणें आहे कीं, तो इ. स. चौदाव्या शतकांत झाला. परंतु म. म. हरप्रसाद शास्त्री म्हणतात कीं, तो इ. स. तेराव्या शतकांत झाला आणि कोलब्रुक साहेबाचें म्हणणें देखील असेंच दिसतें. इ. स. १४३७ मध्यें लिहिलेली प्रक्रिया-कौमुदीची प्रत डेकन कॉलेजच्या लायब्ररींत उपलब्ध असून त्याहि पूर्वी इ. स. १४२० मध्यें लिहिलेली प्रत बनारस येथील गव्हरमेंट संस्कृत कालेजच्या पुस्तकसङ्ग्रहालयांत उपलब्ध आहे. म्हणून रामचन्द्राचार्य इ. स. १४५० मध्यें झाला हें डॉ. भाण्डारकरांचें म्हणणें बरोबर मानतां येत नाहीं. मल्लीनाथ इ. स. चौदाव्या शतकांत झाला असून त्याच्या पूर्वी हेमाद्रि झाला व हेमाद्रीनें आपल्या रघुवंशाच्या टीकेंत–पहा सर्ग १५ श्लोक ६९–प्रसादटीकेचा उल्लेख केला आहे. त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, रामचन्द्राचार्य तेराव्या शतकाच्या प्रारंभीं झाला असून त्या शतकाच्या उत्तरार्धांत त्याचा पौत्र प्रसादकार विठ्ठल झाला असावा.

डॉ. ऑफ्रेक्टच्या म्हणण्याप्रमाणें प्रक्रियाकौमुदीवर सहा टीका लिहिल्या गेल्या. त्यांपैकी विठ्ठलाची प्रसादटीका ही एक असून दुसरी टीका भट्टोजी दीक्षितांचे गुरु पाराशरगोत्रीय श्रीकृष्ण शेष यांनीं लिहिली आहे व तिचें नांव प्रक्रियाप्रकाश आहे. शेषकृष्णांच्या वडिलाचें नांव नृसिंहाचार्य होतें व शेष घराण्याचा वंशवृक्ष पुढे दिल्याप्रमाणें आहे––

नृसिंहाचार्य

श्रीकृष्ण (भट्टोजी दीक्षितांचे गुरु व प्रकाशकर्ते)   चिन्तामणि

वीरेश्वर   नारायण
(पं. जगन्नाथरायाचे गुरु)

पुरुषोत्तम   चक्रपाणि

नृसिंहाचार्याला विजयानगरच्या राजसभेनें भट्टभट्टारक ही पदवी दिली होती हें शेषकृष्णांनी केलेल्या मुरारिविजय नाटकावरून दिसून येतें. या घराण्याचें वास्तव्य गोदाकांठच्या प्रान्तांत असून या घराण्याचा मूळ पुरुष विश्वरूप होता हें वरील नाटकांतील पुढें दिलेल्या उताऱ्यावरून स्पष्ट होतें–'अस्ति किल दाक्षिणात्यस्य गोदारोधोवास्तव्यस्य श्रीमद्विश्वरूपवंशवनमुक्तामणेरधि विद्यानगरसभं विद्वद्वृन्दवितीर्णभट्टभट्टारकापरनाम्नो भट्टनृसिंहस्यात्मजः कृष्णभट्टो नाम महाविद्वत्कविः।' रा. ब. वासुदेव अनंत बांबर्डेकर यांचे असें म्हणणें आहे कीं, ज्यानें याज्ञवल्क्यस्मृतीवर विस्तृत टीका लिहिली व जिचा उल्लेख विज्ञानेश्वरानें मिताक्षरेंत केला आहे तो हा बहुधा विश्वरूप असावा. शेषकृष्णाचा बन्धु चिन्तामणि यानें रसमञ्जरीवर जी परिमल नांवाची टीका लिहिली आहे तींत त्यानें अखेरीस 'श्रीनृसिंहचरणोपासिना ब्रध्नपुरनिवासिना श्रीशेषचिन्तामणिना निर्मितो रसमञ्जरीपरिमलः समाप्तः।' असें म्हटलें असल्यामुळें त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, या शेषघराण्याचें राहण्याचें मूळ ठिकाण ब्रध्नपूर असून या कुलाचें श्रीनृसिंह हें उपास्य दैवत होतें. ब्रध्नपूर हें गांव

राजमहेन्द्रीपासून सुमारें ४० मैलांवर असून तेथें चारशें किंवा पांचशें आंध्रब्राम्हणांचीं घरें आहेत व त्या गावांत नृसिंहाचें देवालय असून नृसिंहाची मूर्ति पुरुषभर उंच आहे व दरवर्षी तेथें नृसिंहाची यात्रा भरत असून मोठ्या थाटानें रथोत्सव होत असतो. शेषकृष्णांनीं आपल्या पित्याजवळ सर्व शास्त्रांचा अभ्यास करून इ. स. पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धांत ते काशीस राहण्यास गेले व तेथेंच स्थायिक झाले आणि हे प्रखर विद्वान पण्डित असल्यामुळें यांची लौकरच सर्वत्र प्रसिद्धि झाली. पण्डितप्रकाण्ड द्राविड अप्पैया दीक्षितांचे व तसेंच नारायणभट्टांचे चिरंजीव व भट्टोजी दीक्षितांचे उत्तरगुरू शंकरभट्ट हे दोघेहि यांचे समकालीन होते. अकबर बादशहाचा प्रधान तोडरमल याचा जो पुत्र गिरिधारी होता त्याचा श्रीकृष्णशेषांना आश्रय मिळाल्यामुळें त्यांचा दिल्लीदरबारच्या पण्डितसभेंत प्रवेश झाला व जहांगीरचे काळीं त्यांचें मधून मधून दिल्लीस राहणें सुरू झालें. त्यांनीं गिरिधारिप्रभृति बड्या सरदारांसमोर स्वतः रचलेल्या कंसवध नाटकाचा प्रयोग करून दाखविल्यामुळें त्यांचा सर्वत्र गौरव झाला. अलाहबादजवळ असलेल्या पत्रपुञ्जसंस्थानच्या बिरबलनामक राजानें त्याचा पुत्र जो कल्याण त्याला व्याकरणशास्त्रांत प्रवीण करावें अशी शेषकृष्णांना विनंति केल्यावर शेषकृष्णांनीं प्रक्रिया-कौमुदीवर प्रकाशटीका लिहिली व बहुधा ही टीकाच त्यांची सर्वत्र प्रसिद्धि होण्यास व त्यांचा दिल्लीदरबारच्या पण्डितसभेंत प्रवेश होण्यास कारण झाली असली पाहिजे. राजा बिरबल इ. स. १५८६ मध्यें वारला. त्यावरून हरप्रसादशास्त्री म्हणतात---' Vira-Vala died in 1586 A. D. The request for writing Prakriya-Prakash must have been made when Kalyan was very young. So I put it down in the sixties of the century. Bhattoji must have read with SeshKrishna when the Prakriya Prakash was in the making. Perhaps he and Kalyan read together. ' पण हें त्यांचें

म्हणणें बरोबर मानल्यास भट्टोजी दीक्षितांचा जन्मकाल इ स. १५५० च्या सुमारें वीस वर्ष पूर्वीचा मानावा लागेल; कारण १५५०–१५६० च्या दरम्यान प्रकाशटीका लिहिली जात असतांना जर श्रीकृष्णशेषांनीं त्यांना ती पढविली तर त्यावेळीं भट्टोजी दीक्षितांचें वय सुमारें २५ तरी असलें पाहिजे, म्हणजे त्यांचा जन्म सुमारें इ. स. १५३० मध्यें झाला असावा असें मानणें भाग आहे. पण इ. स. १६२६ चे सुमारास त्यांचा जो जगन्नाथ पण्डिताशीं कडाक्याचा वादविवाद झाला त्याच्यानंतर लौकरच सुमारें इ. स. १६३० मध्यें त्यांच्या सुमारें ७५ व्या वर्षी त्यांचा अन्त झाला असल्यामुळें, त्यांचा जन्म सुमारें इ. स. १५५५ मध्यें झाला असला पाहिजे. म्हणून श्रीकृष्णशेषांच्या प्रसिद्धीला व त्यांचा दिल्लीदर-बारच्या पण्डितसभेंत प्रवेश होण्याला प्रामुख्यानें कारणीभूत झालेली प्रकाशटीका जरी इ. स. १५६० च्या सुमारास लिहिली गेली असली तरी, शेषकृष्णांनीं भट्टोजी दीक्षितांना ती टीका इ. स. १५८० चे सुमारास पढविली असली पाहिजे हेंच मानणें योग्य दिसतें. कंसवध व प्रक्रियाप्रकाश या दोन ग्रंथांखेरीज श्रीकृष्णशेषांनीं पारिजातहरण-चम्पू, उषापरिणय, मुरारिविजय, सत्यभामापरिणय, सत्यभामा-विलास व क्रियागोपनकाव्य हे ग्रंथ लिहिले आहेत.

भट्टोजी दीक्षित तैलंग ब्राम्हण होते. ते ऋग्वेदी होते किंवा कृष्णयजुर्वेदी हें निश्चयपूर्वक सांगणें कठिण आहे. त्यांनीं तैत्तिरीय संध्याभाष्य लिहिलें असल्यामुळें ते कृष्णयजुर्वेदी असले पाहिजेत असें कित्येकांचें म्हणणें आहे. इतरांचें असें म्हणणें आहे कीं, त्यांनीं कौमु-दींत व मनोरमेंत ऋग्वेदाचींच उदाहरणें विशेषेंकरून दिलीं असून आपल्या सिद्धान्ताच्या समर्थनार्थ त्यांनीं ऋग्वेदीय शौनक प्रतिशा-ख्याचा आधार दिला असल्यामुळें ते ऋग्वेदी ब्राम्हण असले पाहिजेत व एक गृहस्थ असेंहि म्हणतात कीं, भट्टोजींनीं जसें तैत्तिरीय सन्ध्या-भाष्य लिहिलें आहे तसेंच ऋग्वेदी सन्ध्याभाष्य व ऋग्वेदभाष्यसार

देखील लिहिलें आहे. म्हणून दीक्षित कृष्णयजुर्वेदीच होते हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. पण ते ऋग्वेदी असोत किंवा कृष्णयजुर्वेदी असोत ते तैलंग ब्राम्हण होते हें मात्र खास आहे; कारण त्यांच्या शिष्यपरंपरेंत हेंच सांगण्यांत येतें कीं, ते तैलंग ब्राम्हण होते. म. म. भटजीशास्त्री घाटे व प्रसिद्ध सदाशिवशास्त्री घुले यांचे पौत्र म. म. भाऊशास्त्री घुले हे म्हणत असत कीं भट्टोजी तैलंग ब्राम्हण होते आणि शिष्यपरंपरेंत प्रसिद्ध असलेली अशा प्रकारची पुरातन वार्ता विश्वासार्ह आहे. कित्येक म्हणतात कीं, भट्टोजी महाराष्ट्र ब्राम्हण होते. पण तसें म्हणण्याचें कारण एवढेंच दिसतें कीं, भट्टोजी दीक्षित बरेच दिवस काशींत राहून महाराष्ट्र ब्राम्हणांशीं समरस झाले असल्यामुळें व महाराष्ट्र ब्राम्हणांशींच त्यांच्या वंशजांचा विवाहसंबंध घडून आला असल्यामुळें त्यांना महाराष्ट्र ब्राम्हण म्हणतात. कित्येकांनीं असें विधान केलें आहे कीं, भट्टोजी दीक्षित शेणवी होते. पण हें म्हणणें निःसंशय चूक आहे. भट्टोजींच्या काळांत शेणवी ब्राम्हण मानले जात नसत. त्यापुढें अनेक वर्षांनंतर शिवाजीचे काळीं गागाभट्ट इत्यादि पंडित लोकांनीं राजसभेंत असा निर्णय दिला कीं, शेणवी जरी पूर्वीं ब्राम्हण होते तरी अभक्ष्यभक्षणाचें सेवन केल्यानें ते भ्रष्ट झाले असल्यामुळें त्यांनीं प्रायश्चित्त घेऊन अध्ययन दान व यजन हीं तीन कर्में करावीं व अध्यापन, प्रतिग्रह व याजन हीं कर्में करूं नयेत. अजून देखील कर्मनिष्ठ ब्राम्हण त्यांच्याशीं रोटीबेटी व्यवहार करीत नाहींत. म्हणून जर भट्टोजी दीक्षित शेणवी असते तर शेषकृष्णासारख्या कर्मठ वैष्णवानें व अप्पैयानें त्यांचे त्या कालांत गुरुत्व पत्करलें नसतें व वरदराज, नीलकण्ठ शुक्ल इत्यादिकांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें नसतें आणि तसेंच नागोजी भट्टांनीं हरि दीक्षितांजवळ शास्त्राध्ययन केलें नसतें. दुसरें असें कीं, जर भट्टोजी शेणवी असते तर जगन्नाथपंडितानें त्यांना जी शिव्यांची लाखोली वाहिली आहे तींत तो त्यांच्या जातीचा निर्देश केल्याशिवाय कधींहि राहिला

नसता. विशेषेंकरून जेव्हां भट्टोजी दीक्षितांनीं जगन्नाथपंडिताला म्लेंछ म्हटलें तेव्हां जगन्नाथानें तशाच शेलक्या शद्बांत त्यांचा जातिनिर्देश करून त्यांना शिवी दिली असती. म्हणून भट्टोजी दीक्षित शेणवी ब्राम्हण होते हें म्हणणें निराधार व चूक ठरतें. याहिपेक्षां अधिक चमत्कारिक व हास्यास्पद विधान पं. ज्वालाप्रसाद मिश्र, मुरादाबाद, यानीं केलें आहे. त्यानीं सिद्धान्तकौमुदीचें हिन्दींत भाषान्तर केलें असून त्याच्या आरंभीं जी प्रस्तावना लिहिली आहे तींत ते असें म्हणतात कीं, भट्टोजी दीक्षित कान्यकुब्ज ब्राम्हण असून कनौजच्या राजाचे इ. स. बाराव्या शतकांत सभापति होते. त्यानीं दीक्षितांना चार शतक मागें ओढलें असून कान्यकुब्ज ब्राम्हणांत ढकललें आहे. या विधानाचें खण्डन करण्याच्या भरीस पडणें हें त्याला व्यर्थ महत्व देणें होय. म्हणून 'स्वरूपव्याक्रियैव पराक्रिया' या न्यायान्वयें त्यांच्या मताचा निर्देश करणें हेंच त्याचें समर्पक खण्डन होय.

प्राचीन संस्कृत ग्रन्थकार आपल्या ग्रन्थांत स्वत:विषयीं कांहींच माहिती नमूद करून ठेवीत नसल्यामुळें त्यांच्या कालाचा निर्णय करणें किंवा त्यांचे चरित्र लिहिणें फारच कठीण जातें. ज्या वर्षी त्यांनीं आपला ग्रन्थ तयार केला तें वर्ष जर त्यांनीं आपल्या ग्रन्थांत लिहिलें असतें तर त्यांच्या कालाचा निर्णय सहज करतां येऊ शकला असता. परंतु दुर्दैवानें त्या काळांत तशी प्रथाच नव्हती. म्हणून भट्टोजी दीक्षित कोणत्या वर्षीं जन्मले व कोणत्या वर्षीं वारले हें निश्चयेंकरून सांगतां येऊं शकत नाहीं. तथापि त्यांच्या कालाचा सामान्यत: निर्णय करण्याचा मी येथें प्रयत्न करीत आहे. पण त्यांच्या कालाचा निर्णय करण्याकरिता त्यांचे गुरु अप्पैया दीक्षित यांच्या कालाचा निर्णय प्रथम करणें आवश्यक आहे. भट्टोजी दीक्षितांनी श्रीकृष्णशेषाजवळ महाभाष्यान्त संपूर्ण व्याकरणशास्त्र शिकून व नंतर प्रसिद्ध नारायणभट्टांचे चिरंजीव शंकरभट्ट यांचेजवळ वेदान्तशास्त्राचें व मीमांसाशास्त्राचें

साधारण अध्ययन करून पुढें सिद्धान्तकौमुदी लिहिली. त्याकाळीं अप्पैया दीक्षित हे महाविद्वान् व सर्वशास्त्रपारङ्गत पण्डित गणले जात होते व त्यांनीं वेदान्तावर व मीमांसेवर अनेक विद्वत्ताप्रचुर ग्रन्थ लिहिले असल्यामुळें आणि ते मीमांसकमूर्धन्य मानले जात असल्यामुळें त्यांची उत्तर हिन्दुस्थानांत सर्वत्र कीर्ति पसरली होती व काशींत देखील त्यांच्या ग्रन्थांची सर्वत्र प्रशंसा होत होती. म्हणून भट्टोजी दीक्षितांनीं आपल्या सिद्धान्तकौमुदीची एक प्रत त्यांच्याकडे मुद्दाम पाठविली व त्यांच्याकडून भट्टोजी दीक्षितांचा ग्रन्थ फारच उत्तम रीतीनें लिहिला गेला आहे असा प्रशंसापर संदेश देखील भट्टोजींना आला होता अशी किंवदन्ती प्रचलित आहे. म्हणून त्यांच्याजवळ वेदान्त व मीमांसा या दोन गहन शास्त्रांचें अध्ययन करावें अशी भट्टोजींना इच्छा झाली व त्यावेळीं त्यांचे कनिष्ट बन्धु रङ्गोजी देखील द्रावीड-प्रान्तांत राहत असल्यामुळें, त्यांनीं सेतुबन्धरामेश्वरच्या यात्रेला जाण्याचा व अप्पैयांचें दर्शन घेण्याचा निश्चय केला आणि त्याप्रमाणें ते रामेश्वरास जावयास निघाले. वाटेंत चिदंबरम् हें पवित्रक्षेत्र पडत असल्यामुळें व त्यावेळीं तेथें अप्पैया दीक्षित राहत असल्यामुळें त्यांनीं तेथें मुक्काम केला व ते अप्पैयांच्या दर्शनास गेले. आख्यायिका अशी आहे कीं, त्यावेळीं कर्मधर्मसंयोगानें अप्पैया दीक्षित आपल्या विद्यार्थ्यांना भट्टोजींची सिद्धान्तकौमुदी पढवीत होते. भट्टोजींनीं स्वतः-बद्दल कांहीं माहिति न देतां ते तेथें पाठ ऐकत बसले. कौमुदीचा पाठ झाल्यावर अप्पैयानीं आपल्या विद्यार्थ्यांना असें सांगितलें कीं, जरी भट्टोजींनीं अशीं विधानें केलीं आहेत तरी तीं भाष्यविरुद्ध दिसतात व त्यांना भाष्य वाचून दाखविलें. त्यावर दीक्षितांनीं आपल्या मताचें समर्थन करण्याकरितां असें म्हटलें कीं, भाष्याचा आशय अप्पैयांनीं सांगितल्याप्रमाणें नसून कौमुदींत जे सिद्धान्त सांगितले आहेत त्यांच्या-सारखा वास्तविक भाष्याचा आशय आहे. दोन तीन दिवस असेंच झालें. अप्पैया दीक्षितांनीं कौमुदींत दिलेल्या सिद्धान्तांविरुद्ध भाष्याचा

अर्थ सांगावा व भट्टोजींनीं भाष्याचा आशय वेगळा आहे असें सांगून कौमुदींतील सिद्धान्तांचें उत्तम रीतीनें समर्थन करावें. हें पाहून अप्पैया दीक्षित आश्चर्यचकित झाले व त्यांना असें वाटलें कीं, हा महाविद्वान् पण्डित बहुधा भट्टोजी दीक्षितच असावा. म्हणून त्यांनीं तुम्ही भट्टोजी दीक्षित आहांत काय असा भट्टोजींना स्पष्टच प्रश्न केला. मी तोच आहे हें भट्टोजींना कबूल करावें लागलें व त्यांनीं अप्पैयांस विनयपूर्वक नमस्कार करून आपण कोणत्या हेतूनें येथें आलों आहों हें अप्पैयांना कळविलें. हें ऐकून अप्पैयांना फारच आनंद झाला. (पहा सूब्रमण्य शास्त्रिकृत श्रीमदप्पैयदीक्षितेन्द्रविजय पान ९७–९८) एवढा महाविद्वान् पुरुष प्रसिद्ध काशी विद्यापीठ सोडून व एवढ्या लांबचा प्रवास करून मजकडे शिक्षणार्थ आला आहे हें त्यांनीं ऐकल्यावर त्यांनीं भट्टोजीला प्रेमालिङ्गन दिलें व तेव्हांपासून जें त्यांच्यांत प्रेम जडलें तें अखेरपर्यंत कायम राहिलें. नंतर भट्टोजी रामेश्वरच्या यात्रेकरितां रवाना झाले व यात्रा करून परत आल्यावर ते अप्पैया जवळ सुमारें तीन वर्षं राहिले. तेवढ्या अवधींत त्या कुशाग्रबुद्धि भट्टोजीला त्यांनीं शांकरभाष्यापासून परिमलापर्यंत सर्व वेदान्तग्रन्थ व तसेंच मीमांसाग्रन्थहि शिकविले. हें शिक्षण पूर्ण झाल्यावर ते भट्टोजीला केलदीचा राजा व्यंकटपति याजकडे भेटीस घेऊन गेले. व्यंकटपति हा स्वतःविद्वान् व अप्पैयादीक्षितांसारखा कट्टा अद्वैतमताचा पुरस्कर्ता होता. अप्पैयानीं भट्टोजींची प्रशंसा करून त्यांची ओळख करून दिल्यावर व्यंकटपति फार प्रसन्न झाला. त्यावेळीं रङ्गोजी दीक्षित देखील व्यंकटपतीच्या आश्रयास येऊन राहिले होते. कांहीं दिवस तेथें मुक्काम केल्यावर व्यंकटपतीनें भट्टोजींना विनंति केली कीं, त्यांनीं अद्वैतसिद्धान्तावर एक उत्तम ग्रन्थ लिहावा व राजाच्या आज्ञेनुसार भट्टोजींनीं तत्वकौस्तुभनामक ग्रन्थ लिहिला. त्या ग्रन्थांत त्यांनीं 'केलदीव्यंकटेन्द्रस्य निर्देशाद्विदुषां मुदी ध्वान्तोच्छित्तौ पटुतरस्तन्यते तत्वकौस्तुभः ॥' असें स्पष्ट म्हटलें आहे. या नंतर व्यंकटपतीनें

त्यांचा गौरव करून त्यांची रवानगी केली. पुढें भट्टोजी कांहीं दिवस अप्पैयाजवळ राहून त्यांच्या निर्देशानुसार त्यांनीं मीमांसेवर एक उत्तम ग्रन्थ लिहिला. हें सर्व काम आटोपल्यावर भट्टोजी अप्पैया दीक्षितांसह काशीस परत जावयास निघाले. अप्पैया दीक्षित सुमारें तीन वर्षं काशींत राहून नंतर आपल्या गावीं परत आले व तेथें लौकरच सुमारें दोन तीन वर्षांनीं त्यांचें देहावसान झालें.

अप्पैया दीक्षितांच्या कालासंबंधीं देखील मतभेद दिसून येतो. शिवानन्दयोगीन्द्रानें अप्पैयांची नष्टजातक पत्रिका देऊन असें म्हटलें आहे कीं, अप्पैयांचा जन्म १८ सप्टेंबर १५५३ मध्यें झाला व ते १६२६ सालीं वारले. अप्पैयांचा वंशज देखील असें म्हणतो कीं, १५५४–१६२६ हा अप्पैयांचा काल होय. पण मद्रास ओरिअँटल जर्नल १९२८ व १९२९ यांत महालिङ्गशास्त्री, मद्रास, यांनीं दोन विद्वत्ताप्रचुर लेख अप्पैयांबद्दल लिहिले आहेत व त्यांत त्यांनीं असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, अप्पैया दीक्षित इ. स. १५२० सालीं जन्मले व १५९३ सालीं त्यांचा मृत्यु झाला. या सिद्धान्ताच्या समर्थनार्थ त्यांनीं जीं अनेक प्रमाणें दिलीं आहेत त्यांपैकीं एक हें आहे कीं, पाण्डयवंशांतील राजा चंद्रशेखर राज्य करीत असतां त्यानें त्यावेळीं तरुणावस्थेंत असलेल्या अप्पैयांची कीर्ति ऐकली व आपल्या दरबारांतील पण्डितांना अप्पैयाबरोबर वादविवाद करावा असें आव्हान केलें. तेव्हां त्या दरबारांतील रत्नखेतनामक पण्डित अप्पैयाशीं वादविवाद करण्यास तयार झाला. त्यावर चंद्रशेखरानें अप्पैयांस पाचारण केलें व अप्पैया तेथें आल्यावर त्याचा रत्नखेताशीं वादविवाद झाला. वादांत रत्नखेत पराभूत झाला व त्यानें अविवाहित अप्पैयाला आपली कन्या माणिकाम्बा मोठ्या प्रेमानें अर्पण केली. हें जें पाणिग्रहण घडवून आणलें त्याला राजा चंद्रशेखर मुख्यत्वेंकरून कारण झाला. राजा चंद्रशेखर १५४२ सालीं वारला. यावरून हें सिद्ध होतें कीं, अप्पैया दीक्षित त्यावेळीं २०–२२ वर्षांचा असावा. हें

जें प्रमाण महालिङ्गशास्त्रीनें दिलें आहे तें ऐतिहासिक दृष्टचा खरें असल्यास, अप्पैयांचा जन्म १५५३ किंवा १५५४ सालीं झाला हें जें इतरांनीं विधान केलें आहे तें चूक ठरतें. दोन्ही पक्षांना हें मान्य आहे कीं, अप्पैया दीक्षित ७३ वर्षाचे असतांना वारले. म्हणून जर अप्पैयांचा जन्म १५२० सालीं झाला हें खरें मानलें तर १५९३ सालीं त्यांचें देहावसान झालें हें आपोआपच सिद्ध होतें. महालिङ्ग-शास्त्रीनीं जीं अनेक कारणें दिलीं आहेत त्यांवरून मला अल्प मतीनें असें वाटतें कीं, त्यांचें विधान बरोबर आहे व व्ही. के. रामस्वामी शास्त्री एम्. ए. यानीं इंग्रजी भाषेंत जें जगन्नाथ पण्डितांचें चरित्र लिहिलें आहे त्यांत देखील त्यानीं असेंच मत पान २१ मध्यें प्रदर्शित केलें आहे. अशा रीतीनें अप्पैया दीक्षितांचा काल १५२०–१५९३ मानल्यास, भट्टोजींचा १५७५–१६३० हा जो काल सध्यां मानला जातो तो त्यांच्या जन्मकालासम्बंधानें कांहीं वर्षें मागें ढकलणें आवश्यक आहे; कारण महाभाष्यान्त व्याकरणशास्त्राचें व प्रक्रिया-कौमुदी, प्रसाद, प्रकाश, काशिका, न्यास, पदमञ्जरी इत्यादि व्याकरणशास्त्रावरील अनेक ग्रन्थांचें श्रीकृष्णशेषांजवळ संपूर्ण अध्ययन करून व पुढें शंकरभट्टाजवळ वेदान्तशास्त्र व मीमांसाशास्त्र शिकून आणि नंतर सिद्धान्तकौमुदी लिहून भट्टोजी दीक्षित जेव्हां रामेश्वरचे यात्रेस गेले तेव्हां त्यांचें वय निदान ३० तरी असलें पाहिजे. म्हणून त्यांच्या यात्रेचा काल सुमारें १५८६ ठरतो व ते अप्पैयांजवळ सुमारें तीन वर्ष राहून व दोन ग्रन्थ लिहून अप्पैयांबरोबर काशीस १५८९ सालचे सुमारास परत आले असावेत व काशींत अप्पैया दीक्षित सुमारें दोन वर्ष राहून नंतर आपल्या गावीं परत गेले व तेथें त्यांचें १५९३ सालीं देहावसान झालें. सारांश अप्पैया दीक्षितांचा काल १५२०–१५९३ मानल्यास भट्टोजींचा काल १५५५–१६३० मानणें योग्य ठरतें.

दुसरें असें कीं, भट्टोजी दीक्षित व त्यांचे धाकटे बंधु रङ्गोजी

दीक्षित हे दोघेहि नृसिंहाश्रमाचे शिष्य होते. नृसिंहाश्रमस्वामी पुरुषोत्तमपुरास राहत असतांना त्यांनीं संवत् १६०४=इ. स. १५४७ मध्यें तत्वविवेकदीपन नामक वेदान्तावर ग्रन्थ लिहिला होता हें त्या ग्रन्थांतील पुढील श्लोकावरून स्पष्ट होतें:–'अब्दे वेदवियद्रसेन्दुगणिते पौषासिते श्रीदिने । रक्षोनामनि पूरुषोत्तमपुरे ग्रन्थं मुदाऽचीकरत् ॥' भट्टोजी दीक्षितांनीं त्या ग्रन्थावर तत्वविवेकदीपनव्याख्यानामक टीका लिहिली. रङ्गोजी भट्टांनीं देखील जो अद्वैतचिन्तामणिनामक ग्रन्थ लिहिला त्या ग्रन्थांत त्यांनीं मधून मधून नृसिंहाश्रमाच्या ग्रन्थांतील उतारे देऊन 'तदुक्तं श्रीनृसिंहाश्रम गुरुचरणैः' असें म्हटलें आहे. एका लेखावरून असें दिसून येतें कीं, अप्पैया दीक्षित देखील नृसिंहाश्रमांना गुरुतुल्य मानीत असत व त्यांच्या आज्ञेवरूनच त्यांनी कल्पतरूवर परिमलनामक प्रसिद्ध टीका लिहिली. (पहा रा. ब. बांबर्डेकरकृत भट्टोजिदीक्षित ज्ञातिविवेक पा. ३०६ टीप १) हें जर खरें असेल तर अप्पैया दीक्षितांपेक्षां नृसिंहाश्रम वयानें मोठे असले पाहिजेत व पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अप्पैया दीक्षितांचा जन्म इ. स. १५२० मध्यें झाला असल्यामुळें नृसिंहाश्रमाचा जन्म निदान इ. स. १५१० मध्यें झाला असावा हें मानणें वावगें होणार नाहीं. डॉ. दासगुप्ताचें तर असें म्हणणें आहे कीं (पहा–History of Indian Philosophy Vol. II P. 216) नृसिंहाश्रम इ. स. १५०० सालीं झाले. भट्टोजी व त्यांचे धाकटे बंधु हे दोघेहि नृसिंहाश्रमाचे शिष्य असल्यामुळें, भट्टोजीचा जन्म इ. स. १५७० मध्यें किंवा त्याहिनंतर कांहीं कालानें झाला हें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें बरोबर मानतां येत नाहीं व त्यांचा जन्म इ. स. १५५५ चे सुमारास झाला व त्यांनीं सुमारें २५ वर्षांचे असतांना नृसिंहाश्रमास गुरु केलें हेंच मानणें सयुक्तिक ठरतें. अप्पैया दीक्षितांचा मृत्यु इ. स. १५९३ सालीं झाला असल्यामुळें जे कोणी म्हणतात कीं, जेव्हां इ. स. १६२६ चे सुमारास भट्टोजी दीक्षित व जगन्नाथ पण्डित या दोघांमध्यें जो काशींत

कडाक्याचा वादविवाद झाला त्यावेळीं अप्पैया दीक्षित हजर होते व त्यांनीं वादांत भट्टोजी दीक्षितांतर्फे भाग घेतला तें म्हणणें चूक ठरतें हें अगदीं उघड आहे.

भट्टोजी दीक्षितांचा वंशवृक्ष खालीं दिल्याप्रमाणें आहे--

- लक्ष्मीधर
  - भट्टोजी
    - वीरेश्वर
      - हरिदीक्षित
    - भानुजी
  - रङ्गोजी
    - कोण्डभट्ट

भट्टोजींचे पूर्वज विजागापट्टम् येथें राहत होते. पुढें विजयानगर येथें कृष्णदेवराय राज्य करीत असतांना जेव्हां अनेक विद्वान् तैलंग ब्राम्हण राजाश्रय मिळण्याच्या हेतूनें त्या राज्यांत गेले तेव्हां भट्टोजींचे पूर्वज देखील तिकडे गेले व चिक्कियङ्लूर येथें स्थायिक झाले. हा गांव कर्नाटक प्रान्तांत असल्यामुळें भट्टोजी तैलंग ब्राम्हण असून देखील कर्नाटक होते असें कित्येक म्हणतात. भट्टोजींचा जन्म बहुधा त्याच गांवीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें इ. स. १५५५ च्या सुमारास झाला असावा. त्यांचे वडील महाविद्वान् पण्डित होते व भट्टोजींनीं त्यांना विद्वन्मुकुटमाणिक्य असें म्हटलें आहे. ‘भट्टोजी पौगण्डावस्थेंत असतांनाच लक्ष्मीधरपण्डितांचा अन्त झाला. पुढें भट्टोजी उत्तर हिंदुस्थानांत प्रथम जयपुरास गेले व लवकरच जयपूर सोडून काशीस शेषकृष्णपण्डितांकडे व्याकरणशास्त्राच्या अध्ययनासाठीं येऊन राहिले. भट्टोजी हे जात्याच लोकोत्तर बुद्धिमान् असल्यामुळें त्यांनीं थोड्याच अवधींत व्याकरणशास्त्रांत प्राविण्य संपादन केलें. पुढें लवकरच ते विवाहबद्ध झाले. ते अग्निहोत्र घेऊन,

सोमयाग करून दीक्षित झाले.' (पहा रा. ब. बांबर्डेकर यांचा भट्टोजी दीक्षित ज्ञातिविवेक पान. ३५०.) भानुजीनीं अमरकोशावरील वाक्यसुधाटीकेच्या प्रारंभीं 'बलवीवल्लभं नत्वा गुरुं भट्टोजिदीक्षितम्' असें म्हटलें असल्यामुळें त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, भट्टोजींच्या पत्नीचें नांव बलवी होतें. त्यानीं संपूर्ण व्याकरणशास्त्राचें महाभाष्यान्त अध्ययन श्रीकृष्णशेषांजवळ केलें हें पूर्वीं सांगितलेंच आहे. महाभाष्याचें काळजीपूर्वक स्वतंत्र अध्ययन केल्यावर त्यांना असें दिसून आलें कीं, काशिकेंत, पदमञ्जरींत, प्रक्रियाकौमुदींत व त्यावरील प्रसाद व प्रकाश टीकेंत कित्येक ठिकाणीं केलेलीं विधानें व व्याख्यानें भाष्यविरुद्ध आहेत. म्हणून त्यांनीं स्वतंत्र प्रमाणभूत सिद्धान्तकौमुदी लिहिली. या ग्रन्थांत महाभाष्यावरून निष्पन्न होणारे सिद्धान्त सांगितले असल्यामुळें, भट्टोजींनीं या ग्रन्थाला सिद्धान्तकौमुदी हें अन्वर्थक नांव दिलें. प्रक्रियाकौमुदी तयार झाल्यावर काशिका ग्रन्थ व त्यावरील न्यास व पदमञ्जरी यांचें पठन पाठन कमी होऊन भट्टोजींचे काळीं प्रक्रियाकौमुदी व त्या ग्रन्थावरील प्रसाद व प्रकाश या टीकांचें पठन पाठन सुरू होतें. या ग्रन्थांत केलेलीं कित्येक चूक विधानें दुरस्त करण्याच्या हेतूनें व व्याकरणशास्त्र पढणाऱ्या विद्यार्थ्यांना भाष्यावरून निष्पन्न होणाऱ्या तात्विक सिद्धान्तांचा बोध व्हावा या सदिच्छेनें भट्टोजींनीं सिद्धान्तकौमुदी निर्माण केली व त्यांचा ग्रन्थ इतका उत्कृष्ट वठला कीं, त्यावेळीं प्रचलित असलेल्या पूर्व ग्रन्थांचें पठन पाठन हळूहळू बंद पडून या सर्वमान्य सिद्धान्तकौमुदीचें पठन पाठन सर्वत्र सुरू झालें. 'कौमुदी यदि कण्ठस्था वृथा भाष्यपरिश्रमः' अशी या ग्रन्थाची स्तुति सर्व निःपक्षपाती विद्वज्जनांनीं केली आहे. सिद्धान्तकौमुदींत केलेलें व्याख्यान व तींत सांगितलेले सिद्धान्त बरोबर आहेत व त्याविरूद्ध पूर्व वैयाकरणांनीं केलेलें व्याख्यान व दिलेले सिद्धान्त चूक आहेत हें सिद्ध करण्याच्या हेतूनेंच भट्टोजींनीं प्रौढमनोरमानामक टीका स्वरचित सिद्धान्त-

कौमुदीवर लिहिली. श्रीकृष्णशेषाच्या मरणानंतर व शब्दकौस्तुभ लिहिल्यानंतर त्यांनीं हा ग्रन्थ लिहिला व हा ग्रन्थ लिहितेवेळीं त्यांना स्वतःच्या गुरूनें केलेलीं व त्या काळीं प्रमाणभूत मानली जाणारीं अनेक विधानें खोडून काढण्याचें कटु कर्तव्य करावें लागलें. पण Duty is duty अशी म्हण आहे व सत्यान्वेषण करणाऱ्या पुरूषांना अशीं कटु कर्तव्यें करण्याचा कित्येकदां प्रसंग येतो आणि तशा वेळीं दीक्षितांनीं कचरणें हें कर्तव्यपराङमुखतेचें द्योतक झालें असतें. साक्षात् बापानें किंवा गुरूनें चुकीचे सिद्धान्त सांगितले असल्यास ते सिद्धान्त समर्थन करण्याचा प्रयत्न करणें व त्यांची चूक उघडकीस न आणतां ते चूक सिद्धान्त जसेचे तसेच प्रचलित ठेवणें हें अन्धतेचें लक्षण आहे. 'दोषा वाच्या गुरोरपि' हें वचन सर्वत्र प्रसिद्ध आहेच. भट्टोजींनीं केवळ आपल्या गुरूच्या मताचें खण्डन केलें नसून काशिका, न्यास, पदमञ्जरी, माधवीय धातुवृत्ति, प्रक्रियाकौमुदी, प्रसादटीका इत्यादि अनेक व्याकरणग्रन्थांत जीं भाष्यविरूद्ध भ्रामक विधानें केलीं आहेत त्या सर्वांचे त्यांनीं खण्डन केलें आहे. तसें करितांना त्यांनीं कैयटास देखील वगळलें नाहीं व भागवतावरील प्रसिद्ध व पूज्य टीकाकार श्रीधरस्वामी यांची देखील एके ठिकाणीं व्याकरणासंबंधानें केलेली चूक दाखविली आहे. हेतु हाच कीं, विद्यार्थ्यांना तात्विक सिद्धान्तांचा बोध व्हावा. शब्दरत्नकार व नागोजी भट्ट यांनीं कित्येक ठिकाणीं भट्टोजींच्या मतांचें खण्डन करून विरूद्ध मताचें प्रतिपादन केलें आहे. तेवढ्यावरून ते जसे अनुक्रमें पितामहद्रोही व दीक्षितद्रोही ठरत नाहींत त्याचप्रमाणें भट्टोजी देखील गुरूद्रोही ठरत नाहींत व जगन्नाथपण्डितांनीं संतापाच्या भरात त्यांना गुरूद्रोही असें जें म्हटलें आहे तें व्यर्थ व अयोग्य आहे. भट्टोजींनी इतर ग्रन्थकारांच्या मतांचें खण्डन करितांना त्यांच्या नांवाचा किंवा ग्रंथाचा निर्देश केला आहे; पण आपल्या गुरूच्या मताचें खण्डन करितांना 'आत्मनाम गुरोर्नाम नामातिकृपणस्य च ।

श्रेयस्कामो न गृण्हीयाज्ज्येष्ठापत्यकलत्रयोः ' हें स्मृतिवचन लक्षांत धरून त्यांच्या नांवाचा किंवा ग्रन्थाचा निर्देश न करितां 'यत्त्वाहुः, यदाहुः' असा आदरार्थक बहुवचनाचा प्रयोग करून त्यांचे ठिकाणीं स्वतःचा आदर व्यक्त केला आहे आणि मनोरमेच्या प्रारंभीं 'स्मारं स्मारं गुरोर्गिरः' असा त्यांच्या संबंधाने कृतज्ञताबोधक निर्देश केला आहे.

प्रौढमनोरमा ही सिद्धान्तकौमुदीवर लिहिलेली टीका होय. सिद्धान्तकौमुदींत जरी सर्व सूत्रांचें व्याख्यान केलें आहे तरी कांहीं स्थलीं सूत्रनिर्दिष्ट सर्व विधींची उदाहरणें व प्रत्युदाहरणें न देतां प्रसङ्गोपात्त विधीचेंच उदाहरण दिलें आहे. उदाहरणार्थ 'न पदान्त' सू. ५१ या सूत्रावरील कौमुदींत त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या सर्व विधींचीं उदाहरणें न देतां केवळ द्विर्वचनविधीचें उदाहरण दिलें आहे. त्यामुळें त्या सूत्राचें खरें मर्म त्या सूत्रावरील कौमुदी वाचतांना विद्यार्थ्यांच्या ध्यानात येत नाहीं. ही एक सिद्धान्तकौमुदींत उणीव राहिली आहे. काशिकेंत जशीं सूत्रोपात्त सर्व विधींचीं उदाहरणें दिलीं आहेत त्याचप्रमाणें भट्टोजी दीक्षितांनीं वास्तविक करावयास पाहिजे होतें, परंतु त्यांनीं तसें न करितां प्रक्रियाकौमुदीचा कित्ता गिरविला आहे. ही उणीव भरून काढण्याकरितां व स्वमतांचें समर्थन व त्याविरुद्ध असलेल्या परमतांचें खण्डन करण्याकरितां त्यांना प्रौढमनोरमा लिहावी लागली व या ग्रन्थाचें काळजीपूर्वक अध्ययन केल्यानेंच सिद्धान्तकौमुदीचें खरें रहस्य कळूं शकतें. भट्टोजींनीं सिद्धान्तकौमुदी व प्रौढमनोरमा खेरीज करून इतर बत्तीस ग्रन्थ लिहिले आहेत व त्यांपैकीं शब्दकौस्तुभ हा एक प्रसिद्ध ग्रन्थ आहे.

अष्टाध्यायीला धरून कौमुदी ग्रन्थ निर्माण करण्याचें सर्व श्रेय रामचन्द्राचार्यांना आहे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. रामचन्द्राचार्यांनीं कित्येक सूत्रांचें, त्यांचा अर्थ स्पष्ट आहे असें मानून व्याख्यान केलें नाहीं. भट्टोजींनीं सिद्धान्तकौमुदींत एकहि सूत्र गाळलें नाहीं. प्रक्रिया-

कौमुदीच्या उत्तरार्धांत रामचन्द्राचार्यांनीं भ्वादिगणांतील ठळक ठळक धातु निवडून त्यांना लागू पडणारीं सूत्रें दिलीं आहेत व परस्मैपदाचे व आत्मनेपदाचे धातु वेगवेगळ्या प्रकरणांत दिले आहेत. भट्टोजींनीं तसें न करितां धातुपाठक्रमानुसार सर्व धातु सिद्धान्तकौमुदींत पठित करून योग्य ठिकाणीं आवश्यक सूत्रें दिलीं आहेत व ठिकठिकाणीं प्रक्रियाकौमुदींत दिलेल्या सूत्रपाठक्रमांत इष्ट व आवश्यक फरक केला आहे. त्यांचा सूत्रपाठक्रम अधिक योग्य व सरस आहे यांत कांहीं संशय नाहीं व प्रक्रियाकौमुदींतील चूक विधानांचे जागीं भाष्यमतानुसार भट्टोजींनीं योग्य विधान केलें आहे व आपली कामगिरी उत्कृष्ट रीतीनें बजाविली आहे. तरी पण भट्टोजींनीं सिद्धान्तकौमुदी लिहितांना आपल्या डोळ्यांसमोर प्रक्रियाकौमुदी ठेऊन ठिकठिकाणीं प्रक्रियाकौमुदींत जसें व्याख्यान केलें आहे व जीं उदाहरणें दिलीं आहेत तसेंच व्याख्यान व तींच उदाहरणें त्यांनीं ठिकठिकाणीं सिद्धान्तकौमुदींत दिलीं आहेत आणि म्हणूनच सिद्धान्तकौमुदी ही उत्कृष्ट रीतीनें काळजीपूर्वक सुधारलेली प्रक्रियाकौमुदीची आवृत्ति आहे असें पूर्वीं म्हटलें आहे.

वर जो भट्टोजी दीक्षितांचा वंशवृक्ष दिला आहे त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, रङ्गोजी हे भट्टोजींचे धाकटे बन्धु होते. ते भट्टोजींना अत्यन्त पूज्य मानीत असत हें त्यांनीं केलेल्या अद्वैतचिन्तामणि ग्रन्थाच्या शेवटीं 'भट्टोजीभट्टसंज्ञं तं गुरुं नौमि निरन्तरम्' असें जें म्हटलें आहे त्यावरून स्पष्ट होतें. रेणिगुन्टा स्टेशनापासून सुमारें १५ मैलांवर तैलंग देशांत असणाऱ्या कालहस्ति शहरांत जें कालहस्तीशाचें देवालय आहे त्या देवतेचे ते उपासक होते व त्यांनीं शिवोल्लास हा ग्रन्थ रचून कालहस्तीशाची स्तुति केली आहे. ते व्यंकटपतीच्या दरबारांत राजपण्डित होते हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ते देखील अप्पैया दीक्षितांसारखे व आपल्या वडील बन्धूसारखे अद्वैतमताचे कट्टे पुरस्कर्ते होते व त्यांनीं एका माध्व यतीला वादांत

जिंकून राजदरबारांतून पालखीचा मान मिळविला होता. त्यानीं वरील दोन ग्रन्थांखेरीज अद्वैतशास्त्रसारोद्धार व पदार्थदीपिका हे दोन ग्रन्थ लिहिले आहेत. त्यांचा पुत्र कोण्डभट्ट हा देखील महाविद्वान् वैयाकरण होता व त्यानें वैयाकरणभूषण, सिद्धान्तदीपिका, स्फोटवाद इत्यादि सात ग्रन्थ लिहिले आहेत.

भट्टोजींचा वडील पुत्र वीरेश्वर हा तारुण्यावस्थेंतच वारला. त्याचा हरि दीक्षित हा पुत्र होय. हरि दीक्षित हा रामाश्रमाचा शिष्य होता व रामाश्रम भट्टोजींचा शिष्य होता. हरि दीक्षितानें सात ग्रन्थ लिहिले आहेत व हा प्रसिद्ध पण्डित नागोजी भट्टाचा गुरू होता; व नागोजी भट्टांनीं त्याच्याजवळ व्याकरणशास्त्राचें अध्ययन केलें होतें. भट्टोजींचा द्वितीय पुत्र भानुजी यानें अमरकोशावर व्याख्यासुधा-नामक सुन्दर टीका लिहिली आहे व या टीकेंत त्यानें अमरकोशांतील सर्व शब्दांची व्याकरणशास्त्रानुसार प्रक्रिया दिली असल्यामुळें ही टीका उच्च दर्जाची मानली गेली आहे. भानुजीनें ही टीका महीधर देशाचा राजा बघेलवंशोत्पन्न कीर्तिसिंह याच्या आज्ञेनुसार लिहिली होती हें त्या टीकेवरून स्पष्ट होतें.

प्रौढमनोरमेवर ज्या कित्येक टीका लिहिल्या गेल्या आहेत त्यांपैकीं शब्दरत्न ही सर्वोत्कृष्ट टीका मानली गेली असून तिचा कर्ता भट्टोजींचा पौत्र व रामाश्रमाचा शिष्य हरि दीक्षित होय हें त्या टीकेंतील पुढील श्लोकावरून स्पष्ट होतें—'गूढोक्तिग्रथितां पितामह-कृतां विद्वत्प्रमोदप्रदां । भक्त्याधीत्य मनोरमां निरुपमाद्रामाश्रमात्स-द्गुरोः । तत्वज्ञानवशात्परेण कलितान्दोषान्समुन्मूलयन् । व्याचष्टे हरिरेष तां फणिमतान्यालोच्य वैरेश्वरिः ॥' पण या टीकेचा कर्ता वास्तविक नागोजीभट्ट असून त्यानें ही टीका कृतज्ञताबुद्धिपूर्वक आपल्या गुरूच्या नांवानें लिहिली आहे असा सर्वत्र प्रवाद आहे व तो यथार्थ आहे असें अनेक विद्वानांचें म्हणणें आहे. नागोजीभट्ट शृङ्ग-वेरपूरच्या रामराजाचे आश्रित होते आणि जशी आपला आश्रयदाता

रामराजा याच्या नांवानें त्यांनीं अध्यात्मरामायणावर टीका लिहिली आहे त्याचप्रमाणें आपल्या गुरूच्या नांवानें प्रौढमनोरमेवर शब्दरत्न ही टीका लिहून आपला आश्रयदाता व विद्यादाता या दोघांच्याहि ऋणांतून ते मुक्त झाले आहेत. उद्योत, परिभाषेन्दुशेखर व शब्देन्दुशेखर हे ग्रंथ लिहिल्यावर नागोजीभट्टांनीं शब्दरत्न टीका लिहिली. या टीकेंत ठिकठिकाणीं वरील तीन नागोजीभट्टकृत ग्रन्थांतील अनेक पंक्ति आढळतात. हरिदीक्षितांनीं आपल्या शिष्यानें केलेल्या ग्रन्थांतील पंक्तींची शब्दरत्नांत नागोजींचा नामनिर्देश न करितां नकल केली आहे हें म्हणणें त्यांच्या कीर्तीला कलंक लावण्यासारखें होय. ते देखील विद्वान् पण्डित असल्यामुळें ते आपल्या शब्दांत त्या त्या विषयांचें स्वतंत्र रीतीनें विवरण सहज करूं शकले असते व त्यांना आपल्या शिष्याच्या ग्रन्थांतील पंक्तींची ठिकठिकाणीं नकल करण्याची कांहींच गरज नव्हती. नागोजीभट्टांनीं शब्दरत्नांतून उद्योतांत, परिभाषेन्दुशेखरांत व शब्देन्दुशेखरांत उतारे घेतले आहेत हेंहि म्हणणें बरोबर दिसत नाहीं; कारण वरील तीन ग्रन्थांत नागोजीभट्ट त्या त्या विषयांचें स्वतःच्या भाषेंत स्वतंत्र रीतीनें विवरण करण्यास पूर्णपणें समर्थ होते व त्यांना देखील गुरूचें नांव न घेतां शब्दरत्नांतील पंक्तींची नकल करण्याची कांहीं गरज नव्हती. जर नागोजीभट्ट शब्दरत्नाचे निर्माते नसते व हरिदीक्षितकृत तो ग्रंथ असता तर वरील तीन ग्रन्थांत शब्दरत्नांतील ज्या अनेक पंक्ति आढळतात त्या लिहितेवेळीं त्यांनीं 'तदुक्तं गुरुचरणैः शब्दरत्ने' असें अवश्य म्हटलें असतें व गुरुग्रन्थांतील पंक्ति त्यांनीं स्वनिर्मित आहेत अशा रीतीनें आपल्या ग्रन्थांत उद्धृत केल्या नसत्या. वरील चारहि ग्रन्थांची भाषा अगदीं सारखी आहे. ती फार क्लिष्ट, समासप्रचुर व न्यायघटित असून त्या भाषेवरून हें स्पष्ट होतें कीं, वरील चारहि ग्रन्थांचा निर्माता एकच असला पाहिजे व ही वस्तुस्थिति नागोजी भट्टांचा साक्षात् शिष्य वैद्यनाथ पायगुण्डे याला पूर्णपणें अवगत असल्यामुळें त्यानें

शब्दरत्नावरील आपल्या भावप्रकाश टीकेंत जेथें जेथें शब्दरत्नांत 'इत्यन्यत्र विस्तरः' हे शब्द आले आहेत तेथें 'अन्यत्र' या पदाचा बहुधा उद्योत, परिभाषेन्दुशेखर किंवा शब्देन्दुशेखर असा अर्थ दिला आहे व हरिदीक्षितांच्या कोणत्याहि ग्रन्थाचा त्यानें निर्देश केला नाहीं. याचें उघड कारण हेंच आहे कीं, हरिदीक्षितांच्या ग्रन्थांत तशा तऱ्हेचें विस्तृत विवरण केलें नसून नागोजी भट्टकृत ग्रन्थांतच तसें विवरण केलेलें आढळतें. हरिदीक्षितांनीं आपल्या शिष्याच्या ग्रन्थांचा हवाला दिला हें म्हणणें अगदींच विसङ्गत व असंभवनीय ठरतें; कारण गुरूला जर इतर ग्रन्थांचा हवाला देणें असेल तर तो स्वग्रन्थांचा किंवा प्राचीन मान्य वैयाकरणकृत ग्रन्थांचा हवाला देईल व शिष्य-निर्मित ग्रन्थांचा हवाला केव्हांहि देणार नाहीं. तसें करणें गुरूला केव्हांहि शोभत नाहीं व गुरूनें तसें करणें मुळींच संभवनीय नाहीं. हरिदीक्षितांनीं नागोजी भट्टांच्या ग्रन्थांचाच शब्दरत्नांत हवाला दिला आहे असें मानल्यास, नागोजी भट्टांनीं वरील तीन्ही ग्रन्थ लिहितेवेळीं ते हयात होते व नंतर त्यांनीं शब्दरत्न लिहिल्यावर ते वारले असें मानावें लागेल. एक तर तसें मानण्यास कांहींच आधार नाहीं व दुसरें असें कीं, तसें मानल्यास, हरिदीक्षितांना लोकोत्तर आयुष्य लाभलें होतें अशी असंभवनीय कल्पना करावी लागेल. सारांश सर्व तऱ्हेनें विचार केला असतां हेंच सिद्ध होतें कीं, नागोजी भट्टांनी आपल्या गुरूचे ठिकाणीं कृतज्ञता प्रदर्शित करण्याकरितां आपल्या गुरूच्या मरणानंतर गुरूच्या नांवानें शब्दरत्न लिहिला. तसें नसतें तर वरील प्रवाद केव्हांहि उत्पन्न झाला नसता असा त्या विद्वानांच्या म्हणण्याचा आशय आहे.

भट्टोजी दीक्षितांनीं आपल्या गुरूच्या मरणानंतर प्रौढमनोरमा लिहिली हे पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यांनीं त्या ग्रन्थांत ठिकठिकाणीं आपल्या गुरूच्या मताचें खण्डन केलें असल्यामुळें शेषकृष्णाच्या वंशजांना व त्यांच्या शिष्यपरंपरेंतील पण्डितांना भट्टोजींचा फार

राग आला व त्यांपैकीं कांहीं जणांनीं मनोरमेवर विरुद्ध टीकाग्रन्थ लिहिण्यास सुरुवात केली. बहुधा हे ग्रन्थ भट्टोजींच्या मरणानंतर प्रसिद्ध झाले असावेत. जर भट्टोजींच्या हयातींत हे ग्रन्थ निर्माण झाले असते तर भट्टोजींनी स्वतः त्या सर्व विरुद्ध टीकांचें समर्पक उत्तर दिलें असतें. परंतु हें काम नागोजी भट्टांनीं केलें असल्यामुळें त्यावरून हें दिसून येतें कीं, बहुधा हे सर्व ग्रन्थ भट्टोजींच्या मरणानंतर तयार झाले असावेत. शेषकृष्णाचा पुत्र वीरेश्वर जो जगन्नाथ पण्डितांचा गुरू होता त्याचा पुत्र चक्रपाणि यानें प्रथम मनोरमेचें खण्डन करणारा ग्रन्थ लिहिला व त्यालाच उद्देशून भावप्रकाशांत व भैरवींत खण्डनकार असें म्हटलें आहे. यानंतर जगन्नाथ पण्डितांनीं मनोरमाकुचमर्दननामक ग्रन्थ लिहिला व या ग्रन्थाच्या प्रारंभीं जगन्नाथ पण्डितांनीं 'लक्ष्मीकान्तपदाम्भोजं प्रणम्य श्रेयसां पदम् । पण्डितेन्द्रो जगन्नाथः स्यति गर्वं गुरुद्रुहाम् ॥' असें मङ्गलाचरण पठित करून पुढें असें म्हटलें आहे: 'इह केचिन्निखिलविद्वन्मुकुटमयूखमालालालितचरणकमलानां शेषवंशावतंसानां श्रीकृष्णपण्डितानां चिरायार्चितयोःपादुकयोःप्रसादादासादितशद्बानुशासनास्तेषु च पारमेश्वरं पदं प्रयातेषु कलिकालवंशवदीभवन्तस्तत्रभवद्भिरुल्लासितं प्रक्रियाप्रकाशमाशयानवबोधनिबन्धनैर्दूषणैः स्वयं निर्मितायां मनोरमायामाकुल्यकार्षुः । सा च प्रक्रियाप्रकाशकृतां पौत्रैरखिलशास्त्रमहार्णवमन्थाचलायमानमानसानामस्मद्गुरुपण्डितवीरेश्वराणां तनयैर्दूषिताऽपि स्वमतिपरीक्षार्थं पुनरस्माभिर्निरीक्ष्यते ।' एवढें करून देखील जगन्नाथ पण्डितांचा क्रोध नाहींसा झाला नाहीं. त्यांनीं पुढें लवकरच शब्दकौस्तुभावर शब्दकौस्तुभशाणोत्तेजननामक ग्रन्थ लिहिला व त्या ग्रन्थांत त्यांनीं 'अप्पय्यदुर्ग्रहविचेतितचेतनानामार्यद्रुहामयमहं शमयेऽवलेपान्' असें म्हटलें आहे. भट्टोजी दीक्षितांनीं शेषकृष्णाच्या प्रकाशग्रन्थावर मनोरमेंत विरुद्ध टीका केली याबद्दल त्यांना भट्टोजींचा राग येणें साहजिक होतें.

परंतु या क्रोधाच्या आवेशांत त्यानीं अप्पैया दीक्षितांवर ताशेरे कां झाडले आहेत याचें कारण ध्यानांत येत नाहीं. अप्पैया दीक्षित त्यांच्यापेक्षां वयानें बरेच जास्त असून विद्येंत देखील श्रेष्ठ होते. मनोरमाग्रन्थ निर्माण होण्याच्या बरेंच पूर्वीं ते निवर्तले होते व तो ग्रन्थ लिहिण्यास त्यांनीं भट्टोजींना चिथविलें व उत्तेजन दिलें हें म्हणणें असंभवनीय ठरतें हें अगदीं उघड आहे. परंतु भट्टोजींनीं आपला स्वजातीय तैलंग प्रसिद्ध विद्वान् गुरु श्रीकृष्ण शेष याला सोडून दूर प्रान्तांत राहणाऱ्या विजातीय द्रविड ब्राम्हणाचें शिष्यत्व पत्करलें हें पाहून जगन्नाथ पंडितांना त्यांचा फार राग आला असावा व त्या रागाच्या आवेशांतच त्यांनीं अप्पैया दीक्षितांना अयोग्य शिव्या देऊन त्यांच्यावर ताशेरे झाडले. पुढें त्यांनीं अप्पैया दीक्षितकृत चित्रमीमांसेचें खण्डन करतेवेळीं 'द्रविडशिशुःप्रलपति' इत्यादि वाईट शब्दांनीं त्यांना संबोधिलें आहे. तसेंच रसगङ्गाधरनामक ग्रन्थांत देखील त्यांनीं बरेच ठिकाणीं अप्पैयांचें मत खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे व एका ग्रन्थांत 'अप्पैय्यदीक्षितदवानलदग्धशेषं साहित्यमङ्कुरयते सरसैर्निबन्धैः' असा अप्पैयांवर ताशेरा झाडून मोठ्या प्रौढीनें आत्मप्रशंसा केली आहे.

चक्रपाणि व जगन्नाथपंडित यांच्या खेरीज इतर दोन पंडितांनीं प्रौढमनोरमेवर विरुद्ध टीका केली आहे. त्यांपैकीं एक श्रीकृष्ण शेषाचा धाकटा मुलगा व जगन्नाथपंडितांचे गुरु वीरेश्वर यांचा कनिष्ट बंधु नारायण हा होय. यानें महाभाष्यावर सूक्तिरत्नाकर नांवाची टीका लिहिली आहे व या टीकेंत त्यानें दीक्षितांचें मत ठिकठिकाणीं चूक ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. 'रत्नाकरोक्ति खण्डयति' असें जें ठिकठिकाणीं भावप्रकाशांत व भैरवींत म्हटलें आहे तें या नारायणालाच उद्देशून म्हटलें आहे.

भट्टोजींच्या प्रौढमनोरमेवर विरुद्ध टीका करणारा चवथा पंडित शिवरामेन्द्रसरस्वती हा होय. हा संन्यासी होता आणि म्हणूनच

भावप्रकाशकार व भैरवीकार यांनीं याचा दण्डी–संन्यासी–या नांवानें आपल्या टीकेंत निर्देश केला आहे. भट्टोजी दीक्षितांनीं जेव्हां सिद्धान्तकौमुदी लिहून प्रसिद्ध केली तेव्हांच या संन्याशाचें तो ग्रन्थ वाचून पित्त खवळलें व त्यानें 'प्रक्रिया विक्रियां नीता श्रीमद्भट्टोजि-दीक्षितैः' असे सिद्धान्तकौमुदीसंबंधानें उद्गार काढले. हा चक्रपाणीचा समकालीन होता व चक्रपाणीला याच्याबद्दल फार आदर वाटत असे व चक्रपाणीनें याच्यासंबंधानें 'वैयाकरणकुम्भीन्द्रकुम्भनिर्भेदभीषणः । कवीन्द्रकेसरी भाति काश्यामानन्दकानने ॥' असें म्हटलें आहे. हा बहुधा वीरेश्वराचा शिष्य असावा व पूर्वाश्रमांत यानें वीरेश्वराजवळ व्याकरणशास्त्राचें अध्ययन केलें असावें व वीरेश्वराचे वडील श्रीकृष्ण शेष यांचीं मतें दीक्षितांनीं प्रौढमनोरमेंत कित्येक ठिकाणीं खोडून काढलीं असल्यामुळें याला दीक्षितांचा राग आला असावा. यानें महाभाष्यावर सिद्धान्तरत्नाकरनामक टीका लिहिली आहे व त्या टीकेंत यानें भट्टोजी दीक्षितांचीं मतें ठिकठिकाणीं खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील चारहि टीकाकारांनीं जें भट्टोजींच्या मताविरुद्ध प्रतिपादन केलें त्याचें शब्दरत्नांत व शब्देन्दुशेखरांत पूर्णपणें खण्डन केलें आहे. हें जें शब्दरत्नांत व शब्देन्दुशेखरांत विरुद्ध मतांचें खण्डन करून दीक्षितांच्या मतांचें समर्थन केलें आहे त्याचें खण्डन करण्यास समर्थ असा कोणी विद्वान् वैयाकरण शेष घराण्यांत किंवा त्या घराण्यांतील शिष्यपरंपरेंत निपजला नाहीं, व तसेंच सिद्धान्तकौमुदींत जें प्रक्रियाकौमुदीविरुद्ध पाणिनीय सूत्रांचें मधून मधून दीक्षितांनीं व्याख्यान केलें आहे तें सदोष असून प्रक्रियाकौमुदीकारांनीं जें व्याख्यान केलें आहे तेंच योग्य आहे असें सप्रमाण प्रतिपादन करणारा कोणीहि विद्वान् वैयाकरण नागेशानंतर निपजला नाहीं. त्यामुळें सिद्धान्तकौमुदी, प्रौढमनोरमा, शब्दरत्न, शब्देन्दुशेखर व परिभाषेन्दु-शेखर हेच व्याकरणशास्त्रावर प्रमाणभूत ग्रन्थ मानले जाऊन त्यांचेंच

सर्वत्र पठन पाठन सुरु झालें व अझूनहि तीच स्थिति कायम आहे. नागेशाच्या शिष्यपरंपरेंतच वैजनाथ पायगुंडे इत्यादि अनेक विद्वान् वैयाकरण निपजले व त्या सर्वांनीं दीक्षितसंप्रदायच चालू ठेवला. त्यामुळें कौमुदीकारांमध्यें भट्टोजी दीक्षितांना अग्रस्थान प्राप्त झालें आणि प्रक्रियाकौमुदी, प्रसादटीका व प्रकाशटीका यांचें अध्ययन नाहींसें होऊन सर्वत्र सिद्धान्तकौमुदीचेंच अध्ययन प्रचलित झालें; कारण अष्टाध्यायीचें यथार्थ ज्ञान होण्याकरितां सिद्धान्तकौमुदीसारखा दुसरा कोणताहि ग्रन्थ नाहीं.

पाणिनीनें जशी अष्टाध्यायी तयार केली त्याचप्रमाणें धातुपाठ, गणपाठ, लिङ्गानुशासन व शिक्षा हे ग्रन्थ निर्माण केले व पाणिनीय शास्त्रांत जसे हे ग्रन्थ अन्तर्भूत होतात त्याचप्रमाणें पाणिनीय सूत्रांवर रचलेलीं व भाष्यकारांनीं स्वीकारलेलीं वार्तिकें आणि तसेंच परिभाषा, उणादि सूत्रें व फिट्सूत्रें हीं देखील अन्तर्भूत होतात. अष्टाध्यायींत फारच थोड्या परिभाषा सांगितल्या असून बाकीच्या सर्व परिभाषा व्याडीनें आपल्या सङ्ग्रहनामक ग्रन्थांत एकत्रित केल्या होत्या. तो ग्रन्थ जरी भाष्यकारांच्या वेळीं विद्यमान होता तरी पुढें लौकरच तो ग्रन्थ नाहींसा झाला. सुदैवानें भाष्यकारांनीं भाष्यांत सर्व महत्वाच्या परिभाषा पठित केल्या असून त्यांचीं प्रयोजनेंहि दिलीं आहेत. या सर्व परिभाषांवर सीरदेवानें इ. सन तेराव्या शतकापूर्वी परिभाषावृत्तिनामक ग्रन्थ लिहिला व पुढें नागेशांनीं अठराव्या शतकांत परिभाषेन्दुशेखरनामक उत्कृष्ट व सर्वमान्य ग्रन्थ लिहिला. हाच ग्रन्थ आजकाल परिभाषांचें यथार्थज्ञान होण्याकरितां प्रमाणभूत ग्रन्थ मानला जातो. या ग्रन्थाचें महाराष्ट्रभाषेंत विस्तृत विवरण मी केलें असून तें १९३६ च्या अखेरीस छापून प्रसिद्ध केलें आहे.

उणादिसूत्रें कोणी रचलीं हें सांगतां येणें कठिण आहे. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, हीं सूत्रें पाणिनीच्या पूर्वीं झालेल्या शाकटायन मुनीनें प्रणीत केलीं आहेत व या विधानाच्या समर्थनार्थ

ते 'नाम च धातुजमाह निरुक्ते व्याकरणे शकटस्य च तोकम्' या भाष्यवचनाचा आधार देतात. इतरांचें असें म्हणणें आहे कीं, उणादिसूत्रांत पाणिनीय संज्ञांचाच सर्वत्र निर्देश आढळत असल्यामुळें हीं सूत्रें पाणिनीच्या पूर्वीं झालेल्या शाकटायनानें रचलीं आहेत हें म्हणणें चूक ठरतें व हीं सूत्रें पाणिनीनें स्वतःच रचलीं असून त्यांत वार्तिककारानें बहुधा पुढें भर घातली आहे आणि 'उणादयो बहुलम्' हें सूत्र पाणिनीनें पठित केलें असल्यामुळें त्यानेंच उणादिसूत्रपाठ तयार केला हेंच मानणें सयुक्तिक ठरतें असें त्यांचें म्हणणें आहे. उणादिसूत्रें प्रथम किती होती व त्यांत पुढें कोणी किती सूत्रांची भर घातली हें सांगतां येणें कठिण आहे. एवढें मात्र निश्चित आहे कीं, मूळ उणादिसूत्रांत अनेक वैयाकरणांनीं पुढें वेळोवेळीं बरीच भर घातली. उणादिसूत्रें प्रथम पांच पादांत पठित असून पुढें त्यांचे दहा पाद झाले. दीक्षितांनीं कौमुदींत पञ्चपादीचें विवरण केलें असून प्रक्रियाकौमुदींत दशपादीचें विवरण केलें आहे. उज्वलदत्तानें तेराव्या शतकांत पञ्चपादीवर वृत्ति लिहिली असून पुढें माणिक्यदेवानें दशपादीवर वृत्ति लिहिली आहे. दीक्षितांनीं कौमुदींत पञ्चपादीचा संग्रह केला असल्यामुळें त्यावरून हें दिसून येतें कीं, त्यांच्या मतें पञ्चपादी हाच मूळचा विश्वसनीय ग्रन्थ असून दशपादी हा ग्रन्थ पुढें जेव्हां इतर व्याकरणसंप्रदाय सुरु झाले तेव्हां निर्माण झालेला ग्रन्थ आहे.

पाणिनीनें जीं स्वरप्रक्रियेचीं सूत्रें अष्टाध्यायींत पठित केलीं आहेत तीं स्वरसिद्धि करतेवेळीं कांहीं ठिकाणीं अपुरी पडत असल्यामुळें ही उणीव भरून काढण्याच्या हेतूनें पाणिनीच्या नंतर व वार्तिककालापूर्वीं शान्तनवाचार्यानें फिट्सूत्रें रचलीं. हीं सूत्रें वार्तिककालापूर्वीं रचलीं गेलीं हें म्हणण्याचें कारण हें कीं, वार्तिककालांत हीं सूत्रें नसतीं तर वार्तिककारानें तशा अर्थाचीं वार्तिकें अवश्य पठित केलीं असतीं. फिट्सूत्रें चार पादांत पठित केलीं असून त्यांची संख्या ८७

आहे व या सर्व सूत्रांवर व तसेंच उणादिसूत्रांवर दीक्षितांनीं कौमुदीच्या उत्तरार्धांत वृत्ति लिहिली आहे.

पाणिनीच्या धातुपाठावर अनेक विद्वान् वैयाकरणांनीं वृत्ति लिहिली आहे व त्यांपैकीं बऱ्याच ग्रन्थकर्त्यांचा नामनिर्देश मनोरमेंत केला आहे, उदाहरणार्थ क्षीरस्वामी, मैत्रेयरक्षित, उज्वलदत्त, माधव, श्रीपति, पुरुषोत्तम, विश्वरुप व रत्नमति. याखेरीज शद्बरत्नांत सम्मताकाराचा देखील निर्देश केला आहे. क्षीरस्वामी अकराव्या शतकांत झाला असून त्यानें धातुवृत्तिशिवाय अमरकोशावर टीका लिहिली आहे व तसेंच त्यानें क्षीरतरङ्गिणी, निपाताव्ययोपसर्गवृत्ति, व निघण्टुवृत्ति हे ग्रन्थ लिहिले आहेत. मैत्रेयरक्षितानें धातुवृत्ति लिहिली असून जिनेन्द्रबुद्धिकृत न्यासटीकेवर तन्त्रप्रदीप नांवाची टीका लिहिली आहे. या टीकेला अनुन्यास असें देखील म्हणतात. या ग्रन्थकाराचा नामनिर्देश इ. स. ११६० च्या सुमारास झालेल्या सर्वानन्द पण्डितानें केला असल्यामुळें, हा बहुधा अकराव्या शतकांत झाला असावा. माधव चवदाव्या शतकांत विजयानगरच्या राजाचा मन्त्री होता. या अलौकिक बुद्धिमान् सर्वशास्त्रनिष्णात पण्डितानें अनेक शास्त्रांवर उत्कृष्ट ग्रन्थ लिहिले असून उत्तम धातुवृत्ति देखील लिहिली आहे. श्रीपति हा वङ्गदेशीय पण्डित असून यानें कातन्त्रावर उत्तम परिशिष्ट लिहिलें आहे व तसेंच धातुवृत्ति देखील लिहिली आहे. हा प्रसिद्ध कातन्त्रपरिशिष्टकार पंधराव्या शतकांत झाला. पुरुषोत्तम हा देखील वङ्गदेशीय बौद्ध पण्डित होता. राजा लक्ष्मणसेन (११७९–१२०६) बङ्गालांत राज्य करीत असतां, त्याच्या आज्ञेनुसार पुरुषोत्तमानें धातुवृत्ति लिहिली. विश्वरूप हा कोशकर्ता असून धातुवृत्तिकार देखील होता. रत्नमति केव्हां झाला हे सांगता येत नाहीं. सम्मताकार हा सम्मतानामक धातुवृत्तीचा कर्ता असला पाहिजे. त्याचें नांव काय होतें व तो केव्हां झाला हें कळत नाहीं.

धातुपाठावर जशा अनेक वृत्ति लिहिल्या आहेत तशा गणपाठा-

वर लिहिल्या गेल्या नाहींत. याचें उघड कारण हेंच कीं, धातुपाठ जसा भाषेंत अत्यन्त महत्वाचा भाग आहे तसा गणपाठ नाहीं. तथापि गणपाठांत ज्यांना महत्व आहे, म्हणजे 'स्वरादिनिपातमव्ययम्' सू. ४४७ या सूत्रान्वयें ज्यांना अव्ययसंज्ञा आहे, त्यांवर क्षीरस्वामीनें वृत्ति लिहिली आहे व त्यानंतर वर्धमानानें संपूर्ण गणपाठावर गणरत्न-महोदधिनामक प्रसिद्ध ग्रन्थ बाराव्या शतकाच्या पूर्वार्धांत लिहिला आहे व या दोन्ही ग्रन्थांचा निर्देश मनोरमेंत केला आहे.

लिङ्गानुशासन व शिक्षा हे जे दोन ग्रन्थ सध्यां उपलब्ध आहेत ते पाणिनिकृत नव्हत असें कित्येक विद्वानांचें मत आहे. 'अथ शिक्षां प्रवक्ष्यामि पाणिनीयं मतं यथा' या शिक्षेंतील प्रथम श्लोकाच्या पूर्वार्धावरूनच हें दिसून येतें कीं, पाणिनीनंतर त्याच्या संप्रदायांतील कोणीतरी विद्वान् पण्डितानें हा ग्रन्थ निर्माण केला असावा. 'लिङ्गमशिष्यं लोकाश्रयत्वाल्लिङ्गस्य' असें वार्तिककार व भाष्यकार यांनीं म्हटलें असल्यामुळें, व्याकरणशास्त्रांत लिङ्गानुशासनाला विशेष महत्व नाहीं आणि म्हणून या ग्रन्थासंबंधानें अधिक चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं. भट्टोजी दीक्षितांनीं मात्र या ग्रन्थावर देखील कौमुदींत वृत्ति लिहिली आहे व इतर कांहीं ग्रन्थ-कारांनींहि या ग्रन्थावर वेळोवेळीं वृत्ति लिहिली आहे.

दीक्षितांनीं मनोरमेंत वर निर्दिष्ट केलेल्या ग्रन्थकारांखेरीज ज्या इतरांचा निर्देश केला आहे ते व्याघ्रभूति, शौनक, शाकल्य, भागुरि, जयदेव, पञ्चकाव्यांचे कर्ते, म्हणजे कालिदास, भारवि, माघ व श्रीहर्ष व तसेंच भट्टि व अनुस्मृतिकार हे होत. याशिवाय शब्द-रत्नांत हेलाराज व व्याख्यादर्शकार यांचा देखील निर्देश केला आहे. व्याघ्रभूति हा पाणिनीचा शिष्य असून त्यानें पाणिनीय संप्रदाय चालू राहावा या हेतूनें कारिकाग्रन्थ तयार केला अशी जनश्रुति आहे. शौनक व शाकल्य हे प्राचीन प्रातिशाख्यकार होत. भागुरि हा क्रोष्टुक षीचा पुत्र होता. याला क्रौष्टकि भागुरि असें म्हणतात व हा

यास्कापूर्वी झाला. हा प्राचीन व्याकरणाचार्य होता. यानें केलेला कोणताहि ग्रन्थ उपलब्ध नाहीं. तथापि याच्या मताची प्रदर्शक 'वष्टि भागुरिरल्लोपमवाप्योरुपसर्गयोः। आपं चैव हलन्तानां यथा वाचा निशा दिशा ॥' ही कारिका सर्वत्र प्रसिद्ध आहे व या कारिकेचा उल्लेख मनोरमेंत केला आहे. जयदेव कवि हा प्रसिद्ध गीतगोविन्द काव्याचा कर्ता होय. बङ्गालांत राजा लक्ष्मणसेन राज्य करीत असतांना त्याचे जे नव मुख्य सभापण्डित होते त्या नवरत्नांपैकीं हा एक होता. कालिदासादि पञ्चकाव्यकर्ते व भट्टिकाव्याचा कर्ता हे प्रसिद्ध कवि असून यांचा कालनिर्णय करण्याचें हें स्थल नव्हें. हे केव्हां झाले हें कोणत्याहि संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासग्रन्था-वरून सहज कळून येईल. हेलाराज यानें भर्तृहरिकृत वाक्यपदीयावर टीका लिहिली आहे. हेलाराज केव्हां झाला हें सांगतां येत नाहीं आणि तसेंच अनुस्मृतिकार व व्याख्यादर्शकार हे कोण होते व केव्हां झाले याचीहि माहिती मला उपलब्ध झाली नाहीं.

अष्टाध्यायींत सुमारें ४००० सूत्रें पठित असून त्या सूत्रांवर बरींच वार्तिकें पठित आहेत. हीं सर्व सूत्रें व वार्तिकें पाठ करून व यांचा अर्थ नीट समजून घेऊन ध्यानांत ठेवणें व इष्ट रूपांची सिद्धि करते वेळीं त्यांचा यथार्थ उपयोग करणें याकरितां पुष्कळ परिश्रम करावे लागतात व बराच काळ व्यतीत करावा लागतो. संसारांत पोट भरण्याकरितां अविश्रान्त परिश्रम करणाऱ्या पुरुषाला अजस्त्र पाणिनीयशास्त्राचा अभ्यास करण्यास वेळ मिळणें शक्य नाहीं. या सर्व अडचणी ध्यानांत आणून, थोड्या अवधींत कोणालाहि व्याकरण-शास्त्राचें ज्ञान संपादन करून घेतां यावें व शुद्ध संस्कृत लिहितां व बोलतां यावें या हेतूनें कित्येक विद्वान् वैयाकरणांनीं लहान स्वतंत्र व्याकरणग्रन्थ वेळोवेळीं निर्माण केले. या दिशेनें प्रथम प्रयत्न करणारा कातन्त्रसूत्रकार शर्ववर्मा हा होय. हा ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकांत झाला. आख्यायिका अशी आहे कीं, त्या शतकांत दक्षिण देशांत

शातवाहन घराण्यांतील जो राजा राज्य करीत होता त्यानें उत्तर हिन्दुस्थानांतील एका विदुषी कन्येशीं लग्न केलें होतें व या राणीला तद्देशीय भाषा अवगत नसल्यामुळें ती नेहमी राजाशीं संस्कृतांत बोलत असे. राजाला फारच कमी संस्कृत येत असल्यामुळें, त्याला कित्येकदां तिचें भाषण कळत नसे व त्यामुळें त्याची फजिती होत असे. एकदां जलक्रीडेच्या प्रसङ्गीं राणीनें 'मोदकं देहि राजन्' असें राजास म्हटलें असतां, राजानें राणीकरितां मोदक घेऊन येण्याबद्दल नौकरास आज्ञा केली. हें ऐकून राणी हंसली व माझ्या अङ्गावर पाणी शिंपडूं नका हा माझ्या म्हणण्याचा अर्थ होता असें तिनें राजास सांगितलें. हें ऐकून राजा फार खजील झाला व त्याच्या दरबारांत शर्ववर्मानामक जो महापण्डित होता त्याला विनंती केली कीं, ज्या योगानें मला संस्कृत भाषा चांगल्या रीतीनें थोडक्या काळांत समजतां व बोलतां येईल असें एक लहानसें सोपें व्याकरण आपण तयार करावें. तेव्हां त्या पण्डितानें शिवाराधना करून शंकरास प्रसन्न केलें व शंकरानें आपला पुत्र कुमार–कार्तिकेय–याला आज्ञा केली कीं, या पण्डिताचे मनोरथ पूर्ण कर. त्यावरून कुमारानें त्या पण्डिताला आपल्या मयूराकडून व्याकरणसूत्रें कळविलीं व त्या सूत्रांनाच कौमार किंवा कालापसूत्रें म्हणतात. पाणिनीचीं सुमारें चार हजार सूत्रें असून कातन्त्राचीं केवळ आठशें पंचावन सूत्रें असल्यामुळें, या शास्त्राला कातन्त्र–लहानसें तन्त्र–असें म्हणतात. पण संस्कृत भाण्डागार अत्यन्त विशाल असल्यामुळें व कातन्त्रांतील थोड्या सूत्रांनीं संस्कृत भाषेंतील सर्व रूपांची सिद्धि होऊं शकत नसल्यामुळें, त्या व्याकरणशास्त्राला वेळोवेळीं कौमार वैयाकरणांनीं परिशिष्टें जोडलीं व या परिशिष्टांनाच कातन्त्रपरिशिष्ट म्हणतात. कातन्त्र-सूत्रांवर दुर्गसिंहानें सुमारें इ. स. आठव्या शतकांत विस्तृत टीका लिहिली व त्या शास्त्राला धातुपाठ जोडून त्यावर धातुवृत्ति लिहिली व तें शास्त्र पाणिनीयशास्त्रासारखें त्यानें व इतरांनीं सर्वाङ्गपूर्ण

करण्याचा प्रयत्न केला. कातन्त्रानंतर अनेक व्याकरणसंप्रदाय निघाले, उदाहरणार्थ चन्द्रगोमिन्‌चा चान्द्रसंप्रदाय, पूज्यपाद देवानन्दीचा जैनेन्द्रसंप्रदाय, नरेन्द्राचा सारस्वतसंप्रदाय, वोपदेवाचा मुग्धबोध-संप्रदाय, पद्मनाभभट्टाचा सौपद्मसंप्रदाय. यांशिवाय शैवसंप्रदायाचीं व वैष्णवसंप्रदायाचीं देखील व्याकरणशास्त्रें निर्माण झालीं. या सर्व व्याकरणसंप्रदायांचा काल व इतिहास डॉ. बेलवलकरकृत Systems of Sanskrit Grammar या ग्रन्थांत दिला आहे. या सर्व संप्रदायांतील व्याकरणग्रन्थ संस्कृत भाषेंत प्रचलित असलेल्या सर्व तऱ्हेच्या रूपांची सिद्धि करण्याकरितां उपयोगी पडणारे नसल्यामुळें व त्यांत वैदिक प्रक्रिया व स्वरप्रक्रिया दिली नसल्यामुळें, ते कांहीं कालपर्यंत टिकून पुढें कालगतीनें 'उत्पद्यन्ते विलीयन्ते' या न्यायान्वयें विलयास गेले व हिन्दुस्थानच्या थोड्याशा भागांत जरी कांहीं संप्रदाय अझून चालू आहेत तरी सर्वत्र पाणिनीयशास्त्राचें अध्ययन सुरू आहे. याचें कारण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें हेंच आहे कीं, पाणिनीयशास्त्र संस्कृत भाषेंतील सर्वरूपांना व्यापणारें व कोणत्याहि रूपाची सिद्धि करण्यास उपयोगी पडणारें सर्वाङ्गपरिपूर्ण असून पूर्वाचार्यांनीं व उत्तराचार्यांनीं केलेले व्याकरणग्रन्थ त्याच्या कसोटीला पावत नसल्यामुळें आणि त्याच्या पुढें ते सर्व ग्रन्थ फिके पडत असल्यामुळें, ते कांहीं काळ टिकाव धरून पुढें कालगतीनें नष्टप्राय व नामशेष झाले आणि सर्वांना पुरून पाणिनीयशास्त्रच अनेक शतकांपासून टिकाव धरून उरलें आहे आणि सर्वमान्य झालें आहे. धन्य तो पाणिनी व धन्य त्याची विशाल बुद्धि ! ज्या हिन्दुस्थानांत 'न भूतो न भविष्यति' असा हा अद्वितीय पुरुष निर्माण झाला त्या हिन्दुस्थानाला त्याच्याबद्दल अत्यन्त अभिमान वाटणें साहजिक आहे व त्या महात्म्याची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच आहे. जरी अष्टाध्यायीवर अनेक वार्तिकें रचलीं गेलीं तरी विद्वान् वैयाकरणांनीं ठिकठिकाणीं असेंच म्हटलें आहे कीं 'सूत्रेष्वेव हि तत्सर्वं यद्वृत्तौ यच्च वार्तिके।'

जसा व्याकरणसूत्रकारांत आचार्य पाणिनि श्रेष्ठ त्याचप्रमाणें कौमुदीकारांत भट्टोजी दीक्षित श्रेष्ठ. जशी अष्टाध्यायी निर्माण झाल्यावर पूर्वाचार्यांचे ग्रन्थ विलयास गेले त्याचप्रमाणें सिद्धान्तकौमुदी तयार झाल्यावर पूर्वकौमुदीग्रन्थांचें पठनपाठन बंद पडून ते नामशेष झालें. सिद्धान्तकौमुदीच विद्यार्थ्यांना समजणें फार कठीण आहे. जोपर्यंत वासुदेव दीक्षितकृत सिद्धान्तकौमुदीवरील बालमनोरमानामक टीका प्रसिद्ध झाली नव्हती तोपर्यंत गुरूच्या सहायाशिवाय सिद्धान्त-कौमुदींत दिलेल्या अनेक पंक्तींचा अर्थ व तसेंच त्या ग्रन्थांत दिलेल्या अनेक उदाहरणांची प्रक्रिया कळणें फार कठीण जात होतें. पण आतां फार सरळ व सुन्दर भाषेंत लिहिलेल्या बालमनोरमेच्या सहायानें गुरुच्या मदतीशिवाय कौमुदींतील पंक्तींच्या अर्थाचा बोध होऊं शकतो व सर्व उदाहरणांची प्रक्रिया कळूं शकते. सिद्धान्तकौमुदीपेक्षां मनोरमा फार कठीण असून मनोरमेपेक्षां शब्दरत्न किती तरी पट कठीण आहे. मूळ ग्रन्थाचा अर्थ विशद होऊन तो सहज रीतीनें सामान्य विद्यार्थ्यांच्या ध्यानांत यावा हें वास्तविक टीकेचें ध्येय असलें पाहिजे व टीका मूळ ग्रन्थापेक्षां सोपी व सुबोध असली पाहिजे. पण प्रकृत स्थलीं पाहावें तो अगदीं उलट प्रकार दिसून येतो. मूळ ग्रन्थाच्या मानानें टीका अधिक कठीण व दुर्बोध आहे. मूळ ग्रन्थांतील कठीण पंक्तींचा अर्थ विशद करण्याचा व उदाहरणांची प्रक्रिया समजवून देण्याचा टीकेंत मुळींच प्रयत्न केला नसून अनेक क्लिष्ट कल्पना उपस्थित करून त्यांवर उत्तर दिलें आहे. शंका व समाधान इतक्या कठीण व त्रोटक शब्दांत सांगितलें आहे कीं, त्यांचा भावार्थ ध्यानांत येणें हें सामान्य विद्यार्थ्यास फारच जड जातें. त्यामुळें नको ती टीका, मूळच बरें, असें वारंवार म्हणण्याची पाळी येते. मनोरमेची भाषा शब्दरत्नासारखी समासप्रचुर, न्यायघटित व क्लिष्ट नाहीं व तत्वबोधिनींत आणि विशेषतः बालमनोरमेंत मनोरमेंतील कांहीं पंक्तींचें विवरण करून पुष्कळ ठिकाणीं प्रक्रिया दिली आहे. त्यामुळें

मनोरमेच्या पंक्ति कशा तरी लावतां येऊं शकतात. पण त्या दोन्ही टीकेंत शब्दरत्नांतील कोणत्याहि पंक्तीचा अर्थ विशद केला नसल्यामुळें, शब्दरत्न लावतेवेळीं त्या टीका उपयोगी पडत नाहींत आणि भैरवी व भावप्रकाश या टीकांच्या सहायानें शब्दरत्न कसा तरी लावावा लागतो. पण या दोन टीका बालमनोरमेसारखा प्रत्येक पंक्तीचा अर्थ विशद करीत नाहींत. त्यामुळें शब्दरत्न लावतेवेळीं कित्येक ठिकाणीं फार अडचण जाते. परिष्कारप्रिय वैयाकरणानीं शब्दरत्नावर मधून मधून कांहीं टिप्पणी दिल्या आहेत. पण त्या टिप्पणींत वीत वीत लांब समासांचा उपयोग करून न्यायघटित व क्लिष्ट भाषा वापरली असल्यामुळें सामान्य वाचकास त्या टिप्पणींपासून कांहीं विशेष अर्थबोध व फायदा होत नाहीं. बालमनोरमेच्या धर्तीवर प्रौढमनोरमा, शब्दरत्न, शब्देन्दुशेखर, परिभाषेन्दुशेखर इत्यादि व्याकरणशास्त्रावरील प्रमाणभूत ग्रन्थांचें सामान्य विद्यार्थ्यास देखील समजू शकेल अशा सोपी व सरळ संस्कृत भाषेंत विद्वान् पण्डितांनीं व्याख्यान केलें पाहिजे व तसें केल्यासच हे ग्रन्थ नीट ध्यानांत येऊं शकतील व व्याकरणशास्त्राध्ययन करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थिवर्गावर त्यांचे फार उपकार होतील. दुर्दैवानें तसा प्रयत्न अझून कोणी करीत नाहीं. सध्यां संस्कृत भाषेबद्दल सर्वत्र व विशेषतः महाराष्ट्रांत फारच अनास्था उत्पन्न झाली आहे. त्यांत व्याकरणशास्त्रासारखे कठीण विषय शिकण्याची इच्छा फारच थोड्या विद्यार्थ्यांना होते. दुसरें असें कीं, जरी सिद्धान्तकौमुदी पढविणारे शास्त्री अझून ठिकठिकाणीं महाराष्ट्रांत आहेत तरी व्याकरणशास्त्रावरील वरचे ग्रन्थ शिकविणारा पण्डित महाराष्ट्रांत फारच क्वचित् आढळतो. अझून सुदैवानें काशींत तसे थोडे पण्डित आहेत. परंतु गरीब विद्यार्थ्यांना द्रव्याभावामुळें तेथें जातां येणें शक्य नाहीं. महामहोपाध्याय कै. वा. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनीं मराठींत महाभाष्याचें सुन्दर भाषान्तर करून व ठिकठिकाणीं टीपा देऊन विद्यार्थिवर्गावर फार

उपकार केले आहेत. इतर प्रसिद्ध प्रचलित व्याकरणग्रन्थांचे देखील तसें भाषान्तर व्हावयास पाहिजे व विद्वान् महाराष्ट्र वैयाकरणांनीं तसा प्रयत्न केला पाहिजे. तसें केल्यासच व्याकरणशास्त्र पठित करण्याची जी प्रथा सध्यां दुर्दैवानें बंद पडली आहे ती पुन्हा थोडी-बहुत प्रचलित होण्याची उमेद आहे.

मी कोणत्याहि वैयाकरणाजवळ जुन्या पद्धतीनें व्याकरणशास्त्राचें अध्ययन कार्यबाहुल्यामुळें सरकारी नौकरींत असतांना करूं शकलो नाहीं. पण सेवानिवृत्त झाल्यावर मला जो पहिल्येपासून व्याकरण-शास्त्राची गोडी होती ती पुन्हा उत्पन्न झाली व माझें परममित्र प्रो. गोपाळ केशव गर्दे यांच्याबरोबर मी सिद्धान्तकौमुदीची कांहीं प्रकरणें वाचलीं व पुढें कांहीं वर्षांनीं त्यांच्या प्रेरणेनें व सहायानें मी परिभाषेन्दुशेखराचें मराठींत विस्तृत विवरण करून तो ग्रन्थ १९३६ च्या अखेरीस प्रसिद्ध केला. त्यानंतर कांहीं मित्रांच्या प्रेरणेनें मी मनोरमा व शब्दरत्न यांचें भाषान्तर व विवरण करण्यास सुरुवात केली. परिभाषेन्दुशेखराचें डॉ. किल्हॉर्न यांनीं इंग्रजींत भाषान्तर केलें आहे. पण मनोरमा व शब्दरत्न या ग्रन्थांचें भाषान्तर अझून कोणीहि केलें नाहीं आणि म्हणून मी ते ग्रन्थ मुद्दाम हातीं घेतले. प्रथम माझा मनोरमेचेंच विवरण करण्याचा विचार होता. पण शब्दरत्न कळल्याशिवाय मनोरमेचें खरें रहस्य कळूं शकत नाहीं हें आढळून आल्यावर मी दोन्ही ग्रन्थांचें विवरण करण्यास प्रारंभ केला. हें करितांना माझे मित्र प्रो. गर्दे यांचें कांहीं वेळपर्यंत मला सहाय्य झालें. पण ते पुढें लवकरच आजारी पडले व अझून ते गेल्या पांच वर्षांपासून सारखे आजारीच आहेत व अंध झाले आहेत. मीहि सुमारें दोन वर्षांपूर्वीं फार आजारी झालों व अजून माझा आजार चालूच आहे व वार्धक्यामुळें शरीर व्याधीनें जर्जर झालें आहे. अशा स्थितींत मी स्त्रीप्रत्ययान्त मनोरमा व शब्दरत्न या ग्रन्थांचें कसें तरी विवरण केलें आहे. कारक प्रकरणाचें विवरण करण्याची माझी फार

इच्छा होती. पण आतां शरीर अगदीं दुर्बल झालें असल्यामुळें, दुर्दैवानें ती इच्छा पूर्ण करण्याचें सामर्थ्य माझ्यांत राहिलें नाहीं व त्याबद्दल मला फार दिलगिरी वाटते. माझी उत्कट इच्छा ही आहे की, कोणी तरी विद्वान् महाराष्ट्र वैयाकरणानें अवशिष्ट राहिलेल्या कारकप्रकरणाचें व तसेंच कारकान्त शब्देन्दुशेखराचें मराठींत विस्तृत व सुबोध विवरण करावें.

मनोरमा व शब्दरत्न यांचें विवरण करितांना मी प्रथम प्रत्येक पंक्तीचा सरळ अर्थ दिला आहे व त्यानंतर प्रत्येक पंक्तीचें कंसांत विस्तृत विवरण करून जेथें जेथें प्रक्रिया देणें आवश्यक आहे तेथें पूर्ण प्रक्रिया दिली आहे आणि प्रक्रिया देतांना पाणिनीय सूत्रें व त्यांच्या बालमनोरमेच्या प्रतींत दिलेला अनुक्रमाङ्क दिला आहे. त्यामुळें ज्यानें सिद्धान्तकौमुदी वाचली आहे त्याला गुरूच्या सहाया-शिवाय माझें विवरण वाचल्यानें मनोरमा व शब्दरत्न पूर्णपणें कळूं शकतील अशी मला पूर्ण आशा आहे. माझा ग्रन्थ कितपत ठीक झाला आहे हें वैयाकरणच सांगूं शकतील. मी यावद्बुद्धिबलोदय वरील दोन ग्रन्थांचें मराठींत विवरण करून व्याकरणशास्त्राची व मातृभाषेची यथाशक्ति थोडीशी सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे व या विवरणानें जर विद्यार्थिवर्गाची अडचण दूर होईल तर माझे परिश्रम सफल झाले आहेत असें मी समजेन.

हा ग्रन्थ लिहितेवेळीं प्रो. गोपाळ केशव गर्दे यांनीं मला जी अमूल्य मदत केली तिचेबद्दल मी त्यांचे जितके आभार मानले तितके कमीच आहेत. त्यांच्यामुळेंच मला व्याकरणशास्त्रावरील वरचे ग्रन्थ वाचण्याची इच्छा झाली व त्यांच्या कृपाप्रसादानेंच मी ती इच्छा थोडी बहुत पूर्ण करूं शकलों आणि म्हणून मी त्यांचा सदैव ऋणी आहे. प्रस्तुत ग्रन्थ जरी मी कसातरी लिहून काढला तरी माझा स्वतःचे ठिकाणीं आत्मविश्वास नसल्यामुळें, बनारस गव्हर्न्मेंन्ट संस्कृत कॉलेजांत असलेले व्याकरणशास्त्राचे प्रधानाध्यापक सुप्रसिद्ध विद्वान्

पं. गोपाळशास्त्री नेने, व्याकरणाचार्य यांना माझा ग्रन्थ वाचण्याची मी विनन्ति केली व माझे विनन्तीस मान देऊन त्यांनीं माझे ग्रन्थाचा बराच भाग वाचला व मधूनमधून उपयुक्त सूचना केल्या आणि माझा ग्रन्थ वाचून ते फार प्रसन्न झाले. तसेंच अनन्तशास्त्री फडके, व्याकरणाचार्य व मीमांसातीर्थ व दिवाकरशास्त्री जोशी, व्याकरणाचार्य आणि सदाशिवशास्त्री मुसळगांवकर, माजी प्रिन्सिपॉल गव्हर्न्मेन्ट संस्कृत कॉलेज, ग्वालेर, यांनीं कृपा करून माझ्या ग्रन्थाचीं कांहीं प्रकरणें वाचलीं व या सर्व विद्वान् पण्डितांनीं माझ्या ग्रन्थाबद्दल उत्कृष्ट अभिप्राय नमूद केले आहेत. या सर्व सज्जनांनीं माझा ग्रन्थ वाचण्याची जी तसदी घेतली व जें माझें हार्दिक अभिनन्दन केलें त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. हीं प्रस्तावना लिहितांना मला डॉ. बेलवलकरकृत 'Systems of Sanskrit grammar' व महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री यांनीं बङ्गाल रॉयल एशिआटिक सोसायटीच्या ग्रन्थालयांत जे हस्तलिखित ग्रन्थ आहेत त्यांच्या संबंधानें लिहिलेली प्रस्तावना आणि रा. ब. बांबर्डेकरकृत भट्टोजी दीक्षित–ज्ञातिविवेक या तीन ग्रन्थांचा फार उपयोग झाला आहे व या ग्रन्थकारांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. ही प्रस्तावना लिहितेवेळीं माझे जामात चि. रा. शिवनाथपंत झारखण्डी, एम्. ए., एम्. एस्सी. यांनीं बरेच परिश्रम घेऊन मधून मधून पुष्कळ माहिती पुरविली. मला हस्तकंपामुळें लिहितां येत नसल्यामुळें या ग्रन्थलेखनाचें सर्व काम माझ्या ज्येष्ठ चिरंजिवानें केलें. अखेरीस ज्या जगदीश्वराच्या कृपेनें हें ग्रन्थलेखनाचें काम मी कसेंतरी पार पाडूं शकलों त्याचे चरणकमलीं हा ग्रन्थ अत्यन्त नम्रतापूर्वक अर्पण करून ही प्रस्तावना मी पूरी करितों.

धंतोली, चैत्र शु. ९ शके १८६७ **ना. दा. वाडेगांवकर**
ता. २०–४–१९४५

टीप–जेथें जेथें मी आपल्या विवरणांत दीक्षित हा शब्द वापरला आहे त्यानें भट्टोजी दीक्षितांचें ग्रहण करावें.

॥ श्रीगणेशायनमः ॥

प्रौढमनोरमा व शब्दरत्न यांचें महाराष्ट्रभाषेंत विवरण

सर्वारिष्टविनाशकं गणपतिं श्रीव्यंकटेशं प्रभुम् ।
देवीं माहुरवासिनीं भगवतीं पूज्यं मुनीनां त्रयम् ॥
भट्टोजि हरिदीक्षितं च पितरौ श्रीभट्टजीशास्त्रिणम् ।
नत्वा प्रौढमनोरमाविवरणं कुर्वे प्रसादाद्गुरोः ॥ १ ॥
हरिदीक्षितैः कृताया गूढार्थाया मनोरमाविवृतेः ।
व्याख्यानं च यथामति कुर्वेऽहं मातृभाषायाम् ॥ २ ॥
क्व शब्दरत्नो गम्भीरो मादृशोऽल्पमतिः क्व च ।
तथाऽपि साहसं कुर्वे क्षन्तव्यं तन्मनीषिभिः ॥ ३ ॥

अथ संज्ञाप्रकरणम्

मनोरमा– ध्यायं ध्यायं परं ब्रह्म स्मारं स्मारं गरोर्गिरः ।
सिद्धान्तकौमुदीव्याख्यां कुर्मः प्रौढमनोरमाम् ॥

परब्रह्माचें पुन्हा पुन्हा ध्यान करून व गुरूच्या उक्तींचें पुन्हा पुन्हा स्मरण करून सिद्धान्तकौमुदीची प्रौढमनोरमानामक व्याख्या आम्ही करितों. (हातीं लिहिण्यास घेतलेल्या ग्रन्थाची निर्विघ्नपणें समाप्ति व्हावी व त्या ग्रन्थाचा सर्वत्र प्रसार होऊन त्याची सर्वत्र प्रसिद्धि व्हावी या हेतूनें दीक्षितांनीं 'ग्रन्थादौ ग्रन्थमध्ये ग्रन्थान्ते च मङ्गलं कुर्यात्' या शिष्टाचाराला व तसेंच 'भूवादयो धातवः' सू. १–३–१ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'मङ्गलादीनि मङ्गलमध्यानि मङ्गलान्तानि हि शास्त्राणि प्रथन्ते वीरपुरुषाणि च भवन्त्यायुष्मत्पुरुषाणि चाध्येतारश्च मङ्गलयुक्ता यथा स्युः' असें जें म्हटलें आहे त्याला अनुसरून वरील मङ्गलाचरण केलें आहे.)

शब्दरत्न– शेषविभूषणमीडे शेषाशेषार्थलाभाय ।
दातुं सकलमभीष्टं फलमीष्टे यत्कृपादृष्टिः ॥१॥

ध्यायं ध्यायमिति । ध्यात्वा ध्यात्वेत्यर्थः । णमुलन्तमेतत् । परम् = सर्वं जगदुपादानम् । कार्यब्रह्महिरण्यगर्भव्यावृत्तये इदम् । ध्यानम् = चिन्तापरपर्यायं स्मृत्यनुकूलव्यापाररूपम् । स्मरणं तु तज्जन्यमिति विशेषः । गुरोरित्येकवचनेन सर्वविद्यालाभ एकस्मादेव गुरोरिति सूचितम् । 'प्रौढानां मनो रमयति' इत्यर्थिकां मनोरमाम् । प्रौढत्वं च सकलदर्शनार्थज्ञानपूर्वकमहाभाष्यगूढार्थज्ञानवत्त्वम् ॥

ज्याचा कृपाकटाक्ष सर्व वांछित फल देण्यास समर्थ आहे व शेष ज्याचा अलंकार आहे अशा शिवाची, भाष्यांतील संपूर्ण अर्थाचें ज्ञान होण्याकरितां, मी स्तुति करितों. मनोरमेंतील 'ध्यायं ध्यायम्' या पदांचा 'ध्यात्वा ध्यात्वा' असा अर्थ आहे. व हें ('ध्यै' धातूचें) णमुल्प्रत्ययान्त रूप आहे. (त्याचप्रमाणें 'स्मारं स्मारम्' हें देखील 'स्मृ' धातूचें णमुल्प्रत्ययान्त रूप असून त्याचा 'स्मृत्वा स्मृत्वा' असा अर्थ आहे. वरील दोन्ही स्थलीं 'आभीक्ष्णे णमुल् च' सू. ३३४३ या सूत्रानें 'पौनः पुन्य' या अर्थामध्यें णमुल् प्रत्यय झाला असून 'नित्यवीप्सयोः' सू. २१४० या सूत्रानें द्विर्वचन झालें आहे.) मनोरमेंतील 'परम्' या पदाचा सकलविश्वाचें उपादानकारण असा अर्थ आहे व हिरण्यगर्भरूप कार्यब्रह्माची व्यावृत्ति व्हावी याकरितां तें पद घातलें आहे. ('अपञ्चीकृतसकलभूतसमष्टिसूक्ष्मशरीरोपहितो हिरण्यगर्भः, तदुपाधिभूततादृशशरीरस्य जन्यत्वात् हिरण्यगर्भस्य जन्यत्वव्यवहारः। अतएव–हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् । इति श्रुतिः सङ्गच्छते' असें भैरवींत म्हटलें आहे. सारांश अशा कार्यब्रह्माचें ग्रहण न होतां 'नित्यं विज्ञानमानन्दं ब्रह्म' या शुद्ध चैतन्यस्वरूप जगदुपादानकारण परब्रह्माचें ग्रहण व्हावें याकरितां दीक्षितांनीं 'परम्' हें पद मङ्गलाचरणांत घातलें आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'ध्यानम्' हा शब्द चिन्तन

या अर्थाचा वाचक असून 'चिन्तन' हा स्मृति होण्यास अनुकूल व्यापार आहे, म्हणजे चिन्तनामुळेंच स्मृति होते. स्मृति चिन्तनामुळें होणारी आहे व हाच ध्यान–चिन्तन–व स्मरण या दोहोंमध्यें फरक आहे. ('ध्यै चिन्तायाम्' या धातूहून भावे 'ल्युट् = अन' प्रत्यय केल्यानें ध्यान हा जो शब्द सिद्ध होतो त्याचा चिन्तन असा अर्थ आहे.) 'गुरोः' असा जो मनोरमेंत ('आदरार्थे बहुवचनम्' या वचनान्वयें 'गुरूणां गिरः' असा बहुवचनाचा प्रयोग न करितां) एकवचनाचा प्रयोग केला आहे तो अशा हेतूनें केला आहे कीं, एकाच गुरूजवळ सर्व शास्त्रांचें अध्ययन करून विद्या अधिगत केली आहे हें सूचित व्हावें. (शेषोपनामक कृष्णाचार्य दीक्षितांचे गुरु होते. ते सर्व शास्त्रांत निष्णात असल्यामुळें दीक्षितांनीं त्यांच्याच जवळ सर्व शास्त्रांचें अध्ययन करून त्यांत प्रभुत्व संपादन केलें व त्यांना कोणतेंहि शास्त्र शिकण्याकरितां इतर गुरूजवळ जाण्याची गरज पडली नाहीं हें 'गुरोः' या एकवचनाच्या प्रयोगानें बोधित होतें.) 'प्रौढमनोरमाम्' या पदाचा 'प्रौढानां मनो रमयति ताम्' असा अर्थ–विग्रह– आहे. सर्व दर्शनांचें ज्ञान संपादन केल्यानंतर ज्यानीं महाभाष्याचें अध्ययन करून त्याच्या गूढ अर्थाचें ज्ञान संपादित केलें आहे ते प्रौढ होत. ('प्रौढमनोरमा' या पदाचा 'प्रौढा चासौ मनोरमा' असा विग्रह करूं नये. तसा विग्रह केल्यास 'वयांत आलेली कामिनी' असा त्या शब्दाचा अनिष्ट अर्थ होईल. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, प्रौढमनांसि रमयति इति प्रौढमनोरमा' असा देखील विग्रह करतां येत नाहीं; कारण तसा विग्रह केल्यास, 'कर्मण्यण्' सू. २९१३ या सूत्रानें 'अण्' प्रत्यय होऊन 'टिड्ढाणञ्,' सू. ४७० या सूत्रानें 'ङीप्' प्रत्ययाची प्राप्ति होईल व 'प्रौढमनोरमा' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. म्हणून 'नन्दिग्रहिपचादिभ्यः' सू. २८९६ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'पचादि' आकृतिगणांत किंवा 'कप्रकरणे मूलविभुजादिभ्य उपसंख्यानम्'–सू. २९१९ वरील वार्तिक–या वार्तिकांत

निर्दिष्ट असलेल्या 'मूलविभुजादि' आकृतिगणांत 'रम्' धातु अन्तर्भूत आहे असें मानून त्या 'रम्' धातूहून 'अच्' किंवा 'क' प्रत्यय करून व नंतर 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें 'टाप्' प्रत्यय करून 'रमयतीति रमा' असें रूप सिद्ध केल्यावर 'प्रौढमनसां रमा प्रौढमनोरमा' असा विग्रह करणें उचित आहे. पण 'नन्दिग्रहिपचादिभ्यः' या सूत्रानें होणारा 'अच्' प्रत्यय व तसेंच 'मूलविभुजादिभ्यः' या वार्तिकानें होणारा 'क' प्रत्यय हे दोन्ही 'कर्मण्यण्' या सूत्रानें होणाऱ्या 'अण्' प्रत्ययाचे बाधक असल्यामुळें, पचादिगणांत किंवा मूलविभुजादिगणांत अन्तर्भूत मानलेल्या 'रम्' धातूहून, कर्मार्थक उपपद असतां देखील, 'अण्' प्रत्यय न होतां 'अच्' किंवा 'क' प्रत्ययच होऊं शकतो व त्यामुळें 'ङीप्' प्रत्ययाची प्राप्ति होत नाहीं, व 'प्रौढमनांसि रमयतीति प्रौढमनोरमा' असा विग्रह करण्यांत कोणताहि प्रत्यवाय येत नाहीं असें भैरवीकारांचें म्हणणें आहे व म्हणूनच तसाच विग्रह शब्दरत्नकारांनीं केला आहे. 'प्रौढमनोरमा' या सामासिक शब्दांत 'प्रौढ' हा जो शब्द मुद्दाम घातला आहे त्यानें हें सूचित होतें कीं, दीक्षितांनीं केलेली सिद्धान्तकौमुदी मध्यम विद्यार्थ्यांकरितां असून तींत केवळ सिद्धान्त सांगितले आहेत. पण तेच खरोखर सिद्धान्त होत व इतर वैयाकरणांनीं त्या सिद्धान्तांविरुद्ध जें प्रतिपादन केलें आहे तें चूक आहे इत्यादि विविध कठीण विषयांची त्या ग्रंथांत चर्चा केली नाहीं. ती चर्चा प्रकृत ग्रंथांत केली आहे, व इतर वैयाकरणांनीं मानलेले विरुद्ध अर्थ व सिद्धान्त खोडून काढले आहेत. त्या चर्चेचें खरें मर्म व रहस्य प्रौढांनाच, म्हणजे ज्यांनीं इतर दर्शनांचें अध्ययन करून महाभाष्याचें काळजीपूर्वक अध्ययन केलें आहे अशा विद्वानांनाच, कळूं शकतें व तशा विद्वानांच्याच मनाला आनंद देणारी व रमविणारी ही टीका असल्यामुळें तिला दीक्षितांनीं 'प्रौढमनोरमा' असें जें नांव दिलें आहे तें अन्वर्थक ठरतें हें उघड आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा– "हयवरट्" । हकारोपदेशः, अट्अश्हश्इण्ग्रहणेषु हकारग्रहणार्थः । 'अर्हेण' "अड्व्यवायेऽपि" इति णत्वम् । 'देवा हसन्ति' "भोभगो" इति रोर्यत्वम् । 'देवो हसति' "हशि च" इत्युत्वम् । 'लिलिहिढ्वे' 'लिलिहिध्वे' "विभाषेटः" इति वा ढः ॥

'हयवरट्' या शिवसूत्रांत जें हकाराचें उच्चारण केलें आहे तें अशाकरितां कीं, 'अट्, अश्, हश्' व 'इण्' या प्रत्याहारांनीं हकाराचें ग्रहण व्हावें. ('हयवरट्' व 'हल्' या दोन्हीं शिवसूत्रांत हकाराचें उच्चारण केलें आहे. 'हल्' या अन्तिम शिवसूत्रांत हकाराचें उच्चारण केलें असून पुन्हा 'हयवरट्' या शिवसूत्रांत हकाराचें उच्चारण कां केलें आहे याचें प्रयोजन दीक्षितांनीं या पंक्तींत सांगितलें आहे. अट्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होतें म्हणूनच) 'अर्हेण' या उदाहरणांत 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' सू. १९७ या सूत्रानें णत्व झालें आहे. ('अर्हेण' या उदाहरणांत रकार व नकार या दोहोंमध्यें हकार व एकार यांचें व्यवधान आहे. एकार हा अट् आहे. जर 'हयवरट्' या शिवसूत्रांत हकाराचें उच्चारण केलें नसतें तर अट्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण झालें नसतें व त्यामुळें 'अर्हेण' या स्थलीं णत्व न होतां 'अर्हेन' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती. ती आपत्ति टळावी व तसेंच 'अट्कुप्वाङ्नुम्-हव्यवायेऽपि' असें वेगळें हकारग्रहण करून तसें सूत्र पठित करण्याची गरज न पडावी याकरितां प्रकृत शिवसूत्रांत हकाराचें ग्रहण केलें आहे.) 'देवा हसन्ति' या उदाहरणांत 'भोभगोअघो' सू. १६७ या सूत्रानें 'रु' चे जागीं यकारादेश झाला आहे. ('देव अस् हसन्ति' या स्थलीं 'प्रथमयोः पूर्वसवर्णः सू. १६४ या सूत्रानें पूर्वसवर्णदीर्घ होऊन व 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें पदान्तीं असलेल्या सकाराचें रुत्व होऊन 'देवा रु हसन्ति' अशी स्थिति झाली असतां, अश्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होत असल्यामुळेंच व तो हकार 'रु' पुढें आला असल्यामुळें, 'भोभगो' या सूत्रानें 'रु' चे जागीं यकार

होऊन 'देवाय् हसन्ति' अशी स्थिति होते व 'हलि सर्वेषाम्' सू. १७१ या सूत्रानें यकाराचा लोप होऊन 'देवा हसन्ति' असा इष्ट प्रयोग सिद्ध होतो. जर प्रकृत शिवसूत्रांत हकाराचें ग्रहण केलें नसतें तर अश्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण झालें नसतें व वरील इष्ट प्रयोग सिद्ध होऊं शकला नसता.) 'देवो हसति' या उदाहरणांत 'हशि च' सू. १६६ या सूत्रानें उत्व झालें आहे. ('देव सु हसति' या स्थलीं 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें पदान्तीं असलेल्या सकाराचें रुत्व होऊन 'देव रु हसति' अशी स्थिति झाली असतां, हश्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होत असल्यामुळेंच, 'हशि च' या सूत्रानें 'रु' चे जागीं उकार होऊन 'देव उ हसति' अशी स्थिति होते व नंतर 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें 'देव' यांतील अन्त्य अकार व त्या-पुढील 'उ' या दोहोंचे जागीं 'ओ' असा गुणरूप एकादेश होऊन 'देवो हसति' हा इष्ट प्रयोग सिद्ध होतो. जर प्रकृत शिवसूत्रांत हकाराचें उच्चारण केलें नसतें तर हश्प्रत्याहार साधतांच येऊं शकला नसता व 'हशि च' या सूत्राऐवजीं 'यशि च' असें सूत्र करावें लागलें असतें व यश्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होऊं शकलें नसतें व वरील इष्ट प्रयोग सिद्ध होऊं शकला नसता. तो प्रयोग सिद्ध होण्याकरितां 'यशि च' या सूत्रांत हकाराचें वेगळे ग्रहण करणें भाग पडलें असतें. हें सर्व टळावें व हश् प्रत्याहार साधतां यावा आणि त्या हश्-प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण व्हावें याकरितां प्रकृत शिवसूत्रांत हकाराचें उच्चारण केलें आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'लिलिहिढ्वे, लिलिहिध्वे' या स्थलीं 'विभाषेटः' सू. २३२५ या सूत्रानें विकल्पेंकरून ढकार होतो. (इण्प्रत्याहारान्तर्गत वर्णापुढें इट् असून त्या इट्पुढें लिट् किंवा लुङ लकाराचा 'ध्वम्' प्रत्यय आल्यास, त्या प्रत्ययांतील धकाराचा, 'विभाषेटः' या सूत्रानें, विकल्पेंकरून ढकार होणें सांगितलें आहे. लिडादेश तिङ 'लिट् च' सू. २१७२ या सूत्रान्वयें आर्धधातुकसंज्ञक प्रत्यय असल्यामुळें, लिट्चे जागीं

होणाऱ्या वलादि प्रत्ययांना 'आर्धधातुकस्येड् वलादेः' सू. २१८४ या सूत्रानें इडागम होतो. जरी 'लिह्' धातु अनिट् आहे तरी, त्यापुढें लिडादेश वलादि आर्धधातुकप्रत्यय आल्यास, तशा प्रत्ययाला क्रादि-नियमान्वयें इडागम होतोच; आणि जरी 'तिप्तस्झि' सू. २१५४ या सूत्रांत 'ध्वम्' प्रत्यय निर्दिष्ट आहे तरी त्या प्रत्ययांतील 'अम्' या 'टि' चे जागीं 'टित आत्मनेपदानां टेरे' सू. २२३३ या सूत्रानें 'ए' होऊन त्याचें 'ध्वे' असें रूपान्तर होतें तरी, 'ध्वे' हा 'ध्वम्'च आहे असें स्थानिवद्भावानें मानतां येतें व त्या 'ध्वे' ला लिट्लकारांत इडागम होतो व त्यामुळें 'लिलिह्+इट्+ध्वे' अशी स्थिति होते. जर 'हयवरट्' या शिवसूत्रांत हकारग्रहण केलें नसतें तर माहेश्वर सूत्रांतील पर णकारानें साधणाऱ्या इण्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण झालें नसतें व 'विभाषेटः' या सूत्राची वरील उदाहरणांत प्रवृत्ति करतां आली नसती व 'ध्वे' यांतील धकाराचें वैकल्पिक ढत्व करतां आलें नसतें. पण त्या शिवसूत्रांत हकारग्रहण केलें असल्यामुळें, हकार हा इण्प्रत्याहारान्तर्गत वर्ण ठरतो व वरील उदाहरणांत तशा हकाररूप इण्पुढें इट् आला असून त्या इट्पुढें 'ध्वम्=ध्वे' हा प्रत्यय आला असल्यामुळें, 'विभाषेटः' या सूत्रानें त्या प्रत्ययांतील धकाराचें वैकल्पिक ढत्व होऊन 'लिलिहिढ्वे' असें पाक्षिक इष्ट रूप सिद्ध होतें. सारांश 'अट्, अश्, हश्, इण्' या चार प्रत्याहारांनीं हकाराचें ग्रहण व्हावें याकरितां 'हयवरट्' या सूत्रांत हकारग्रहण केलें आहे. तसें ग्रहण केलें नसतें तर, जेथें जेथें पाणिनीय सूत्रांत 'अट् अश् इण्' प्रत्याहारांचें ग्रहण केलें आहे तथें तेथें इष्टरूपसिद्धि होण्याकरितां त्या प्रत्याहारांखेरीज हकाराचें ग्रहण करावें लागलें असतें, आणि तसेंच जेथें जेथें पाणिनीय सूत्रांत हश्प्रत्याहाराचें ग्रहण केलें आहे तेथें तेथें यश्प्रत्याहाराचें ग्रहण करून त्याखेरीज हकाराचें ग्रहण करावें लागलें असतें. हा सर्व त्रास टाळण्याकरितां प्रकृत शिवसूत्रांत हकारग्रहण केलें आहे. 'हयवरट्' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'सर्वे

वर्णाः सकृदुपदिष्टाः। अयं हकारो द्विरुपदिश्यते पूर्वश्चैव परश्च। यदि पुनः पूर्व एवोपदिश्येत पर एव वा। कश्चात्र विशेषः। ' व त्या हकाराच्या पूर्वोपदेशाचें प्रयोजन सांगतांना भाष्यकार 'हकारस्य परोपदेशेऽड्ग्रहणेषु हग्रहणम्' व 'उत्त्वे च' हीं दोन वार्तिकें पठित करतात. प्रथम वार्तिकाचा अर्थ असा आहे कीं, हकार एकदां शेवटींच, म्हणजे 'हल्' या अन्तिम शिवसूत्रांतच, उच्चारल्यास, ज्या ठिकाणीं 'अट्' हा शब्द उच्चारून अट्वर्णांना किंवा तन्निमित्तक कार्य होणें सांगितलें आहे त्या सूत्रांत त्या प्रत्याहाराखेरीज हकाराचा उच्चार करावा लागेल. द्वितीय वार्तिकाचा अर्थ हा आहे कीं, उकारादेश सांगणाऱ्या–'हशि च' इत्यादि–सूत्रांत हकार उच्चारावा लागेल; आणि नंतर हकाराच्या परोपदेशाचें प्रयोजन सांगून अखेरीस भाष्यकार म्हणतात–'तस्मात्पूर्वश्चैवोपदेष्टव्यः परश्च। यदि च किंचिदन्यत्राप्युपदेशे प्रयोजनमस्ति तत्राप्युपदेशः कर्तव्यः।' या भाष्याचा आशय हा आहे कीं, वर्णांचें ज्ञान व्हावें याकरितां अक्षरसमाम्नाय उच्चारला नसून प्रयोजनाकरितां, म्हणजे प्रत्याहार साधण्याकरितां, उच्चारला आहे. म्हणून एखादा वर्ण एकदां उच्चारल्यानें जर सर्व इष्ट प्रयोजनांची सिद्धि होत नसेल तर तो वर्ण दोनदां किंवा गरज असल्यास अधिक वेळां उच्चारणें आवश्यक आहे, व अशा रीतीनें भाष्यकार अक्षरसमाम्नायांतील हकाराच्या द्विरुच्चारणाचें समर्थन करितात.)

शब्दरत्न–इण्ग्रहणेष्विति। नन्विदं न्यूनम्, अम्ग्रहणेऽपि ग्रहणात्। फलं तु 'बहुपुम्क्रुह्' इत्यादौ "पुमः खय्यम्" इति रुत्वम्। 'गवित्ययमाह' इत्यादिवत् अपदान्तत्वात्ककारादेर्न जश्त्वमिति, चेत्, न, "सुट्तिथोः" इत्यादाविकाराद्युच्चारणेन शास्त्राबोधिताजव्यवहितहल्समुदायस्यासाधुत्वबोधनात्। अत एव "उच्चैरुदात्तः" इति सूत्रे भाष्यम्–"न पुनरन्तरेणाचं व्यञ्जनस्योच्चारणमपि भवति" इति। स्कोरित्यादिस्तु सौत्रः प्रयोगः। अत एवाटि

हकारप्रयोजनकथनावसरे भाष्ये "शश्छोटि" इत्युपन्यस्य तदुदाहरणं नोपन्यस्तम्। हकारपरशकारासम्भवेन शश्छोटीति प्रसङ्गोच्चारितमिति च कैयटेन व्याख्यातम्। 'अमि' हकारप्रयोजनम् 'इति' च भाष्ये नोक्तमिति दिक्॥

कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, 'हकारोपदेशः अट्अश्हश्इण्ग्रहणेषु हकारग्रहणार्थः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें अपुरें आहे; कारण हकाराचें (वरील चार प्रत्याहारांखेरीज) 'अम्' प्रत्याहारांत देखील ग्रहण व्हावें हें 'हयवरट्' या शिवसूत्रांतील हकारग्रहणाचें एक अधिक प्रयोजन मानतां येतें, व 'अम्' प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण केल्यानें, 'बहुपुम् क् ह्' इत्यादि स्थलीं 'पुमः-खय्यम्परे' सू. १३९ या सूत्रानें 'बहुपुम्' यांतील मकाराचें रुत्व होणें हें फल आहे; आणि 'गवित्ययमाह' इत्यादि प्रयोगांत 'गो' हें अनुकरण जसें पद मानतां येत नाहीं तसेंच 'क्' व 'ह्' या अनुकरणांना पदसंज्ञक मानतां येत नाहीं व अशा रीतीनें 'क्' व 'ह्' हे पदाच्या अन्तीं आहेत असें मानतां येत नसल्यामुळें, त्यांचें ('झलां जशोऽन्ते' सू. ८४ व 'हो ढः' सू. ३२४ या सूत्रांनीं होणारें अनुक्रमें) जश्त्व व ढत्व होत नाहीं. ('बहवः पुमांसः यस्मिन् तत्' या बहुव्रीहिसमासांत 'पुमांसः' हा बहुवचनान्त शब्द असल्यामुळें व 'उरः प्रभृतिभ्यः कप्' सू. ८८९ या नित्य कप्विधायक सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'उरः' प्रभृतिगणांत 'पुमान्' असा एकवचनान्त शब्द पठित असल्यामुळें, या स्थलीं नित्य 'कप्' प्रत्यय न होतां 'शेषाद्विभाषा' सू. ८९१ या सूत्रानें विकल्पेंकरून 'कप्' प्रत्यय पावला आहे. तो समासान्त 'कप्' प्रत्यय प्रकृत स्थलीं न केल्यास, 'बहुपुम्स्' असें जें सामासिक रूप होतें त्याहून प्रथमेच्या एकवचनाचा 'सु' प्रत्यय केला असतां, 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें त्या 'सु' प्रत्ययाचा लोप होतो व 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रानें 'बहुपुम्स्' याला पदसंज्ञा होते व त्यामुळें त्या पदांतील संयोगान्त सकाराचा 'संयोगान्तस्य लोपः' सू.

५४ या सूत्रानें लोप होऊन 'बहुपुम्' असें प्रथमेच्या एकवचनाचें रूप होतें. या पदापुढें ककार व हकार यांचे अनुकरण 'क्, ह्' हे वर्ण आले असल्यामुळें व ककार हा 'खय्' असून त्या खय्पुढें हकार हा 'अम्' आला असल्यामुळें, 'पुम्' यांतील मकाराचे जागीं 'रु' होतो हें, अम्प्रत्याहारांत हकाराचें ग्रहण केल्याचें, फल आहे. येथें अशी प्रतिशंका करण्यांत येते कीं, अनुकरण व अनुकार्य यांच्या विषयांत भेदानुकरणपक्ष मानला असतां, अनुकरण ककार व हकार हे अर्थवान् ठरतात व त्यामुळें 'अर्थवदधातुरप्रत्ययः' सू. १७८ या सूत्रानें त्यांना प्रातिपदिकसंज्ञा होते व 'ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रान्वयें त्यांहून सुबुत्पत्ति होऊन व 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्राने 'सु' प्रत्ययाचा लोप होऊन 'क्,ह्' या दोहोंनाहि प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा होते आणि त्यामुळें 'झलां जशोऽन्ते' सू. ८४ या सूत्रानें ककाराचा गकार व 'हो ढः' सू. ३२४ या सूत्रानें हकाराचा ढकार होणें प्राप्त होतें आणि तसें केल्यास 'पुम्' यांतील मकारापुढें 'खय्' नसणारा गकार येत असून त्या गकारापुढें 'अम्' नसणारा ढकार येत असल्यामुळे, अम्प्रत्याहारानें हकार ग्रहण होण्याचें फल आहे हें सिद्ध करण्याकरितां वर दिलेलें 'बहुपुम् क् ह्' हें योग्य उदाहरण मानतांच येत नाहीं. या प्रतिशंकेवर शंकाकार असें उत्तर देतो कीं, अभेदानुकरणपक्ष मानला असतां, 'गवित्ययमाह' या प्रयोगांत 'गो' हें अनुकरण अर्थवान् ठरत नसल्यामुळें जशी त्याला 'अर्थवदधातुः' या सूत्रानें होणारी प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति होत नसल्याकारणानें त्याला पदसंज्ञा होत नाहीं आणि त्यामुळें 'अवङ् स्फोटायनस्य' सू. ८८ या सूत्रानें 'गो' यांतील ओकाराचे जागीं विकल्पेंकरून अवङ् आदेश न होतां 'एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रानें जसा केवळ अवादेश होतो व त्या आदेशांतील वकार, म्हणजे 'गव्' यांतील वकार, पदान्ती आहे असें ठरत नसल्याकारणानें 'लोपः शाकल्यस्य' सू. ६७ या सूत्रानें त्या

वकाराचा लोप होत नाहीं. त्याचप्रमाणें अभेदानुकरणपक्षांत प्रकृत स्थलीं अनुकरण ककार व हकार हे अर्थवान् ठरत नसल्यामुळें, त्यांना प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं व त्यामुळें त्यांहून सुबुत्पत्ति होऊं शकत नसल्यामुळें, 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें होणारी पदसंज्ञा त्यांना होऊंच शकत नाहीं व त्यामुळें त्यांचे अनुक्रमें जश्त्व व ढत्व होऊं शकत नाहीं. म्हणून अम्प्रत्याहारांत हकारग्रहण करण्याचें 'बहुपु-म् क् ह्' या उदाहरणामध्यें मकाराचें रुत्व होणें हें फल आहे असें जें वर म्हटलें आहे तें निर्दोष ठरतें असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. येथें हें सांगणें आवश्यक आहे कीं, शंकाकारानें जी शंका केली आहे ती अभेदानुकरणपक्ष मानून केली आहे व त्या शंकेवर जी प्रतिशंका केली आहे ती भेदानुकरणपक्ष मानून केली आहे. हे दोन्ही पक्ष व्याकरणशास्त्रांत मानले आहेत व या दोन पक्षांत फरक हा आहे कीं, अभेदानुकरणपक्षांत अनुकार्य अर्थवान् ठरत असून अनुकरण अर्थरहित मानलें जातें आणि म्हणून अर्थवत्वाच्या अभावामुळें त्या अनुकरणाला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति होऊं शकत नसल्याकारणानें त्याला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं. पण भेदानुकरणपक्षांत अनुकरण व अनुकार्य हे दोन्ही सारखेच अर्थवान् मानले जात असल्यामुळें, अनुकरणाला देखील 'अर्थवदधातुः' या सूत्रानें होणारी प्रातिपदिकसंज्ञा होते व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति होऊन त्याला पदसंज्ञा होते. म्हणूनच शंकाकारानें अभेदानुकरणपक्ष मानून शंका केली आहे व त्याच्या शंकेवर प्रतिशंका करितांना प्रतिशंकाकारानें भेदानुकरणपक्ष मानून त्याच्या शंकेचें खण्डन केलें आहे. आतां शंकाकारानें अभेदानुकरणपक्षाचा आश्रय घेऊन वर केलेल्या शंकेचें निरसन करण्याकरितां शब्दरत्नकार असें म्हणतात कीं,) ही शंका बरोबर नाहीं; कारण 'सुट् तिथोः' सू. २२१० इत्यादि सूत्रांत ('त्थोः' असें उच्चारण न करितां) तकाराला इकार जोडून जें उच्चारण केलें आहे त्यावरून हें सिद्ध होतें कीं, जेथें पाणिनीयसूत्रां-

न्वयें अनेक व्यञ्जनें एकापुढें एक असे एकत्र येऊं शकतात तीं स्थलें खेरीज करून इतर स्थलीं अनेक व्यञ्जनांचा एकापुढें एक अशा तऱ्हेचा स्वरव्यवधानरहित प्रयोग भाषेंत साधु मानला जात नाहीं. (सारांश 'इको यणचि' सू. ४७ इत्यादि सन्धिसूत्रांन्वयें जेथें अचाचें मध्यें व्यवधान नसून अनेक व्यञ्जनें एकत्र येतात तशा ठिकाणीं स्वरव्यवधानरहित अनेक व्यञ्जनांचा समुदायरूप प्रयोग पाणिनीय शास्त्राच्या आधारें होत असल्यामुळें तसा प्रयोग साधु मानतां येतो. परंतु 'बहुपुम् क् ह्' या उदाहरणांत मकार ककार व हकार या तीन व्यञ्जनांचा एकापुढें एक असा प्रयोग कोणत्याहि पाणिनीय सूत्रान्वयें झाला नसून केवळ काल्पनिक प्रयोग असल्यामुळें, तसा प्रयोग साधु मानतां येत नाहीं व तशा असाधु प्रयोगाचे ठिकाणीं व्याकरणशास्त्र प्रवृत्त होत नाहीं. म्हणून अम्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण केलें असतां वरील ज्या उदाहरणांत रुत्व होणें हें फल शंकाकार देतो तें उदाहरण काल्पनिक व असाधु असल्यामुळें, शंकाकारानें केलेली शंका व्यर्थ ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) म्हणूनच, म्हणजे पाणिनीय शास्त्रान्वयें सिद्ध न होणारा एकापुढें एक असा हल्समुदाय भाषेंत कोठेंहि आढळत नसल्यामुळें व तशा समुदायाचा प्रयोग व्याकरण रीत्या असाधु मानला जात असल्यामुळेंच, 'उच्चै-रुदात्तः' सू. १–२–२९ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'न पुनरन्तरेणाचं व्यञ्जनस्योच्चारणमपि भवति,' म्हणजे स्वराच्या सहायाशिवाय व्यञ्जनाचा उच्चार देखील होऊं शकत नाहीं, असें म्हटलें आहे. (मग जर स्वराच्या सहायाशिवाय एक देखील व्यञ्जन उच्चारतां येत नाहीं तर ज्यांच्या मध्यें अचाचें व्यवधान नाहीं अशीं अनेक व्यञ्जनें कशीं उच्चारतां येऊं शकणार ? या भाष्यावरून व तसेंच वर सांगितल्याप्रमाणें 'सुट् तिथोः, झषस्तथोः' सू. २२८० इत्यादि पाणिनीय सूत्रांत 'त्थोः' असा निर्देश न करितां मध्यें इकार व अकार जोडून 'तिथोः तथोः' इत्यादि जे निर्देश केले आहेत त्यांवरून

हें स्पष्ट होतें कीं, अजव्यवहित हल्समुदायाचा प्रयोग भाषेंत करतां येऊं शकत नाहीं व त्यामुळें 'बहुपुम् क् ह्' हा काल्पनिक प्रयोग असाधु-शास्त्रविरुद्ध-ठरतो आणि ज्या प्रयोगाचें भाषेंत अभिधान नाहीं अशा प्रयोगाच्या विषयांत पाणिनीय शास्त्राची प्रवृत्ति करतां येत नाहीं. या अर्थाचें 'यथालक्षणमप्रयुक्ते' हें वचन भाष्यकारांनीं भाष्यांत ठिकठिकाणीं पठित केलें असल्यामुळें, तशा काल्पनिक व भाषेंत न आढळणाऱ्या आणि असाधु ठरणाऱ्या प्रयोगाचे ठिकाणीं वरील भाष्य-वचनान्वयें 'पुमः खय्यम्परे' या पाणिनीय सूत्राची प्रवृत्ति करतां येऊं शकत नाहीं.) 'स्कोः संयोगाद्योः' सू. ३८० (किंवा 'लोपो व्योर्वलि' सू. ८७३) इत्यादि सूत्रांत 'स्कोः' (किंवा 'व्योः') असा जो (अजव्यवहित व्यञ्जनांचा) प्रयोग केला आहे तो सौत्र प्रयोग आहे, (आणि 'छन्दोवत्सूत्राणि भवन्ति' असें भाष्यवचन असल्यामुळें ज्या-प्रमाणें वेदांतील कोणताहि प्रयोग अशुद्ध मानतां येत नाहीं त्याचप्रमाणें 'स्कोः, व्योः' इत्यादि सौत्र प्रयोग अशुद्ध मानतां येत नाहींत. पण तशा सौत्र प्रयोगाच्या आधारावर भाषेंत अजव्यवहित हल् समुदायाचा प्रयोग करतां येऊं शकत नाहीं व तसा प्रयोग असाधुच ठरतो.) म्हणूनच 'अट्' प्रत्याहारानें हकाराचे ग्रहण व्हावें याचें प्रयोजन सांगतेवेळीं भाष्यकारांनीं जरी 'शश्छोटि' सू. १२० या सूत्राचा उपन्यास केला आहे तरी त्या सूत्राचें कोणतेंहि उदाहरण दिलें नाहीं आणि त्या भाष्यावरील प्रदीपांत कैयटानें असें व्याख्यान केलें आहे कीं, शकारापुढें हकार येणें असंभवनीय असल्यामुळें भाष्यकारांनीं 'शश्छोटि' या सूत्राचा केवळ प्रसङ्गोपात्त उपन्यास केला आहे, म्हणजे जरी भाष्यकारांनीं प्रसङ्गाला अनुसरून त्या सूत्राचा उल्लेख केला आहे तरी शकारापुढें भाषेंत हकार येणें असंभवनीय असल्यामुळेंच तशा प्रकारचें कोणतेंहि उदाहरण दिलें नाहीं. (या कैयटवृत्तीवरून देखील हें स्पष्ट होतें कीं, ज्यांच्या मध्यें अचाचें व्यवधान नाहीं अशा अनेक व्यञ्जनांचा भाषेंत प्रयोग करतां येत नाहीं व तसा प्रयोग

व्याकरणशास्त्ररीत्या अशुद्ध ठरतो. म्हणून 'वहूपुम् क् हृ' हें जें शंकाकारानें उदाहरण दिलें आहे तें अशुद्ध ठरत असल्यामुळें, त्याचे ठिकाणीं वर सांगितल्याप्रमाणें 'पुमः खय्यम्परे' या पाणिनीय सूत्राची प्रवृत्ति करतां येत नाहीं.) 'हयवरट्' या शिवसूत्रांतील हकाराचें ग्रहण 'अम' प्रत्याहारानें देखील हकाराचें ग्रहण व्हावें याकरितां केलें आहे असें भाष्यांत कोठेंहि म्हटलें नाहीं. (म्हणून दीक्षितांनीं मनोरमेंत ज्या चार प्रत्याहारांचा निर्देश केला आहे तेवढ्याच प्रत्याहारांनी हकारग्रहण व्हावें याकरितांच 'हयवरट्' या शिवसूत्रांत हकाराचें ग्रहण केलें आहे हेंच मानणें योग्य आहे व 'अम्' प्रत्याहारानें देखील हकाराचें ग्रहण व्हावें याकरितां त्या शिवसूत्रांत हकारग्रहण केलें आहे हें मानणें बरोबर नाहीं.)

मनोरमा– "हल्" (मा. सू. १४) । इदं सूत्रं वल्रल्झल्शल्षु हकारग्रहणार्थम् । 'रुदिहि' 'स्वपिहि' "रुदादिभ्यः सार्वधातुके" इति वलादिलक्षण इट् । 'स्निहित्वा' 'स्नेहित्वा' "रलो व्युपधाद्" इति वा किस्वम् । 'अदाग्धाम्' "झलो झलि" इति सकारलोपः । 'अलिक्षत्' "शल इगुपधात्" इति क्सः ॥

('हयवरट्' या शिवसूत्रांत हकाराचें ग्रहण केलें असल्यामुळें, ज्यांत पुन्हा हकाराचें ग्रहण केलें आहे व लकार इत् आहे असें 'हल्' हें अंतिम शिवसूत्र असण्याची गरज काय अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेचें निवारण करण्याकरितां व हकाराचा जसा पूर्वोपदेश करणें जरूर होतें तसाच त्याचा परोपदेश करणें देखील जरूर असल्यामुळें, 'हल्' हें शिवसूत्र करणें आवश्यक होतें हें सिद्ध करण्याकरितां, दीक्षित ही पंक्ति लिहितात.) 'वल्, रल्, झल्, शल्' या प्रत्याहारांत हकाराचें ग्रहण व्हावें म्हणून, 'हल्' हें अन्तिम शिवसूत्र पठित केलें आहे. (जर हें शिवसूत्र पठित केलें नसतें तर, वर निर्दिष्ट केलेल्या चार प्रत्याहारांत हकाराचें ग्रहण झालें नसतें) 'रुदिहि, स्वपिहि' या उदाहरणांत 'रुदादिभ्यः सार्वधातुके' सू. २४७४ या सूत्रानें

(वलादि सार्वधातुकप्रत्यय 'रुद्, स्वप्, श्वस्, अन्, जक्ष्' या धातूंपुढें आला असतां, त्याला) वलादित्यामुळें होणारा इडागम होतो. (सेहर्यपिच्च सू. २२०१ या सूत्रानें 'सि' या सार्वधातुक प्रत्ययाचे जागीं लोट् लकारांत 'हि' असा अपित् आदेश होतो व तो स्थानिवद्भावानें सार्वधातुक प्रत्यय ठरतो. 'हि' हा प्रत्यय हकारानें सुरु होणारा आहे. जर 'हल्' हें शिवसूत्र नसतें तर, 'वल्' प्रत्याहार साधतांच आला नसता व 'वर्' असा प्रत्याहार होऊन त्या प्रत्याहाराचें जर सूत्रांत ग्रहण केलें असतें तर, तशा प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण झालें नसतें, व 'हि' या प्रत्ययाला इडागम झाला नसता आणि 'रुदिहि, स्वपिहि' अशीं इष्टरूपें सिद्ध होऊं शकलीं नसतीं. तीं सिद्ध व्हावीं म्हणून, 'हल्' हें अन्तिम शिवसूत्र आवश्यक आहे व अशा रीतीनें तें सूत्र चरितार्थ ठरतें.) 'स्निहित्वा, स्नेहित्वा' या स्थलीं, 'रलो व्युपधात्' सू. २६१७ या सूत्रान्वयें इडागमसहित 'क्त्वा' प्रत्यय विकल्पेंकरून 'कित्' होतो. ('स्निह् + क्त्वा' या स्थलीं, 'स्निह्' धातु व्यंजनानें सुरु होणारा असून व त्याच्या उपधेंत इकार असून अन्तीं हकार आहे. रल्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण, 'हल्' हें शिवसूत्र असलें तरच, होऊं शकतें. तें सूत्र नसतें तर, 'रल्' प्रत्याहार साधतांच आला नसता. 'रर्' प्रत्याहार साधतां आला असता व त्या 'रर्' प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होऊं शकलें नसतें व त्यामुळें 'न क्त्वा सेट्' सू. ३३२२ या सूत्रान्वयें अकित् असणारा 'सेट् क्त्वा' प्रत्यय विकल्पेंकरून कित् झाला नसता व 'स्निहित्वा' असें इष्ट पाक्षिक रूप होऊं शकलें नसतें. पण 'हल्' हें शिवसूत्र असल्यामुळें, रल्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होतें व स्निह् धातूपुढील 'सेट् त्वा' प्रत्यय जेव्हां विकल्पेंकरून कित् होतो तेव्हां, 'क्ङिति च' सू. २२१७ या सूत्रान्वयें उपधेंतील इकारास गुण होत नाहीं व 'स्निहित्वा' असें पाक्षिक इष्ट रूप सिद्ध होतें.) 'अदाग्धाम्' या उदाहरणांत 'झलो झलि' सू. २२८१ या सूत्रान्वयें सकाराचा लोप होतो.

('अ + दह् + सिच् + ताम्' या स्थलीं, 'वदव्रजहलन्तस्याचः' सू. २२६७ या सूत्रानें 'दह्' यांतील अकाराची वृद्धि होऊन 'अ + दाह् + स् + ताम्' अशी स्थिति झाली असतां, झल्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होत असल्यामुळेंच व त्या झल् हकारापुढें 'सिच्' प्रत्यय असून त्या सिचापुढें झलादि 'ताम्' प्रत्यय आला असल्यामुळें, सिचाचा–म्हणजे सकाराचा–लोप होतो. जर 'हल्' हें शिवसूत्र नसतें तर, 'झल्' प्रत्याहार साधतांच आला नसता. 'झर्' प्रत्याहार साधता आला असता व त्या झर्प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होऊं शकलें नसतें व सिचाचा लोप झाला नसता आणि 'अदाग्धाम्' असें इष्टरूप सिद्ध होऊं शकलें नसतें. सिचाचा लोप होऊन 'अदाह + ताम्' अशी स्थिति झाल्यावर, 'दादेर्धातोर्घः' सू. ३२५ या सूत्रानें 'दह्' धातूंतील हकाराचा घकार होऊन व 'झषस्तथोर्धः' सू. २२८० या सूत्रानें 'ताम्' प्रत्ययांतील तकाराचा धकार होऊन व 'झलां जश् झशि' सू. ५२ या सूत्रानें घकाराचा गकार होऊन 'अदाग्धाम्' असें रूप सिद्ध होतें.) 'अलिक्षत्' या उदाहरणांत 'शल इगुपधादनिटः क्सः' सू. २३३६ या सूत्रानें ('च्लि' चे जागीं) 'क्स' असा आदेश होतो. (या आदेशांतील ककार 'लशक्वतद्धिते' सू. १९५ या सूत्रान्वयें 'इत्' आहे व हा आदेश 'कित्' असल्यामुळें व 'क्ङिति च' सू. २२१७ हें निषेधक सूत्र असल्यामुळें 'लिह्' यांतील उपधेचा 'पुगन्तलघूपधस्य च' सू. २१८९ या सूत्रानें होणारा गुण होत नाहीं. 'अ + लिह् + स + त्' या स्थलीं 'लिह्' हा धातु शल्प्रत्याहारान्तर्गत हवर्णान्त आहे. जर 'हल्' हें शिवसूत्र नसतें तर, 'शल्' प्रत्याहार साधतांच आला नसता. 'शर्' प्रत्याहार साधता आला असता व त्या 'शर्' प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण झालें नसतें, आणि इगुपध हकारान्त 'लिह्' धातूपुढील 'च्लि' चे जागीं 'क्स' हा आदेश होऊं शकला नसता. पण तें शिवसूत्र असल्यामुळें, 'शल्' प्रत्याहार सिद्ध होतो. व त्या प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होऊन 'लिह्' पुढील

'च्लि' चे जागीं 'क्स = स' असा आदेश होतो व 'हो ढः' सू. ३२४ या सूत्रानें 'लिह्' धातूंतील हकाराचा ढकार होऊन व 'षढोः कः सि' सू. २९५ या सूत्रानें त्या ढकाराचा ककार होऊन आणि 'आदेश-प्रत्यययोः' सू. २१२ या सूत्रानें 'स' प्रत्ययांतील सकाराचा षकार होऊन 'अलिक्षत्' असें इष्ट रूप सिद्ध होतें. सारांश 'हल्' हें अन्तिम शिवसूत्र नसतें तर 'वल्, रल्, झल्, शल्' हे प्रत्याहार साधतां आले नसते व त्यामुळें त्या चार प्रत्याहारांऐवजीं 'वर्, रर्, झर्, शर्' असे प्रत्याहार करावे लागले असते हें वर सांगितलेंच आहे आणि त्या प्रत्याहारांचे ज्या ज्या पाणिनीय सूत्रांत ग्रहण केलें असतें तेथें तेथें हकारास किंवा हकारनिमित्तक कार्य होण्याकरितां, त्या प्रत्याहारांखेरीज हकाराचें देखील ग्रहण करावें लागलें असतें. हा सर्व त्रास टाळण्याकरितां व लघु सूत्रें होण्याकरितां 'हल्' हें प्रकृत शिवसूत्र केलें आहे, व अशा रीतीनें तें सूत्र आवश्यक ठरतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. 'हयवरट्' या शिवसूत्रा-वरील भाष्यांत देखील 'पूर्वोपदेशे कित्वक्सेड्विधयो झल्ग्रहणानि च' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्य-कारांनीं वरप्रमाणेंच म्हटलें आहे व त्याचाच अनुवाद मनोरमेंत केला आहे.)

शब्दरत्न– इदं सूत्रमिति । वलादिप्रत्याहाराश्च रेफेणैव सन्तु । हरन्त्यमित्यत्र अन्योन्याश्रयपरिहारस्तु 'रन्त्यं हर्' इति न्यासेनावृत्त्या, हर्प्रत्याहारबोधकसूत्रसमुदायान्त्यमिदित्यर्थेन वा सुकर इति भावः । ग्रहणार्थमिति । शषसहरित्येव तु नोक्तम्, खरि हकारग्रहणापत्तौ हरिर्हरतीत्यादौ विसर्गापत्तेः ।

('हल्' या अन्तिम शिवसूत्रासंबंधानें अशी शंका करण्यांत येते कीं, 'हयवरट्' या शिवसूत्रांत हकाराचा पूर्वींच उपदेश केला असल्यामुळें, 'हल्' हें शिवसूत्र गाळून टाकावें व 'शषसर्' पर्यंत तेराच शिवसूत्रें पठित करावीं, कारण तें सूत्र नसलें तरी, सर्व

स्वर व्यञ्जनांचा बाकीच्या तेरा सूत्रांनीं उपदेश होतोच. तें सूत्र गाळल्यास, चतुर्दशसूत्रींतील अन्त्य लकार नाहींसा होईल हें खरें. पण तो इत्संज्ञकच वर्ण आहे व तो वर्ण असण्याचीं जीं प्रयोजनें आहेत, म्हणजे 'हलन्त्यम्' या सूत्राची उपपत्ति लावणें व वलादि लान्त प्रत्याहार साधणें, तीं सर्व प्रयोजनें, तो वर्ण नसला तरी, इतर रीतीनें सिद्ध होऊं शकतात. तो वर्ण नाहींसा केल्यानें जरी लान्त प्रत्याहार साधतां येणार नाहींत तरी त्यांच्या ऐवजीं रान्त प्रत्याहार साधावे व 'हलन्त्यम्' या पाणिनीय सूत्राऐवजीं 'हरन्त्यम्' असें सूत्र पठित करावें. तसें केलें म्हणजे, अन्त्य लकार असण्याची जीं प्रयोजनें आहेत तीं अशा रीतीनें सहज सिद्ध होऊं शकतात. म्हणून शंकाकार म्हणतो कीं, 'वल्, रल्, झल्, शल्' इत्यादि लान्त प्रत्याहारांऐवजीं 'शषसर्' या शिवसूत्रांतील अन्त्य) रेफानेंच 'वर्' इत्यादि रान्त प्रत्याहार साधावे, (व 'हलन्त्यम्' या सूत्राऐवजीं) 'हरन्त्यम्' असें जें सूत्र पठित करावें लागेल त्यांत जो अन्योन्याश्रयरूप दोष येण्याचा संभव आहे तो दोष टाळण्याकरितां, एकतर 'हरन्त्यम्' असें सूत्र पठित न करितां त्याऐवजीं 'रन्त्यंहर्' असें सूत्र पठित करावें, किंवा (अन्योन्याश्रयरूप दोषाचें निवारण करण्याकरितां जसें दीक्षितांनीं 'हलन्त्यम्' हें सूत्र दोनदां उच्चारून त्या सूत्राचे दोन भिन्न अर्थ केले आहेत त्याचप्रमाणें) 'हरन्त्यम्' हें सूत्र दोनदां उच्चारावें, व तें सूत्र दोनदां उच्चारल्यास, हर् प्रत्याहाराचा बोध करून देणारा जो शिवसूत्रसमुदाय, म्हणजे ज्याच्या योगानें हर्प्रत्याहार साधतां येतो असा 'हयवरट्' या सूत्रापासून 'शषसर्' या सूत्रापर्यंत जो सूत्रसमुदाय, त्यांतील अन्त्य हर्–व्यञ्जन–इत् होतें असा सूत्रार्थ होईल (व अशा रीतीनें वर सांगितलेल्या दोन उपायांपैकीं कोणत्याहि उपायाचें अवलंबन केलें तरी अन्योन्याश्रयरूप दोष सहज टाळतां येतो) असा शंकाकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. ('रन्त्यं हर्' असा 'हलन्त्यम्' या सूत्राऐवजीं सूत्रपाठ केल्यास,

त्यांत 'उपदेशेऽजनुनासिक इत्' या पूर्व सूत्रांतून 'इत्' या पदाची अनुवृत्ति होऊन 'रन्त्यं हर् इत्' असें सूत्र होईल व त्या सूत्रांतील 'र्' व 'हर्' या दोहोंच्या मध्यें पठित असलेल्या 'अन्त्यम्' या पदाचा देहलीदीपन्यायानें 'र्' व 'हर्' या दोहोंशीं अन्वय केल्यास, 'अन्त्यम् र् इत्' व 'अन्त्यम् हर् इत्' असें वाक्यद्वयात्मक सूत्र होईल व शिवसूत्रांतील अन्त्य रकार, म्हणजे 'हल्' हें अन्तिम सूत्र गाळलें असतां 'शषसर्' हें जें अन्तिम शिवसूत्र होतें त्यांतील अन्त्य रकार, इत्संज्ञक होतो असा प्रथम वाक्याचा अर्थ होईल. अशा रीतीनें शिवसूत्रांतील त्या अन्त्य रकाराची इत्संज्ञा सिद्ध झाल्यावर 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्राच्या सहायानें 'हर' प्रत्याहार सिद्ध होऊन व त्या 'हर्' प्रत्याहारांत व्यञ्जनेंच निर्दिष्ट असल्यामुळें 'हर्' याचा व्यञ्जन असा अर्थ होऊन त्या योगानें द्वितीय वाक्याचा उपदेशांतील अन्त्य हर्, म्हणजे व्यञ्जन, इत्संज्ञक होतें असा अर्थ होईल. दोन्ही वाक्यांचा वरप्रमाणें अर्थ केल्यानें अन्योन्याश्रयरूप दोष मुळींच येत नाहीं. पण 'रन्त्यं हर्' असा न्यासभेद करून व रकार अधिक जोडून सूत्र पठित करण्यांत गौरव आहे असें वाटल्यास, तसें सूत्र पठित न करितां 'हरन्त्यम्' असेंच 'हलन्त्यम्' या सूत्रासारखेंच सूत्र पठित करावें व अन्योन्याश्रयरूप दोष टाळण्याकरितां तें सूत्र दोनदां उच्चारून प्रथम उच्चारलेल्या त्या सूत्राचा असा अर्थ करावा कीं, 'हर्' प्रत्याहाराचा बोधक जो 'हयवरट्' या शिवसूत्रापासून 'शषसर्' या अन्तिम शिवसूत्रापर्यंतचा शिवसूत्रसमुदाय आहे, म्हणजे ज्या शिवसूत्रसमुदायानें 'हर्' प्रत्याहार सिद्ध होतो, त्या समुदायाचा अन्त्य रकार इत्संज्ञक होतो. असा अर्थ करतेवेळीं 'हरन्त्यम्' या सूत्रांतील 'हर्' या शब्दाचा हर्प्रत्याहारबोधक शिवसूत्रसमुदाय असा लक्षणेनें अर्थ करावा व 'हरन्त्यम्' या सामासिक पदाचा 'हरः अन्त्यम्' असा षष्ठीतत्पुरुषसमास मानून विग्रह करावा. असा लक्षणेनें अर्थ करण्याचें कारण हें कीं, 'हल्' हें स्वतंत्र अन्तिम

शिवसूत्र असतांना जसा 'हलन्त्यम्' या सूत्राचा 'हलि=हल् इति शिवसूत्रे, अन्त्यं इत्' असा विग्रह करून लकाराची इत्संज्ञा सिद्ध करतां येऊं शकत होती तसा, 'हर्' असें स्वतंत्र अन्तिम शिवसूत्र नसल्यामुळें, 'हरन्त्यम्' या सूत्राचा 'हरि अन्त्यम्' असा विग्रह करतां येऊं शकत नाहीं. म्हणून प्रथम उच्चारलेल्या 'हरन्त्यम्' या सूत्रांतील 'हर्' या पदाचा वर सांगितल्याप्रमाणें लक्षणेनें अर्थ करणें आवश्यक आहे व तसा अर्थ करून शिवसूत्रांतील अन्त्य रकाराची इत्संज्ञा सिद्ध झाल्यावर 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्राच्या सहायानें 'हर्' प्रत्याहार सिद्ध होतो आणि तसा प्रत्याहार सिद्ध झाल्यावर दुसऱ्यानें उच्चारलेल्या 'हरन्त्यम्' या सूत्राचा 'उपदेशे अन्त्यं हर् =व्यञ्जनम् इत्स्यात्' असा अर्थ सिद्ध होतो. अशा रीतीनें 'हरन्त्यम्' हें सूत्र दोनदां उच्चारून वर सांगितल्याप्रमाणें अर्थ केल्यानें अन्योन्याश्रयरूप दोष येत नाहीं असा शंकाकाराच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ आहे. पण त्याच्या म्हणण्याप्रमाणें 'हल्' हें संपूर्ण अन्तिम शिवसूत्र गाळल्यास, लकाराबरोबर हकार देखील नाहींसा होणार व त्या सूत्राचीं जीं प्रयोजनें आहेत, म्हणजे 'वल्, रल्, झल्, शल्' हे प्रत्याहार सिद्ध करणें व त्या प्रत्याहारांत हकार अन्तर्भूत असणें हीं जीं प्रयोजनें आहेत, तीं कशी सिद्ध होऊं शकणार ? तो म्हणतो कीं, त्या लान्त प्रत्याहारांऐवजीं 'वर्, रर्, झर्, शर्' असे रेफान्त प्रत्याहार साधावे. पण तसे प्रत्याहार साधल्यास, त्या प्रत्याहारांनीं हकाराचें ग्रहण होऊं शकणार नाहीं व त्यामुळें मनोरमेंत दिलेलीं 'रुदिहि' इत्यादि उदाहरणें सिद्ध न होण्याची आपत्ति येईल हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ती आपत्ति टाळण्याकरितां शिवसूत्रांत हकाराचें दुसऱ्यानें शेवटीं ग्रहण करणें आवश्यक आहे व 'वल्, रल्, झल्, शल्' हे प्रत्याहार सिद्ध होण्याकरितां अखेरीस उच्चारलेल्या त्या हकाराबरोबर लकारानुबन्ध देखील उच्चारणें आवश्यक आहे, आणि अशा रीतीनें 'हल्' हें संपूर्ण अन्तिम शिवसूत्र आवश्यक असून तें सूत्र

किंवा त्यांतील एकहि वर्ण गाळतां येऊं शकत नाहीं हें सिद्ध करण्याकरितां, शंकाकाराची 'वलादि प्रत्याहाराश्च रेफेणैव सन्तु ......सुकरः इति भावः' ही शब्दरत्नांत सांगितलेली शंका मनांत धरूनच त्या शंकेच्या उत्तरादाखल दीक्षितांनीं 'हल् इदं सूत्रं वलरलझलशल्षु हकार ग्रहणार्थम्' ही पंक्ति मनोरमेंत लिहिली आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. यावर शंकाकार पुन्हा अशी शंका करतो कीं, शिवसूत्रांत हकाराचें दुसऱ्यानें शेवटीं केलेलें ग्रहण आवश्यक असल्यामुळें, हकार कायम ठेवून त्या पुढील लकारानुबन्ध गाळावा व 'शषसहर्' असें तेरावें शिवसूत्र करावें व तसें सूत्र केल्यानें 'वर्, रर्, झर्, शर्' या रेफान्त प्रत्याहारांनीं हकाराचें ग्रहण करतां येतें व मनोरमेंत दिलेलीं इष्ट रूपें सिद्ध होऊं शकतात आणि 'हल्' असें वेगळें अन्तिम शिवसूत्र असण्याची गरज राहत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'शषसर्, हल्' या दोन शिवसूत्रांऐवजीं) 'शषसहर्' असें एक शिवसूत्र पठित केलें नाहीं; कारण (वरील दोन शिवसूत्रें मिळून तसें एकच शिवसूत्र पठित केलें असतें तर) 'खर्' प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होण्याची आपत्ति आली असती आणि 'हरिर्हरति' इत्यादि उदाहरणांत ('खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें) रेफाचा विसर्ग होण्याची आपत्ति आली असती. ('हरि+सु+हरति = हरिर्+हरति' या स्थलीं, हकार 'खर्' मानल्यास, वाक्यसंस्कार-पक्षांत देखील, रेफाचा विसर्ग होऊन 'हरिः हरति' असाच प्रयोग झाला असता. तो टाळण्याकरितां 'शषसर्' व 'हल्' अशीं दोन शिवसूत्रें पठित केलीं आहेत असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'प्रेष्यब्रुवोर्हविषो देवता सम्प्रदाने' सू. ६२१ या पाणिनीय सूत्रांत रेफापुढें हकार आला असून देखील त्या रेफाचा पाणिनीनें विसर्ग केला नसल्यामुळें, त्या ज्ञापकाच्या आधारें असें म्हणतां येतें कीं, रेफापुढें हकार आल्यास, त्या रेफाचा विसर्ग होत नाहीं व

त्यामुळें शब्दरत्नांत दाखविलेली आपत्ति टाळतां येते असें कोणी म्हटल्यास, त्याला उत्तर हें आहे कीं, 'खर्' प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण केल्यास, शब्दरत्नांत दिलेली आपत्ति वरील ज्ञापकाच्या आधारें जरी टाळतां आली तरी, 'शर्' प्रत्याहारानें हकाराचें ग्रहण होईल व 'सुगण् हसति, प्रत्यङ हसति' इत्यादि उदाहरणांत णकारापुढें व ङकारापूढें 'हसति' यांतील हकार आला असल्यामुळें, तो हकार 'शर्' मानल्यास , 'ङणोः कुक्टुक्शरि' सू. १३० या सूत्रानें णकाराला टुक् आगम व ङकाराला कुक् आगम होण्याची आपत्ति येईल. यावर असें म्हणतां येतें कीं, 'एङह्रस्वात्सम्बुद्धेः' सू. १९३ या पाणिनीय सूत्रांत ङकारापुढें हकार आला असून देखील ङकाराला कुगागम केला नसल्यामुळें त्यावरून हें ज्ञापित होतें कीं, ङकारापुढें हकार आल्यास ङकाराला कुगागम होत नाहीं. पण हें जरी बरोबर मानलें तरी 'सुगण् हसति' या उदाहरणांत णकाराला टुगागम होण्याची जी आपत्ति येते ती कशी टाळतां येऊं शकणार ? सारांश हकार हा 'खर्' किंवा 'शर्' मानल्यास ज्या अनेक आपत्ति येऊं पाहतात त्यांचें निवारण करण्याकरितां पाणिनीय सूत्रांतील ज्ञापकें धुंडाळणें यांत गौरव असून, 'हल्' हें अन्तिम शिवसूत्र मानणें यांतच लाघव आहे व तें सूत्र मानल्यास ज्ञापकें धुंडत बसण्याची मुळींच गरज पडत नाहीं. दुसरें असें कीं, 'प्रमाणभूत आचार्यो दर्भपवित्रपाणिः शुचाववकाशे प्राङमुख उपविश्य महता यत्नेन सूत्रं प्रणयति स्म, तत्राशक्यं वर्णेनाप्यनर्थकेन भवितुं किं पुनरियता सूत्रेण' असें जें 'वृद्धिरादैच्' सू. १-१-१ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं म्हटलें आहे तें जसें पाणिनीय सूत्रांना लागू पडतें तसेंच पाणिनीनें स्वीकारलेल्या शिवसूत्रांना देखील सारखेंच लागू पडतें. म्हणून चतुर्दश शिवसूत्रांपैकीं कोणतेंहि सूत्र किंवा त्यांतील कोणतेंहि अक्षर न गाळतां, तीं सूत्रें जशीं पठित आहेत तशीं तीं मानणें योग्य आहे व तसें मानल्यानें ज्ञापकें शोधण्याची गरज न पडतां सर्व इष्ट रूपांची सिद्धि करतां येते.)

मनोरमा– "हलन्त्यम्" सूत्रेऽन्त्यमिति । 'हलि अन्त्यम्' इति विग्रहे 'सप्तमी' इति योगविभागात् "सुप्सुपा" इति वा समास इति भावः । यद्वा षष्ठीतत्पुरुषोऽयम् ॥

'हलन्त्यम्' सू. १ या सूत्राचें कौमुदींत 'हलिति सूत्रे अन्त्यमित्स्यात्' असें जें व्याख्यान केलें आहे तें त्या सूत्राचा 'हलि अन्त्यम्' असा विग्रह करून केलें आहे व या स्थलीं ('सप्तमी शौण्डैः' सू. ७१७ या सूत्राचा योगविभाग करून) 'सप्तमी' असें जें योग-विभागानें पृथक् सूत्र होतें त्या सूत्रानें सप्तमीतत्पुरुषसमास झाला आहे असें समजावें. अथवा या स्थलीं 'सुप्सुपा' या सूत्रानें, म्हणजे 'सह सुपा' सू. ६४९ या सूत्राचा योगविभाग करून व 'सुपा' असें पृथक् सूत्र मानून त्या सूत्रांत 'सुबामन्त्रिते' या पूर्व सूत्रांतून 'सुप्' या पदाची अनुवृत्ति केल्यानें 'सुप् सुपा = सुबन्तं सुबन्तेन सह समस्यते' असें जें सूत्र होतें त्या सूत्रानें, सप्तमीतत्पुरुषसमास झाला आहे असें समजावें किंवा 'हलन्त्यम्' या सूत्राचा ('हलः अन्त्यम्' असा) षष्ठीतत्पुरुषसमास मानून विग्रह करावा. (मनोरमेंतील वरील पंक्तींचें व्याख्यान शब्दरत्नांत करण्यांत येईल.)

शब्दरत्न– सप्तमीति अधिकरणकारकस्य कर्त्राद्यन्वयद्वारा क्रियान्वयादस्ति सामर्थ्यमिति भावः । अस्य योगविभागस्य भाष्येऽदर्शना-दाह–सुप्सुपेतीति । अनेनापि साधनस्यागतिकगतिकत्वादाह–यद्वेति । हलः=हलितिसूत्रस्यान्त्यमिति विग्रह इति भावः । "षष्ठीस्थाने" इत्यस्य च "ऊदुपधाया गोहः" इत्यादाविव, 'गुणानाञ्च परार्थत्वात्' इति न्यायेन वाऽप्रवृत्तिरिति बोध्यम् ।

'सप्तमी इति योगविभागात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, अधिकरणकारकाचा कर्ता इत्यादिकांच्या द्वारा क्रियेशीं अन्वय होत असल्यामुळें अधिकरणसप्तमींत समस्यमान होण्याचें सामर्थ्य आहे. (जर अधिकरणसप्तमींत समस्यमान होण्याचें

सामर्थ्य नसतें तर, 'समर्थः पदविधिः' सू. ६४७ असें सूत्र असल्यामुळें, 'सप्तमी' या योगविभागानें पृथक् केलेल्या सूत्रानें प्रकृत स्थलीं सप्तमीतत्पुरुषसमास होऊं शकला नसता. परंतु 'सप्तमी शौण्डैः, या सूत्राचा जसा दीक्षितांनी योगविभाग केला आहे) तसा योगविभाग भाष्यांत केला नसल्यामुळें, 'सुप्सुपा' या सूत्राच्या आधारें सप्तमी-तत्पुरुषसमास करावा असें दीक्षितांनीं पुढें मनोरमेंत म्हटलें आहे. (सारांश 'सप्तमी शौण्डैः' या सूत्राचा 'सप्तमी' असा योगविभाग भाष्यकारांनीं केला नसल्यामुळें तसा योगविभाग आपणास करतां येऊं शकत नाहीं असें कोणी म्हटल्यास, दीक्षित असें सुचवितात कीं, तसा योगविभाग जर अप्रमाण ठरतो तर तो न करितां 'सुप्सुपा' या सामान्य सूत्रानें प्रकृत स्थलीं सप्तमीतत्पुरुषसमास झाला आहे असें मानावें.) पण 'सुप्सुपा हें समासविधायक सामान्य सूत्र जेथें गत्यन्तर नाही तेथेंच प्रवृत्त करतां येऊं शकतें असें कोणी म्हटल्यास, दीक्षित असें म्हणतात कीं, प्रकृतस्थलीं षष्ठीतत्पुरुषसमास मानावा. (सारांश 'सुप्सुपा' हें सामान्य सूत्र जेथें कोणत्याहि पाणिनीय सूत्रानें इष्ट समास करतां येऊं शकत नाहीं तेथेंच अगतिकगतिन्यायानें प्रवृत्त करतां येऊं शकतें. परंतु प्रकृत स्थलीं 'षष्ठी' सू. ७०२ या सूत्रान्वयें षष्ठीतत्पुरुषसमास करतां येऊं शकत असल्यामुळें 'सुप्सुपा' या सूत्रान्वयें येथें सप्तमीतत्पुरुषसमास करणें अयोग्य आहे असें कोणी म्हटल्यास, दीक्षित पुढें असें म्हणतात कीं, 'षष्ठी' या सूत्रानें येथें षष्ठीतत्पुरुषसमास करावा. तसा समास केल्यानें) 'हलः = हलिति सूत्रस्यान्त्यमित्' असा विग्रह केला पाहिजे असा दीक्षितांच्या म्हण-ण्याचा भावार्थ आहे. 'ऊदुपधाया गोहः' सू. २३६४ इयादि सूत्रांचे ठिकाणीं जशी 'षष्ठी स्थानेयोगा' सू. ३८ ही परिभाषा प्रवृत्त होत नाही त्याचप्रमाणें 'हलः अन्त्यम्' या ठिकाणीं देखील ती परिभाषा प्रवृत्त होऊं शकत नाहीं. अथवा 'गुणानांच परार्थत्वात्' असा न्याय असल्यामुळें त्या परिभाषेची प्रकृत स्थलीं—'हलः अन्त्यम्' या स्थलीं—

प्रवृत्ति होऊं शकत नाही हें जाणावें. ('अनिर्धारितसम्बन्धविशेषा षष्ठीस्थानेयोगा बोध्या' असा 'षष्ठीस्थानेयोगा' या परिभाषेचा अर्थ असल्यामुळें, जेथें अवयवावयविभाव, स्वस्वामिभाव, इत्यादि प्रकारचा संबंध संभवत नाहीं तशाच ठिकाणीं ती परिभाषा प्रवृत्त होते. पण 'हलः अन्त्यम्' किंवा 'ऊदुपधाया गोहः' या दोन्ही स्थलीं जरी 'हलः व 'गोहः' या षष्ठी आहेत तरी त्या दोन्ही स्थलीं 'अन्त्यम्' व 'उपधायाः' हीं अवयववाचक पदें असल्यामुळें त्या दोन्ही षष्ठी अवयवावयविभावसबंधबोधक षष्ठी ठरतात आणि अशा रीतीनें त्या दोन्ही षष्ठींचा अवयवावयविभावरूप अर्थ निश्चित होत असल्यामुळें, ज्या ठिकाणीं कोणत्याहि इतर प्रकारचा संबंध संभवत नाहीं अशाच ठिकाणीं प्रवृत्त होणारी 'षष्ठी स्थानेयोगा' ही परिभाषा वरील दोन्ही स्थलीं प्रवृत्त होऊं शकत नाहीं. 'षष्ठी स्थानेयोगा' सू. १–१–४९ या सूत्रावरील भाष्यांत देखील भाष्यकारांनीं 'अवयवषष्ठ्यादीनां चाप्राप्तिर्योगस्यासन्दिग्धत्वात्' हें वार्तिक पठित करून या वार्तिकाचें व्याख्यान करितांना 'अवयवषष्ठ्यादीनांच नियमस्याप्राप्तिः। किं कारणम् ? । योगस्यासन्दिग्धत्वात् । सन्देहे नियमो, न चावयवषष्ठ्यादिषु सन्देहः ।' असें म्हटलें आहे आणि त्या भाष्यांत भाष्यकार पुढें असेंहि म्हणतात कीं, 'अथवा स्थानेऽयोगा स्थानेयोगा । किमिदमयोगेति ? । अव्यक्तयोगाऽयोगा ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, ज्या षष्ठीचें अवयव इत्यादि संबंध आहेत तशा षष्ठीच्या ठिकाणीं 'षष्ठी स्थानेयोगा' ही परिभाषा प्रवृत्त होत नाहीं व त्याचें कारण हें कीं, अशा संबंधाच्या विषयांत संदेह उत्पन्नच होत नाहीं. जेथें संदेह उत्पन्न होतो तशाच ठिकाणीं नियम केला जातो आणि जेथें अवयववाचक शब्द उच्चारला आहे तशा ठिकाणीं अवयवीचा आक्षेप होत असल्यामुळें आणि अशा रीतीनें अवयवावयविसंबंध स्पष्टपणें–निश्चतपणें–ज्ञात होत असल्यामुळें, अशा स्थलीं 'षष्ठी स्थानेयोगा' ही परिभाषा लागूच पडत नाहीं. अथवा त्या सूत्रांतील 'स्थानेयोगा'

या पदाचा 'स्थाने अयोगा' असा पदच्छेद करावा, म्हणजे 'स्थाने-योगा' हें एक पद न मानतां 'स्थाने' व 'अयोगा' हीं दोन भिन्न पदें मानावीं व 'अयोगा' या पदाचा अव्यक्तयोगा, म्हणजे ज्या षष्ठीचा संबंध अमुक प्रकारचा असा स्पष्ट झालेला नसेल तशा षष्ठीचाच स्थानाशीं संबंध जोडावा. या वरील भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'हलः अन्त्यम्' इत्यादि स्थलीं जेथें 'अन्त्यम्' हा अवयव-वाचक शब्द उच्चारला असल्यामुळें 'हलः' ही अवयवषष्ठी आहे हें निश्चतपणें बोधित होतें तशा ठिकाणीं 'षष्ठी स्थानेयोगा' ही परिभाषा मुळींच लागू पडत नाहीं. दुसरें असें कीं, 'गुणानां च परार्थत्वादसम्बन्धः समत्वात्स्यात्' असा न्याय आहे व अशाच तऱ्हेचा न्याय 'न हि भिक्षुको भिक्षुकान्तरं याचितुमर्हति सत्यन्यस्मिन्नभिक्षुके' या भिन्न शब्दांत भाष्यांत पठित आहे. या मीमांसेंतील वरील जैमिनीय न्यायाचा भावार्थ हा आहे कीं, गुण किंवा विशेषणें हीं अप्रधान असल्यामुळें व तीं प्रधान किंवा विशेष्य याचा अर्थ स्पष्ट करून देणारीं असल्यामुळें आणि अशा रीतीनें तीं प्रधानाच्या किंवा विशेष्याच्या उपयोगी पडणारीं असल्यामुळें समान दर्जाचीं ठरणाऱ्या त्या गुणांचा किंवा विशेषणांचा परस्परांशीं अन्वय न होतां, तीं सर्व अप्रधान विशेषणें प्रधानाशीं किंवा विशेष्याशींच अन्वित होतात. शब्दरत्नकारांनीं हा जो न्याय प्रकृत स्थलीं प्रवृत्त केला आहे त्याचें कारण हें कीं, 'हलन्त्यम्' हें इत्संज्ञेचें विधान करणारें संज्ञासूत्र असून 'षष्ठीस्थानेयोगा' ही परिभाषा आहे आणि संज्ञासूत्रें व परिभाषा हीं स्वतःच्या उपयोगाकरितां नसून कार्यविधायक सूत्रांचा अर्थ निश्चित करण्याच्या उपयोगी पडणारीं साधनें असल्यामुळें व अशा रीतीनें कार्यविधायक सूत्रें प्रधान असून परिभाषा व संज्ञासूत्रें हीं दोन्ही अप्रधान–परार्थ–असल्यामुळें, 'हलन्त्यम्' या संज्ञासूत्राचें ठिकाणीं 'षष्ठी स्थानेयोगा' ही परिभाषा उपस्थित होऊं शकत नाहीं व त्यामुळें देखील 'हलः अन्त्यम्' या विग्रहांतील 'हलः' ही 'हलःस्थाने'

या अर्थाचो बोधक स्थानषष्ठी मानतां येऊं शकत नाहीं असा शब्द-रत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. मीमांसेंतील वरील न्यायाचें विवरण करितांना सरलेंत 'अयं च न्यायो लोकसिद्धः । यथा कस्यचिद्राज्ञो द्वौ भृत्यौ नापितो दीपदर्शकश्च राज्ञ एव क्षुरसंस्कारं दीपदर्शनं वा कुरुतः, न तु परस्परस्य तत्तत्कार्यमिति । एवमेव प्रकृतेऽपि विध्यर्थत्वात्संज्ञा-शास्त्रस्य परिभाषाशास्त्रस्य च तयोस्तदुपकारकत्वमेव भवितुमर्हति, न तु संज्ञाशास्त्रस्य परिभाषोपकारकत्वम्, परिभाषाशास्त्रस्य च संज्ञाशास्त्रो-पकारकत्वमिति । असें म्हटलें आहे.)

मनोरमा– स्यादेतत् हलित्येकदेशस्यैव तन्त्रावृत्त्येकशेषान्यतममस्तु। 'हस्य ल्' इति च व्याख्यास्यते । सामीप्यं षष्ठ्यर्थः । यद्वा मास्तु तन्त्रादि । अस्तु समाहारद्वन्द्वो हल्चल् चेति । लकारस्य संयोगान्तलोपः ॥

(दीक्षितांनीं अन्योन्याश्रयरूप दोष टाळण्याकरितां 'हलन्त्यम्' हें सूत्र दोनदां उच्चारून व प्रथम उच्चारलेलें तें सूत्र एक पद मानून आणि त्या पदाचा 'हलि अन्त्यम्' किंवा 'हलः अन्त्यम्' असा विग्रह करून 'हल् इति शिवसूत्रस्थः अन्त्यलकारः इत्' असा त्या प्रथम उच्चारलेल्या सूत्राचा अर्थ केला आहे, आणि अशा रीतीनें अन्त्य लकाराची इत्संज्ञा सिद्ध करून 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्राच्या सहायानें हल् प्रत्याहार साधला आहे व दुसऱ्यानें उच्चारलेलें 'हलन्त्यम्' हें सूत्र द्विपद मानून त्याचा 'उपदेशे अन्त्यं हल् इत्स्यात् = उपदेशविषयीभूतो यः शब्दः तस्य अन्त्यं व्यञ्जनं इत्स्यात्' असा अर्थ केला आहे. पण इतर वैयाकरणांनीं तें सूत्र दोनदां न उच्चारतां एकदांच उच्चारून अन्योन्याश्रयरूप दोषाचें भिन्न रीतीनें निवारण केलें आहे. उदाहरणार्थ प्रक्रियाकौमुदीकारांनीं तें सूत्र एकदांच उच्चारून त्याचा 'उपदेशे अन्त्यं हल् इत्स्यात्' एवढाच अर्थ केला आहे. यावर टीका करितांना प्रसादकार म्हणतात–'ननु लकार-स्येत्संज्ञायां सत्याम् आदिरन्त्येन सहेता इति प्रत्याहारग्रहणं स्यात्

सति च तस्मिन् हलन्त्यमितीत्संज्ञा। तदितरेतराश्रयत्वं स्यात्। इतरेतराश्रयाणिच कार्याणि न प्रकल्पन्त इति चेदुच्यते। हलिति द्वितीयमत्र हल्ग्रहणं तन्त्रेणोपात्तं द्रष्टव्यम् ।...तत्रैकेन हल्ग्रहणेन हस्य समीपे यो ल् तस्येत्संज्ञा पश्चाद् द्वितीयेन प्रत्याहारग्रहणेनेत्संज्ञेति नेतरेतराश्रयदोषः।' सारांश त्यांनीं 'हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' हा शब्द द्व्यर्थी मानून त्याचा 'हस्य समीपवर्ती यो ल्' असा एक अर्थ केला आहे, व अशा रीतीनें शिवसूत्रांतील अन्त्य लकाराची इत्संज्ञा साधून व 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्राच्या सहायानें हल् प्रत्याहार साधून व 'हल्' या पदाचा 'व्यञ्जन' असा दुसरा अर्थ करून 'उपदेशे अन्त्यं हल्-व्यञ्जनम्-इत् स्यात्' असा अखेरीस प्रकृत सूत्राचा अर्थ सिद्ध केला आहे, आणि अशा रीतीनें अन्योन्याश्रयरूप दोष टाळला आहे. माधवानें देखील आपल्या धातुवृत्तींत 'भू सत्तायाम्' या धातूचें विवरण करितांना असेंच म्हटलें आहे व याखेरीज त्यानें असेंहि म्हटलें आहे कीं, 'हल्' या पदाचा 'हल् च ल् च हल्ल्' असा समाहारद्वन्द्व करावा व त्या पदांतील अन्त्य लकाराचा 'संयोगान्तस्य लोपः' सू. ५४ या सूत्राने लोप झाला आहे असें समजावें. 'हलन्त्यम्' १-३-३ या सूत्रावरील भाष्यांत 'सिद्धं तु लकारनिर्देशात्' असें जें वार्तिक पठित केलें आहे त्याचें व्याख्यान करितांना कैयटानें देखील 'पूर्वं लकारस्येत्संज्ञा विधेया, तेन हलिति प्रत्याहार उपपद्यते, तत्र हल् च ल् चेति समाहारद्वन्द्वं कृत्वा संयोगान्तस्य लोप इति लकारो लुप्यते' असें म्हटलें आहे. अन्योन्याश्रयरूप दोषाचा परिहार करण्याकरितां 'हलन्त्यम्' हें सूत्र एकदांच उच्चारून त्यांतील 'हल्' या पदाचा वर सांगितलेल्या तऱ्हेनें अर्थ करणें हें मत दीक्षितांस मान्य नसल्यामुळें, ते प्रथम त्या मताचा उपन्यास करितात.) 'हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' एवढ्याच भागाचे ठिकाणीं तन्त्र किंवा आवृत्ति किंवा एकशेष या तीनपैकीं कोणतें तरी एक मानावें असें म्हणतां येऊं शकतें. (कारण संपूर्ण सूत्राची आवृत्ति करण्यांत गौरव असून, वर

सांगितल्याप्रमाणें त्यांतील 'हल्' या एकदेशाची आवृत्ति करण्यांत लाघव आहे व तसें केल्यानें देखील इष्ट अर्थ सिद्ध होतो व अन्यो-न्याश्रयरूप दोषाचें निवारण होतें.) 'हस्य ल्' अशा रीतीनें व्याख्यान करावें व 'हस्य' या षष्ठीचा 'सामीप्य' असा अर्थ समजावा; (कारण 'षष्ठी स्थानेयोगा' १–१–४९ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'एकशतं षष्ठ्यर्थाः', म्हणजे षष्ठीचे अनेक अर्थ आहेत, असें म्हटलें असल्यामुळें, प्रकृत स्थलीं 'हस्य' या षष्ठीचा सामीप्यरूप अर्थ मानण्यांत कांहीं दोष येत नाहीं.) अथवा (तन्त्रादिकांचा उपयोग न करितां) 'हल् च ल् च' असा समाहारद्वन्द्व करावा व अन्त्य लकाराचा 'संयोगान्तस्य लोपः' सू. ५४ या सूत्रानें लोप झाला आहे असें मानावें. ('एकस्य शब्दस्यानेकार्थपरत्वेतन्त्रव्यवहारः' अशी भैरवीकारांनीं 'तन्त्र' शब्दाची व्याख्या दिली असून, 'अक्षान् पश्य' हें तन्त्राचें उदाहरण दिलें आहे. या उदाहरणांतील 'अक्ष' हा शब्द द्यूत खेळण्याचे फासे, गाडीचें चाक, माळेचे मणी, इन्द्रिय इत्यादि अनेक अर्थांचा वाचक आहे. सारांश जेथें अनेकार्थवाचक शब्दाचा वाक्यांत प्रयोग करून वक्ता त्या वाक्यानें श्रोत्याला अनेक अर्थांचा बोध व्हावा असें इच्छितो तेथें तशा प्रयोगास 'तन्त्र' असें म्हणतात. जेथें दोन समान स्वरूप किंवा भिन्न स्वरूप शब्दांची वृत्ति केली असतां, 'सरूपाणामेकशेषः' सू. १८८ या सूत्रान्वयें किंवा एकशेषप्रकरणांत पठित असलेल्या सूत्रांन्वयें त्यांपैकीं एक शिलक राहतो त्याला 'एकशेष' म्हणतात. उदाहरणार्थ परशुराम व दाशरथिराम या दोन भिन्न अर्थांच्या वाचक पण समानरूप 'राम' या शब्दांची वृत्ति केली असतां, त्या दोन 'राम' शब्दांपैकीं एक 'राम' शब्द शिलक राहून 'रामौ पश्य' असा एकशेषानें प्रयोग केला जातो. तसेंच 'माता च पिता च पितरौ, भ्राता च स्वसा च भ्रातरौ, पुत्रश्च दुहिता च पुत्रौ' इत्यादि भिन्नस्वरूप शब्दांचीं एकशेषाचीं उदाहरणें होत. आपणास प्रकृत स्थलीं जेथें दोन भिन्नार्थक पण समानरूप शब्दांची

वृत्ति केली असतां, त्यांपैकीं एक शिलक राहतो तशा एकशेषाशीं कर्तव्य आहे. एखादा शब्द किंवा शब्दसमुदाय एकवेळ उच्चारून पुन्हा तो दुसऱ्यानें उच्चारणें याला 'आवृत्ति' म्हणतात. 'चार्थे द्वन्द्वः' सू. ९०१ या सूत्रान्वयें होणारा समास द्वन्द्वसमास होय. वर सांगितलेल्या तन्त्र, आवृत्ति, एकशेष व द्वन्द्व या चार साधनांचा 'हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' या एकदेशाचे ठिकाणीं आतां आपण उपयोग करूं.

'हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' या एकदेशाचे ठिकाणीं तन्त्र मानल्यास, म्हणजे 'हल्' हा शब्द दोन अर्थांचा वाचक मानल्यास, त्याचा 'हस्य समीपवर्ती लकारः' असा एक अर्थ व 'व्यञ्जन' असा दुसरा अर्थ होतो. त्या शब्दाचे असे दोन अर्थ मानल्यानें, 'अन्तिम शिवसूत्रे हस्य समीपवर्ती लकारः इत्संज्ञकः स्यात्, उपदेशे अन्त्यं व्यञ्जनं इत्संज्ञकं स्यात्' असा 'हलन्त्यम्' या सूत्राचा दोन प्रकारचा इष्ट अर्थ होऊं शकतो. तसेंच, 'हल्' या पदाचें दोनदां उच्चारण केल्यास व प्रथम उच्चारलेल्या त्या पदाचा वर सांगितलेला प्रथम अर्थ केल्यास व दुसऱ्यानें उच्चारलेल्या त्या पदाचा वर सांगितलेला द्वितीय अर्थ केल्यास, प्रकृतसूत्राचा वर सांगितल्याप्रमाणें दोन प्रकारचा इष्ट अर्थ निष्पन्न होतो. त्याचप्रमाणें, 'हल् च हल् च हल्' असा एकशेष केल्यास, व प्रथम 'हल्' शब्दाचा वर सांगितलेला प्रथम अर्थ व द्वितीय 'हल्' शब्दाचा वर सांगितलेला द्वितीय अर्थ केल्यास, इष्ट सूत्रार्थ निष्पन्न होतो. तसेंच 'हल् च ल् च' असा समाहारद्वन्द्व केल्यास व 'हल्' या पदाचा 'व्यञ्जन' व 'ल्' याचा शिवसूत्रांतील अन्त्य लकार असा अर्थ केल्यास, तोच सूत्रार्थ निष्पन्न होतो. सारांश 'हलन्त्यम्' या संपूर्ण सूत्राची द्विरावृत्ति न करितां, त्या सूत्रांतील 'हल्' या एकदेशाचे ठिकाणीं वर सांगितलेल्या चार साधनांपैकीं कोणतेंहि एक साधन उपयोगांत आणल्यानें इष्ट सूत्रार्थ निष्पन्न होऊं शकतो. म्हणून संपूर्ण सूत्राची द्विरावृत्ति करण्यांत गौरव असून

हल्' या एकदेशाचे ठिकाणीं वरील चार साधनांपैकीं कोणत्याहि एक साधनाचा उपयोग करण्यांत लाघव असल्यामुळें, तसें करणें इष्ट आहे असें माधवादिकांचें म्हणणें आहे. ह्या मताचें खण्डन पुढें दीक्षित करणार आहेत.)

शब्दरत्न– तन्त्रावृत्त्येकशेषान्यतममस्त्विति । यद्यपीदृशे विषये उच्चारयितुस्तन्त्रैकशेषान्यतरेणोच्चारणम् बोद्धुस्त्वावृत्त्या बोध इत्येवानुभवसिद्धम्, तथापि व्यवस्थितैवान्यतमसत्ताऽनेन बोध्यत इति न दोषः । एकशेषश्च प्रत्याख्यातोऽसहविवक्षायामपि शास्त्रमात्रप्रक्रियोपयोगीत्याशयेन पृथगुक्तः । सामीप्यं षष्ठ्यर्थ इति । "षष्ठी स्थाने" इत्यस्य 'गुणानां च परार्थत्वात्' इति न्यायेनाप्रवृत्तिः । न च 'इको गुणवृद्धी" इति सूत्रे तच्छेषशब्देन परिभाषयोरपि गुणगुणिभाव उक्त इति वाच्यम्, 'सार्वधातुकार्धधातुकयोः' 'अलोन्त्यस्य' 'इको गुणवृद्धी' इति सूत्रत्रयस्य लक्ष्यसंस्कारकमहावाक्ये विशेष्यविशेषणभावमादायैव तच्छेषव्यवहारो, न तु गुणगुणिभावेन परस्परापेक्षत्वेन वेति कैयटेन स्पष्टमुक्तेः, एतन्मूलकतयैव तत्पक्षासम्भवस्य तेनोक्तेश्चेति भावः ॥

जरी अशा ठिकाणीं वक्त्यानें तन्त्राचा किंवा एकशेषाचा उपयोग केला असला तरी, श्रोत्याला आवृत्ति करूनच बोध होतो हें अनुभवसिद्ध आहे. म्हणून वक्ता जरी अनेकार्थांचें बोधन करण्याकरितां तन्त्र किंवा एकशेष याचें अवलंबन करतो तरी, श्रोत्याला आवृत्ति केल्याशिवाय बोध होत नसल्यामुळें व अशा रीतीनें तन्त्र व एकशेष या दोन साधनांचा वक्त्यास, व आवृत्ति या तृतीय साधनाचा श्रोत्यास, असा व्यवस्थित उपयोग करावा लागत असल्यामुळें, दीक्षितांनी मनोरमेंत ('अन्यतरदस्तु' म्हणजे 'तन्त्रावृत्ती एकशेषावृत्ती वा स्ताम्' असें न म्हणतां) 'अन्यतममस्तु' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यांत कांहीं दोष येत नाहीं, म्हणजे तें म्हणणें योग्य ठरतें.

(जरी 'सकृदुच्चरितः शब्दः सकृदेवार्थं गमयति,' म्हणजे एकदां उच्चारलेल्या शब्दानें एकच अर्थाचा बोध होऊं शकतो, असा सामान्य न्याय आहे तरी 'गङ्गायां मीनघोषौ स्तः' इत्यादि प्रयोगांवरून हें सिद्ध होतें कीं, तो न्याय सार्वत्रिक नसून भाषेंतील कित्येक प्रयोगांत तो व्यभिचरित झालेला आढळतो, म्हणजे कित्येक प्रयोगांना तो न्याय लागू पडत नाहीं; कारण वर दिलेल्या उदाहरणांत 'गङ्गायाम्' हा शब्द जरी एकदांच उच्चारला आहे तरी त्या शब्दाचे 'गङ्गाप्रवाहे' व 'गङ्गातीरे' असे दोन भिन्न अर्थ होतात, व 'गङ्गाप्रवाहे मीनोऽस्ति' व 'गङ्गातीरे घोषोऽस्ति' असा वाक्यार्थबोध होतो. जेथें तन्त्राचा उपयोग करून वक्ता दोन भिन्न अर्थांचें बोधक वाक्य उच्चारतो तेथें श्रोत्याला कशी आवृत्ति करावी लागते याचें 'सुखिते दुःखिते चेतसि दवदहनदीधितिराशिस्तुहिनदीधितिः' हें एक काव्यप्रकाशांत दिलेलें उदाहरण आहे. हें वाक्य वक्त्यानें उच्चारलें असतां, श्रोत्याला त्या वाक्यांतील दोन भिन्न अर्थांचा बोध होण्याकरितां एकदां जें उद्देश्य मानलें आहे तें पुन्हा विधेय मानून व जें विधेय मानलें आहे तें पुन्हा उद्देश्य मानून दोन भिन्न वाक्यें कल्पावीं लागतात व अशा रीतीनें त्याला 'दवदहनदीधितिराशिः' व 'तुहिनदीधितिः' या दोन शब्दांची आवृत्ति करून 'सुखिते चेतसि दवदहनदीधितिराशिः= वनाग्निसमूहः, तुहिनदीधितिः=चन्द्रः' आणि 'दुःखिते चेतसि तुहिनदीधितिर्दवदहनदीधितिराशिः' अशीं दोन भिन्न वाक्यें कल्पिल्यानें त्या श्रोत्याला वक्त्यानें उच्चारलेल्या वरील वाक्यांतील दोन भिन्न अर्थांचा बोध होऊं शकतो. याचप्रमाणें 'हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' या पदानें 'हस्य समीपवर्ती लकारः,' म्हणजे 'हल्' या शिवसूत्रांतील हकारापुढील लकार, व 'हल्रूपमन्त्यम्', म्हणजे उपदेशांतील अन्त्य व्यञ्जन, अशा दोन भिन्न अर्थांचा बोध होण्याकरितां 'हल्' या पदाची आवृत्ति करून 'हसमीपवर्तिलकारः इत्' व 'हल्रूपमन्त्यं च इत्' अशीं दोन भिन्न वाक्यें कल्पिणें जरूर आहे.

आतां मनोरमेंतील शंकापर ग्रन्थांत 'हलित्येकदेशस्यैव तन्त्रावृत्त्येकशेषान्यतममस्तु' असें जें म्हटलें आहे त्यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, या पंक्तींत एकशेषाचें ग्रहण करावयास नको होतें; कारण 'सरूपाणामेकशेषः' १–२–६४ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'अशिष्य एकशेष एकेनोक्तत्वात्', म्हणजे 'सरूपाणामेकशेषः' हें एकशेषाचें सूत्र असण्याची कांहींच गरज नाहीं, कारण एकाच शब्दानें अनेक अर्थांचा बोध अभिधाशक्तीनें होत असल्यामुळें एकशेष मानण्याची कांहीं आवश्यकता नाहीं, असें वार्तिक पठित करून एकशेषाचें प्रत्याख्यान केलें आहे. शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, अनेकार्थवाचक एखादा शब्द वक्त्यानें तन्त्राचा आश्रय करून वाक्यांत उच्चारला असतां, त्या शब्दाच्या अनेक अर्थांचा श्रोत्याला आवृत्ति केल्यानें बोध होऊं शकत असल्यामुळें आणि याच कारणाकरितां भाष्यकारांनीं एकशेषाचें प्रत्याख्यान केलें असल्यामुळें, दीक्षितांनीं 'तन्त्रावृत्त्येकशेषान्यतममस्तु' असें न म्हणतां, 'तन्त्रावृत्ती स्ताम्' एवढेंच मनोरमेंतील शंकाग्रन्थांत म्हणावयास हवें होतें. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, जरी भाष्यकारांनीं एकशेषाचें प्रत्याख्यान केलें आहे तरी (त्यांनीं स्वतःच 'एकशेषनिर्देशात्' असें वचन पठित करून पाणिनीय सूत्रांच्या अर्थाचें स्पष्टीकरण करण्याकरितां जेथें सहविवक्षा नाहीं, म्हणजे ज्या दोन समानस्वरूप शब्दांचा त्यांनीं एकशेष मानला आहे त्यांचा वाक्यांतील इतर पदाशीं सारख्याच रीतीनें अन्वय होत नाहीं, अशा स्थानीं देखील, एकशेषांचा उपयोग केला असल्यामुळें व अशा रीतीनें तें प्रत्याख्यान असहविवक्षेच्या विषयांत लागू पडणारें नसून लौकिक प्रयोगांत केवळ सहविवक्षेच्या विषयांत लागू पडणारें असल्यामुळें) असहविवक्षेच्या विषयांत केवळ शास्त्रीय प्रयोग साधण्याच्या उपयोगीं पडणाऱ्या एकशेषाचा दीक्षितांनीं मनोरमेच्या वरील पंक्तींत पृथक् निर्देश केला आहे. (उदाहरणार्थ 'सर्वादीनि सर्वनामानि' १–१–२७ या सूत्रावरील

भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'एवं तर्ह्युभयमनेन क्रियते पाठश्चैव विशेष्यते संज्ञा च । कथं पुनरेकेन यत्नेनोभयं लभ्यम् । लभ्यमित्याह । कथम् ? । एकशेषनिर्देशात् । एकशेषनिर्देशोऽयम् । सर्वादीनि च सर्वादीनि च सर्वादीनि । सर्वनामानि च सर्वनामानि च सर्वनामानि । सर्वादीनि सर्वनामसंज्ञानि भवन्ति सर्वेषां यानि च नामानि तानि सर्वादीनि संज्ञोपसर्जने च विशेषेऽवतिष्ठेते ।' या भाष्याचा थोडक्यांत तात्पर्यार्थ हा आहे कीं, 'सर्वादीनि सर्वनामानि' या सूत्राचा एकशेष करून उल्लेख केला आहे, म्हणजे मूळचीं दोन सूत्रें असून एक सूत्र उच्चारलें आहे, असें मानलें म्हणजे, सर्वादिगणांत पठित असलेले शब्द सर्व अर्थाचे दर्शक असतांनाच सर्वनामसंज्ञक होतात व संज्ञावाचक किंवा उपसर्जनीभूत ते शब्द सर्वनामसंज्ञक होत नाहींत असा दोन्ही प्रकारचा अर्थ त्या सूत्रांतूनच निघतो आणि त्यामुळें 'संज्ञोपसर्जनप्रतिषेधः' हें वार्तिक पठित करण्याची कांहीं गरज राहत नाहीं. त्याचप्रमाणें 'द्विर्वचनेऽचि' १–१–५९ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'एवं तर्ह्युभयमनेन क्रियते प्रत्ययश्च विशेष्यते द्विर्वचनं च । कथं पुनरेकेन यत्नेनोभयं लभ्यम् । लभ्यमित्याह । कथम्? । एकशेशनिर्देशात् । एकशेशनिर्देशोऽयम् । द्विर्वचनं च द्विर्वचनं च द्विर्वचनम् । द्विर्वचने च कर्तव्ये द्विर्वचनेऽचि प्रत्यय इति द्विर्वचन-निमित्तेऽचि स्थानिवद्भवति ।' या दोन्ही भाष्यांत भाष्यकारांनीं 'सर्वादीनि, सर्वनामानि, द्विर्वचने' या पदांचा एकशेष मानला आहे, व हीं तीन्ही पदें अशीं आहेत कीं, त्यांचें द्विरुच्चारण केलें असतां, तीं वाक्यांतील एकाच पदाशीं अन्वित न होतां, भिन्न भिन्न पदांशीं अन्वित होतात हें देखील त्या दोन भाष्यांवरूनच स्पष्ट होतें. सारांश जरी भाष्यकारांनीं एकशेषाचें प्रत्याख्यान केलें आहे तरी पाणिनीय सूत्रांचा अर्थ विशद करण्याकरितां त्यानीं कित्येक ठिकाणीं जेथें सहविवक्षा नाहीं अशा स्थलीं एकशेष केला असल्यामुळें हें ध्वनित होतें कीं, 'असहविवक्षायां सौत्रमात्रप्रयोगार्थमेकशेषस्यावश्यकत्वम्'

आणि म्हणून प्रकृत स्थलीं 'हलन्त्यम्' या पाणिनीय सूत्राचा अर्थ विशद करणें असल्यामुळें, दीक्षितांनीं मनोरमेंतील शंकाग्रन्थांत एकशेषाचा पृथक् निर्देश केला आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. त्या सूत्रांतील 'हल्' या पदाचा 'हल् च हल् च' असा एकशेष केल्यानें 'हल्' हें एक पद 'हस्य समीपवर्ती लकारः' या अर्थाचा बोध करून देतें व दुसरें तें पद 'व्यञ्जन' या अर्थाचा बोध करून देतें आणि अशा रीतीनें एकाच सूत्रानें त्या दोहोंचीहि इत्संज्ञा सिद्ध करतां येते.) 'सामीप्यं षष्ठ्यर्थः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे (व 'हस्य ल्' या स्थलीं दीक्षितांनीं 'षष्ठी स्थानेयोगा' ही परिभाषा प्रवृत्त केली नाहीं) याचें कारण हें कीं, 'गुणानां च परार्थत्वात्' असा न्याय असल्यामुळें, 'हलन्त्यम्' या संज्ञासूत्राचा अर्थ करतेवेळीं 'षष्ठी स्थानेयोगा' ही परिभाषा उपस्थित होऊं शकत नाहीं; (कारण संज्ञासूत्रें व परिभाषा हीं विधायक सूत्रांचा अर्थ लावण्याकरितांच पठित केलीं असल्यामुळें व अशा रीतीनें तीं परार्थ असल्यामुळें, त्यांच्यांत अङ्गाङ्गिभाव किंवा परस्परोपकारित्व राहूं शकत नाहीं. वरील न्यायाचें विस्तृत विवरण मागील शब्दरत्नांत केलेंच आहे.) यावर कोणी असें म्हणेल कीं, 'इको गुणवृद्धी' १-१-३ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'तच्छेष' या शब्दानें दोन परिभाषामध्यें देखील परस्परांत अङ्गाङ्गिभाव असतो असें सांगितलें आहे; पण हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण इष्ट रूपांची सिद्धि करण्याकरितां 'सार्वधातुकार्धधातुकयोः', 'अलोऽन्त्यस्य', व 'इको गुणवृद्धी' या तीन सूत्रांचे मिळून जें एक महावाक्य तयार केलें जातें त्यांत 'अलोऽन्त्यस्य' व 'इको गुणवृद्धी' या दोन परिभाषांपैकीं कोणती परिभाषा विशेष्य व कोणती विशेषण आहे अशा प्रकारच्या विशेषणविशेष्यभावाला धरूनच भाष्यकारांनीं 'तच्छेष' शब्दाचा उपयोग केला आहे; व दोन परिभाषांमध्यें परस्परांत अङ्गाङ्गिभाव अथवा निमित्तनिमित्तिभाव असतो किंवा त्यांना परस्परांची आकांक्षा

असते असें भाष्यकारांनीं मानलें नाहीं व तसें मानून 'तच्छेष' शब्दाचा उपयोग केला नाहीं असें त्या सूत्रावरील भाष्याच्या टीकेंत कैयटानें स्पष्ट म्हटलें आहे आणि 'गुणानां च परार्थत्वादसम्बन्धः समत्वात्स्यात्' असा न्याय असल्यामुळें तच्छेषपक्ष, म्हणजे परिभाषांमध्यें परस्परांत अङ्गाङ्गिभाव, संभवत नाहीं असें देखील कैयटानें तेथें म्हटलें आहे. ('इको गुणवृद्धी' १–१–३ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'किं पुनरयमलोन्त्यशेषः, आहोस्विदलोन्त्यापवादः?। कथं चायं तच्छेषः स्यात्, कथं वा तदपवादः?। यद्येकं वाक्यम्, तच्चेदं च, अलोऽन्त्यस्य विधयो भवन्ति, इको गुणवृद्धी अलोऽन्त्यस्येति ततोऽयं तच्छेषः । अथ नाना वाक्यम्, तच्चेदं च, अलोऽन्त्यस्य विधयो भवन्ति, इको गुणवृद्धी अन्त्यस्य चानन्त्यस्य च इति । ततोऽयं तदपवादः।' या भाष्यांतील 'तच्छेष' या पदाचा कैयटानें दोन तऱ्हेनें, म्हणजे 'सः अलोऽन्त्यस्य इति सूत्रं शेषः यस्य इको गुणवृद्धी इति सूत्रस्य' असा बहुव्रीहि मानून व 'तस्य अलोऽन्त्यस्य इति सूत्रस्य शेषः' असा षष्ठीतत्पुरुष मानून, विग्रह केला आहे. त्यामुळें भाष्यकारांच्या म्हणण्याचा असा अर्थ होतो कीं, 'अलोऽन्त्यस्य' हें सूत्र 'इको गुणवृद्धी' या सूत्राचें विशेषण मानल्यास किंवा 'इको गुणवृद्धी' हें सूत्र 'अलोऽन्त्यस्य' या सूत्राचें विशेषण मानल्यास, तच्छेषपक्ष निष्पन्न होतो; पण 'इको गुणवृद्धी' हें सूत्र 'अलोऽन्त्यस्य' या सूत्राचें बाधक सूत्र मानल्यास, तदपवादपक्ष निष्पन्न होतो. 'विशेषणविशेष्यभावे कामचारः' असा न्याय असल्यामुळें, तच्छेषपक्षांत वरील दोन परिभाषासूत्रांपैकीं कोणतेंहि एक सूत्र दुसऱ्याचें विशेषण, म्हणजे अर्थाचा संकोच करणारें परिच्छेदक, मानतां येतें आणि यामुळेंच कैयटानें वर सांगितल्याप्रमाणें 'तच्छेष' शब्दाचा दोन तऱ्हेनें विग्रह केला आहे. वरील दोन्ही सूत्रें परिभाषा असून, त्या दोन परिभाषांमध्यें भाष्यकारांनीं विशेषणविशेष्यभाव करतां येतो असें म्हटलें असल्यामुळें, शंकाकार असें म्हणतो कीं, जरी

संज्ञासूत्रें व परिभाषा स्वतःकरितां नसून परार्थ आहेत तरी त्यांच्यांत गुणगुणिभाव होऊं शकतो आणि त्यामुळें 'हलन्त्यम्' या संज्ञासूत्रांतील 'हल्' या एकदेशाचा 'हस्य ल्' असा षष्ठीतत्पुरुषसमास केला असतां, 'षष्ठी स्थानेयोगा' ही परिभाषा उपस्थित होऊन 'हस्य स्थाने ल्' असाच अर्थ होऊं शकतो व 'सामीप्यं षष्ठ्यर्थः' असें जें मनोरमेंतील शंकाग्रन्थांत म्हटलें आहे तें बरोबर मानतां येत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, दोन परिभाषांमध्यें अङ्गाङ्गिभाव होऊं शकतो असा भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय नसून, त्यांच्या म्हणण्याचा वास्तविक आशय हा आहे कीं, जेव्हां एखाद्या कार्यविधायक सूत्रांत दोन भिन्न परिभाषांचें निमित्त विद्यमान असल्यामुळें त्या दोन्ही परिभाषा त्या सूत्राचे ठिकाणीं उपस्थित होतात तेव्हां, इष्ट प्रयोगाची सिद्धी करण्याकरितां त्या कार्यविधायक सूत्राचें त्या दोन परिभाषांसह जें एक महावाक्य तयार केलें जातें त्यांत एक परिभाषा दुसऱ्या परिभाषेचें विशेषण मानतां येते व असा विशेषणविशेष्यभाव तशा महावाक्यांतच होऊं शकतो व इतर स्थलीं होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ 'सार्वधातुकार्धधातुकयोः' सू. २१६८ हें सूत्र अङ्गाधिकारांत पठित असल्यामुळें त्या सूत्रांत 'अङ्गस्य' हें पद अनुवृत्त होतें आणि 'अङ्गस्य' ही स्थानषष्ठी असल्यामुळें व ती 'अलोऽन्त्यस्य' ही परिभाषा उपस्थित होण्याचें निमित्त असल्यामुळें, त्या सूत्रांत ती परिभाषा उपस्थित होते. त्याचप्रमाणें त्या विधायक सूत्रांत 'मिदेर्गुणः' या पूर्वसूत्रांतून 'गुणः' हें पद अनुवृत्त होत असल्यामुळें व तें पद 'को गुणवृद्धी' ही परिभाषा उपस्थित होण्याचें निमित्त असल्यामुळें, ती परिभाषा देखील त्या सूत्राचे ठिकाणीं उपस्थित होते. तें विधायक सूत्र व या दोन परिभाषा या तिहींचें मिळून एक महावाक्य तयार केल्याशिवाय इष्ट रूपांची सिद्धि करण्याकरितां उपयोगी पडणारा असा त्या विधायक सूत्राचा अर्थ निष्पन्न होऊं शकत नाहीं. म्हणून या तिहींचें 'सार्वधातुकार्ध-

धातुकयोः प्रत्यययोः परयोः सतोः, अङ्गस्य अन्त्यस्य इग्रूपस्य अलः गुणोभवति,' अथवा 'अन्त्याल्रूपस्य इकः गुणोभवति ' असें दोन प्रकारचें महावाक्य, त्या दोन परिभाषांमध्यें विशेषणविशेष्यभावाचा व्यत्यास केल्यानें, म्हणजे एकदां 'अलोऽन्त्यस्य' ही परिभाषा 'इको गुणवृद्धी' या परिभाषेचें विशेष्य व दुसऱ्यानें ती 'इको गुणवृद्धी' या परिभाषेचें विशेषण मानल्यानें, तयार होते, व तसा सूत्रार्थ सिद्ध झाल्यावरच इष्ट रूपांची सिद्धि करतां येते. सारांश वरील भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, दोन परिभाषांमध्यें परस्परांत अङ्गाङ्गिभाव किंवा परस्पराकांक्षा नसते, पण जेव्हां त्या दोन्ही परिभाषा एखाद्या विधायक सूत्रांत त्यांचें निमित्त विद्यमान असल्यामुळें एकत्र उपस्थित होतात तेव्हांच त्यांच्यामध्यें विशेषणविशेष्यभाव होऊं शकतो, व त्या सूत्रावरील भाष्याच्या टीकेंत कैयटानें भाष्यकाराचा हाच आशय आहे असें म्हटलें आहे. त्या टीकेंत कैयटानें 'परस्परानपेक्षयोः स्वस्वनिमित्तप्रयुक्तसन्निधानयोर्द्वयोः परिभाषयोः प्रदेशेषुस्वस्वकार्यप्रतिपादनम् । तत्र यदि कथंचिदेकविषये सन्निपातो भवति, नैतावता परस्परापेक्षा भवतीत्यर्थः ।' असें म्हटलें असून, त्यावर उद्योतकारानीं 'विशेषणविशेष्यभावमात्रेण शेषशेषिव्यवहारो न क्वापि दृष्टचरः' असें म्हटलें आहे. म्हणून 'हलन्त्यम्' या संज्ञासूत्राचा अर्थ करतेवेळीं जेव्हां त्या सूत्रांतील 'हल्' या एकदेशाचें 'हस्य ल्' अशा रीतीनें व्याख्यान केलें जातें तेव्हां 'हस्य' ही षष्ठी असून देखील तेथें 'षष्ठी स्थानेयोगा' ही परिभाषा उपस्थित होऊं शकत नाहीं, आणि त्यामुळें 'सामीप्यं षष्ठ्यर्थः' असें जें मनोरमेंतील शंकाग्रन्थांत म्हटलें आहे तें अयोग्य ठरत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. मनोरमेंतील ज्या ग्रन्थाचें आतांपर्यंत शब्दरत्नांत विवरण केलें आहे तो शंकाग्रन्थ आहे हें लक्षांत ठेवावें. या ग्रन्थांत केलेल्या शंकेचें निरसन करण्याकरितां दीक्षित मनोरमेंत पुढील पंक्ति लिहितात.

मनोरमा– इति चेन्मैवम् आद्ये समासस्य क्लिष्टत्वात् । न हि 'ब्राह्मणकम्बलः' इत्यादौ ब्राह्मणसमीपवर्त्यन्यदीयः कम्बलः प्रतीयते ।

न वा चित्रगुशब्दाच्चित्रगवीणां समीपवर्ती वृक्षादिः प्रतीयते । अत एवानन्तरादिषु न समासः, अनभिधानादिति स्पष्टमाकरे । किं बहुना 'ब्राह्मणस्य कम्बलः' 'चित्रा गावोऽस्य' इति व्यस्तप्रयोगोऽपि तत्रानिष्टः ।

वरील म्हणणें बरोबर नाहीं. याचें कारण हें कीं, प्रथम पक्ष स्वीकारल्यास, म्हणजे 'हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' या पदाचा 'हस्य ल्' असा विग्रह करून 'हस्य' या षष्ठीचा सामीप्य असा अर्थ मानल्यास, समास क्लिष्ट होतो, म्हणजे त्या समासानें सामीप्यरूप अर्थाचा बोध होऊं शकत नाहीं व 'हकारस्य समीपवर्ती लकारः' असें ज्ञान होऊं शकत नाहीं. 'ब्राह्मणस्य कम्बलः' इत्यादि स्थलीं ब्राम्हणाच्या समीप असलेलें घोंगडे असा अर्थ मुळींच ज्ञात होत नाहीं. (उलट त्या वाक्यावरून ब्राह्मणाचें घोंगडें असाच अर्थ ज्ञात होतो, म्हणजे 'ब्राह्मणस्य कम्बलः' या वाक्यानें सामीप्यरूप संबंध बोधित होत नसून स्वस्वामिभावसंबंधच प्रतीत होतो.) त्याचप्रमाणें 'चित्रगुः' या शब्दानें ज्या वृक्षादिकांजवळ रंगी बेरंगी गायी उभ्या आहेत अशा वृक्षादिकांचा बोध होत नाहीं. ('चित्रा गावो यस्य सः चित्रगुः' या अन्यपदार्थप्रधान बहुव्रीहिसमासांतील लौकिक विग्रहवाक्यांत असणाऱ्या 'यस्य' या षष्ठ्यन्त पदानें 'यस्य वृक्षादेः समीपवर्तिन्यः चित्रा गावः' असा मुळींच बोध होत नसून, 'यस्य पुरुषस्य चित्रा गावः' असाच बोध होतो. सारांश वरील दोन्ही उदाहरणांत सामीप्यरूप संबंधाची प्रतीति न होतां स्वस्वामिभावसंबंधाचीच प्रतीति होते.) षष्ठीचा अर्थ आनन्तर्य, सामीप्य इत्यादि नसल्यामुळेंच, 'अनन्तरः' इत्यादि अर्थांमध्यें षष्ठीतत्पुरुष होत नाहीं, कारण तशा अर्थांमध्यें केलेला षष्ठीतत्पुरुषसमासाचा प्रयोग भाषेंत कोठेंहि आढळत नाहीं असें भाष्यांत स्पष्टपणें सांगितलें आहे. ('षष्ठी स्थानेयोगा' १-१-४९ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात-'शब्दस्यापि शब्देनानन्तरादयोऽभिसम्बन्धाः । अस्तेर्भूर्भवतीति सन्देहः स्थानेऽनन्तरे समीप इति । सन्देहमात्रमेतद्भवति, सर्वसन्देहेषु चेदमुपतिष्ठते व्याख्यानतो

विशेषप्रतिपत्तिर्न हि सन्देहादलक्षणमिति। स्थान इति व्याख्यास्यामः'। या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, एका शद्वाचा दुसऱ्या शद्वाशीं स्थान्यादेशसंबंध होणेंच संभवतें असें नसून, आनन्तर्य इत्यादि प्रकारचे संबंध संभवतात. उदाहरणार्थ 'अस्तेर्भूः' या स्थलीं 'अस्' धातूचे ठिकाणीं 'भू' हा आदेश होतो किंवा तो 'अस्' धातूशीं अनन्तर–संयुक्त–होतो किंवा 'अस्' धातूच्या जवळ तो होतो असा संदेह उत्पन्न होतोच. पण अशा प्रकारचा संशय केवळ नाममात्र–निरर्थक–आहे. सर्व ठिकाणीं संदेह उत्पन्न झाल्यास, 'व्याख्यानतो विशेष प्रतिपत्तिः' प. १ ही परिभाषा लगेंच मनांत येते आणि त्या संदेहाचें निराकरण करण्याकरितां आम्ही 'अस्' धातूचे जागीं 'भू' हा आदेश होतो असें व्याख्यान करूं. सारांश या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, आनन्तर्य, सामीप्य इत्यादि षष्ठीचे अर्थ नव्हत व त्यामुळें तशा अर्थांमध्यें षष्ठीतत्पुरुषसमास होऊं शकत नाही.) एवढेंच नव्हें तर, 'ब्राह्मणस्य कम्बलः' किंवा 'चित्रा गावोऽस्य' अशा असमस्त वाक्यांचा देखील आनन्तर्य इत्यादि संबंध द्योतित करण्याकरितां प्रयोग करणें अयोग्य आहे. (कारण आनन्तर्य, सामीप्य इत्यादि षष्ठीचे अर्थ नसल्यामुळें, तशा वाक्यांचा प्रयोग केला असतां, आनन्तर्य सामीप्य इत्यादि संबंधांची प्रतीति होऊं शकत नाहीं.)

शद्वरत्न– क्लिष्टत्वादिति । 'ब्राह्मणस्य कम्बलः' इत्यादावसत्यपि प्रकरणादौ स्वस्वामिभावादिप्रतीतिवदनन्तरसमीपादिशब्दप्रयोगमन्तरेण सामीप्याद्यप्रतीतेः तस्य षष्ठ्यर्थत्वाभावात्, तत्प्रयोगे स्वसामर्थ्यात् षष्ठीसमासाप्राप्तिरिति मध्यमपदलोपिसमासे, सौत्रे वा तत्र समासस्य क्लिष्टत्वमिति भावः । तदेतदाह— नहीत्यादिना तत्रानिष्ट इत्यन्तेन। चित्र गवीणमिति। "कुमति च" इति णत्वम् । दन्त्यपाठस्तु लेखकप्रमादात् । एवं स्त्रीगवीणामित्येकशेषप्रकरणान्तस्थ कैयटप्रयोगेऽपि बोध्यम् । 'अस्तेरनन्तरे समीपे वा'

इत्यादिभाष्यं त्वनन्तरादिपदाध्याहारेण तन्निरूपितसंबन्धार्थिका, स्थानपदाध्याहारेण तन्निरूपितसंबन्धार्थिका वा षष्ठीत्यभिप्रायकम् । अत एव मतुप्सूत्रे कैयटेन ‘ गावोऽस्य सन्त्यनन्तराः ’ इत्यर्थे मतुप्शङ्कापरभाष्यव्याख्यावसरे आनन्तर्यमस्त्यर्थवत्प्रकृत्यर्थोपाधिरित्युक्तम्, नतु तस्य षष्ठ्यर्थत्वेन प्रत्ययार्थत्वमुक्तम् । भाष्यकृता चासामर्थ्यात्तत्र वृत्त्यभाव उक्तः । षष्ठ्यर्थत्वे तु प्रत्ययार्थत्वात्क्वाऽसामर्थ्यम् ।

‘ समासस्य क्लिष्टत्वात्’ असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, ‘ ब्राह्मणस्य कम्बलः ’ इत्यादि स्थलीं प्रकरणादिक कांहीं नसून देखील तसें वाक्य उच्चारतांक्षणींच जसा स्वस्वामिभावसंबंधाचा बोध होतो तसा ‘ अनन्तर, समीप ’ इत्यादि शब्दांचा प्रयोग केल्याशिवाय आनन्तर्य, सामीप्य इत्यादि अर्थांचा बोध होत नाहीं; कारण आनन्तर्य, सामीप्य इत्यादि षष्ठीचे अर्थ नव्हत, व ‘ ब्राह्मणस्य अनन्तरः कम्बलः ’ अशा प्रकारें विग्रहवाक्यांत ‘ अनन्तरः ’ इत्यादि शब्दांचा उपयोग करून ‘ ब्राह्मणकम्बलः ’ असा षष्ठीतत्पुरुषसमास तशा अर्थामध्यें, सामर्थ्याच्या अभावामुळें, म्हणजे तसा अर्थ द्योतित करण्याचें षष्ठींत सामर्थ्य नसल्यामुळें, होऊं शकत नाहीं. म्हणून अशा ठिकाणीं मध्यमपदलोपीसमास करणें किंवा ‘ हलन्त्यम् ’ या सूत्रांत ‘ हस्य समीपवर्ति ल् ’ असा मध्यमपदलोपीसमास करणें देखील षष्ठीसमासासारखेंच क्लिष्ट आहे. आणि हें स्पष्ट करण्याकरितांच दीक्षितांनीं मनोरमेंत ‘ न हि ब्राह्मणस्य कम्बल इत्यादौ...व्यस्तप्रयोगोऽपि तत्रानिष्टः ’ असें म्हटलें आहे. (कारण तसा मध्यमपदलोपीसमास करून देखील आनन्तर्य, सामीप्य इत्यादि संबंधांचा सामासिक शब्दांतून बोध होणें अशक्यप्राय आहे.) मनोरमेंत ‘ चित्रगवीणाम् ’ असा जो प्रयोग केला आहे त्यांत ‘ कुमति च ’ सू. १०५६ या सूत्रानें णत्व झालें आहे. मनोरमेच्या कांहीं प्रतींत

' चित्रगवीनाम् ' असा जो दन्त्यनकारयुक्त पाठ आढळतो तो लेखकाच्या प्रमादामुळें झाला असून अशुद्ध आहे असें समजावें. त्याचप्रमाणें एकशेष प्रकरणांतील (' त्यदादीनि सर्वैर्नित्यम् ' १–२–७२ या सूत्रावरील भाष्याच्या) कैयटवृत्तींत ' ततश्चात्र गोशब्दः स्त्रीगवीणां वाचकः ' असा जो पाठ आढळतो त्या पाठांतील ' स्त्रीगवीणाम् ' या स्थलीं देखील ' कुमति च ' या सूत्रानें णत्व झालें आहे असें समजावें. (आतां शंकाकार अशी शंका करितो कीं, षष्ठीचा अर्थ सामीप्य आहे हें मानण्यास ' षष्ठी स्थानेयोगा ' १–१–४९ या सूत्रावरील भाष्य प्रमाण आहे आणि म्हणून ' हस्य समीपवर्ति ल् ' असा ' हल् ' या पदाचा षष्ठीतत्पुरुषसमास चूक ठरत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं,) त्या भाष्यांत ' अस्तेरनन्तरे समीपे वा ' इत्यादि जें भाष्यकारांनीं म्हटलें आहे तें, ' अस्तेर्भूः ' या सूत्रांतील ' अस्तेः ' या षष्ठीपुढें ' समीपे, अनन्तरे ' या पदांचा अध्याहार करून त्या पदांनीं बोधित होणाऱ्या संबंधाची वाचक ' अस्तेः ' ही षष्ठी आहे काय किंवा ' अस्तेः ' या षष्ठीपुढें ' स्थाने ' या पदाचा अध्याहारकरून त्या पदानें बोधित होणाऱ्या स्थान्यादेशसंबंधाचीं वाचक ' अस्तेः ' ही षष्ठी आहे काय, या आशयानें म्हटलें आहे. (तें भाष्य मनोरमेंत दिलेंच आहे. त्या भाष्यांत भाष्यकारांनीं जो संशय उपस्थित केला आहे तो ' अनन्तरे, समीपे, स्थाने ' या पदांचा अध्याहार करूनच उपस्थित केला आहे. त्या भाष्यांत त्यांनीं असें मुळींच म्हटलें नाहीं कीं, षष्ठीचा अर्थ आनन्तर्य, सामीप्य किंवा स्थान आहे. तसा षष्ठीचा अर्थ असता तर त्या शब्दांचा अध्याहार करण्याची कांहींच गरज नव्हती. म्हणून षष्ठीचा अर्थ सामीप्य आहे हें मानण्यास वरील भाष्य प्रमाण ठरत नाहीं व त्यामुळें ' हस्य ल् ' याचा ' हसमीपवर्ती लकारः ' असा अर्थ मुळींच करतां येत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) आनन्तर्य, सामीप्य

इत्यादि षष्ठीचा अर्थ नसल्यामुळेंच, 'गावोऽस्य सन्ति अनन्तराः' या अर्थामध्यें 'गो' शद्बाहून मतुप् प्रत्यय कां होऊं नये अशी 'तदस्यास्त्यस्मिन्निति मतुप्' ५-२-९४ या मतुप्विधायक सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं जी शंका उपस्थित केली आहे त्या शंकापर भाष्याचें विवरण करितांना कैयटानें असें म्हटलें आहे कीं, ज्याप्रमाणें 'गावः अस्य सन्ति' या स्थलीं 'अस्ति' या पदाचा विद्यमानतारूप अर्थ प्रकृतीचे, म्हणजे ज्या 'गो' शद्बाहून मतुप् प्रत्यय करणें आहे त्या 'गो' प्रकृतीचे, विशेषण होतो त्याचप्रमाणें 'गावः अस्य सन्ति अनन्तराः' या स्थलीं देखील आनन्तर्यरूप अर्थ 'गो' या प्रकृतीचें विशेषण मानतां येतो. पण आनन्तर्य हा षष्ठीच्या प्रत्ययाचा अर्थ आहे व त्यामुळें आनन्तर्य या अर्थामध्यें मतुप्प्रत्यय होतो असें कैयटानें मुळींच म्हटलें नाहीं. आणि भाष्यकारांनीं असें म्हटलें आहे कीं, 'गावो अस्य सन्ति अनन्तराः' या अर्थामध्यें 'गो' शद्बाहून, असामर्थ्यामुळें, तद्धित मतुप्प्रत्यय होऊं शकत नाहीं. जर षष्ठीचा अर्थ अनन्तर, समीप इत्यादि असता तर, मतुप् प्रत्ययानें तो अर्थ बोधित होऊं शकलाच असता, व षष्ठीचे ठिकाणीं तसा अर्थ बोधित करण्याचें सामर्थ्य नाहीं (व त्यामुळें त्या अर्थामध्यें मतुप् प्रत्यय होऊं शकत नाहीं) असें कसें म्हणतां आलें असतें? मतुब्विधायक सूत्रावरील भाष्यांत ५-२-९४ भाष्यकार म्हणतात— 'अथ क्रियमाणेऽप्यस्तिग्रहणे इह कस्मान्न भवति गावोऽस्य सन्त्यनन्तराः, गावोऽस्य सन्ति समीप इति ?॥ असामर्थ्यात् । कथमसामर्थ्यम् ? । सापेक्षमसमर्थवद्भवतीति ।' या भाष्यावरील टीकेंत कैयटानें 'असामर्थ्यादिति' हें प्रतीक घेऊन असें म्हटलें आहे कीं, 'इह तु यः प्रकृत्यर्थोपाधिः प्रत्ययान्तेनाऽन्तर्भावयितुं शक्यस्तदुपाधेरेव प्रत्ययेन भाव्यम् । न च गोमानित्येतत् प्रकृत्यर्थस्यानन्तर्यं गमयितुं शन्कोतीति तदभिधानाय वाक्यमेव प्रयुज्यते। स्वस्वामिभावस्तु स्वत्तयैवान्तर्भावित इति तत्प्रतीतिर्भवत्येव।'

'तदस्यास्त्यस्मिन्निति मतुप' सू. १८९४ या सूत्रानें अस्तिसमानाधिकरणप्रथमान्ताहून 'अस्य' किंवा 'अस्मिन्' या अर्थामध्यें मतुप्प्रत्यय होणें सांगितलें आहे. येथें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, 'अस्य' ही स्वस्वामिभावसंबंधबोधिकाच षष्ठी मानावी किंवा अनन्तरादिसंबंधबोधिका देखील षष्ठी मानावी? कैयटाचें असें म्हणणें आहे कीं, 'अस्य' या षष्ठीनें जसा स्वस्वामिभावसंबंध ज्ञात होतो तसा, अनन्तर, समीप इत्यादि शद्बांचा उपयोग केल्याशिवाय, त्या षष्ठीनें सामीप्यादिसंबंधाचा बोध होऊं शकत नाहीं; कारण आनन्तर्य किंवा सामीप्य हा षष्ठीचा अर्थ नव्हे. म्हणून तशा अर्थामध्यें मतुपप्रत्यय होऊं शकत नाहीं. आणि म्हणूनच त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं असें म्हटलें आहे कीं, 'अथाऽस्तिग्रहणं किमर्थम्?। सत्तायामर्थे प्रत्ययो यथा स्यात् । नैतदस्ति प्रयोजनं, न सत्तां पदार्थो व्यभिचरति।......इदं तर्हि प्रयोजनमस्तियुक्ताद्यथा स्यादनन्तरादियुक्तान्मा भूदिति, गावोऽस्यानन्तराः, गावोऽस्य समीप इति'।

शद्बरत्न– तस्माद्यत्र षष्ठ्यन्तमात्रप्रयोगे आनन्तर्यादिप्रतीतिस्तत्रानन्तरादिपदाध्याहार एव बोध्यः । तत्रास्तिग्रहणाभावे तस्यान्यफलकत्वे वा सूत्रानुपात्तास्त्यर्थान्तर्भावेण मत्वर्थीयवद्बहुव्रीहिवच्च तथाभूतानन्तर्याद्यर्थान्तर्भावेण 'चित्रा गावोऽस्य सन्त्यनन्तराः' इत्याद्यर्थे बहुव्रीहिमत्वर्थीयौ न भवतोऽनभिधानादिति मतुप्सूत्रे भाष्ये स्पष्टम् । अनन्तरादेरिदमर्थत्वे "तस्येदम्" इति शैषिकोऽप्यनभिधानान्नेति "तस्येदम्" इत्यत्र भाष्ये । तदुक्तम्––अनन्तरादिषु न समासोऽनभिधानादिति स्पष्टमाकर इति । तत्र समासग्रहणं तद्धितवृत्तेरप्युपलक्षणम् ।

म्हणून जेथें केवळ षठ्यन्तपदाचा प्रयोग केल्यानें आनन्तर्य इत्यादि अर्थांची प्रतीति होते तशा ठिकाणीं देखील, अनन्तर इत्यादि पदांचा अध्याहार मानणेंच योग्य आहे असें समजावें. (जसें 'गुरुपुत्रो देवदत्तस्य किञ्चित्' या स्थलीं 'अनन्तर' हें पद वाक्यांत

घातलें नसून देखील जो आनन्तर्यनिरुपितसंबंधाचा, म्हणजे 'गुरुपुत्रः देवदत्तस्य किञ्चिदनन्तरः' असा, बोध होतो तो 'अनन्तरः' या पदाचा अध्याहार केल्यानेंच होतो.) 'तदस्यास्ति' सू. ५–२–९४ या मतुप्सूत्रावरील भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, जरी त्या सूत्रांत 'अस्ति' या पदाचें ग्रहण नसलें किंवा तें पद इतर प्रयोजनांकरितां, म्हणजे 'अस्ति' या धनवाचकतिङन्तप्रतिरूपक अव्ययाहून मतुप् प्रत्यय पावला नसल्यामुळें त्याहून देखील मतुप् प्रत्यय व्हावा व 'अस्तिमान्' असें मतुप्प्रत्ययान्त रूप व्हावें या प्रयोजनाकरितां, घातलें असलें तरी देखील, त्या 'अस्ति' शद्बाच्या अर्थाचा ('न सत्तां पदार्थो व्यभिचरति' या न्यायान्वयें) प्रकृतीच्या अर्थामध्यें अन्तर्भाव होत असल्यामुळें, त्या अर्थाला धरून जसा बहुव्रीहिसमास, म्हणजे 'चित्रा गावो यस्य सः चित्रगुः' असा बहुव्रीहिसमास, किंवा 'गावः सन्ति अस्य सः गोमान्' असा 'गो' शद्बाहून मतुप् प्रत्यय होतो तसा त्या सूत्रांत न घातलेल्या 'अनन्तर' इत्यादि शद्बांच्या अर्थाचा अन्तर्भाव करून 'चित्रा गावोऽस्य सन्त्यनन्तराः' असा आनन्तर्य इत्यादि अर्थांमध्यें बहुव्रीहिसमास किंवा मतुप् प्रत्यय होऊं शकत नाहीं; कारण (तशा अर्थाचा बोध करण्याचें सामर्थ्य बहुव्रीहींत किंवा मतुप् प्रत्ययांत नाहीं व) तशा अर्थामध्यें केलेल्या बहुव्रीहीचा किंवा मतुप् प्रत्ययान्ताचा प्रयोग भाषेंत कोठेंहि आढळत नाहीं. (या विषयासंबंधाचें मतुप्विधायक सूत्रावरील भाष्य पूर्वीं दिलेंच आहे. 'अनन्तर' इत्यादि अर्थांमध्यें बहुव्रीहिसमास किंवा मतुप् प्रत्यय कां होऊं शकत नाहीं याचीं दोन कारणें त्या भाष्यांत भाष्यकारांनीं दिलीं आहेत. प्रथम कारण 'असामर्थ्यात्' हें असून, द्वितीय कारण 'अनभिधानात्' हें आहे व भाष्यकारांनीं प्रथम कारणाचें व्याख्यान करितांना 'सापेक्षमसमर्थवद्भवति' असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ हा आहे कीं, बहुव्रीहिसमासांत किंवा मतुप् प्रत्यय करते वेळीं 'अनन्तर, समीप' इत्यादि शद्बांचा उपयोग केल्याशिवाय तशा बहुव्रीहिसमासांत

किंवा मतुप्प्रत्ययान्तांत सामीप्य इत्यादि अर्थाचा बोध करून देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें, म्हणजे तशा अर्थाचा बोध करून देण्याकरितां त्यांना 'अनन्तर, समीप' इत्यादि शद्बांची अपेक्षा असल्यामुळें, तशा अर्थामध्यें बहुव्रीहिसमास किंवा मतुप् प्रत्यय होऊं शकत नाहीं. 'अनभिधानात' या द्वितीय हेतूचा अर्थ हा आहे कीं, भाषेंत सामीप्य इत्यादि अर्थामध्यें केलेला बहुव्रीहीचा किंवा मतुप् प्रत्ययान्ताचा प्रयोग कोठेंहि आढळत नाहीं.) 'तस्येदम' सू. ४–३–१२० या सूत्रावरील भाष्यांत असें म्हटलें आहे कीं, 'तस्येदम्' सू. १५०० या सूत्रांतील 'इदम्' या पदाचा 'अनन्तर,' म्हणजे 'सस्येदमनन्तरम्' इत्यादि अर्थ केल्यानें तशा अर्थामध्यें, त्या सूत्रान्वयें होणारा शैषिक प्रत्यय होऊं शकत नाहीं; कारण (तसा अर्थ द्योतित करण्याचें सामर्थ्य त्या प्रत्ययांत नाहीं व) तशा अर्थामध्ये केलेला प्रयोग भाषेंत कोठेंहि आढळत नाहीं. (त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात– 'तस्येदमित्यसन्निहितेऽप्राप्तिः। किं कारणम् ?। इदमः प्रत्यक्षवाचित्वात्। इदमित्येतत्प्रत्यक्षे वर्तते। तेनेहैव स्यात्–तस्येदमिति। तस्याऽद इति, तस्य तदित्यत्र न स्यात्। सिद्धं तु यद्योगा षष्ठी तत्र। सिद्धमेतत्। कथम् ?। यद्योगा षष्ठी वर्त्तते तत्रेति वक्तव्यम्। अनन्तरादिषु च प्रतिषेधः। अनन्तरादिषु च प्रतिषेधो वक्तव्यः।' पुढें भाष्यकारांनीं 'अनन्तरादिषु च प्रतिषेधः' या वार्तिकाचें प्रत्याख्यान केलें आहे, व प्रत्याख्यान करितांना असें म्हटलें आहे कीं, 'यदप्युच्यते–अनन्तरादिषु च प्रतिषेधो वक्तव्य इति। न वक्तव्यः– अनभिधानादनन्तरादिषूत्पत्तिर्न भविष्यति।' 'इदम्' हा शब्द प्रत्यक्षाचा वाचक असल्यामुळें, 'तस्य तत्' इत्यादि अर्थामध्यें शैषिक प्रत्यय न होण्याची जी आपत्ति येत होती ती टाळण्याकरितां, 'सिद्धं तु यद्योगा षष्ठी तत्र' हें वार्तिक वार्तिककारानें पठित केलें. परंतु त्या वार्तिकान्वयें, 'तस्य अनन्तरः' इत्यादि अर्थामध्यें शैषिक प्रत्यय होण्याची आपत्ति येत होती. ती टाळण्याकरितां, वार्तिककारानें 'अनन्तरादिषु च प्रतिषेधः' हें द्वितीय वार्तिक पठित केलें. परंतु

भाष्यकार म्हणतात कीं, असें द्वितीय वार्तिक पठित करण्याची कांहीं गरज नाहीं; कारण 'अनन्तर' इत्यादि अर्थ द्योतित करण्याचें सामर्थ्य षष्ठींत व षष्ठ्यन्ताहून होणाऱ्या शैषिक तद्धित प्रत्ययांत नाहीं, व तशा अर्थामध्यें झालेल्या शैषिक प्रत्ययाचें कोणतेंहि उदाहरण भाषेंत आढळत नाहीं.) या वर सांगितलेल्या सर्व गोष्टी मनांत धरूनच, 'अनन्तरादिषु न समासः अनभिधानादिति स्पष्टमाकरे' असें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे. या मनोरमेंतील पंक्तींत 'समास' असा जो शब्द वापरला आहे त्यांत तद्धितवृत्तीचा देखील समावेश होतो, म्हणजे 'अनन्तर, समीप' इत्यादि अर्थांमध्यें जसा समास होत नाहीं तसा तद्धितप्रत्यय देखील होत नाहीं.

शब्दरत्न– अनन्तरादिशब्दैः षष्ठीतत्पुरुषादिस्तु भवत्येव। 'ग्रामकूपः' 'गङ्गातीरम्' इत्यादौ समीप एवावयवत्वारोपेण समासः। स्पष्टा चेयं रीतिः "मपर्यन्तस्य" इति सूत्रे कैयटे। किं च हस्य लित्यर्थे "हल विलेखने" इति धातोर्लस्येत्त्वापत्तिः। न च फलाभावः? 'देवदत्त हल्' इत्यादौ डित्त्वसामर्थ्यादभस्यापि टेर्लोपवल्लित्त्वसामर्थ्या-त्प्रत्ययात्पूर्वत्वाभावेऽपि लित्स्वरस्यैव फलत्वस्य वक्तुं शक्यत्वादित्यपि बोध्यम्। यद्यपि "हलसीरात्" इति निर्देशेन तस्य नेत्त्वमिति कल्पयितुं शक्यम्। तथापि ज्ञापकस्वीकारापेक्षया सूत्रावृत्तिरेव लघीयसीति दिक्।

'अनन्तर' इत्यादि शब्दांशीं षष्ठीतत्पुरुष इत्यादि समास होतातच (जसें 'तस्य अनन्तरः तदनन्तरः' इत्यादि; कारण वृत्ति न होण्याकरितां जें असामर्थ्य पाहिजे तें अशा स्थलीं नसून, दोन पदांत परस्परान्वित होण्याचें सामर्थ्य आहे.) 'ग्रामकूपः, गङ्गातीरम्' इत्यादि स्थलीं सामीप्याचें ठिकाणीं अवयवत्वाचा आरोप करून (व षष्ठी-समासांतील षष्ठ्यन्त पद अवयवषष्ठी मानून) षष्ठीतत्पुरुषसमास होतो. 'मपर्यन्तस्य' ७-२-९१ या सूत्रावरील भाष्याच्या कैयट टीकेवरून वर सांगितल्याप्रमाणें अवयवत्वाचा आरोप करून वर दिलेल्या उदाहरणांत समास करतां येतो हें स्पष्ट होतें. (कैयटानें त्या

टीकेंत असें म्हटलें आहे कीं 'सर्वत्रैवाऽन्तशब्दोऽवयववाची, कस्य चिन्मुख्यमव यवत्वं कस्य चित्सामीप्यादुपचरितमित्यभिप्रायेणेदं भाष्यम् ।') दुसरें असें कीं, (आनन्तर्य सामीप्य इत्यादि षष्ठीचा अर्थ मानला व 'हल्' याचा 'हस्य समीपवर्ती लकारः इत्संज्ञकः स्यात्' असा अर्थ केला तर) 'हल् विलेखने' या भ्वादिगणांतील धातूमध्यें 'ह' च्या समीप लकार असल्यामुळें, त्याला इत्संज्ञा (होऊन 'तस्य लोपः' सू. ६२ या सूत्रानें त्या लकाराचा लोप) होण्याची आपत्ति येईल. येथें लोपव्यतिरिक्त दुसरें कांहीं फल नाहीं असें समजूं नये. ज्याप्रमाणें भसंज्ञक अङ्गापुढें डित् प्रत्यय आल्यास त्या अङ्गाच्या 'टि' चा लोप होतो हें सांगणाऱ्या 'टेः' सू. ३१६ या सूत्रान्वयें, भसंज्ञक अङ्ग नसून देखील त्यापुढें डित् प्रत्यय आला असतां 'डित्वसामर्थ्यादभस्यापि टेर्लोपः' या वचनान्वयें तशा अङ्गाच्याहि 'टि' चा लोप डित्त्वसामर्थ्यामुळें होतो, म्हणजे 'भू + इ + तास् + डा = भवितास् + डा' येथें डा हा डित् प्रत्यय पुढें आल्यामुळें, 'भवितास्' हें अङ्ग भसंज्ञक नसून देखील, त्याच्या 'आस्' या 'टि' चा लोप होतो, त्याचप्रमाणें (लित्प्रत्यय पुढें आला असतां तशा प्रत्ययाच्या लगेंच पूर्वी असलेला अच् उदात्त होतो हें सांगणाऱ्या 'लिति' सू. ३६७६ या सूत्रान्वयें) प्रत्ययभिन्न लित् पुढें आल्यास देखील त्याच्या लगेंच पूर्वी असणारा अच् लित्सामर्थ्यामुळें उदात्त होतो असें देखील म्हणतां येणें शक्य आहे व असें मानल्यास, 'देवदत्त हल्' म्हणजे 'हे देवदत्त हल् अस्ति' या उदाहरणांतील 'हल्' या (क्विबन्त प्रथमान्त) पदांतील लकार वर सांगितल्याप्रमाणें, इत् मानला असतां, त्या लकाराच्या लगेंच पूर्वी असणारा अकार उदात्त होईल. जरी 'हलसीरात् ठक्' सू. १६३३ या सूत्रामध्यें 'हल' अशा शब्दाचा निर्देश केला असल्यामुळें हें ज्ञापित होतें कीं, 'हल्' धातूंतील लकार इत् नाहीं असें म्हणतां येऊं शकतें. तरी 'हल्' धातूंतील लकाराला जी इत्संज्ञा होण्याची आपत्ति येते ती आपत्ति टाळण्याकरितां,

'हलसीरात्' या सूत्रांतील ज्ञापकाचा आधार घेणें अशा तऱ्हेची खटपट करण्यापेक्षां, 'हलन्त्यम्' या संपूर्ण सूत्राची द्विरावृत्ति करून त्या सूत्राचा कौमुदींत जसा अर्थ केला आहे तसें करण्यांतच अधिक लाघव आहे. (सारांश संपूर्ण 'हलन्त्यम्' या सूत्राची द्विरावृत्ति करण्यापेक्षां त्या सूत्रांतील 'हल्' या एकदेशाची द्विरावृत्ति करण्यांत लाघव आहे असें मानून प्रसादकारादिकांनीं जो प्रकृत सूत्राचा अर्थ करण्याचा यत्न केला आहे त्यांत वर सांगितल्याप्रमाणें अनेक दोष उद्भवत असल्यामुळें, तसें करण्यापेक्षां संपूर्ण सूत्राची द्विरावृत्ति करून सूत्रार्थ केल्यानें कोणताहि दोष येत नसल्यामुळें, तसेंच करण्यांत अधिक लाघव आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा– द्वितीयेऽपि संयोगान्तलोपो दुर्लभः, यणः प्रतिषेधारम्भात्, तत्प्रत्याख्यानपक्षेऽपि "झलो झलि" इत्यतो झल्ग्रहणमपकृष्य संयोगान्तस्य झलो लोपविधानाच्च । किं च पदार्थबोधं विना वाक्यार्थबोधासंभवेन हल्प्रत्याहारसिद्धेः प्रागेतत्सूत्रार्थाबोधे प्रसक्ते तदुद्धारार्थोऽयं यत्नः । अस्यां चावस्थायां हल्शब्दार्थाप्रसिद्धौ द्वन्द्व एव दुर्लभः, सहविवक्षाया असम्भवात् । तस्माद्यथोक्तमेव न्याय्यम् ॥

द्वितीय पक्ष स्वीकारल्यास देखील, म्हणजे 'हल् च ल् च' असा समाहारद्वन्द्व करून 'हल्ल्' असें जें पद होतें त्यांतील अन्त्य लकाराचा 'संयोगान्तस्य लोपः' सू. ५४ या सूत्रानें जो लोप केला आहे तो पक्ष स्वीकारल्यास देखील, संयोगान्त लकाराचा लोप होणें अशक्य आहे; कारण 'संयोगान्तस्य लोपः' या सूत्रावर 'यणः प्रतिषेधो वाच्यः' हें वार्तिक आरंभिलें असल्यामुळें, त्या वार्तिकारंभपक्षांत 'हल्ल्' यांतील संयोगान्त लकार या यण्चा लोप होऊं शकत नाहीं. वार्तिकप्रत्याख्यानपक्षांत देखील (भाष्यकारांनीं) 'झलो झलि' या उत्तर सूत्रांतून 'संयोगान्तस्य लोपः' या पूर्व सूत्रांत 'झलः' या पदाचें अपकर्षण करून संयोगान्त झलाचा लोप होतो असें विधान केलें

असल्यामुळें व 'हल्ल्' यांतील अन्त्य लकार झल् नसल्यामुळें, त्याचा लोप होऊं शकत नाहीं. ('संयोगान्तस्य लोपः' ८–२–२३ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'संयोगान्तस्य लोपे यणः प्रतिषेधः' हें वार्तिक प्रथम पठित करून, पुढें त्या वार्तिकाचें प्रत्याख्यान करितांना 'न वा, झलो लोपात् ।' हें द्वितीय वार्तिक पठित केलें आहे व असें म्हटलें आहें कीं, 'न वा वक्तव्यम् । किं कारणम् ? । झलो लोपात् । झलो लोपः संयोगान्तलोपो वक्तव्यः ।' सारांश वार्तिकारंभपक्ष मानला तर, लकार यण् असल्यामुळें त्याचा लोप होऊं शकत नाहीं. वार्तिकप्रत्याख्यानपक्ष मानला तरी, लकार झल् नसल्यामुळें त्याचा लोप होऊं शकत नाहीं. एकंदरीत दोन्ही पक्षांत लकाराचा लोप होणें अशक्य आहे. म्हणून 'हल् च ल् च' असा समाहारद्वन्द्व करून व त्याचा 'व्यञ्जनमित् अन्त्यलकारश्च इत्' असा अर्थ सिद्ध करण्याकरितां 'हल्ल्' असें पद सिद्ध करून त्यांतील अन्त्य लकाराचा 'संयोगान्तस्य लोपः' या सूत्रानें लोप होऊं शकत नसल्यामुळें, 'हल्' या अन्तिम शिवसूत्रांतील अन्त्य लकाराला इत्संज्ञा प्राप्त करून देण्याची जी अशा तऱ्हेची खटपट केली आहे ती, वर सांगितल्याप्रमाणें दोषयुक्त असल्यामुळें त्याज्य आहे, आणि त्यामुळें द्वितीय द्वन्द्व पक्ष देखील स्वीकारतां येत नाहीं. असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) दुसरें असें कीं, वाक्यांतील प्रत्येक पदाच्या अर्थाचा बोध झाल्याशिवाय संपूर्ण वाक्याच्या अर्थाचा बोध होणें असंभवनीय असल्यामुळें, जोपर्यंत हल्प्रत्याहार सिद्ध होत नाहीं (व 'हल्' या पदाचा 'व्यञ्जन' असा अर्थ आहे हें ज्ञात होत नाहीं) तोपर्यंत 'हलन्त्यम्' या संपूर्ण सूत्राच्या अर्थाचा बोध होणें अशक्य आहे अशी जी आपत्ति येते ती टाळण्याकरितांच 'हल् च ल् च' असा समाहारद्वन्द्व करण्याचा प्रयत्न केला आहे. पण असा द्वन्द्वसमास करतेवेळीं त्या समासांतील 'हल्' या पदाचा अर्थ अप्रसिद्ध–अज्ञात–असल्यामुळें, अशा ठिकाणीं द्वन्द्वसमास होऊंच शकत नाहीं; कारण येथें अशा स्थितींत सहविवक्षा असणें असंभवनीय

आहे, म्हणजे जेथें द्वन्द्वसमास करतेवेळीं त्या समासांतील प्रत्येक पदाच्या अर्थाचा बोध झालेला नाहीं तशा ठिकाणीं सहविवक्षा संभवतच नाहीं (व अशा रीतीनें येथें सहविवक्षेचा अभाव असल्यामुळें द्वन्द्वसमास होऊंच शकत नाहीं. या विषयाचें विस्तृत विवरण शब्दरत्नांत केलें जाईल.) म्हणून ('हल्' या एकदेशाचा 'हल् च ल् च' असा द्वन्द्वसमास करण्यापेक्षां) 'हलन्त्यम्' या संपूर्ण सूत्राची द्विरावृत्ति करून जसा त्या सूत्राचा कौमुदींत अर्थ केला आहे तशाच तऱ्हेनें त्या सूत्राचा अर्थ करणें न्याय्य–योग्य–आहे.

शब्दरत्न– झलो लोपेति । सौत्रलोपाश्रयणे तु मूलोक्तमेव लघु । असम्भवादिति । नच "आद्यन्तौ टकितौ इत्यादौ यथासङ्ख्यमन्वयेऽपि प्रथमतः साहित्यावच्छिन्ने साहित्यावच्छिन्नान्वयमात्रेण सहविवक्षामाश्रित्य यथा द्वन्द्वसाधुत्वं तथेहापि प्रथमतः लकारो हल्पदवाच्यश्चेत्" इति सामान्यतो बोधं कल्पितमादाय द्वन्द्वसाधुत्वम्, ततो विशेषजिज्ञासायाम् "आदिरन्त्येन" इत्येकवाक्यतया विशेषतो वाक्यार्थो लक्ष्यसंस्कारकः । किं च, सहविवक्षा = सहवक्तुं वक्तुरिच्छा, सा च सूत्रप्रणयनानुपपत्त्या पाणिनेस्ततः पूर्वमपि हल्पदार्थज्ञानादक्षतैव, बोद्धृबोधस्तु क्रमेणैवेति वाच्यम्, "आद्यन्तौ" इत्यादौ यथासङ्ख्यसूत्रारम्भसामर्थ्येन तथा-साधुत्वाङ्गीकारेऽप्यन्यप्रकारेण तस्य साधुत्वकल्पने मानाभावात् ।

('हल् च ल् च हल्ल्' असा द्वन्द्वसमास करून 'हल्ल्' असें जें सामासिक पद होतें त्यांतील अन्त्य लकार झल् नसल्यामुळें व 'संयोगान्तस्य झलो लोपः' असें भाष्यवचन असल्यामुळें त्याचा लोप न होण्याची जी आपत्ति येते ती टाळण्याकरितां त्या अन्त्य लकाराचा निपातनानें) सौत्रलोप झाला आहे असें मानण्यापेक्षां 'हलन्त्यम्' या संपूर्ण सूत्राची द्विरावृत्ति करून त्या सूत्राचा कौमुदींत जसा अर्थ केला आहे तसें करण्यांतच लाघव आहे (व सौत्रलोप मानण्यांत गौरवरूप दोष आहे. आतां मनोरमेंत 'द्वन्द्व एव दुर्लभः सहविवक्षायाः

असम्भवात्' असें जें म्हटलें आहे त्यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, 'ङ: सि धुट्, नश्च, शि तुक्' सू. १३१–३३ इत्यादि सूत्रांन्वयें लक्ष्याला टित् कित् आगम करतेवेळींच) ज्याप्रमाणें 'आद्यन्तौ टकितौ' सू. ३६ इत्यादि सौत्र वाक्यांत यथासंख्य अन्वय केला जातो, म्हणजे 'टित् आद्यवयवो भवति, कित् अन्तावयवो भवति' असा 'यथासंख्यमनुदेश: समानाम्' सू. १२८ या सूत्राच्या सहायानें लक्ष्याला संस्कार करतेवेळींच अनुक्रमें अन्वय केला जातो, तरी 'आद्यन्तौ टकितौ या वाक्याचा प्रयोग करतेवेळीं 'टकितौ' या समुदायाचा 'आद्यन्तौ,' या समुदायाशीं अन्वय केल्यानें (वक्त्याचे ठिकाणीं असलेली) जी सहविवक्षा ज्ञात होते तिचा आश्रय केल्यानें त्या सूत्रांतील दोन्ही द्वन्द्वसमास साधु ठरतात, त्याचप्रमाणें 'हल् च ल् च हल्' या स्थलीं 'लकार: इत्, हल्पदवाच्यश्च इत्' असा जो प्रथम सामान्य बोध होतो त्याचा आश्रय केल्यानें हा द्वन्द्वसमास देखील साधु मानतां येतो. त्यानंतर (या द्वन्द्वसमासांतील 'हल्' या पदाचा अर्थ काय आहे ही) विशेष जिज्ञासा उत्पन्न झाली असतां ('अन्त्यं ल् इत्' असा अर्थ केल्यानें अन्तिम शिवसूत्रांतील अन्त्य लकाराला इत्संज्ञा प्राप्त झाली असल्यामुळें) 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्राच्या सहायानें (हल्प्रत्याहार सिद्ध होऊन 'हल्' या पदाचा अर्थ 'व्यञ्जन' आहे असा) विशेष बोध होतो व 'अन्त्यं हल् इत्संज्ञकं स्यात्' असा जो वाक्यार्थ निष्पन्न होतो तो लक्ष्याला संस्कार करण्याच्या उपयोगी पडतो, म्हणजे उपदेशविषयीभूत–ज्यांचे पाणिनीय शास्त्रांत आद्योच्चारण केलें आहे अशा–शब्दांतील अन्त्य व्यञ्जन इत्संज्ञक असतें असा बोध होऊन त्या अन्त्य व्यञ्जनाचा 'तस्य लोप:' या सूत्रानें लोप करण्यांत वर सिद्ध झालेला वाक्यार्थ उपयोगी पडतो. (शंकाकार म्हणतो कीं, लक्ष्याला संस्कार करतेवेळीं 'आद्यन्तौ टकितौ' या सूत्रांतील 'टकितौ' या संपूर्ण सामासिक पदाचा 'आद्यन्तौ' या संपूर्ण सामासिक शब्दाशीं अन्वय होणें बिवक्षित नाही; कारण तसा अन्वय होणें विवक्षित

असतें तर, त्या सूत्राचा असा विपरीत अर्थ झाला असता कीं, ‘टित्’ व ‘कित्’ हे दोन्ही प्रकारचे आगम ज्याला होतात त्याचे ते आद्यवयव व तसेंच अन्तावयव देखील होतात. वास्तविक लक्ष्यसंस्कार –लक्ष्याला आगम–करतेवेळीं ‘टित्’ चा ‘आदि’ या पदाशीं व ‘कित्’ चा ‘अन्त’ या पदाशीं अन्वय होणें विवक्षित आहे. सारांश इतरेतरयोग-द्वन्द्व होण्यास जी साहित्याची अपेक्षा असते ती ‘आद्यन्तौ’ व ‘टकितौ’ या दोन्ही स्थलीं नसल्यामुळें, या दोन्ही ठिकाणी वास्तविक द्वन्द्वसमास न झाला पाहिजे. तरी पण ‘आद्यन्तौ टकितौ’ या वाक्याचा प्रयोग केला असतां, ‘टकितौ’ या पदाचा ‘आद्यन्तौ’ या पदाशीं जो कल्पित अन्वय होतो त्या कल्पित अन्वयाचे आधारावर वक्त्याचे ठिकाणीं सहविवक्षा आहे असें मानल्यानें ज्याप्रमाणें हे वरील दोन्ही द्वन्द्वसमास साधु मानले जातात त्याचप्रमाणें, ‘हल् च ल् च हल्ल्’ या द्वन्द्वसमासांत देखील ‘हल्ल्’ या संपूर्ण समुदायाचा ‘इत्’ या पदाशीं जो कल्पित अन्वय होतो त्या कल्पित अन्वयाचे आधारावर वक्त्याचे ठिकाणीं सहविवक्षा आहे असें मानल्यानें हा द्वन्द्वसमास देखील साधु मानतां येतो. हें खरें कीं, असा द्वन्द्वसमास करतेवेळीं जसा ‘ल्’ या पदाचा ‘अन्तिम शिवसूत्रांतील लकार’ असा निश्चित अर्थ समास करणाऱ्याला ज्ञात आहे तसा त्याला ‘हल्’ या पदाचा निश्चित अर्थ ज्ञात नाहीं. तरी पण त्या पदाचा कांहींतरी अर्थ असलाच पाहिजे असें त्याला सामान्य ज्ञान आहेच, व ‘पाठक्रमादर्थक्रमो बलीयान्’ या न्यायान्वयें ‘ल्’ या पदाचा ‘इत्’ शीं प्रथम अन्वय केल्यानें लकार इत्संज्ञक ठरत असल्यामुळें, ‘आदिरन्त्येत सहेता’ या सूत्राच्या सहायानें हल्प्रत्याहार सिद्ध केला असतां, ‘हल्’ या पदाचा ‘व्यञ्जन’ हा अर्थ आहे हें नंतर त्या श्रोत्याला–पाणिनीय सूत्रांचें अध्ययन करणाऱ्या पुरुषाला–ज्ञात होऊं शकतेंच. म्हणून हा द्वन्द्वसमास असाधु मानतां येत नाहीं. पण ‘हल् च ल् च हल्ल्’ असा द्वन्द्वसमास करतेवेळीं जर ‘हल्’ या पदाच्या अर्थाचें ज्ञानच नाहीं तर सहविवक्षा कशी मानतां यावी ? वक्त्याचे ठिकाणीं सहविवक्षा तेव्हांच मानतां येते कीं, जेव्हां दोन किंवा अधिक पदांचा इतरेतरयोगद्वन्द्व करतेवेळीं

त्या वक्त्याला त्या समासांत अवयवीभूत असलेल्या सर्व पदांच्या अर्थाचें ज्ञान आहे अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर शंकाकार पुढें सांगितल्याप्रमाणें उत्तर देतो.) दुसरें असें कीं, सहविवक्षा या शब्दाचा 'सह वक्तुं वक्तुरिच्छा'–एकत्र उच्चारण्याची वक्त्याची इच्छा–असा अर्थ आहे. 'हलन्त्यम्' हें सूत्र रचणाऱ्या पाणिनीला तें सूत्र रचण्यापूर्वी जर 'हल्' या पदाच्या अर्थाचें ज्ञान नसतें तर त्याला तें सूत्र रचतांच आलें नसतें पण त्यानें तें सूत्र रचलें असल्यामुळें, तें सूत्र अनुपपन्न–निरर्थक–न ठरावें व त्या सूत्राची उपपत्ति लावतां यावी याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं त्याला तें सूत्र रचण्यापूर्वी 'हल्' या पदाच्या अर्थाचें ज्ञान होतें व अशा रीतीनें त्याचे ठिकाणीं सहविवक्षा होती हें सिद्ध होतें. परंतु श्रोत्याला मात्र क्रमानेंच बोध होतो, म्हणजे 'हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' या पदाचा 'हल् च ल् च' असा विग्रह केल्यानें 'अन्त्यं हल् इत् लकारश्च इत्' असें जें वाक्य तयार होतें तें ऐकतेवेळीं पाणिनीय शास्त्राचें अध्ययन करणाऱ्या पुरुषाला जरी अन्तिम शिवसूत्रांतील लकार इत्संज्ञक होतो एवढेंच प्रथम ज्ञान होतें व 'हल्' या पदाच्या अर्थाचें एकदम ज्ञान होत नाहीं तरी, लकार इत्संज्ञक होतो हें ज्ञान त्याला झालें असल्यामुळें तो 'आदिरन्त्येन सहेता,' या सूत्राच्या सहायानें जेव्हा नंतर हल्प्रत्याहार सिद्ध करतो तेव्हा त्याला 'हल्' या पदाचा अर्थ व्यञ्जन आहे असें मागून ज्ञान होतेंच. (सारांश 'हलन्त्यम्' हें सूत्र रचणाऱ्या पाणिनीचे ठिकाणीं 'अन्त्यं हल् ल् च इत्' अशी वर सांगितल्याप्रमाणें सहविवक्षा होती असें मानतां येत असल्यामुळें, 'हल् च ल् च हल्ल्' हा द्वन्द्वसमास साधु मानतां येण्यांत कोणतीहि अडचण येत नाहीं असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. 'न च आद्यन्तौ टकितौ इत्यादौ...क्रमेणैवेति' हा सर्व शंकाग्रन्थ आहे हें लक्षांत ठेवावें. आतां या ग्रन्थांत शंकाकारानें जी शंका केली आहे त्या शंकेवर उत्तर देतांना शब्दरत्नकार असें म्हणतात कीं,) ही शंका बरोबर नाहीं, कारण 'आद्यन्तौ टकितौ' इत्यादि स्थलीं सहविवक्षा

नसून देखील 'आद्यन्तौ, टकितौ' इत्यादि द्वन्द्वसमास, 'यथासंख्यमनुदेशः समानाम्' सू. १२८ हें सूत्र आरंभिलें असल्यामुळें त्या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानें जरी साधु मानले जातात तरी, ज्या स्थलीं यथासंख्य सूत्र लागू पडत नाहीं तशा ठिकाणीं सहविवक्षा नसून देखील केलेला द्वन्द्वसमास इतर रीतीनें, म्हणजे शंकाकारानें जी तऱ्हा सांगितली आहे त्या तऱ्हेनें, साधु ठरतो असें मानण्यास कोणतेंहि प्रमाण नाहीं. ('शत्रुं मित्रं विपत्तिं च जय रञ्जय भञ्जय' इत्यादि लौकिक प्रयोगांत जेथें द्वन्द्वसमास न करितां असमस्त पदें उच्चारलीं आहेत तशा स्थलीं स्थानरूप लौकिक प्रमाणान्वयें 'शत्रुं जय, मित्रं रञ्जय, विपत्तिं भञ्जय' असा यथासंख्य अन्वय ज्याप्रमाणें होतो त्याचप्रमाणें व्याकरणशास्त्रांत देखील द्वन्द्वसमास न करितां असमस्त उद्देश्यरूप व विधेयरूप पदें उच्चारलीं असलीं तर त्या स्थानरूप लौकिक प्रमाणान्वयें यथासंख्य अन्वय होऊं शकतो. पण लौकिक प्रयोगांत जर द्वन्द्वसमास करून एखादें वाक्य उच्चारलें असेल तर तशा स्थलीं स्थानरूप प्रमाण लागू केल्यानें यथासंख्य अन्वय प्रतीत होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ 'अजाविधनौ देवदत्तयज्ञदत्तौ' अशा द्वन्द्वसमासघटित वाक्याचा प्रयोग केला असतां, 'देवदत्तयज्ञदत्तौ' या सामासिक पदाचा 'अजाविधनौ' या सामासिक पदाशीं अन्वय होत असून क्रमान्वय होत नसल्यामुळें, अजा देवदत्ताचें धन आहे व अवि यज्ञदत्ताचें धन आहे असा क्रमिक बोध होत नसून, देवदत्त व यज्ञदत्त या दोघांचेंहि अजा व अवि हें धन आहे असाच समुदायरूप बोध होतो. पाणिनीय व्याकरणशास्त्रांत असें द्वन्द्वसमासघटित सूत्र उच्चारलें असतां, समुदायाचा समुदायाशीं अन्वय न होतां क्रमिक अन्वय व्हावा एवढ्याकरितांच 'यथासंख्यमनुदेशः' हें सूत्र आरंभिलें आहे, व त्या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानेंच 'आद्यन्तौ टकितौ' सू. ३६, 'तस्थस्थमिपां तांतंतामः' सू. २१९९ इत्यादि सूत्रांत निर्दिष्ट असलेले द्वन्द्वसमास सहविवक्षा नसून देखील साधु मानले जातात व तशा ठिकाणीं समुदायाचा समुदायाशीं अन्वय न होतां क्रमान्वय

होतो. 'आद्यन्तौ' टकितौ १.१.४६ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'समासनिर्देशोऽयं तत्र न ज्ञायते क आदिः कोऽन्तः इति। तद्यथा। अजाविधनौ देवदत्तयज्ञदत्तावित्युक्ते तत्र न ज्ञायते कस्याजा धनं कस्यावय इति। यद्यपि तावल्लोक एष दृष्टान्तो, दृष्टान्तस्यापि पुरुषारम्भो निवर्तको भवति। अस्ति चेह कश्चित्पुरुषारम्भः? अस्तीत्याह। कः?। संख्यातानुदेशो नाम।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, जेथें पाणिनीय सूत्रांत उद्देश्यांचा व विधेयांचा सहविवक्षा नसून देखील द्वन्द्वसमासरूपानें प्रयोग केला आहे तशा ठिकाणीं यथासंख्यसूत्राच्या आरंभसामर्थ्यानेंच क्रमिक अन्वय होतो व सहविवक्षा नसून देखील केलेले तसे द्वन्द्वसमास साधु मानले जातात. पण 'हल् च ल् च हल् इत्' या स्थलीं यथासंख्यसूत्र लागू पडत नाहीं; कारण येथें 'हल्' व 'ल्' हीं दोन उद्देश्यें असून 'इत्' हें एकच विधेय आहे. सारांश या वरील उदाहरणांत उद्देश्य व विधेय यांची संख्या सारखी नसल्यामुळें, 'हलन्त्यम्' हें सूत्र यथासंख्य सूत्राचा विषय होऊं शकत नाहीं व त्यामुळें या स्थलीं सहविवक्षा नसून देखील जो प्रसादकारादिकांनीं द्वन्द्वसमास करण्याचा प्रयत्न केला आहे तो प्रयत्न निष्फल असून त्यांनीं केलेला द्वन्द्वसमास साधु मानतां येत नाही असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न– किं च, 'श्रोतॄणां सहबोधो भवतु' इतीच्छया सह वक्तुमिच्छाया एव सहविवक्षात्वेन श्रोतॄणामपि सहबोध एवोचितः। तादृशेच्छया तेषां तादृशबोधाजनकशब्दप्रयोगे तु पाणिनेर्भ्रान्तत्वापत्तिः। 'मुखनयनं पश्य' इत्यादौ तु न दोषः, उभयज्ञत्वेन ज्ञातं प्रत्येव तादृशशब्दप्रयोगात्। तेन रूपेण ज्ञानं भ्रमः, प्रमा वेत्यन्यदेतत्।

दुसरें असें कीं, सहविवक्षा या शब्दाचा (जसा शंकाकारानें वर सांगितल्याप्रमाणें अर्थ केला आहे तो अर्थ बरोबर नसून) 'श्रोतॄणां सहबोधो भवतु इतीच्छया सहवक्तुः वक्तुमिच्छा' असा वास्तविक अर्थ आहे, म्हणजे वक्त्यानें एखादें वाक्य उच्चारलें असतां जसा तें वाक्य

उच्चारतेवेळीं त्याला त्या वाक्याचा अर्थ अवगत असतो त्याचप्रमाणें श्रोत्याला देखील तें वाक्य ऐकल्याबरोबर त्या वाक्याच्या अर्थाचा बोध व्हावा अशी जी वक्त्याची इच्छा ती सहविवक्षा होय, व त्या शब्दाचा असा अर्थ असल्यामुळें, श्रोत्याला देखील (वक्त्यानें वाक्य उच्चारलें असतां जसा त्याला त्या वाक्याचा अर्थ अवगत असतो तसा) बोध होणेंच उचित आहे. सारांश 'श्रोतृसमवेतं सहज्ञानं मदिष्टसाधनम्' अशा प्रकारची वक्त्याचे ठिकाणीं असणारी जी इच्छा तिलाच सहविवक्षा म्हणतात. म्हणून वक्त्यानें एखादें वाक्य उच्चारलें असतां तें वाक्य ऐकल्यावर जर श्रोत्याला त्या वाक्याच्या अर्थाचा बोध होऊं शकत नाहीं तर तशा स्थलीं वक्त्याचे ठिकाणीं सहविवक्षा होती असें मानतां येत नाहीं.) पाणिनीला सहविवक्षा असून देखील, म्हणजे त्यानें उच्चारलेल्या सूत्राच्या अर्थाचा श्रोत्याला तें सूत्र ऐकल्याबरोबर बोध व्हावा अशी त्याची इच्छा असून देखील, जर त्यानें अशा द्वन्द्वसमासघटित वाक्याचा प्रयोग केला असेल कीं, तें वाक्य ऐकल्यावर श्रोत्याला त्या वाक्याच्या अर्थाचा बोध होऊं शकत नाहीं तर पाणिनीनें भ्रमानें–चुकीनें–तशा वाक्याचा प्रयोग केला असें मानण्याची आपत्ति येते. ('हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' हें पद 'हल् च ल् च' या द्वन्द्वसमासाचें घटक पद आहे असें मानल्यास, तें सूत्र उच्चारतेवेळीं जरी पाणिनीला 'हल्' चा 'व्यञ्जन' हा अर्थ आहे हें ज्ञात होतें तरी तें सूत्र उच्चारलें असतां, श्रोत्याला 'हल्' या पदाचा अर्थ ज्ञात होत नसल्यामुळें, 'श्रोतॄणां सहबोधो भवतु' अशी पाणिनीची इच्छा असून देखील त्यानें भ्रांतीनें 'हलन्त्यम्' हें सूत्र उच्चारलें आहे असें मानण्याचा अनिष्ट प्रसंग येतो. पण तशा सर्वज्ञ आचार्याला भ्रान्ति होणें अशक्य आहे. म्हणून हेंच मानलें पाहिजे कीं, पाणिनीनें 'हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' हें पद 'हल् च ल् च' अशा द्वन्द्वसमासाचें घटक पद आहे व त्याचा व्यञ्जन असा अर्थ आहे या अभिप्रायानें मुळींच उच्चारलें नाहीं. पुन्हा

शंकाकार अशी शंका करतो कीं, द्वन्द्वसमासघटक दोन पदांपैकीं श्रोत्याला जेथें एकाच पदाच्या अर्थाचें ज्ञान असून दुसऱ्या पदाच्या अर्थाचें ज्ञान नाहीं तशा ठिकाणीं देखील 'मुखनयनं पश्य' इत्यादि द्वन्द्वसमासघटित वाक्याचा प्रयोग केलेला भाषेंत आढळतो, म्हणजे 'मुखनयनम्' या सामासिक पदांत मुख व नयन हे जे दोन शब्द आहेत त्यापैकीं श्रोत्याला जरी एकाच शब्दाच्या अर्थाचें ज्ञान असलें व दुसऱ्या शब्दाच्या अर्थाचें मुळींच ज्ञान नसलें तरी वक्ता तसा प्रयोग भाषेंत करीत असतो. म्हणून 'हल् च ल् च हल्' अशा अभिप्रायानें 'हल्' हें पद उच्चारलें असतां, जरी श्रोत्याला 'हल्' या द्वन्द्वसमासघटक प्रथम पदाच्या अर्थाचें ज्ञान नसून केवळ 'ल्' या द्वितीय पदाच्या अर्थाचें ज्ञान आहे तरी, अशा ठिकाणीं वक्त्यानें–पाणिनीनें–केलेला द्वन्द्वसमासाचा प्रयोग साधु ठरतो. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'मुखं च नयने च तेषा समाहारः मुखनयनम्' असा 'द्वन्द्वश्च प्राणितूर्यसेनाङ्गानाम्' सू. ९०६ या सूत्रान्वयें समाहारद्वन्द्व करून) 'मुखनयनं पश्य' इत्यादि प्रयोग करण्यांत कांहीं दोष येत नाहीं; कारण तशा वाक्याचा प्रयोग अशाच श्रोत्याला उद्देशून केला जातो कीं, ज्याला मुख व नयन या द्वन्द्वसमासघटक दोन्ही पदांच्या अर्थाचें ज्ञान आहे असें वक्ता समजतो. हें शक्य आहे कीं, श्रोत्याला तशा द्वन्द्वसमासांतील दोन्ही पदांच्या अर्थाचें ज्ञान आहे असा वक्त्याचे ठिकाणीं झालेला ग्रह कदाचित् खरा असेल किंवा चुकीचा अथवा आरोपित असेल; पण ही गोष्ट वेगळी. (तशा चुकीच्या किंवा आरोपित ग्रहानें वक्त्यानें केलेला द्वन्द्वसमासाचा प्रयोग साधु मानण्यांत कांहीं दोष येत नाहीं.)

शब्दरत्न– किं च पाणिनेः पूर्वं हल्पदार्थज्ञानेऽपि तदभिप्रायेण न प्रयोगः । अन्यथा व्याख्यातृपरम्परावगतवक्तृतात्पर्यानुपपत्त्या "लट् स्मे" इति सूत्रस्थकैयटोक्तरीत्या लक्षणया, तन्त्रान्तरीयप्रथमादिव्यवहारेण प्रथमादिपदानामिव शक्त्यनुमानाद्वा ततः श्रोतॄणां

बोधसम्भवेनेतरेतराश्रयस्यैवाभावेन तदाशङ्का "लश्चेतिवक्तव्यम्" इत्यादिसमाधानपरभाष्यासङ्गत्यापत्तेः । न चैवमजादिव्यवहारस्यापि लक्षणादिनैवोपपत्तावादिरन्त्येनेति सूत्रवैयर्थ्यम्, क्वचिल्लक्षणादिना बोध इति सर्वत्र लक्षणाद्याश्रयणमेवेति नियमाभावात् । "नासूया कर्त्तव्या यत्रानुगमः क्रियते" इति "पङ्क्तिविंशति" इति सूत्रे भाष्योक्तेः ।

दुसरें असें कीं, 'हलन्त्यम्' हें सूत्र रचण्यापूर्वी पाणिनीला जरी 'हल्' या पदाचा अर्थ 'व्यञ्जन' आहे असें ज्ञान होतें तरी, त्यानें त्या सूत्रांत 'हल्' या पदाचा प्रयोग 'व्यञ्जन' या अर्थामध्यें केला नाहीं. 'व्यञ्जन' या अर्थामध्यें त्यानें त्या सूत्रांत 'हल्' या पदाचा प्रयोग केला असें मानल्यास, वक्त्याला–पाणिनीला–अभिप्रेत असलेल्या व गुरुशिष्यपरंपरेनें–पाणिनी, त्याचे शिष्य, त्या शिष्यांचे शिष्य इत्यादि परंपरेनें–ज्ञात होणाऱ्या 'व्यञ्जन' या अर्थामध्यें 'हल्' या पदाचा पाणिनीनें जो उपयोग केला आहे त्या अर्थाची इतर रीतीनें उपपत्ति लागू शकत नसल्यामुळें, (१) 'लट् स्मे' या सूत्रावरील भाष्याच्या टीकेंत जशी कैयटानें लक्षणा मानली आहे तशी लक्षणा मानल्यानें, किंवा (२) इतर वैयाकरणांच्या व्याकरणग्रन्थांत 'सु औ जस्' म्हणजे प्रथमा, 'अस् औट् शस्' म्हणजे द्वितीया इत्यादि केलेल्या व्यवहाराला धरूनच पाणिनीनें त्याच अर्थामध्यें प्रथमा, द्वितीया इत्यादि शब्दांचा प्रयोग केला आहे असे ज्याप्रमाणें शक्त्यनुमानानें ठरविलें जातें, म्हणजे 'सु औ जस्, अम् औट् शस्' इत्यादि त्रिकांचे ठिकाणीं अनुक्रमें प्रथमा, द्वितीया इत्यादि अर्थाचा बोध करण्याची अभिधाशक्ति आहे असें अनुमानानें ठरवितां येतें, त्याचप्रमाणें 'हल्' या शब्दाचा प्रयोग 'हलन्त्यम्' या सूत्रांत पाणिनीनें, तो शब्द अभिधाशक्तीनें 'व्यञ्जन' या अर्थाचा वाचक आहे असें मानून, त्या अर्थामध्यें उपयोग केला आहे असें शक्त्यनुमान केल्यानें, म्हणजे 'हल्पदं हकारादिषु शक्तम्=हकारादिलान्तसमुदायघटकबोधजनकम्, हकारादिबोधतात्पर्येण पाणिन्युच्चरितत्वात्' अशा तऱ्हेचें

शक्यनुमान केल्यानें, श्रोत्याला उपदेशविषयीभूत शब्दांतील अन्त्य व्यञ्जन इत्संज्ञक होतें असा 'हलन्त्यम्' या सूत्राच्या अर्थाचा बोध होणें संभवतें. पण तसें मानलें तर अन्योन्याश्रयरूप दोष मुळींच येत नाहीं व त्यामुळें 'हलन्त्यम्' १–३–३ या सूत्रावरील ज्या भाष्यांत भाष्यकारांनीं अन्योन्याश्रयदोषरूप शंका उपस्थित केली आहे व त्या शंकेच्या परिहारार्थ 'लश्चेति वक्तव्यम्' ('एकशेष-निर्देशाद्वा सिद्धम्') इत्यादि वचनें पठित केलीं आहेत तें समाधानपर भाष्य असंगत ठरण्याची आपत्ति येते. ('लट् स्मे' ३–२–११८ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'स्मपुरा भूतमात्रे' व 'न स्मपुराऽद्यतने' अशीं दोन वार्तिकें पठित केलीं आहेत. पहिल्या वार्तिकाचा 'स्म' किंवा 'पुरा' यांचा वाक्यांत उपयोग केला असल्यास, सामान्य भूतकालवाचक अर्थामध्यें लट् लकाराचा प्रयोग करावा असा अर्थ केला, व द्वितीय वार्तिकाचा 'स्म' किंवा 'पुरा' यांचा वाक्यांत उपयोग केला असल्यास, सामान्य अद्यतनभूत या अर्थामध्यें लट् लकाराचा प्रयोग होऊं शकत नाहीं, म्हणजे अनद्यतन-भूत या विशेष प्रकारच्या भूतकालवाचक अर्थामध्येंच लट्लकाराचा प्रयोग होतो, असा अर्थ केला तर, वरील दोन वार्तिकें परस्परविरुद्ध अर्थांचें प्रतिपादन करणारीं वार्तिकें आहेत असें मानण्याची आपत्ति येते. ही आपत्ति टाळण्याकरितां कैयटानें प्रथम वार्तिकांतील 'स्मपुरा' या पदाचा, ज्या सूत्रांत 'स्म' हा शब्द आहे त्या सूत्रापासून ज्या सूत्रांत 'पुरा' हा शब्द आहे त्या सूत्रापर्यंतचीं पांच सूत्रें, म्हणजे 'लट् स्मे' अपरोक्षे च, ननौ पृष्टप्रतिवचने, नन्वोर्विभाषा, पुरि लुङ् चास्मे' सू. २७७८–२७८२, असा लक्षणेनें अर्थ केला आहे व असा लक्षणेनें 'स्मपुरा' याचा अर्थ करून वरील दोन वार्तिकांचा असा अर्थ केला आहे कीं, वर सांगितलेल्या पांच सूत्रांपैकीं दोन सूत्रांनीं–म्हणजे सूत्र २७८०–८१ या सूत्रांनी–सामान्य भूतकालवाचक अर्थामध्यें लट् लकाराचा प्रयोग होतो; पण बाकीच्या ज्या तीन सूत्रांत 'स्म' व

'पुरा' हे शब्द आहेत अशा 'लट् स्मे, अपरोक्षे च, पुरि लुङ् चास्मे' त्या तीन सूत्रांनीं होणारा लट् लकाराचा प्रयोग सामान्य भूतकालवाचक अर्थांमध्यें करतां येत नसून अनद्यतनभूतकालवाचक विशेष अर्थामध्येंच करतां येतो. त्या भाष्यावरील टीकेंत कैयटानें असें म्हटलें आहे. 'इत आरभ्य पञ्चसूत्र्यां कालविभागप्रतिपादनाय वार्तिकद्वयम्, स्मपुराभूतमात्रे, न स्म पुराद्यतन इति । तस्याऽयमर्थः–प्रथमे वार्तिके स्मपुराशब्दाभ्यामाद्यन्ताभ्यां पञ्जसूत्री लक्ष्यते । तत्र भूतमात्रे प्रत्ययो भवति । स्मपुरालक्षणस्तु प्रत्ययोऽद्यतने न भवति । एतदुक्तं भवति–लट् स्मे, अपरोक्षे च, पुरि लुङ् चास्मे इति सूत्रत्रयेणाऽनद्यतने भूतविशेषे प्रत्ययो भवति । ननौ पृष्टप्रतिवचने, नन्वोर्विभाषेत्येताभ्यां तु भूतमात्रे प्रत्ययः ।' सारांश 'स्मपुरा' या शब्दांचा 'स्म' पासून 'पुरा' पर्यंत असा ज्याप्रमाणें कैयटानें लक्षणेनें अर्थ केला आहे त्याचप्रमाणे 'हलन्त्यम्' या सूत्रांतील 'हल्' या शब्दाचा 'ह' पासून 'ल्' पर्यंत शिवसूत्रांतील वर्णसमुदाय असा लक्षणेनें अर्थ करतां येतो, व त्या सूत्रांत 'अन्त्यम्' हें अवयववाचक पद घातलें असल्यामुळें, उपदेशविषयीभूत शब्दांत–आद्योच्चारणांत–असणारा शिवसूत्रस्थहकारादिलकारान्तसमुदायान्तर्गत अन्त्य वर्ण–व्यञ्जन–इत्संज्ञक होतो असा त्या सूत्राचा अर्थ फलित होतो. पण तसा अर्थ 'हल्' शब्दाचे ठिकाणीं अभिधाशक्ति मानल्यानें बोधित होऊं शकत असल्यास, लक्षणावृत्तीचा आश्रय करणें अनुचित आहे हा आशय मनांत धरून शंकाकार असें सुचवितो कीं, 'हल्' हें पद अभिधावृत्तीनें 'व्यञ्जन' या अर्थाचें वाचक आहे असें मानतां येतें; कारण पाणिनीनें अष्टाध्यायींत 'प्रातिपदिकार्थलिङ्गपरिमाणवचनमात्रे प्रथमा, कर्मणि द्वितीया, कर्तृकरणयोस्तृतीया' इत्यादि सूत्रांत प्रथमा, द्वितीया, तृतीया इत्यादि विभक्तींचा निर्देश केला असून ज्याअर्थीं प्रथमा, द्वितीया, तृतीया इत्यादि कशास म्हणावें याबद्दल कोठेंहि विधान केलें नाहीं त्याअर्थीं इतर व्याकरणग्रन्थांत 'सु औ जस् इति

प्रथमा, अम् औट् शस् इति द्वितीया' इत्यादि प्रथमा द्वितीया वगैरे विभक्तींची व्याख्या सांगितली असल्यामुळें, 'स्वौजस्' सू. १८३ या सूत्रांत जीं सात त्रिकें निर्दिष्ट आहेत त्यांचे ठिकाणीं अनुक्रमें प्रथमा, द्वितीया, तृतीया इत्यादि सात विभक्तींचा अभिधाशक्तीनें बोध करण्याचें सामर्थ्य आहे व त्यामुळेंच पाणिनीनें प्रथमा, द्वितीया इत्यादि शब्दांची वेगळी व्याख्या न देतां, इतर व्याकरणग्रन्थांत त्या शब्दांचा ज्या अर्थामध्यें उपयोग केला आहे त्या अर्थाला धरूनच पाणिनीनें देखील त्या शब्दांचा उपयोग अष्टाध्यायींत केला आहे असें ज्याप्रमाणें शक्त्यनुमान म्हणजे 'स्वौजस्' इत्यादि सात त्रिकें प्रथमा इत्यादि सात विभक्तींचे अभिधाशक्तीनें अनुक्रमें बोधक आहेत असें अनुमान, करतां येतें त्याचप्रमाणें इतर प्राचीन व्याकरणग्रन्थांत जेथें जेथें 'व्यञ्जन' शब्दाचा प्रयोग आढळतो तेथें तेथें पाणिनीनें 'हल्' शब्दाचा प्रयोग केला असल्यामुळें, 'हल्' हा शब्द अभिधाशक्तीनें 'व्यञ्जन' या अर्थाचा वाचक आहे व त्या अर्थामध्येंच पाणिनीनें 'हलन्त्यम्' या सूत्रांत 'हल्' या शब्दाचा उपयोग केला आहे असें शक्त्यनुमान करतां येतें. सारांश वर सांगितल्याप्रमाणें लक्षणेनें किंवा शक्त्यनुमानानें 'हल्' या शब्दाचा 'व्यञ्जन' असा अर्थ केल्यानें, 'हल् च ल् च हल्ल्' असा द्वन्द्वसमास करतेवेळीं त्या समासाचे घटक–अवयव–जे 'हल्' व 'ल्' हे आहेत त्यांपैकीं 'हल्' चा अर्थ व्यञ्जन असून 'ल्' याचा शिवसूत्रांतील अन्त्य लकार हा अर्थ आहे अशा प्रकारचें दोन्ही पदांच्या अर्थाचें ज्ञान आहे असें सिद्ध होत असल्यामुळें, येथें सहविवक्षा आहे असें मानतां येतें व त्यामुळें या स्थलीं द्वन्द्वसमास होण्यांत कांहीं प्रत्यवाय येत नाहीं आणि तसा द्वन्द्वसमास केला असतां, शिवसूत्रांतील अन्त्य लकार इत्संज्ञक समजावा व उपदेशांतील अन्त्य व्यञ्जन इत्संज्ञक समजावें असा 'हलन्त्यम्' या सूत्राचा अर्थ निष्पन्न होतो असें शंकाकाराच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं,

शंकाकाराच्या म्हणण्याप्रमाणें 'हलन्त्यम्' या प्रकृत सूत्रांतील 'हल्' हें पद लक्षणेनें किंवा अभिधाशक्तीनें व्यञ्जन या अर्थाचें वाचक आहे असें मानून शंकाकारानें वर सांगितल्याप्रमाणें प्रकृत सूत्राचा अर्थ केल्यास अन्योन्याश्रयरूप दोष मुळींच उद्भवत नाहीं. मग त्या सूत्रावरील ज्या भाष्यांत अन्योन्याश्रयरूप दोष दाखविला आहे व त्या दोषाचें निवारण करण्याकरितां अनेक उपाय सुचविले आहेत त्या भाष्याची सुसङ्गतता कशी लावतां येणें शक्य आहे? त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात– 'लकारस्यानुबन्धत्वेनाऽज्ञापितत्वाद्हल्ग्रहणस्याऽप्रसिद्धिः । हलन्त्यमित्संज्ञं भवतीत्युच्यते, लकारस्यैव तावदित्संज्ञा न प्राप्नोति ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'हल्' या अन्तिम माहेश्वरसूत्रांतील लकाराला दुसऱ्या कोणत्याहि सूत्रानें इत्संज्ञा होणें सांगितलें नसल्यामुळें 'हलन्त्यम्' या प्रकृत सूत्रांतील 'हल्' या पदाचा अर्थच कळूं शकत नाहीं; कारण त्या लकाराला इत्संज्ञा झाल्याशिवाय हल् या पदाचा अर्थ बोधित करून देणारें 'आदिरन्त्येन सहेता' हें सूत्र प्रवृत्त होऊंच शकत नाहीं आणि 'हलन्त्यम्' या सूत्रांत तर हल् इत्संज्ञक होणें सांगितलें आहे. पण हल् या शब्दानें कोणते वर्ण घ्यावे हें समजूं शकत नसल्यामुळें त्या सूत्राचा अर्थच होऊं शकत नाहीं. या वरील भाष्यांतील 'लकारस्येति' हें प्रतीक घेऊन कैयटानें असें म्हटलें आहे कीं, 'इतरेतराश्रयं मन्यते । शषसर् हलित्यत्र लकारस्य सत्यामित्संज्ञायां हलिति प्रत्याहारः, सति च प्रत्याहारे लणित्यत्र लकारस्य हल्त्वात्तस्यैव शषसर् हलित्यत्रान्ते निर्दिष्टत्वादित्संज्ञेति प्रत्याहाराश्रयेत्संज्ञा, तदाश्रयश्च प्रत्याहारः।' कैयटाच्या म्हणण्याचा थोडक्यांत आशय हा आहे कीं, 'हलन्त्यम्' या सूत्राच्या विषयांत भाष्यकार अन्योन्याश्रयरूप दोष मानतात व त्याचें कारण हें कीं, 'हल्' या अन्तिम शिवसूत्रांतील लकाराला इत्संज्ञा झाल्याशिवाय 'हल्' प्रत्याहार सिद्ध होऊं शकत नाहीं व तो प्रत्याहार 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्राच्या सहायानें सिद्ध केल्याशिवाय शिवसूत्रांतील अन्त्य लकाराला–व्यञ्जनाला–इत्संज्ञा

होऊं शकत नाहीं. अशा रीतीनें हल्प्रत्याहारसापेक्ष लकाराची इत्संज्ञा ठरत असून इत्संज्ञासापेक्ष हल्प्रत्याहाराची सिद्धि ठरत असल्यामुळें, येथें अन्योन्याश्रयरूप दोष येतो व 'इतरेतराश्रयाणि कार्याणि न प्रकल्पन्ते' असा सिद्धान्त असल्यामुळें लकाराची इत्संज्ञाहि सिद्ध होत नाहीं व तसेंच हल्संज्ञाहि सिद्ध होत नाहीं, म्हणजे हल् या पदाचा व्यञ्जन असा अर्थ आहे हें देखील सिद्ध होऊं शकत नाहीं. सारांश 'आदिरन्त्येन सहेता' हें इत्संज्ञासापेक्ष सूत्र असल्यामुळें जोपर्यंत अन्तिम शिवसूत्रांतील लकाराची इत्संज्ञा सिद्ध होत नाहीं तोपर्यंत त्या सूत्राची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं व जोपर्यंत त्या सूत्राच्या सहायानें हल्प्रत्याहार सिद्ध होत नाहीं तोपर्यंत हल्संज्ञासापेक्ष 'हलन्त्यम्' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व त्यामुळें लकाराला इत्संज्ञा होऊं शकत नाहीं. अशा रीतीनें 'आदिरन्त्येन सहेता' व 'हलन्त्यम्' हीं दोन सूत्रें परस्परसापेक्ष असल्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणें इत्संज्ञा व तशीच हल्संज्ञा या दोन्हीहि संज्ञा सिद्ध होत नाहींत आणि त्यामुळें 'हलन्त्यम्' या सूत्राच्या अर्थाचा बोध होऊं शकत नाहीं. वर दिलेल्या भाष्यावरून व कैयटवृत्तीवरून हें स्पष्ट होतें कीं, भाष्यकारांनीं प्रकृत सूत्राच्या विषयांत अन्योन्याश्रयरूप दोष मानला आहे व तो दोष टाळण्याकरितांच त्यांनीं 'लकारनिर्देशः कर्तव्यः । हलन्त्यमित्संज्ञं भवति लकारश्चेति वक्तव्यम्' असें प्रकृत सूत्रावरील भाष्यांत म्हटलें आहे व 'एकशेषनिर्देशात्सिद्धम्' असा दुसरा उपाय देखील सुचविला आहे. पण शंकाकाराच्या म्हणण्याप्रमाणें 'हलन्त्यम्' या प्रकृत सूत्रांत 'हल्' या पदाचा पाणिनीनें 'हकारादिलकारान्तवर्णसमुदायः,' म्हणजे 'व्यञ्जनम्' या अर्थामध्यें उपयोग केला आहे असें मानल्यास, समाहारद्वन्द्वपक्षांत लकाराची इत्संज्ञा सिद्ध होते व हल् या पदाचा व्यञ्जन असा अर्थ देखील बोधित होतो आणि त्यामुळें प्रकृत सूत्राच्या विषयांत अन्योन्याश्रयरूप दोष मुळींच येत नाहीं. मग भाष्यकारांनीं एवढी उठाठेव करून अन्योन्याश्रयरूप दोष निवारण करण्याचा व्यर्थच

प्रयत्न केला आहे असें मानलें पाहिजे. सारांश शंकाकाराचें म्हणणें बरोबर मानल्यास, वरील भाष्य असङ्गत ठरण्याची आपत्ति येते हें उघड आहे. पण सर्वज्ञ भाष्यकारांनीं केलेलें प्रमाणभूत भाष्य तर केव्हांहि असङ्गत किंवा चूक मानतां येत नाहीं. म्हणून तें भाष्य सुसङ्गत ठरण्याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं, पाणिनीनें 'हलन्त्यम्' या सूत्रांत 'हल्' या पदाचा 'व्यञ्जन' या अर्थामध्यें मुळींच उपयोग केला नाहीं. सारांश 'हल् च ल् च' असा द्वन्द्वसमास करतेवेळीं त्या द्वन्द्वसमासांतील 'हल्' या पूर्वपदाच्या अर्थाचें ज्ञान नसल्यामुळें, येथें सहविवक्षा मानतां येत नाहीं व त्यामुळें तसा द्वन्द्वसमास होऊं शकत नाहीं असें शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे. आतां 'स्मपुरा भूतमात्रे' या वार्तिकांतील 'स्मपुरा' या शब्दांचा, ज्या सूत्रांत 'स्म' हा शब्द आहे त्या सूत्रापासून ज्या सूत्रांत 'पुरा' हा शब्द आहे असा पञ्चसूत्रसमुदाय, अशा तऱ्हेनें ज्याप्रमाणें कैयटानें लक्षणेनें अर्थ केला आहे त्याचप्रमाणें) 'अच्, हल्' इत्यादि शब्दांचा देखील 'अ' पासून 'च्' पर्यंत वर्णसमुदाय, 'ह्' पासून 'ल्' पर्यंत वर्णसमुदाय असा लक्षणेनेंच किंवा वर सांगितल्याप्रमाणें शक्त्यनुमानानेंच अर्थ केल्यानें सर्व उपपत्ति लागू शकत असल्यामुळें, 'आदिरन्त्येन सहेता' हें सूत्र असण्याची कांहींच गरज नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं. एखाद्या सूत्रांतील (किंवा वार्तिकांतील) पदाचा अर्थ करण्याकरितां लक्षणा किंवा शक्त्यनुमान यांचा जरी उपयोग केला असला तरी, सर्वत्र त्यांचा उपयोग करून सूत्रार्थ करावा असा कोठेंहि नियम नाहीं, आणि 'पङ्क्तिविंशति' सू. ५-१-५९ या सूत्रावरील भाष्यांत 'नासूया कर्तव्या यत्रानुगमः क्रियते' असें भाष्यकारांनीं म्हटलें आहे. (त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात– 'इमे विंशत्यादयः सप्रकृतिकाः सप्रत्ययकाश्च निपात्यन्ते, तत्र न ज्ञायते का प्रकृतिः, कः प्रत्ययः, कः प्रत्ययार्थ इति । तत्र वक्तव्यमियं प्रकृतिरयं प्रत्ययोऽयं प्रत्ययार्थ इति । इमे ब्रूमो, द्विशब्दादयं दशदर्था-

भिधायिनः स्वार्थे शतिच्प्रत्ययो निपात्यते विन्भावश्च । द्वौ दशती विंशतिः ।' अशा रीतीनें त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या शब्दांचा प्रकृतिप्रत्ययरूप विभाग करून दाखविल्यावर, तें सूत्र आरंभिण्याची कांहींच गरज नव्हती या अर्थाचें 'अनारम्भो वा प्रातिपदिकविज्ञानाद्यथा सहस्रादिषु' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतातः–'अनारम्भो वा पुनर्विंशत्यादीनां न्याय्यः । कथं सिद्ध्यति ? । प्रातिपदिकविज्ञानात् । कथं प्रातिपदिकविज्ञानम् ? । विंशत्यादयोऽव्युत्पन्नानि प्रातिपदिकानि । यथा सहस्रादिषु । तद्यथा–सहस्रमयुतमर्बुदमिति, नचानुगमः क्रियते, भवति चाभिधानम् ।' पुढें पाणिनीनें तें सूत्र आरंभिणेंच योग्य होतें याचें समर्थन करितांना भाष्यकार म्हणतातः–'यथा सहस्रादिष्विव्त्युच्यते, –अथ सहस्रादिष्वपि कथं भवितव्यम्,–सहस्रं गवां, सहस्रं गावः, सहस्रगवं, गोसहस्रमिति ? । यावताऽत्रापि सन्देहो, नासूया कर्त्तव्या यत्रानुगमः क्रियते ।' या भाष्यांतील 'नासूया कर्त्तव्या यत्रानुगमः क्रियते' या पंक्तीचा कैयटानें 'अननुगमो हि दोषाय । अशक्यो वानन्त्यात् सर्वशब्दानुगमः । नत्वनुगम एव स्वप्रज्ञापराधादशक्यार्थविशेषनिश्चयत्वाद्दोषत्वेनोद्भावनीय इत्यर्थः' असा अर्थ केला आहे व याच अर्थाचे भैरवीकारांनी 'प्रकृतिप्रत्ययोरानन्त्येन शब्दानां साधुत्वज्ञानं न सम्भवति, तत्र केषाञ्चिच्छब्दानां साधुत्वमाचार्येण प्रतिपादितम्, पङ्क्तिविंशति इत्यादिना, शब्दानामानन्त्यात्सर्वेषां तन्न सम्भवतीति तथा न कृतम्, नह्येतावताऽऽचार्यस्य दोष इति' अशा रीतीनें स्पष्टीकरण केलें आहे. सारांश त्या पंक्तीचा तात्पर्यार्थ असा आहे कीं, भाषेंत रूढ असलेल्या शब्दांच्या अर्थाचें यथार्थ ज्ञान होण्याकरितां व ते शब्द साधु आहेत असा निश्चित बोध होण्याकरितां प्रत्येक शब्दाची प्रकृति कोणती, त्या प्रकृतीहून कोणता प्रत्यय झाला आहे, व तो कोणत्या अर्थामध्यें झाला आहे हें ज्ञान असणें जरी इष्ट आहे तरी, भाषेंत अनन्त शब्द असल्यामुळें आचार्य पाणिनीनें त्या

सर्व शब्दांचें असें व्याख्यान न करितां कांहीं शब्दांचेंच असें व्याख्यान जरी केलें आहे तरी ज्या शब्दांचें पाणिनीनें प्रकृतिप्रत्ययविभागरूपानें व्याख्यान केलें नाहीं, म्हणजेच अनुगम केला नाहीं, व ते शब्द निपातनरूपानें सूत्रांत पठित केले आहेत त्याबद्दल आचार्य पाणिनीला दोष देतां येत नाहीं. हा न्याय प्रकृत स्थलीं लावल्यास, असा अर्थ निष्पन्न होतो कीं, 'स्मपुरा' या स्थलीं 'आदिरन्त्येन सहेता' हें सूत्र लागू पडत नसल्यामुळें व अशा अडचणींच्या स्थलीं लागू पडणारें पाणिनीनें कोणतेंहि सूत्र केलें नसल्यामुळें, जरी कैयटानें 'स्मपुरा' या शब्दांचा पूर्वीं सांगितल्याप्रमाणें लक्षणेनें अर्थ केला आहे तरी, ज्या ठिकाणीं तें सूत्र लागू पडतें तशा ठिकाणीं लक्षणेचा किंवा शक्त्यनुमानाचा उपयोग करणें अयोग्य आहे. अशा ठिकाणीं देखील लक्षणेचा किंवा शक्त्यनुमानाचा उपयोग केल्यास, 'आदिरन्त्येन सहेता' हें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. सारांश पाणिनीनें 'आदिरन्त्येन सहेता' हें सूत्र केलें असल्यामुळें, जरी तें सूत्र जेथें लागू पडत नाहीं तेथें लक्षणादिकांनीं अर्थ करून काम भागवावें लागतें तरी, जेथें तें सूत्र लागू पडतें तेथें त्या सूत्रान्वयेंच अर्थ करणें योग्य आहे; कारण शब्दांच्या अभिधाशक्तीनें त्यांच्या अर्थाचा बोध व्हावा याकरितां व्याकरणशास्त्र निर्माण केलें असल्यामुळें, सर्वत्र लक्षणादिकांचा उपयोग करणें योग्य नाहीं.)

शब्दरत्न– **तस्मात्करिष्यमाणशक्तिग्रहोपायकपदस्य तदभिप्रायेणाचार्यस्य पूर्वमप्रयोग इत्येव कल्पना ज्यायसी, ध्वनितश्चायमर्थो "नाऽऽज्झलौ" इति सूत्रेऽष्टादशानां ग्रहणाभावाय "वर्णानामुपदेशस्तावत्, उपदेशोत्तरकालेत्सञ्ज्ञा, इत्सञ्ज्ञोत्तरकाला प्रत्याहारः, प्रत्याहारोत्तरकाला सवर्णसञ्ज्ञा, तदुत्तरमणुदिदिति सवर्णग्राहकमित्येतेन समुदितेनान्यत्र सवर्णानां ग्रहणं भवति न स्वस्मिन्नापि स्वाङ्गे" इत्येवं वाक्यापरिसमाप्तिप्रतिपादकभाष्येणापि । अन्यथा तत्तच्छास्त्रप्रणयनानुपपत्त्या पाणिनेस्तथाज्ञानस्य पूर्वमपि सत्त्वेनाचार्येण तथाप्रयोगे, बोध्दृ-**

णामपि क्रमेण तथाबोधे उपपन्ने किं तेन कृतं स्यात्, कथं वा नाऽज्झलावित्यत्राष्टादशादीनां ग्रहणवारणं भाष्योक्तं सङ्गतं स्यादिति विभाव्यतां तदाह–तस्मादिति ।

म्हणून ज्या पदाच्या अर्थाचा अभिधाशक्तीनें बोध होण्याकरितां आचार्य पाणिनीनें पुढें शक्तिग्राहक उपाय सांगितला आहे त्या पदाचा त्यानें पूर्वीं ज्ञात असलेल्या अर्थामध्यें स्वरचित सूत्रांत उपयोग केला नाहीं, हेंच मानणें अधिक उचित ठरतें. (सारांश अन्तिम शिवसूत्रांतील लकाराची इत्संज्ञा साधल्यावर व नंतर 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्राच्या सहायानें हल् प्रत्याहार साधल्यावरच, 'हल्' या पदाचा अर्थ 'व्यञ्जन' आहे असें ज्ञात होत असल्यामुळें, तें शक्तिग्राहक–अर्थबोध करून देणारें–सूत्र प्रवृत्त करण्यापूर्वींच, 'हल्' या पदाचा 'व्यञ्जन' असा अर्थ करणें अयोग्य आहे. आतां, इत्संज्ञा सिद्ध झाल्यानंतरच प्रत्याहार साधतां येतात व प्रत्याहार साधल्यानंतरच त्या प्रत्याहारांच्या अर्थाचा बोध होऊं शकतो हें सिद्ध करण्याकरितां, शब्दरत्नकार पुढील पंक्तींत 'नाज्झलौ' १-१-१० या सूत्रावरील भाष्याचें प्रमाण देतात.) हाच अर्थ 'नाज्झलौ' या सूत्रावरील वाक्यापरिसमाप्तिन्यायप्रतिपादक भाष्यांत देखील ध्वनित केला आहे. 'नाज्झलौ' या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अच्' या प्रत्याहारानें त्या प्रत्याहारांत अन्तर्भूत असलेल्या अ,इ,उ,ऋ या वर्णांच्या अठराहि प्रकारच्या सवर्णांचें ग्रहण होऊं नये याकरितां, भाष्यकारांनीं त्या भाष्यांत असें म्हटलें आहे कीं, प्रथम वर्णांचा उपदेश केला आहे. उपदेशोत्तरकालीं इत्संज्ञा सिद्ध झाल्यावर 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्रान्वयें प्रत्याहार सिद्ध होतात. प्रत्याहार सिद्ध झाल्यानंतर सवर्णसंज्ञा होते आणि सवर्णसंज्ञा सिद्ध झाल्यानंतर 'अणुदित्सवर्णस्य' या सूत्रानें सवर्णांचें ग्रहण होतें. या सर्व पोटवाक्यांनीं युक्त अशा महावाक्यानें एतद्व्यतिरिक्त स्थलीं सवर्णांचें ग्रहण होतें. (पण अशा क्रमानें बोधित झालेला 'अण्' जरी इतर सूत्रांत सवर्णांचा ग्राहक होतो तरी) 'अणुदित्' या सूत्रांतील 'अण्

व तसेंच तदङ्गभूत 'नाज्झलौ' या सूत्रांतील अण्प्रत्याहारांत अन्तर्भूत असलेला अच् सवर्णाचा ग्राहक होत नाहीं. (अनेक पोटवाक्यांनीं बनलेल्या मोठ्या वाक्याला महावाक्य असें म्हणतात. अशा महावाक्यांत एक पोटवाक्य प्रधान असून इतर पोटवाक्यें त्याचीं अङ्गभूत असतात. अङ्गभूत पोटवाक्यांचा अर्थ निश्चित झाल्याशिवाय मुख्य पोटवाक्याच्या अर्थाची परिसमाप्ति किंवा पूर्णता होत नाहीं, म्हणजे त्या मुख्य पोटवाक्याच्या अर्थाचा निश्चित बोध होऊं शकत नाहीं, आणि म्हणूनच याला वाक्यापरिसमाप्तिन्याय असें नांव दिलें आहे व या न्यायाचें लक्षण असें आहे कीं, महावाक्याचा अर्थ पूर्णपणें निश्चित होईपर्यंत त्या महावाक्यांत सांगितलेल्या विधानांचा उपयोग करतां येत नाहीं. आतां 'हलन्त्यम्' या सूत्राची प्रवृत्ति करण्याकरितां त्या सूत्राला ज्यांत वर्णांचा निर्देश केला आहे त्या माहेश्वरसूत्रांची गरज आहे आणि अशा रीतीनें माहेश्वरसूत्रें 'हलन्त्यम्' या सूत्राचे अङ्ग ठरतात. 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्रांतील 'अन्त्येन इता' या पदांचा अर्थ बोधित करणारें 'हलन्त्यम्' हें सूत्र असल्यामुळें, 'हलन्त्यम्' हें वाक्य 'आदिरन्त्येन सहेता' याचें अङ्गभूत ठरतें. त्याचप्रमाणें, 'अणुदित्सवर्णस्य' या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अण्' या पदाचा आणि तसेंच 'नाज्झलौ' या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अच्' व 'हल्' या पदांचा अर्थ बोधित करणारें 'आदिरन्त्येन सहेता' हें सूत्र असल्यामुळें, तें सूत्र त्या दोन्ही सूत्रांचें अङ्गभूत ठरतें. तसेंच 'अणुदित्सवर्णस्य' या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'सवर्ण' या पदाचा अर्थ बोधित करणारीं 'तुल्यास्य प्रयत्नं सवर्णम्' व 'नाज्झलौ' हीं सूत्रें असल्यामुळें, तीं दोन्हीं सूत्रें 'अणुदित्सवर्णस्य' या सूत्राचीं अङ्गभूत ठरतात. वर निर्दिष्ट केलेल्या सर्व सूत्रांचें जें एक महावाक्य तयार होतें त्यांत 'अणुदित्सवर्णस्य' हें पोटवाक्य मुख्य आहे व बाकीच्या पोटवाक्यांत परस्परांमध्यें अङ्गाङ्गिभावसंबंध असून तीं सर्व पोटवाक्यें 'अणुदित्सवर्णस्य' या सूत्राचीं अङ्गभूत ठरतात.

जोपर्यंत या अङ्गभूत सूत्रांचा अर्थ निश्चित होत नाहीं तोपर्यंत 'अणुदित्सवर्णस्य' या मुख्य पोटवाक्याचा–सूत्राचा–अर्थ निश्चित होऊं शकत नाहीं. तो अर्थ निश्चित होण्याकरितां, प्रथम वर्णोपदेश, नंतर इत्संज्ञा, नंतर प्रत्याहारसिद्धि, नंतर सवर्णसंज्ञा, आणि अखेरीस सवर्णांचें ग्रहण असा भाष्यकारांनीं क्रम आंखून दिला आहे. या क्रमावरून हें स्पष्ट होतें कीं, प्रथम इत्संज्ञा झाल्यानंतरच प्रत्याहार सिद्ध होऊं शकतात व त्या प्रत्याहारांच्या अर्थाचा बोध होऊं शकतो. असा भाष्यकारांनीं क्रम सांगितला असल्यामुळें, पाणिनीनें 'हलन्त्यम्' या सूत्रांत 'हल्' या पदाचा पूर्वीं ज्ञात असलेल्या 'व्यञ्जन' या अर्थामध्यें उपयोग केला आहे हें मानणें अयोग्य ठरतें. पहिल्यानें शिवसूत्रांतील अन्त्य लकाराची इत्संज्ञा सिद्ध केल्यावर आणि नंतर 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्राच्या सहायानें 'हल्' प्रत्याहार साधल्यावरच, 'हल्' या पदाच्या अर्थाचा निश्चित बोध होऊं शकतो. म्हणून द्वन्द्वसमास करतेवेळीं 'हल् च ल् च' या द्वन्द्वसमासांतील 'हल्' या प्रथम पदाच्या अर्थाचें निश्चित ज्ञान नसल्यामुळें आणि अशा रीतीनें येथें सहविवक्षा नसल्यामुळें, तसा द्वन्द्वसमास करणें व तसें करून 'हलन्त्यम्' या सूत्राचा अर्थ करणें योग्य नाहीं आणि त्या सूत्राची द्विरावृत्ति करून जसा त्या सूत्राचा कौमुदींत अर्थ केला आहे तसाच अर्थ करणें इष्ट आहे हें शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे. वर सांगितलेला अर्थ दृढ करण्याच्या हेतूनें शब्दरत्नकार पुढील पंक्ति लिहितात.) पाणिनीनें पदार्थबोध होण्याकरितां जीं शक्तिग्रहोपायक सूत्रें रचलीं आहेत तीं सूत्रें त्याला त्या त्या पदांच्या अर्थाचें ज्ञान पूर्वीं असल्याशिवाय रचणें असंभवनीय असल्यामुळें, त्याला त्या पदांच्या अर्थाचें ज्ञान तशीं सूत्रें रचण्यापूर्वीं असलेंच पाहिजे व त्यानें त्याला पूर्वीं ज्ञात असलेल्या अर्थामध्यें त्या पदांचा अष्टाध्यायींत उपयोग केला आहे असें मानल्यास, ज्या अर्थामध्यें त्या पदांचा पाणिनीनें उपयोग केला आहे तो अर्थ बोद्धयाला–पाणिनीय सूत्राध्ययन

करणाऱ्याला–देखील उपदेशादिक्रमानें ज्ञात होऊं शकत असल्यामुळें, त्या पदांचा, म्हणजे 'हल्' इत्यादि पदांचा, अभिधाशक्तीनें अर्थबोध होण्याकरितां पाणिनीनें जीं ('आदिरन्त्येन सहेता' इत्यादि) शक्ति-ग्रहोपायक–अर्थबोध करून देणारीं–सूत्रें रचण्याची खटपट केली आहे ती खटपट करून त्यानें अधिक काय मिळविलें, किंवा 'नाज्झलौ' या सूत्रांत अठराहि प्रकारच्या अणांचें ग्रहण न व्हावें याकरितां भाष्यकारांनीं जें व्याख्यान केलें आहे तें सुसङ्गत कसें ठरूं शकणार, या संबंधानें ('हल् च ल् च' असा द्वन्द्वसमास करून त्यायोगानें 'हल-न्त्यम्' या सूत्राचा अर्थ करणाऱ्या द्वन्द्ववादी व्याख्यात्यांनीं) विचार करावा. (सारांश पाणिनीनें त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या प्राचीन वैयाकरणांनीं ज्या अर्थामध्यें 'हल्' इत्यादि पदांचा उपयोग केला आहे त्याच, त्याला पूर्वी ज्ञात असलेल्या, अर्थामध्यें अष्टाध्यायींत त्यानें उपयोग केला आहे असें मानल्यास, त्यानें जीं शक्तिग्रहोपायक सूत्रें मुद्दाम रचलीं आहेत तीं सर्व सूत्रें व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते व भाष्यकारांनीं इत्संज्ञा सिद्ध झाल्यावरच प्रत्याहारसिद्धि करावी इत्यादि जो क्रम सांगितला आहे तो क्रम निष्प्रयोजनक ठरण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टळण्याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं पाणिनीनें 'हल्' इत्यादि पदांचा पूर्वी ज्ञात असलेल्या अर्थामध्यें उपयोग केला नसून, त्यानें जीं शक्तिग्रहोपायक सूत्रें रचलीं आहेत तीं सूत्रें प्रवृत्त केल्यानें पुढें निष्पन्न होणाऱ्या अर्थामध्येंच त्यांचा उपयोग केला आहे. असें मानलें म्हणजे, 'हल् च ल् च' असा द्वन्द्वसमास करतेवेळीं त्या द्वन्द्वसमासांतील प्रथम 'हल्' या पदाच्या अर्थाचें ज्ञान नसल्यामुळें व अशा रीतीनें सहविवक्षा नसल्यामुळें, तसा द्वन्द्वसमास करणें व त्यायोगानें 'हलन्त्यम्' या सूत्राचा अर्थ करणें साधु ठरत नाहीं हें उघड आहे.) वर सांगितलेल्या सर्व गोष्टी मनांत धरूनच, दीक्षितांनीं 'तस्माद्यथोक्तमेव न्याय्यम्' म्हणजे 'हलन्त्यम्' या सूत्राचा द्वन्द्ववादीनें जशा रीतीनें अर्थ केला आहे तशा रीतीनें

त्या सूत्राचा अर्थ न करितां त्या सूत्राची द्विरावृत्ति करून कौमुदींत जशा रीतीनें त्या सूत्राचा अर्थ केला आहे तशाच रीतीनें अर्थ करणें न्याय्य आहे असें मनोरमेंत म्हटलें आहे.

मनोरमा– मध्यगानामिति। आद्यन्ताभ्यामवयवाभ्यामवयवी समुदाय आक्षिप्यते, तस्य च युगपल्लक्ष्ये प्रयोगाभावात्तदवयवेऽवतरन्ती सञ्ज्ञा मध्यगेषु विश्राम्यति, न त्वाद्यन्तयोः, संज्ञास्वरूपान्तर्भाविण तयोः पारार्थ्यनिर्णयादिति भावः। स्वस्य चेति। "स्वं रूपम्" इत्यनुवृत्तेः। स्वं रूपं चादेरेव गृह्यते नान्त्यस्य, अन्त्येनेत्यप्रधानतृतीयानिर्देशात्, सर्वनाम्नामुत्सर्गतः प्रधानपरामर्शित्वात्।

('आदिरन्त्येन सहेता' सू. २ या सूत्रांत 'आदि' व 'अन्त्य' या दोन अवयववाचक शब्दांचा उपयोग केला असल्यामुळें व अवयव अवयवीशिवाय राहणें असंभवनीय असल्यामुळें, 'येन विना यदनुपपन्नं तत्तेनाक्षिप्यते' या न्यायान्वयें) आद्यन्त अवयवांनीं अवयवी जो समुदाय त्यांचा आक्षेप होतो, म्हणजे त्याचें ग्रहण होतें. तशा संपूर्ण समुदायाचा कोणत्याहि उदाहरणांत एकेचवेळीं प्रयोग आढळणें अशक्य असल्यामुळें ('प्रत्येकं वाक्यपरिसमाप्तिः'– परि. ११६ या न्यायान्वयें) अवयवांना लागू पडणारी ती संज्ञा समुदायांतील मध्य वर्णांनाच लागू पडते, म्हणजे आद्यन्त वर्णांना ती संज्ञा न होतां त्या दोन वर्णांच्या मध्यें जे वर्ण असतात त्यांनांच ती संज्ञा लागू पडते; कारण त्या आद्यन्त वर्णांचा संज्ञेचें रूप साधण्यामध्यें उपयोग करण्याकरितांच उच्चार केला असल्यामुळें व अशा रीतीनें ते परार्थ ठरत असल्यामुळें, म्हणजे दुसऱ्याचा बोध करून देण्यांतच उपयोगी पडत असल्यामुळें, ते संज्ञी होऊं शकत नाहींत (व संज्ञा सिद्ध करून देण्याचें आपलें काम त्यांनीं करून दिल्यावर ते आद्यन्त वर्ण निवृत्त होतात व त्यामुळें मध्यवर्णच संज्ञी होतात. 'इको यणचि' या सूत्रांत 'इक्, यण्, अच्' या तीन प्रत्याहारांचा निर्देश केला आहे. जर त्या तीन

प्रत्याहारांनीं संपूर्ण इक्समुदाय, यण्समुदाय व अच्समुदाय यांचें ग्रहण केलें तर, कोणत्याहि उदाहरणांत सर्व इकांपुढें सर्व अच् येणें असंभवनीय असल्यामुळें, तें सूत्र कोठेंहि उपयोगांत आणतां येणार नाहीं व व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल आणि म्हणूनच दीक्षितांनीं म्हटलें आहे कीं, समुदायास संज्ञा न होतां त्या समुदायाचे घटक जे वर्ण आहेत त्यांपैकीं आद्यन्त दोन वर्ण खेरीज करून बाकीच्या प्रत्येक वर्णास ती संज्ञा होते. पण अशा रीतीनें समुदायांतील आद्य अवयव जर वगळला तर, 'इक्' यांतील इकारास इक् संज्ञा व 'अच्' यांतील अकारास अच्संज्ञा होणार नाहीं व त्यामुळें इकारापुढें अकार आल्यास, इकाराचे जागीं यकारादेश होणार नाहीं. ही आपत्ति टळावी म्हणून दीक्षित म्हणतात कीं, 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्रांत) 'स्वं रूपं शब्दस्य' या पूर्व सूत्रांतून 'स्वम्' हें पद अनवृत्त होत असल्यामुळें, (त्या पदाचा 'स्वस्य' असा षष्ठीविभक्तींत विपरिणाम केल्यानें) 'मध्यगानां स्वस्य च संज्ञा स्यात्' असें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे (व तशा अनुवृत्तीमुळें वर दाखविलेली आपत्ति टळते. परंतु अशा रीतीनें अनुवृत्ति केल्यास, जे दोन आद्यन्त वर्ण मिळून प्रत्याहार सिद्ध होतो, म्हणजे अच्, इक् इत्यादि संज्ञा सिद्ध होतात, त्या दोन्ही वर्णांचे 'स्वस्य' या शब्दानें ग्रहण होईल व त्यामुळें 'अच्' ही संज्ञा जशी आद्य अकारास होते तशी ती अन्त्य चकारास देखील होईल व चकार देखील अच् ठरण्याची आपत्ति येईल. त्या आपत्तीचें निवारण करण्याकरितां दीक्षित म्हणतात कीं) 'स्वस्य' या अनुवृत्त पदानें संज्ञेंतील आद्य वर्णाचेंच ग्रहण होतें, अन्त्य वर्णाचें ग्रहण होऊं शकत नाहीं; कारण 'आदिरन्त्येन सहेता' या प्रकृत सूत्रांत 'अन्त्येन' असा अप्रधान तृतीयाविभक्तीचा निर्देश केला आहे व सर्वनामानें वाक्यांतील प्रधान शब्दाचाच परामर्श होत असतो, म्हणजे ग्रहण करतां येतें, असा सामान्य नियम आहे. (त्यामुळें 'स्वम्=स्वस्य' या सर्वनामानें 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्रांतील अप्रधानतृतीया-

विभक्तिनिर्दिष्ट अन्त्य वर्णाचें ग्रहण न होतां, 'आदिः' या प्रधान प्रथमाविभक्तिनिर्दिष्ट आद्य वर्णाचेंच ग्रहण होतें आणि म्हणून अच् इत्यादि प्रत्याहारांनीं 'च्' इत्यादि अन्त्य वर्णांचें ग्रहण होत नाहीं, व अशा रीतीनें वर दाखविलेली आपत्ति टळते.)

शब्दरत्न– आद्यन्ताभ्यामिति। अवयवत्वेन बोधकाद्यन्तशब्दाभ्यामित्यर्थः। तस्येति। समुदायस्य। तयोः पारार्थ्येति। सञ्ज्ञास्वरूपबोधकतया शक्तिग्रहकाले एव तयोः पारार्थ्यनिर्णयादित्यर्थः। परामर्शितत्वादिति। वस्तुतो ज्ञापकादिनाऽस्यापि न संज्ञाकार्यम्, आद्यन्तशब्दाभ्यामाद्यन्तघटितसमुदायस्याक्षेपेणान्येषामिव तयोः प्राप्तायाः सञ्ज्ञायाः प्रकारान्तरेणाशक्यवारणत्वात्। स्वशब्दानुवृत्तेश्च न फलम्। भाष्येऽपि एतत्फलितार्थकथनमेव स्वस्य च रूपस्येति। सञ्ज्ञा स्वरूपत्वं विशिष्टस्यास्तु, प्रत्येकं स्वबोध्यत्वं चास्तु को विरोधः। यथा "अच्च घेः" इत्यादौ गुणदर्शनेन घिशब्दस्यापि घिसञ्ज्ञाबोध्यत्वं तद्वदेवाजादिसञ्ज्ञा स्वसञ्ज्ञिघटकेकारादिष्विवाकारचकारयोरपि प्राप्नोत्येव। किं च स्वशब्देन केवलान्त्यपरामर्शासम्भवेऽपि विशिष्टपरामर्शो न बाधकम्, तत्र समुदाये फलाभावादवयवयोर्विश्रान्तिं प्राप्स्यति। तस्माज् ज्ञापकादिनैवान्त्यस्य तत्कार्यं वारणीयमित्यलम्।

मनोरमेंतील 'आद्यन्ताभ्याम्' या शब्दांतील 'आदि' व 'अन्त्य' या शब्दांनीं अवयववाचक आदि व अन्त्य वर्ण यांचें ग्रहण होतें. 'तस्य च युगपल्लक्ष्ये प्रयोगाभावात्' या मनोरमेच्या पंक्तींतील 'तस्य' या पदाचा 'समुदायस्य' असा अर्थ आहे. मनोरमेंत 'तयोः पारार्थ्यनिर्णयात्' असें जें म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, आद्यन्त वर्ण संज्ञेच्या स्वरूपाचे बोधक असल्यामुळें, म्हणजे केवळ संज्ञा तयार करून देण्याच्या कामीं ते वर्ण उपयोगी पडत असल्यामुळें, संज्ञेचा अर्थ करतेवेळींच ते आद्यन्त वर्ण परार्थ आहेत असा निश्चित बोध होतो; (कारण 'संज्ञा संज्ञिनं बोधयति न तु संज्ञास्वरूपमपि' असा न्याय असल्यामुळें, अच् इक् इत्यादि शब्दांनीं संज्ञा तयार करून देणाऱ्या आद्यन्त वर्णांचें ग्रहण न होतां केवळ मध्यग वर्णांचेंच ग्रहण

होतें. आद्य वर्णाचें जें ग्रहण होतें तें प्रकृत सूत्रांत 'स्वस्य' या पदाची अनुवृत्ति केल्यानेंच होतें. पण दीक्षितांनीं प्राचीन वैयाकरणांच्या मताला अनुसरून जें वर सांगितल्याप्रमाणें प्रकृत सूत्राचें व्याख्यान केलें आहे तें व्याख्यान शब्दरत्नकारांस मान्य नसल्यामुळें, शब्दरत्नकार असें म्हणतात कीं, 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्रांतील 'आदि' व 'अन्त्य' या अवयववाचक शब्दांनीं आद्यन्तवर्णघटित समुदायांतील प्रत्येक वर्णाला संज्ञा प्राप्त होते व त्यामुळें ती जशी मध्यग वर्णांना होते तशीच आद्यन्त वर्णांना देखील होते. ती संज्ञा आदि वर्णाला होणें इष्ट असून, अन्त्य वर्णाला होणें इष्ट नाहीं. म्हणून) वास्तविक ज्ञापकादिकांच्या आधारेंच आद्यन्तवर्णघटित समुदायांतील अन्त्य वर्णाला प्राप्त होणाऱ्या संज्ञेचें देखील निवारण केलें पाहिजे; कारण प्रकृत सूत्रांतील 'आदि' व 'अन्त्य' या शब्दांनीं तशा आद्यन्तवर्णघटित समुदायाचा आक्षेप होत असल्यामुळें, जशी ती संज्ञा मध्यग वर्णांना प्राप्त होते तशीच ती आद्यन्त वर्णांना देखील प्राप्त होते, आणि ज्याप्रमाणें इतर मध्यग वर्णांना, म्हणजे णकार, ककार इत्यादि इत्संज्ञक मध्यग वर्णांना, प्राप्त होणाऱ्या संज्ञेचे ज्ञापकाच्या आधारें निवारण केलें जातें त्याचप्रमाणें त्या दोन आद्यन्त वर्णांपैकीं अन्त्य वर्णाला प्राप्त होणाऱ्या संज्ञेचें निवारण ज्ञापकाखेरीज इतर कोणत्याहि उपायानें करणें शक्य नाहीं. (अच् प्रत्याहारानें इत्संज्ञक मध्यग वर्ण जो ककार आहे त्याचें देखील प्रकृत सूत्रान्वयें ग्रहण होऊं पाहतें. पण 'उपदेशेऽजनुनासिक इत्' या सूत्रांत 'अनुनासिकः' या शब्दाचा निर्देश केला असल्यामुळें त्या निर्देशानें हें ज्ञापित होतें कीं, अच् प्रत्याहारानें इत्संज्ञक मध्यग वर्ण जो ककार आहे त्याचें ग्रहण होत नाहीं. तसें ग्रहण झालें असतें तर, ककाराला अच् संज्ञा होऊन 'इको यणचि' सू. ४७ या सूत्रान्वयें 'अनुनासिकः' या स्थलीं 'सि' यांतील इकारापुढें ककार आला असल्यामुळें त्या इकाराचे जागीं यकारादेश झाला असता, व

'लोपो व्योर्वलि' सू. ८७३ या सूत्रानें त्या यकाराचा लोप होऊन 'अनुनास्कः' असें रूप झालें असतें व पाणिनीनें तशा रूपाचा त्या सूत्रांत निर्देश केला असता. परंतु तशा रूपाचा निर्देश न करितां 'अनुनासिकः' अशा रूपाचा पाणिनीनें निर्देश केला असल्यामुळें, त्या ज्ञापकाच्या आधारें 'प्रत्याहारेषु इतां न ग्रहणम्' हें सिद्ध होतें. शब्दरत्नकार म्हणतात कीं, हें जसें ज्ञापकाच्या आधारें सिद्ध केलें जातें त्याचप्रमाणें प्रत्याहारांतील अन्त्य वर्णाला संज्ञा होत नाहीं हें देखील ज्ञापकाच्या आधारेंच सिद्ध केलें पाहिजे; कारण ज्ञापकाच्या आधाराशिवाय अन्त्य वर्णास प्राप्त होणाऱ्या संज्ञेचें इतर कोणत्याहि रीतीनें निवारण करणें शक्य नाहीं व तें ज्ञापक 'एचोऽयवायावः' सू. ६१ हें सूत्र मानतां येतें. 'एच्' ही संज्ञा वास्तविक 'ए, ओ, ऐ, औ' या वर्णांना होते. ती संज्ञा व तसेंच 'अच्' ही संज्ञा जर अन्त्य चकारास देखील होते असें मानलें तर, त्या सूत्रांतील 'एचः' या पदांत 'ए' च्या पुढें चकार आला असल्यामुळें त्या 'ए' च्या जागीं त्या सूत्रान्वयें अयादेश झाला पाहिजे. पण तसा अयादेश न करितां पाणिनीनें 'एचः' असा निर्देश केला असल्यामुळें, त्या ज्ञापकाच्या आधारें हें ज्ञापित होतें कीं, प्रत्याहारांतील अन्त्य वर्णास त्या प्रत्याहारानें प्राप्त होणारी संज्ञा होत नाहीं. सारांश प्रत्याहारांतील अन्त्य वर्णाला प्राप्त होणाऱ्या संज्ञेचें निवारण करण्याकरितां 'तयोः पारार्थ्यनिर्णयात्' व 'सर्वनाम्नः उत्सर्गतः प्रधानपरामर्शित्वात्' असे जे दीक्षितांनीं मनोरमेंत हेतु दिले आहेत ते बरोबर नसून, वर सांगितल्याप्रमाणें अन्त्य वर्णाला प्राप्त होणाऱ्या संज्ञेचें निवारण ज्ञापकाच्याच आधारें केलें पाहिजे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) प्रकृत सूत्रांत दीक्षितांनीं 'स्वं रूपं शब्दस्य' या पूर्व सूत्रांतून जी 'स्वम्' या शब्दाची अनुवृत्ति केली आहे तशी अनुवृत्ति करून कोणतेंहि अधिक फल निष्पन्न होत नाहीं. (कारण समुदायघटक आद्यन्तवर्णांनीं जसें मध्यग वर्णांचें ग्रहण होतें तसेंच आद्यन्त वर्णांचें

देखील ते समुदायाचे अवयव असल्यामुळें ग्रहण होतेंच. म्हणून आद्य वर्णांचें ग्रहण होण्याकरितां 'स्वं रूपं शब्दस्य' या पूर्व सूत्रांतून 'स्वम्' या शब्दाची अनुवृत्ति करण्याची कांहींच गरज नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. येथें अशी शंका करण्यांत येते कीं, 'स्वस्य च रूपस्य' असें प्रकृत सूत्रावरील भाष्यांत म्हटलें असल्यामुळें त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, भाष्यकारांनीं प्रकृत सूत्रांत पूर्व सूत्रांतून 'स्वम्स्वस्य' या पदाची अनुवृत्ति केली आहे. म्हणून तशी अनुवृत्ति न करितां शब्दरत्नांत जसें व्याख्यान केलें आहे तसें व्याख्यान करणें भाष्य विरुद्ध ठरतें. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, प्रकृत सूत्रावरील) भाष्यांत देखील 'स्वस्य च रूपस्य' असें जें म्हटलें आहे तें केवळ वर सांगितल्याप्रमाणें निष्पन्न होणाऱ्या अर्थाचेंच प्रतिपादन करणारें वचन आहे. (त्या भाष्यांत १-१-७१ भाष्यकार म्हणतात:– 'आदिरन्त्य इति सम्बन्धिशब्दावेतौ। तत्र सम्बन्धादेतद्गन्तव्यं यं प्रात्यादिरन्त्य इति च भवति तस्य ग्रहणं भवति स्वस्य च रूपस्येति।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, भाष्यकारांनीं प्रकृत सूत्रांत 'स्वं रूपं शब्दस्य' या सूत्रांतून 'स्वम्' या शब्दाची अनुवृत्ति केली नाहीं व 'स्वस्य च रूपस्य' असें जें म्हटलें आहे त्याचें कारण हेंच कीं, समुदायांतील आद्यन्त वर्णांनी जसें मध्यग वर्णांचें ग्रहण होतें तसेंच आद्यन्त वर्णांचें देखील ग्रहण होतें.) आद्यन्तवर्णयुक्त शब्द, म्हणजे अच्, इक् इत्यादि प्रत्याहार, संज्ञेचें स्वरूप आहे, म्हणजे संज्ञा आहे, व त्या संज्ञेनें तशा आद्यन्त घटितवर्णसमुदायांतील प्रत्येक वर्ण बोध्य आहे, म्हणजे त्या संज्ञेचा संज्ञी आहे, असें मानलें तर कोणता विरोध येतो? (अच्-प्रत्याहारान्तर्गत प्रत्येक वर्ण उद्देश्य ठरून 'अच्' ही वर्णानुपूर्वी विधेय ठरत असल्यामुळें आणि अशा रीतीनें उद्देश्य व विधेय भिन्न असल्यामुळें, प्रकृत स्थलीं अच् हेंच उद्देश्य व अच् हेंच विधेय आहे असें मुळींच म्हणतां येत नाहीं व अशा प्रकारचा दोष येथें देतां येत

नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) ज्याप्रमाणें 'अच्च घेः' सू. २४७ इत्यादि स्थलीं 'घि' हा संज्ञावाचक शब्द असून त्याला गुण केला असल्यामुळें, 'घि' हा शब्द देखील 'घि' या संज्ञेनें बोध्य होतो, म्हणजे त्या संज्ञेचा संज्ञी होतो त्याचप्रमाणें अच् इत्यादि संज्ञा जशी त्या संज्ञेनें बोधित होणाऱ्या अच्प्रत्याहारान्तर्गत-वर्णसमुदायरूप संज्ञीचे इकारापासून औकारापर्यंत जे अवयवरूप मध्यग वर्ण आहेत त्यांना लागू पडते तशीच ती अकार व चकार या आद्यन्त वर्णांना देखील लागू पडतेच. (सारांश अच्प्रत्याहाराचे इकारापासून औकारापर्यंत जे मध्यग वर्ण आहेत तेवढेच वर्ण अच्संज्ञेचे संज्ञी ठरत नसून आद्यन्त अकार व चकार हे संज्ञा साधून देणारे वर्ण देखील त्या संज्ञेचे संज्ञी ठरतात.) दुसरें असें कीं, जरी 'स्व' या सर्वनामशब्दानें केवळ अन्त्य वर्णाचें ग्रहण होणें असंभवनीय आहे तरी त्या सर्वनामानें अच् या आद्यन्तवर्णविशिष्ट समुदायाचें ग्रहण होण्यांत कोणताहि प्रत्यवाय येत नाहीं. समुदायाला तशी संज्ञा केल्यानें कोणतेंहि फल निष्पन्न होत नसल्यामुळें, त्या समुदायाच्या अवयवांना, म्हणजे आद्यन्त व मध्यग वर्णांना, ती संज्ञा होते. म्हणून त्या समुदायांतील अन्त्य वर्णाला प्राप्त होणाऱ्या त्या संज्ञेचें निवारण ज्ञापकादिकांच्या आधारेंच केलें पाहिजे. या विषयासंबंधानें एवढें पुरें. ('अवयवेष्ववतरन्ती संज्ञा मध्यगेषु विश्राम्यति...उत्सर्गतः प्रधान-परामर्शित्वात्' असें जें मनोरमेंत दीक्षितांनीं म्हटलें आहे त्याचें खण्डन करण्याकरितां 'वस्तुतो ज्ञापकादिनाऽस्यापि न संज्ञाकार्यम्... वारणीयमित्यलम्' या पंक्ति शब्दरत्नकारांनीं लिहिल्या आहेत व शब्देन्दुशेखरांत नागेशभट्टांनीं प्रकृत सूत्रावरील टीकेंत याच मताचा अनुवाद केला आहे. त्या ग्रन्थांत नागेशभट्ट म्हणतात—'अत्राद्यन्ताभ्यामवयत्वेन बोधकाभ्यां स्वघटितः समुदाय आक्षिप्तः संज्ञी, तस्य चैकत्र लक्ष्ये प्रयोगाभावात्प्रत्येकं संज्ञित्वम् । अन्त्यस्य तु न तत्कार्यम्, तस्येत्संज्ञालोपाभ्यामपहारात् । एतत्फलितकथनमेव भाष्ये, मूले च—

स्वस्य च रूपस्येति। स्वमित्यनुवृत्तिपरत्वेन व्याख्यानन्तु हेयमेव, अनुवृत्तौ फलाभावात्।' दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, ज्याला संज्ञा केली जाते तें उद्देश्य असून व संज्ञा हें विधेय असून, वाक्यांत उद्देश्य व विधेय एकच नसावींत व भिन्न असलीं पाहिजेत असा नियम असल्यामुळें, ज्याप्रमाणें 'घटो घटः, दण्डवान् दण्डवान्' इत्यादि प्रयोग साधु ठरत नाहींत त्याचप्रमाणें 'अच् अच् स्यात्' हा प्रयोग देखील साधु ठरत नाहीं; कारण या वाक्यांत 'अच्' हें उद्देश्य असून 'अच्' हेंच विधेय आहे व उद्देश्य आणि विधेय एकच असणें हें शास्त्रनियमाविरुद्ध आहे. सारांश दीक्षितांच्या मताप्रमाणें संज्ञा ही कधींहि संज्ञी होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ 'तरप्तमपौ घः' सू. २००३, 'दाधा घ्वदाप्' सू. २३७३ इत्यादि सूत्रांनीं होणाऱ्या 'घ, घु' या संज्ञांचे 'घ, घु' हे केव्हांहि संज्ञी होऊं शकत नाहींत आणि त्याचप्रमाणें 'अच्' या संज्ञेचा देखील 'अच्' हाच संज्ञी होऊं शकत नाहीं. 'अच्' ही संज्ञा प्रकृत सूत्रान्वयें अकार व चकार या दोन आद्यन्त वर्णांनीं बनली आहे व या संज्ञेचा जरी अच् प्रत्याहारान्तर्गत अकारापासून चकारापर्यंत वर्णसमुदायांतील प्रत्येक वर्ण, 'प्रत्येकं वाक्यपरिसमाप्तिः' या न्यायान्वयें संज्ञी ठरूं शकतो तरी, अकार व चकार हे आद्यन्त वर्ण संज्ञा तयार करून देण्यांत खर्ची पडल्यामुळें, ते दोन वर्ण माठरपरिवेषणन्यायान्वयें 'अच्' या संज्ञेचे संज्ञी होऊं शकत नाहींत व त्या प्रत्याहारांतील अवशिष्ट मध्यग वर्णच त्या संज्ञेचे संज्ञी होऊं शकतात. 'सर्वे ब्राह्मणा भोज्यन्तां, माठरकौण्डिन्यौ परिवेविषाताम्' हा माठरपरिवेषणन्याय होय. 'सर्व ब्राम्हणांना जेवूं घालावें' या वाक्यांत माठर व कौण्डिन्य हे ब्राम्हण असल्यामुळें जरी त्यांचा समावेश होतो तरी, त्यांच्याकडे वाढप्याचें काम सोंपविलें असल्यामुळें जसे ते ब्राम्हणांच्या पंक्तींत भोजनास बसूं शकत नाहींत त्याचप्रमाणें संज्ञा तयार करून देण्यांत गुंतलेले व खर्ची पडलेले आद्यन्त अकार व चकार हे वर्ण 'अच्' या संज्ञेचे संज्ञी होऊं

शकत नाहींत व मध्यग वर्णांनाच ती संज्ञा होते. 'वृद्धिरादैच्' १-१-१ या सूत्रावरील भाष्यांत देखील भाष्यकारांनीं असें म्हटलें आहे कीं, 'न च संज्ञाया निवृत्तिरुच्यते। स्वभावतः संज्ञाः संज्ञिनः प्रत्याय्य निवर्तन्ते। तेनानुबन्धानामपि निवृत्तिर्भविष्यति' या भाष्याचा अर्थ असा आहे कीं, संज्ञेची निवृत्ति कोठेंहि सांगितली जात नाहीं. संज्ञा ही स्वभावतःच संज्ञीचें ज्ञान करून दिल्यावर नाहींशी होते. या नियमानुसार अनुबन्ध देखील संज्ञीचें ज्ञान झाल्यावर आपोआपच नाहींसे होतील. या भाष्यानुसार 'अच्' ही संज्ञा संज्ञीचा बोध करून दिल्यावर नाहींशी झाली असतां, ज्या आद्यन्त वर्णांनीं ती संज्ञा तयार झाली आहे ते नाहींसे होणार आणि मग त्या दोन आद्यन्त वर्णांना ती संज्ञा कशी होणार व त्या संज्ञेचे ते कसे संज्ञी ठरूं शकणार? परंतु प्रत्याहारांतील आद्य वर्णाला तर संज्ञा होणें इष्ट आहे, व त्याला ती संज्ञा होण्याकरितां 'स्वं रूपं शब्दस्य' या पूर्व सूत्रांतून 'स्वम्=स्वस्य' या पदाची अनुवृत्ति करणें आवश्यक आहे. त्या अनुवृत्त केलेल्या 'स्वस्य' या सर्वनामसंज्ञक पदानें प्रकृत सूत्रांतील प्रथमा-विभक्तिनिर्दिष्ट 'आदिः' या पदाचेंच ग्रहण होतें व अप्रधान तृतीयाविभक्तिनिर्दिष्ट 'अन्त्येन' या पदाचें ग्रहण होऊं शकत नाहीं व त्यामुळें प्रत्याहारांतील आद्य वर्णाला संज्ञा होते व अन्त्य वर्णाला ती संज्ञा होत नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हें दीक्षितांचें मत शब्दरत्नकारांस मान्य नाहीं. व शब्दरत्नकार असें म्हणतात कीं, संज्ञा केव्हांहि संज्ञी होऊं शकत नाहीं असें जें दीक्षितांचें म्हणणें आहे तें बरोबर नाहीं; कारण 'शेषो घ्यसखि' सूः २४३ या सूत्रानें ऱ्हस्व इकारान्त व उकारान्त शब्दांना जशी घिसंज्ञा होते तशीच ती 'घि' या संज्ञाबोधक ऱ्हस्व इकारान्त शब्दाला देखील होते. त्या शब्दाला ती संज्ञा झाली नसती तर, 'अच्च घेः' सू. २४७ या सूत्रांत 'घेर्ङिति' सू. २४५ या सूत्रानें होणारा गुण पाणिनीनें 'घि' यांतील अन्त्य इकारास केला नसता.

सारांश 'अच्च घेः' या सूत्रांत 'घेः' असा निर्देश असल्यामुळें, संज्ञाबोधक शब्द केव्हांहि संज्ञी होऊं शकत नाहीं हें दीक्षितांचें म्हणणें बरोबर मानतां येत नाहीं आणि त्याचप्रमाणें अच् संज्ञा तयार करून देणारे अकार व चकार हे आद्यन्त वर्ण 'अच्' या संज्ञेचे संज्ञी ठरूं शकत नाहींत हे म्हणणें देखील स्वीकारतां येत नाहीं. प्रकृत स्थलीं अच् ही वर्णानुपूर्वी संज्ञा–विधेय–असून अच्प्रत्याहारान्तर्गत प्रत्येक वर्ण संज्ञी–उद्देश्य–आहे आणि अशा रीतीनें संज्ञा व संज्ञी–विधेय व उद्देश्य–येथें भिन्न आहेत हें पूर्वी सिद्ध केलेंच आहे. म्हणून प्रत्याहारांतील आद्य वर्णास अशा रीतीनें संज्ञा होत असल्यामुळें, त्याला ती संज्ञा प्राप्त करून देण्याकरितां प्रकृत सूत्रांत 'स्वम् स्वस्य' या पदाची अनुवृत्ति करण्याची कांहींच गरज नाहीं. दुसरें असें कीं, प्रकृत सूत्रांत 'स्वम् स्वस्य' या पदाची अनुवृत्ति केली तरी, जरी 'स्वस्य' या सर्वनामसंज्ञक शब्दानें प्रत्याहारांतील केवळ अन्त्य वर्णाचें ग्रहण होऊं शकत नाहीं तरी त्या शब्दानें प्रत्याहार बोधक वर्णसमुदायाचें ग्रहण होण्यांत कोणताहि बाध येत नाहीं, म्हणजे 'अच्' या संज्ञेतील, 'स्वस्य' या पदानें, जरी केवळ अन्त्य चकाराचा परामर्श होऊं शकत नाहीं तरी त्या सर्वनामसंज्ञकशब्दानें 'अच्' या समुदायाचें ग्रहण होण्यांत कोणताहि प्रत्यवाय येत नाहीं आणि 'अच्' या संज्ञेनें अकारापासून चकारापर्यंत असलेला वर्णसमुदाय बोधित होत असल्यामुळें व पूर्वी सांगितल्याप्रमाणें समुदायाला संज्ञा करून कोणतेंहि फल निष्पन्न होत नसल्यामुळें, ती संज्ञा त्या समुदायांतील प्रत्येक वर्णाला 'प्रत्येकं वाक्यपरिसमाप्तिः' या न्यायान्वयें होते. आतां हें खरें कीं, 'अच्' ही संज्ञा जशी आद्य वर्णाला व मध्यग वर्णांना होते तशी ती अन्त्य वर्णाला देखील होऊं पहाते. कारण तो वर्ण देखील आद्य व मध्यग वर्णांसारखा समुदायाचा अवयव आहेच. परंतु प्रत्याहारांतील अन्त्य वर्ण 'हलन्त्यम्' या सूत्रान्वयें इत्संज्ञक असल्यामुळें व 'तस्य लोपः' या सूत्रानें त्याचा

अवश्य लोप होणार असल्यामुळें, त्या अन्त्य वर्णाला पूर्वी सांगितलेल्या ज्ञापकान्वयें ती संज्ञा होत नाहीं. म्हणून दीक्षितांचें म्हणणें स्वीकारार्ह नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा– आद्योच्चारणमिति । यद्यपि 'उपदिश्यतेऽनेन' इति करणव्युत्पत्त्या शास्त्रमुपदेश इति भाष्यवृत्त्यादिषु व्याख्यातम्, तथापि तत्प्रौढिवादमात्रम्, करणे घञो दुर्लभत्वात्, ल्युटा बाधात् । न च घः, असंज्ञात्वात् । 'प्रायेण संज्ञायाम्' इति व्याख्यानस्य क्लिष्टत्वात्, न ह्युपाधेरुपाधिर्भवतीत्यादिना भाष्यकृताऽवहेलनाच्च । अत एव घापवादः "हलश्च" इति घञपीह न । बाहुलकं त्वगतिकगतिः । अत एव 'प्रक्रियन्ते शब्दा याभिः' इति करणव्युत्पत्तिरपि परास्ता । तथा च वार्तिकम् "अजब्भ्यां स्त्रीखलनाः स्त्रियाः खलनौ विप्रतिषेधेन" इति । अतो भावे एव प्रत्ययो न्याय्य इति भावः ।

('आदिरन्त्येन सहेता' सू. २ या सूत्रावरील कौमुदींत 'उपदेश आद्योच्चारणम्' असें जें म्हटलें आहे त्यांतील 'उपदेशः' या स्थलीं 'आद्य' या अर्थाच्या वाचक 'उप' या उपसर्गपूर्वक उच्चारण-क्रियार्थक 'दिश्' धातूहून 'भावे' सू. ३१८४ या सूत्रानें 'सिद्धावस्था-पन्नक्रिया'–पूर्ण झालेली क्रिया–या अर्थामध्यें घञ् प्रत्यय झाला असल्यामुळें) 'उपदेश' या शब्दाचा 'आद्योच्चारण'–उपदेशन–असा अर्थ होतो. जरी भाष्य, काशिकावृत्ति इत्यादि ग्रन्थांत 'उपदिश्यते अनेन' अशा रीतीनें 'करणे घञ्' प्रत्यय करून 'उपदेश' या शब्दाचा 'शास्त्र', म्हणजे सूत्रपाठ धातुपाठ वगैरे, असा अर्थ केला आहे तरी ती केवळ प्रौढोक्ति होय, म्हणजे ती सिद्धान्तोक्ति समजूं नये; कारण 'उपदेशः' या स्थलीं 'करणे' या अर्थामध्यें घञ् प्रत्यय होणें दुर्लभ–अशक्य–आहे ('भावे' या सूत्रानें 'सिद्धावस्थापन्न क्रिया' या अर्थामध्येंच घञ् प्रत्यय होऊं शकतो. इतर अर्थांमध्यें घञ् प्रत्यय होण्याकरितां 'अकर्तरि च कारके संज्ञायाम्' सू. ३१८६ व 'हलश्च' सू. ३३०० हीं दोन सूत्रें आहेत. या दोन्ही

सूत्रांनीं संज्ञेच्या विषयांत, म्हणजे जेथें घञ्प्रत्ययान्त शब्द संज्ञावाचक होत असेल तशाच ठिकाणीं, घञ् प्रत्यय होऊं शकतो. 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक नसल्यामुळें, या स्थलीं त्या वरील दोन सूत्रांनीं घञ् प्रत्यय होऊं शकत नाहीं. 'अकर्तरि च कारके संज्ञायाम्' सू. ३–३–१९ या सूत्रावरील भाष्यांत 'संज्ञाग्रहणानर्थक्यं च, सर्वत्र घञो दर्शनात्' हें वार्तिक पठित करून भाष्यकारांनीं असें म्हटलें आहे कीं, त्या सूत्रांत 'संज्ञायाम्' हें पद असण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. हा पक्ष मानल्यास, 'अकर्तरि च कारके' या सूत्रानें, संज्ञा वाच्य नसून देखील, कर्तृभिन्न कोणत्याहि कारकाच्या अर्थामध्यें घञ् प्रत्यय होऊं शकतो हें खरें. परंतु पुढें 'करणाधिकरणयोश्च' सू. ३२९३ हें ल्युट्प्रत्ययविधायक सूत्र असल्यामुळें, 'अकर्तरि च कारके' या सूत्रानें 'करण' व 'अधिकरण' या कारकांच्या अर्थामध्यें होणाऱ्या घञ् प्रत्ययाचा त्या) ल्युट्नें बाध होतो. ('पुंसि संज्ञायां घः प्रायेण' सू. ३२९६ या सूत्रानें 'उपदेशः' या स्थलीं) 'घ' प्रत्यय होऊं शकत नाहीं; कारण (त्या सूत्रांत 'संज्ञायाम्' हें पद असल्यामुळें घप्रत्ययान्त शब्द संज्ञावाचक होत असल्यासच, 'घ' प्रत्यय होऊं शकतो. परंतु) 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक नसल्यामुळें, 'घ' प्रत्यय होऊं शकत नाहीं. ('पुंसि संज्ञायां घः प्रायेण' या सूत्रांत) 'प्रायेण संज्ञायाम्' असा अन्वय करणें क्लिष्ट–अयोग्य–आहे, आणि भाष्यकारांनीं 'न ह्युपाधेरुपाधिर्भवति' इत्यादि व्याख्यान करून तशा प्रकारचा–'प्रायेण संज्ञायाम्' अशा तऱ्हेचा–अन्वय करण्याचें प्रत्याख्यान केलें आहे. ('उपदेशोऽजनुनासिक इत्' १–३–२ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं असेंच वरप्रमाणें म्हटलें आहे. भाष्यकार म्हणतातः– 'उपदेश इति घञयं करणसाधनः । न सिध्यति । परत्वाल्ल्युट् प्राप्नोति । न ब्रूमोऽकर्तरि च कारके संज्ञायामिति । किंतर्हि ? । हलश्चेति । तत्रापि संज्ञायामिति वर्तते, न चैषा संज्ञा । प्रायवचनादसंज्ञायामपि भविष्यति । प्रायवचनात्संज्ञायामेव

स्याद्वा न वा, न ह्युपाधेरुपाधिर्भवति विशेषणस्य वा विशेषणम् ।... एवं च कृत्वा घञ् न प्राप्नोति । एवं तर्हि कृत्यल्युटो बहुलमित्येयमत्र घञ् भविष्यति ।' या भाष्यांतील 'न ह्युपाधेरुपाधिर्भवति' या न्यायाचा असा अर्थ आहे कीं, प्रधान शब्दाच्या अर्थामध्यें अन्वय होणें संभवत असतां, वाक्यांतील अप्रधान शब्दाच्या अर्थाचा दुसऱ्या अप्रधान शब्दाच्या अर्थाशीं अन्वय होऊं शकत नाहीं. 'पुंसि संज्ञायां घः प्रायेण' या सूत्रांत 'संज्ञायाम्' व 'प्रायेण' हे दोन्ही अप्रधान शब्द असल्यामुळें, त्यांचा परस्परांशीं अन्वय होऊं शकत नाहीं व त्या सौत्रवाक्यांत 'घः' हें जें विधेय प्रधान आहे त्याशींच 'प्रायेण' या पदाचा अन्वय करणें योग्य असून, 'संज्ञायाम्' या अप्रधान पदाशीं अन्वय करणें योग्य नाहीं. म्हणून बहुधा संज्ञा वाच्य असतां 'घ' प्रत्यय होतो असा त्या सूत्राचा अर्थ न करितां, संज्ञा वाच्य असल्यास बहुधा 'घ' प्रत्यय होतो असाच त्या सूत्राचा अर्थ करणें उचित आहे.) 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक नसल्यामुळेंच, 'घ' प्रत्ययाचें अपवादक 'हलश्च' सू. ३३०० हें जें सूत्र आहे त्या सूत्रानें देखील 'घञ्' प्रत्यय होऊं शकत नाहीं (कारण त्या सूत्रांत 'संज्ञायाम्' हें पद अनुवृत्त असल्यामुळें व 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक नसल्यामुळें, त्या सूत्रानें होणारा 'घञ्' प्रत्यय 'उपदेशः' या स्थलीं होऊं शकत नाहीं. सारांश 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक नसल्यामुळें, जसा 'पुंसि संज्ञायाम्' या सामान्य सूत्रानें होणारा 'घ' प्रत्यय होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें 'हलश्च' या अपवादक सूत्रानें होणारा 'घञ्' प्रत्यय देखील होऊं शकत नाहीं.) 'कृत्यल्युटो बहुलम्' सू. २८४१ या सूत्रानें (त्या सूत्रांत 'बहुलम्' हें पद असल्यामुळें वाटेल त्या कारकाच्या अर्थामध्यें व तसेंच 'भावे' या अर्थामध्यें व संज्ञा वाच्य नसतांना देखील) होणारा बाहुलक ल्युट् प्रत्यय अशाच ठिकाणीं केला जातो कीं, जेथें गत्यन्तर नाहीं, म्हणजे जेथें इतर कोणतेंहि सूत्र लागू पडत नाहीं. (परंतु प्रकृत स्थलीं 'भावे' सू. ३१८४ हें सूत्र लागू पडत असल्यामुळ, 'कृत्यल्युटो बहुलम्' या सूत्रानें

होणारा प्रत्यय करणें उचित नाहीं. सारांश वर सांगितलेल्या सर्व कारणांमुळें, 'उपदेशः' या स्थलीं वर जीं सूत्रें निर्दिष्ट केलीं आहेत त्या सूत्रांन्वयें प्रत्यय न करितां, 'भावे' या सूत्रानेंच सिद्धावस्थापन्न-क्रिया या अर्थामध्यें 'घञ्' प्रत्यय करणें योग्य आहे. 'कृञः श च' सू. ३२७७ या सूत्रानें होणारा 'श' प्रत्यय देखील 'भावे' या अर्था-मध्येंच होत असल्यामुळें) 'प्रक्रियन्ते शब्दा याभिः' अशा रीतीनें 'करणे' या अर्थामध्यें 'श' प्रत्यय करून 'प्रक्रिया' या शब्दाची जी व्युत्पत्ति केली आहे ती चूक ठरते. ('श्रीमद्विठ्ठलमानम्य पाणि-न्यादिमुनीन् गुरून् । प्रक्रियाकौमुदीं कुर्मः पाणिनीयानुसारिणीम् ॥' या प्रक्रियाकौमुदींतील आद्य श्लोकाच्या द्वितीयार्धांत 'प्रक्रिया-कौमुदीम्' हें जें पद आहे त्यांतील 'प्रक्रिया' या शब्दाचें व्याख्यान करितांना प्रसादकारांनीं 'प्रक्रियन्ते प्रकृतिप्रत्ययविभागेन व्युत्पाद्यन्ते शब्दा आभिस्ताः प्रक्रियाः' अशी 'कृञः श च' या सूत्रान्वयें 'करणे' या अर्थामध्यें 'श' प्रत्यय करून व्युत्पत्ति केली आहे. दीक्षित म्हणतात कीं, 'करणे' या अर्थामध्यें 'श' प्रत्यय होऊं शकत नसून 'भावे' या अर्थांतच तो प्रत्यय होऊं शकतो, व त्यामुळें प्रसादकारांनीं जी 'प्रक्रिया' शब्दाची वर सांगितल्याप्रमाणें व्युत्पत्ति केली आहे ती चूक ठरते.) याच अर्थाचें पुढील वार्तिक आहे–'अजब्भ्यां स्त्रीखलनाः स्त्रियाः खलनौ विप्रतिषेधेन'––('ईषद्दुःसुषु कृच्छ्राकृच्छ्रार्थेषु खल्' ३-३-१२६ या सूत्रावरील भाष्यांत 'अजब्भ्यां स्त्रीखलनाः' व 'स्त्रियाः खलनौ विप्रतिषेधेन' हीं दोन वार्तिकें पठित केलीं आहेत. प्रथम वार्तिकाचा अर्थ असा आहे कीं, 'स्त्रियां क्तिन्' या सूत्रांतील 'स्त्रियाम्' हा अधिकार ज्यांना लागू आहे असे धातूहून होणारे प्रत्यय व तसेंच 'खल्' आणि 'अन' हे प्रत्यय 'अच्' व 'अप्' या प्रत्ययांचे विप्रतिषेधानें बाधक होतात. द्वितीय वार्तिकाचा अर्थ असा आहे कीं, 'स्त्रियां क्तिन्' या सूत्रांतील 'स्त्रियाम्' हा अधिकार ज्यांना लागू पडतो अशा धातूंहून होणाऱ्या स्त्रीप्रत्ययांचे 'खल्' व

'अन' हे प्रत्यय विप्रतिषेधाने बाधक होतात. म्हणून 'कृञः श च' या सूत्राला वरील 'स्त्रियाम्' हा अधिकार लागू पडत असल्यामुळें, त्या सूत्रानें 'करणे' या अर्थामध्यें 'श' प्रत्यय करतां येत नाहीं; कारण त्या अर्थात होणाऱ्या 'स्त्रियाम्' या अधिकारांत पठित असलेल्या 'श' या प्रत्ययाचा 'करणाधिकरणयोश्च' सू. ३२९३ या सूत्रानें होणारा 'ल्युट्=अन' प्रत्यय वरील वार्तिकान्वयें बाधक ठरतो. त्यामुळें 'प्रक्रिया' या स्थलीं 'भावे' या अर्थामध्येंच 'श' प्रत्यय करणें योग्य आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) म्हणून वर सांगितलेल्या सर्व कारणांमुळें, 'उपदेशः' या स्थलीं 'भावे' या अर्थामध्येंच 'घञ्' प्रत्यय करणें न्याय्य आहे (व त्या अर्थामध्यें 'घञ्' प्रत्यय केला असतां 'उपदेशः' या पदाचा करणव्युत्पत्तीनें होणारा 'शास्त्र' असा अर्थ न होतां, 'आद्योच्चारण'–उपदेशन–असा अर्थ होतो.)

शब्दरत्न– भाष्येति । तत्र हि 'उपदेश इति किम्, अभ्र आँ अपः, प्रत्यक्षमाख्यानमुपदेशो, गुणैः प्रापणमुद्देशः" इति "नासावुपदेशः" इत्युत्क्वोपदेशोद्देशयोर्लोकव्यवहारेण सङ्कीर्णत्वमाशङ्कय "उपदेशनेऽजनुनासिकः" इति वार्त्तिककृद्दर्शितन्यासस्य खण्डनाय "उपदेश इति करणे घञुपदिश्यतेऽनेन" इत्युक्तम् । तच्च शास्त्रम्=शासनकरणम्, प्रत्यासत्त्यैतच्छास्त्रीयधात्वागमप्रातिपदिकप्रत्याहारसूत्रप्रत्ययादेशरूपम् ।

प्रौढिवादमात्रमिति । वार्तिककृदुक्तन्यासीयार्थस्य कथंचित्सूत्रतोऽपि लाभसम्भवात् न्यासान्तरप्रवृत्तिस्ते वृथैवेति प्रौढ्या बोधयितुमेवं वाद इति भावः ।

ज्या भाष्याचा मनोरमेंत उल्लेख केला आहे त्या भाष्यांत, म्हणजे 'उपदेशोऽजनुनासिक इत्' १–३–२ या सूत्रावरील भाष्यांत, भाष्यकारांनीं असा प्रश्न केला आहे कीं, त्या सूत्रांत 'उपदेशे' हें पद कां घातलें आहे व त्या प्रश्नाचें उत्तर देतांना त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, 'अभ्र आँ अपः' या स्थलीं 'आँ' या अनुनासिकाला

इत्संज्ञा होऊं नये याकरितां त्या सूत्रांत तें पद घातलें आहे. ज्याचें प्रत्यक्ष उच्चारण केलें जातें त्याला 'उपदेश' म्हणतात व ज्याचें प्रसिद्ध धर्म सांगून तशा धर्मांनीं–गुणांनीं–बोध केला जातो त्याला 'उद्देश' म्हणतात. असें असल्यामुळें 'अभ्र आँ अपः' यांतील 'आँ' याला उपदेश म्हणतां येत नाहीं. (भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'आङोऽनुनासिकश्छन्दसि' सू. ३५२५ या सूत्रानें 'आङ' चे जागीं होणारा अनुनासिक 'आँ' हा आदेश इत्संज्ञक होत नाहीं. 'आङो आँ छन्दसि' असें सूत्र करून त्या सूत्रांत 'आँ' असें प्रत्यक्ष अनुनासिकरूपानें उच्चारण केलें असतें तर 'आँ' इत्संज्ञक ठरला असता; पण तसें अनुनासिकरूपानें प्रत्यक्ष उच्चारण न करितां, अनुनासिक या गुणानें–धर्मानें–विधान केलें असल्यामुळें 'आँ' याला इत्संज्ञा होऊं शकत नाहीं.) असें सांगून, लौकिक व्यवहारांत 'उपदेश' या शब्दाचे जागीं 'उद्देश' या शब्दाचा प्रयोग व 'उद्देश' या शब्दाचे जागीं 'उपदेश' या शब्दाचा प्रयोग अशा उलट प्रकारचा प्रयोग देखील भाषेंत रूढ असल्यामुळें या संकीर्ण व्यवहारामुळें 'उपदेश' या शब्दानें उद्देशाचें ग्रहण होण्याचा संभव आहे ही शंका मनांत धरून तसें होऊं नये याकरितां वार्तिककारानें 'उपदेशेऽजनुनासिक इत्' या सूत्राऐवजीं 'उपदेशनेऽजनुनासिक इत्' असें सूत्र पठित करावें असें जें म्हटलें आहे त्याचें खण्डन करण्याच्या हेतूनें 'उपदिश्यते अनेन' अशा रीतीनें 'करणे' या अर्थामध्यें 'घञ्' प्रत्यय केला असतां 'उपदेश' हा शब्द सिद्ध होऊं शकतो (व प्रकृत सूत्रांत 'उपदेशे' या पदाऐवजीं 'उपदेशने' हें पद घालण्याची कांहीं गरज नाहीं) असें भाष्यकारांनीं पुढें म्हटलें आहे. तें उपदेशाचें करण–साधन–शास्त्र होय आणि प्रत्यासत्तिन्यायानें, म्हणजे चर्चेचा जो विषय प्रकृत आहे तदनुसार, पाणिनीय शास्त्रांत सांगितलेले धातु, आगम, प्रातिपदिक, प्रत्याहार, सूत्र, प्रत्यय व आदेश हीं तें शास्त्र होत. ('अभ्र आँ अपः' या वैदिक प्रयोगांतील

'आँ' हा अनुनासिक अच् उपदेश नसून उद्देश असल्यामुळें, त्याला इत्संज्ञा होत नाहीं असें सांगतेवेळीं भाष्यकारांनीं 'प्रत्यक्षमाख्यानमुपदेशः, गुणैः प्रापणमुद्देशः' अशी उपदेश व उद्देश या दोन शब्दांची व्याख्या सांगितली आहे, व या दोन व्याख्यांचें विवरण करितांना भाष्यकार म्हणतात–'प्रत्यक्षं तावदाख्यानमुपदेशः । तद्यथा, अगोज्ञाय कश्चिद्गां सक्थनि कर्णे वा गृहीत्वोपदिशति, अयं गौरिति । स प्रत्यक्षमाख्यातमाह, उपदिष्टो मे गौरिति । गुणैः प्रापणमुद्देशः । तद्यथा, कश्चित् कञ्चिदाह, देवदत्तं मे भवानुद्दिशतु इति । स इहस्थः पाटलिपुत्रस्थं देवदत्तमुद्दिशति, अङ्गदी कुण्डली किरीटी व्यूढोरस्को वृत्तबाहुर्लोहिताक्षस्तुङ्गनासो विचित्राभरण ईदृशो देवदत्तः इति । स गुणैः प्राप्यमाणमाह, उद्दिष्टो मे देवदत्त इति ।' पण पुढें भाष्यकार त्या भाष्यांत अशी शंका उपस्थित करतात व असें म्हणतात कीं, 'सङ्कीर्णावुद्देशोपदेशौ । प्रत्यक्षमाख्यानमुद्देशो गुणैश्च प्रापणमुपदेशः । प्रत्यक्षं तावदाख्यानमुद्देशः । तद्यथा, कश्चित् कञ्चिदाह, अनुवाकं मे भवानुद्दिशतु इति । स तस्मायाचष्टे, इषेत्वकमधीष्व, शन्नोदेवीयकमधीष्वेति । स प्रत्यक्षमाख्यातमाह, उद्दिष्टो मेऽनुवाकस्तमध्येष्ये इति । गुणैश्च प्रापणमुपदेशः । तद्यथा, कश्चित् कञ्चिदाह, ग्रामन्तरं गमिष्यामि पन्थानं मे भवानुपदिशतु इति । स तस्मायाचष्टे, अमुष्मिन्नवकाशे हस्तदक्षिणो ग्रहीतव्योऽमुष्मिन् हस्तवामः इति । स गुणैः प्राप्यमाणमाह, उपदिष्टो मे पन्थाः इति ।' म्हणून संकीर्ण व्यवहारामुळें उत्पन्न होणाऱ्या या संदेहाच्या निवारणार्थ, म्हणजे उपदेशानें उद्देशाचें ग्रहण न व्हावें याकरितां, नंतर भाष्यकारांनीं त्या भाष्यांत 'सिद्धं तूपदेशनेऽनुनासिकवचनात्' हें वार्तिक पठित केलें आहे. या वार्तिकाचा अर्थ वर सांगितलाच आहे.) प्रकृत सूत्रांतील 'उपदेशे' या पदाऐवजीं 'उपदेशने' हें पद घालावें (कारण 'करणे घञ्' करून 'उपदेश' हा शब्द सिद्ध होऊं शकत नसल्यामुळें, त्या शब्दाचा 'शास्त्र' असा इष्ट अर्थ होऊं शकत नाहीं) असें जें वार्तिक-

कारनें म्हटलें आहे तें व्यर्थ आहे व सूत्रनिर्दिष्ट 'उपदेशे' या पदांतून देखील ('कृत्यल्युटो बहुलम्' या सूत्रानें उपपूर्वक 'दिश्' धातूहून 'करणे' या अर्थामध्यें 'घञ्' प्रयत्य केला असतां) वार्तिककारानें भिन्न शब्द वापरून जो इष्ट अर्थ होणें सांगितलें आहे तो अर्थ कसा तरी निघूं शकतो असें बोधित करण्याकरितां जें भाष्यकारांनीं म्हटलें आहे तो केवळ प्रौढिवाद होय (व सिद्धान्त नव्हें) असा मनोरमेंतील 'प्रौढिवादमात्रम्' या पदाचा अर्थ आहे. (या विषयाचें विवरण मनोरमेंत केलेंच आहे. धातूहून 'करणे' या अर्थामध्यें घञ् प्रत्यय होऊं शकत नसल्यामुळें व संज्ञा वाच्य नसल्यास 'करणे' या अर्थामध्यें 'घ' प्रत्यय देखील होऊं शकत नसल्यामुळें आणि जेथें इतर कोणतेंहि सूत्र लागू पडत नाहीं तशाच ठिकाणीं अगतिकगतिन्यायानें 'कृत्यल्युटो बहुलम्' सू. २८४१ हें सूत्र प्रवृत्त करतां येत असल्यामुळें व 'उपदेशः' या स्थलीं 'भावे' सू. ३१८४ या सूत्रानें सिद्धावस्थापन्नक्रिया या अर्थामध्यें 'घञ्' प्रत्यय केल्यानें 'उपदेश' हा शब्द सिद्ध होत असून त्याचा 'आद्योच्चारण' असा इष्ट अर्थ निष्पन्न होत असल्यामुळें, 'सिद्ध तूपदेशनेऽनुनासिकवचनात्' या वार्तिकाचें कसें तरी प्रत्याख्यान करितांना, 'एवं तर्हि कृत्यल्युटो बहुलमित्येवमत्र भविष्यति' असें जें प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं म्हटलें आहे तो केवळ प्रौढिवाद होय असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे असें शब्दरत्नकार म्हणतात.)

शब्दरत्न– घञ इति । "अकर्त्तरि च" इत्यत्र संज्ञायामित्यस्य प्रायिकत्वात्तत्प्राप्तिरिति भावः । बाधादिति । वा सरूपविधिस्तु क्तल्युट्तुमुन्खलर्थेषु प्रतिषिद्धः । न च तत्र साहचयण भावल्युट एव ग्रहणमिति वाच्यम्, 'ईषत्पानः सोमो भवता' इत्यत्र कर्मणि खल् नेति भाष्यादिप्रामाण्येनात्र साहचर्यानाश्रयणादिति भावः ।

'करणे घञो दुर्लभत्वात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें अशा आशयानें म्हटलें आहे कीं, 'अकर्त्तरि च कारके संज्ञायाम्' सू.

३१८६ या सूत्रांत 'संज्ञायाम्' हें पद प्रायिक असल्यामुळें—म्हणजे 'संज्ञाव्यभिचारार्थश्चकारः' या त्या सूत्रावरील काशिकावृत्त्यनुसार, 'को भवता दायो दत्तः, को भवता लाभो लब्धः' या उदाहरणांतील 'दायः, लाभः' हे कर्मणि घञ्प्रत्ययान्त शब्द संज्ञावाचक नसून देखील, कोठें कोठें संज्ञा वाच्य नसतांनाहि घञ्प्रत्यय होत असल्यामुळें—'उपदेशः' या स्थलीं, तो शब्द संज्ञावाचक नसून देखील, घञ्प्रत्ययाची प्राप्ति आहे. (तरी पण त्या घञ्प्रत्ययाचा ल्युट्प्रत्ययानें बाध होतो हें पूर्वी मनोरमेंत सांगितलेंच आहे व त्यामुळें 'उपदेशः' या स्थलीं 'करणे' या अर्थामध्यें घञ्प्रत्यय होऊं शकत नाहीं.) 'ल्युटा बाधात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'वाऽसरूपोऽस्त्रियाम्' सू. २८३० हें सूत्र क्त, ल्युट्, तुमुन् व खलर्थ प्रत्यय यानां लागत नाही. ('क्तल्युट्तुमुन्खलर्थेषु वाऽसरूपविधिर्नास्ति'—परि. ६९—या परिभाषान्वयें 'वाऽसरूपोऽस्त्रियाम्' हें सूत्र ल्युट्प्रत्ययाला लागू पडत नसल्यामुळें, ल्युट्प्रत्ययानें घञ्प्रत्ययाचा बाध होतो. तें सूत्र लागू पडलें असतें तर, वरील दोन्ही प्रत्यय विकल्पेंकरून करतां आले असते.) वरील परिभाषेंतील 'ल्युट्' या प्रत्ययानें साहचर्यन्यायान्वयें 'भावे' या अर्थामध्यें होणाऱ्याच ल्युट्चें ग्रहण होतें (व 'करणे' इत्यादि इतर अर्थांमध्यें होणाऱ्या ल्युट्चें ग्रहण होत नाहीं) असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'ईषत्पानः सोमो भवता' या उदाहरणांत ('आतो युच्' सू. ३३०९ या सूत्रानें होणारा 'युच्=अन' हा प्रत्यय खल्प्रत्ययाचा बाधक असल्यामुळें) या स्थलीं कर्मणि खल्प्रत्यय होत नाहीं असें ('वाऽसरूपोऽस्त्रियाम्' ३-१-९४ या सूत्रावरील) भाष्यांत व इतर ग्रन्थांत सांगितलें असल्यामुळें त्या प्रमाणभूत ग्रन्थांवरून हें स्पष्ट होतें कीं, येथें साहचर्यन्यायाचें अवलंबन करतां येत नाहीं. ('तुमुन्ण्वुलौ' सू. ३१७५ इत्यादि सूत्रांनीं होणारा 'तुमुन्=तुम्' हा कृत्प्रत्यय मान्त असल्यामुळें व तशा प्रत्ययान्त शब्दाला 'कृन्मेजन्तः' सू. ४४९ या

सूत्रानें अव्ययसंज्ञा होत असल्यामुळें, 'अव्ययकृतो भावे' या वचनान्वयें 'तुमुन्' प्रत्यय 'भावे' या अर्थामध्येंच नेहमी होत असतो. म्हणून शंकाकार अशी शंका करतो कीं, वरील निषेधात्मक परिभाषेंत 'भावे' या अर्थामध्यें नेहमी होणाऱ्या 'तुमुन्' प्रत्ययाच्या लगेंच पूर्वी 'ल्युट्' प्रत्ययाचें उच्चारण केलें असल्यामुळें व अशा रीतीनें त्या ल्युट् प्रयत्याला तुमुन् या परपठित प्रत्ययाचें साहचर्य असल्यामुळें जरी 'ल्युट्' प्रत्यय 'ल्युट् च' सू. ३२९० व 'करणाधिकरणयोश्च' सू. ३२९३ या सूत्रांनीं 'भावे, करणे, अधिकरणे' या तीन्ही अर्थांमध्यें होणारा प्रत्यय आहे तरी, वर सांगितलेल्या परसाहचर्यामुळें, 'सहचरिता-सहचरितयोः सहचरितस्यैव ग्रहणम्'–परि. ११२–या न्यायान्वयें वरील निषेधात्मक परिभाषेंत निर्दिष्ट असलेल्या 'ल्युट्' प्रत्ययानें 'भावे' या अर्थामध्येंच होणाऱ्या 'ल्युट्' प्रत्ययाचें ग्रहण होतें, व 'करणे' आणि 'अधिकरणे' या अर्थामध्यें होणाऱ्या 'ल्युट्' प्रत्ययाचें ग्रहण होत नाहीं आणि म्हणून वरील परिभाषा 'भावे' या अर्थामध्यें होणाऱ्याच 'ल्युट्' प्रत्ययाला लागू पडते व त्यामुळें 'करणे' या अर्थांत होणारा 'ल्युट्' 'करणे' या अर्थामध्यें होणाऱ्या घञ्प्रत्ययाचा, 'वाऽसरूपोऽस्त्रियाम्' या सूत्रान्वयें बाधक होऊं शकत नाहीं. पण शब्दरत्नकार म्हणतात कीं, ही शंका बरोबर नाही; कारण 'ईषत्पानः सोमो भवता' या स्थलीं 'ईषद्दुःसुषु' सू. ३३०५ या सूत्रानें 'कर्मणि' या अर्थामध्यें होणारा खल्प्रत्यय होऊं शकत नाहीं व 'आतो युच्' सू. ३३०९ या सूत्रानें 'कर्मणि' या अर्थामध्यें 'युच्=अन' प्रत्ययच होतो असें भाष्यकारांनीं 'वाऽसरूपोऽस्त्रियाम्' ३-१-९४ या सूत्रावरील भाष्यांत म्हटलें आहे. त्या भाष्यांत भाष्य-कारांनीं 'खलर्थः, ईषत्पानः सोमो भवता, खलपि प्राप्नोति' असें म्हटलें आहे. भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जरी 'ईषत्पानः' या स्थलीं कर्मणि खल्प्रत्ययाची प्राप्ति आहे तरी, वरील निषेधक परिभाषा असल्यामुळें कर्मणि खल् प्रत्यय न होतां कर्मणि

युच्प्रत्ययच होतो, आणि म्हणूनच 'आतो युच्' या सूत्रावरील कौमुदींत 'खलोऽपवादः' असें दीक्षितांनीं म्हटलें आहे. जर वरील निषेधक परिभाषेला साहचर्यन्याय लागू पडतो असें मानलें तर, 'भावे' या अर्थामध्येंच होणाऱ्या तुमुन्प्रत्ययाच्या साहचर्यानें भावार्थकच खल्प्रत्ययाचें ग्रहण होईल व त्यामुळें 'कर्मणि' या अर्थामध्यें होणाऱ्या खल्प्रत्ययाचा 'युच्' हा असरूप प्रत्यय 'वाऽसरूपोऽस्त्रियाम्' या सूत्रान्वयें बाधक ठरणार नाहीं, व तसें मानल्यास, वरील भाष्य चूक ठरण्याची आपत्ति येते. पण भाष्य केव्हांहि चूक मानतां येत नाहीं. म्हणून तें भाष्य सुसङ्गत ठरण्याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं, वरील निषेधक परिभाषेला 'सहचरितासहचरितयोः' हा साहचर्यन्याय लागू पडत नाहीं. असें मानलें म्हणजे, वरील निषेधक परिभाषेंत निर्दिष्ट असलेल्या ल्युट्प्रत्ययानें साहचर्यन्यायान्वयें 'भावे' ल्युट्प्रत्ययाचेंच ग्रहण होतें व त्यामुळें 'करणे ल्युट्' हा 'करणे' घञ् या असरूप प्रत्ययाचा बाधक ठरत नाहीं असें जें शंकाकाराचें म्हणणें आहे तें निःसंशय चूक ठरतें व 'करणे घञो दुर्लभत्वात्, ल्युटा बाधात्' असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे तेंच योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.)

शब्दरत्न– क्लिष्टत्वादिति । गुणप्रधानसन्निधौ प्रधानस्य विशेषणे साकाङ्क्षत्वे इतरान्वयस्तस्यायुक्त इति क्लेश इति भावस्तदाह-नहीत्यादिना । भाष्यकृतेति । अस्यार्थस्येति शेषः । एवं च "उभयप्राप्तौ कर्मणि" इति नियमान्न कर्त्तरि षष्ठीति बोध्यम् । अवहेलनाच्चेति । चो हेतौ यतोऽवहेलनमतः क्लिष्टत्वमित्यर्थः । घापवाद इति । ल्युडपवादश्चेत्यपि बोध्यम्, तत्रापि सञ्ज्ञायामित्यनुवृत्तेरिति भावः । अगतिकगतिरिति । न च "खनो घ च" इति घविधानमन्यतोऽपीत्यर्थमित्याकरे स्पष्टम्, तेनात्र घे सिद्ध्यतीति वाच्यम्, तस्याप्यगतिकगतित्वात्, 'भगः पदम्' इत्यादौ यत्र घित्त्वफलं

तत्रैव तत्प्रवृत्तेश्च । पदस्य घञर्थे केन सिद्धेनैतदुदाहरणं किन्तु क्वाचित्कं वाक्यं तत् ।

('प्रायेण संज्ञायामिति व्याख्यानस्य क्लिष्टत्वात्' या मनोरमेंतील पंक्तींत) 'क्लिष्टत्वात्' असें जें म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, वाक्यांत प्रधान व अप्रधान शब्दांचा प्रयोग केला असल्यास व त्यांच्याजवळ विशेषण उच्चारलें असल्यास, प्रधान शब्दाला विशेषणाशीं अन्वित होण्याची आकांक्षा असल्यामुळें, तें विशेषण वाक्यातील अप्रधान शब्दाशीं अन्वित करणें अयोग्य आहे व तशा तऱ्हेनें अन्वय करण्यांत क्लेश आहे आणि म्हणूनच 'न ह्युपाधेरुपाधिर्भवति' ('विशेषणस्य वा विशेषणम्' असें प्रकृत सूत्रावरील भाष्यांत जें भाष्यकारांनीं म्हटलें आहे त्या) या वचनाचा दीक्षितांनीं मनोरमेंत उल्लेख केला आहे. ('न ह्युपाधेरुपाधिर्भवति विशेषणस्य वा विशेषणम्' असा न्याय असल्यामुळें, 'प्रायेण संज्ञायाम्' असा पूर्वी सांगितल्याप्रमाणें अन्वय करतां येत नाहीं व 'प्रायेण घः' असाच अन्वय करतां येतो.) 'भाष्यकृताऽवहेलनाच्च' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्या वाक्यांत 'अस्य अर्थस्य' हीं (कर्मवाचक) पदें अध्याहृत आहेत. हीं पदें अध्याहृत असल्यामुळेंच व 'उभयप्राप्तौ कर्मणि' सू. ६२४ हें नियामक सूत्र असल्यामुळें, 'भाष्यकृता' या कर्तृवाचक पदाचा ('कर्तृकर्मणोः कृति' सू. ६२३ या सूत्रान्वयें षष्ठीमध्यें होणारा प्रयोग न करितां) तृतीयाविभक्तींत प्रयोग केला आहे हें जाणावें. 'अवहेलनाच्च' यांतील 'च' हें पद हेत्वर्थक आहे व त्यामुळें 'अवहेलनाच्च' याचा 'यतोऽवहेलनमतः क्लिष्टत्वम्' असा अर्थ होतो, म्हणजे ज्याअर्थी भाष्यकारांनीं 'प्रायेण संज्ञायाम्' अशा प्रकारचा अन्वय करणें अयोग्य मानलें आहे त्या अर्थी तसा अन्वय करणें क्लिष्ट व अयोग्य आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. 'हलश्च' सू. ३३०० या सूत्रानें होणारा घञ्प्रत्यय जसा घप्रत्ययाचा अपवाद आहे असें मनोरमेंत म्हटलें आहे

तसाच तो ल्युट्प्रत्ययाचा देखील अपवाद आहे हें लक्षांत असूं द्यावें. पण 'हलश्च' या सूत्रानें 'उपदेश' या स्थलीं घञ्प्रत्यय होऊं शकत नाहीं; कारण त्या सूत्रांत ('पुंसि संज्ञायां घः प्रायेण' या पूर्वसूत्रांतून) 'संज्ञायाम्' हें पद अनुवृत्त आहे (आणि 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक नसल्यामुळें 'हलश्च' या सूत्रानें या स्थलीं करणे 'घञ्' प्रत्यय होऊं शकत नाहीं.) 'खनो घ च' सू. ३३०४ या सूत्रांत ('खन्' धातूहून घकारादि घप्रत्यय व्हावा असें जें विधान केलें आहे तें वास्तविक निष्प्रयोजनक आहे; कारण 'खन्' धातूच्या अन्तीं चकार किंवा जकार नसून नकार असल्यामुळें, 'चजोः कु घिण्यतोः' सू. २८६३ या सूत्रानें घित्प्रत्यय पुढें आला असतां त्याच्या लगेंच मागें असलेल्या चकाराचें किंवा जकाराचें कुत्व होणें हें जें फल आहे तें 'खन्' धातूचे ठिकाणीं संभवतच नाहीं. तरी पण त्या सूत्रांत) घप्रत्ययाचें विधान अशाकरितां केलें आहे कीं, तो प्रत्यय इतर धातूंहून देखील व्हावा असें भाष्यांत म्हटलें असल्यामुळें, 'उपदेशः' या स्थलीं (तो शब्द संज्ञावाचक नसून देखील 'करणे' या अर्थामध्यें 'उप' पूर्वक 'दिश्' धातूहून) 'खनो घ च' या सूत्रानें घप्रत्यय होऊं शकतो व अशा रीतीनें 'उपदेश' हा शब्द सिद्ध होऊं शकतो असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'खनो घ च' या सूत्रानें देखील 'खन्' धातूहून भिन्न धातूंना अशाच ठिकाणीं घप्रत्यय करतां येतो कीं, जेथें गत्यन्तर नाहीं, म्हणजे तें प्रवृत्त केल्याखेरीज इतर कोणत्याहि रीतीनें इष्ट रूप सिद्ध होऊं शकत नाहीं. 'भगः पदम्' इत्यादि स्थलीं जेथें घित् प्रत्यय केल्यानें कुत्वफल होऊं शकतें तशाच ठिकाणीं 'खनो घ च' या सूत्राची प्रवृत्ति करतां येते. ('भज्' धातु जकारान्त असल्यामुळें त्याहून 'घ' हा घित्प्रत्यय केला असतां, त्या धातूंतील अन्त्य जकाराचें 'चजोः कु' सू. २८६३ या सूत्रानें कुत्व होतें व अशाच ठिकाणीं 'खनो घ च' या सूत्रानें

'खन्' धातूहून भिन्न धातूंना घप्रत्यय करतां येतो. पण 'दिश्' धातु चकारान्त किंवा जकारान्त नसून शकारान्त असल्यामुळें त्याचे ठिकाणीं 'चजोः कु' या सूत्रानें होणाऱ्या कुत्वाची प्राप्तीच नाहीं. म्हणून 'खनो घ च' या सूत्रानें 'दिश्' धातूहून घप्रत्यय करतां येत नाहीं असें शब्दरत्नकारांचें म्हणणें आहे. 'खनो घ च' या सूत्रावरील कौमुदींत 'भगः पदम्' हें जें उदाहरण दिलें आहे त्यांतील 'भगः' हेंच वास्तविक त्या सूत्राचें उदाहरण होय; कारण 'भज्' धातूहून घप्रत्यय केल्यानेंच, 'चजोः कु' या सूत्रानें त्या धातूंतील अन्त्य जकाराचें कुत्व होऊं शकतें. पण 'पदम्' हें त्या सूत्राचें उदाहरण नव्हे; कारण 'पद्' धातूहून घप्रत्यय केला असतां, तो धातु चकारान्त किंवा जकारान्त नसून दकारान्त असल्यामुळें, या स्थलीं कुत्वाची प्राप्तीच नाहीं आणि म्हणून 'पद्' धातूहून 'खनो घ च' या सूत्रानें घप्रत्यय करतां येत नाहीं, व 'घञर्थे कविधानम्'–सू. ३२३४ वरील वार्तिक—या वार्तिकान्वयें) 'पद्' धातूहून 'क' प्रत्यय केला असतां, 'पद' हें रूप सिद्ध होऊं शकत असल्यामुळें, 'पदम्' हें 'खनो घ च' या सूत्राचें उदाहरण नव्हें असें समजावें. 'भगः पदम्' असा कोठें तरी आढळलेला वाक्यप्रयोग दीक्षितांनीं 'खनो घ च' या सूत्राचें उदाहरण देते वेळीं उपयोगांत आणला आहे.

शब्दरत्न– किं च "उच्चार्य हि वर्णानाह–उपदिष्टा इमे वर्णाः" इत्यादिभाष्यादुपदेशशब्दस्योच्चारणार्थत्वस्य निर्णयेन, सङ्कीर्णलोकव्यवहारस्य लक्षणयाऽप्युपपत्त्या, भावे घञि बाधकाभावः। किं चोपदेशशब्दस्य प्रत्ययादिपरत्वे तस्यैव हलन्त्यमित्यत्रान्वयेन यत्किंचित्समुदायान्त्यस्य वारणसम्भवे तदर्थमन्त्यग्रहणसामर्थ्यादिवर्णनक्लेशो भाष्यकृतो व्यर्थः स्यादिति बोध्यम्। "उद्देशश्च प्रातिपदिकानां नोपदेशः" इति "आदेच उपदेशे" इति सूत्रे च भाष्ये भावघञन्तस्यैव तस्याङ्गीकाराच्चेति दिक्।

दुसरें असें कीं, 'उच्चार्य हि वर्णानाह, उपदिष्टा इमे वर्णाः' म्हणजे वर्णांचें उच्चारण करून आचार्य म्हणतात कीं, या वर्णांचा उपदेश केला—इत्यादि (पस्पशान्हिकांतील) भाष्यप्रयोगांवरून 'उपदेश' हा शब्द 'उच्चारण' या अर्थाचा वाचक आहे हें सिद्ध होत असल्यामुळें आणि संकीर्ण लोकव्यवहार, म्हणजे उपदेश व उद्देश या दोन शब्दांचा एकमेकांच्या अर्थांमध्यें भाषेंत उपयोग करणें हा व्यवहार, लक्षणेनें देखील उपपन्न ठरत असल्यामुळें, 'उपदेशः' या स्थलीं 'भावे' या अर्थामध्यें घञ्प्रत्यय करण्यांत कोणतेंहि बाधक सूत्र उपस्थित होत नाहीं. (पस्पशान्हिकांत भाष्यकार म्हणतात—'अथ क उपदेशः ?। उच्चारणम् । कुत एतत् ?। दिशिरुच्चारणक्रियः । उच्चार्थ हि वर्णानाहोपदिष्टा इमे वर्णा इति ।' भाष्यांतील किती तरी आणखी अशीं वाक्यें देतां येतील कीं, ज्यांत 'उपदेश' या शब्दाचा 'उच्चारण' या अर्थामध्यें उपयोग केला आहे. उदाहरणार्थ, 'हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात—'सर्वे वर्णाः सकृदुपदिष्टाः। अयं हकारो द्विरुपदिश्यते पूर्वश्चैव परश्च,' म्हणजे शिवसूत्रांत बाकीच्या सर्व वर्णांचें एकदांच उच्चारण केलें आहे पण या हकाराचें मात्र दोनदां उच्चारण केलें आहे, एकदां सर्व व्यञ्जनांच्या पूर्वीं व दुसऱ्यानें सर्व व्यञ्जनांच्या शेवटीं. तसेंच 'ऋऌक्' या शिवसूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात 'ऌकारस्योपदेशः किमर्थः,' म्हणजे या शिवसूत्रांत ऌकाराचें उच्चारण कां केलें आहे ? भाष्यांतील इतर उतारे विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत. सारांश भाष्यकारांनीं भाष्यांत ठिकठिकाणीं 'उपदेश' या शब्दाचा 'उच्चारण' या अर्थामध्यें उपयोग केला असल्यामुळें व तसा अर्थ 'उप' पूर्वक उच्चारणार्थक 'दिश्' धातूहून 'भावे' सू. ३१८४ या सूत्रानें सिद्धावस्थापन्नक्रिया—साध्य अवस्थेंत नसून सिद्ध किंवा पूर्ण झालेली क्रिया—या अर्थामध्यें घञ्प्रत्यय केल्यानेंच निष्पन्न होऊं शकत असल्यामुळें आणि 'करणे' घञ्प्रत्ययाचा जसा ल्युट्प्रत्यय बाधक आहे तसा 'भावे'

घञ् प्रत्ययाचा इतर कोणताहि प्रत्यय बाधक नसून, संज्ञा वाच्य नसतांना देखील तो प्रत्यय होऊं शकत असल्यामुळें, 'उपदेश' या स्थलीं 'भावे' घञ्प्रत्यय करणें व त्या शब्दाचा 'आद्योच्चारण' असा अर्थ करणें हेंच योग्य आहे असें शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे.) दुसरें असें कीं, 'उपदेश' या शब्दाचा ('उपदेशेऽजनुनासिक इत्' १–३–२ या सूत्रावरील भाष्यांत प्रौढोक्तिरूपानें सांगितल्याप्रमाणें 'कृत्यल्युटो बहुलम्' सू. २८४१ या सूत्रानें 'करणे घञ्' प्रत्यय करून) प्रत्यय इत्यादि, म्हणजे प्रत्यय, धातु, आदेश, आगम, निपात इत्यादि, असा अर्थ केला तर, त्या प्रत्ययादिकांचा 'हलन्त्यम्' या सूत्रांत ('प्रत्ययादीनामन्त्यं हल् इत्संज्ञं स्यात्' अशा रीतीनें) अन्वय होऊन त्यांच्याच अन्त्य हलाला इत्संज्ञा होईल व त्यामुळें इतर प्रकारच्या वर्णसमुदायाच्या अन्त्य हलाला इत्संज्ञा आपोआपच प्राप्त होऊं शकणार नाहीं. असें असून देखील, कोणत्याहि इतर वर्णसमुदायाच्या अन्त्य हलाला इत्संज्ञा होऊं नये याकरितां 'हलन्त्यम्' या सूत्रांत 'अन्त्य' हें पद घातलें आहे व त्या पदाच्या सामर्थ्यामुळें कोणत्याहि इतर वर्णसमुदायाच्या अन्त्य हलाला इत्संज्ञा होत नाहीं इत्यादि जें ('हलन्त्यम्' १–३–३ या सूत्रावरील भाष्यांत) भाष्यकारांनीं म्हटलें आहे तें व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. (त्या सूत्रावरील भाष्यांत 'हलन्त्ये सर्वप्रसङ्गः। सर्वस्य हल इत्संज्ञा प्राप्नोति। किं कारणम्?। सर्वान्त्यत्वात्। सर्वो हि हल् तं तमवधिं प्रत्यन्त्यो भवति' अशी शंका उपस्थित करून त्या शंकेचें निरसन करण्याकरितां 'सिद्धं तु व्यवसिताऽन्त्यत्वात्' हें समाधानपर वार्तिक भाष्यकार पठित करतात व त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना असें म्हणतात कीं, 'सिद्धमेतत्। कथम्?। व्यवसिताऽन्त्यत्वात्। व्यवसिताऽन्त्यो हलित्संज्ञो भवतीति वक्तव्यम्। के पुनर्व्यवसिताः?। धातुप्रातिपदिकप्रत्ययनिपातागमादेशाः। सिध्यति। सूत्रं तर्हि भिद्यते। यथान्यासमेवास्तु। ननु चोक्तं हलन्त्ये सर्वप्रसङ्गः सर्वान्त्यत्वादिति।

नैष दोषः । आहाऽयम्, हलन्त्यमित्संज्ञं भवतीति । सर्वश्च हल् तं त-मवधिं प्रत्यन्त्यो भवति, तत्र प्रकर्षगतिर्विज्ञास्यते, साधीयो योऽन्त्य इति । कश्च साधीयः ? । व्यवसितानां योऽन्त्यः । अथवा सापेक्षोऽयं निर्देशः क्रियते । न चान्यत् किञ्चिदपेक्ष्यमस्ति, तेन व्यवसितानेवापे-क्षिष्यामहे ।' हेंच तें वरील भाष्य होय कीं ज्याचा शब्दरत्नांतील वरील पंक्तींत निर्देश केला आहे. या भाष्यांत अशी शंका उपस्थित केली आहे कीं, अन्त्य हलाला इत्संज्ञा होते असें 'हलन्त्यम्' या सूत्रांत सांगितलें असल्यामुळें, त्या सूत्रानें प्रत्येक हलाला इत्संज्ञा होण्याची आपत्ति येते; कारण प्रत्येक हल् कोणत्या तरी समुदायाचा अन्त्य असतोच. पण भाष्यकार म्हणतात कीं, व्यवसितांच्याच, म्हणजे धातु, प्रातिपदिक, प्रत्यय, निपात, आगम, व आदेश यांच्याच, अन्त्य हलाला इत्संज्ञा होते असें म्हटल्यानें वरील आपत्ति टळते. पण शंकाकार असें म्हणतो कीं, तसें म्हटल्यास वरील सूत्राच्या ऐवजीं 'व्यवसितान्त्यं हल्' असें भिन्न तऱ्हेचें सूत्र पठित करावें लागेल. पण भाष्यकार म्हणतात कीं, तसें भिन्न सूत्र पठित करण्याची कांही गरज नाहीं व जसें मूळ सूत्र पठित केलें आहे तसें तें मानल्यानें देखील इष्टसिद्धि होऊं शकते; कारण अन्त्य हल् इत्संज्ञक होतो असें आचार्य पाणिनी सांगत आहेत व प्रत्येक हल् कोणत्या तरी समुदायाचा अन्त्य असल्यामुळें, त्या सूत्रांतील 'अन्त्य' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरूं पाहतें. म्हणून त्या पदाच्या ग्रहणसामर्थ्यानें हें बोधित होतें कीं, चांगला जो अन्त्य त्याचेंच त्या सूत्रांतील 'अन्त्य' या पदानें ग्रहण होतें व व्यवसितांच्या शेवटीं असणारा जो अन्त्य हल् तो चांगला अन्त्य होय आणि अशा रीतीनें त्या सूत्रांतील 'अन्त्य' ग्रहणाच्या सामर्थ्यानें त्या सूत्रांतूनच 'व्यवसितान्त्यं हल् इत्' असा अर्थ निष्पन्न होतो. अथवा त्या सूत्रांत अवयववाचक 'अन्त्य' असा सापेक्ष शब्द उच्चारला असून कोणत्या समुदायाचा अन्त्य अशा अपेक्षित समुदा-याचा त्या सूत्रांत निर्देश केला नसल्यामुळें, ती अपेक्षा–आकांक्षा–पूर्ण

करण्याकरितां आम्ही व्यवसितसंज्ञक समुदायाचेंच ग्रहण करूं असा वरील भाष्याचा भावार्थ आहे. परंतु 'उपदेशेऽजनुनासिक इत्' या पूर्व सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'उपदेश' या शब्दाची 'करणे घञ्' प्रत्ययानें व्युत्पत्ति करून व त्या शब्दाचा 'उपदिश्यते अनेन इति उपदेशः = शास्त्रम्' असा अर्थ करून त्या सूत्रावर वार्तिककारानें 'उपदेशनऽजनुनासिक इत्' असें जें वार्तिक पठित केलें आहे त्या वार्तिकाचें प्रत्याख्यान केलें आहे हें पूर्वीं मनोरमेंत सांगितलेंच आहे व या पूर्व सूत्रांतील 'उपदेशे' या शब्दाची 'हलन्त्यम्' या उत्तर सूत्रांत अनुवृत्ति होत असल्यामुळें, त्या सूत्रांत देखील त्या अनुवृत्त पदाचा 'शास्त्रम्' असा अर्थ होऊं शकतोच आणि 'शास्त्रम्' या शब्दानें पाणिनीयशास्त्रोपदिष्ट धातु, प्रत्यय, आगम, आदेश इत्यादिकांचें ग्रहण होऊं शकतेंच आणि त्यामुळें तशा शास्त्रोपदिष्ट धातु, प्रत्यय, आगम, आदेश इत्यादिकांच्याच अन्त्य हलाला त्या सूत्रानें इत्संज्ञेची प्राप्ति होते व धात्वादिभिन्न इतर समुदायांच्या अन्त्य हलाला इत्संज्ञेची प्राप्ति मुळींच होत नाहीं. म्हणून त्या सूत्रावरील भाष्यांत 'हलन्त्ये सर्वप्रसङ्गः' ही जी शंका उपस्थित केली आहे ती वास्तविक उद्भवतच नाहीं व अनुपपन्न ठरते आणि तसेंच त्या शंकेचें निवारण करण्याकरितां 'सिद्धं तु व्यवसितान्त्यत्वात्' हें वार्तिक पठित करून जें उत्तर दिलें आहे तें देखील सारखेंच अनुपपन्न ठरतें. वास्तविक त्या शंकेवर भाष्यकारांनीं असें उत्तर द्यावयास पाहिजे होतें कीं, पूर्व सूत्रांतून 'हलन्त्यम्' या सूत्रांत 'उपदेशे' या ज्या शब्दाची अनुवृत्ति होते तो 'उपदेश' शब्द पूर्व सूत्रावरील भाष्यांत सांगितल्या-प्रमाणें 'करणे घञन्त' असून त्याचा 'शास्त्रम्' असा अर्थ होत असल्यामुळें व 'शास्त्र' या शब्दानें पाणिनीयशास्त्रो-पदिष्ट धातु, प्रत्यय, आगम, आदेश इत्यादिकांचेंच ग्रहण होऊं शकत असल्यामुळें, धात्वादिभिन्न इतर समुदायांतील अन्त्य हलाला इत्संज्ञा होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं आणि त्यामुळें 'हलन्त्ये

सर्वप्रसङ्गः' ही शंका अयोग्य ठरते. परंतु तसें उत्तर न देतां वरील सूत्रांतील 'अन्त्य' या पदाच्या सामर्थ्यानें व्यवसितांचेंच ग्रहण होतें इत्यादि भिन्न तऱ्हेचें त्या सूत्रावरील भाष्यांत उत्तर दिलें आहे. म्हणून त्या सूत्रावरील भाष्यांत जी शंका उपस्थित केली आहे व तिचें जें उत्तर दिलें आहे तीं दोन्ही अनुपपन्न न ठरावीं याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं, जरी 'उपदेशनेऽजनुनासिक इत्' या पूर्व सूत्रावर पठित केलेल्या वार्तिकाचें कसें तरी प्रत्याख्यान करण्याकरितां भाष्यकारांनीं 'उपदेश' या शब्दाची 'करणे घञ्' प्रत्यय करून व्युत्पत्ति केली होती तरी ती त्यांना वास्तविक मान्य व पसंत नव्हती. याचें उघड कारण हेंच आहे कीं, जेथें इतर कोणतेंहि सूत्र प्रवृत्त होत नाहीं तशाच ठिकाणीं अगतिकगतिन्यायानें 'कृत्यल्युटो बहुलम्' सू. २८४१ या सूत्रांतील 'बहुल' ग्रहण-सामर्थ्यानें 'करणे' या अर्थामध्यें धातूहून 'घञ्' प्रत्यय करतां येतो. परंतु 'भावे' सू. ३१८४ या सूत्रानें 'भावे' या अर्थामध्यें 'घञ्' प्रत्यय करून 'उपदेश' या शब्दाची शास्त्रशुद्ध व्युत्पत्ति करतां येत असल्यामुळें, 'कृत्यल्युटो बहुलम्' या सूत्रानें 'करणे घञ्' प्रत्यय करणें अनुचित ठरतें आणि हें जाणूनच भाष्यकारांनीं 'हलन्त्यम्' या सूत्रावरील भाष्यांत त्या सूत्रांतील 'अन्त्य' पदाच्या ग्रहणसामर्थ्यानें व्यवसितांचेंच ग्रहण होतें इत्यादि म्हटलें आहे, म्हणजे अशा भिन्न तऱ्हेनें प्रतिपादन केलें आहे. सारांश 'हलन्त्यम्' या सूत्रावरील भाष्य सुसङ्गत ठरण्याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं, 'भावे घञ्' प्रत्यय करून 'उपदेश' या शब्दाची व्युत्पत्ति करणें व त्या शब्दाचा 'आद्योच्चारण' असा अर्थ करणें हेंच भाष्यकारांना इष्ट होतें आणि अशा रीतीनें त्या सूत्रावरील भाष्य, 'उपदेश' या शब्दाचा 'आद्योच्चारण' असा 'भावे घञ्' प्रत्यय करून अर्थ होतो याला, प्रमाण ठरतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां 'उपदेश' हा शब्द भावे घञन्तच आहे हें सिद्ध करण्या-

करितां शब्दरत्नकार 'आदेच उपदेशेऽशिति' या सूत्रावरील भाष्याचें प्रमाण देतात.) आणि 'उद्देशश्च प्रातिपदिकानां नोपदेशः' असें जें 'आदेच उपदेशे' ६–१–४५ या सूत्रावरील भाष्यांत म्हटलें आहे त्यावरून देखील हेंच सिद्ध होतें कीं, भाष्यकारांनीं 'उपदेश' हा शब्द (करणे घञन्त नसून) भावे घञन्तच आहे असें मानलें आहे. (त्या भाष्यांत 'प्रातिपदिकप्रतिषेधः' हें वार्तिक पठित करून 'प्रातिपदिकानां प्रतिषेधो वक्तव्यः। गोभ्यां गोभिः, नौभ्यां नौभिः' असें भाष्यकारांनीं त्या वार्तिकाचें व्याख्यान केलें आहे. पुढें भाष्यकार असा प्रश्न करतात कीं, तें वार्तिक पठित करण्याची गरज आहे काय व त्या प्रश्नाचें उत्तर देतांना भाष्यकार म्हणतात :–'न वक्तव्यः। धात्वधिकारात्प्रातिपदिकस्याऽप्राप्तिः। धात्वधिकारात्प्रातिपदिकस्यात्वं न भविष्यति। धातोरिति वर्तते। क्व प्रकृतम् ?। लिटि धातोरनभ्यासस्येति। अयापि निवृत्तम् एवमप्यदोषः। उपदेश इत्युच्यते, उद्देशश्च प्रातिपदिकानां नोपदेशः।' 'आदेच उपदेशे' सू. २३७० हें षष्ठाध्यायांतील सूत्र 'धातोः' या अधिकारांत पठित नाहीं; कारण तो अधिकार तृतीयाध्यायाच्या अखेरपर्यंतच चालू आहे. तसेंच 'आदेच उपदेशे' या सूत्रांत 'लिटि धातोरनभ्यासस्य' या बरेंच पूर्वी असणाऱ्या सूत्रांतून 'धातोः' हें पद अनुवृत्त करतां येत नाहीं; कारण 'ष्यङः सम्प्रसारणम्' इत्यादि पूर्वसूत्रांत तें पद निवृत्त झालें आहे आणि मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करणें हा दोष मानला आहे. म्हणून 'आदेचः' या सूत्रांतील 'एचः' या पदानें एजन्त प्रातिपदिकांचें देखील ग्रहण होऊं शकतें व त्यामुळें 'गो, नौ' इत्यादि एजन्त प्रातिपदिकांहून 'भ्याम्, भिस्' इत्यादि शित् नसणारे प्रत्यय केल्यास, एचाचें आत्व होऊन 'गाभ्यां गाभिः, नाभ्यां नाभिः' इत्यादि अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां वार्तिककारानें 'प्रातिपदिकप्रतिषेधः' हें वार्तिक पठित केलें आहे. पण भाष्यकार म्हणतात कीं, तें वार्तिक असण्याची कांहीं गरज

नाहीं व त्या वार्तिकाचें प्रत्याख्यान करतेवेळीं भाष्यकार 'उद्देशश्च प्रातिपदिकानां नोपदेशः' हें कारण देतात. या भाष्यपंक्तीचा भावार्थ हा आहे कीं, 'गोपयसोर्यत्' सू. १५३८ 'नौवयोधर्म' सू. १६४३ इत्यादि सूत्रांत 'गो, नौ' इत्यादि एजन्त प्रातिपदिकांचा जरी निर्देश केला आहे तरी तो उद्देशरूपानें केला असून उपदेश नव्हे, म्हणजे त्या सूत्रांनीं यत्प्रत्यय होण्याचा जो उपदेश केला आहे त्या उपदेशाचे ते शब्द उद्देश्य होत, आणि 'आदेच उपदेशे' या सूत्रांत 'उपदेशे' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें, तें सूत्र ज्यांचा उद्देश्यरूपानें सूत्रांत निर्देश केला आहे अशा एजन्त प्रातिपदिकांना लागू शकत नाहीं. या वरील भाष्यपंक्तीचा कैयटानें 'अर्थवदिति प्रातिपदिकसंज्ञाविधानाल्लब्धसाधिमानः प्रत्ययविधानाय परार्था गवादय उपात्ताः। येषां तु स्वरूपज्ञानायाऽपूर्वमुच्चारणं तेषामेवोपदेशव्यवहारः' असा अर्थ केला आहे व त्यावर उद्योतकारानें 'अनिर्ज्ञातस्वरूपस्य कार्यार्थस्वरूपज्ञापनार्थमपूर्वोच्चारणं ह्युपदेशः। गुणैः प्रापणं चोद्देशः... येषां तु परार्थमुपादानेऽपि तेनैव लक्षणेन स्वरूपसिद्धिरपि तेषामुपदेशत्वमस्त्येवेति भावः' असें म्हटलें आहे. सारांश या वरील भाष्यपंक्तीवरून देखोल हेंच सिद्ध होतें कीं, भाष्यकारांनीं 'उपदेश' या शब्दाचा 'आद्योच्चारण' या अर्थामध्येंच उपयोग केला आहे व तसा अर्थ 'भावे घञ्' प्रत्यय केल्याशिवाय होऊं शकत नसल्यामुळें, 'उपदेश' हा शब्द भावघञन्तच मानणें योग्य असून तो 'करणे' घञन्त मानणें योग्य नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा– यत्तु–धातुसूत्रेत्यादि पठन्ति। यच्च व्याचक्षते–करणव्युत्पत्त्या पूर्वार्धोपात्तानामुपदेशत्वम्, कर्मव्युत्पत्त्या त्वागमादीनाम्। उणादिलिङ्गानुशासनयोरपि सूत्रत्वात्सिद्धे पृथगुपादानं गोबलीवर्दन्यायेन। एवं गणत्वादेव सिद्धे धातोरपीत्यादि।

अत्रेदं वक्तव्यम्–किमेषामुपदेशसंज्ञा, उत योगमात्रम्। नाद्यः, संज्ञायाः शास्त्रकारैरनुक्तेः, "असंज्ञात्वाद् घप्रत्ययो न" इति भाष्यो-

क्तेश्च । अस्मदादिकृतसंज्ञायाः शास्त्रव्यवस्थापकत्वेऽतिप्रसङ्गाच्च,
'आमोऽमित्त्वमदन्तत्वात्' इत्यादिस्वपरग्रन्थविरोधाच्च, न ह्युत्सृष्टा-
नुबन्धस्यामो न प्रत्ययत्वं येन मित्त्वं न भवेत् । किं चैवं प्रत्ययविधौ
पञ्चम्याः षष्ठीप्रकल्पकत्वे सनः सन्नेवादेशोऽस्त्वित्याशङ्कचोपदेशा-
भावादित्संज्ञा न स्यादिति भाष्यकैयटोक्तं व्याकुप्येत । किञ्च "न
धातुलोपः" इति सूत्रे "धातुग्रहणं किम्? लूञ् लविता, पूञ् पविता"
इति भाष्यम्, 'उपदेश एवानुबन्धलोपे कृते ततो धातुसञ्ज्ञा' इत्येवंपरः
कैयटग्रन्थश्च विरुद्ध्येत । अपि च "ध्वसोरेद्धौ" इति सूत्रे 'लोपश्च'
इति द्विशकारको निर्देशः, द्वितीयः शकार इदिति अलोऽन्त्यसूत्रस्थभाष्य-
कैयटादिकमपि विरुद्ध्येत । न द्वितीयः, योगस्यैव पुरस्कारे परिगणनस्य
व्यर्थत्वात्, धात्वादिषु करणव्युत्पत्तिरागमादिषु नेति वैषम्यस्य दुरुप-
पादत्वाच्च । उपदेशताप्रयोजकधातुत्वादिरूपोपाध्यवच्छिन्नसमुदायान्त्यं
हलिदित्यर्थ इति स्वग्रन्थविरोधाच्च । पक्षद्वयेऽपि लिङ्गानुशासनस्य
प्रकृतानुपयोगात्, लोपश्श्चेति शकारस्यासंग्रहाच्च । "आदेच उपदेशे"
"उपदेशेऽत्वतः" इत्यादावाद्योच्चारणस्यैवोपदेशपदार्थतायाः सर्वसंमत-
त्वाच्चेति दिक् ॥

(रामचन्द्रकृत प्रक्रियाकौमुदींत 'उपदेशेऽजनुनासिक इत्' या
सूत्रावरील वृत्तींत 'धातुसूत्रगणोणादिवाक्यलिङ्गानुशासनम् । आगम-
प्रत्ययादेशा उपदेशाः प्रकीर्तिताः ॥' ही कारिका पठित केली आहे.
भट्टोजी दीक्षितांचे गुरु शेषोपनामक कृष्णाचार्य यांनीं प्रक्रियाकौमुदीवर
'प्रकाश' नांवाची टीका लिहिली आहे व दीक्षित त्या टीकेचा
उल्लेख पुढील पंक्तींत करतात. ती टीका दुर्दैवानें येथें उपलब्ध नाहीं.
परंतु रामचन्द्राचे पौत्र विठ्ठल यांनीं प्रक्रियाकौमुदीवर 'प्रसाद'
नांवाची जी टीका लिहिली आहे ती येथें उपलब्ध आहे, व वरील
कारिकेचें व्याख्यान करितांना प्रसादकारांनीं, 'धातुर्धातुपाठः । तत्र
एध वृद्धावित्यादावकारादेरित्संज्ञादि, उपदेशत्वात् । सूत्रं सूत्रपाठः ।
तत्र लण् इत्यादौ च तदेव । गणो गणपाठः । तत्र भवतु इत्यादावपि

तदेव । उणादि उणादिपाठः । तत्रापि कजिमृजिभ्यां चित् इत्यादौ सौत्रस्य कज्यादेरिदित्वादि । वाक्यं वार्तिकम् । तत्रापि आचारे गल्भ-क्लीबह्रोडेभ्यः क्लब् वाच्यः इत्यत्र तङर्थानुषक्ताकारस्येत्संज्ञा । लिङ्गानुशासनं लिङ्गानुशासनप्रतिपादको ग्रन्थः। तत्रापि इदन्तो मृच्च इत्यादौ तकारादेरित्संज्ञादि । उपदेशकार्यं यथासंभवं ज्ञेयम् । एतेषां द्वन्द्वः । समाहारे एकवचनम् । उपदिश्यन्ते यैस्ते इति साधनव्युत्पत्त्या एते उपदेशाः । आगमः त्रपुजतुनोः षुक् इत्यादि । तत्र उकारादेरित्त्वम् । प्रत्ययः सनादिः । आदेशः चक्षिङः ख्याञ् इत्यादि । उपदिश्यन्ते इति कर्मव्युत्पत्त्या एते उपदेशाः ।' असें म्हटलें आहे. 'उणादिलिङ्गानुशासनयोरपि सूत्रत्वात्सिद्धे पृथगुपादानं गोबलीवर्दन्यायेन । एवं गणत्वादेव सिद्धे धातोरपि' असें जे मनोरमेंत म्हटलें आहे तें वरील प्रसादटीकेंत आढळत नाहीं. तें प्रकाशकारांच्या टीकेंत म्हटलें आहे असें दिसतें.) 'धातुसूत्रगणोणादि' इत्यादि कारिका पठित करून तिचें व्याख्यान करितांना प्रकाशकारांनीं असें म्हटलें आहे कीं, त्या कारिकेच्या पूर्वार्धांत निर्दिष्ट असलेल्या धातु, सूत्र इत्यादिकांना, 'उपदेश' या शब्दाची 'करणे' घञ् प्रत्यय करून ('उपदिश्यते अनेन इत्युपदेशः' अशी) व्युत्पत्ति केल्यानें 'उपदेश' असें म्हटलें जातें, व त्या कारिकेच्या उत्तरार्धांत निर्दिष्ट असलेल्या आगम, प्रत्यय इत्यादिकांना 'उपदेश' या शब्दाची कर्मणि घञ्प्रत्यय करून ('उपदिश्यते इति उपदेशः' अशी) व्युत्पत्ति केल्यानें 'उपदेश' असें म्हटलें जातें. उणादि सूत्रपाठ व लिङ्गानुशासनपाठ यांचा कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या 'सूत्र' या शब्दांत अन्तर्भाव होत असून देखील त्यांचा त्या कारिकेंत जो पुन्हा निर्देश केला आहे तो गोबलीवर्दन्यायानें केला आहे. त्याचप्रमाणें (ज्यांत भ्वादि, अदादि दहा गण निर्दिष्ट केले आहेत अशा) धातुपाठाचा 'गण' या शब्दांत अन्तर्भाव होत असून देखील पुन्हा त्याचा वरील कारिकेंत जो पृथक् निर्देश केला आहे तो देखील वरील न्यायान्वयेंच केला आहे. (या पंक्तींत ज्या

गोबलीवर्दन्यायाचा उल्लेख केला आहे तो सामान्यविशेषन्याय होय व त्याला ब्राम्हणवशिष्ठन्याय असें देखील म्हणतां येतें. 'गो' हा सामान्य शब्द सर्व प्रकारच्या बैलांचा वाचक असून 'बलीवर्द' हा विशेष शब्द, 'त्यदादीनि सर्वैर्नित्यम्' १-२-७२ या सूत्रावरील भाष्यांत सांगितल्याप्रमाणें 'उत्कालिकपुंस्का वाहाय च विक्रयाय च ये ते बलीवर्दाः' या विशेष प्रकारच्या बैलांचा, वाचक आहे. 'गो' या शब्दांत बलीवर्दांचा व तसेंच 'ब्राम्हण' या सामान्य शब्दांत ब्राम्हण असणाऱ्या वशिष्ठाचा अन्तर्भाव होत असून देखील पुन्हा बलीवर्द व वशिष्ठ या विशेष व्यक्तिवाचक शब्दांचा प्रामुख्यानें निर्देश करणें हाच सामान्यविशेषन्याय किंवा गोबलीवर्दन्याय किंवा ब्राम्हणवशिष्ठ-न्याय होय.) प्रकाशकारांनीं वर सांगितल्याप्रमाणें जें व्याख्यान केलें आहे त्यासंबंधानें त्यांनीं हें सांगावें कीं, वरील कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातु, सूत्र इत्यादिकांना 'उपदेश' ही रूढ संज्ञा आहे काय, म्हणजे लौकिकव्यवहारांत ते शब्द 'उपदेश' या संज्ञेनें बोधित होतात काय किंवा 'उपदेश' या शब्दाचा जो यौगिकअर्थ आहे त्या अर्थान्वयें त्यांना 'उपदेश' असें म्हटलें जातें? पहिला पक्ष स्वीकारतां येत नाहीं; कारण त्यांना उपदेश ही संज्ञा आहे व 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक आहे असें शास्त्रकारांनीं कोठेंहि म्हटलें नाहीं, व भाष्य-कारांनीं 'असंज्ञात्वात् घप्रत्ययो न,' म्हणजे 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक नसल्यामुळें 'पुंसि संज्ञायां घः प्रायेण' सू. ३२९६ या सूत्रानें घप्रत्यय करतां येत नाहीं, असें म्हटलें आहे. (सारांश 'उपदेश' ही संज्ञा नसल्यामुळें वरील कारिकेंत निर्दिष्ट असलेले धातु, सूत्र इत्यादि उपदेशसंज्ञक आहेत असें म्हणतां येत नाहीं.) आपण तयार केलेल्या लौकिकसंज्ञांनी पाणिनीय शास्त्राची व्यवस्था लावल्यास (व तशा लौकिकसंज्ञांचे ठिकाणीं पाणिनीय सूत्रांची प्रवृत्ति केल्यास) अतिप्रसङ्ग, म्हणजे अतिव्याप्तिरूप दोष येतो. (उदाहरणार्थ एखाद्या मुलाचें रघुनाथ असें नांव ठेऊन तो शब्द संज्ञावाचक आहे असें

मानल्यास, 'पूर्वपदात्संज्ञायामगः' सू. ८५७ या सूत्रानें नकाराचें णत्व होण्याची आपत्ति येते. पण लौकिकसंज्ञावाचक शब्दांना पाणिनीय सूत्रें लागत नसून शास्त्रीय संज्ञावाचक शब्दांनाच तीं सूत्रें लागू पडतात असें मानलें तरच ती आपत्ति टळते. सारांश पाणिनीय शास्त्रांत धातु इत्यादि उपदेशसंज्ञक आहेत व 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक आहे असें कोठेंहि सांगितलें नसल्यामुळें, व भाष्यकारांनीं तो शब्द संज्ञावाचक नाहीं असें स्पष्ट म्हटलें असल्यामुळें त्याला संज्ञावाचक शब्द मानणें अयोग्य आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) तसेंच 'प्रत्यय' हा उपदेशसंज्ञक आहे असें मानल्यास, प्रकाशकारांनीं 'आमोऽमित्वमदन्तत्वात्' असें जें आपल्या ग्रन्थांत पुढें स्वतःच म्हटलें आहे त्याशीं विरोध येतो. 'आम' यांतील अकार हा अनुबन्ध नाहींसा झाल्यावर अवशिष्ट राहिलेला 'आम्' प्रत्ययसंज्ञक होत नाहीं व त्यामुळें त्याचा अन्त्य मकार इत्संज्ञक होत नाहीं असें म्हणता येत नाहीं. ('आमोऽमित्वमदन्तत्वादगुणत्वं विदेस्तथा। आस्कासोरांविधानाच्च पररूपं कतन्तवत्' ही कारिका 'कास्प्रत्ययादाममन्त्रे लिटि' ३–१–३५ या सूत्रावरील काशिकेंत पठित केली आहे व 'आम्' प्रत्यय मित् नाहीं हें सांगतेवेळीं प्रकाशकारांनीं त्या कारिकेंतील 'आमोऽमित्वमदन्तत्वात्' हें वचन प्रमाण दिलें आहे. 'आम' हा अकारान्त असल्यामुळें तो मित् नाहीं असा त्या वचनाचा अर्थ आहे. जर 'आम्' हा प्रत्यय मित् मानला, म्हणजे त्या प्रत्ययांतील अन्त्य मकार इत्संज्ञक आहे असें मानलें तर, 'तस्य लोपः' सू. ६२ या सूत्रानें मकाराचा लोप होऊन 'आ' एवढाच त्या प्रत्ययांतील भाग अवशिष्ट राहील आणि 'कास्प्रत्ययादाम्' सू २३०६ व 'दयायासश्च' सू. २३२४ या सूत्रांनीं लिट्लकारांत 'कास्' व 'आस्' या धातूंहून 'आम्' प्रत्यय होण्याचें विधान केलें असल्यामुळें, तो प्रत्यय मित् मानल्यास, 'मिदचोऽन्त्यात्परः' सू. ३७ या सूत्रान्वयें तो प्रत्यय 'कास्, आस्' यांतील 'आ' पुढें होईल व 'का+आ+स्=कास्,

आ+आ+स्=आस्' अशींच रूपें होतील व 'आम्' प्रत्ययाचें विधान व्यर्थ ठरेल, म्हणजे तें विधान केलें असून देखील न केल्यासारखेंच होईल. ही आपत्ति टाळण्याकरितांच 'आम' असा अदन्त उपदेश मानला आहे व त्यामुळें 'आम्' प्रत्यय मित् ठरत नाहीं आणि म्हणूनच 'इजादेश्च गुरुमतः' सू. २२३७ या सूत्रावरील कौमुदींत 'आमो मकारस्य नेत्वम् । आस्कासोरांविधानाज्ज्ञापकात्' असें दीक्षितांनीं म्हटलें आहे. 'आम्' असा उपदेश न मानतां 'आम' असा उपदेश मानल्यानें, 'आम' यांतील अन्त्य अकार 'उपदेशेऽजनुनासिक इत्' सू. ३ या सूत्रानें इत्संज्ञक ठरून व 'तस्य लोपः' सू. ६२ या सूत्रानें त्याचा लोप होऊन 'आम्' असा प्रत्यय अवशिष्ट राहतो व तो उपदेश नसल्यामुळें, त्यांतील अन्त्य मकार इत्संज्ञक होत नाहीं व त्या मकाराचा लोप होत नाहीं आणि अशा रीतीनें वर दाखविलेली आपत्ति टळते. आतां दीक्षित असें म्हणतात कीं, जरी 'आम' असा उपदेश आहे तरी त्यांतील अन्त्य अकार हा अनुबन्ध वर सांगितल्याप्रमाणें नाहींसा झाल्यावर जो 'आम्' अवशिष्ट राहतो तो स्थानिवद्भावानें प्रत्ययसंज्ञक आहेच; अकार नाहींसा झाल्यामुळें 'आम्' प्रत्ययसंज्ञक ठरत नाहीं असें मुळींच म्हणतां येत नाहीं. त्यामुळें 'प्रत्यय' हा शब्द उपदेशसंज्ञक आहे असें मानल्यास, त्या 'आम्' प्रत्ययांतील अन्त्य मकार 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञक ठरेल व 'आम्' प्रत्यय मित् ठरेल. त्यामुळें 'आमोऽमित्वमदन्तत्वात्' असें जें प्रकाशकारांनीं स्वतः पुढील ग्रन्थांत म्हटलें आहे व प्रत्यय हा उपदेश आहे असें जें त्यांनीं 'धातुसूत्रगणोणादि' या कारिकेचें व्याख्यान करितांना पूर्वी म्हटलें आहे त्या दोन विधानांमध्यें परस्पर विरोध येतो हें उघड आहे. म्हणून प्रत्यय उपदेशसंज्ञक आहे असें मानणें उचित नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. येथपर्यंत प्रत्यय उपदेशसंज्ञक मानतां येत नाहीं हें सिद्ध करून आतां दीक्षित पुढील पंक्तींत 'आदेश' देखील उपदेशसंज्ञक मानतां

येत नाहीं हें सिद्ध करतात.) दुसरें असें कीं, प्रकाशकारांचें म्हणणें बरोबर मानलें तर, ज्या सूत्रांत प्रत्यय होण्याचें विधान केलें आहे तशा सूत्रांत पञ्चमीविभक्त्यन्त शब्दानंतर उच्चारलेल्या शब्दाला षष्ठ्यन्त करावें असा ('तस्मादित्युत्तरस्य' सू. ४० या परिभाषेचा) अर्थ केल्यानें 'सनः सन्नेव आदेशो भविष्यति' असा ('गुप्तिज्किद्भ्यः सन्' सू. २३९३ या सूत्राचा) अर्थ होईल अशी शंका उपस्थित करून, तसा त्या सूत्राचा अर्थ केला तरी, आदेश हा उपदेश नसल्यामुळें, 'सन्' या आदेशांतील अन्त्य नकाराला इत्संज्ञा होणार नाहीं असें जें भाष्यकारांनीं व त्या भाष्यावर टीका करितांना कैयटानें म्हटलें आहे त्याशीं (आदेश उपदेश मानल्यास, प्रकाशकारांनीं जें म्हटलें आहे तें) विरूद्ध ठरतें. ('तस्मादित्युत्तरस्य' १-१-६७ या सूत्रावरील भाष्यांत 'यथार्थं वा षष्ठीनिर्देशः' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकारांनीं असें म्हटलें आहे कीं, 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' व 'तस्मादित्युत्तरस्य' या सूत्रांत 'षष्ठी' या पदाचा निर्देश करण्याची कांहीं गरज नाहीं; कारण त्या दोन्ही सूत्रांत 'षष्ठी स्थानेयोगा' या पूर्व सूत्रांतून 'षष्ठी' हें पद अनुवृत्त केल्यानें, 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य षष्ठी, तस्मादिति निर्दिष्टे उत्तरस्य षष्ठी' असा त्या दोन सूत्रांचा अर्थ करतां येईल. पण पुढें भाष्यकार म्हणतात कीं, तसा त्या सूत्रांचा अर्थ केल्यास, ज्या सूत्रांत पञ्चमीविभक्त्यन्त शब्दाचा निर्देश करून प्रत्यय होण्याचें विधान केलें आहे तेथें पञ्चमीविभक्त्यन्त शब्दापुढें जो शब्द उच्चारला आहे त्याची षष्ठी करावी लागेल. उदाहरणार्थ 'गुप्तिज्किद्भ्यः सन्' या सन्प्रत्ययविधायक सूत्रांत 'गुप्तिजिकद्भ्यः' असा पञ्चमीनिर्देश असल्यामुळें त्या शब्दापुढील 'सन्' या प्रथमान्त शब्दाची 'सनः' अशी षष्ठी करावी लागेल व 'षष्ठी स्थानेयोगा' सू. ३८ या सूत्रान्वयें ती स्थान्यादेशसंबंधबोधिका षष्ठी मानावी लागेल. पण 'सनः' ही तशी षष्ठी मानल्यास, त्या सूत्रांत आदेशाचा

निर्देश केला नसल्यामुळें, 'सन्' चे जागीं आदेश कसा होणार व कोणता आदेश होणार ? या प्रश्नाचें उत्तर देतांना भाष्यकार असें म्हणतात कीं, वरील सूत्रांत कोणताहि आदेश जरी निर्दिष्ट नाहीं तरी, 'स्थानेऽन्तरतमः' सू. ३९ या सूत्रान्वयें 'सन्' चे जागीं 'सन्' असाच अन्तरतम आदेश होईल व 'गुप्तिज्किद्भ्यः सनः सन्' असा त्या सूत्राचा अर्थ होईल. पण भाष्यकार पुढें असें म्हणतात कीं, असें करणें शक्य नाहीं; कारण त्या 'सन्' आदेशांतील अन्त्य नकाराला इत्संज्ञा होणार नाहीं. याचें कारण हें कीं, उपदेशांतील—आद्योच्चारणांतील—अन्त्य हलालाच 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञा होणें सांगितलें आहे. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, आदेश हा उपदेश नव्हे. आदेश जर उपदेश असता तर, भाष्यकारांनीं 'नैवं शक्यम् । इत्संज्ञा न प्रकल्पेत । उपदेश इतीत्संज्ञोच्यते ।' असें त्या भाष्यांत म्हटलें नसतें. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'प्रकल्पकमिति चेत्... प्रत्ययविधौ खल्वपि पञ्चम्यः प्रकल्पिकाः स्युः । तत्र को दोषः ? । गुप्तिज्किद्भ्यः सन् । गुप्तिज्किद्भ्य इत्येषा पञ्चमी सन्निति प्रथमायाः षष्टीं प्रकल्पयेत्, तस्मादित्युत्तरस्येति । अस्तु । न कश्चिदन्य आदेशः प्रतिनिर्दिश्यते, तत्रान्तर्यतः सनः सन्नेव भविष्यति । नैवं शक्यम् । इत्संज्ञा न प्रकल्पेत । उपदेश इतीत्संज्ञोच्यते ।' या भाष्यांतील 'इत्संज्ञा न प्रकल्पेत' या पदांचा 'आदेशस्योपदेशाभावात् तस्येत्संज्ञा न सिध्यति' असा कैयटानें आपल्या वृत्तींत अर्थ केला आहे. सारांश भाष्यकारांनीं व कैयटानें आदेश हा उपदेश नव्हे असें स्पष्ट म्हटलें असल्यामुळें, आदेश उपदेश आहे हें प्रकाशकारांचें म्हणणें भाष्यकैयटविरुद्ध व चूक ठरतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां धातु देखील उपदेश मानतां येत नाहीं हें दीक्षित पुढील पंक्तींत सांगतात.)

आणखी असें की, 'न धातुलोप आर्धधातुके' १–१–४ या सूत्रावरील भाष्यांत 'धातुग्रहणं किम् ? लूञ् लषिता, पूञ् पविता' असें म्हटलें आहे, म्हणजे त्या सूत्रांत 'धातु' या पदाचें ग्रहण अशाकरिता केलें

आहे कीं, 'लूञ् लविता लवितुम्, पूञ् पविता पवितुम्' या स्थलीं 'सार्वधातुकार्धधातुकयोः' सू. २१६८ या सूत्रानें होणाऱ्या गुणाचा निषेध न व्हावा, व त्या भाष्याच्या वृत्तींत कैयटानें असें म्हटलें आहे कीं, उच्चारणकालींच अनुबन्धाचा लोप केल्यानंतर अवशिष्ट राहिलेल्या भागाला धातुसंज्ञा होते. धातु उपदेश मानल्यास, वरील भाष्याशीं व कैयटोक्तीशीं विरोध येतो. (धातुपाठांत 'लूञ् छेदने, पूञ् पवने' असा निर्देश आहे. 'लूञ्, पूञ्' हे धातु नसून उपदेश आहेत. या उपदेशांतील 'ञ्' या अन्त्य हलाला 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञा होऊन 'तस्य लोपः' सू. ६२ या सूत्रानें त्या इत्संज्ञक ञकाराचा लोप केल्यावर, अवशिष्ट राहिलेल्या 'लू, पू' यांना धातुसंज्ञा होते; कारण 'भूवादयो धातवः' सू. १८ या सूत्रानें धातुपाठांत निर्दिष्ट असलेल्या क्रियावाचक भ्वादि शब्दांना धातुसंज्ञा होणें सांगितलें असल्यामुळें व 'लूञ्, पूञ्' हे क्रियावाचक नसून 'लू, पू' हे क्रियावाचक असल्यामुळें, त्यांनाच धातुसंज्ञा होते. 'लूञ्, पूञ्' हे क्रियावाचक नाहींत असें जें नुकतेंच वर म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'लुनाति, पुनाति' इत्यादि रूपांत ञकार आढळत नाहीं. यावरून हें स्पष्ट होतें कीं, धातु हे उपदेश नव्हत व धातुपाठांत निर्दिष्ट असलेल्या उपदेशांतील इत्संज्ञक अनुबन्धाचा 'तस्य लोपः' या सूत्रानें लोप केल्यावर अवशिष्ट राहिलेल्या क्रियावाचक भागाला धातुसंज्ञा होते. त्या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'अनुबन्धो न धात्वेकदेशो, यस्मादुपदेश एवेत्संज्ञा। प्रयोगेतु लूशब्द एव धातुसंज्ञः। केवलमसौ ञित्कार्यं लभते। लूशब्दस्यैव हि क्रियावाचित्वमिति तस्यैव धातुसंज्ञा युक्ता।' असें म्हटलें आहे. सारांश वरील भाष्यावरून व कैयटवृत्तीवरून धातु उपदेश नव्हत हें स्पष्ट होत असल्यामुळें, प्रकाशकारांनीं धातु उपदेश होत असें जें म्हटलें आहे तें भाष्यकैयटविरुद्ध व चूक ठरतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां मनोरमेंत ज्या भाष्याचा उल्लेख केला आहे तें भाष्य

वास्तविक असें आहे–'धातुग्रहणं किमर्थम् ?। इह मा भुत्। लूञ् लविता लवितुम्। पूञ् पविता पवितुम्।' व त्या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'न धातुलोपे' या सूत्रांत 'धातु' या पदाचें ग्रहण न करितां 'न लोपे आर्धधातुके' असें सूत्र पठित केलें असतें तर त्या सूत्राचा असा अर्थ झाला असता कीं, लोप झाला असतां, आर्धधातुक प्रत्ययाच्या निमित्तामुळें होणारा गुण किंवा वृद्धि करूं नये व त्यामुळें 'लूञ्, पूञ्' या स्थलीं ञकारानुबन्धाचा लोप झाला असल्यामुळें 'लू, पू' या धातूंहून 'तृच्,' किंवा 'तुमुन्' हा आर्धधातुक प्रत्यय केला असतां, त्या धातूंतील अन्त्य ऊकाराचा गुण न होण्याची आपत्ति आली असती व 'लविता लवितुम्, पविता पवितुम्' अशीं इष्ट रूपें सिद्ध होऊं शकलीं नसतीं. पण त्या सूत्रांत 'धातु' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें व 'लूञ्, पूञ्' हा ञकारानुबन्धघटित समुदाय धातु नसून उपदेश असल्यामुळें आणि त्या समुदायांतील ज्या ञकाराचा लोप होतो तो धातूचा अवयव नसल्यामुळें, 'न धातुलोपे' या सूत्रानें होणारा गुणनिषेध प्रवृत्त होत नाहीं व गुण आणि आदेश होऊन इष्ट रूपांची सिद्धि होते. येथपर्यंत 'धातुसूत्रगणोणादि' या कारिकेंत निर्दिष्ट असलेले धातु इत्यादि उपदेशसंज्ञक आहेत असें जें विधान केलें आहे तें विधान प्रत्यय, आदेश व धातु यांच्या विषयांत चूक ठरतें हें सिद्ध करून आतां ती कारिका दोषयुक्त आहे, म्हणजे जे उपदेश आहेत त्यांचा उपदेशसंज्ञकशब्दांचें परिगणन करणाऱ्या त्या कारिकेंत निर्देश केला नसून, जे धातु, प्रत्यय व आदेश उपदेशसंज्ञक नाहींत त्यांचा त्या कारिकेंत निर्देश केला आहे व अशा रीतीनें ती कारिका न्यूनातिरिक्तदोषयुक्त आहे, हें सिद्ध करण्याकरितां दीक्षित पुढील पंक्ति लिहितात.) आणखी असें कीं, ('धातुसूत्रगणोणादि' या कारिकेंत निर्दिष्ट असलेले धातु इत्यादि एवढेच उपदेशसंज्ञक होत असें मानल्यास,) 'घ्वसोरेद्धौ अभ्यासलोपश्च' सू. २४७१ या सूत्रांत द्विशकारक निर्देश आहे असें मानावें

व द्वितीय शकार इत् समजावा असें जें 'अलोऽन्त्यात्पूर्व उपधा' १–१–६५ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं म्हटलें आहे व त्या भाष्याच्या वृत्तींत कैयटानें जें म्हटलें आहे त्याशीं विरोध येतो. ('अलोऽन्त्यात्पूर्व उपधा' १–१–६५ या उपधासंज्ञाविधायक सूत्रावरील भाष्यांत 'नानर्थकेऽलोऽन्त्यविधिरनभ्यासविकारे'–परि. १०५–ही परिभाषा भाष्यकारांनीं पठित केली आहे. त्या परिभाषेचा अर्थ हा आहे कीं, जेथें सूत्रांत अनर्थक वर्णसमूहाचे जागीं आदेश होणें सांगितलें आहे तेथें 'अलोऽन्त्यस्य' सू. ४२ हें सूत्र लागू पडत नाहीं; पण जेथें अभ्यासविकाररूप कार्य होणें सांगितलें आहे तेथें अनर्थकाचे जागीं आदेश होणें सांगितलें असलें तरी 'अलोऽन्त्यस्य' हें सूत्र लागू पडतें. या परिभाषेचें प्रयोजन सांगतांना भाष्यकार म्हणतात–'घ्वसोरेद्धावभ्यासलोपश्च इत्यन्त्यस्य प्राप्नोति। अनर्थकेऽलोऽन्त्यविधिर्नेति न दोषो भवति। एतदपि नास्ति प्रयोजनम्। पुनर्लोपवचनसामर्थ्यात्सर्वस्य भविष्यति। अथवा शिल्लोपः करिष्यते, स शित्सर्वस्येति सर्वादेशो भविष्यति। स तर्हि शकारः कर्तव्यः। न कर्तव्यः। क्रियते न्यास एव। द्विशकारको निर्देशः। घ्वसोरेद्धावभ्यासलोपश्श्चेति।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'घ्वसोरेद्धावभ्यासलोपश्च' या सूत्रानें घुसंज्ञक 'दा' व 'धा' या धातूंपुढें व तसेंच 'अस्' धातूपुढें 'हि' प्रत्यय आला असतां धातूंतील अकाराचें किंवा आकाराचे जागीं एकार करावा व अभ्यासाचा लोप करावा असें सांगितलें असल्यामुळें, 'दादा+हि=ददा+हि=ददे+हि' अशा स्थितींत 'द' या अभ्यासाचे ठिकाणीं 'अलोऽन्त्यस्य' हें सूत्र प्रवृत्त केल्यास, 'द' या अभ्यासांतील केवळ अन्त्य अकाराचा लोप होण्याची व 'द्देहि' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. परंतु 'नानर्थकेऽलोऽन्त्यविधिः' ही परिभाषा असल्यामुळें व 'द' हा अभ्यास अनर्थक–अर्थरहित–असल्यामुळें, 'अलोऽन्त्यस्य' हें सूत्र वरील उदाहरणांत प्रवृत्त होत नाहीं व वर दाखविलेली आपत्ति टळते आणि अशा रीतीनें ती

परिभाषा सप्रयोजनक व चरितार्थ ठरते. पण पुढें भाष्यकार असें म्हणतात कीं, ही परिभाषा न मानतां देखील वरील उदाहरणांत 'द' या संपूर्ण अभ्यासाचा लोप करतां येतो; कारण 'घ्वसोरेत्' या सूत्रांत 'लोपो यि' या पूर्व सूत्रांतून 'लोपः' या शब्दाची अनुवृत्ति करतां येत असून देखील पुन्हा 'अभ्यासलोपः' या स्थलीं 'लोपः' हा शब्द उच्चारला असल्यामुळें, त्या उच्चारणसामर्थ्यामुळें संपूर्ण अभ्यासाचा लोप करतां येतो. अथवा 'लोपः' हा शब्द शित् केल्यास, म्हणजे त्याला इत्संज्ञक शकार जोडल्यास, 'अनेकाल्शित्सर्वस्य' सू. ४५ या सूत्रान्वयें संपूर्ण अभ्यासाचे ठिकाणीं लोपरूप आदेश होऊं शकतो, म्हणजे संपूर्ण अभ्यासाचा लोप होऊं शकतो. एवढेंच कीं 'घ्वसोरेद्धावभ्यासलोपश्च' अशा प्रकारचेंच सूत्र पाणिनीनें उच्चारलें आहे असें समजावें व तसें मानल्यास, वरील परिभाषा न मानतां देखील, संपूर्ण अभ्यासाचा लोप होऊन 'देहि, धेहि' इत्यादि इष्ट रूपें सिद्ध होऊं शकतात. भाष्यकारांनीं हा जो इत्संज्ञक शकार जोडला आहे तो वरील कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या 'धातु' इत्यादिकांच्या अन्तीं जोडला नसून 'लोपः' या प्रथमान्त पदाच्या अन्तीं जोडला आहे. वरील कारिका बरोबर मानल्यास, त्या कारिकेंत 'पद' या शब्दाचा निर्देश केला नसल्यामुळें तो शकार इत्संज्ञक होऊं शकणार नाहीं. पण भाष्यकारांनीं तो शकार इत्संज्ञक मानला असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, वरील कारिकेंत केलेलें परिगणन चूक असून न्यून–अपुरें–देखील आहे. वरील भाष्यांतील 'द्विशकारको निर्देशः' या पदांचें व्याख्यान करितांना कैयटानें 'लोपशब्दात् कृदन्तात्संज्ञिनाऽर्थेनाऽर्थवत्त्वाद्विभक्तौ कृतायां शकारः प्रतिनिर्दिश्यते । तस्य चेत्संज्ञायां सत्यां सर्वादेशो लोपो भवति । इत्संज्ञोपदेशे एव प्रवर्तते । तत्कार्यं तु प्रयोग इत्येष सिद्धान्तः ।' असें म्हटलें आहे. दीक्षित म्हणतात कीं, वरील कारिकेंत ज्या धातु इत्यादिकांचा निर्देश केला आहे त्यांच्यापैकीं कोणाच्याहि कक्षेंत 'लोपः' हा शब्द येत नसून

'अदर्शनं लोपः' सू. ५३ या सूत्रान्वयें संज्ञावाचक असणाऱ्या 'लोप' या प्रातिपदिकाच्या प्रथमैकवचनाच्या 'लोपः' या रूपाला भाष्यकारांनीं इत्संज्ञक शकार जोडला असल्यामुळें, कारिकेंतील परिगणन वरील भाष्याच्या व कैयटोक्तीच्या विरुद्ध ठरतें. येथपर्यंत प्रथम पक्षाचें, म्हणजे 'पङ्कज' हा शब्द भाषेंत कमल या अर्थामध्यें जसा रूढ आहे त्याचप्रमाणें कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातु इत्यादि अर्थामध्यें 'उपदेश' हा शब्द लौकिक व्यवहारांत रूढ आहे या पक्षाचें, खण्डन करून, आतां दीक्षित पुढील पंक्तींत द्वितीय पक्षाचें–'उपदेश' हा शब्द पङ्कज इत्यादि शब्दांसारखा योगरूढ अर्थाचा वाचक नसून, प्रकृतीला प्रत्यय लावल्यानें जो अर्थ निष्पन्न होतो तशा यौगिक अर्थाचा, 'पाठक' इत्यादि शब्दांसारखा, वाचक आहे या पक्षाचें–खण्डन करितात.) 'उपदेश' हा शब्द रूढ अर्थाचा वाचक नसून केवळ यौगिक अर्थाचा वाचक आहे हा द्वितीय पक्ष मानल्यास, कारिकेंत केलेलें परिगणन व्यर्थ ठरतें. ('उपदेश' ही रूढ संज्ञा लौकिक व्यवहारांत अमुकांनाच लागू पडते व ती इतरांना मुळींच लागू पडत नाहीं असें मानलें तरच, कोणाला ती संज्ञा लागू पडते याचें ज्ञान होण्याकरितां परिगणन आवश्यक ठरतें. पण जर 'उपदेश' हा शब्द केवळ यौगिक अर्थाचा वाचक मानला तर, जे त्या अर्थाच्या कक्षेंत येतात त्यांना 'उपदेश' म्हणतां येईल. मग परिगणन करण्याची गरज काय असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'उपदेश' या शब्दाचा केवळ यौगिक अर्थ स्वीकारल्यास, कारिकेच्या पूर्वार्धांत निर्दिष्ट असलेल्या) 'धातु' इत्यादिकांना 'उपदेश' हा शब्द लागू पडण्याकरितां ('उपदिश्यते अनेन इति उपदेशः' अशी) 'करणे घञ्' प्रत्यय करून 'उपदेश' या शब्दाची व्युत्पत्ति करणें (व कारिकेच्या उत्तरार्धांत निर्दिष्ट असलेल्या) 'आगम' इत्यादिकांना तो शब्द लागू पडण्याकरितां तशी 'करणे घञ्' प्रत्यय करून 'उपदेश' या शब्दाची व्युत्पत्ति न करणें (व 'कर्मणि घञ्'

प्रत्यय करून 'उपदिश्यते इति उपदेशः' अशी त्या शब्दाची भिन्न तऱ्हेनें व्युत्पत्ति करणें) या वैषम्याची उपपत्ति लावणें अशक्य आहे. (सारांश 'उपदेश' हा शब्द केवळ यौगिक अर्थाचा वाचक आहे असें मानल्यास, 'सकृदुच्चरितः शब्दः सकृदेवार्थं गमयति' या न्यायान्वयें त्या शब्दाची एकच तऱ्हेनें व्युत्पत्ति करून एकच अर्थ करणें योग्य आहे व भिन्न भिन्न तऱ्हेनें व्युत्पत्ति करून भिन्न भिन्न अर्थ करणें हें वरील न्यायाच्या विरुद्ध आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) आणखी असें कीं, द्वितीय यौगिक पक्ष मानल्यास, प्रकाशकारांनीं ('हलन्त्यम्' या सूत्राचें व्याख्यान करितांना) 'उपदेशताप्रयोजक-धातुत्वादिरूपोपाध्यवच्छिन्नसमुदायान्त्यं हलित्यर्थः' असें जें स्वतः म्हटलें आहे त्याशीं विरोध येतो. (त्या पंक्तीचा अर्थ असा आहे कीं, उपदेशतेचे प्रयोजक–'उपदेश' हा शब्द लागू पडण्यास आवश्यक असणारे–धातुत्व इत्यादि जे धर्म त्या धर्मांनीं अवच्छिन्न–युक्त-असलेल्या समुदायांतील अन्त्य हल् इत्संज्ञक होतो असा 'हलन्त्यम्' या सूत्राचा अर्थ समजावा. 'उपदेश' हा शब्द पङ्कज इत्यादि शब्दांसारखा लौकिक व्यवहारांत रूढ असलेल्या अर्थाचा वाचक आहे हा प्रथम पक्ष स्वीकारल्यासच, प्रकाशकारांनीं केलेलें वरील व्याख्यान उपपन्न ठरतें. पण 'उपदेश' हा शब्द 'पाठक' इत्यादि शब्दांसारखा केवळ यौगिक अर्थाचा वाचक आहे असा द्वितीय पक्ष मानल्यास, तें व्याख्यान मुळींच उपपन्न ठरत नाहीं; कारण या द्वितीय पक्षांत ज्यांना 'उपदेश' हा यौगिक शब्द लागू पडतो त्यांना 'उपदेश' मानतां येईलच. ते धातुत्वादिधर्मविशिष्ट समुदायच असले पाहिजेत असें मानण्याची गरज काय ? तसें मानणें हें प्रथम पक्षाचाच पुरस्कार करणें असून द्वितीय पक्षाच्या विरुद्ध आहे. म्हणून प्रकाश-कारांनीं 'हलन्त्यम्' या सूत्राचें व्याख्यान करितांना वर सांगितल्या-प्रमाणें जें म्हटलें आहे त्या व्याख्यानान्वयें द्वितीय पक्ष मुळींच स्वीकारतां येत नाहीं व प्रथम पक्षच स्वीकारतां येतो असा

दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. तो प्रथम पक्ष कसा दोषयुक्त आहे हें दीक्षितांनीं वर सांगितलेंच आहे. या पंक्तीचें अधिक विवरण शब्दरत्नांत करण्यांत येईल.) आणखी असें कीं, वरील दोन पक्षांपैकीं कोणताहि पक्ष स्वीकारला तरी (कारिकेंत पठित असलेला) 'लिङ्गानुशासन' हा शब्द प्रकृत विषयांमध्यें निरुपयोगी ठरतो. (कारण लिङ्गानुशासन पाठांत इत्संज्ञा करण्याचा प्रसंगच उपस्थित होत नाहीं. त्या पाठांत प्रत्ययादिकांचा अनुवाद करूनच तसें प्रत्ययान्त शब्द कोणत्या लिङ्गाचे समजावे वगैरे सांगितलें आहे.) आणखी असें कीं, वरील दोन पक्षांतून कोणताहि पक्ष मानला तरी, 'लोपश्च' या स्थलीं जो शकार प्रश्लिष्ट केला आहे त्याचा संग्रह होऊं शकत नाहीं म्हणजे त्या शकाराला इत्संज्ञा होऊं शकत नाहीं. (पहिला योगरूढ पक्ष स्वीकारला तर, कारिकेंत सुबन्ताचें परिगणन केलें नसल्यामुळें, 'लोपः' या सुबन्ताला जोडलेल्या शकाराला इत्संज्ञा होऊं शकत नाहीं. द्वितीय पक्षांत देखील शकार कां इत्संज्ञक होऊं शकत नाही याचें कारण 'न ह्यनेन किञ्चिदुपदिश्यते' असें शब्दरत्नांत दिलें आहे व त्याचें विवेचन शब्दरत्नांत करण्यात येईल. परंतु 'उपदेश' हा शब्द भावघञन्त मानून त्याचा 'आद्योच्चारण' असा अर्थ केल्यानें 'लोपश्' या आद्योच्चारणांतील अन्त्य शकाराला 'हलन्त्यम्' या सूत्रान्वयें इत्संज्ञा होण्यांत कांहींच अडचण येत नाहीं.) तसेंच 'आदेच उपदेशे' सू. २३७०, 'उपदेशेऽत्वतः' सू. २२९५ ('एकाच उपदेशेऽनुदात्तात्' सू. २२४६) इत्यादि सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'उपदेश' या शब्दाचा अर्थ 'आद्योच्चारण' च आहे असें सर्वांना संमत असल्यामुळें, ('उपदेशेऽजनुनासिक इत्' सू. ३ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या) 'उपदेश' या शब्दाचा ('भावे' या सूत्रानें सिद्धावस्थापन्न-क्रिया या अर्थामध्यें घञ् प्रत्यय करून) आद्योच्चारण असाच अर्थ करणें योग्य आहे (व भिन्न भिन्न सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या त्या शब्दाचा 'आद्योच्चारण' असा एकच तऱ्हेनें सर्वत्र अर्थ करणें संभवत असतां, तसाच अर्थ सर्वत्र करणें योग्य असून भिन्न भिन्न रीतीनें अर्थ करणें योग्य नाहीं.)

शब्दरत्न– धातुसूत्रेत्यादीति । “धातु सूत्रगणोणादिवाक्य-लिङ्गानुशासनम् । आगमप्रत्ययादेशा उपदेशाः प्रकीर्तिताः” इतीत्यर्थः । उपदेशत्वमिति । उपदेशशब्दव्यवहार इत्यर्थः । धातोरपीति । प्रत्ययेभ्य उणादेरपीत्यपिशब्दार्थः । वाक्यशब्देन वार्तिकम् । शीङ्, लण्, चोरट्, उण्, आचारेऽवगल्भ, धुट्, अण्, अनाङित्युदाहरणानि । उपदेशसञ्ज्ञेति । उपदेशपदं योगरूढमेष्विति भावः । ननु सञ्ज्ञाशब्देन व्यवहार एवाभिमतोऽत आह–आम इत्यादि । न चाकारोच्चारणं व्यर्थम्, तेनास्मत्पक्षज्ञापन-स्यैवौचित्यादिति भावः । आदिना यकारादी चुञ्चुप्चणपावित्यादिसंग्रहः । उपदेशाभावादिति । आदेशस्योपदेशाभावादित्यर्थः । ततो धातुसञ्ज्ञेति । लूशब्द एव धातुसञ्ज्ञकः, केवलमसौ ञित्कार्यं लभत इति भावः । नन्वत्र सूत्रसाहचर्याद्धात्वागमप्रत्ययादिशब्देन तद्बोधकपाणिन्यादि-पठितानुपूर्वीकाणां ग्रहणम्, तेषां धात्वादिव्यवहारस्तु भाविसञ्ज्ञा-विषयघटितत्वेन ‘धातुपाठ’ इत्यादिव्यवहारवदिति चेन्न, आद्योच्चारण-विषयाणामित्येव सिद्धे एतस्यानुपयोगात् । इत एव वाऽरुचेराह-अपि चेति ।

अलोऽन्त्यसूत्रेति । उपधासञ्ज्ञासूत्रेत्यर्थः । विरुदध्येतेति । तत्र हि ‘लोपश्’ इति भिन्नं पदम् ‘श्’ इति च । पूर्वस्य श्चुत्वेन शः । असन्देहाय झल्परसंयोगादित्वेऽपि “स्कोः” इत्यस्य न प्रवृत्तिः, “झलां जश्” इत्यादौ जश्त्वस्येव । शकारस्य धात्वाद्यन्तत्वाभावः स्पष्ट एवेति भावः ।

मनोरमेंतील ‘धातुसूत्रेत्यादि पठन्ति’ या पंक्तींतील ‘इति’ या शब्दाचा ‘धातुसूत्रगणोणादिवाक्यलिङ्गानुशासनम् । आगमप्रत्यया-देशा उपदेशाः प्रकीर्तिताः ।।’ ही कारिका असा अर्थ आहे. ‘पूर्वाधोपात्तानामुपदेशत्वम्’ या मनोरमेच्या पंक्तींतील ‘उपदेशत्वम्’ या पदाचा ‘उपदेशशब्दव्यवहारः’–‘उपदेश’ हा शब्द लौकिक व्यवहारांत कारिकेच्या पूर्वार्धांत निर्दिष्ट असलेल्या धातु इत्यादिकांना रूढीनें लागू पडतो–असा अर्थ आहे. मनोरमेंतील ‘धातोरपि’ यांतील

'अपि' शब्दाचा असा अर्थ आहे कीं, कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या 'प्रत्यय' या शब्दानें उणादि प्रत्ययांचें देखील ग्रहण होऊं शकतें. (परंतु त्यांचें कारिकेंत जें पृथक् ग्रहण केलें आहे तें गोबलीवर्दन्यायानें केलें आहे.) कारिकेंतील 'वाक्य' या शब्दाचा ('सुप्तिङन्तचयो वाक्यम्' असा जो प्रसिद्ध अर्थ आहे तो अर्थ नसून) 'वार्तिक' असा अर्थ आहे. 'शीङ, लण्, चोरट्, उण्, आचारेऽवगल्भ, धृट्, अण्, अनङ' हीं (कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातु इत्यादिकांचीं अनुक्रमें) उदाहरणें होत. ('शीङ स्वप्ने' हें धातूचें उदाहरण आहे. धातुपाठांतील अदादिगणांत 'शीङ' असा उपदेश असल्यामुळें, त्यांतील अन्त्य ङकाराला 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञा होते व 'अनुदात्तङित आत्मनेपदम्' सू. २१५७ या सूत्रान्वयें 'शी' धातूला आत्मनेपदी प्रत्यय होतात. 'लण्' हें सूत्राचें उदाहरण असून तें सहावें शिवसूत्र आहे व त्यामुळें 'हलन्त्यम्' या सूत्रान्वयें 'लण्' यांतील अन्त्य णकाराला इत्संज्ञा होते व तो णकार इत्संज्ञक असल्यामुळें, 'आदिरन्त्येन सहेता' या सूत्रान्वयें 'अण् इण्' हे प्रत्याहार सिद्ध होतात. 'चोरट्' हें गणाचें उदाहरण आहे; हा शब्द पचादिगणांत उपदेशरूपानें पठित असल्यामुळें त्या शब्दांतील अन्त्य टकाराला 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञा होते व त्यामुळें 'टिड्ढाणञ्' सू. ४७० या सूत्रान्वयें 'चोर' या प्रातिपदिकाला 'ङीप्' प्रत्यय होऊन 'चोरी' असें स्त्रीलिङ्गाचें रूप होतें. 'उण्' हें उणादीचें उदाहरण आहे व 'कृवापाजिमिस्वदिसाध्यशूभ्य उण्' या प्रथम उणादि सूत्रांत 'उण्' असा उपदेश असल्यामुळें, त्या 'उण्' मधील अन्त्य णकार 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञक होतो व त्यामुळें 'अत उपधायाः सू. २२८२ या सूत्रान्वयें उपधेंतील अकाराची वृद्धि होऊन व 'अचो ञ्णिति' सू. २५४ या सूत्रानें अन्त्य इक्‌ची वृद्धि होऊन 'कारुः जायुः मायुः आशुः' इत्यादि रूपें सिद्ध होतात. 'आचारेऽवगल्भ' हें वार्तिकाचें उदाहरण आहे व 'आचारेऽवगल्भक्लीबहोडेभ्यः क्विब्वा' असें तें

संपूर्ण वार्तिक असून तें २६६५ या सूत्रावरील कौमुदींत पठित आहे. या वार्तिकांत 'अवगल्भ, क्लीब, होड' असा उपदेशरूपानें निर्देश केला असल्यामुळें, त्या तीन्ही शब्दांतील अन्त्य अनुदात्त अनुनासिक अकार 'उपदेशेऽजनुनासिक इत्' सू. ३ या सूत्राने इत्संज्ञक होतो व 'अनुदात्तङित आत्मनेपदम्' सू. २१५७ या सूत्रान्वयें त्या तीन शब्दांहून आत्मनेपदाचे प्रत्यय होऊन 'अवगल्भते, क्लीबते, होडते' इत्यादि रूपें सिद्ध होतात. 'धुट्' हें आगमाचें उदाहरण आहे आणि 'डः सि धुट्' सू. १३१ इत्यादि सूत्रांत 'धुट्' असा आगमाचा उपदेश केला असल्यामुळें, त्यांतील अन्त्य टकार 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञक होतो व 'आद्यन्तौ टकितौ' सू. ३६ या सूत्रान्वयें तो आगम सूत्रनिर्दिष्ट सकार इत्यादिकांचा आद्यवयव होतो. 'अण्' हें प्रत्ययाचें उदाहरण आहे व 'प्राग्दीव्यतोऽण्, अश्वपत्यादिभ्यश्च' सू. १०७३, १०७४ इत्यादि सूत्रांत तो प्रत्यय उपदेशरूपानें पठित असल्यामुळें, त्यांतील अन्त्य णकाराला 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञा होते आणि अशा रीतीनें तो प्रत्यय णित् ठरत असल्यामुळें ज्याहून तो प्रत्यय होतो त्यांतील अन्त्य इक्‌ची व उपधेंतील अकाराची 'अचो ञ्णिति' व 'अत उपधायाः' या सूत्रांन्वयें वृद्धि होते. 'अनङ' हें आदेशाचें उदाहरण आहे व तसा आदेश 'अनङ सौ' सू. २४८ इत्यादि सूत्रांत उपदेशरूपानें पठित असल्यामुळें, त्यांतील अन्त्य ङकार 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञक होतो आणि तो आदेश अनेकाल् असून देखील ज्याला तो होणें सांगितलें आहे त्याच्या अन्त्य वर्णाचे जागीं 'ङिच्च' सू. ४३ या सूत्रान्वयें तो होतो. वर जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांत लिङ्गानुशासनाचें उदाहरण दिलें नाहीं. त्याचें कारण हेंच कीं, लिङ्गानुशासनपाठांत इत्संज्ञा होत नाहीं व कारिकेंत 'लिङ्गानुशासन' हा शब्द व्यर्थ घातला आहे हें पूर्वी मनोरमेंत सांगितलेंच आहे. उपदेशविषयीभूत शब्दांना जे इत्संज्ञक अनुबन्ध लावले जात असतात ते निरर्थक नसून सप्रयोजनक असतात हें

ध्यानांत यावें याकरितां वरील उदाहरणांतील प्रत्येक अनुबन्धाचें प्रयोजन वर सांगितलें आहे.) मनोरमेंतील 'किमेषामुपदेशसंज्ञा' याचा अर्थ हा आहे कीं, कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या 'धातुसूत्र' इत्यादिकांचे ठिकाणीं 'उपदेश' हा शब्द योगरूढ आहे काय, म्हणजे 'उपदेश' या शब्दाचा लौकिक व्यवहारांत 'धातुसूत्र इत्यादि' रूढ अर्थ आहे काय व 'उपदेश' या रूढ शब्दानें ते बोधित होतात काय? (सारांश जरी चिखलांत उत्पन्न होणाऱ्या सर्व वस्तूंना पङ्कज असें म्हणतां येतें तरी तो शब्द 'कमल' या अर्थामध्येंच जसा भाषेंत रूढ आहे तसाच 'उपदेश' हा शब्द 'धातुसूत्रगणोणादि' या कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातुसूत्र इत्यादिकांचा लौकिक व्यवहारांत रूढीनें बोधक आहे काय असें मनोरमेंतील 'किमेषामुपदेशसंज्ञा' या पहिल्या प्रश्नांत विचारलें आहे. आतां येथें असें म्हणतां येऊं शकतें कीं, प्रक्रियाकौमुदीकारांनीं 'धातुसूत्रगणोणादि' ही जी कारिका पठित केली आहे ती अशाच आशयानें पठित केली आहे कीं, लौकिक व्यवहारांत 'उपदेश' हा शब्द रूढीनें त्या कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातुसूत्र इत्यादिकांचा बोधक आहे व म्हणून 'किमेषामुपदेशसंज्ञा उत योगमात्रम्' असा जो मनोरमेंत विकल्पप्रदर्शक प्रश्न केला आहे तो अनुचित ठरतो. परंतु प्रकाशकारांनीं त्या कारिकेचें व्याख्यान करितांना 'उपदेश' या शब्दाची एकदां 'करणे घञ्' प्रत्यय करून व पुन्हा 'कर्मणि घञ्' प्रत्यय करून व्युत्पत्ति केली असल्यामुळें असें दिसून येतें कीं, त्यांनीं बहुधा योगाचाच पुरस्कार केला आहे, म्हणजे 'उपदेश' हा शब्द त्यांनीं रूढ न मानतां केवळ यौगिक मानला आहे. म्हणून दीक्षित प्रकाशकारांना असा प्रश्न करितात कीं तुम्ही जें योगार्थाचें वर्णन केलें आहे तें प्रक्रियाकौमुदीकारांच्या मताला अनुसरून 'उपदेश' हा शब्द रूढ आहे या आशयानें केलें आहे किंवा तो केवळ यौगिक शब्द आहे या आशयानें केलें आहे आणि अशा रीतीनें तो विकल्पप्रदर्शक प्रश्न

उपपन्न ठरतो. भावप्रकाशकारांनीं त्या विकल्पप्रदर्शक प्रश्नाचें वर सांगितल्या रीतीनेंच समाधान केलें आहे. भावप्रकाशकार म्हणतात– 'ननु प्राचो रूढेरेवोक्त्या व्याख्यातुर्योगस्यैवोक्त्या तथा विकल्पानवकाशोऽत आह। उपदेशपदमिति। उभयोक्त्या पङ्कजादिवत्तस्यैव व्याख्यानेन पाचकादिवद्वा तव मतमिदमिति मूलकृता प्रतिपाद्यते।') जर प्रकाशकारांचें असें म्हणणें असेल कीं, 'उपदेश' या शब्दाचा 'व्यवहार' असाच अर्थ अभिप्रेत आहे (व 'उपदेश' हा शब्द लौकिकव्यवहारांत कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातु इत्यादिकांना रूढीनें लागू पडणारा शब्द आहे) तर, त्या मताचें खण्डन करण्याकरिता दीक्षितांनीं 'आमोऽमित्वमदन्तत्वात्' या प्रकाशकारांच्या उक्तीचा उल्लेख केला आहे. (दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जर प्रकाशकार प्रक्रियाकौमुदीकारांच्या मताचाच पुरस्कार करीत असतील तर, त्यांनीं 'आमोऽमित्वमदन्तत्वात्' असें जें पुढें म्हटलें आहे तें त्या मताच्या विरूद्ध जातें; कारण 'आम' असा अदन्त शब्द पठित आहे असें मानलें तरी, त्या शब्दांतील इत्संज्ञक अकारानुबन्धाचा 'तस्य लोपः' सू. ६२ या सूत्रानें लोप केल्यावर जो 'आम्' अवशिष्ट राहतो तो प्रत्ययसंज्ञक आहेच व प्रत्यय रूढीनें उपदेशसंज्ञक आहे असें मानल्यास, 'आम्' यांतील मकार 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञक होऊन तो प्रत्यय मित् ठरतो व तो प्रत्यय अमित् आहे असें जें त्यांचें म्हणणें आहे तें सिद्ध होऊं शकत नाहीं.) 'आम' यांतील अकारानुबन्धाचें उच्चारण व्यर्थ नाहीं. त्या अकारानुबन्धोच्चारणानें आमचा पक्ष ज्ञापित होतो हेंच मानणें उचित आहे. ('उपदेश' हा शब्द भावघञन्त असून 'आद्योच्चारण' या अर्थाचा वाचक आहे हा जो आमचा सिद्धान्तपक्ष आहे तोच 'आम' हा अदन्त मानल्यानें सिद्ध होतो; कारण 'आम' हें आद्योच्चारण असल्यामुळें, त्याच्या अन्त्य अकारालाच 'उपदेशेऽजनुनासिक इत्' सू. ३ या सूत्रानें इत्संज्ञा होते व अवशिष्ट राहिलेल्या 'आम्' यांतील

अन्त्य मकाराला 'हलन्त्यम्' या सूत्रानें होणारी इत्संज्ञा होऊं शकत नाहीं; कारण अवशिष्ट राहिलेला 'आम्' जरी प्रत्यय आहे तरी, तो आद्योच्चारण नसून 'आम' हें आद्योच्चारण असल्यामुळें, त्या 'आम्' ला सिद्धान्तपक्षांत उपदेश मानतां येत नाहीं. परंतु 'उपदेश' हा शब्द लौकिक व्यवहारांत प्रत्यय इत्यादिकांचा वाचक रूढ शब्द आहे असें मानल्यास, 'आम' यांतील अन्त्य अकारानुबन्धाचा लोप झाल्यावर अवशिष्ट राहिलेला 'आम्' प्रत्ययसंज्ञक असल्यामुळें, त्यांतील अन्त्य मकार 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञक होणार व त्यामुळें तो प्रत्यय अमित् ठरूं शकणार नाहीं आणि 'आम' चे ठिकाणीं, 'आम्' प्रत्ययांतील मकाराचा लोप न व्हावा याकरितां, मुद्दाम मानलेलें अकारान्तोच्चारण व्यर्थ ठरणार. सारांश 'आम' याचें अदन्तत्व योगरूढपक्षाचें ज्ञापक नसून सिद्धान्तपक्षाचेंच ज्ञापक आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'इत्यादि-स्वपरग्रन्थविरोधाच्च' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यांतील 'आदि' या शब्दानें यकारादि 'चुञ्चुप्, चणप्' इत्यादि प्रत्ययांचा संग्रह होतो. ('तेन वित्तश्चुञ्चुप्चणपौ' सू. १८२७ या सूत्रांत 'तेन वित्तः' या अर्थामध्यें 'चुञ्चुप्' व 'चणप्' प्रत्यय होण्याचें विधान केलें आहे. या दोन्ही प्रत्ययांत चकार आदि असल्यामुळें, 'चुटू' सू. १८९ या सूत्रानें त्या चकाराला इत्संज्ञा होण्याची आपत्ति येते व 'तस्य लोपः' या सूत्रानें त्या चकाराचा लोप केल्यास, 'विद्याचुञ्चुः, विद्याचणः' इत्यादि इष्ट रूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत. ती आपत्ति टाळण्याकरितां 'चुटू' १-३-७ या सूत्रावरील भाष्यांत भाष्य-कार म्हणतात–'एवं तर्हि यकारादी चुञ्चुप्चणपौ । किं यकारो न श्रूयते? । लुप्तनिर्दिष्टो यकारः।' या भाष्याचा अर्थ असा आहे कीं, 'चुञ्चुप्' व 'चणप्' हे प्रत्यय यकारानें सुरु होणारे प्रत्यय आहेत असें मानावें व त्यांत प्रश्लिष्ट असलेल्या यकाराचा 'लोपो व्योर्वलि' सू. ८७३ या सूत्रानें लोप झाला आहे असें समजावें आणि

त्याचमुळें त्या दोन प्रत्ययांत यकाराचें श्रवण होत नाही. दीक्षितांनीं देखील 'तेन वित्तः' सू. १८२७ या सूत्रावरील कौमुदींत 'यकारः प्रत्यययोरादौ लुप्तनिर्दिष्टः । तेन चस्य नेत्संज्ञा' असेंच म्हटलें आहे. सारांश 'आम' यांतील मकाराला इत्संज्ञा न व्हावी म्हणून त्याचें जसें अदन्त उच्चारण केलें आहे त्याचप्रमाणें 'चुञ्चुप्, चणप्' या प्रत्ययांतील आद्य चकाराला इत्संज्ञा न व्हावी म्हणून ते प्रत्यय यकारादि मानले आहेत. योगरूढपक्ष स्वीकारल्यास, त्या दोन प्रत्ययांतील आद्य यकाराचा लोप केल्यावर देखील अवशिष्ट राहिलेले 'चुञ्चुप्, चणप्' हे प्रत्यय असल्यामुळें, त्यांच्या आद्य चकाराचा 'चुटू' या सूत्रानें पुन्हा लोप होणार व ते प्रत्यय यकारादि पठित करून कोणताहि फायदा होणार नाहीं. म्हणून प्रत्यय उपदेशसंज्ञक मानणें अयोग्य आहे. 'उपदेश' या पदाचा 'आद्योच्चारण' असा अर्थ केल्यानें, यकारादि 'चुञ्चुप्, चणप्' हे आद्योच्चारण असून अवशिष्ट 'चुञ्चुप्, चणप्' जरी प्रत्यय आहेत तरी ते आद्योच्चारण नसल्यामुळें, त्या प्रत्ययांतील आद्य चकार इत्संज्ञक होण्याची व त्याचा लोप होण्याची आपत्ति टळते म्हणून भावघञन्त पक्ष मानणेंच योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'उपदेशाभावादित्संज्ञा न स्यात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यांतील 'उपदेशाभावात्' या पदाचा 'आदेशस्योपदेशाभावात्' असा अर्थ आहे. (सारांश भाष्यकारांनीं आदेश हा उपदेश नव्हे असें म्हटलें असल्यामुळें, आदेश उपदेशसंज्ञक आहे हें प्रकाशकारांचें म्हणणें चूक ठरतें.) 'ततो धातुसंज्ञा' असा जो मनोरमेंत कैयटवृत्तीचा उल्लेख केला आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('लूञ्' हा उपदेश असून त्यांतील) 'लू' एवढाच शब्द धातुसंज्ञक आहे व त्याला ('हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञक होणारा) जो ञकार लावला आहे त्याचें फल हेंच आहे कीं, ('स्वरितञितः कर्त्रभिप्राये क्रियाफले' सू. २१५८ या सूत्रान्वयें) त्या 'लू' धातूला

ञित्कार्य होतें, म्हणजे तो धातु उभयपदी होतो. कित्येकांचें–खण्डन-काराचें–असें म्हणणें आहे कीं, 'धातुसूत्रगणोणादि' या कारिकेंतील 'सूत्र' या शब्दाच्या साहचर्यानें धातु, आगम, प्रत्यय इत्यादि शब्दांनीं, पाणिनी, वार्तिककार इत्यादिकांनीं स्वरचित सूत्रांत किंवा पाठांत व वार्तिकांत जसा त्या धात्वादिकांचा (सानुबन्धक) पाठ केला आहे तशा आनुपूर्वीविशिष्ट शब्दांचें ग्रहण होतें. (आतां हें खरें कीं, प्रयोगकालीं धात्वादिकांना लावलेला अनुबन्ध दृष्टिगोचर होत नसल्यामुळें, तशा सूत्रनिर्दिष्ट किंवा पाठनिर्दिष्ट सानुबन्धक धात्वादि-कांना धात्वादि म्हणतां येत नाहीं. त्यांचा अनुबन्ध नाहींसा केल्यावर अवशिष्ट भागालाच धातु इत्यादि संज्ञा होते. तरी पण धातुपाठांत जे अनुबन्धसहित शब्द पठित आहेत ते वास्तविक धातुसंज्ञक नसून देखील तशा सानुबन्ध) पाठाचे ठिकाणीं जसा धातुपाठ इत्यादि व्यवहार केला जातो त्याचप्रमाणें (सूत्रांत धातु, आगम, आदेश इत्यादि उपदेशविषयीभूत शब्दांना जो अनुबन्ध लावला आहे त्याचा लोप केल्यावर) पुढें त्यांना ज्या धातु, प्रत्यय, आगम इत्यादि संज्ञा प्राप्त होणार आहेत त्या भावि संज्ञांचे ते धात्वादि विषय होणारे असल्यामुळें, तशा सानुबन्धक शब्दांचे ठिकाणीं धातु, प्रत्यय, आगम इत्यादि व्यवहार उपपन्न ठरतो. ('सूत्रसाहचर्यात्' असें जें खण्डन-कारानें म्हटलें आहे त्यांतील 'साहचर्य' या शब्दाचा 'सादृश्य'–सदृशधर्मत्व–असा अर्थ आहे. सूत्रें व धातुपाठ पाणिनीनें रचलीं असल्यामुळें जसा त्यांचे ठिकाणीं पाणिनीयत्व–पाणिनिकृतत्व–धर्म आहे त्याचप्रमाणें त्या पाणिनीय सूत्रांत किंवा धातुपाठांत निर्दिष्ट असलेल्या सानुबन्धक प्रत्यय, आगम, आदेश, धातु यांचे ठिकाणीं देखील, ते पाणिनीनें तशा रीतीनें उच्चारलेले असल्यामुळें, पाणिनीयत्व धर्म आहेच व या धर्मसादृश्यामुळें जसें कारिकेंतील 'सूत्र' या शब्दानें पाणिनीय सूत्रांचें ग्रहण होतें त्याचप्रमाणें त्या कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या प्रत्यय, आगम, आदेश, धातु या शब्दांनीं, पाणिनीनें

स्वरचित सूत्रांत किंवा धातुपाठांत जें त्यांचें सानुबन्ध उच्चारण केलें आहे तशा वर्णानुपूर्वीविशिष्ट उच्चारणाचेंच ग्रहण केलें पाहिजे असा खण्डनकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. हें खरें कीं, तसे सूत्रनिर्दिष्ट किंवा धातुपाठनिर्दिष्ट सानुबन्धक शब्द प्रत्यय, आगम, आदेश, धातु या संज्ञा होण्यास पात्र नाहींत. अनुबन्धाचा लोप केल्यावर अवशिष्ट राहिलेल्या भागालाच त्या संज्ञा होण्याची पात्रता येते. तरी पण अनुबन्ध नाहींसा केल्यावर त्यांना पुढें तशा संज्ञा अवश्य प्राप्त होणार असल्यामुळें व ते त्या संज्ञांचे अवश्य विषय होणार असल्यामुळें, तशा भावि संज्ञेचा आश्रय केल्यानें, सानुबन्धक शब्दांचे ठिकाणीं धातु प्रत्यय, आगम, आदेश इत्यादि व्यवहार लक्षणेनें करतां येतो व कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या त्या शब्दांचा तसा लक्षणेनें अर्थ केला असतां, दीक्षितांनीं मनोरमेंत जे प्रकृत कारिकेवर दोष दिले आहेत ते मुळींच उद्भवत नाहींत. उदाहरणार्थ पाणिनीय धातुपाठांत 'लूञ्, पूञ्, शीङ' असा निर्देश असल्यामुळें, कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या 'धातु' या शब्दानें तशा निर्देशाचें ग्रहण केल्यास आणि तसेंच 'अनङ सौ' इत्यादि सूत्रांत 'अनङ' असा निर्देश असल्यामुळें कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या 'आदेश' या शब्दानें तशा निर्देशाचें ग्रहण केल्यास, दीक्षितांनीं जे मनोरमेंत दोष दाखविले आहेत ते निरर्थक ठरतात असें खण्डनकाराचें म्हणणें आहे. यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'हलन्त्यम्' या सूत्रांत अनुवृत्त असलेल्या 'उपदेशे' या पदाचा) 'आद्योच्चारणविषयाणाम्' असा अर्थ केल्यानेंच सर्व इष्ट फलांची सिद्धि होत असल्यामुळें, तसें व्याख्यान करणें निरूपयोगी–व्यर्थ–ठरतें, म्हणजे तसा लक्षणेनें अर्थ करण्याची कांहींच गरज नाहीं. ('उपदेश' हा शब्द भावघञन्त मानल्यानें 'उपदेशे' या पदाचा अभिधावृत्तीनेंच 'आद्योच्चारण-विषयीभूतानाम्' असा अर्थ होत असल्यामुळें व तसा अर्थ केल्यानें सर्व इष्ट प्रयोजनें सिद्ध होत असल्यामुळें, कारिकेंतील पूर्वार्धांत निर्दिष्ट

असलेल्यांचें ग्रहण होण्याकरितां 'उपदेश' या शब्दाची 'करणे घञ्' प्रत्यय करून व्युत्पत्ति करणें व उत्तरार्धांत निर्दिष्ट असलेल्यांचें ग्रहण होण्याकरितां 'उपदेश' या शब्दाची 'कर्मणि घञ्' प्रत्यय करून भिन्न रीतीनें व्युत्पत्ति करणें व साहचर्यन्यायाचा, म्हणजे 'सहचरितासहचरितयोः सहचरितस्यैव ग्रहणम्'–परि. ११२–या परिभाषेचा, व भावि संज्ञेचा आश्रय करणें आणि तसेंच कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातु, प्रत्यय, आगम, आदेश यांचा वर सांगितल्याप्रमाणें लक्षणेनें अर्थ करणें हा सर्व दीर्घ प्रयास व्यर्थ ठरतो. सारांश जें अभिधावृत्तीनें सहज सिद्ध होतें तें सिद्ध करण्याकरितां लक्षणावृत्तीचा आश्रय करणें आणि वर सांगितल्याप्रमाणें अनेक कल्पना करणें अनुचित असून तसें करण्यांत अत्यन्त गौरव आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. तथापि लक्षणावृत्तीनें अर्थ केल्यास मोठासा दोष येत नाहीं असें कोणी म्हटल्यास,) ती अरुचि मनांत धरून 'अपि च घ्वसोरद्धौ' इत्यादि पंक्ति पुढें मनोरमेंत लिहिली आहे. त्या पंक्तींत असणाऱ्या 'अलोऽन्त्यसूत्र' या शब्दाचा 'अलोऽन्त्यात्पूर्व उपधा' सू. २४९ हें उपधासंज्ञाविधायक सूत्र असा अर्थ आहे. त्या सूत्रावरील भाष्यांत 'लोपश्श्च' असा जो द्विशकारक निर्देश मानला आहे त्यांत 'लोपश्' व 'श्' हीं भिन्न पदें आहेत व ('लोप+सु+श्=लोपस्+श्' यांतील) पूर्व सकाराचा ('स्तोः श्चुना श्चुः' सू. १११ या सूत्रानें) शकार झाला आहे. 'झलां जश् झशि' सू. ५२ इत्यादि सूत्रांत, सन्देह न व्हावा म्हणून, 'जश्' यांतील शकार या झल्चें जसें ('झलां जशोऽन्ते' सू. ८४ या सूत्रानें पावलेलें) जश्त्व केलें नाही (व 'झलां जज् झशि' असें सूत्र पठित केलें नाहीं) त्याचप्रमाणें 'लोपस्श्च' या स्थलीं 'स्श्' या संयोगापुढें चकार हा झल् असून देखील, संयोगाच्या आदि असलेल्या सकाराचा 'स्कोः संयोगाद्योः' सू. ३८० या सूत्रानें पावलेला लोप केला नाहीं. (वास्तविक 'स्कोः संयोगाद्योः' हें त्रैपादिक पूर्व सूत्र

असून 'स्तोः श्चुना श्चुः' हें त्रैपादिक परसूत्र आहे. म्हणून 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या सूत्रान्वयें 'स्कोः संयोगाद्योः' हें सूत्र प्रथम प्रवृत्त व्हावयास हवें होतें. पण तें सूत्र प्रथम प्रवृत्त केलें असतें तर, सकाराचा लोप झाला असता व सूत्रांत द्विशकारक निर्देश स्पष्ट दिसूं शकला नसता आणि सन्देह उत्पन्न होण्याची भीति होती. द्विशकारक निर्देश दिसून पडावा व सन्देह उत्पन्न न व्हावा याकरितां 'स्कोः संयोगाद्योः' हें त्रैपादिक पूर्वसूत्र प्रथम प्रवृत्त न करितां 'स्तोः श्चुना श्चुः' हें त्रैपादिक परसूत्र असून देखील त्याची प्रथम प्रवृत्ति केली आहे. 'श्' हें भिन्न पद आहे असें जें वर शब्दरत्नांत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'अनेकाल्शित्सर्वस्य' सू. ४५ या सूत्रान्वयें सर्वादेशाचा बोधक 'श्' हा वर्ण अर्थवान् असल्यामुळें, 'अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्' सू. १७८ या सूत्रानें त्याला प्रातिपदिक संज्ञा होते व 'ङ्याप् प्रातिपदिकात्' सू. १८२ या सूत्रानें त्याहून सुबुत्पत्ति केली असतां, 'श्+सु' अशा स्थितींत 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लोप केल्यावर 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें 'श्' पदसंज्ञक ठरतो. पण अशा रीतीनें 'श्' हें भिन्न पद मानल्यास, 'श्' याला 'लोपः' या लगेंच पूर्वी असलेल्या स्वतंत्र भिन्न पदाचा अवयव आहे असें मानतां येऊं शकणार नाहीं व त्यामुळें तो 'श्' 'लोपः' या पदाचा अनुबन्ध आहे असें मानतां येणार नाहीं आणि त्यामुळें लोप सर्वादेश ठरणार नाहीं. म्हणून या द्विशकारकनिर्देशपक्षांत 'अनेकान्ता अनुबन्धाः'— परि. ४—हीच परिभाषा स्वीकारली पाहिजे व ती परिभाषा येथें लावल्यास, जरी 'श्' हा 'लोपः' याचा अवयव नाहीं तरी तो त्याच्या समीप उच्चारला असल्यामुळें, त्याला 'लोपः' या पदाचा अनुबन्ध आहे असें मानतां येतें आणि त्यामुळें लोप सर्वादेश होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. पण 'अनेकान्ता अनुबन्धाः' हा सिद्धान्तपक्ष नसून, 'एकान्ता अनुबन्धाः'—परि. ५—हा वास्तविक सिद्धान्तपक्ष

आहे व 'श्' हा 'लोपः' या पदाचा अवयव नसल्यामुळें त्याला या सिद्धान्तपक्षांत 'लोपः' याचा अनुबन्ध मानतां येऊं शकत नाहीं व द्विशकारक निर्देश मानून देखील, लोप सर्वादेश न होण्याची आपत्ति येते अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर हें उत्तर आहे कीं, 'एकान्ता अनुबन्धाः' हा पक्ष स्वीकारल्यास, असेंच मानलें पाहिजे कीं, 'लोपो यि' या पूर्व सूत्रांतून 'घ्वसोरेत्' या सूत्रांत 'लोपः' या पदाची अनुवृत्ति करतां येत असून देखील पुन्हा त्या सूत्रांत 'लोपः' हें पद मुद्दाम उच्चारलें असल्यामुळें, त्या उच्चारण-सामर्थ्यानें लोप सर्वादेश होतो. सारांश 'अनेकान्ता अनुबन्धाः' हा पक्ष मानल्यासच द्विशकारक निर्देश उपपन्न ठरतो; परंतु 'एकान्ता अनुबन्धाः' हा पक्ष स्वीकारल्यास, लोप सर्वादेश होण्याकरितां, वर सांगितल्याप्रमाणेंच, उपपत्ति लावली पाहिजे, आणि म्हणूनच 'अलोऽन्त्यात्पूर्व उपधा' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं दोन्ही प्रकारची उपपत्ति सांगितली आहे व तें भाष्य मनोरमेचें विवरण करितांना पूर्वीं दिलेंच आहे.) 'लोपश्श्' या स्थलीं द्वितीय शकार हा जो अनुबन्ध मानला आहे तो कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातु इत्यादिकांपैकीं कशाच्याहि अन्तीं नाहीं हें स्पष्ट आहे. (तो वास्तविक 'लोपः' या पदाच्या अन्तीं–लगेंच पुढें–आहे व कारिकेंत परिगणन केलेल्या 'धातु' इत्यादिकांत 'पद' याचा समावेश केला नसल्यामुळें, ते परिगणन अन्यून व परिपूर्ण मानल्यास शकाराला इत्संज्ञा होऊं शकत नाहीं व लोप सर्वादेश ठरूं शकत नाहीं. पण 'लोपश्श्' हें आद्योच्चारण मानल्यास, त्यांतील अन्त्य शकार 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञक ठरतो व 'अनेकाल्शित्सर्वस्य' या सूत्रान्वयें लोप सर्वादेश होण्यांत, म्हणजे संपूर्ण अभ्यासाचे जागीं होण्यांत, कांहीं अडचण येत नाहीं.

शब्दरत्न– किं च "नमो वरिवश्चित्रङः" इत्यस्यासंग्रहोऽत्र पक्षे इत्यपि बोध्यम्, एष्वेतस्य रूढिरित्युक्तेः परिगणनताया एव

लाभात्। योगस्यैवेति। न तु रूढेरित्यर्थः। परिगणनस्येति। धात्वादिगणनस्येत्यर्थः। वैषम्येति। भाष्यरीत्या करणव्युत्पत्त्यैव सर्वसंग्रहादिति भावः। उपदेशताप्रयोजकेति। योगमात्रस्वीकारे उपदेशता=उपदेशकरणता, न हि तत्प्रयोजकं धातुत्वादि भवतीति तद्विरोधः। सञ्ज्ञात्वे तु उपदेशता=उपदेशशब्दत्वम्, उपदेशशब्दस्य शब्दपरत्वात्। तदवच्छिन्नस्य प्रयोजकं तु रूढ्यर्थतावच्छेदकतया धातुत्वादि वक्तुं शक्यमिति भावः। शकारस्येति। न ह्यनेन किञ्चिदुपदिश्यत इति भावः। ननूपदिश्यते=ज्ञाप्यतेऽनेनेति तदर्थः, धात्वादिभिर्हि प्रयोगो ज्ञाप्यते, तद्वदनेनापि शकारेण सर्वादेशत्वं ज्ञाप्यते, इत्यरुचेराह–आदेच इति। सर्वेति। भाष्याकारादीत्यर्थः। यत्र तु करणव्युत्पत्त्यैवार्थसङ्गतिः, तत्रागत्याऽस्तु "कृत्यल्युटः" इति बाहुलकाल्ल्युडभावः। यथा "यन्निमित्तवैकल्यप्रयुक्तोपदेशाप्रवृत्तौ" इत्यादाविति दिक्।

दुसरें असें कीं, या पक्षांत, म्हणजे 'उपदेश' हा शब्द योगरूढ आहे हा प्रथम पक्ष मानल्यास, 'नमोवरिवश्चित्रङः क्यच्' सू. २६७५ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'चित्रङ' या शब्दाचा संग्रह होऊं शकत नाहीं (व त्यामुळें त्या शब्दांतील अन्त्य ङकाराला इत्संज्ञा होऊं शकणार नाहीं व त्याचा लोप होऊं शकणार नाहीं) हें देखील जाणावें; कारण कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातु इत्यादिकांना 'उपदेश' ही संज्ञा व्यवहारांत रूढीनें लागू पडते असें म्हणणें हें परिगणन करणेंच होय. (जेथें परिगणन करणें असतें तेथें 'परिगणनं कर्तव्यम्' असें म्हणण्याचा परिपाठ असून, प्रकृत स्थलीं तसें म्हटलें नसल्यामुळें, कारिकेंत परिगणन केलें आहे असें म्हणतां येत नाहीं व त्या कारिकेंत उपदेशाचीं काहीं उदाहरणें दिलीं आहेत असेंच मानलें पाहिजे असें प्रकाशकारांचें म्हणणें असल्यास, त्यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, कारिकेच्या पूर्वार्धांत निर्दिष्ट असलेल्या धातु इत्यादिकांना 'उपदेश' ही योगरूढ संज्ञा लागू पडण्याकरितां 'उपदेश' या शब्दाची 'करणे घञ्' प्रत्यय करून

व्युत्पत्ति करावी व उत्तरार्धांत निर्दिष्ट असलेल्या आगम इत्यादिकांना ती संज्ञा लागू पडण्याकरितां त्या शब्दाची 'कर्मणि घञ्' प्रत्यय करून व्युत्पत्ति करावी असें म्हणणें हें केवळ उदाहरणप्रदर्शकपर नसून, परिगणन करणेंच होय. म्हणून कारिकेंत प्रातिपदिकाचा निर्देश केला नसल्यामुळें, 'चित्र' या प्रातिपदिकाच्या अन्तीं असलेला ङकार इत्संज्ञक होऊं शकणार नाहीं व त्याचा लोप होऊं शकणार नाहीं. परंतु 'उपदेश' या शब्दाचा 'आद्योच्चारण' असा अर्थ केल्यास, 'चित्रङ' हें आद्योच्चारण असल्यामुळें त्यांतील अन्त्य ङकार 'हलन्त्यम्' या सूत्रान्वयें इत्संज्ञक ठरतो व तो शब्द ङित् पठित असल्यामुळें त्याहून क्यच्प्रत्यय केल्यावर 'अनुदात्तङित आत्मनेपदम्' सू. २१५७ या सूत्रान्वयें आत्मनेपदी प्रत्यय होऊन 'चित्रीयते' इत्यादि रूपें सिद्ध होतात.) मनोरमेंतील 'योगस्यैव पुरस्कारे परिगणनस्य व्यर्थत्वात्' या पंक्तींतील 'योगस्यैव' (या स्थलीं 'एव' हें अवधारणार्थक पद घातलें असल्यामुळें) याचा 'न तु रूढेः,' म्हणजे रूढीचा आश्रय न करितां केवळ यौगिक अर्थाचा आश्रय केल्यास, असा अर्थ आहे व 'परिगणनस्य' या शब्दाचा 'धात्वादिगणनस्य,' म्हणजे कारिकेंत धातु, सूत्र इत्यादि जें परिगणन केलें आहे त्याचें, असा अर्थ आहे. मनोरमेंत 'वैषम्यस्य दुरुपपादत्वाच्च'–म्हणजे 'उपदेश' या शब्दाची दोन भिन्न रीतीनें व्युत्पत्ति करणें याचें समर्थन कोणत्याहि रीतीनें करतां येत नाहीं– असें जें म्हटलें आहे त्याचें कारण हें की, भाष्यकारांनीं 'उपदेश' या शब्दाची केवळ 'करणे घञ्' प्रत्यय करून व्युत्पत्ति केली आहे व तशा व्युत्पत्तीनेंच म्हणजे 'उपदिश्यते प्रयोगः अनेन' अशा व्युत्पत्तीनेंच, सर्व प्रकारच्या उपदेशांचा, म्हणजे कारिकेंत पठित असलेल्या धातु इत्यादिकांचा व इतरांचाहि संग्रह करतां येत असल्यामुळें परिगणन व्यर्थ ठरतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. ('उपदेशेऽजनुनासिक इत्' या सूत्रावरील भाष्यांत

'उपदेश' हा शब्द 'करणे घञ्' प्रत्यय करून सिद्ध होऊं शकत नाहीं असें अनेक रीतीनें प्रतिपादन करून अखेरीस भाष्यकारांनीं 'एवं तर्हि कृत्यल्युटो बहुलमित्येवात्र घञ् भविष्यति' असें म्हटलें आहे. या भाष्याचें विवरण मनोरमेंत केलेंच आहे. सारांश भाष्यकारांनीं 'उपदेश' या शब्दाची दोन तऱ्हेनें व्युत्पत्ति न करितां, 'करणे घञ्' प्रत्यय करून एकच तऱ्हेनें व्युत्पत्ति केली असल्यामुळें व तशी व्युत्पत्ति केल्यानें 'उपदेश' हा शब्द सर्व प्रकारच्या उपदेशांचा संग्राहक होत असल्यामुळें आणि 'सकृदुच्चरितः शब्दः सकृदेवार्थं गमयति' हा न्याय असल्यामुळें, प्रकाशकारादिकांनीं त्या शब्दाची जी दोन तऱ्हेनें व्युत्पत्ति केली आहे ती भाष्यविरुद्ध, व्यर्थ व अयोग्य ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. येथें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, भाष्यकारांनीं 'उपदेश' या शब्दाची 'करणे घञ्' प्रत्यय करून व्युत्पत्ति केली असल्यामुळें, दीक्षितांनीं त्या शब्दाची 'भावे घञ्' प्रत्यय करून जी व्युत्पत्ति केली आहे ती भाष्यविरुद्ध असल्यामुळें बरोबर मानतां येत नाहीं. या प्रश्नाचें उत्तर हें आहे कीं, 'उपदेशेऽजनुनासिक इत्' या वार्तिकाचें कसें तरी प्रत्याख्यान करण्याकरितां जरी भाष्यकारांनीं 'उपदेश' या शब्दाची 'करणे घञ्' प्रत्यय करून व्युत्पत्ति केली आहे तरी तें—भाष्य सिद्धान्तभाष्य नसून केवळ एकदेशीची उक्ति आहे आणि भाष्य सिद्धान्त हाच आहे कीं, 'उपदेश' हा शब्द भावघञन्त असून त्याचा 'आद्योच्चारण' असाच अर्थ आहे आणि म्हणून दीक्षितांचें म्हणणें सिद्धान्तपक्षाला अनुसरून असल्यामुळें चूक ठरत नाहीं. आतां 'उपदेशताप्रयोजक......हलिदित्यर्थः इति स्वग्रन्थविरोधाच्च' असें जें मनोरमेंत द्वितीय पक्षावर दूषण दिलें आहे त्याचें शब्दरत्नकार पुढील पंक्तींत कारण सांगतात.) 'उपदेश' या शब्दाचा केवळ यौगिक अर्थ स्वीकारल्यास, ('करणे घञ्' प्रत्यय करून सिद्ध केलेल्या 'उपदेश' या शब्दाचा 'उपदेशकरण' असा यौगिक अर्थ होत असल्या-

मुळें, 'तस्य भावस्त्वतलौ' सू. १७८१ या सूत्रानें 'उपदेश= उपदेशकरण' या शब्दाहून 'तल्' प्रत्यय केला असतां) 'उपदेशता' या पदाचा 'उपदेशकरणता' असा अर्थ होतो. पण उपदेशकरणतेचे प्रयोजक धातुत्वादि होत नाहींत, आणि म्हणून प्रकाशकारांच्या पूर्वपर ग्रन्थांत विरोध येतो. (धातु हा उपदेशकरण मानला असतां, धातूचे ठिकाणीं असणारा धातुत्व हा धर्म उपदेशकरणता ठरतो, म्हणजे 'धातुत्व=उपदेशकरणता' असा अर्थ निष्पन्न होतो आणि धातुत्व व उपदेशकरणता हे एकच आहेत असें मानल्यास, धातुत्व उपदेशकरणतेचें, म्हणजेच धातुत्वाचें, प्रयोजक होऊं शकत नाहीं; कारण प्रयोज्य व प्रयोजक हे नेहमी भिन्न राहात असून, प्रयोज्यच स्वतःचें केव्हांहि प्रयोजक होऊं शकत नाही. सारांश 'उपदेशता=उपदेशकरणता' ही धातुत्व या धर्माहून भिन्न नाहीं; कारण धातुत्व हेंच उपदेशकरणत्व आहे. म्हणून हे दोन्ही पदार्थ एकच असल्यामुळें व एक दुसऱ्याचा प्रयोजक होणें शक्य असून स्वतःचाच प्रयोजक होणें शक्य नसल्यामुळें, धातुत्व व उपदेशकरणत्व या दोहोंमध्यें प्रयोज्यप्रयोजकभाव मुळींच संभवत नाहीं. म्हणून धातुत्वादि उपदेशतेचे प्रयोजक आहेत हें प्रकाशकारांचें म्हणणें यौगिकपक्षांत चूक ठरतें आणि प्रकाशकारांनीं धातुत्वादिकांना एके ठिकाणीं उपदेशता म्हटलें असून, दुसरे ठिकाणीं उपदेशताप्रयोजक म्हटलें असल्यामुळें, त्यांच्या या दोन उक्ति परस्परविरुद्ध ठरतात असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'योगमात्रस्वीकारे उपदेशता=उपदेशकरणता, न हि तत्प्रयोजकं धातुत्वादि भवतीति तद्विरोधः' या शब्दरत्नांतील पंक्तीचें व्याख्यान करितांना भैरवीकारांनीं 'प्रयोज्यप्रयोजकभावस्यान्वयव्यतिरेककल्पनया यथा चैत्रे चैत्रत्वधर्मसत्व एव पाचकत्वमन्यथा नेति कस्यापि न सम्मतम्, किन्तु विक्लित्यनुकूलव्यापारसत्वमेव पाचकत्वप्रयोजकम्, तथा धातुत्वादिकं न करणताप्रयोजकम्' असें म्हटलें आहे व सभापतिमिश्रांनीं आपल्या टिप्पणींत शब्दरत्नांतील वरील पंक्तीचा 'उपदेश-

शब्दस्य यौगिकत्वस्वीकारे धात्वाद्यन्यतमत्वापेक्षयोपदेशकरणताया धात्वाद्यतिरिक्तप्रातिपदिकपदादिष्वपि सत्त्वेनाधिकवृत्तितया प्रयोज्य-प्रयोजकभावस्य च समनियतयोरेव नियतत्वेन उपदेशताप्रयोजक-धातुत्वादि इत्यग्रिमग्रन्थो विरुद्धचेतेति भावः' असा अर्थ दिला आहे. या म्हणण्याचा असा आशय आहे कीं, 'तत्सत्वे तत्सत्वं तदसत्वे तद-सत्वम्' हा अन्वयव्यतिरेकभाव जेथें असतो तेथेंच प्रयोज्यप्रयोजकभाव मानला जात असल्यामुळें व उपदेशता ही कारिकेच्या पूर्वार्धांत निर्दिष्ट असलेल्या 'धातुसूत्रगणोणादिवाक्यलिङ्गानुशासनम्' एवढ्यांनाच लागू पडणारी नसून त्या पूर्वार्धांत निर्दिष्ट नसलेल्या प्रातिपदिक, पद इत्यादिकांना देखील लागू पडणारी असल्यामुळें, म्हणजे उपदेशकरणता ही अधिक व्यापक असल्यामुळें, या दोहोंमध्यें प्रयोज्यप्रयोजकभाव मानतां येत नाहीं, आणि म्हणून धातुत्व इत्यादि उपदेशतेचे प्रयोजक मानतां येत नाहींत.) 'उपदेश' हा शब्द संज्ञावाचक– योगरूढ अर्थाचा वाचक–मानल्यास, 'उपदेशता' या शब्दाचा 'उपदेशशब्दत्वम्' असा अर्थ होतो; कारण येथें 'उपदेश' हा शब्द ('उपदेश' या शब्दाच्या अर्थाचा वाचक नसून) त्या शब्दाचाच वाचक आहे. म्हणून त्या पक्षांत उपदेशता या धर्मानें अवच्छिन्न–युक्त–असणाऱ्या 'उपदेश' या शब्दानें व्यवहारांत रूढीनें बोधित होणाऱ्या कारिकानिर्दिष्ट धातु इत्यादिकांचे अवच्छेदक धातुत्व इत्यादि जे धर्म आहेत ते त्या उपदेशतेचे प्रयोजक होतात असें म्हणतां येणें शक्य आहे. (सारांश योगरूढपक्षांत कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातु इत्यादिकांना 'उपदेश' ही रूढ संज्ञा आहे असें मानलें असतां, ते व्यवहारांत 'उपदेश' या शब्दानें बोधित होत असल्यामुळें, त्यांचे ठिकाणीं असणारे धातुत्वादि धर्म त्यांना लागू पडणाऱ्या उपदेशतेचे, म्हणजे 'उपदेश' या शब्दाचे किंवा व्यवहाराचे, प्रयोजक ठरतात असें म्हणतां येऊं शकतें–म्हणजे ज्यांचे ठिकाणीं धातुत्वादि धर्म आहेत त्यांनाच 'उपदेश' हा शब्द लागू पडतो व ज्यांचे ठिकाणीं ते धर्म

नाहींत त्यांना 'उपदेश' हा शब्द लागू पडत नाहीं आणि अशा रीतीनें धातुत्वादि धर्म, 'उपदेश' हा शब्द लागू पडण्याचे, प्रयोजक-कारणीभूत–ठरतात असें म्हणतां येऊं शकतें–असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. परंतु असें व्याख्यान करतेवेळीं 'प्रयोजक' या शब्दाचा 'रूढीनें होणाऱ्या अर्थाचे अवच्छेदक' असा लक्षणेनें अर्थ करावा लागतो व तसा लक्षणेनें अर्थ करणें हा एक गौरवरूप दोषच आहे. दुसरें असें कीं, कारिकेंत निर्दिष्ट असलेल्या धातु इत्यादिकांनाच 'उपदेश' ही संज्ञा लागू पडते असें मानल्यास, जे आद्योच्चारणाचे विषय असून देखील कारिकेंत निर्दिष्ट नाहींत ते उपदेश न मानले जाण्याची आपत्ति येते, आणि म्हणून कारिकेंत प्रातिपदिक व पद यांचा निर्देश नसल्यामुळें 'चित्रङ" यांतील अन्त्य ङकाराला व 'लोपश्श्' यांतील अन्त्य शकाराला इत्संज्ञा न होणें हा दोष या पक्षांत कायम राहतोच. पण आद्योच्चारणपक्ष मानल्यास, वर दाखविलेले सर्व दोष सहज टाळतां येऊं शकत असल्यामुळें, तशी सदोष कारिका न मानतां व 'उपदेश' हा शब्द 'करणे घञन्त' न मानतां, तो शब्द भावघञन्त मानून त्याचा 'आद्योच्चारण' असाच अर्थ करणें उचित आहे. आतां 'पद' या शब्दाचा कारिकेंत निर्देश केला नसल्यामळें, संज्ञापक्षांत जसा 'उपदेश' हा शब्द 'लोपश्श्' या निर्देशाला लागू पडत नाहीं तसाच तो शब्द यौगिक पक्षांत देखील त्या निर्देशास लागू पडत नाहीं याचें कारण शब्दरत्नकार पुढील पंक्तींत सांगतात व त्यांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जसा 'अनङ् सौ' सू. २४८ इत्यादि सूत्रांत 'अनङ्' इत्यादि आदेश होण्याचा स्पष्ट उपदेश केला आहे तसा 'लोपश्श्' या स्थलीं) शकारानें कशाचाहि उपदेश केला नाहीं. (पण यावर अशी शंका करण्यांत येते कीं,) 'उपदिश्यते ज्ञाप्यते प्रयोगः अनेन' असा 'उपदेश' या शब्दाचा यौगिक अर्थ केल्यास, ज्याप्रमाणें धात्वादिकांनीं प्रयोग ज्ञापित होतो, म्हणजे कोणते

विकरण व कोणते प्रत्यय लावून त्यांचा वाक्यांत प्रयोग करावा हें ज्ञापित होतें, त्याचप्रमाणें शकारानें ('अनेकाल्शित्सर्वस्य' सू. ४५ या सूत्रान्वयें) लोप सर्वादेश व्हावा, म्हणजे संपूर्ण अभ्यासाचे जागीं लोपरूप आदेश व्हावा व संपूर्ण अभ्यासाचा लोप व्हावा, हें ज्ञापित होतें. (ही शंका यथार्थ मानून व) ही अरुचि लक्षांत घेऊन दीक्षितांनीं 'आदेच उपदेशे...सर्वसम्मतत्वाच्चेति दिक्' ही पंक्ति पुढें मनोरमेंत लिहिली आहे. (या पंक्तीचें विवरण मनोरमेंत केलेंच आहे. या पंक्तींतील 'सर्वसम्मतत्वात्' या पदांतील) 'सर्व' या शब्दाचा 'भाष्यकारादि' असा अर्थ आहे. (कारण जो अर्थ इतर वैयाकरणांना मान्य असून देखील भाष्यकारांना मान्य नाहीं तो अर्थ स्वीकारार्ह नाहीं. पण भाष्यकारांनी स्वतः 'उपदेश' या शब्दाचा 'आद्योच्चारण' असा अर्थ केला असल्यामुळें, तोच त्या शब्दाचा अर्थ मानणें व त्या अर्थान्वयें जें आद्योच्चारणाचे विषय आहेत त्यांना उपदेश मानणें हेंच योग्य आहे.) जेथें 'उपदेश' या शब्दाची 'करणे घञ्' प्रत्यय करून व्युत्पत्ति केल्याशिवाय अर्थ बरोबर होऊं-जुळूं-शकत नाहीं तेथें गत्यन्तर नसल्यामुळें 'कृत्यल्युटो बहुलम्' सू. २८४१ या सूत्रान्वयें बाहुलकत्वामुळें ल्युट् झाला नाहीं (व 'करणे घञ्' प्रत्यय झाला आहे) असें मानून अर्थ करावा. उदाहरणार्थ 'यन्निमित्तवैकल्यप्रयुक्तोपदेशाप्रवृत्तौ' इत्यादि स्थलीं 'उपदेश' या शब्दाची 'करणे घञ्' प्रत्यय करून व्युत्पत्ति केल्याशिवाय म्हणजे 'उपदिश्यते अनेनेति उपदेशः शास्त्रं सूत्रम्' असा 'उपदेश' या शब्दाचा अर्थ केल्याशिवाय, त्या पंक्तीचा अर्थ बरोबर होऊं शकत नाहीं. (म्हणून तशा ठिकाणीं 'करणे घञ्' प्रत्यय करूनच 'उपदेश' या शब्दाचा अर्थ करावा. 'यन्निमित्तवैकल्यप्रयुक्तोपदेशाप्रवृत्तौ...।' ही पंक्ति 'न पदान्त' सू. ५१ या सूत्रावरील शब्दरत्नांत दिली आहे व तेथें तिचें व्याख्यान करण्यांत येईल.)

मनोरमा– "उपदेशेऽजनुनासिक इत्"।। यद्यप्यत्रोपजीव्यत्वादनुनासिकसञ्ज्ञा प्रथमं वक्तुमुचिता, तथाऽपि 'नासिकामनुगतः' इति

योगाश्रयणेनैव गतार्थत्वाद् 'अनुनासिकसञ्ज्ञासूत्रं मन्दप्रयोजनम्' इति ध्वनयितुं नेहोपन्यस्तम्। उपदेशे किम्? 'अभ्र आँ अपः'। यद्यपीह "उञः" "ऊँ" इत्यत्रैव विधानसामर्थ्यान्नेत्त्वमिति सुवचम्, तथाप्युत्तरार्थमवश्यं कर्त्तव्यमुपदेशग्रहणं स्पष्टप्रतिपत्तये इहैव कृतम्। अच् किम्? मनिनो मकारस्य मा भूत्॥

'उपदेशेऽजनुनासिक इत्,' सू. ३ या सूत्रांत 'अनुनासिक' हा संज्ञावाचक शब्द उच्चारला असल्यामुळें, या सूत्रापूर्वी अनुनासिकसंज्ञेचें विधायक सूत्र, म्हणजे 'मुखनासिकावचनोऽनुनासिकः' सू. ९ हें सूत्र, जरी पठित केलें पाहिजे होतें तरी, 'नासिकामनुगतः अनुनासिकः' असा यौगिक अर्थ केल्यानें ते अनुनासिकसंज्ञासूत्र गतार्थ होत असल्यामुळें, म्हणजे यौगिक अर्थ केल्यानेंच 'अनुनासिक' या शब्दाच्या अर्थाचा बोध होत असल्यामुळें व अशा रीतीनें तें सूत्र व्यर्थ ठरत असल्यामुळें, त्या सूत्राचें फारच अल्प प्रयोजन आहे हें सुचविण्याच्या हेतूनें, त्या सूत्राचा प्रकृत सूत्रापूर्वी उपन्यास केला नाहीं. ('मन्दप्रयोजनम्' असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें व्याख्यान शब्दरत्नांत करण्यांत येईल.) प्रकृत सूत्रांत 'उपदेशे' हें पद घालण्याचें प्रयोजन हें आहे कीं, 'अभ्र आँ अपः' या श्रुतींत असलेल्या 'आँ' या अनुनासिक स्वराला इत्संज्ञा होऊं नये. (याचें विवरण पूर्वी शब्दरत्नांत केलेंच आहे. सारांश वरील श्रुति पाणिनीय 'उपदेश= आद्योच्चारण' नसल्यामुळें, त्या श्रुतींतील 'आँ' या अनुनासिक अचाला इत्संज्ञा होत नाहीं.) ज्याप्रमाणें 'उञः, ऊँ' सू. १०६,१०७ या स्थलीं 'उ' या निपाताचे जागीं 'ऊँ' असा आदेश होण्याचें विधान केलें असल्यामुळें, त्या विधानाच्या सामर्थ्यानें 'ऊँ' या अनुनासिक स्वराला इत्संज्ञा होत नाहीं त्याचप्रमाणें ('आङोऽनुनासिकश्छन्दसि' सू. ३५२५ या सूत्रांत 'आङ' चे जागीं अनुनासिक आदेश व्हावा असें स्पष्ट विधान केलें असल्यामुळें त्या) विधानाच्या सामर्थ्यानें 'अभ्र आँ अपः' यांतील 'आँ' हा अनुनासिक इत्संज्ञक होत नाहीं असें जरी म्हणतां

येऊं शकतें तरी, उत्तरसूत्रांत, म्हणजे 'हलन्त्यम्' या सूत्रांत, 'उपदेशे' या पदाची अनुवृत्ति होण्याकरितां व प्रकृत सूत्राचा अर्थ स्पष्ट होण्याकरितां प्रकृत सूत्रांतच 'उपदेशे' या पदाचें ग्रहण केलें आहे. ('अभ्र आँ अपः' या स्थलीं 'आङ' चे जागीं 'आङोऽनुनासिकश्छन्दसि' या सूत्रान्वयें 'आँ' असा आदेश झाला आहे. दीक्षित म्हणतात कीं, ज्याप्रमाणें 'उ' या निपाताचे जागीं होणारा 'ऊँ' हा अनुनासिक आदेश विधानसामर्थ्यामुळें इत्संज्ञक होत नाहीं त्याचप्रमाणें 'आङ' चे जागीं होणारा 'आँ' हा अनुनासिक आदेश विधानसामर्थ्यामुळें इत्संज्ञक होत नाहीं असें म्हणतां येतें; कारण जर तो आदेश इत्संज्ञक मानला तर, 'तस्य लोपः' सू. ६२ या सूत्रानें त्याचा लोप होईल व आदेशाचें विधान व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल आणि म्हणून प्रकृत सूत्रांत 'उपदेशे' हें पद नसलें तरी, जसा 'ऊँ' हा इत्संज्ञक होत नाहीं तसाच 'आँ' हा देखील इत्संज्ञक होऊं शकत नाहीं. तरी पण प्रकृत सूत्रांत 'उपदेशे' या पदाचें ग्रहण एवढ्याचकरितां केलें आहे कीं, सूत्रार्थ स्पष्ट व्हावा व 'हलन्त्यम्' या उत्तरसूत्रांत तें पद अनुवृत्त व्हावें.) प्रकृत सूत्रांत 'अच्' या पदाचें ग्रहण अशाकरितां केलें आहे कीं, 'मनिन्' प्रत्ययांतील मकाराला इत्संज्ञा होऊं नये. (प्रकृत सूत्रांतून 'अच्' हें पद गाळलें असतें व 'उपदेशेऽनुनासिक इत्' एवढेंच जर सूत्र केलें असतें तर, 'सर्वधातुभ्यो मनिन्' उ. सू. ५८४ या सूत्रानें होणाऱ्या 'मनिन्=मन्' या प्रत्ययांतील मकार अनुनासिक असल्यामुळें, तो इत्संज्ञक झाला असता. पण प्रकृत सूत्रांत 'अच्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें व मकार अच् नसल्यामुळें, तो इत्संज्ञक होत नाहीं.)

शब्दरत्न– नासिकामनुगत इति । नासिकामभिहत्य वायुनाऽभिव्यञ्जित इत्यर्थः । प्रातिशाख्यशिक्षादौ, लोके च तद्व्यवहारस्य तथैवोपपादनमावश्यकमिति तात्पर्यम् ॥ अत एव मुखग्रहणप्रत्याख्यानभाष्यध्वनितो यमानुस्वारयोरनुनासिकव्यवहारः सूत्रमते सङ्गच्छते ।

"यरोऽनुनासिके" इत्यादौ स्वरूपग्रहणाभावस्तु 'पशुः' 'अपत्यम्' इत्यादिवदिति ध्येयम्। मन्दप्रयोजनमिति। मन्देषु प्रयोजनमस्येति बहुव्रीहिः। एवंविधयोगलोक प्रातिशाख्याद्यनभिज्ञं प्रति सप्रयोजनमित्यर्थः। अभ्र आँ अप इति। अत्रेत्सञ्ज्ञायां लोपः स्यादिति भावः। विधानेति। इदिति वक्तव्येऽनुनासिकविधानसामर्थ्यादित्यर्थः। नेत्त्वमिति। तत्फललोपस्य सामर्थ्यादभावे इत्त्वमपि फलाभावान्नेत्यर्थः।

'नासिकामनुगतः अनुनासिकः' असा जो मनोरमेंत 'अनुनासिकः' या शब्दाचा विग्रह केला आहे त्याचा 'नासिकामभिहत्य वायुनाऽभिव्यञ्जितः,' म्हणजे नासिकास्थानाचे ठिकाणीं आघात करून प्राणवायूनें अभिव्यक्त केलेला वर्ण, असा अर्थ आहे. ('अनुगतः' यांतील 'अनु' या उपसर्गाचा 'अभिहत्य' व 'गतः' या पदाचा 'वायुना अभिव्यञ्जितः' असा लक्षणेनें अर्थ करून 'अनुनासिकः' या पदाचा वर सांगितल्याप्रमाणें शब्दरत्नकारांनीं अर्थ केला आहे.) प्रातिशाख्यांत व शिक्षा इत्यादि ग्रन्थांत जेथें 'अनुनासिक' या पदाचा निर्देश आढळतो तेथें व लौकिक व्यवहारांत जेव्हां 'अनुनासिक' या शब्दाचा उपयोग केला जातो तेव्हां त्या शब्दाचें वर दिलेल्या यौगिक अर्थान्वयेंच उपपादन करणें, म्हणजे अर्थ करणें, आवश्यक आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ आहे. ('नासिक्या नासिकस्थाना मुखनासिक्या वा' अशी जरी तैत्तिरीय प्रातिशाख्यांत 'अनुनासिक' या शब्दाची व्याख्या दिली आहे तरी ऋक्प्रातिशाख्यांत किंवा शिक्षेंत त्या शब्दाची व्याख्या दिली नाहीं. म्हणून त्या ग्रन्थांत आढळणाऱ्या 'अनुनासिक' या शब्दाचा व तसेंच लौकिकव्यवहारांत उपयोगांत आणला जाणाऱ्या 'अनुनासिक' या शब्दाचा वर दिलेल्या यौगिक अर्थान्वयेंच अर्थ करणें जरूर आहे.) आणि 'अनुनासिक' या शब्दाचा तसा यौगिक अर्थ असल्यामुळेंच, ज्या भाष्यांत त्या सूत्रांतील 'मुख' या शब्दाचें प्रत्याख्यान केलें आहे त्या भाष्यावरून

यम व अनुस्वार यांचे ठिकाणीं ध्वनित होणारा 'अनुनासिक' या
शब्दाचा व्यवहार सूत्रकाराच्या मतें योग्य ठरतो. ('मुखनासिका-
वचनोऽनुनासिकः' १-१-८ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार
म्हणतात कीं, त्या सूत्रांतून 'मुख' हा शब्द गाळतां येणें शक्य आहे.
पण तो शब्द गाळल्यास व 'नासिकावचनोऽनुनासिकः' एवढेंच सूत्र
मानल्यास, ज्यांचें केवळ नासिका हें उच्चारणस्थान आहे अशा
यम व अनुस्वार यांनाच अनुनासिकसंज्ञा होईल व ती संज्ञा मुख व
नासिका या दोन्ही स्थानांनीं उच्चारल्या जाणाऱ्या सानुनासिक
स्वरांना व 'ञ्, म्, ङ्, ण्, न्' या वर्गांतील पञ्चम वर्णांना होणार
नाहीं अशी शंका उपस्थित करून त्या शंकेवर भाष्यकार असें उत्तर
देतात कीं, प्रासादवासिन्यायानें त्यांना देखील अनुनासिकसंज्ञा होऊं
शकते. त्या न्यायाचा अर्थ सांगतांना भाष्यकार असें म्हणतात कीं,
जेथें एका वाड्यांत कांहीं लोक माडीवर राहतात व कांहीं लोक
खालच्या मजल्यावर राहतात आणि कांहीं लोक माडीवर व खालच्या
मजल्यावर मिळून दोन्ही ठिकाणीं राहतात तेथें जे लोक माडीवर
राहतात त्यांना माडीवर राहणारे या शब्दानीं ओळखिलें जातें व जे
खालच्या मजल्यावर राहतात त्यांना खालच्या मजल्यावर राहणारे
या शब्दांनीं ओळखिलें जातें आणि जे माडीवर व खालच्या मजल्यावर
मिळून दोन्हीं ठिकाणीं राहतात त्यांना माडीवर राहणारे किंवा
खालच्या मजल्यावर राहणारे अशा दोन्हीहि प्रकारच्या शब्दांनीं
ओळखिलें जातें. या न्यायान्वयें जे वर्ण मुखानें व नासिकेनें अशा
उभय स्थानांनीं उच्चारले जातात त्यांना मुखानें उच्चारले जाणारे
किंवा नासिकेनें उच्चारले जाणारे अशा दोन्हीहि प्रकारच्या शब्दांनीं
ओळखतां येतें. म्हणून मुख व नासिका या दोन्ही स्थानांनीं उच्चारले
जाणारे सानुनासिक स्वर किंवा वर्गांतील पञ्चम वर्ण यांना 'नासिका
वचन' हा शब्द प्रासादवासिन्यायानें लावतां येऊं शकत असल्यामुळें,
वरील सूत्रांतून 'मुख' हा शब्द गाळला तरी, त्यांना अनुनासिकसंज्ञा

होण्यांत कांहीं अडचण येऊं शकत नाहीं. पण अशा रीतीनें 'मुख' व 'नासिका' या उभय स्थानांनीं उच्चारलेल्या वर्णांना जरी अनुनासिकसंज्ञा होईल तरी केवळ नासिकास्थानानें उच्चारल्या जाणाऱ्या यम आणि अनुस्वार यांना देखील, प्रकृत सूत्रांतून 'मुख' हा शब्द गाळल्यास, अनुनासिकसंज्ञा प्राप्त होण्याची आपत्ति येईल, असा प्रश्न करून त्या प्रश्नाचें भाष्यकार असें उत्तर देतात कीं, यम व अनुस्वार यांना अनुनासिकसंज्ञा झाली तरी कांहीं दोष येत नाहीं आणि त्यांना ती संज्ञा न झाल्यानें कोणताहि फायदा होत नाहीं. त्या भाष्यांत भाष्यकारांनीं असें म्हटलें आहे–'मुखग्रहणं शक्यमकर्तुम्। केनेदानीमुभयवचनानां भविष्यति ? । प्रासादवासिन्यायेन । तद्यथा । केचित् प्रासादवासिनः, केचिद्भूमिवासिनः, केचिदुभयवासिनः । ये प्रासादवासिनो गृह्यन्ते ते प्रासादवासिग्रहणेन । ये भूमिवासिनो गृह्यन्ते ते भूमिवासिग्रहणेन । ये उभयवासिनो गृह्यन्ते ते प्रासादवासिग्रहणेन भूमिवासिग्रहणेन च । एवमिहापि केचिन्मुखवचनाः केचिन्नासिकावचनाः केचिदुभयवचनाः । तत्र ये मुखवचना गृह्यन्ते ते मुखग्रहणेन । ये नासिकावचना गृह्यन्ते ते नासिकाग्रहणेन । ये उभयवचना गृह्यान्त एव ते मुखग्रहणेन नामिकाग्रहणेन च । भवेदुभयवचनानां सिद्धम्, यमानुस्वाराणामपि प्राप्नोति । नैव दोषो न प्रयोजनम् ।' या भाष्यांत यम व अनुस्वार यांना अनुनासिकसंज्ञा झाली तरी कांहीं दोष येत नाहीं असें भाष्यकारांनीं म्हटलें असल्यामुळें त्यावरून हें ध्वनित होतें कीं, यम व अनुस्वार यांना अनुनासिक हा व्यवहार लागू पडतो. तसा व्यवहार त्यांना लागू पडला नसता तर भाष्यकारांनीं 'यमानुस्वाराणामपि प्राप्नोति । नैवदोषो न प्रयोजनम्' असें म्हटलें नसतें. पण पाणिनीनें जें अनुनासिकसंज्ञेचें वरील सूत्र केलें आहे त्यावरून तर हें स्पष्ट होतें कीं, ज्यांचें नासिका व मुख हे दोन्ही मिळून उच्चारणस्थान आहे त्यांनाच अनुनासिकसंज्ञा होऊं शकते. मग 'अनुस्वारयमानां च नासिकास्थानमुच्यते' या पाणिनीय शिक्षेंतील वचनान्वयें ज्यांचें केवळ

नासिका हें उच्चारणस्थान आहे अशा अनुस्वार व यम यांना व्यवहारांत लागू पडणारी अनुनासिकसंज्ञा कशी होणार ? या प्रश्नाचें उत्तर हेंच आहे कीं, जरी वरील सूत्रान्वयें त्यांना अनुनासिकसंज्ञा होऊं शकत नाहीं तरी, 'अनुनासिकः' या शब्दाचा पूर्वी सांगितल्या-प्रमाणें जो यौगिक अर्थ केला आहे तो मानल्यानें त्यांना ती संज्ञा होऊं शकतेच व त्यांना त्या अर्थान्वयें स्वतंत्र रीतीनें प्राप्त होणारी ती संज्ञा वरील सूत्रानें बाधित होत नाहीं. सारांश अनुस्वार व यम यांना व्यवहारांत लागू पडणारी अनुनासिकसंज्ञा होण्याकरितां पाणि-नीनें कोणतेंहि स्वतंत्र सूत्र रचलें नसल्यामुळें हें ध्वनित होतें कीं, पाणिनीला 'अनुनासिक' या शब्दाचा वर दिलेला यौगिक अर्थ मान्य होता व त्या अर्थान्वयें त्यांना ती संज्ञा प्राप्त होऊं शकत असल्यामुळें, त्यांना ती संज्ञा प्राप्त होण्याकरितां स्वतंत्र सूत्र रचण्याची पाणिनीला गरज भासली नाहीं, आणि म्हणून वर जसा 'अनुनासिक' या शब्दाचा यौगिक अर्थ केला आहे तसा अर्थ करणें आवश्यक आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां 'अनुनासिक या शब्दाचा वर सांगितल्याप्रमाणें यौगिक अर्थ असल्यामुळें व त्या अर्थान्वयें इष्ट वर्णांना अनुनासिकसंज्ञा होऊं शकत असल्यामुळें अनुनासिक संज्ञेचें वरील सूत्र असण्याची कांहीं गरज नाहीं असें जें दीक्षितांनीं म्हटलें आहे त्यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, अनुनासिकसंज्ञेचें सूत्र गाळल्यास, 'अनुनासिक' हा शब्द संज्ञावाचक ठरणार नाहीं व 'स्वं रूपं शब्दस्याशब्दसंज्ञा' सू. २५ असें सूत्र असल्यामुळें, म्हणजे संज्ञावाचक शब्द खेरीज करून सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या शब्दाचें जसें वर्णानुपूर्वीविशिष्ट स्वरूप आहे त्याचेंच त्या शब्दानें ग्रहण करावें व इतर पर्यायवाचक शब्दाचें ग्रहण करूं नये अशा अर्थाचें सूत्र असल्यामुळें, 'यरोऽनुनासिकेऽनुनासिको वा' सू. ११६ या सूत्राचा, पदान्तीं असणाऱ्या 'यर्' पुढें 'अनुनासिक' हा शब्द आला असतां, त्या यर्चे जागीं विकल्पेंकरून 'अनुनासिक' या

शब्दाचा आदेश होतो अशा प्रकारचा अनिष्ट अर्थ होण्याची आपत्ति येईल. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'हरतेर्दृतिनाथयोः पशौ' सू. २९३९ व 'तस्यापत्यम्' सू. १०८८ इत्यादि सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या) 'पशु, अपत्य' इत्यादि शब्दांचा ज्याप्रमाणें 'पशु, अपत्य हे शब्द' असा अर्थ न करितां, 'पशु, अपत्य' यांच्या अर्थाचें ग्रहण केलें जातें त्याचप्रमाणें 'यरोऽनुनासिके' इत्यादि सूत्रांत 'अनुनासिके, अनुनासिकः' या पदांनीं 'अनुनासिक' या शब्दाचें ग्रहण न करितां त्यांच्या अर्थाचें ग्रहण करतां येतें. ('स्वं रूपं शब्दस्य' १-१-६८ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'शब्दपूर्वकश्चार्थस्य सम्प्रत्ययः, इह च व्याकरणे शब्दे कार्यस्य सम्भवोऽर्थेऽसम्भवस्तस्मादर्थनिवृत्तिः' इत्यादि तऱ्हेचें प्रतिपादन करून त्या सूत्राचें प्रत्याख्यान केलें आहे. आतां हें खरें कीं, 'हरतेर्दृतिनाथयोः पशौ' या सूत्रांत 'पशु' या शब्दाचें व 'तस्यापत्यम्' या सूत्रांत 'अपत्य' या शब्दाचें ग्रहण केलें आहे आणि हे दोन्ही शब्द संज्ञावाचक नाहींत, कारण अष्टाध्यायींत यांची व्याख्या दिली नाहीं. तरी पण 'स्वं रूपं शब्दस्य' हें सूत्र असून देखील, ज्याप्रमाणें 'पशु' व 'अपत्य' या शब्दांचा शब्दपर अर्थ न करितां अर्थपर अर्थ केला जातो, त्याचप्रमाणें 'यरोऽनुनासिके' या सूत्रांतील 'अनुनासिके, अनुनासिकः' या शब्दांचा शब्दपर अर्थ न करितां अर्थपर अर्थ करण्यांत कांहीं अडचण येत नाहीं; कारण पाणिनीनें ठिकठिकाणीं सूत्रांत केलेल्या निर्देशांन्वयें, 'स्वं रूपं शब्दस्य' या सूत्राची अनित्यता सिद्ध होते.) मनोरमेंतील 'मन्दप्रयोजनम्' या पदाचा 'मन्देषु प्रयोजनमस्य' असा व्यधिकरण बहुव्रीहि आहे (व जरी अष्टाध्यायींत तसा व्यधिकरण बहुव्रीहि करण्याकरितां कोणतेंहि सूत्र साक्षात् पठित केलें नाहीं तरी, 'सप्तमी विशेषणे बहुव्रीहौ' सू. ८९८ या ज्ञापकाच्या आधारें तसा बहुव्रीहि करितां येतो) व 'मन्दप्रयोजनम्' या पदाचा अर्थ असा आहे कीं, ज्यांना 'अनुनासिक' या शब्दाचा यौगिकार्थ माहीत नाहीं व लौकिक-

व्यवहारांत आणि प्रातिशाख्यादि व्याकरणग्रन्थांत 'अनुनासिक' या शब्दाच्या यौगिक अर्थाला धरूनच त्या शब्दाचा प्रयोग केला जातो हें माहीत नाहीं तशा लोकांकरितांच अनुनासिकसंज्ञासूत्र केलें आहे व अशा रीतीनें तें सूत्र सप्रयोजनक ठरतें. 'अभ्र आँ अपः' या स्थलीं 'आँ' या अनुनासिकाला इत्संज्ञा झाल्यास, ('तस्य लोपः' सू. ६२ या सूत्रान्वयें) त्याचा लोप होण्याची आपत्ति येईल असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. 'विधानसामर्थ्यात्' या मनोरमेंतील पदाचा "आङ इत् छन्दसि असें सूत्र न करितां 'आङोऽनुनासिकश्छन्दसि' असें सूत्र करून अनुनासिक आदेश होण्याचें जें विधान केलें आहे त्याच्या सामर्थ्यामुळें" असा अर्थ आहे. इत्त्वाचें फल जो लोप तो विधान-सामर्थ्यामुळें होत नसल्यामुळें व अशा रीतीनें इत्संज्ञा निष्फल ठरत असल्यामुळें, ती देखील होत नाहीं असा 'नेत्त्वम्' या मनोरमेंतील पदांचा अर्थ आहे.

शब्दरत्न– ननु 'अभ्र आँ अटितः' इत्यत्र "अनेकान्ता अनुबन्धाः" इति पक्षे "आदितश्च" इतीट्प्रतिषेधः फलम्। न च लोपाभावे इदितिमहासञ्ज्ञाकरणात्संज्ञाऽपि नेति वाच्यम्, महासञ्ज्ञ-यैव लोपसिद्ध्या "तस्य लोपः' इत्यस्य वैयर्थ्यापत्तेः, "इक" इत्यादौ ककारादिश्रवणानापत्तेश्च; इति चेन्न, "अनुबन्धानामेकान्तत्वमेव" इति मुख्यपक्षे दोषाभाव इत्याशयात्। तदा हि मुख्येऽवयविन्यन्य-पदार्थे बहुव्रीहिः। न चायमाकारोऽट्धातोरवयवः, इत्यदोषात्।

(इत्संज्ञेचें फल 'तस्य लोपः' सू. ६२ या सूत्रान्वयें लोप असल्यामुळें, जेथें लोप होत नाहीं तेथें इत्संज्ञा करणें निष्फल ठरत असल्यामुळें ती देखील होत नाहीं असें जें नुकतेंच वर म्हटलें आहे त्यावर शंकाकार अशी शंका करितो कीं, जेथें इत्संज्ञा केल्यानें लोपव्यतिरिक्त इतर फल संभवतें तेथें इत्संज्ञा व्यर्थ ठरत नाहीं व त्यामुळें तशा ठिकाणीं इत्संज्ञा होण्यास काहीं हरकत नाहीं व आपल्या शंकेच्या पुष्ट्यर्थ तो 'अभ्र आँ अटितः' हें उदाहरण देतो

आणि म्हणतो कीं,) 'अनेकान्ता अनुबन्धाः' हा पक्ष स्वीकारल्यास, 'अभ्र आँ अटितः' या उदाहरणांत ('आङ' चे जागीं झालेल्या) 'आँ' या अनुनासिक आदेशाला इत्संज्ञा केली असतां, 'आदितश्च' सू. ३०३६ या सूत्रान्वयें 'अट्' धातूला इडागम न होणें हें फल संभवते. (शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जरी 'आँ' हा 'अट्' धातूचा अवयव नसून भिन्न पद आहे तरी, 'अनेकान्ता अनुबन्धाः' परि ४–म्हणजे ज्याला अनुबन्ध लावले जातात त्याचे ते अनुबन्ध अवयव होत नाहींत, ही परिभाषा असल्यामुळें, 'आँ' या समीप असलेल्या भिन्न पदाला देखील अनुबन्ध मानतां येतें व अशा रीतीनें तें पद अनुबन्ध मानल्यानें 'उपदेशेऽजनुनासिक इत्' सू. ३ या सूत्रानें त्याला इत्संज्ञा केली असतां, जरी विधानसामर्थ्यामुळें त्याचा लोप होत नाहीं तरी, 'आदितश्च' हें सूत्र असल्यामुळें 'अट्' धातूला इडागम न होणें हें लोपव्यतिरिक्त फल संभवतें.) या शंकेवर अशी प्रतिशंका करण्यांत येते कीं, ज्याअर्थी 'आँ' या अनुनासिकाचा लोप होत नाहीं त्याअर्थी, इत्संज्ञा अन्वर्थक असल्यामुळें, ती इत्संज्ञा देखील 'आँ' याला होऊं शकत नाही. (वरील शंकेवर प्रतिशंका करणाऱ्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, एति गच्छतीति-प्रयोगे न तिष्ठतीति–इत्' असा 'इत्' या पदाचा अर्थ असल्यामुळें व इत्संज्ञा अशा रीतीनें अर्थाला धरून केलेली असल्यामुळें, ती संज्ञा अन्वर्थक ठरते आणि म्हणून जेथें ज्याचा लोप होत नाहीं तेथें त्याला अन्वर्थक असलेली ती इत्संज्ञा देखील करतां येत नाहीं. या प्रतिशंकेवर शंकाकार असें उत्तर देतो कीं,) हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण इत्संज्ञा अन्वर्थक मानल्यानेंच जर लोपसिद्धि होऊं शकते तर, 'तस्य लोपः' सू. ६२ हें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येऊं पाहते व तसेंच 'इकः' इत्यादि स्थलीं ककारादि इत् वर्णांचें श्रवण न होण्याची देखील आपत्ति येऊं पाहते. (शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जर 'इत्' या अन्वर्थक संज्ञेच्या सामर्थ्यानेंच इत्संज्ञक

ठरणाऱ्या वर्णाचा लोप होऊं शकतो असें मानलें तर, 'तस्य लोपः' हें सूत्र व्यर्थ ठरेल व 'अण् इक्' इत्यादि प्रत्याहारांतील अन्त्य वर्ण इत् असल्यामुळें ते एकदम नाहींसे होतील व 'अण्, इक्' इत्यादि प्रयोगच होऊं शकणार नाहींत आणि त्यामुळें 'इको यणचि' इत्यादि सूत्र-प्रयोग चूक ठरण्याची आपत्ति येईल. म्हणून जेथें लोप होत नाहीं तेथें अन्वर्थक इत्संज्ञा देखील होऊं शकत नाहीं हें म्हणणें अयोग्य ठरतें. येथें हें लक्षांत ठेवावें कीं, 'ननु अभ्र आँ अटितः' येथपासून 'ककारादिश्रवणानापत्तेश्च' येथपर्यंत शंकाग्रन्थ आहे. आतां या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'अनेकान्ता अनुबन्धाः' हा सिद्धान्तपक्ष नसून एकदेशीची उक्ति आहे आणि म्हणून तो पक्ष स्वीकारतां येत नाहीं आणि 'एकान्ता अनुबन्धाः' प. ५ हाच सिद्धान्तपक्ष असल्यामुळें तोच पक्ष स्वीकारला पाहिजे आणि) अनुबन्ध हे अवयवच होत या मुख्य सिद्धान्तपक्षांत, वर जी इडागम-प्रतिषेधरूप आपत्ति दाखविली आहे ती मुळींच उद्भवत नाहीं आणि तो सिद्धान्तपक्ष स्वीकारल्यासच, अवयवी जो अन्य पदार्थ आहे तो बहुव्रीहिचा अर्थ मानल्यानें बहुव्रीहिसमास उपपन्न ठरतो. (सारांश ज्याला अनुबन्ध लावले आहेत त्याचे ते अवयवच होत, म्हणजे एखादा वर्ण ज्याचा अनुबन्ध मानणें आहे त्याचा तो अवयव असल्यासच त्याला अनुबन्ध मानतां येतें व तो त्याचा अवयव नसल्यास त्याला अनुबन्ध मानतां येत नाहीं असा सिद्धान्तपक्ष असल्यामुळें, 'अभ्र आँ अटितः' या स्थलीं 'आँ' हा 'अट्' धातूचा अवयव नसून भिन्न पद असल्यामुळें तो 'अट्' धातूचा अनुबन्ध आहे असें मुळींच मानतां येत नाहीं व त्यामुळें 'उपदेशेऽजनुनासिक इत्' या सूत्रानें होणारी इत्संज्ञा त्या 'आँ' ला होत नाहीं व वरील उदाहरणांत 'आदितश्च' हें इडागमप्रतिषेधाचें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व इडागम होऊन 'अटितः' असें क्तप्रत्ययान्त इष्ट रूप सिद्ध होऊन 'अभ्र आँ अटितः' हा प्रयोग शुद्ध ठरतो. दुसरें असें कीं, 'एकान्ता

अनुबन्धाः' हा पक्ष मानल्यासच 'पित्, मित्, कित्' इत्यादि स्थलीं 'पकारः, मकारः, ककारः इत् यस्य शप्, श्नम्, क्त इत्याद्यवयविनः' असा अन्यपदार्थप्रधान बहुव्रीहिसमास होऊं शकतो व पित्, मित्, कित् इत्यादि प्रयोग योग्य ठरतात.) वरील उदाहरणांत आकार हा 'अट्' धातूचा अवयव नसल्यामुळें शंकाकारानें दाखविलेला इडागमप्रतिषेधरूप दोष येत नाहीं. (याचें विवरण वर केलेंच आहे.'अनेकान्ता अनुबन्धाः' व 'एकान्ता अनुबन्धाः' या दोन्ही परिभाषांचें विस्तृत विवरण परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरांत पान १६ ते १८ मध्यें केलें आहे व तें वाचल्यास, वरील दोन्ही परिभाषांचा अर्थ नीट ध्यानांत येईल व वरील शब्दरत्नांतील पंक्तीचा अर्थ पूर्णपणें लक्षांत येईल.)

मनोरमा– 'प्रतिज्ञायते इति प्रतिज्ञा' "आतश्चोपसर्गे" इति कर्मण्यङ्। 'प्रतिज्ञा आनुनासिक्यं येषाम्' इति विग्रहः। एवं च 'प्रतिज्ञासमधिगम्ये प्रतिज्ञाशब्दस्य लक्षणा' इति क्लिष्टं व्याख्यानं नाश्रयणीयम्, "पाणिन्युपज्ञं व्याकरणम्" इत्यादिष्विव लक्षणां विनैव निर्वाहात्। यद्यपि सूत्रकारकृतोऽनुनासिकपाठ इदानीं परिभ्रष्टस्तथापि वृत्तिकारादिव्यवहारबलेन यथाकार्यं प्राक् स्थित इत्यनुमीयत इति भावः।

('उपदेशेऽजनुनासिक इत्' सू. ३ या सूत्रावरील कौमुदींत पठित असलेल्या) 'प्रतिज्ञानुनासिक्याः पाणिनीयाः' या पंक्तींतील 'प्रतिज्ञा' या शब्दाची 'प्रतिज्ञायते इति प्रतिज्ञा' अशी व्युत्पत्ति असून या स्थलीं 'आतश्चोपसर्गे' सू. ३२८३ या सूत्रानें 'कर्मणि अङ' प्रत्यय झाला आहे. 'प्रतिज्ञानुनासिक्याः' या पदाचा 'प्रतिज्ञा आनुनासिक्यं येषाम्' असा विग्रह आहे. म्हणून 'प्रतिज्ञासमधिगम्ये प्रतिज्ञाशब्दस्य लक्षणा' असें जें क्लिष्ट व्याख्यान (प्रकाशकारांनीं) केलें आहे तें स्वीकारूं नये; कारण 'पाणिन्युपज्ञं व्याकरणम्' इत्यादि स्थलीं जसा लक्षणा न करितां देखील इष्ट अर्थाचा बोध होऊं शकतो

तसा प्रकृत स्थलीं देखील होऊं शकतो. (प्रकाशकारांनीं 'प्रतिज्ञानं प्रतिज्ञा' असा 'भावे' या अर्थामध्यें 'अङ' प्रत्यय करून 'प्रतिज्ञा नम्=प्रतिज्ञा' अशा रीतीनें 'प्रतिज्ञा' हा शब्द साधला आहे व नंतर 'प्रतिज्ञा' या शब्दाचा 'प्रतिज्ञासमधिगम्य' असा लक्षणेनें अर्थ केला आहे. पण 'आतश्चोपसर्गे' या सूत्रांत पूर्व सूत्रांतून 'भावे' व 'अकर्तरि च कारके' हीं पदें अनुवृत्त होत असल्यामुळें, त्या सूत्रानें जसा 'भावे' या अर्थामध्यें 'अङ' प्रत्यय होऊं शकतो तसाच कर्तृभिन्न कारकाच्या, म्हणजे कर्मरूप कारकाच्या, अर्थामध्यें देखील तो प्रत्यय होऊं शकतो आणि 'कर्मणि' या अर्थामध्यें 'अङ' प्रत्यय केला असतां, 'प्रतिज्ञा' या शब्दाचा 'प्रतिज्ञानविषय' असा यौगिक अर्थ होत असल्यामुळें, प्रथम 'भावे अङ' प्रत्यय करून नंतर लक्षणा करणें असा द्राविडी प्राणायाम करण्याची कांहींच गरज नाहीं. उलट तसें करण्यांत गौरव असून, 'कर्मणि अङ' प्रत्यय करण्यांतच लाघव आहे. 'पाणिन्युपज्ञं व्याकरणम्' या स्थलीं, 'उपज्ञायते इति उपज्ञा' असा 'कर्मणि अङ' प्रत्यय करून 'उपज्ञा' हें रूप सिद्ध केल्यावर, 'पाणिनेः उपज्ञा पाणिन्युपज्ञम्' म्हणजे 'पाणिनिना प्रथम-मुपज्ञायमानम् = पाणिनिकर्तृकाद्यज्ञानविषयीभूतम्', असा अर्थ होत असतां, 'भावे अङ' प्रत्यय करून नंतर लक्षणा करण्याची जशी गरज राहत नाहीं तसेंच 'प्रतिज्ञा' या स्थलीं देखील समजावें, म्हणजे दोन्ही स्थलीं 'कर्मणि अङ' प्रत्ययच करावा व तसें केलें असतां लक्षणा करण्याची मुळींच गरज पडत नाहीं. 'पाणिनेः उपज्ञा' या स्थलीं 'पाणिनेः' ही 'कर्तृकर्मणोः कृति' सू. ६२३ या सूत्रान्वयें कर्तरि षष्ठी असून 'कृद्योगा च षष्ठी समस्यते इति वाच्यम्'–सू. ७०३ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें षष्ठीतत्पुरुषसमास झाला आहे व त्या समासांत 'उपज्ञा' हें उत्तरपद असल्यामुळें, 'उपज्ञोपक्रमं तदाद्याचिख्यासायाम्' सू. ८२४ या सूत्रान्वयें सामासिक शब्द नपुंसक-लिङ्गी झाला आहे हें लक्षांत ठेवावें.) जरी पाणिनीनें केलेला

अनुनासिक पाठ आतां नाहींसा झाला आहे तरी वृत्तिकारादिकांनीं पाणिनीय सूत्रांन्वयें प्रक्रिया करितांना जसा व्यवहार केला आहे व जीं कार्यें केलीं आहेत त्या व्यवहारावरून व त्या कार्यांवरून पाणिनीय पाठांत कोणते अच् अनुनासिक पठित केले होते याचें आपणांस अनुमान करतां येतें व तशा प्रकारचा अनुनासिकस्वरयुक्त पाणिनीय पाठ–अष्टाध्यायी, धातुपाठ इत्यादि–होता असें आपण अनुमान करूं शकतो. ('उपदेशेऽजनुनासिक इत्' सू. ३ हें सूत्र पाणिनीनें केलें असल्यामुळें त्यावरूनच हें सिद्ध होतें कीं, पाणिनीनें अष्टाध्यायी, धातुपाठ इत्यादि रचतेवेळीं ज्यांना इत्संज्ञा होणें इष्ट आहे अशा आद्योच्चारणविषयक शब्दांतील अचांचा अनुनासिकरूपानें पाठ केला असला पाहिजे. तसा पाठ पाणिनीनें केला नसता तर त्याला तें सूत्र रचण्याची कांहींच आवश्यकता नव्हती. सांप्रतकालीं तो अनुनासिक पाठ दुर्दैवानें लुप्त झाला आहे. मग त्या पाठांत कोणते अच् अनुनासिक पठित केले होते हें आतां समजण्यास मार्ग काय? या प्रश्नाचें दीक्षित असें उत्तर देतात कीं, वृत्तिकारादि पूर्व वैयाकरणांनीं जीं उदाहरणें दिलीं आहेत व जे प्रयोग साधले आहेत त्यावरून पाणिनीय पाठांतील कोणते अच् अनुनासिक पठित केले होते याचें आपणांस अनुमान करतां येतें. उदाहरणार्थ चुरादि गणांत 'चुर स्तेये, घट संघाते, कथ वाक्यप्रबन्धे' हे धातु पठित केले आहेत. या धातूंचीं 'चोरयति, घाटयति, कथयति' अशीं रूपें पूर्व वैयाकरणांनीं दिलीं असल्यामुळें, आपणांस हें अनुमान करतां येतें कीं, 'चुर' व 'घट' या धातूंतील अन्त्य अकार अनुनासिक पठित केला असून 'कथ' यांतील अन्त्य अकार अनुनासिक पठित केला नव्हता. पहिल्या दोन धातूंतील अन्त्य अकार अनुनासिक पठित केला असल्यामुळेंच तो प्रकृत सूत्रान्वयें इत्संज्ञक ठरून 'तस्य लोपः' या सूत्रानें त्याचा लोप होतो. यामुळेंच 'चुर्' यांतील उपधेला 'पुगन्तलघूपधस्य च' सू. २१८९ या सूत्रानें गुण होतो व 'घट्' यांतील उपधा अकाराची

'अत उपधायाः' सू. २२८२ या सूत्रानें वृद्धि होते. पण 'कथ' यांतील अन्त्य अकार अनुनासिक पठित नसल्यामुळें तो प्रकृत सूत्रान्वयें इत्संज्ञक होत नाहीं व 'कथ' धातूहून णिच् प्रत्यय केल्यावर जरी त्या अकाराचा 'अतो लोपः' सू. २३०८ या सूत्रानें लोप होतो तरी तो अकार स्थानिवद्भावानें विद्यमान आहे असें मानावें लागत असल्यामुळें व अशा रीतीनें 'कथ' यांतील ककारापुढील अकार उपधाभूत अकार ठरत नसल्यामुळें, त्याची 'अत उपधायाः' या सूत्रानें होणारी वृद्धि होत नाहीं. तसेंच 'समानकर्तृकेषु तुमुन्' या सूत्रावरील काशिकावृत्तींत 'भोक्तुम्' हें तुमुन्प्रत्ययान्ताचें उदाहरण दिलें असल्यामुळें, आपणांस असें अनुमान करतां येतें कीं, तुमुन्प्रत्ययांतील मकारापुढील उकारच अनुनासिक पठित केला असून, तकारापुढील उकार अनुनासिक पठित केला नव्हता. सारांश वृत्तिकारादिकांनीं पाणिनीय सूत्रांचें व्याख्यान करितांना जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यावरून आपणांस पाणिनीय पाठांतील कोणते अच् अनुनासिक पठित केले होते याचें वर सांगितल्याप्रमाणें अनुमान करतां येतें.)

शब्दरत्न–प्रतिज्ञेति । प्रतिज्ञानविषय इत्यर्थः । प्रतिज्ञाशब्दस्येति । भावाऽन्तस्येत्यर्थः । क्लिष्टेति । शक्तिग्राहकव्याकरणसत्त्वाच्छक्त्यैव तदर्थबोधसम्भवे लक्षणाश्रयणं क्लेश इति भावः । लक्षणां विनैवेति । अत्र लक्षणया व्याख्यानं कुर्वताऽपि तत्र लक्षणां विना मदुक्त रीत्यैव व्याख्यातम् । एवं च पूर्वापरविरोधस्तस्येति भावः । न चोभयोर्विधानेऽपि लाघवाद्भावे शक्तिः, कर्मणि लक्षणा, अनुशासनमपि लाक्षणिकार्थानुशासनमेवेति वाच्यम्, "लः कर्मणि" इत्यादीनामपि तथात्वापत्तौ 'तिङां कर्त्रादौ शक्तिः' इति सिद्धान्तासङ्गत्यापत्तेः, व्याकरणस्याभियुक्तोक्तशक्तिग्राहकत्वस्य भङ्गापत्तेश्च ॥

('प्रतिज्ञायते इति प्रतिज्ञा' अशा रीतीनें 'कर्मणि अङ्' प्रत्यय करून 'प्रतिज्ञा' या शब्दाची व्युत्पत्ति केली असल्यामुळें) 'प्रतिज्ञा' या शब्दाचा 'प्रतिज्ञानविषयः' असा अर्थ होतो.

'प्रतिज्ञासमधिगम्ये प्रतिज्ञाशब्दस्य लक्षणा' या मनोरमेंत दिलेल्या पंक्तींतील 'प्रतिज्ञाशब्दस्य' या पदाचा 'भावाङन्तस्य,' म्हणजे 'भावे' या अर्थामध्यें अङप्रत्यय करून जो 'प्रतिज्ञा' शब्द सिद्ध होतो त्या शब्दाचा, असा अर्थ आहे. 'क्लिष्टं व्याख्यानम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, अभिधाशक्तीनें शब्दाच्या अर्थाचा बोध करून देणारें व्याकरणशास्त्र असल्यामुळें, अभिधाशक्तीनेंच शब्दाच्या अर्थाचा बोध होणें संभवत असतां, तशा ठिकाणीं लक्षणेचा आश्रय करण्यांत क्लेश–गौरव–आहे. (सारांश ज्या शब्दाचा अभिधावृत्तीनें इष्ट अर्थ करतां येतो त्या शब्दाचा लक्षणावृत्तीनें तसा अर्थ करणें अनुचित असून, तसा अर्थ करण्यांत काठिन्य व गौरव आहे.) 'लक्षणां विनैव निर्वाहात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'प्रतिज्ञानुनासिक्याः' या स्थलीं जरी प्रकाशकारांनीं 'प्रतिज्ञा' या शब्दाचें लक्षणावृत्तीचा आश्रय करून वर सांगितल्याप्रमाणें व्याख्यान केलें आहे तरी, 'पाणिन्युपज्ञं व्याकरणम्' या स्थलीं 'उपज्ञा' या शब्दाचा अर्थ करतेवेळीं लक्षणेचा आश्रय न करितां आम्ही जसें 'प्रतिज्ञा' या शब्दाचें अभिधावृत्तीनें व्याख्यान केलें आहे तसेंच त्यांनीं 'उपज्ञा' या शब्दाचें अभिधावृत्तीनेंच व्याख्यान केलें आहे आणि अशा रीतीनें त्यांच्या या दोन व्याख्यानांत परस्पर विरोध येतो. (सारांश जसा प्रकाशकारांनीं 'उपज्ञा' या शब्दाची व्युत्पत्ति करितांना 'कर्मणि अङ' प्रत्यय केला आहे त्याचप्रमाणें त्यांनीं 'प्रतिज्ञा' या शब्दाची व्युत्पत्ति करितांना देखील 'कर्मणि अङ' प्रत्ययच करावयास हवा होता. तसें त्यांनीं न करितां 'भावे अङ' प्रत्यय करून 'प्रतिज्ञा' या शब्दाचा 'प्रतिज्ञासमधिगम्य' असा जो लक्षणेनें अर्थ केला आहे तें त्यांचें करणें अनुचित असून, 'उपज्ञा' या शब्दाची त्यांनीं पुढें जी व्युत्पत्ति केली आहे तिच्याशीं विरोध येतो असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे असें शब्दरत्नकार म्हणतात. आतां प्रकाश-

कारांतर्फे असें म्हणण्यांत येतें कीं,) जरी अङ्प्रत्यय 'भावे' या अर्थात व तसेंच कर्तृभिन्न इतर कारकांच्या अर्थांमध्यें होण्याचें विधान केलें आहे तरी (धातु क्रियावाचक असल्यामुळें व धातूनें क्रियारूप अर्थाचीच उपस्थिति होत असल्यामुळें, धातूहून होणाऱ्या) अङ प्रत्ययाची लाघवामुळें भावार्थ–क्रियारूप अर्थ–द्योतन करण्यांतच अभिधाशक्ति आहे व त्या प्रत्ययानें 'कर्मणि' या अर्थाचें द्योतन करणें झाल्यास, लक्षणावृत्तीचा उपयोग केला पाहिजे. उदाहरणार्थ, 'अनुशासन' या स्थलीं ('शास्' धातूहून होणारा 'ल्युट्=अन' हा प्रत्यय अभिधावृत्तीनें 'भावे' या अर्थाचा बोधक असून) लक्षणावृत्तीनें जसा 'करणे' या अर्थाचा बोधक आहे तसाच अङ प्रत्यय अभिधावृत्तीनें 'भावे' या अर्थाचा बोधक असून लक्षणावृत्तीनें 'कर्मणि' या अर्थाचा बोधक आहे. (पण शब्दरत्नकार म्हणतात कीं, प्रकाशकारांच्या मताचें समर्थन करण्याकरितां खण्डनकारादिकांनीं हें जें म्हटलें आहे) तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण तें म्हणणें बरोबर मानल्यास, 'लः कर्मणि च भावे चाकर्मकेभ्यः' सू. २१५२ इत्यादि ठिकाणीं देखील असेंच मानण्याची, म्हणजे लकारांनीं 'भावे' या अर्थाचा बोध अभिधावृत्तीनें होतो आणि 'कर्मणि' व 'कर्तरि' या अर्थांचा बोध लक्षणावृत्तीनें होतो असें मानण्याची, आपत्ति येईल व त्यामुळें 'तिङां कर्त्रादौ शक्तिः' हा सिद्धान्त चूक ठरण्याची व तसेंच व्याकरणशास्त्रानें शब्दाच्या अर्थाचा अभिधाशक्तीनें बोध होतो असें जें विद्वान वैयाकरणांनीं म्हटलें आहे तें देखील चूक ठरण्याची आपत्ति येईल. ('लः कर्मणिच भावे चाकर्मकेभ्यः' या सूत्रानें सकर्मक धातूंना 'कर्तरि' व 'कर्मणि' या अर्थांमध्यें व अकर्मक धातूंना 'कर्तरि' व 'भावे' या अर्थांमध्यें लकार होणें सांगितलें आहे; धातूंहून केवळ 'भावे' या अर्थामध्यें लकार होणें सांगितलें नाहीं आणि तीन्ही प्रकारच्या अर्थांमध्यें लकार होणें सांगितलें असल्यामुळें, 'भावे' या अर्थाचा अभिधाशक्तीनें बोध होतो आणि 'कर्तरि' व 'कर्मणि' या

अर्थांचा लक्षणावृत्तीनें बोध होतो असें मानण्यास कांहींच प्रमाण नाहीं. वरील सूत्रांत 'कर्तरि, कर्मणि, भावे' या तीन्ही शब्दांचा निर्देश केला असल्यामुळें, लकारानें तीन्ही प्रकारच्या अर्थांचा अभिधाशक्तीनेंच बोध होतो असेंच मानणें योग्य आहे. दुसरें असें कीं, लकारानें 'भावे' या अर्थाचाच अभिधाशक्तीनें बोध होतो असें मानल्यास, 'तिङां' भावे शक्तिः' असा सिद्धान्त असावयास पाहिजे होता. पण तसा सिद्धान्त नसून 'तिङां कर्त्रादौ शक्तिः' असा सिद्धान्त आहे व या सिद्धान्तान्वयें जसा 'भावे' या अर्थाचा अभिधाशक्तीनें बोध होतो तसाच 'कर्तरि, कर्मणि' या अर्थांचा देखील अभिधाशक्तीनेंच बोध होतो. तिसरें असें कीं, अभियुक्त वैयाकरणांनीं 'शक्तिग्रहं व्याकरणोपमानकोशाप्तवाक्याद्व्यवहारतश्च । वाक्यस्य शेषाद्विवृत्तेर्वदन्ति सान्निध्यतः सिद्धपदस्य वृद्धाः ॥' अशी कारिका पठित केली आहे. या कारिकेवरून देखील हें स्पष्ट होतें कीं, शब्दाच्या अर्थाचा अभिधाशक्तीनें बोध करून देणें हेंच व्याकरणशास्त्राचें प्रयोजन आहे. म्हणून 'भावे शक्तिः इतरत्र लक्षणा' असें जें खण्डनकारादिकांनीं म्हटलें आहे तें शास्त्रविरुद्ध आहे. सारांश 'आतश्चोपसर्गे' सू. ३२८३ या सूत्रानें उपसर्गपूर्वक आकारान्त धातूहून 'भावे' व कर्तृभिन्नकारक या दोन्ही अर्थांमध्यें अङ्प्रत्यय होण्याचें विधान केलें असल्यामुळें, जसा तो प्रत्यय 'भावे' या अर्थाचा अभिधाशक्तीनें बोधक होतो तसाच 'कर्मणि' या अर्थाचा देखील तो अभिधाशक्तीनेंच बोधक होतो आणि म्हणून प्रकाशकारांनीं जसा 'उपज्ञा' या स्थलीं कर्मणि अङ्प्रत्यय केला आहे त्याचप्रमाणें 'प्रतिज्ञा' या स्थलीं देखील त्यांनीं कर्मणि अङ्प्रत्ययच करावयास पाहिजे होता व त्या स्थलीं त्यांनीं प्रथम 'भावे अङ्' प्रत्यय करून नंतर 'कर्मणि' या अर्थामध्यें जी लक्षणा केली आहे तें त्यांचें करणें योग्य नव्हतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा—ननु रलयोरिति न्यूनम्, टकारस्यापि मध्यगतत्वादित्यत आह—प्रत्याहारेष्विति । व्यवन्हियन्ते इति । 'प्रत्यान्हियन्ते =

संक्षिप्यन्ते वर्णा यत्र' इति बाहुलकादधिकरणे घञ्। यद्यपि योगमात्रमकारादिसञ्ज्ञास्वतिप्रसक्तं तथापि योगरूढिरिति भावः। प्रत्याहाराश्चैकचत्वारिंशदिति प्राञ्चः। चतुर्दशसूत्रीस्थैर्हल्भिरिड्भिः कृता अष्टाध्याय्यां व्यवहृता एकचत्वारिंशदिति तस्यार्थः। तेन सुप्तिङादीनाम्, रप्रत्याहारस्य, "चयो द्वितीया" इति वार्तिकस्थ-'चय्' प्रत्याहारस्य चाधिक्येऽप्यदोषः। यत्तु "-ञमन्ताड्डः" इति, "यमिर्ञमन्तेष्वनिडेक इष्यते" इति च 'ञम्' वार्तिककृता व्यवहृत इत्याहुः, तद्भ्रमसाभिधानम्, आद्यस्योणादिसूत्रत्वात्, द्वितीयस्य व्याघ्रभूतिकारिकास्थत्वात्। इत्यास्तां तावत्। एष च संख्यानियमो नातीवोपयुज्यत इत्युपेक्षितः।

(दीक्षितांनीं 'उपदेशेऽजनुनासिक इत्' सू. ३ या सूत्रावरील कौमुदींत 'एषामन्त्या इतः। लण्सूत्रे अकारश्च' म्हणजे शिवसूत्रांतील अन्त्य व्यञ्जन 'हलन्त्यम्' या सूत्रानें इत्संज्ञक होतें व 'लण्' या शिवसूत्रांतील लकारापुढील अकार 'उपदेशेऽजनुनासिक इत्' या सूत्रानें इत्संज्ञक होतो, असें सांगून त्यांनीं त्या सूत्रावरील कौमुदींत 'लण्सूत्रस्थावर्णेन सहोच्चार्यमाणो रेफोरलयोः संज्ञा' असें म्हटलें आहे. यावर कदाचित् अशी शंका करण्यांत येईल कीं, त्या पंक्तींत) 'रलयोः' असें जें म्हटलें आहे तें न्यून-अपुरें-आहे; कारण (हयवरट्' या सूत्रांतील रकार व 'लण्' या सूत्रांतील अकार या) दोन वर्णांमध्यें टकार देखील आहे. (म्हणून 'रटलानाम्' असें 'रलयोः' या ऐवजीं म्हटलें पाहिजे होतें. या शंकेचें निरसन करण्याकरितांच) 'प्रत्याहारेष्वितां न ग्रहणम्,' म्हणजे प्रत्याहारांनीं मध्यें पठित असलेल्या इत्संज्ञक वर्णांचें ग्रहण होत नाहीं, असें त्या सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे. (म्हणून 'हयवरट्' या शिवसूत्रांतील अन्त्य टकार हा 'हलन्त्यम्' या सूत्रान्वयें इत्संज्ञक असल्यामुळें, 'र' या प्रत्याहारानें त्या टकाराचें ग्रहण न होतां 'र्, ल्' या दोन वर्णांचेंच ग्रहण होतें आणि अशा रीतीनें 'रलयोः संज्ञा' असें जें

दीक्षितांनीं म्हटलें आहे तें योग्य ठरतें. प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेला 'अनुनासिक' हा शब्द 'प्रत्याहारेष्वितां न ग्रहणम्' याचें ज्ञापक आहे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. या खेरीज 'तृषिमृषिकृषेः काश्यपस्य' सू. ३३२६ हें सूत्र देखील त्याचें ज्ञापक देतां यतें. या सूत्रांतील 'मृषि' यांतील षकारापुढील इकारापुढें ककार आला असून देखील त्या इकाराचे जागीं यणादेश केला नसल्यामुळें हें सिद्ध होतें कीं, 'ऋऌक्' या शिवसूत्रांतील अन्त्य इत्संज्ञक ककाराचें अच्प्रत्याहारानें ग्रहण होत नाहीं. 'आदिरन्त्येन इत्येतत्सूत्रेण कृताः संज्ञाः प्रत्याहार-शब्देन व्यवन्हियन्ते' असें जें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे त्यांत निर्दिष्ट असलेल्या 'प्रत्याहार' या शब्दाची व्युत्पत्ति आतां दीक्षित सांगतात.) 'प्रत्यान्हियन्ते=संक्षिप्यन्ते वर्णा यत्र इति प्रत्याहारः' अशी 'प्रत्याहार' या शब्दाची व्युत्पत्ति असून या स्थलीं ('कृत्यल्युटो बहुलम्' सू. २८४१ या सूत्रानें) बाहुलकत्वामुळें 'अधिकरणे' या अर्थामध्यें घञ्प्रत्यय झाला आहे. जरी 'प्रत्याहार' या शब्दाचा यौगिक अर्थ स्वीकारल्यास, अकार इत्यादिकांचे ठिकाणीं देखील 'प्रत्याहार' ही संज्ञा लागू पाहाते तरी, येथें 'प्रत्याहार' या शब्दाच्या योगरूढ अर्थाचेंच ग्रहण करावें असा वर दिलेल्या कौमुदींतील पंक्तीचा भावार्थ आहे. (अच् या प्रत्याहारानें अकारापासून चकारापर्यंत जो वर्णसमुदाय आहे त्याचें जसें ग्रहण होतें तसेंच शिव-सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अ, इ, उ' या वर्णांनीं अठराहि प्रकारच्या त्या वर्णांचें ग्रहण होतें व ऋकार व ऌकार यांनीं तीस प्रकारच्या वर्णांचें व 'ए, ओ, ऐ, औ' यांनीं बारा प्रकारच्या वर्णांचें ग्रहण होतें असें 'अणुदित्' सू. १४ या सूत्रावरील कौमुदींत सांगितलें आहे. म्हणून शिवसूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अ' इत्यादि वर्णांनीं अनेक वर्णांचें ग्रहण होत असल्यामुळें, 'प्रत्याहार' या शब्दाचा वर दिलेला यौगिक अर्थ मानल्यास, त्या वर्णांना देखील 'प्रत्याहार' ही संज्ञा लागू पाहते. ही आपत्ति टाळण्याकरितां दीक्षित असें म्हणतात कीं,

येथें 'प्रत्याहार' या शब्दाचा यौगिक अर्थ न स्वीकारतां, ज्याप्रमाणें 'पङ्कज' या शब्दाचा 'कमल' असाच योगरूढ अर्थ स्वीकारला जातो त्याचप्रमाणें, योगरूढ अर्थच स्वीकारावा व तसा अर्थ स्वीकारल्यास, शास्त्रीय व्यवहारांत 'अण्, अक्, अच्' इत्यादिकांनाच 'प्रत्याहार' ही संज्ञा लावली जात असल्यामुळें, त्या संज्ञेनें तशा शास्त्रीय प्रत्याहारांचेंच ग्रहण होतें व अकारादिकांचें ग्रहण होत नाहीं आणि अशा रीतीनें वर दाखविलेली आपत्ति टळते.) प्राचीन वैयाकरणांच्या–प्रक्रियाकौमुदीकारादिकांच्या–मतें एकेचाळीस प्रत्याहार आहेत व त्यांच्या म्हणण्याचा अर्थ हा आहे कीं, चवदा शिवसूत्रांत असणाऱ्या इत्संज्ञक व्यंजनांनीं साधलेले आणि अष्टाध्यायींत उपयोगांत आणलेले एकेचाळीस प्रत्याहार आहेत. त्यामुळें 'सुप्,' 'तिङ,' इत्यादि आणि 'र' व तसेंच 'चयोद्वितीयाः' या वार्तिकांत पठित असलेला 'चय्' प्रत्याहार यांनीं जरी वर सांगितलेली एकेचाळीस ही संख्या वाढते तरी कांहीं दोष येत नाहीं. (कारण 'सुप्, तिङ' इत्यादि प्रत्याहार जरी अष्टाध्यायींत निर्दिष्ट आहेत तरी ते शिवसूत्रांत असलेल्या इत्संज्ञक हलानें साधले नाहींत. 'र' प्रत्याहार हा इत् हलानें साधला नसून 'लण्' या शिवसूत्रांतील 'अ' या इत् अचानें साधला आहे, व 'चय्' प्रत्याहार जरी शिवसूत्रस्थ इत् हलानें साधला आहे तरी, त्याचा अष्टाध्यायींत कोठेंहि निर्देश केला नसून केवळ वार्तिकांत निर्देश केला आहे. म्हणून प्राचीन वैयाकरणांनीं सांगितलेली प्रत्याहारसंख्या बरोबर मानण्यास हरकत नाहीं. प्रकाशकार असें म्हणतात कीं, 'ञमन्ताड्डः' व 'यमिर्ञमन्तेष्वनिडेक इष्यते' या दोन स्थलीं वार्तिककारानें 'ञम्' प्रत्याहाराचा उपयोग केला आहे; पण त्यांनीं विचार न करितां हें म्हटलें आहे; कारण 'ञमन्ताड्डः' हें (वार्तिक नसून) उणादि सूत्र-सू. १११–आहे, आणि 'यमिर्ञमन्तेषु' हें देखील (वार्तिक नसून) व्याघ्रभूतिकृत कारिकेचा भाग आहे. ह्या विषयासंबंधीं एवढें पुरे.

प्रत्याहारांची गणना करण्यांत कांहीं विशेष लाभ नाहीं आणि म्हणूनच कौमुदींत तशी संख्या सांगण्याची उपेक्षा केली आहे, म्हणजे सांगितली नाहीं.

शब्दरत्न– टकारस्यापीति। अत्र यद्वक्तव्यं तदन्यत्रोक्तम्। बाहुलकादिति। 'भावघञन्तादर्शआद्यच्' इत्यपि बाहुलकादविशिष्टमिति भावः। एकचत्वारिंशदिति।

"एकस्मान् ङञणवटा, द्वाभ्यां ष स्त्रिभ्य एव कणमाः स्युः। ज्ञेयौ चयौ चतुर्भ्यो, रः पञ्चभ्यः, शलौ षड्भ्यः" इति तदुक्तेरिति भावः॥

'र' प्रत्याहारासंबंधानें जें सांगणें आवश्यक आहे तें इतर ग्रन्थांत, म्हणजे शब्देन्दुशेखरांत, सांगितलें आहे. (म्हणून त्याचा या ग्रन्थांत पुन्हा उल्लेख केला नाहीं. त्या ग्रन्थांत असें म्हटलें आहे कीं, 'लण्' या शिवसूत्रांतील अकार इत्संज्ञक मानला व त्यायोगें 'र' प्रत्याहाराची सिद्धि करून स्वतंत्र 'र' प्रत्याहार मानला तर, 'अतो लरान्तस्य' सू. २३३० असें सूत्र न करितां, पाणिनीनें 'अतो रान्तस्य' असें सूत्र करावयास पाहिजे होतें; तसेंच 'यण्' प्रत्याहार न करितां, 'य' असा लघु प्रत्याहार करावयास पाहिजे होता आणि त्यामुळें पाणिनीनें 'इको यणचि' असें सूत्र न करितां 'इको योऽचि' असें सूत्र करावयास पाहिजे होतें व तसें सूत्र केल्यानें अर्धमात्रालाघव झालें असतें. शब्देन्दुशेखरांत 'परे त्वस्यानुनासिकत्वे अतो ॡेति सूत्रे पाणिनिर्लकारं नोच्चारयेत्, प्रत्याहारेणैव निर्वाहात्। किन्त्वास्येत्संज्ञकत्वे बहुषु यण्पदघटितसूत्रेष्वर्द्धमात्राऽऽलाघवानुरोधेन यप्रत्याहारेणैव व्यवहरेत्......तस्मादस्यानुनासिकत्वमप्रामाणिकम्, उरण्रपर इत्यत्र लग्रहणं कर्तव्यमेव, ऋॡवर्णयोः सावर्ण्यवदित्याहुः।' नागेशानीं असें म्हटलें आहे. सारांश शब्दरत्नकारांच्या मतें 'लण्' या शिवसूत्रांतील अकार अनुनासिक व इत्संज्ञक नाहीं व त्यामुळें 'र' प्रत्याहार सिद्ध होऊं शकत नाहीं.) 'बाहुलकादधिकरणे वञ्' असें जें मनोरमेंत

म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'प्रत्याहार' हा शब्द
भावघञन्त मानून नंतर त्याहून 'अर्श आदिभ्योऽच्' सू. १९३३ या
सूत्रानें 'अच्' प्रत्यय करून 'प्रत्याहार' या शब्दाची सिद्धि करणें
किंवा बाहुलकत्वामुळें 'अधिकरणे घञ्' प्रत्यय करून त्या शब्दाची
सिद्धि करणें या दोन प्रकारच्या व्युत्पत्तींत कांहीं फरक नाहीं.
(शंकाकाराचें असें म्हणणें आहे कीं, जेथें गत्यन्तर नाहीं तेथेंच
'कृत्यल्युटो बहुलम्' सू. २८४१ या सूत्रानें 'अधिकरणे' या अर्थामध्यें
घञ् प्रत्यय करतां येतो; कारण 'सिद्धावस्थापन्नक्रिया' या
अर्थामध्येंच 'भावे' सू. ३१८४ या सूत्रानें घञ् प्रत्यय होणें सांगितलें
असून, 'करणाधिकरणयोश्च' सू. ३२९३ या सूत्रानें 'अधिकरणे'
या अर्थामध्यें होणारा 'ल्युट्' प्रत्यय 'अधिकरणे घञ्' प्रत्ययाचा
बाधक आहे. म्हणून 'प्रत्याह्रियन्ते वर्णा यत्र स प्रत्याहारः' अशी
'अधिकरणे घञ्' प्रत्यय करून 'प्रत्याहार' या शब्दाची व्युत्पत्ति
करणें शास्त्रविरुद्ध व सदोष असल्यामुळें, 'प्रत्याहरणम् प्रत्याहारः'
असा भावघञन्त शब्द 'भावे' या सूत्रान्वयें सिद्ध करून नंतर
'प्रत्याहारः=प्रत्याहरणम् अस्ति अस्मिन् स प्रत्याहारः' अशा रीतीनें
त्या भावघञन्त 'प्रत्याहार' शब्दाहून 'अर्श आदिभ्योऽच्' सू. १९३३
या सूत्रानें मत्वर्थीय 'अच्' प्रत्यय करून 'प्रत्याहार' या शब्दाची
व्युत्पत्ति करावी व तसें केल्यानें तो शब्द 'अण्, अक्, अच्' इत्यादि
प्रत्याहारांना लागू पडतो. पण अशा रीतीनें शंकाकारानें म्हटल्या-
प्रमाणें 'प्रत्याहार' या शब्दाची सिद्धि करतेवेळीं त्या शब्दाचा 'अर्श
आदि' या आकृतिगणांत पाठ कल्पिला पाहिजे व 'प्रत्याहरणमिति
प्रत्याहारः' आणि 'प्रत्याहारः अस्ति अस्मिन् सः प्रत्याहारः' अशा
दोन वृत्ति कल्पिल्या पाहिजेत. असें करण्यांत गौरव असून, बाहुल-
कत्वामुळें 'अधिकरणे घञ्' प्रत्यय करण्यांत लाघव आहे व तो
प्रत्यय अगतिकगतिन्यायानें करतां येतो. म्हणून 'अधिकरणे घञ्'
प्रत्यय करून 'प्रत्याहार' या शब्दाची व्युत्पत्ति करणें हाच अधिक

श्रेयस्कर मार्ग आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) एकेचाळीस प्रत्याहार आहेत असें जें प्राचीन वैयाकरणांनीं म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, त्यांनीं या विषयासंबंधीं, 'एकस्मान् ङञणवटा, द्वाभ्यां ष, स्त्रिभ्य एव कणमाः स्युः । ज्ञेयौ चयौ चतुर्भ्यो, रः पञ्चभ्यः, शलौ षड्भ्यः ॥' अशी कारिका पठित केली आहे. (या कारिकेचा अर्थ असा आहे कीं, अक्षरसमाम्नायांतील एका वर्णानंतर, म्हणजे 'ए, य, अ, छ, अ' या वर्णांपुढें, 'ङ, ञ्, ण्, व्, ट्' हे इत्संज्ञक वर्ण अनुक्रमें लावले असतां, त्या योगानें 'एङ, यञ्, अण्, छव्, अट्' हे पांच प्रत्याहार सिद्ध होतात. येथील णकार प्रथम शिवसूत्रांत असलेला णकार समजावा. अक्षरसमाम्नायांतील दोन वर्णांनंतर, म्हणजे 'झ, भ' या दोन वर्णांपुढें, ष् हा इत्संज्ञक वर्ण जोडला असतां, त्या योगानें 'झष्, भष्' हे दोन प्रत्याहार सिद्ध होतात. अक्षरसमाम्नायांतील तीन वर्णांपुढें, म्हणजे 'अ, इ, उ' या तीन वर्णांपुढें, क् हा इत्संज्ञक वर्ण जोडला असतां, त्या योगानें 'अक्, इक्, उक्' हे तीन प्रत्याहार सिद्ध होतात. तसेंच 'लण्' या शिवसूत्रांतील इत्संज्ञक णकार 'अ, इ, य' या अक्षरसमाम्नायांतील तीन वर्णांपुढें जोडला असतां, त्या योगानें 'अण्, इण्, यण्' हे तीन प्रत्याहार सिद्ध होतात, आणि तसेंच 'म्' हा इत्संज्ञक वर्ण अक्षरसमाम्नायांतील 'अ, य, ङ' या तीन वर्णांपुढें जोडला असतां, त्या योगानें 'अम्, यम्, ङम्' हे तीन प्रत्याहार सिद्ध होतात व अशा रीतीनें 'त्रिभ्य एव कणमाः स्युः' या वचनान्वयें एकंदर नव प्रत्याहार सिद्ध होतात. 'च्, य्' हे इत्संज्ञक वर्ण अक्षरसमाम्नायांतील चार वर्णांनंतर येतात, म्हणजे 'च्' हा इत्संज्ञक वर्ण 'अ, इ, ए, ऐ' यांच्यानंतर जोडला असतां, त्या योगानें 'अच्, इच्, एच्, ऐच्' हे चार प्रत्याहार सिद्ध होतात, आणि तसेंच 'य्' हा इत्संज्ञक वर्ण 'य, म, झ, ख' या चार अक्षरसमाम्नायांतील वर्णांपुढें जोडला असतां, त्या योगानें 'यय्, मय्, झय्, खय्,' हे चार प्रत्याहार सिद्ध

होतात व अशा रीतीनें 'झयौ चयौ चतुर्भ्यः' या वचनान्वयें एकंदर आठ प्रत्याहार सिद्ध होतात. 'र्' हा इत्संज्ञक वर्ण अक्षरसमाम्नायांतील 'य, झ, ख, च, श' या पांच वर्णांपुढें जोडला असतां त्या योगानें 'यर्, झर्, खर्, चर्, शर्' हे पांच प्रत्याहार सिद्ध होतात. 'श्, ल्' हे इत्संज्ञक वर्ण अक्षरसमाम्नायांतील सहा वर्णांपुढें जोडल्यास, म्हणजे श् हा इत्संज्ञक वर्ण 'अ, ह, व, झ, ज, ब' या सहा वर्णांपुढें जोडल्यास, त्यायोगानें 'अश्, हश्, वश्, झश्, जश्, बश्' हे सहा प्रत्याहार सिद्ध होतात, आणि त्याचप्रमाणें 'ल्' हा इत्संज्ञक वर्ण 'अ, ह, व, र, झ, श' या सहा वर्णांपुढें जोडल्यास, त्या योगानें 'अल्, हल्, वल्, रल्, झल्, शल्' हे सहा प्रत्याहार सिद्ध होतात आणि अशा रीतीनें 'शलौ षड्भ्यः' या वचनान्वयें एकंदर बारा प्रत्याहार सिद्ध होतात. सारांश ५+२+९+८+५+१२=४१ असे वरील कारिकेंत सांगितल्याप्रमाणें एकेचाळीस प्रत्याहार सिद्ध होतात व याच एकेचाळीस प्रत्याहारांचा अष्टाध्यायींत निर्देश केला आहे. कारिकेंत ज्या इत्संज्ञक वर्णांचा निर्देश केला आहे ते 'हलन्त्यम्' या सूत्रान्वयें इत्संज्ञक होणारे शिवसूत्रांतील अन्त्य वर्ण होत.)

मनोरमा– "ऊकालोच्" ॥ ह्रस्वदीर्घप्लुत इति समाहारद्वन्द्वः। सौत्रं पुंस्त्वम्। वां काल इवेति। फलितार्थकथनमिदम्। विग्रहस्तु 'वः कालो यस्य' इति बोध्यः। ऊशब्देन स्वोच्चारणकालो लक्ष्यते। आ ये इति। "निपाता आद्युदात्ताः" इत्याकार उदात्तः। यच्छब्दस्तु फिट्सूत्रेण। अर्वाङ इति। अकारोऽनुदात्तः।

'ऊकालोऽज्झ्रस्वदीर्घप्लुतः' सू. ४ या सूत्रांतील 'ऱ्हस्वदीर्घप्लुतः' हा समाहारद्वन्द्व आहे व त्याचा पुल्लिङ्गांत केलेला प्रयोग सौत्रप्रयोग समजावा. ('ऱ्हस्वदीर्घप्लुतः' हा समाहारद्वन्द्व मानल्यास, 'स नपुंसकम्' सू, ८२१ या सूत्रानें तो नपुंसकलिङ्गी व्हावयास पाहिजे होता. परंतु 'छन्दोवत्सूत्राणि भवन्ति' व 'दृष्टानुविधिश्छन्दसि' या वचनांन्वयें तो सौत्र पुल्लिङ्गी प्रयोग शुद्ध मानला पाहिजे.)

प्रकृत सूत्रावरील कौमुदींत ‘ ऊकालः ’ या पदाचें ‘ वां काल इव कालो यस्य सः ’ असें जें व्याख्यान केलें आहे तें (‘ ऊकालः ’ या शब्दाचा विग्रह नसून, विग्रह वाक्याचा जो अर्थ निष्पन्न होतो तो) फलित अर्थ सांगणारें तें वाक्य आहे. वास्तविक ‘ ऊकालः ’ या पदाचा ‘ वः कालो यस्य ’ असा विग्रह समजावा. (या स्थलीं ‘ उ + ऊ + ऊ३ ’ यांचे ‘ अकः सवर्णे दीर्घः ’ सू. ८५ या सूत्रानें ‘ ऊ ’ असें रूप झालें असून, ‘ वः ’ हें त्याच्या प्रथमेचें बहुवचन आहे हें लक्षांत ठेवावें. ‘ ऊकालः ’ यांतील) ‘ ऊ ’ या शब्दाचा म्हणजे उ, ऊ, ऊ३ या तीन शब्दांचा, त्यांचा उच्चार होण्यास लागणारा काल ’ असा लक्षणेनें अर्थ होतो. (सारांश उ, ऊ, ऊ३ हे तीन शब्द वर्णांचे वाचक न समजतां ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत अचांच्या उच्चारणास जो काल लागतो त्या कालाचे लक्षणेनें वाचक आहेत असें समजावें.) ‘ उच्चैरुदात्तः ’ सू. ५ या सूत्रावरील कौमुदींत ‘ आ ये ’ हें जें उदाहरण दिलें आहे त्यांतील ‘ आ ’ हा निपात ‘ निपाता आद्युदात्ताः ’ फिट् सू. ८० या सूत्रान्वयें उदात्त आहे. पण ‘ यद् ’ हा शब्द ‘ फिषोऽन्त उदात्तः ’ फिट् सू. १ या सूत्रान्वयें अन्तोदात्त आहे. (‘ आ ये ’ या उदाहरणांतील ‘ ये ’ या पदाची स्वरप्रक्रिया शब्दरत्नाचें व्याख्यान करितांना दिली जाईल.) ‘ निचैरनुदात्तः ’ सू. ६ या सूत्रावरील कौमुदींत ‘ अर्वाङ ’ हें जें उदाहरण दिलें आहे त्यांतील अकार अनुदात्त आहे. (याचें कारण शब्दरत्नांत दिलें जाईल.)

शब्दरत्न– सौत्रं पुंस्त्वमिति । यद्यपि इतरेतरयोगेऽपि सौत्रमेकवचनं वक्तुं शक्यम्,तथापि ‘ लिङ्गमशिष्यं लोकाश्रयत्वाल्लिङ्गस्य ’ इति तत्र तत्र वार्तिकोक्तेर्लिङ्गस्य लौकिकत्वात्तद्व्यत्ययकल्पनमेवोचितम्, न तु शास्त्रीयवचनव्यत्ययकल्पनमिति भावः । फलितार्थेति । ऊपदेन स्वोच्चारणकालसदृशलक्षणया, कालशब्देन समानाधिकरणबहुव्रीहौ तत् फलतीति भावः । ‘ वां कालः ’ इति तु न विग्रहो व्यधिकरणत्वादत

आह–विग्रहस्त्विति । 'कालः' इति जात्याख्यायामेकवचनम् । स्वोच्चारणकाल इति । स्वोच्चारणकालसदृश इत्यर्थः । सादृश्यमूलके कालयोरभेदाध्यवसाये तु यथाश्रुतमेव साधु ।

फिट्सूत्रेणेति । अन्तोदात्त इत्यर्थः । जसः सुप्त्वादनुदात्तत्वम् । "एकादेश उदात्तेन" इत्येकार उदात्त इति भावः । अनुदात्त इति । फिट्स्वरेणान्तस्योदात्तत्वे शेषनिघातेनेति भावः । अभिमुखवाच्यव्युत्पन्नं प्रातिपदिकमर्वाङिति ।

'ह्रस्वदीर्घप्लुतः' हा इतरेतरयोगद्वन्द्व असून देखील या स्थलीं ('ह्रस्वदीर्घप्लुताः' असा जो बहुवचनाचा प्रयोग करावयास पाहिजे होता तसा प्रयोग न करितां) जो एकवचनाचा प्रयोग केला आहे तो सौत्रप्रयोग आहे असें देखील जरी दीक्षितांना म्हणतां येऊं शकत होतें तरी, त्यांनीं तसें न म्हणतां 'सौत्रं पुंस्त्वम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें आहे कीं, 'लिङ्गमशिष्यं लोकाश्रयत्वाल्लिङ्गस्य,' म्हणजे लिङ्ग हें लौकिक व्यवहारावर अवलंबून असल्यामुळें त्याचा उपदेश व्याकरणशास्त्रांत केला जात नाहीं, असें वार्तिककारानें ठिकठिकाणीं म्हटलें असल्यामुळें व अशा रीतीनें लिङ्ग हें (शास्त्रीय नसून) लौकिक असल्यामुळें, लिङ्गामध्येंच फरक करणें उचित आहे व वचन हें शास्त्रीयोपदेशानुसार होत असल्यामुळें त्यांत व्यत्यय–फरक–करणें उचित नाहीं. (सारांश शास्त्रीय मर्यादेचें उल्लङ्घन केव्हांहि करतां येऊं शकत नसून अवश्यस्थलीं लौकिक मर्यादेचें उल्लङ्घन करतां येऊं शकत असल्यामुळें, दीक्षितांनी 'सौत्रमेकवचनम्' असें न म्हणतां 'सौत्रं पुंस्त्वम्' असें म्हटलें आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'फलितार्थकथनमिदम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'ऊ' या पदाचा त्याच्या उच्चारणाला लागणाऱ्या कालाएवढा काल असा सादृश्यमूलक लक्षणेनें अर्थ केल्यानें 'ऊ' या पदाचा 'काल' या शब्दाशीं सामानाधिकरण्यानें बहुव्रीहि होऊन 'वः कालः यस्य'

असा विग्रह होतो व 'वां काल इव कालो यस्य' हा त्या विग्रहवाक्यां-तून तात्पर्यार्थ निघतो. (सारांश 'ऊकालोऽच्' या सूत्रांतील 'ऊकालः' या पदाचा वरप्रमाणें बहुव्रीहि समास केल्यानें, असा अर्थ होतो कीं, 'उ, ऊ, ऊ३' यांच्या उच्चारणाला जेवढा काल लागतो तेवढा काल ज्या अचांच्या उच्चारणाला लागतो तशा अचांना ऱ्हस्व, दीर्घ, व प्लुत अशी अनुक्रमें संज्ञा होते.) 'वां काल इव कालो यस्य' हा व्यधिकरणबहुव्रीहि असल्यामुळें, (तसा विग्रह करणें इष्ट नाहीं आणि म्हणून मनोरमेंत) 'विग्रहस्तु वः कालो यस्य' असें म्हटलें आहे. (अष्टाध्यायींत समानाधिकरणबहुव्रीहि सांगितला आहे, व्यधिकरण-बहुव्रीहि सांगितला नाहीं; तसा बहुव्रीहि जरी 'सप्तमीविशेषणे बहुव्रीहौ' सू. ८९८ या ज्ञापकाच्या आधारें करतां येतो तरी, जेथें गत्यन्तर नाहीं तशाच ठिकाणीं तसा बहुव्रीहि करणें उचित आहे हें या पंक्तीवरून ध्वनित होतें.) 'वः कालो यस्य' या विग्रहवाक्यांत 'काल' हा शब्द जातिवाचक मानून त्याचें एकवचन केलें आहे. (वास्तविक येथें 'काल' हा शब्द तीन प्रकारच्या, म्हणजे एकमात्र, द्विमात्र, व त्रिमात्र अच् यांना उच्चारण्यास लागणाऱ्या तीन भिन्न प्रकारच्या कालांचा वाचक आहे आणि म्हणून 'बहुषु बहुवचनम्' सू. १८७ या सूत्रान्वयें, 'कालाः' असें विग्रहवाक्यांत बहुवचन करावयास पाहिजे होतें. परंतु तीन्ही कालांच्या ठिकाणीं 'कालत्व' ही एकच जाति असल्यामुळें व अशा रीतीनें 'काल' हा जातिवाचक शब्द असल्यामुळें, 'जात्याख्यायाम्' सू. ८१७ या सूत्रान्वयें विकल्पें-करून 'कालः' असा विग्रहवाक्यांत एकवचनाचा प्रयोग केला आहे.) मनोरमेंतील 'स्वोच्चारणकालः' या शब्दाचा 'स्वोच्चारणकालसदृशः कालः' असा अर्थ आहे. सादृश्यामुळें दोन भिन्न कालांचे ठिकाणीं अभेदाचा आरोप करितां येतो असें मानल्यानें मनोरमेंत जें म्हटलें आहे तेंच साधु–योग्य–ठरतें. ('गौर्वाहीकः' या स्थलीं जरी वाहीक व बैल हे भिन्न आहेत तरी, गुणसादृश्यामुळें जसा 'गोसदृशः वाहीकः'

असा प्रयोग न करितां, अभेदारोपानें 'गौर्वाहीकः' असा देखील प्रयोग करतां येतो त्याचप्रमाणें जरी उकार उच्चारण्याचा काल व इतर अच् उच्चारण्याचा काल हे दोन भिन्न काल आहेत तरी, त्यांचे ठिकाणीं कालसादृश्यामुळें अभेद मानल्यास, 'स्वोच्चारणकालसदृशः कालः' अशी लक्षणा करण्याची गरज राहत नाहीं व 'स्वोच्चारण-कालः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें देखील अभेदारोप मानल्यानें साधु ठरतें.) 'यच्छब्दस्तु फिट्सूत्रेण' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा अर्थ हा आहे कीं, 'यद्' हा शब्द ('फिषोऽन्त उदात्तः' फिट् सू. १ या सूत्रान्वयें) अन्तोदात्त आहे. ('यद्+जस्' या स्थलीं 'त्यदादीनामः' सू. २६५ या सूत्रानें 'यद्' यांतील दकाराचे जागीं अकार होऊन, 'यद्=य+अ' अशी स्थिति झाली असतां, 'अतो गुणे' सू. १९१ या सूत्रानें गुणरूप एकादेश झाल्यावर 'य' असें ज प्रातिपदिकाचें रूप होतें तें 'फिषोऽन्त उदात्तः' या फिट्सूत्रानें अन्तोदात्त होतें, म्हणजे 'य' यांतील अन्त्य अकार उदात्त होतो व 'जसः शी' सू. २१४ या सूत्रानें जस्प्रत्ययाचे जागीं 'शी=ई' असा आदेश होतो आणि 'अनुदात्तौ सुप्पितौ' सू. ३७०९ या सूत्रान्वयें) 'जस्' हा सुप्प्रत्यय अनुदात्त असल्यामुळें (त्याचे जागीं होणारा 'शी=ई' हा आदेश स्थानिवद्भावानें अनुदात्त होतो आणि 'य+ई=ये' या स्थलीं 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें झालेला गुणरूप एकारादेश) 'एकादेश उदात्तेनोदात्तः' सू. ३६५८ या सूत्रानें उदात्त होतो असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. ('यद्+जस्=य+ई' या स्थलीं 'य' यांतील अकार उदात्त असून 'ई' हा अनुदात्त आहे व या दोहोंचें जागीं होणारा 'ए' हा एकादेश उदात्त व अनुदात्त या दोन स्वरांचे जागीं होत असल्यामुळें, वर सांगितलेल्या सूत्रान्वयें तो उदात्त होतो.) 'अर्वाङ इति । अकारोऽनुदात्तः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, (वेदभाष्यांत सांगितल्याप्रमाणें) 'अर्वाङ' हें 'अभिमुख' या अर्थाचें वाचक अव्युत्पन्न, म्हणजे धातूहून

असा विग्रह होतो व 'वां काल इव कालो यस्य' हा त्या विग्रहवाक्यांतून तात्पर्यार्थ निघतो. (सारांश 'ऊकालोऽच्' या सूत्रांतील 'ऊकाल:' या पदाचा वरप्रमाणें बहुव्रीहि समास केल्यानें, असा अर्थ होतो कीं, 'उ, ऊ, ऊ$_3$' यांच्या उच्चारणाला जेवढा काल लागतो तेवढा काल ज्या अचांच्या उच्चारणाला लागतो तशा अचांना ऱ्हस्व, दीर्घ, व प्लुत अशी अनुक्रमें संज्ञा होते.) 'वां काल इव कालो यस्य' हा व्यधिकरणबहुव्रीहि असल्यामुळें, (तसा विग्रह करणें इष्ट नाहीं आणि म्हणून मनोरमेंत) 'विग्रहस्तु व: कालो यस्य' असें म्हटलें आहे. (अष्टाध्यायींत समानाधिकरणबहुव्रीहि सांगितला आहे, व्यधिकरणबहुव्रीहि सांगितला नाहीं; तसा बहुव्रीहि जरी 'सप्तमीविशेषणे बहुव्रीहौ' सू. ८९८ या ज्ञापकाच्या आधारें करतां येतो तरी, जेथें गत्यन्तर नाहीं तशाच ठिकाणीं तसा बहुव्रीहि करणें उचित आहे हें या पंक्तीवरून ध्वनित होतें.) 'व: कालो यस्य' या विग्रहवाक्यांत 'काल' हा शब्द जातिवाचक मानून त्याचें एकवचन केलें आहे. (वास्तविक येथें 'काल' हा शब्द तीन प्रकारच्या, म्हणजे एकमात्र, द्विमात्र, व त्रिमात्र अच् यांना उच्चारण्यास लागणाऱ्या तीन भिन्न प्रकारच्या कालांचा वाचक आहे आणि म्हणून 'बहुषु बहुवचनम्' सू. १८७ या सूत्रान्वयें, 'काला:' असें विग्रहवाक्यांत बहुवचन करावयास पाहिजे होतें. परंतु तीन्ही कालांच्या ठिकाणीं 'कालत्व' ही एकच जाति असल्यामुळें व अशा रीतीनें 'काल' हा जातिवाचक शब्द असल्यामुळें, 'जात्याख्यायाम्' सू. ८१७ या सूत्रान्वयें विकल्पें करून 'काल:' असा विग्रहवाक्यांत एकवचनाचा प्रयोग केला आहे.) मनोरमेंतील 'स्वोच्चारणकाल:' या शब्दाचा 'स्वोच्चारणकालसदृश: काल:' असा अर्थ आहे. सादृश्यामुळें दोन भिन्न कालांचे ठिकाणीं अभेदाचा आरोप करितां येतो असें मानल्यानें मनोरमेंत जें म्हटलें आहे तेंच साधु–योग्य–ठरतें. ('गौर्वाहीक:' या स्थलीं जरी वाहीक व बैल हे भिन्न आहेत तरी, गुणसादृश्यामुळें जसा 'गोसदृश: वाहीक:'

असा प्रयोग न करितां, अभेदारोपानें 'गौर्वाहीकः' असा देखील प्रयोग करतां येतो त्याचप्रमाणें जरी उकार उच्चारण्याचा काल व इतर अच् उच्चारण्याचा काल हे दोन भिन्न काल आहेत तरी, त्यांचे ठिकाणीं कालसादृश्यामुळें अभेद मानल्यास, 'स्वोच्चारणकालसदृशः कालः' अशी लक्षणा करण्याची गरज राहत नाहीं व 'स्वोच्चारण-कालः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें देखील अभेदारोप मानल्यानें साधु ठरतें.) 'यच्छब्दस्तु फिट्सूत्रेण' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा अर्थ हा आहे कीं, 'यद्' हा शब्द ('फिषोऽन्त उदात्तः' फिट् सू. १ या सूत्रान्वयें) अन्तोदात्त आहे. ('यद्+जस्' या स्थलीं 'त्यदादीनामः' सू. २६५ या सूत्रानें 'यद्' यांतील दकाराचे जागीं अकार होऊन, 'यद्=य+अ' अशी स्थिति झाली असतां, 'अतो गुणे' सू. १९१ या सूत्रानें गुणरूप एकादेश झाल्यावर 'य' असें ज प्रातिपदिकाचें रूप होतें तें 'फिषोऽन्त उदात्तः' या फिट्सूत्रानें अन्तोदात्त होतें, म्हणजे 'य' यांतील अन्त्य अकार उदात्त होतो व 'जसः शी' सू. २१४ या सूत्रानें जस्प्रत्ययाचे जागीं 'शी=ई' असा आदेश होतो आणि 'अनुदात्तौ सुप्पितौ' सू. ३७०९ या सूत्रान्वयें) 'जस्' हा सुप्प्रत्यय अनुदात्त असल्यामुळें (त्याचे जागीं होणारा 'शी=ई' हा आदेश स्थानिवद्भावानें अनुदात्त होतो आणि 'य+ई=ये' या स्थलीं 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें झालेला गुणरूप एकारादेश) 'एकादेश उदात्तेनोदात्तः' सू. ३६५८ या सूत्रानें उदात्त होतो असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. ('यद्+जस्=य+ई' या स्थलीं 'य' यांतील अकार उदात्त असून 'ई' हा अनुदात्त आहे व या दोहोंचें जागीं होणारा 'ए' हा एकादेश उदात्त व अनुदात्त या दोन स्वरांचे जागीं होत असल्यामुळें, वर सांगितलेल्या सूत्रान्वयें तो उदात्त होतो.) 'अर्वाङ इति । अकारोऽनुदात्तः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, (वेदभाष्यांत सांगितल्याप्रमाणें) 'अर्वाङ' हें 'अभिमुख' या अर्थाचें वाचक अव्युत्पन्न, म्हणजे धातूहून

प्रत्यय होऊन सिद्ध झालेलें नसून स्वतः सिद्ध, प्रातिपदिक असल्यामुळें, फिट्स्वरानें तें अन्तोदात्त होऊन, शेषनिघातानें त्यांतील अकार अनुदात्त होतो. ('अर्वाङ' हें 'अर्वन्तमञ्चति' अशा रीतीनें होणारें व्युत्पन्न प्रातिपदिक न मानतां, पाणिनीला अव्युत्पत्तिपक्ष अभिमत असल्याकारणानें, तें अव्युत्पन्न प्रातिपदिक मानलें असल्यामुळें, 'फिषोऽन्त उदात्तः' या फिट्सूत्रानें तें अन्तोदान्त होतें, म्हणजे त्यांतील अन्त्य अच् 'आ' हा उदात्त होतो व 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' सू. ३६५० या सूत्रान्वयें 'अर्वाङ' यांतील अवशिष्ट 'अ' हा अच् अनुदात्त होतो.)

मनोरमा– "तस्यादितः" अतन्त्रमिति। "उपेयिवान्" इत्यत्रोपसर्ग इवाविवक्षितमित्यर्थः। ननु तत्र "ईयिवांसमतिस्त्रिधः" इत्यादिप्रयोगदर्शनादविवक्षाऽस्तु, इह त्वविवक्षायां प्रमाणं किम्?, इति चेल्लक्ष्यदर्शनं प्रातिशाख्यादिकं चेति गृहाण। तथा हि–'येऽराः' इत्यत्रैकारः, 'तनूनपात्' 'शचीपतिम्' इत्यत्र पदपाठे ऊदीतौ चार्धोदात्तौ इति सकलबह्वृचप्रसिद्धम्। तनूनपाच्छचीपतिशब्दयोः "उभे वनस्पत्यादिषु युगपत्" इति पूर्वोत्तरपदयोराद्युदात्तत्वे कृते "अनुदात्तं पदमेकवर्जम्" इति शेषनिघातः। पूर्वपदभूतयोस्तनूशची एतयोरन्त्यस्य पाक्षिकं स्वरितत्वं प्रातिशाख्ये उक्तम्।

"जात्यवद्वा तथा वाऽन्तौ तनूशचीति पूर्वयोः" इति।

तथा स्वरितार्द्धस्योदात्तत्वे प्रातिशाख्यमपि––

"एकाक्षरसमावेशे पूर्वयोः स्वरितः स्वरः।
तस्योदात्ततरोदात्तादर्धमात्राऽर्द्धमेव वा॥
अनुदात्तः परः शेषः स उदात्तश्रुतिर्न चेत्।
उदात्तं वोच्यते किंचित्स्वरितं वाऽक्षरं परम्॥" इति।

अस्यार्थः–पूर्वयोः = उदात्तत्वानुदात्तत्वयोः। एकत्र समावेशे सति स्वरितो बोध्यः। तस्य = स्वरितस्य, स्वतन्त्रोदात्तापेक्षयोदात्ततराऽर्द्धमात्रा बोध्येति। "क्व वोऽश्वाः" इत्यादिन्हस्वाभिप्रायम्। "अर्धं वा"

इति दीर्घाभिप्रायम् । अनेनैव ऱ्हस्वस्यापि संग्रहाद्व्यापकत्वादिदमेवा-
दर्तव्यमिति सूचयितुमेवकारः । "अनुदात्त" इत्यादिपरिशेषसिद्धार्थ-
कथनम् । सः=शेषः । उदात्तश्रुतिः स्यात् । किमविशेषेण ? नेत्याह–न
चेदित्यादि । उदात्तस्वरितपरं विहायेत्यर्थः । शाकल्योऽप्याह—

"अप्राकृतस्तु यः स्वारः स्वरितोदात्तपूर्वगः ।
उदादायार्द्धमस्याथ शिष्टं निघ्नन्ति कम्पितम्" ॥ इति ।

उदादाय=उदात्तं कृत्वा । 'अर्द्धऱ्हस्वशब्देनार्द्धमात्रा लक्ष्यते' इति
हरदत्तादिग्रन्थास्तु मतान्तरपरतया कथंचिन्नेयाः । क्वेति । "किमोऽत्"
"तित् स्वरितम्" । व इति । अनुदात्तं सर्वमपादादौ" इत्यधिकारा-
दनुदात्तम् । अश्वा इति । अशेः क्वनि नित्स्वरेणाद्युदात्तम् । संहितायां
तु "एकादेश उदात्तेनोदात्तः" इत्योकार उदात्तः । ये अरा इति ।
द्वयमपि फिट्सूत्रेणान्तोदात्तम् । एकादेशस्तु पक्षे स्वरितः, "स्वरितो
वाऽनुदात्ते पदादौ" इत्युक्तेः ।

(ज्या स्वराचे ठिकाणीं उदात्त व अनुदात्त यांचें मिश्रण होतें तशा स्वराला 'समाहारः स्वरितः' सू. ७ या सूत्रान्वयें स्वरित अशी संज्ञा होते. अशा मिश्रणानें तयार झालेल्या स्वरित स्वराचा कोणता व किती भाग उदात्त समजावा व कोणता व किती भाग अनुदात्त समजावा याकरितां 'तस्यादित उदात्तमर्धऱ्हस्वम्' सू. ८ हें सूत्र पठित केलें आहे. या सूत्रांतील 'अर्धऱ्हस्वम्' या पदाचा 'अर्धऱ्हस्वस्य' असा विग्रह होत असून, 'अर्धं नपुंसकम्' सू. ७१३ या सूत्रानें 'अर्धम्' या शब्दाचा षष्ठीसमासांत पूर्व निपात होतो व सूत्रार्थ असा होतो कीं, ऱ्हस्व अच् स्वरित असल्यास त्याचा प्रथमार्ध उदात्त होतो. पण प्रकृत सूत्राचा असा अर्थ केला तर, दीर्घ अच् स्वरित असल्यास त्याचा प्रथमार्ध उदात्त न होण्याची आपत्ति येते. ती टळावी म्हणून दीक्षितांनीं प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'ऱ्हस्वग्रहणमतन्त्रम्' म्हणजे प्रकृत सूत्रांत 'ऱ्हस्व' हा जो शब्द घातला आहे तो अविवक्षित आहे असें म्हटलें आहे व त्याचें कारण ते पुढील पंक्तींत देतात.) ज्याप्रमाणें

'उपेयिवान्' या स्थलीं 'उप' हा उपसर्ग अविवक्षित आहे त्याचप्रमाणें 'अर्धन्हस्वम्' या पदांतील 'न्हस्वम्' हा शब्द अतन्त्र–अविवक्षित–आहे. ('उपेयिवाननाश्वाननूचानश्च' सू. ३०९८ या सूत्रांत जरी 'उपेयिवान्' असा शब्द पठित आहे तरी, 'उप' हा उपसर्ग पूर्वी नसून देखील जशीं क्वसुप्रत्ययान्त 'ईयिवान्, समीयिवान्' इत्यादि रूपें होतात व अशा रीतीनें 'उपेयिवान्' यांतील 'उप' हा उपसर्ग अविवक्षित ठरतो त्याचप्रमाणें 'अर्धन्हस्वम्' यांत 'न्हस्व' हा शब्द अविवक्षित आहे, म्हणजे या सूत्रांत तो शब्द नाहीं असें समजून 'तस्यादित उदात्तमर्धम्' असेंच सूत्र मानावें; व असें सूत्र मानल्यानें कोणत्याहि स्वरिताचा, मग तो न्हस्व असो किंवा दीर्घ असो, प्रथमार्ध उदात्त होऊं शकतो व अशा रीतीनें वर दर्शविलेली आपत्ति टाळतां येते असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'ईयिवांसमतिस्त्रिधः' इत्यादि प्रयोग आढळत असल्यामुळें जरी 'उपेयिवान्' यांतील 'उप' हा उपसर्ग अविवक्षित आहे असें मानतां येऊं शकतें तरी, 'अर्धन्हस्वम्' यांतील 'न्हस्व' हा शब्द अविवक्षित आहे असें मानण्यास कोणतें प्रमाण आहे असा कोणी प्रश्न केल्यास, त्याला उत्तर हें आहे कीं, 'न्हस्व' हा शब्द अविवक्षित मानण्यास वैदिक उदाहरणें व तसेंच प्रातिशाख्यादि ग्रन्थ प्रमाण आहेत. उदाहरणार्थ 'येऽराः' या वैदिक उदाहरणांत 'ये' या स्वरित स्वरांतील एकार दीर्घ असून देखील त्याचा प्रथमार्ध उदात्त उच्चारला जातो आणि तसेंच 'तनूनपात्' व 'शचीपतिम्' यांचा पदपाठ करतेवेळीं 'तनू' यांतील अन्त्य ऊकार व 'शची' यांतील अन्त्य ईकार या दोन्ही दीर्घ स्वरितांचा प्रथमार्ध उदात्त उच्चारला जातो हें सर्व बह्वृच्–ऋग्वेदी-ब्राम्हणांना पूर्णपणें विदित आहे. 'तनूनपात्' व 'शचीपति' हे दोन्ही सामासिक शब्द वनस्पत्यादिगणांत पठित असल्यामुळें, 'उभे वनस्पत्यादिषु युगपत्' सू. ३८७४ या सूत्रानें त्या शब्दांतील पूर्व पद व उत्तर पद हीं दोन्ही आद्युदात्त होतात व त्या दोन्ही पदांतील अवशिष्ट

स्वर जरी 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' सू. ३६५० या सूत्रानें अनुदात्त होतात तरी 'तनू' व 'शची' या दोन्ही पूर्व पदांतील अन्त्य स्वर विकल्पेंकरून स्वरित होतो असें शौनकीय प्रातिशाख्यांत सांगितलें आहे. त्या ग्रन्थांत 'जात्यवद्वा तथा वाऽन्तौ तनूशचीति पूर्वयोः,' म्हणजे 'तनू' व 'शची' या पूर्वपदांतील अन्त्य स्वर विकल्पेंकरून ('उदात्तस्वरितपरत्वाभाववान्' अशा) जात्य स्वरितासारखा होतो, असें म्हटलें आहे. (शौनकीय प्रातिशाख्यांतील तृतीय पटलांत पठित असलेल्या सोळाव्या कारिकेचा 'जात्यवद्वा...पूर्वयोः' हा उत्तरार्ध असून, या कारिकेचा पूर्वार्ध शब्दरत्नांत दिला आहे व शब्दरत्नाचें विवरण करितांना त्या पूर्वार्धाचा अर्थ सांगण्यांत येईल. ऱ्हस्व स्वराची एक मात्रा असून, दीर्घ स्वर द्विमात्रिक असतो. दीर्घ अच् स्वरित असल्यास, त्याचा प्रथमार्ध उदात्त होतो असें जें वर म्हटलें आहे त्याचा अर्थ हा कीं, त्या दीर्घ स्वराची पहिली एक मात्रा उदात्त-रूपानें पठित होत असून अवशिष्ट दुसरी मात्रा अनुदात्तरूपानें पठित होते. दीक्षितांनीं वर जीं वैदिक उदाहरणें दिलीं आहेत तीं ऋग्वेदां-तून दिलीं आहेत व ते असें म्हणतात कीं, दीर्घ स्वरिताच्या दोन मात्रांपैकीं पहिली मात्रा उदात्तरूपानें पठिन केली जाते हें ऋग्वेदसंहितेचें व त्या संहितेच्या पदपाठाचें अध्ययन करणाऱ्या ऋक्शाखीय ब्राम्हणांना पूर्णपणें विदित आहे आणि यावरून हें स्पष्ट होतें कीं, प्रकृत सूत्रांतील 'ऱ्हस्व' या शब्दाचें ग्रहण अविवक्षित आहे. तसें न मानल्यास, ऋक्शाखीय ब्राम्हण पुरातन कालापासून दीर्घस्वरिताचा उच्चार करतेवेळीं त्याची प्रथम मात्रा जी उदात्तरूपानें उच्चारतात तें त्यांचें करणें अशुद्ध ठरण्याची आपत्ति येते. म्हणून हें मानणें आवश्यक आहे कीं, त्स्वरित स्वर ऱ्हस्व असो किंवा दीर्घ असो, त्याचा प्रथमार्ध उदात्तरूपानें पठित होत असतो. स्वरित स्वर ऱ्हस्व असल्यास, त्याची पहिली अर्धी मात्रा व दीर्घ असल्यास, त्याची पहिली एक मात्रा उदात्त होते

असाच प्रकृत सूत्राचा अर्थ समजावा असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां 'येऽराः' असें जें मनोरमेंत वैदिक उदाहरण दिलें आहे त्यांतील 'ये' या पदांतील अन्त्य एकार उदात्त आहे व तो उदात्त कसा होतो याची प्रक्रिया पूर्वी दिलीच आहे. 'अराः' यांतील 'अ' हा अनुदात्त आहे; कारण 'अर' हा शब्द 'फिषोऽन्त उदात्तः' या फिट् सूत्रान्वयें अन्तोदात्त असल्यामुळें, 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' सू. ३६५० या सूत्रानें त्यांतील अवशिष्ट आद्य अकार अनुदात्त होतो आणि 'एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें उदात्त एकार व अनुदात्त अकार या दोहोंचे जागीं झालेला पूर्वरूप एकादेश 'ए' हा 'स्वरितो वानुदात्ते पदादौ' सू. ३६५९ या सूत्रानें स्वरित होतो. या सूत्रावरील कौमुदींत असें म्हटलें आहे कीं, या सूत्रानें जी विभाषा सांगितली आहे ती व्यवस्थितविभाषा आहे व 'एङः पदान्तादति' या सूत्रानें होणारा पूर्वरूप एकादेश विकल्पेंकरून स्वरित न होतां नेहमीच स्वरित होत असतो. दीक्षित म्हणतात–'किं च एङः पदान्तात् इति पूर्वरूपे स्वरित एव.' 'येऽराः' यांतील 'ए' हा दीर्घ स्वरित उच्चारतेवेळीं ऋक्शाखीय वैदिक ब्राम्हण त्या 'ए' ची पहिली मात्रा उदात्तरूपानें व द्वितीय मात्रा अनुदात्तरूपानें उच्चारीत असतात. हा एकार दीर्घस्वरित असून देखील ज्याअर्थी त्याचा प्रथमार्ध उदात्तरूपानें उच्चारला जातो त्याअर्थी हें स्पष्ट होतें कीं, केवळ ऱ्हस्व स्वरिताचा प्रथमार्ध उदात्त उच्चारला जात नसून, दीर्घस्वरिताचा देखील प्रथमार्ध उदात्त उच्चारला जात असतो. वनस्पत्यादिगणांत पठित असलेल्या 'तनूनपात्' यांतील 'तनू' हें पूर्व पद निपातनानें आद्युदात्त आहे. म्हणून 'तनू' यांतील अन्त्य ऊकार 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' या सूत्रान्वयें अनुदात्त होतो व तो अनुदात्त 'ऊ' 'त' यांतील 'अ' या उदात्त स्वरापुढें असल्यामुळें, 'उदात्तादनुदात्तस्य स्वरितः' सू. ३६६० या सूत्रान्वयें स्वरित होतो. येथें हें लक्षांत ठेवावें कीं, जरी 'अ' व 'ऊ' या दोन स्वरांमध्यें

नकाराचें व्यवधान आहे तरी, 'स्वरविधौ व्यञ्जनमविद्यमानवत्' –परि. ८०–व 'हल्स्वरप्राप्तौ व्यञ्जनमविद्यमानवत्'–परि. ८१– या परिभाषा असल्यामुळें, नकार या व्यञ्जनाचें व्यवधान नाहीं असें मानून स्वरकार्य केलें जातें. 'शचीपतिम्' या पदांतील 'शची' हें पूर्व पद 'शाङ्गर्रवाद्यञोङीन्' सू. ५२७ या सूत्रान्वयें 'ङीन्' हा नित्प्रत्यय होऊन सिद्ध झालें असल्यामुळें, 'ञ्नित्यादिर्नित्यम्' सू. ३६८६ या सूत्रानें आद्युदात्त होतें व त्यामुळें 'शची' यांतील अन्त्य ईकार 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' या सूत्रान्वयें अनुदात्त होतो आणि तो अनुदात्त ईकार 'श' यांतील 'अ' या उदात्त स्वरापुढें, असल्यामुळें, 'उदात्तादनुदात्तस्य स्वरितः' या सूत्रान्वयें तो ईकार स्वरित होतो. 'तनू' यांतील अन्त्य ऊकार व 'शची' यांतील अन्त्य ईकार हे दीर्घस्वरित असून देखील, पदपाठांत त्यांची पहिली मात्रा उदात्त उच्चारली जात असल्यामुळें, 'ह्रस्वग्रहणमतन्त्रम्' असें जें दीक्षितांनीं म्हटलें आहे तें योग्य ठरतें. येथपर्यंत दीक्षितांनीं आपल्या मताचें समर्थन करण्याकरितां वैदिक उदाहरणांचें प्रमाण सांगितलें असून, आतां पुढील पंक्तींत ते प्रातिशाख्याचें प्रमाण देतात.)

त्याचप्रमाणें स्वरिताचा प्रथमार्ध उदात्त असतो याविषयीं, 'एकाक्षरसमावेशे पूर्वयोः स्वरितः स्वरः । तस्योदात्ततरोदात्तादर्धमात्राऽर्द्धमेव वा ॥ अनुदात्तः परः शेषः स उदात्तश्रुतिर्न चेत् । उदात्तं वोच्यते किञ्चित्स्वरितं वाऽक्षरं परम् ॥' या शौनकीय प्रातिशाख्यांतील कारिका प्रमाण आहेत. प्रथम कारिकेंतील 'पूर्वयोः' या पदाचा 'उदात्तत्वानुदात्तत्वयोः' असा अर्थ आहे व हे दोन उदात्तत्व व अनुदात्तत्व धर्म एखाद्या अचाच्या ठिकाणीं एकत्र झाल्यास, तो अच् स्वरित समजावा. प्रथम कारिकेंतील 'तस्य' या पदाचा 'स्वरितस्य' असा अर्थ आहे व जो मूळचा उदात्त स्वर असतो त्याच्यापेक्षां या स्वरिताची प्रथम अर्धमात्रा उदात्ततर असते हें जाणावें 'क्ववो ऽश्वाः' इत्यादि उदाहरणें ह्रस्वस्वरिताचीं आहेत. वरील प्रथम कारिकेंत

'अर्धं वा' असें जें म्हटलें आहे तें दीर्घस्वरिताला उद्देशून म्हटलें आहे. 'अर्धं वा' हें व्यापक असून त्यानेंच ऱ्हस्वस्वरिताचा देखील संग्रह–समावेश–होत असल्यामुळें, म्हणजे तो पाठ स्वीकारल्यानें, ऱ्हस्वस्वरिताला व दीर्घस्वरिताला सारख्याच रीतीनें लागू पडणाऱ्या त्या व्यापक पाठानें ऱ्हस्वस्वरिताच्या व तसेंच दीर्घस्वरिताच्या प्रथमार्धाला उदात्त करतां येत असल्यामुळें, ('अर्धमात्रा' असें म्हणण्यापेक्षां) 'अर्धं वा' असेंच म्हणणें व हाच पाठ स्वीकारणें आदरणीय आहे हें सुचविण्याकरितां, 'अर्धमेव वा' या स्थलीं 'एव' हें पद घातलें आहे. (या प्रथम कारिकेंतील 'वा' हें अन्त्य पद विभाषेचें वाचक नसून केवळ पादपूरणार्थ घातलें आहे हें शब्दरत्नांत सांगण्यांत येईल. सारांश या प्रथम कारिकेंतून 'अर्धमात्रा' हा शब्द व तसेंच 'वा' हें पादपूरणार्थक पद गाळल्यास, 'पूर्वयोःउदात्तत्वानुदात्तत्वयोः एकाक्षर-समावेशे सति, स्वरितः स्वरो निष्पद्यते; तस्य स्वरितस्य अर्धमुदात्ततरम्' अशा रीतीची ऱ्हस्वस्वरिताला व दीर्घस्वरिताला सारखीच लागू पडणारी ती कारिका व्यापक होत असून, तिचा अर्थ असा होतो कीं, ज्या अचामध्यें उदात्तत्व व अनुदात्तत्व या दोन्ही धर्मांचें संमिश्रण होतें त्या अचाला स्वरित असें म्हणतात व त्या स्वरित अचाचा, मग तो ऱ्हस्व असो किंवा दीर्घ असो, प्रथमार्ध उदात्त होत असून, तो मूळच्या उदात्तापेक्षां अधिक उदात्त रूपानें उच्चारला जातो असा त्या कारिकेचा अर्थ होत असल्यामुळें, 'ऱ्हस्वग्रहणमतन्त्रम्' असें जें दीक्षितांनीं प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे त्याला ही कारिका प्रमाण आहे. पशुपतिनाथ मिश्रांनीं उवटकृत भाष्यानुसार या कारिकेचें 'एकाक्षरसमावेशे सति पूर्वयोरुदात्तानुदात्तयोरिति यावत् स्वरितः स्वरः निष्पद्यते ।...... तस्य स्वरितस्य आदौ अर्धमात्रा एकमात्रिकऱ्हस्वस्वरस्थले इति शेषः, अर्धमेव वा द्विमात्रस्वरस्य अर्धम् एका वा मात्रा इत्यर्थः, उदात्तादुदात्ततरा उदात्तादपि उदात्ततरा इत्यर्थः' असें व्याख्यान केलें आहे, व हें भाष्यानुसार व्याख्यान दीक्षितांच्या

मताशीं तंतोतंत जुळतें. आतां दीक्षित द्वितीय कारिकेचा अर्थ सांगतात.) या द्वितीय कारिकेंत 'अनुदात्तः परः शेषः' असें जें म्हटलें आहे तें (स्वरित स्वराचा प्रथमार्ध उदात्त होत असल्यामुळें, त्याचा) अवशिष्ट द्वितीयार्ध अनुदात्त होतो या फलितार्थाचें कथन करणारें आहे. (वास्तविक 'अनुदात्तः परः शेषः' असें म्हटलें नसतें तरी चाललें असतें; कारण स्वरित स्वर हा उदात्त व अनुदात्त या दोन स्वरांच्या संमिश्रणानें होणारा स्वर असल्यामुळें, त्याचा प्रथमार्ध उदात्त असतो असें सांगितल्यानेंच हें आपोआप सिद्ध होतें कीं, त्याचा अवशिष्ट द्वितीयार्ध अनुदात्त असतो.) या द्वितीय कारिकेंतील 'सः' या पदाचा 'शेषः' असा अर्थ आहे व या अवशिष्ट (अनुदात्त) द्वितीयार्धाचें उदात्तरूपानें श्रवण होतें. पण तसें त्याचें उदात्तरूपानें नेहमी श्रवण होतें कीं काय अशी पृच्छा केल्यास, कारिकाकार म्हणतात कीं, तसें श्रवण नेहमी होत नसून, उदात्त किंवा स्वरित स्वर पुढें नसल्यासच, त्या अवशिष्ट अनुदात्त द्वितीयार्धाचें उदात्तरूपानें श्रवण होतें. शाकल्यानें देखील 'अप्राकृतस्तु यः स्वारः स्वरितोदात्तपूर्वगः। उदादायार्द्धमस्याथ शिष्टं निघ्नन्ति कम्पितम्॥' असें म्हटलें आहे. या कारिकेंतील 'उदादाय' या पदाचा 'उदात्तं कृत्वा' असा अर्थ आहे (व 'अप्राकृतः स्वारः' या पदांचा 'स्वरितः स्वरः' असा अर्थ आहे हें शब्दरत्नांत सांगितलें आहे आणि म्हणून या कारिकेचा अर्थ असा होतो कीं, स्वरित स्वर उदात्त किंवा स्वरित स्वरापूर्वी असल्यास, मग तो ऱ्हस्व असो किंवा दीर्घ असो, त्याच्या प्रथमार्धाला उदात्त करून व अवशिष्ट द्वितीयार्धाला अनुदात्त करून त्या द्वितीय अनुदात्त अंशाला कम्पितरूपानें उच्चारतात. यावरून देखील 'ऱ्हस्वग्रहणमतन्त्रम्' हें दीक्षितांचें म्हणणें सिद्ध होतें व याखेरीज हें देखील सिद्ध होतें कीं, स्वरित स्वरापुढें उदात्त किंवा स्वरित स्वर नसल्यासच त्याचा द्वितीयार्ध उदात्तश्रुतिक होतो, पण त्या स्वरित स्वरापुढें उदात्त किंवा स्वरित स्वर नसेल तर तो

अनुदात्तरूपानें कम्पितस्वरयुक्त उच्चारला जातो.) प्रकृत सूत्रांतील 'अर्धऱ्हस्वम्' या पदाचा 'अर्धमात्रा' असा लक्षणेनें अर्थ होतो, म्हणजे असा त्या पदाचा रूढ अर्थ आहे, असें जें हरदत्तादिकांच्या ग्रन्थांत म्हटलें आहे तें इतर शाखांतील प्रातिशाख्याला अनुसरून म्हटलें आहे असें समजावें व अशा रीतीनें त्या ग्रन्थांत कशी तरी लक्षणा करून केलेल्या त्या अर्थाची, उपपत्ति लावावी. (हरदत्तादिकांचें असें मत आहे कीं, स्वरित स्वर ऱ्हस्व असो किंवा दीर्घ असो, त्याची प्रथम अर्धमात्राच उदात्त पठित होत असते. त्यांच्या मताप्रमाणें द्विमात्रिक दीर्घ स्वरिताची पहिली अर्धी मात्राच उदात्त पठित होत असून अवशिष्ट दीड मात्रा अनुदात्त होत असते. पण दीक्षितांचें असें म्हणणें आहे कीं, जसा ऱ्हस्व स्वरिताचा प्रथमार्ध उदात्त असतो तसाच दीर्घ स्वरिताचा देखील प्रथमार्ध उदात्त असतो, म्हणजे त्याची पहिली एक मात्रा उदात्त असते व अवशिष्ट द्वितीय मात्रा अनुदात्त असते. तैत्तरीय प्रातिशाख्यांत 'आदिरस्योदात्तसमः, शेषोऽनुदात्तसम इत्याचार्याः' असें म्हटलें आहे व या प्रातिशाख्यांतील पंक्तीचें व्याख्यान करितांना भैरवीकारांनीं 'तत्र पूर्ववाक्याद्यावदर्धं ऱ्हस्वस्येति सम्बध्यते। एवञ्चास्य स्वरितस्यादिर्यावर्द्धऱ्स्वस्यार्द्धं ऱ्हस्वार्द्धकालस्य उदात्तसमो भवति, शेषस्त्वनुदात्तसम इत्याचार्याः' असें म्हटलें आहे. या व्याख्यानावरून हें स्पष्ट होतें कीं, स्वरित स्वर ऱ्हस्व असो किंवा दीर्घ असो त्याची पहिली अर्धमात्राच उदात्त होत असून अवशिष्ट मात्रा अनुदात्त होते. सारांश हरदत्तादिकांच्या म्हणण्याला वरील तैत्तरीय प्रातिशाख्य प्रमाण आहे. परंतु दीक्षित शौनकीय ऋक् प्रातिशाख्याचे अनुयायी असल्यामुळें व पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्या प्रातिशाख्यान्वयें स्वरित स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ असला तरी त्याचा प्रथमार्ध उदात्त व अवशिष्ट द्वितीयार्ध अनुदात्त होत असल्यामुळें, दीक्षित हरदत्तादिकांच्या मताचा स्वीकार करण्यास तयार नाहींत.) 'क्व वोऽश्वाः' या उदाहरणांत 'क्व' हा

शब्द 'किमोऽत्' सू. १९५९ या सूत्रान्वयें 'अत्' प्रत्ययान्त असल्यामुळें, 'तित्स्वरितम्' सू. ३७२९ या सूत्रानें त्यांतील अन्त्य 'अ' स्वरित होतो व त्या उदाहरणांतील 'वः' हा शब्द, म्हणजे 'बहुवचनस्य वस्नसौ' सू. ४०५ या सूत्रानें 'युष्माकम्' चे जागीं झालेला हा आदेश, 'अनुदात्तं सर्वमपादादौ' सू. ४०३ या अधिकार सूत्रान्वयें अनुदात्त असून, 'अश्व' हा शब्द ('अशूप्रषि' उणादि. सू. १४९ या सूत्रानें) 'अश्' धातूस 'क्वन्' प्रत्यय होऊन झाला असल्यामुळें व अशा रीतीनें तो शब्द नित्प्रत्ययान्त असल्यामुळें ('ञ्नित्यादिर्नित्यम्' सू. ३६८६ या सूत्रानें) आद्युदात्त आहे. 'वः अश्वाः' या दोन पदांचा सन्धि केला असतां, 'एकादेश उदात्तेनोदात्तः' सू. ३६५८ या सूत्रानें 'ओ' हा एकादेश उदात्त होतो. ('किमोऽत्' या सूत्रानें सप्तम्यन्त 'किम्' शब्दाहून 'अत्' प्रत्यय होणें सांगितलें आहे व तशा 'किम्' शब्दापुढें 'अत्' प्रत्यय आला असतां, 'किम्' चे जागीं 'क्वाति' सू. १९६० या सूत्रानें 'क्व' असा आदेश होणें सांगितलें आहे. म्हणून 'किम्+अत्=क्व+अत्' अशी स्थिति झाली असतां, 'अतोगुणे' सू. १९१ या सूत्रानें पर रूप एकादेश होऊन 'क्व' असें रूप सिद्ध होतें व हा शब्द तित्प्रत्ययान्त असल्यामुळें, 'तित्स्वरितम्' या सूत्रान्वयें त्यांतील अन्त्य अकार स्वरित होतो. 'वः' हा शब्द अनुदात्त असून, 'अश्व' हा शब्द आद्युदात्त आहे हें वर सांगितलेंच आहे. 'वस्+अश्वाः' या दोन पदांचा सन्धि केला असतां, 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें 'वस्' या पदांतील अन्त्य सकाराचे जागीं 'रु' असा आदेश होऊन व 'अतो रोः' सू. १६३ या सूत्रानें त्या 'रु' चे जागीं उकारादेश होऊन, 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें 'अ' व 'उ' या दोन अनुदात्त अचांचे जागीं होणारा 'ओ' हा गुणरूप एकादेश अनुदात्त होतो व 'वो अश्वाः' अशी स्थिति झाली असतां, 'एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें 'वो' यांतील अनुदात्त 'ओ' आणि 'अश्वाः' यांतील उदात्त 'अ' या

दोहोंचे जागीं होणारा 'ओ' हा पूर्वरूप एकादेश 'एकादेश उदात्तेनोदात्तः' या सूत्रानें उदात्त होतो. सारांश 'क्व' यांतील 'अ' हा ऱ्हस्वस्वरित असा आहे कीं, त्याच्यापुढें 'वो' यांतील 'ओ' हा उदात्त स्वर आला आहे. त्यामुळें त्याची प्रथम अर्धमात्रा उदात्तरूपानें उच्चारली जात असून, द्वितीय अर्धमात्रा 'शिष्टं निघ्नन्ति कम्पितम्' या वचनान्वयें कम्पित अनुदात्तरूपानें स्पष्ट ऐकूं येते. जर 'क्व' या स्वरितापुढें उदात्त स्वर नसता तर त्याची द्वितीय अर्धमात्रा उदात्ततररूपानें ऐकूं आली असती.) 'येऽराः' या उदाहरणांतील 'ये' व 'अराः' हीं दोन्हीं पदें ('फिषोऽन्त उदात्तः' फिट् सू. १ या) फिट्सूत्रान्वयें अन्तोदात्त आहेत व या दोन पदांचा सन्धि केला असतां जो एकादेश होतो तो 'स्वरितो वानुदात्ते पदादौ' सू. ३६५९ या सूत्रानें विकल्पेंकरून स्वरित होतो. ('ये' हें पद अन्तोदात्त कसें होतें याची प्रक्रिया मागें सांगितलीच आहे. 'अर' हें प्रातिपदिक 'फिषोऽन्त उदात्तः' या सूत्रान्वयें अन्तोदात्त असल्यामुळें, म्हणजे त्यांतील अन्त्य अकार उदात्त असल्यामुळें, 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' सू. ३६५० या सूत्रानें त्या प्रातिपदिकांतील अवशिष्ट आद्य अकार अनुदात्त होतो, आणि 'ये+अराः' या दोन पदांचा 'एङः पदान्तादति' या सूत्रानें सन्धि केला असतां, 'ये' यांतील उदात्त 'ए' व 'अराः' यांतील अनुदात्त 'अ' या दोहोंचे जागीं होणारा 'ए' हा पूर्वरूप एकादेश 'स्वरितो वानुदात्ते पदादौ' या सूत्रानें विकल्पेंकरून स्वरित होतो. सारांश 'ये' हा दीर्घ स्वरित असल्यामुळें, त्याची पहिली एक मात्रा उदात्त असून पुढची एक मात्रा अनुदात्त आहे व या अनुदात्त मात्रेपुढें 'राः' यांतील 'आ' हा उदात्त स्वर असल्यामुळें, त्या द्वितीय अनुदात्त मात्रेचें 'शिष्टं निघ्नन्ति कम्पितम्' या वचनान्वयें कम्पित अनुदात्तरूपानें स्पष्ट श्रवण होतें.)

शब्दरत्न– अविवक्षितमित्यर्थ इति । इदं च वक्ष्यमाणं प्रातिशाख्यं यच्छाखायाम्, तच्छाखास्थवैदिकोदाहरणविषयम् । तनूनपाच्छ-

चीपतिशब्दयोरिति । अस्य यद्यपीत्यादिः शेषनिघात इति । अस्य तथापीति शेषः । तेनोदीतौ अनुदात्तौ प्राप्नुत इति भावः । जात्यवद्वेति । पूर्वपदभूतयोस्तनूशचीशब्दयोरन्तौ जात्यवदिति ।

"अतोऽन्यत्स्वरितं स्वारं जात्यमाचक्षते पदे" ।

इति लक्षितो जात्यः । उदात्तस्वरितपूर्वस्वरितादन्य एकपदे स्थितः स्वरितो जात्य इति तदर्थः । तेन तुल्यं तद्वत्, अस्यान्त उदात्त-श्रुतिक इत्यर्थः । तथा वा असंहितवद्वा । संहितवद्वेत्यर्थः,

"पद्यादींस्तुद्व्युदात्तानामसंहितवदुत्तरान् ।"

इत्युत्तरमस्य पाठात् । असंहितवदित्यनेन केवलमनुदात्तत्वम् । संहितवदित्यनेनार्धानुदात्तस्वरितत्वमिति तद्भाष्ये स्पष्टम् । तथेति । लक्ष्यदर्शनवत्प्रातिशाख्यमपि प्रमाणमस्तीत्यर्थः ।

स्वतन्त्रोदात्तोपेक्षयेति । श्लोके "उदात्तात्" इति स्वतन्त्रो-दात्तादित्यर्थकमिति भावः । एवकार इति । तच्छाखायां दीर्घादिष्वपि समांशोदात्तकस्वरितस्यैव पाठादिति भावः । एतेनैतो पक्षौ वैकल्पिका-वित्यपास्तम् । 'वा' शब्दस्तु पादपूरणायेति बोध्यम् । अप्राकृत इति । स्वरित इत्यर्थः । स्वार इति । स्वर एव स्वारः, स्वार्थेऽण् । स्वरितो-दात्ताभ्यां पूर्ववर्णग इत्यर्थः । लक्षते इति । तदुक्तं भाष्ये—"अर्द्धन्हस्व-शब्दोऽर्द्धमात्रायां रूढः" इति । हरिरप्याह—

"प्रमाणमेव न्हस्वादावनु पात्तं प्रतीयते" इति ।

अनुपात्तमपि अर्द्धमात्रारूपं प्रमाणमेवोपलक्ष्यत इत्यर्थं तस्य हेलाराज आह । एवं च लोकेऽन्यशाखासु च दीर्घादिष्वप्यर्धमात्रैवो-दात्तेति भावः । मतान्तरेति । प्रातिशाख्योक्तमतापेक्षयेतरवेदलोक-साधारणमतान्तरेत्यर्थः । कथंचिदिति । लक्ष्यते इत्यंशपरमिदम्, भाष्यतो रूढिशक्तेरेव प्रतीतेरिति भावः । इत्युक्तेरिति । "नोदा-त्तस्वरितोदयम्" इति निषेधस्तु "उदात्तादनुदात्तस्य" इत्यस्यैव, "अनन्तरस्य" इति न्यायादिति भावः ॥

'उपेयिवान् इत्यत्रोपसर्ग इवाविवक्षितम्' या मनोरमेंतील पंक्तींत 'अविवक्षितम्' हा जो शब्द घातला आहे तो मनोरमेंत ज्या प्रातिशाख्याचा पुढें निर्देश केला आहे तें प्रातिशाख्य ज्या शाखांना लागू पडतें त्या शाखांतील वैदिक उदाहरणांना अनुलक्षून घातला आहे. (मनोरमेंत शौनकीय ऋक्प्रातिशाख्याचा उल्लेख केला आहे व तें प्रातिशाख्य ज्या ऋक्शाखीयांना लागू पडतें त्यांच्या वेदांतील उदाहरणांना 'अविवक्षितम्' हा शब्द लागू पडतो, म्हणजे ऋग्वेदांतील उदाहरणांत स्वरित स्वर, ऱ्हस्व असला किंवा दीर्घ असला, तरी त्याचा प्रथमार्ध उदात्त होत असून अवशिष्ट द्वितीयार्ध अनुदात्त होतो. पण तैत्तरीय इत्यादि प्रातिशाख्यें ज्या शाखांना लागू पडतात त्या शाखांतील वैदिक उदाहरणांना 'अविवक्षितम्' हा शब्द लागू पडत नाहीं व 'अर्धऱ्हस्वम्' यांतील 'ऱ्हस्वम्' हा शब्द त्या शाखांमध्यें विवक्षित आहे; कारण त्या सर्व शाखांमध्यें स्वरित स्वर, ऱ्हस्व असो किंवा दीर्घ असो, त्याची प्रथम अर्धमात्राच उदात्त उच्चारली जाते व तो ऱ्हस्वस्वरित असल्यास त्याची अवशिष्ट अर्धमात्रा अनुदात्त उच्चारली जाते आणि तो दीर्घ स्वरित असल्यास, त्याची अवशिष्ट दीड मात्रा अनुदात्त उच्चारली जाते.) 'तनूनपाच्छचीपतिशब्दयोः......शेषनिघातः' ही जी मनोरमेंत पंक्ति आहे त्या पंक्तीच्या आरंभीं 'यद्यपि' हा शब्द व शेवटीं 'तथापि' हा शब्द अध्याहृत आहे असें समजावें (व असें मानलें म्हणजे त्या मनोरमेंतील पंक्तीचा असा अर्थ होतो कीं, 'तनू' व 'शची' हे शब्द आद्युदात्त असल्यामुळें, 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' या सूत्रान्वयें) जरी त्या शब्दांच्या अनुक्रमें अन्त्य ऊकाराला व ईकाराला अनुदात्त स्वराची प्राप्ति होते तरी, 'जात्यवद्वा तथा वाऽन्तौ तनूशचीति पूर्वयोः' या कारिकान्वयें 'तनू' व 'शची' यांतील अनुक्रमें अन्त्य ऊकार व ईकार जात्यस्वरासारखे होतात. 'अतोऽन्यत्स्वरितं स्वारं जात्यमाचक्षते

पदे' या कारिकेंत जात्यस्वराची व्याख्या दिली आहे व त्या
कारिकेचा अर्थ असा आहे कीं, ज्या स्वरितापुढें उदात्त किंवा
स्वरित स्वर असतो त्याहून भिन्न असणारा व एकाच पदांत
असणारा स्वरित जात्य होय. (शौनकीय प्रातिशाख्यांतील तृतीय
पटलांत दिलेल्या चवथ्या कारिकेचा हा उत्तरार्ध असून त्या कारिकेचा
'उदात्तपूर्व्वं स्वरितमनुदात्तं पदेऽक्षरम्' हा पूर्वार्ध आहे व या
कारिकेचें 'पदे एकस्मिन् पदे उदात्तपूर्व्वं उदात्तः पूर्वं यस्य तं
तथाविधम् अनुदात्तं स्वरितं जानीयात्... अतः प्रकृतादुदात्तपूर्वा-
त्स्वरितात्स्वराद् यदन्यद् एकस्मिन्नेव पदे स्वरितं तं स्वारं जात्य-
माचक्षते व्याडिप्रभृतयः । जात्या स्वभावेनैव उदात्तानुदात्तसङ्गतिं
विना इति यावत् जातो जात्यः।' असें व्याख्यान केलें आहे. शब्द-
रत्नांतील 'उदात्तस्वरितपूर्वस्वरितादन्य...जात्यः' या पदांचा 'उदात्त-
स्वरिताभ्यां पूर्वः यः स्वरितः तस्मादन्यः स्वरितः जात्यः,' म्हणजे
'उदात्तस्वरितपरत्वाभाववान् स्वरितो जात्यः,' असा अर्थ आहे.
'जात्यः' या शब्दाची 'जात्या स्वरान्तरसम्बन्धं विनैव जातः जात्यः'
अशी व्युत्पत्ति आहे व या स्थलीं 'दिगादिभ्यो यत्' सू. १४२२ या
सूत्रानें 'यत्' प्रत्यय झाला आहे. सारांश जात्य स्वर हा एक विशिष्ट
प्रकारचा स्वरित स्वर आहे व वर जी 'जात्य' या शब्दाची व्युत्पत्ति
दिली आहे तिच्यावरून हें स्पष्ट होतें कीं, जो स्वर स्वरान्तराच्या
अपेक्षेनें–सहायानें–स्वरित होतो तो जात्य स्वर नव्हे. उदाहरणार्थ
'उदात्तादनुदात्तस्य स्वरितः' सू. ३६६० इत्यादि सूत्रांनीं स्वरा-
न्तराच्या अपेक्षेनें होणाऱ्या स्वरिताला जात्य म्हणतां येत नाहीं.
'तित्स्वरितम्' सू. ३७२९, 'न्यङ्स्वरौ स्वरितौ' फिट् सू. ७४ इत्यादि
सूत्रांनीं जो स्वर स्वरान्तराची अपेक्षा न करितां स्वरित होतो
त्यालाच जात्य स्वरित म्हणतात. 'जा येन तुल्यः' असा 'जात्यवत्'
या शब्दाचा विग्रह आहे व 'तेन तुल्यं क्रिया चेद्वतिः' सू. १७७८ या
सूत्रानें 'जात्यवत्' या, स्थलीं) 'तेन तुल्यम्' या अर्थामध्यें 'वत्'

प्रत्यय झाला आहे. 'तनू, शची' यांतील अन्त्य ऊकाराला व ईकाराला जेव्हां जात्यवत् स्वरित स्वर होतो तेव्हां त्यांचा द्वितीय अर्धांश उदात्त-रूपानें ऐकूं येतो असा त्या कारिकेचा अर्थ आहे. 'जात्यवद्वा तथा वाऽन्तौ तनूशचोति पूर्वयो:' हा जो (शौनकीय प्रातिशाख्यांतील तृतीय पटलांत दिलेल्या सोळाव्या कारिकेचा) उत्तरार्ध आहे त्याचा 'पद्यादींस्तु द्व्युदात्तानामसंहितवदुत्तरान्' असा पूर्वार्ध असल्यामुळें, (त्या पूर्वार्धाच्या अनुरोधानें) उत्तरार्धांतील 'तथा वा' या पदांचा 'असंहितवद्वा' असा अर्थ होतो व 'तथा वा' यांत 'वा' हें पद असल्यामुळें, त्याचा 'संहितवद्वा' असा अर्थ होतो. या वरील कारिकेंतील 'असंहितवत्' या पदाचा 'केवळ अनुदात्त' असा अर्थ असून, 'संहितवत्' या शब्दाचा 'अर्धानुदात्तस्वरितत्वम्'—म्हणजे ज्या स्वरिताचा द्वितीयार्ध अनुदात्त असतो तशा स्वरित स्वराला संहितवत् स्वर म्हणतात—असा अर्थ आहे असें त्या कारिकेवरील (उवटकृत) भाष्यावरून स्पष्ट होतें. (त्या कारिकेचें 'पद्यं पदार्धम्, द्व्युदात्तानां पदानां पद्यादीन् पदार्धस्य आदीन् उत्तरान् च असंहितवज्जानीयात् । जात्येन तुल्यं जात्यवत् । यथा जात्यस्यान्तो निहन्यते अनुदात्तो भवति उदात्ते परभूते, एवं तनूशची इति पदयो: पदपूर्वार्धयो: सतो: अन्तौ निहन्येते । तथा वा अन्तौ कुर्यात् यथा पद्यादींस्तु इत्यादिना उपरि प्रतिपादितम्' असें व्याख्यान केलें आहे. सारांश 'तनू, शची' यांतील अन्त्य ऊकाराला व ईकाराला जात्य, संहितवत, व असंहितवत् असें तीन प्रकारचे भिन्न स्वर विकल्पेंकरून होतात. या तीन स्वरांपैकीं संहितस्वर हा स्वरित स्वराचा एक भेद असून, तो जात्य स्वरिताचा प्रतिद्वन्द्वी आहे, म्हणजे ज्या स्वरितापुढें स्वरित किंवा उदात्त स्वर असतो व त्यामुळें त्याचा उत्तरार्ध स्पष्टपणें अनुदात्तरूपानें ऐकूं येतो तसा स्वरित संहितसंज्ञक असून, ज्या स्वरितापुढें स्वरित किंवा उदात्त स्वर नाहीं व ज्याचा उत्तरार्ध उदात्तश्रुतिक असतो त्याला जात्यस्वरित म्हणतात. असंहितस्वर हा स्वरित नसून केवळ अनुदात्त स्वराचा

बोधक आहे. म्हणून 'तनू, शची' यांतील अन्त्य ऊकार व ईकार जेव्हां जात्य होतात तेव्हां त्यांचा उत्तरार्ध उदात्तश्रुतिक होतो. जेव्हां ते अन्त्य ऊकार व ईकार संहित होतात तेव्हां त्यांचा उत्तरार्ध अनुदात्तश्रुतिक असतो आणि जेव्हां ते असंहित होतात तेव्हां त्यांच्या दोन्ही मात्रा अनुदात्त असतात असा एकंदरींत या शब्दरत्नांतील वरील पंक्तींचा भावार्थ आहे.) 'तथा स्वरितार्धस्योदात्तत्वे प्रातिशाख्यमपि' या मनोरमेच्या पंक्तींतील 'तथा' या शब्दाचा असा अर्थ आहे कीं, ज्याप्रमाणें स्वरिताचा (मग तो ऱ्हस्व असो किंवा दीर्घ असो) प्रथमार्ध उदात्त होतो याला वैदिक उदाहरणें प्रमाण आहेत त्याचप्रमाणें त्याला प्रातिशाख्य देखील प्रमाण आहे. 'तस्योदात्ततरोदात्तादर्धमात्राऽर्द्धमेव वा' या मनोरमेंत दिलेल्या कारिकेंतील 'उदात्तात्' या पदाचा 'स्वतन्त्रोदात्तात्,' म्हणजे 'उच्चैरुदात्तः' सू ५ या सूत्रानें उदात्तसंज्ञा पावणाऱ्या स्वतंत्र उदात्तापेक्षां, असा अर्थ असल्यामुळें, दीक्षितांनीं त्या कारिकेंतील 'उदात्तात्' या पदाचा 'स्वतन्त्रोदात्तापेक्षया' असा अर्थ केला आहे. त्या कारिकेंतील अर्धमेव वा' या स्थलीं 'एव' हें पद अशाकरितां घातलें आहे कीं, ज्या शाखांना तें शौनकीय प्रातिशाख्य लागू पडतें त्या शाखांमध्यें दीर्घ स्वरितादिकांचा देखील प्रथमार्ध उदात्त पठित केला जातो, (व केवळ पहिली अर्धमात्रा उदात्त पठित केली जात नाहीं.) असें असल्यामुळें दीर्घ स्वरिताची पहिली अर्धमात्रा किंवा पहिली एक मात्रा विकल्पें करून उदात्त होते असें जे कोणी म्हणतात त्यांचें तें म्हणणें चूक ठरतें. 'अर्धमेव वा' या स्थलीं जो 'वा' शब्द घातला आहे तो (विकल्पाचा वाचक नसून) केवळ पादपूरणार्थ घातला आहे असें समजावें. 'अप्राकृतस्तु यः स्वारः स्वरितोदात्तपूर्वगः' या कारिकेंतील 'अप्राकृतः' या पदाचा 'स्वरितः' असा अर्थ असून, 'स्वारः' या पदाचा 'स्वरः' असा अर्थ आहे व 'स्वारः' हा शब्द 'स्वरः एव स्वारः' अशा रीतीनें 'स्वार्थे अण्' प्रत्यय होऊन सिद्ध झाला आहे.

प्रत्यय झाला आहे. 'तनू, शची' यांतील अन्त्य ऊकाराला व ईकाराला जेव्हां जात्यवत् स्वरित स्वर होतो तेव्हां त्यांचा द्वितीय अर्धांश उदात्तरूपानें ऐकूं येतो असा त्या कारिकेचा अर्थ आहे. 'जात्यवद्वा तथा वाऽन्तौ तनूशचीति पूर्वयोः' हा जो (शौनकीय प्रातिशाख्यांतील तृतीय पटलांत दिलेल्या सोळाव्या कारिकेचा) उत्तरार्ध आहे त्याचा 'पद्यादींस्तु द्व्युदात्तानामसंहितवदुत्तरान्' असा पूर्वार्ध असल्यामुळें, (त्या पूर्वार्धाच्या अनुरोधानें) उत्तरार्धांतील 'तथा वा' या पदांचा 'असंहितवद्वा' असा अर्थ होतो व 'तथा वा' यांत 'वा' हें पद असल्यामुळें, त्याचा 'संहितवद्वा' असा अर्थ होतो. या वरील कारिकेंतील 'असंहितवत्' या पदाचा 'केवळ अनुदात्त' असा अर्थ असून, 'संहितवत्' या शब्दाचा 'अर्धानुदात्तस्वरितत्वम्'–म्हणजे ज्या स्वरिताचा द्वितीयार्ध अनुदात्त असतो तशा स्वरित स्वराला संहितवत् स्वर म्हणतात–असा अर्थ आहे असें त्या कारिकेवरील (उवटकृत) भाष्यावरून स्पष्ट होतें. (त्या कारिकेचें 'पद्यं पदार्धम्, द्व्युदात्तानां पदानां पद्यादीन् पदार्धस्य आदीन् उत्तरान् च असंहितवज्जानीयात् । जात्येन तुल्यं जात्यवत् । यथा जात्यस्यान्तो निहन्यते अनुदात्तो भवति उदात्ते परभूते, एवं तनूशची इति पदयोः पदपूर्वार्धयोः सतोः अन्तौ निहन्येते । तथा वा अन्तौ कुर्यात् यथा पद्यादींस्तु इत्यादिना उपरि प्रतिपादितम्' असें व्याख्यान केलें आहे. सारांश 'तनू, शची' यांतील अन्त्य ऊकाराला व ईकाराला जात्य, संहितवत, व असंहितवत् असें तीन प्रकारचे भिन्न स्वर विकल्पेंकरून होतात. या तीन स्वरांपैकीं संहितस्वर हा स्वरित स्वराचा एक भेद असून, तो जात्य स्वरिताचा प्रतिद्वन्द्वी आहे, म्हणजे ज्या स्वरितापुढें स्वरित किंवा उदात्त स्वर असतो व त्यामुळें त्याचा उत्तरार्ध स्पष्टपणें अनुदात्तरूपानें ऐकूं येतो तसा स्वरित संहितसंज्ञक असून, ज्या स्वरितापुढें स्वरित किंवा उदात्त स्वर नाहीं व ज्याचा उत्तरार्ध उदात्तश्रुतिक असतो त्याला जात्यस्वरित म्हणतात. असंहितस्वर हा स्वरित नसून केवळ अनुदात्त स्वराचा

बोधक आहे. म्हणून 'तनू, शची' यांतील अन्त्य ऊकार व ईकार जेव्हां जात्य होतात तेव्हां त्यांचा उत्तरार्ध उदात्तश्रुतिक होतो. जेव्हां ते अन्त्य ऊकार व ईकार संहित होतात तेव्हां त्यांचा उत्तरार्ध अनुदात्तश्रुतिक असतो आणि जेव्हां ते असंहित होतात तेव्हां त्यांच्या दोन्ही मात्रा अनुदात्त असतात असा एकंदरीत या शब्दरत्नांतील वरील पंक्तींचा भावार्थ आहे.) 'तथा स्वरितार्धस्योदात्तत्वे प्रातिशाख्यमपि' या मनोरमेच्या पंक्तींतील 'तथा' या शब्दाचा असा अर्थ आहे कीं, ज्याप्रमाणें स्वरिताचा (मग तो ऱ्हस्व असो किंवा दीर्घ असो) प्रथमार्ध उदात्त होतो याला वैदिक उदाहरणें प्रमाण आहेत त्याचप्रमाणें त्याला प्रातिशाख्य देखील प्रमाण आहे. 'तस्योदात्ततरोदात्तादर्धमात्राऽर्द्धमेव वा' या मनोरमेंत दिलेल्या कारिकेंतील 'उदात्तात्' या पदाचा 'स्वतन्त्रोदात्तात्,' म्हणजे 'उच्चैरुदात्तः' सू ५ या सूत्रानें उदात्तसंज्ञा पावणाऱ्या स्वतंत्र उदात्तापेक्षां, असा अर्थ असल्यामुळें, दीक्षितांनीं त्या कारिकेंतील 'उदात्तात्' या पदाचा 'स्वतन्त्रोदात्तापेक्षया' असा अर्थ केला आहे. त्या कारिकेंतील अर्धमेव वा' या स्थलीं 'एव' हें पद अशाकरितां घातलें आहे कीं, ज्या शाखांना तें शौनकीय प्रातिशाख्य लागू पडतें त्या शाखांमध्यें दीर्घ स्वरितादिकांचा देखील प्रथमार्ध उदात्त पठित केला जातो, (व केवळ पहिली अर्धमात्रा उदात्त पठित केली जात नाहीं.) असें असल्यामुळें दीर्घ स्वरिताची पहिली अर्धमात्रा किंवा पहिली एक मात्रा विकल्पें-करून उदात्त होते असें जे कोणी म्हणतात त्यांचें तें म्हणणें चूक ठरतें. 'अर्धमेव वा' या स्थलीं जो 'वा' शब्द घातला आहे तो (विकल्पाचा वाचक नसून) केवळ पादपूरणार्थ घातला आहे असें समजावें. 'अप्राकृतस्तु यः स्वारः स्वरितोदात्तपूर्वगः' या कारिकेंतील 'अप्राकृतः' या पदाचा 'स्वरितः' असा अर्थ असून, 'स्वारः' या पदाचा 'स्वरः' असा अर्थ आहे व 'स्वारः' हा शब्द 'स्वरः एव स्वारः' अशा रीतीनें 'स्वार्थे अण्' प्रत्यय होऊन सिद्ध झाला आहे.

'स्वरितोदात्तपूर्वंगः' या पदाचा 'स्वरितोदात्ताभ्यां पूर्ववर्णगः,' म्हणजे स्वरिताच्या किंवा उदात्ताच्या पूर्वी जो वर्ण आहे त्या वर्णाचे–अचाचे–ठिकाणीं असणारा स्वरित स्वर," असा अर्थ आहे. 'अर्ध-ह्रस्वशब्देनार्धमात्रा लक्ष्यते' असें जें हरदत्तादिकांनीं म्हटलें आहे त्याला 'अर्ध-ह्रस्वशब्दोऽर्धमात्रायां रूढः' म्हणजे 'अर्ध-ह्रस्व' या शद्वाचा 'अर्धमात्रा' असा रूढ अर्थ आहे, हें भाष्यकारांचें वचन प्रमाण आहे. हरीच्या कारिकेंत देखील 'प्रमाणमेव ऱ्हस्वादावनुपात्तं प्रतीयते' असें म्हटलें आहे व हेलाराजानें त्या कारिकेचा 'अनुपात्तमपि अर्धमात्रारूपं प्रमाणमेवोपलक्ष्यते' असा अर्थ केला आहे. (त्या कारिकेंतील 'अनुपात्तम्' या पदाचा 'अर्ध-ह्रस्वशद्वनिष्ठशक्त्यप्रतिपाद्यम्' असा अर्थ आहे व त्यामुळें त्या कारिकेचा असा अर्थ होतो कीं, जरी 'अर्ध-ह्रस्व' या शद्वाच्या अभिधाशक्तीनें अर्धमात्रा या अर्थाचा बोध होऊं शकत नाहीं तरी, त्या शद्वानें अर्धमात्रारूप प्रमाणाचेंच लक्षणेनें ग्रहण होतें.) सारांश 'अर्ध-ह्रस्व' हा शद्व अर्धमात्रा या अर्थाचा रूढीनें वाचक मानला असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, भाषेंत व तसेंच बह्वृचांच्या शाखा खेरीज करून इतर सर्व शाखांमध्यें दीर्घादि स्वरितांची देखील अर्धमात्राच उदात्त होते (व अवशिष्ट दीड मात्रा अनुदात्तरूपानें पठित केली जाते.) 'मतान्तरपरतया नेयाः' या मनोरमेच्या पंक्तींचा 'प्रातिशाख्योक्तमतापेक्षयेतरवेदलोकसाधारणमतान्तरपरतया नेयाः'— म्हणजे ऋक्प्रातिशाख्य ज्यांना लागू पडते अशा शाखांचे वेद खेरीज करून इतर वेदांत व लोकांत अर्ध-ह्रस्व हा शब्द अर्धमात्रा या अर्थामध्यें रूढ असल्यामुळें त्या रूढ अर्थाच्या आधारें हरदत्तादिकांच्या मताचें समर्थन करावें, असा अर्थ आहे. भाष्यकारांनीं 'अर्ध-ह्रस्व' हा शब्द 'अर्धमात्रा' या अर्थाचा रूढीनें वाचक मानला असल्यामुळें, 'कथंचिन्नेयाः' या मनोरमेंतील पदांचा 'लक्षणया नेयाः' असा अर्थ करावा; (कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणें 'अर्ध-ह्रस्व' या शब्दाचा 'अर्धमात्रा' असा अभिधाशक्तीनें अर्थ होत नसून भाष्यकारांनीं त्या

शब्दाचा तसा रूढ अर्थ मानला असल्यामुळें, त्या शब्दाचा लक्षणेनें तसा अर्थ करणें भाग आहे व तसा अर्थ केल्यानें, ज्या शाखांना शौनकीय ऋक्प्रातिशाख्य लागू पडत नाहीं अशा सर्व शाखांच्या वेदांत व तसेंच भाषेंत दीर्घादि स्वरितांची प्रथम अर्धमात्राच उदात्त होत असून अवशिष्ट भाग अनुदात्त होतो असा प्रकृत सूत्राचा अर्थ समजावा.) 'नोदात्तस्वरितोदयम्' सू. ३६६१ हें (अष्टमाध्यायांतील चतुर्थ पादांत पठित असलेलें) सूत्र 'अनन्तरस्य विधिर्वा भवति प्रतिषेधो वा'–परि. ६२–या न्यायान्वयें 'उदात्तादनुदात्तस्य स्वरितः' सू. ३६६० या (लगेंच पूर्वीं पठित असलेल्या) सूत्राचेंच निषेधक सूत्र आहे (व त्या सूत्रानें 'स्वरितो वानुदात्ते पदादौ' सू. ३६५९ या बरेंच पूर्वीं अष्टमाध्यायाच्या द्वितीय पादांत पठित असलेल्या सूत्राचा निषेध होऊं शकत नाहीं आणि म्हणूनच 'एकादेशस्तु पक्षे स्वरितः' असें मनोरमेंत म्हटलें आहे.)

मनोरमा –'मुखं च नासिका च' इति विग्रहे प्राण्यङ्गत्वादेकवद्भावे 'मुखनासिकम्' इति स्यादत आह– मुखसहितेति ॥

('मुखनासिकावचनोऽनुनासिकः' सू. ९ या सूत्रांतील 'मुख-नासिका' या शब्दाचा) 'मुखं च नासिका च' असा विग्रह केल्यास, मुख व नासिका हे दोन्ही प्राण्यङ्ग असल्यामुळें ('द्वन्द्वश्च प्राणितूर्य-सेनाङ्गानाम्' सू. ९०६ या सूत्रानें) एकवद्भाव होऊन (व समाहारद्वन्द्व केला असतां 'स नपुंसकम्' सू. ८२१ या सूत्रानें समाहारद्वन्द्वानें तयार झालेला सामासिक शब्द नपुंसक होऊन आणि 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' सू. ३१८ या सूत्रानें तो ऱ्हस्व होऊन) 'मुखनासिकम्' असा सामासिक शब्द होईल (व पूर्ण सामासिक शब्दाचें 'मुखनासिकावचनः' असें रूप न होतां, 'उच्यते इति वचनः, मुखनासिकेन वचनः मुखनासिकवचनः' असें रूप होण्याची आपत्ति येईल. ती आपत्ति टळावी म्हणून) 'मुखसहिता नासिका' असा 'मुखनासिका' या शब्दाचा कौमुदींत विग्रह केला

आहे (व 'शाकपार्थिवादीनां सिद्धये उत्तरपदलोपस्योपसंख्यानम्'– सू. ७३९ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें 'सहिता' या मध्यम पदाचा लोप होत असल्यामुळें, 'मुखनासिकया वचनः मुखनासिकावचनः' हा सूत्रनिर्दिष्ट शब्द साधु ठरतो. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'किमिदं मुखनासिकावचन इति। मुखं च नासिका च मुखनासिकम्। मुखनासिकं वचनमस्य सोऽयं मुखनासिकावचनः। यद्येवं मुखनासिकवचन इति प्राप्नोति। निपातनाद्दीर्घत्वं भविष्यति। अथवा ...मुखद्वितीया वा नासिका वचनमस्य सोऽयं मुखनासिकावचनः। मुखोपसंहिता वा नासिका वचनमस्य सोऽयं मुखनासिकावचनः।')

मनोरमा– "तुल्यास्य"। आस्ये भवमास्यम्, "शरीरावयवाद्यत्"। इत्यभिप्रेत्याह–ताल्वादीति। आभ्यन्तरेति। एतच्च प्रशब्दबलाल्लभ्यते। तुल्यास्यं किम्। तप्र्ता अत्र पकारस्य तकारे परे "झरो झरि' इति लोपो मा भूत्। प्रयत्नग्रहणं किम्। वाक् श्चोतति। शस्य लोपो न। ञमङणनानामिति। 'नासिका च' इति चकारेण स्वस्ववर्गानुकूलं ताल्वादि समुच्चीयते। "अनुस्वारोत्तमा अनुनासिकाः" इति तैत्तिरीयाणां प्रातिशाख्यम्। "यमानुस्वारनासिक्यानां नासिका, अनुनासिकाश्चोत्तमाः" इति कात्यायनप्रातिशाख्यम्। "वर्गोत्तमा ञमङणना अनुनासिका भवन्ति, चशब्दात्स्वस्थानाद्यपरित्यागेन नासिका स्थानं द्वितीयमेषामित्यर्थः" इति तद्भाष्यं च। "एदैतोः" इत्यादौ तपरत्वमसंदेहार्थं, न तु तत्कालग्रहणार्थम्। तेन प्लुतस्यापि संग्रहः॥

('तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' सू. १० या सूत्रांतील) 'आस्य' हा शब्द 'आस्ये भवम्' अशा रीतीनें 'शरीरावयवाच्च' सू. १४३० या सूत्रानें ('तत्र भवः' या अर्थामध्यें) 'यत्' प्रत्यय होऊन, (व 'यस्येति च' सू. ३११ या सूत्रानें प्रकृतींतील अन्त्य अकाराचा व 'हलो यमां यमि लोपः' सू. ६० या सूत्रानें अवशिष्ट पूर्व

यकाराचा लोप होऊन) सिद्ध होत असल्यामुळें, त्याचा 'ताल्वादि-स्थानम्' असा कौमुदींत अर्थ केला आहे. (वास्तविक 'आस्य' या शब्दाचा मुख असा अर्थ आहे, पण तसा अर्थ केल्यास, मुखांतूनच सर्व वर्ण निघत असल्याकारणानें प्रकृत सूत्रांतील 'आस्य' हा शब्द व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते व त्या शब्दाचा मुखांत असलेलीं ताल्वादि स्थानें असा अर्थ अभिप्रेत असल्यामुळें, त्या शब्दाची वर सांगितल्याप्रमाणें व्युत्पत्ति केली आहे. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'न हि लौकिकमास्यम्। किं तर्हि? । तद्धितान्तमास्यम्। आस्ये भवमास्यम्। शरीरावयवाद्यत्। किं पुनरास्ये भवम्? । स्थानं करणं च।') या प्रकृत सूत्रांतील 'प्रयत्न' या शब्दांत (प्रकर्षवाचक) 'प्र' हा उपसर्ग असल्यामुळें, त्या उपसर्गाच्या सामर्थ्यानें 'प्रयत्न' या शब्दाचा आभ्यन्तर प्रयत्न असा अर्थ होतो. (सारांश 'यत्न' हा शब्द विवारसंवारादि बाह्य यत्नांचा वाचक असून 'प्रयत्न' हा शब्द आभ्यन्तर यत्नाचा वाचक आहे; कारण आभ्यन्तर प्रयत्न प्रथम होत असून बाह्य यत्न नंतर होत असल्यामुळें व आभ्यन्तर प्रयत्नांत जसा प्रकृष्ट यत्न करावा लागतो तसा बाह्य यत्नांत करावा लागत नसल्यामुळें, आभ्यन्तर यत्नास प्रयत्न असें म्हणतात.) प्रकृत सूत्रांत 'तुल्यास्य' हा शब्द अशाकरितां घातला आहे कीं, 'तर्प्ता' या स्थलीं पकारापुढें तकार असल्यामुळें, त्या पूर्व पकाराचा 'झरो झरि सवर्णे' सू. ७१ य सूत्रानें लोप होऊं नये. ('तृप् + ता' या स्थलीं 'पुगन्तलघूपधस्य च' सू. २१८९ या सूत्रानें 'तृप्' यांतील उपधेंत असणाऱ्य ऋकाराचा गुण होऊन तर्प् + ता' अशी स्थिति झाली असत 'र्' या हलापुढें 'प्' हा झर् असून त्यापुढें तकार हा झर् आल आहे. पकार व तकार हे दोन्ही स्पर्श वर्ण असल्यामुळें, 'स्पृष्ट प्रयतनं स्पर्शानाम्' या वचनान्वयें त्यांचा आभ्यन्तर प्रयत्न एकच— म्हणजे स्पृष्ट– आहे. पण पकाराचें ओष्ठ हें उच्चारण स्थान ा

तकाराचें दन्त हें उच्चारण स्थान आहे. सारांश, जरी या दोन वर्णांचा आभ्यन्तर प्रयत्न एकच आहे तरी त्यांच्यांत स्थानसाम्य नाहीं आणि म्हणून, 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' या सूत्रान्वयें ते सवर्ण होऊं शकत नाहींत व त्यामुळें 'झरो झरि सवर्णे' हें सूत्र येथें लागू पडत नाहीं व पकाराचा लोप होत नाहीं. 'तुल्यप्रयत्नं सवर्णम्' असें जर सूत्र असतें तर, पकाराचा लोप होण्याची आपत्ति आली असती. ती टळावी म्हणून, प्रकृत सूत्रांत 'आस्य' हा शब्द मुद्दाम घातला आहे.) या सूत्रांत 'प्रयत्न' या शब्दाचें ग्रहण अशाकरितां केलें आहे कीं, 'वाक् श्चोतति' या स्थलीं शकाराचा लोप होऊं नये. ('वाक् श्चोतति' या उदाहरणांत 'क्' या हलापुढें 'श्' हा झर् असून त्यापुढें 'च्' हा झर् आहे. शकार व चकार या दोहोंचें उच्चारणस्थान एकच म्हणजे 'इचुयशानां तालु' या वचनान्वयें 'तालु' आहे; पण शकार या ऊष्मवर्णाचा आभ्यन्तरप्रयत्न, 'विवृतमूष्मणां स्वराणां च' या वचनान्वयें, विवृत असून, चकार या स्पर्श वर्णाचा आभ्यन्तरप्रयत्न, 'स्पृष्टं प्रयतनं स्पर्शानाम्' या वचनान्वयें स्पृष्ट आहे. सारांश, या दोन वर्णांत जरी उच्चारणस्थानसाम्य आहे तरी, त्यांच्यांत आभ्यन्तरप्रयत्नसाम्य नाहीं आणि म्हणून शकार व चकार हे सवर्ण होऊं शकत नाहींत व त्यामुळें 'झरो झरि सवर्णे' हें सूत्र येथें लागू पडत नाहीं आणि शकाराचा लोप होत नाहीं. जर 'तुल्यास्य सवर्णम्' एवढेंच सूत्र केलें असतें तर, शकाराचा लोप होण्याची आपत्ति आली असती. ती टळावी म्हणून, त्या सूत्रांत 'प्रयत्न' या शब्दाचें मुद्दाम ग्रहण केलें आहे. सारांश, या सूत्रांत 'आस्य' व 'प्रयत्न' हे दोन्ही शब्द आवश्यक आहेत व ज्या वर्णांत स्थानसाम्य व आभ्यन्तरप्रयत्नसाम्य आहे तसेच वर्ण प्रकृतसूत्रान्वयें सवर्णसंज्ञक होतात.) 'ञमङणनानां नासिका च' या कौमुदींतील पंक्तींत 'च' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें, 'ञ्, म्, ङ, ण्' व 'न्' ज्या वर्गांत अन्तर्भूत आहेत त्या वर्गाचें जें स्थान आहे तें त्यांचें स्थान

होत असून, त्यांचें त्या शिवाय नासिका देखील उच्चारणस्थान आहे हें स्पष्ट होतें. (सारांश ञकाराचें तालु व नासिकास्थान, मकाराचें ओष्ठ व नासिकास्थान इत्यादि समजावें.) अनुस्वार व पांच वर्गांपैकीं प्रत्येक वर्गांतील अन्त्य वर्ण हे अनुनासिक होत असें तैत्तिरीयांच्या प्रातिशाख्यांत सांगितलें आहे. यम, अनुस्वार व नासिक्य यांचें नासिका हें उच्चारणस्थान आहे व पांच वर्गांपैकीं प्रत्येक वर्गांतील अन्त्य वर्ण अनुनासिकसंज्ञक आहे असें कात्यायनप्रातिशाख्यांत सांगितलें आहे, व त्या प्रातिशाख्यावरील भाष्यांत असें म्हटलें आहे कीं, वर्गांचे अन्त्य वर्ण ञ्, म्, ङ, ण्, न् हे अनुनासिक आहेत आणि 'च' या शब्दानें हें द्योतित होतें कीं, हे वर्ण ज्या वर्गांत आहेत त्या वर्गांचें जें उच्चारण-स्थान आहे तें त्यांचें आहेच व त्याखेरीज नासिका हें त्यांचें द्वितीय उच्चारणस्थान आहे, म्हणजे दोन्ही स्थानांनीं मिळून त्यांचें उच्चारण होतें. 'एदैतोः (कण्ठतालु, ओदौतोः कण्ठोष्ठम्' असें जें कौमुदींत तपरकरण करून 'एदैतोः' व 'ओदौतोः' असें म्हटलें आहे व) या स्थलीं जें तपरकरण केलें आहे तें, ('तपरस्तत्कालस्य' सू. १५ या सूत्रान्वयें) तत्कालवाचक वर्णांचेंच ग्रहण व्हावें याकरितां केलें नसून, संदेह उत्पन्न न व्हावा एवढ्याकरितांच केलें आहे व त्यामुळें 'ए, ऐ, ओ, औ' हे वर्ण प्लुत असले तरी त्यांचें देखील ग्रहण होतें, म्हणजे दीर्घ 'ए, ऐ' व दीर्घ 'ओ, औ' यांचें जें उच्चारणस्थान आहे तेंच प्लुत 'ए, ऐ' व प्लुत 'ओ, औ' यांचें उच्चारणस्थान समजावें. ('ए+ऐ' यांचा संधि करून व तसेंच 'ओ+औ' यांचा 'एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रान्वयें सन्धि करून 'अयै' व 'अवौ' अशीं रूपें झाल्यावर त्याहून षष्ठी विभक्तीच्या द्विवचनाचा प्रत्यय करून जर कौमुदींतील पंक्तींत उच्चारण केलें असतें तर, हे कोणत्या वर्णांचें वाचक आहेत असा संदेह उत्पन्न झाला असता. तसा संदेह उत्पन्न न व्हावा एवढ्याकरितांच तपरकरण केलें आहे.)

शब्दरत्न– **'आस्य' शब्देन कथं तदवयवताल्वादिग्रहणमत आह–आस्ये भवमिति। प्रशब्दबलादिति। प्रकृष्टो यत्नः प्रयत्नः।**

तकाराचें दन्त हें उच्चारण स्थान आहे. सारांश, जरी या दोन वर्णांचा आभ्यन्तर प्रयत्न एकच आहे तरी त्यांच्यांत स्थानसाम्य नाहीं आणि म्हणून, 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' या सूत्रान्वयें ते सवर्ण होऊं शकत नाहींत व त्यामुळें 'झरो झरि सवर्णे' हें सूत्र येथें लागू पडत नाहीं व पकाराचा लोप होत नाहीं. 'तुल्यप्रयत्नं सवर्णम्' असें जर सूत्र असतें तर, पकाराचा लोप होण्याची आपत्ति आली असती. ती टळावी म्हणून, प्रकृत सूत्रांत 'आस्य' हा शब्द मुद्दाम घातला आहे.) या सूत्रांत 'प्रयत्न' या शब्दाचें ग्रहण अशाकरितां केलें आहे कीं, 'वाक् श्चोतति' या स्थलीं शकाराचा लोप होऊं नये. ('वाक् श्चोतति' या उदाहरणांत 'क्' या हलापुढें 'श्' हा झर् असून त्यापुढें 'च्' हा झर् आहे. शकार व चकार या दोहोंचें उच्चारणस्थान एकच म्हणजे 'इचुयशानां तालु' या वचनान्वयें 'तालु' आहे; पण शकार या ऊष्मवर्णाचा आभ्यन्तरप्रयत्न, 'विवृतमूष्मणां स्वराणां च' या वचनान्वयें, विवृत असून, चकार या स्पर्श वर्णाचा आभ्यन्तरप्रयत्न, 'स्पृष्टं प्रयतनं स्पर्शानाम्' या वचनान्वयें स्पृष्ट आहे. सारांश, या दोन वर्णांत जरी उच्चारणस्थानसाम्य आहे तरी, त्यांच्यांत आभ्यन्तरप्रयत्नसाम्य नाहीं आणि म्हणून शकार व चकार हे सवर्ण होऊं शकत नाहींत व त्यामुळें 'झरो झरि सवर्णे' हें सूत्र येथें लागू पडत नाहीं आणि शकाराचा लोप होत नाहीं. जर 'तुल्यास्य सवर्णम्' एवढेंच सूत्र केलें असतें तर, शकाराचा लोप होण्याची आपत्ति आली असती. ती टळावी म्हणून, त्या सूत्रांत 'प्रयत्न' या शब्दाचें मुद्दाम ग्रहण केलें आहे. सारांश, या सूत्रांत 'आस्य' व 'प्रयत्न' हे दोन्ही शब्द आवश्यक आहेत व ज्या वर्णांत स्थानसाम्य व आभ्यन्तरप्रयत्नसाम्य आहे तसेच वर्ण प्रकृतसूत्रान्वयें सवर्णसंज्ञक होतात.) 'ञमङणनानां नासिका च' या कौमुदींतील पंक्तींत 'च' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें, 'ञ्, म्, ङ, ण्' व 'न्' ज्या वर्गांत अन्तर्भूत आहेत त्या वर्गाचें जें स्थान आहे तें त्यांचें स्थान

होत असून, त्यांचें त्या शिवाय नासिका देखील उच्चारणस्थान आहे हें स्पष्ट होतें. (सारांश ञकाराचें तालु व नासिकास्थान, मकाराचें ओष्ठ व नासिकास्थान इत्यादि समजावें.) अनुस्वार व पांच वर्गांपैकीं प्रत्येक वर्गांतील अन्त्य वर्ण हे अनुनासिक होत असें तैत्तिरीयांच्या प्रातिशाख्यांत सांगितलें आहे. यम, अनुस्वार व नासिक्य यांचें नासिका हें उच्चारणस्थान आहे व पांच वर्गांपैकीं प्रत्येक वर्गांतील अन्त्य वर्ण अनुनासिकसंज्ञक आहे असें कात्यायनप्रातिशाख्यांत सांगितलें आहे, व त्या प्रातिशाख्यावरील भाष्यांत असें म्हटलें आहे कीं, वर्गांचे अन्त्य वर्ण ञ्, म्, ङ्, ण्, न् हे अनुनासिक आहेत आणि 'च' या शब्दानें हें द्योतित होतें कीं, हे वर्ण ज्या वर्गांत आहेत त्या वर्गांचें जें उच्चारण-स्थान आहे तें त्यांचें आहेच व त्याखेरीज नासिका हें त्यांचें द्वितीय उच्चारणस्थान आहे, म्हणजे दोन्ही स्थानांनीं मिळून त्यांचें उच्चारण होतें. 'एदैतोः (कण्ठतालु, ओदौतोः कण्ठोष्ठम्' असें जें कौमुदींत तपरकरण करून 'एदैतोः' व 'ओदौतोः' असें म्हटलें आहे व) या स्थलीं जें तपरकरण केलें आहे तें, ('तपरस्तत्कालस्य' सू. १५ या सूत्रान्वयें) तत्कालवाचक वर्णांचेंच ग्रहण व्हावें याकरितां केलें नसून, संदेह उत्पन्न न व्हावा एवढ्याकरितांच केलें आहे व त्यामुळें 'ए, ऐ, ओ, औ' हे वर्ण प्लुत असले तरी त्यांचें देखील ग्रहण होतें, म्हणजे दीर्घ 'ए, ऐ' व दीर्घ 'ओ, औ' यांचें जें उच्चारणस्थान आहे तेंच प्लुत 'ए, ऐ' व प्लुत 'ओ, औ' यांचें उच्चारणस्थान समजावें. ('ए+ऐ' यांचा संधि करून व तसेंच 'ओ+औ' यांचा 'एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रान्वयें सन्धि करून 'अयै' व 'अवौ' अशीं रूपें झाल्यावर त्याहून षष्ठी विभक्तीच्या द्विवचनाचा प्रत्यय करून जर कौमुदींतील पंक्तींत उच्चारण केलें असतें तर, हे कोणत्या वर्णांचें वाचक आहेत असा संदेह उत्पन्न झाला असता. तसा संदेह उत्पन्न न व्हावा एवढ्याकरितांच तपरकरण केलें आहे.)

शब्दरत्न— 'आस्य' शब्देन कथं तदवयवताल्वादिग्रहणमत आह—आस्ये भवमिति। प्रशब्दबलादिति। प्रकृष्टो यत्नः प्रयत्नः।

प्रकर्षश्च–वर्णोत्पत्त्यव्यवहितप्राक्कालिकत्वरूप इति भावः। चकारेणेति। अत्र यथा नासिकायाः स्थानत्वम्, तथाऽन्यत्र निरूपितम्। न तु तत्कालेऽति। एषां शिक्षाद्युक्तार्थानुवादत्वेनात्र शास्त्रप्रवृत्त्यभावादिति भावः।

'आस्य' (या शब्दाची 'अस्यन्ते वर्णा येन' अशी व्युत्पत्ति असून त्या शब्दाचा 'मुख' असा अर्थ होत असल्यामुळें,) या शब्दानें मुखाचे अवयव जीं तालु इत्यादि स्थानें आहेत त्यांचें ग्रहण कसें होतें हें बोधित करण्याकरितां, 'आस्ये भवमास्यम्' अशी 'आस्य' या शब्दाची मनोरमेंत व्युत्पत्ति केली आहे. 'प्रकृष्टो यत्नः प्रयत्नः = आभ्यन्तरप्रयत्नः' असा 'प्रयत्न' शब्दाचा विग्रह आहे व बाह्य यत्नाच्या मानानें आभ्यन्तरप्रयत्नामध्यें जो प्रकर्ष, म्हणजे अधिक यत्न, असतो तो वर्णाची उत्पत्ति–अभिव्यक्ति–होण्याच्या लगेंच पूर्वीं होणारा प्रयत्न होय. (वर्णोत्पत्ति मुखाच्या द्वारें होते; पण ती होण्यापूर्वीं, 'आत्मा बुद्ध्या समेत्यार्थान् मनो युङ्क्ते विवक्षया। मनः कायाग्निमाहन्ति स प्रेरयति मारुतम्॥ मारुतस्तूरसि चरन् मन्द्रं जनयति स्वरम्।' इत्यादि पाणिनीय शिक्षेंत सांगितल्याप्रमाणें, जो प्रकृष्ट आन्तरप्रयत्न होत असतो त्याला आभ्यन्तर प्रयत्न म्हणतात. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'न हि प्रयतनं प्रयत्नः। किं तर्हि। प्रारम्भो यत्नस्य प्रयत्नः।' या भाष्याचा अर्थ असा आहे कीं, कोणत्याहि तऱ्हेचा प्रयत्न या अर्थामध्यें 'प्रयत्न' या शब्दाचा प्रकृत सूत्रांत उपयोग केला नसून, 'प्रारम्भो यत्नस्य' या व्युत्पत्तीनें वर्णोत्पत्ति होण्यापूर्वीं जो आभ्यन्तर प्रयत्न होतो त्या अर्थामध्यें येथें प्रयत्न या शब्दाचा उपयोग केला आहे. या वरील विवेचनावरून जरी हें सिद्ध होतें कीं, शास्त्रीय व्यवहारांत आभ्यन्तर प्रयत्नालाच प्रयत्न म्हणत असून विवारादि बाह्य यत्नांना प्रयत्न न म्हणतां केवळ यत्न असें म्हणतात तरी, लौकिक व्यवहारांत अशा प्रकारचा भेद मानला जात नसून,

आभ्यन्तर प्रयत्न व बाह्य यत्न या दोन्ही प्रकारच्या यत्नांना प्रयत्न
असेंच म्हणण्याची प्रथा आहे हें ध्वनित करण्याच्या हेतूनें दीक्षितांनीं
कौमुदींत बाह्य यत्नाचे ठिकाणीं देखील प्रयत्न हा शब्द वापरला
आहे असें शब्देन्दुशेखरांत म्हटलें आहे. त्या ग्रन्थांत नागेश म्हणतात–
'सूत्रे प्रशब्देन विलक्षणार्थबोधेऽपि लोके यत्नप्रयत्नयोः पर्यायतेति
ध्वनयन्नाह, प्रयत्नो द्विधेति। क्वचिद् यत्न इत्येव पाठः।' येथें
कौमुदीच्या ज्या प्रती उपलब्ध आहेत त्या सर्व प्रतींत 'प्रयत्नो
द्विधा' असा नागेशांनीं निर्दिष्ट केलेला पाठ नसून 'यत्नो द्विधा'
असाच पाठ आहे. तरी पण दीक्षितांनीं 'पूर्वत्रासिद्धम्' या सूत्रावरील
कौमुदींत 'बाह्यप्रयत्नस्त्वेकादशधा, बाह्यप्रयत्नाश्च यद्यपि सवर्णसंज्ञा-
यामनुपयुक्ताः' इत्यादि म्हटलें असल्यामुळें, नागेशांनीं सांगितल्या-
प्रमाणें असें म्हणतां येतें कीं, आभ्यन्तर प्रयत्न व बाह्य यत्न या
दोन्ही प्रकारच्या यत्नांना लौकिक व्यवहारांत प्रयत्न असें म्हणण्याची
चाल आहे हें ध्वनित करण्याकरितां दीक्षितांनीं कौमुदींत ठिकठिकाणीं
बाह्य यत्नाचे ठिकाणीं देखील प्रयत्न हा शब्द वापरला आहे.)
नासिका हें कशा रीतीनें उच्चारणस्थान ठरतें यासंबंधानें इतर
ग्रन्थांत–शब्देन्दुशेखरांत– चर्चा केली आहे. (त्या ग्रन्थांत नागेशांनीं
नासिकास्थानासंबंधानें बरीच विस्तृत चर्चा केली आहे व ती संपूर्ण
चर्चा येथें विस्तारभयास्तव देतां येत नाहीं. तरी पण त्या चर्चेचा जो
सारांश सभापतिमिश्रांनीं आपल्या टिप्पणींत दिला आहे तो पुढें
लिहिल्याप्रमाणें आहे–'यद्देशावच्छिन्नवायुसंयोगाद् यद्वर्णस्वरूपोपल-
ब्धिस्तद्देशीयत्वमेव तस्य इति नियमः, अत एव अकारादीनां
कण्ठादिदेशावच्छिन्नवायुसंयोगेन स्वरूपोपलब्ध्या तत्तद्देशत्वमेव तेषाम्,
नासिकायास्त्वकारादिषु आनुनासिक्यगुणजनकत्वान्न तत्स्थानत्वम्।
वर्गपञ्चमानान्तु तत्तद्वर्गीयस्थाननासिकोभयावच्छिन्नवायुसंयोगेनैव
स्वरूपोपलब्ध्या उभयस्थानत्वम्।' या वरील सारांशाचा भावार्थ
हा आहे कीं, मुखांतील ज्या स्थानांचे ठिकाणीं वायूचा आघात

होऊन ज्या वर्णांची उत्पत्ति होते तें त्या वर्णांचें स्थान होय असा नियम आहे. त्यामुळें कण्ठादि स्थानांचे ठिकाणीं वायूचा आघात होऊन अकारादिवर्णांची उत्पत्ति व अभिव्यक्ति होत असल्यामुळें तीं तीं स्थानेंच त्या त्या अकारादिवर्णांचीं ठरतात. नासिका हें त्यांचें स्थान नव्हें; कारण नासिकेचा उपयोग केल्यानें त्या अकारादि वर्णांचे ठिकाणीं आनुनासिक्यरूप गुण उत्पन्न होतो. वर्गांतील पञ्चम वर्णांचे उच्चारण करतेवेळीं ज्या वर्गाचीं तीं व्यञ्जनें आहेत व त्या वर्गाचें जें स्थान आहे त्या स्थानाचे ठिकाणीं व तसेंच नासिकेचे ठिकाणीं वायूचा आघात होऊन वर्गांतील पञ्चम वर्णांची उत्पत्ति व अभिव्यक्ति होत असल्यामुळें, नासिका व तत्तद्वर्गीय स्थान हीं दोन्ही त्यांचीं उच्चारणस्थानें होतात.) 'एदैतोः कण्ठतालु, ओदौतोः कण्ठोष्ठम्' असें जें कौमुदींत म्हटलें आहे तें शिक्षादि ग्रन्थांत जें म्हटलें आहे त्याचा केवळ अनुवाद करणारें वचन असल्यामुळें, म्हणजे पाणिनीय शिक्षेंत 'एऐ तु कण्ठतालव्या ओऔ कण्ठोष्ठजौ स्मृतौ' असें म्हटलें असून त्या ग्रन्थांत 'ए ऐ ओ औ' हे वर्ण तपर करून पठित केले नाहींत आणि दीक्षितांचें वचन शिक्षेंत दिलेल्या वरील श्लोकाचें केवळ अनुवादक असल्यामुळें, या ठिकाणीं 'तपरस्तत्कालस्य' सू. १५ या सूत्राची प्रवृत्ति होत नाहीं (व त्यामुळें 'ए ऐ ओ औ' या वर्णांनीं जसें त्या दीर्घ अचांचें ग्रहण होतें तसेंच त्या प्लुत अचांचें देखील ग्रहण होतें) असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.

मनोरमा– "पूर्वत्रासिद्धम्"। यद्ययं स्वतन्त्रो विधिः स्यात्, तर्हि 'त्रिपादी पूर्वं प्रत्यसिद्धा' इत्येव लभ्येत, त्रैपादिकं तु पूर्वं प्रति परं नासिद्धं स्यादत आह–अधिकारोऽयमिति। यद्यत्र कार्यासिद्धत्वमिष्येत तर्हि पूर्वत्रासिद्धमिति 'मनोरथः' इत्यादावुत्वं न स्यात्, परत्वाद् "रो रि" इत्यस्य प्रसङ्गात्। तथा च "पूर्वत्रासिद्धे नास्ति विप्रतिषेधोऽभावादुत्तरस्य" इति सिद्धान्तो व्याकुप्येत। अमू, अमी, इत्यादि च न सिध्येदत आह–त्रिपादीति, परं शास्त्रमिति च। एतेन त्रिपाद्यां विहितं कार्यमसिद्धमित्यादिः प्राचां ग्रन्थः परास्तः।

'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ हें सूत्र (अधिकारसूत्र न मानतां) केवळ स्वतंत्र विधिसूत्र मानलें तर, त्या सूत्राचा एवढाच अर्थ होईल कीं, सपादसप्ताध्यायीच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध आहे व त्यामुळें त्रिपादींतील पूर्व सूत्रांच्या दृष्टीनें उत्तर सूत्रें असिद्ध ठरणार नाहींत. (ही आपत्ति टळावी म्हणून, प्रकृत सूत्रावरील कौमुदींत) 'अधिकारोऽयम्,' म्हणजे हें अधिकारसूत्र आहे, असें म्हटलें आहे (व हें अधिकारसूत्र मानल्यानें, त्रिपादींतील पुढील प्रत्येक सूत्राशीं हें सूत्र अन्वित होतें व त्यामुळें त्रिपादींतील पूर्व पूर्व सूत्राच्या दृष्टीनें उत्तरोत्तर सूत्र असिद्ध ठरतें. येथें हें लक्षांत ठेवावें कीं, वर जें दीक्षितांनीं म्हटलें आहे तें 'पूर्वत्रासिद्धम्' हें विधिसूत्र आहे या पक्षाचें खण्डन करण्याकरितां म्हटलें नसून, हें सूत्र अधिकारसूत्र आहे हा पक्ष स्थापित करण्याच्या हेतूनें त्यांनीं तसें म्हटलें आहे. प्रकृत सूत्र अधिकारसूत्र मानल्यानें विधिसूत्राचें प्रयोजन व अधिकारसूत्राचें प्रयोजन हीं दोन्ही प्रयोजनें सिद्ध होतात. पण तें विधिसूत्र मानल्यास, अधिकारसूत्राचें प्रयोजन सिद्ध होऊं शकत नाहीं. म्हणून तें अधिकारसूत्र मानणें आवश्यक आहे. भाष्यकारांनीं हेंच म्हटलें आहे व तें भाष्य शब्दरत्नांत देण्यांत येईल. आतां दीक्षित कार्यासिद्धत्वपक्ष मानणें उचित नसून, शास्त्रासिद्धत्वपक्ष मानणेंच योग्य आहे हें सिद्ध करण्याच्या हेतूनें पुढील पंक्ति लिहितात.) जर प्रकृत सूत्र कार्याच्या असिद्धत्वाचें प्रतिपादक सूत्र आहे, (व शास्त्राच्या असिद्धत्वाचें प्रतिपादक सूत्र नाहीं) असें मानलें तर, या सूत्रान्वयें 'मनोरथः' या स्थलीं उत्व होणार नाहीं; कारण 'रो रि' सू. १७३ हें परसूत्र असल्यामुळें, तें परसूत्र प्रथम प्रवृत्त होण्याचा प्रसंग येईल. तसेंच 'पूर्वत्रासिद्धे नास्ति विप्रतिषेधोऽभावादुत्तरस्य,' म्हणजे सपादसप्ताध्यायीच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध असल्यामुळें व त्रिपादींतील पूर्व पूर्व सूत्रांच्या दृष्टीनें उत्तर सूत्रें असिद्ध असल्यामुळें आणि म्हणून तीं असिद्ध सूत्रें विद्यमानच नाहींत असें मानावें लागत असल्यामुळें 'पूर्वत्रासिद्धम्' हें सूत्र जेथें लागू

पडतें तेथें 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें सूत्र लागू पडत नाहीं, असा जो सिद्धान्त आहे त्याशीं (शास्त्रासिद्धत्वपक्ष न मानतां कार्यासिद्धत्वपक्ष मानल्यास) विरोध येईल आणि 'अमू, अमी' इत्यादि रूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत. (या पंक्तीचें विवरण शब्दरत्नांत केलें जाईल.) म्हणून 'सपादसप्ताध्यायीं प्रति त्रिपाद्यसिद्धा । त्रिपाद्यामपि पूर्वं प्रति परं शास्त्रमसिद्धं स्यात्' असें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे. त्यामुळें 'त्रिपाद्यां विहितं कार्यमसिद्धम्' इत्यादि जें प्राचीन वैयाकरणांच्या ग्रन्थांत म्हटलें आहे तें चूक ठरतें. (प्रक्रियाकौमुदीकारांनीं प्रकृत सूत्राचें 'सपादसप्ताध्याय्यां विहितं कार्यं प्रतीह त्रिपाद्यां विहितमसिद्धं ज्ञेयम् । इतः परमप्युत्तरोत्तरं कार्यं पूर्वं पूर्वं कार्यं प्रत्यसिद्धं ज्ञेयम् ।' असें व्याख्यान केलें आहे व त्यांचे टीकाकार प्रसादकार व प्रकाशकार यांनींहि त्याच मताचें समर्थन केलें आहे आणि दीक्षितांचा या मतावर कटाक्ष असून ते असें म्हणतात कीं, प्रक्रियाकौमुदीकार व त्यांचे टीकाकार यांनीं जो कार्यासिद्धत्वपक्ष मानला आहे तो पक्ष भाष्यविरुद्ध असून शास्त्रासिद्धत्वपक्ष हाच सिद्धान्त पक्ष आहे व या पक्षाचें शब्दरत्नांत समर्थन करण्यांत येईल.)

शब्दरत्न– नाऽसिद्धं स्यादिति । ततश्च 'गोधुङ्मान्' इत्यादौ घत्वजश्त्वानुनासिकेषु भष्भावो न स्यात् । न चातिदेशान्तरवदस्यापि त्रिपाद्यां प्रवृत्तौ न दोषः, सपादसप्ताध्याय्यामपि पूर्वं प्रति परासिद्धत्वापत्तेः । मध्ये पाठस्य, विप्रतिषेधसूत्रस्य च सामर्थ्याश्रयणे तु विनिग मनाविरहात् त्रिपाद्यामप्यप्रवृत्त्यापत्तिरिति भावः । रो रीत्यस्य प्रसङ्गादिति । सिद्धेऽसिद्धत्वारोपात् सूत्रोदाहरणसंपत्त्यै परत्वाल्लक्ष्ये कार्यप्रवृत्तेरावश्यकतया परत्वात् त्रैपादिके कार्ये जाते तत्राभावप्रतियोगित्वारोपेऽपि 'देवदत्तहन्तृहत' न्यायेन स्थानिभूतरोरभावात् "हशि च" इत्यस्याप्राप्तिरिति भावः । स्पष्टं चेदं प्रकृतसूत्रे "अचः परस्मिन्" इत्यत्र, "षत्वतुकोः" इत्यत्र च भाष्ये ।

तथा चेति । शास्त्रस्य, तद्बोध्यकार्यस्य च शास्त्रजज्ञानवेलायामसिद्धत्वाभावे "रो रि" इत्यादेः प्रसङ्गे चेत्यर्थः । व्याकुप्येतेति ।

त्वया विप्रतिषेधशास्त्रप्रवृत्तौ निमित्तस्य त्रैपादिकस्य शास्त्रजबोधविषयकार्यस्य, शास्त्रस्य वाऽसिद्धता वक्तुमशक्या, किन्तु लक्ष्ये जातस्य तस्य प्रवर्तमानसपादसप्ताध्यायीस्थकार्यदृष्टयाऽसिद्धत्वं वाच्यम्। एवं च विप्रतिषेधाभावोपपादकहेतोरसिद्धिरिति भावः न च ममापि पूर्वपरपदयोः पूर्वपरशास्त्रजन्यबोधविषयकार्यलक्षणया शास्त्रे एव कार्यासिद्धत्वमिति वाच्यम्, लक्षणायां मानाभावात्, फलाभावात्, गौरवाच्च।

('पूर्वत्रासिद्धम्' हें अधिकारसूत्र न मानतां स्वतंत्र विधिसूत्र मानलें तर, त्रिपादींतील पूर्व पूर्व सूत्रांच्या दृष्टीनें उत्तरोत्तर सूत्रें असिद्ध ठरणार नाहींत व) त्यामुळें 'गोधुङ्मान्' इत्यादि स्थलीं घत्व, जश्त्व व अनुनासिक प्रथम केल्यास, भष्भाव होणार नाहीं. ('गोदुह् + मतुप्' या स्थलीं 'दादेर्धातोर्घः' सू. ३२५, 'एकाचो बशो भष्' सू. ३२६, 'झलां जशोऽन्ते' सू. ८४, व 'यरोऽनुनासिकेऽनुनासिको वा' सू. ११६ हीं सूत्रें प्रवृत्त केल्यानें 'गोधुङ्मान्' हें रूप सिद्ध होतें. हीं सर्व सूत्रें त्रिपादींत पठित आहेत व त्यांचा पूर्वपरक्रम वर दिल्याप्रमाणें आहे. जर त्रिपादींतील पूर्व सूत्राच्या दृष्टीनें पर सूत्र असिद्ध न मानलें तर, 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ या वचनान्वयें उत्तर सूत्र प्रथम प्रवृत्त झालें पाहिजे. पण जोपर्यंत 'दुह्' यांतील हकाराचे जागीं घकार केला जात नाहीं तोपर्यंत वरील चार सूत्रांपैकीं 'यरोऽनुनासिके' या सर्वांत पलीकडे असलेल्या त्रैपादिक सूत्राची प्राप्तीच होऊं शकत नाहीं; कारण 'दुह्' यांतील अन्त्य हकार हा यर् नाहीं म्हणून 'दादेर्धातोर्घः' या प्रथम सूत्रानें हकाराचा पहिले घकार करणें आवश्यक आहे. घकार केल्यावर 'गोदुघ + मतुप्' अशी स्थिति झाली असतां, 'एकाचो बशो भष्, झलां जशोऽन्ते, यरोऽनुनासिके' या तीन सूत्रांची प्राप्ति आहे. या तीन सूत्रांपैकीं 'यरोऽनुनासिके' हें सर्वांत पुढील सूत्र 'विप्रतिषेधे परं कार्यम्' या वचनान्वयें प्रथम प्रवृत्त केल्यास, घकार

या 'यर्' पुढें मकार हा अनुनासिक वर्ण येत असल्यामुळें, घकाराचे जागीं अनुनासिक ङकार होऊन 'गोदुङ + मतुप्' अशी 'प्रत्यये भाषायां नित्यम्'–सू. ११६ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें स्थिति झाल्यावर 'एकाचो बशो भष्' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकणार नाहीं; कारण 'दुङ' हा एकाच् झषन्त नाहीं. म्हणून 'गोधुङमान्' हें इष्ट रूप सिद्ध होण्याकरितां 'दादेर्धातोर्घः' हें सूत्र प्रथम प्रवृत्त केल्यावर 'एकाचो बशो भष्' हें सूत्र प्रवृत्त करणें आवश्यक आहे, व तें सूत्र प्रवृत्त करून भष्भाव–धुघ्–व नंतर धुग् असें जश्त्व केल्यावर 'यरोऽनुनासिके' या सूत्राची प्रवृत्ति केल्यानें 'गोधुङमान्' हें इष्ट रूप सिद्ध होऊं शकतें. सारांश त्रिपादींतील पूर्व पूर्व सूत्राच्या-शास्त्राच्या-दृष्टीनें उत्तरोत्तर सूत्र–शास्त्र–असिद्ध मानलें तरच, पूर्व पूर्व सूत्र प्रथम प्रवृत्त केल्यानें, वर सांगितल्याप्रमाणें, वरील रूप सिद्ध होऊं शकतें. म्हणून 'पूर्वत्रासिद्धम्' हें स्वतंत्र विधिसूत्र न मानतां अधिकारसूत्रच मानलें पाहिजे. या सूत्रावरील भाष्यांत–८–२–१–भाष्यकार म्हणतात–'पूर्वत्रासिद्धमित्यधिकारोऽयं द्रष्टव्यः। किं प्रयोजनम् ?...परः परो योगः पूर्वं पूर्वं योगं प्रत्यसिद्धो यथा स्यात्।...अनधिकारे हि सति समुदायस्य समुदायेऽसिद्धत्वं विज्ञायेत। तत्र को दोषः। तत्राऽयथेष्टप्रसङ्गः। तत्राऽयथेष्टं प्रसज्येत। गोधुङमान् गुडलिण्मानिति,–घत्वढत्वयोः कृतयोर्झय इति वत्वं प्रसज्येत।' या भाष्याचा असा अर्थ आहे कीं, 'पूर्वत्रासिद्धम्' हें अधिकारसूत्र न मानतां स्वतंत्र विधिसूत्र मानल्यास, सपादसप्ताध्यायीरूप समुदायाच्या दृष्टीनें त्रिपादीरूप समुदाय असिद्ध ठरेल, पण त्रिपादींतील पूर्व पूर्व सूत्रांच्या दृष्टीनें उत्तरोत्तर सूत्रें असिद्ध ठरणार नाहींत व त्यामुळें 'गोधुङमान् गुडलिण्मान्' हीं इष्ट रूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत आणि या वरील दोन उदाहरणांत त्रैपादिक उत्तर सूत्रांनीं घत्व, ढत्व प्रथम केल्यास, 'झयः' सू. १८९८ या त्रैपादिक पूर्व सूत्रानें मतुप् प्रत्ययांतील मकाराचे जागीं वकार

होण्याची आपत्ति येईल. भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय हा
आहे कीं, ‘दुह्’ या दकारादि धातूंतील अन्त्य हकाराचें ‘दादेर्धा-
तोर्घः’ सू. ३२५ या त्रैपादिक उत्तर सूत्रानें प्रथम घत्व केल्यास
व तसेंच ‘लिह्’ यांतील अन्त्य हकाराचें ‘हो ढः’ सू. ३२४ या
उत्तर त्रैपादिक सूत्रानें प्रथम ढत्व केल्यास, ‘गोदुध्, गुडलिढ्’
यांतील अन्त्य ‘घ्, ढ्’ या झय्प्रत्याहारान्तर्गत वर्णांपूढें ‘मतुप्’
प्रत्यय येत असल्यामुळें, ‘झयः’ या पूर्व त्रैपादिक सूत्राची नंतर
प्रवृत्ति केल्यानें, त्या ‘मतुप्’ प्रत्ययांतील मकाराचे जागीं वकार
होण्याची आपत्ति येईल व वर दिलेलीं इष्ट रूपें सिद्ध होऊं शकणार
नाहींत. परंतु ‘पूर्वत्रासिद्धम्’ हें अधिकारसूत्र मानलें असतां, पूर्व
पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें उत्तरोत्तर त्रैपादिक सूत्र असिद्ध ठरत
असल्यामुळें आणि ‘गोदुह्, गोलिह्’ अशा स्थितींत त्या पदांच्या
अन्तीं जो हकार आहे तो झय् नसल्यामुळें, ‘झयः’ या सूत्राची
प्रवृत्ति होत नसून, उत्तर त्रैपादिक सूत्रांनीं घत्व, ढत्व केल्यावर तें
घत्व, ढत्व ‘झयः’ या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत
असल्यामुळें व हकारच विद्यमान आहे असें मानावें लागत असल्या-
मुळें, तें पूर्व त्रैपादिक सूत्र प्रवृत्त होत नाहीं व ‘मतुप्’ प्रत्ययांतील
मकाराचें वत्व न होतां वर दिलेलीं दोन इष्ट रूपें सिद्ध होतात. या
भाष्याला धरूनच शब्दरत्नांतील वरील पंक्ति लिहिली आहे हें
लक्षांत ठेवावें.) इतर अतिदेशविधायक शास्त्रांप्रमाणें ‘पूर्वत्रासिद्धम्’
हें सूत्र देखील त्रिपादींत प्रवृत्त केल्यास कांहीं दोष येत नाहीं असें कोणी
म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण सपाद सप्ताध्यायीमध्यें
देखील पूर्वसूत्राच्या दृष्टीनें परसूत्र असिद्ध ठरण्याची आपत्ति येईल.
(शंकाकाराची शंका अशी आहे कीं, जरी ‘पूर्वत्रासिद्धम्’ हें सूत्र
स्वतन्त्र विधिसूत्र मानतां येत नसलें तरी ‘स्थानिवदादेशः’ सू ४९
‘अन्तादिवच्च’ सू. ७५ इत्यादि अतिदेशविधायक सूत्रांप्रमाणें तें
देखील अतिदेशविधायकसूत्र मानावें. हें खरें कीं, त्या सूत्रांत

अतिदेशदर्शक 'वति' प्रत्यय लावून 'पूर्वत्रासिद्धवत्' असें सूत्र न करितां, 'पूर्वत्रासिद्धम्' असें सूत्र केलें आहे. तरी पण 'विनापि वतिम् वत्यर्थो गम्यते' व 'अन्तरेणापि वतिमतिदेशो गम्यते' असें भाष्यांत ठिकठिकाणीं म्हटलें असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'असिद्धम्' या पदाचा 'असिद्धवत्' असा अर्थ करून तें सूत्र अतिदेशविधायकसूत्र मानतां येतें व तें तसें मानल्यास, ज्याप्रमाणें इतर अतिदेशविधायक-सूत्रें संपूर्ण अष्टाध्यायींत प्रवृत्त होत असतात त्याचप्रमाणें प्रकृत सूत्र देखील त्रिपादींत प्रवृत होऊं शकेल व त्यामुळें त्रिपादींतील पूर्व-सूत्राच्या दृष्टीनें परसूत्र असिद्ध ठरण्यांत काहीं अडचण येणार नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, प्रकृत सूत्र अतिदेशविधायक सूत्र मानल्यास व इतर अतिदेशविधायक सूत्राप्रमाणें प्रकृत सूत्र अष्टाध्यायींत सर्वत्र प्रवृत केल्यास, तें सपादसप्ताध्यायींत देखील प्रवृत्त होईल व त्यामुळें सपादसप्ताध्यायीं-तील देखील पूर्वसूत्राच्या दृष्टीनें परसूत्र असिद्ध ठरण्याची आपत्ति येईल व 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ हें सूत्र व्यर्थ ठरेल. म्हणून प्रकृत सूत्र अतिदेशविधायक सूत्र मानणें अयोग्य आहे. आतां शंकाकार असें म्हणतो कीं, प्रकृत सूत्र अतिदेशविधायक सूत्र मानल्यानें जर वर दाखविलेला दोष उद्भवतो तर त्याला परिभाषा मानावी व तें सूत्र परिभाषा मानल्यास, 'कार्यकालं संज्ञापरिभाषम्' प. ३ या परिभाषान्वयें तें कार्यकालपक्षांत त्रिपादींतील प्रत्येक सूत्राजवळ, त्या सूत्रानें कार्य करतेवेळीं, उपस्थित होऊन व त्याशीं अन्वित होऊन 'पूर्वं प्रति परमसिद्धम्' अशी व्यवस्था सहज सिद्ध होऊं शकेल. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, प्रकृत सूत्र, अष्टाध्यायीच्या प्रथमाध्यायांत जेथें परिभाषा पठित केल्या आहेत तेथें पठित न करितां, मुद्दाम सपादसप्ताध्यायी व त्रिपादी या दोहोंच्या) मध्यें पठित केलें असल्यामुळें, तशा पाठाच्या सामर्थ्याचा व तसेंच 'विप्रतिषेधे परं कार्यम्' या सूत्राच्या सामर्थ्याचा आश्रय

केल्यास या दोन सूत्रांपैकीं अमुकच सूत्र त्रिपादींत लागू पडावें असें म्हणण्यास कोणतेंहि प्रमाण उपलब्ध नसल्यामुळें, प्रकृत सूत्र त्रिपादीमध्यें देखील प्रवृत्त न होण्याची आपत्ति येईल. (प्रकृत सूत्र परिभाषाप्रकरणांत पठित न करितां सपादसप्ताध्यायीच्या नंतर व त्रिपादीच्या लगेंच पूर्वीं–आरंभीं–पठित केलें असल्यामुळें, अशा मध्यें केलेल्या पाठाच्या सामर्थ्यानें त्याला परिभाषा मानतां येत नाहीं. जर तें सूत्र परिभाषारूपानें पठित करावें असा पाणिनीचा हेतु असता तर, त्यानें तें सूत्र जेथें प्रथमाध्यायांत 'षष्ठी स्थानेयोगा, तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' इत्यादि परिभाषा पठित केल्या आहेत तेथें त्या परिभाषाप्रकरणांत पठित केलें असतें. असें असून देखील शंकाकाराच्या म्हणण्याप्रमाणें जर तें सूत्र परिभाषा आहे असें मानलें तर, 'षष्ठी स्थानेयोगा' १·१·४९ या सूत्रावरील भाष्यांत सांगितल्याप्रमाणें तें सूत्र सकलशास्त्रव्यापि होईल, म्हणजे त्या सूत्राची सपादसप्ताध्यायी व त्रिपादी या दोन्ही ठिकाणीं सारखीच प्रवृत्ति होईल. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'अधिकारो नाम त्रिप्रकारः । कश्चिदेकदेशस्थः सर्वं शास्त्रमभिज्वलयति यथा प्रदीपः सुप्रज्वलितः सर्वं वेश्माभिज्वलयति ।' या भाष्याचा अर्थ असा कीं, अधिकार तीन प्रकारचा आहे. पहिला अधिकार–म्हणजेच परिभाषा–अशा प्रकारचा असतो कीं, तो स्वतः एकाच जागीं विद्यमान राहून, ज्याप्रमाणें चांगला पेटविलेला दिवा एकाच ठिकाणीं ठेवलेला असून सर्व घरांत उजेड पाडतो त्याचप्रमाणें, सर्व शास्त्राला प्रकाशित करतो. सारांश परिभाषा ही वरील भाष्यान्वयें सर्वशास्त्रव्यापिनी आहे. म्हणून प्रकृत सूत्राला जर परिभाषा मानलें तर, त्याला स्वतंत्र विधिसूत्र मानतेवेळीं 'सपादसप्ताध्यायीं प्रति त्रिपादी असिद्धा' असा जो त्याचा संकुचित अर्थ केला होता तसा अर्थ न होतां, 'पूर्वं प्रति परमसिद्धम्' असा त्याचा सामान्य अर्थ होईल, व अशा रीतीनें तें सूत्र सकलशास्त्रव्यापि मानल्यानें सपादसप्ताध्यायींत देखील प्रवृत्त झाल्यास, सापादिक

पूर्वशास्त्राच्या दृष्टीनें देखील सापादिक परशास्त्र असिद्ध ठरेल व 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें परिभाषारूप सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ या सूत्राच्या सामर्थ्यामुळें प्रकृत सूत्र सपादसप्ताध्यायींत प्रवृत्त होऊं शकणार नाहीं असें शंकाकाराचें म्हणणें असल्यास, जसें त्या सूत्राच्या सामर्थ्यामुळें प्रकृत सूत्र, शंकाकाराच्या म्हणण्याप्रमाणें, सपादसप्ताध्यायींत प्रवृत्त होऊं शकणार नाहीं तसेंच त्या सूत्राच्या सामर्थ्यानें प्रकृत सूत्र त्रिपादींत देखील प्रवृत्त होऊं शकणार नाहीं; कारण 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें सूत्र देखील परिभाषा असल्यामुळें सकलशास्त्रव्यापि आहे व त्याच्या सकलशास्त्रव्यापित्वामुळें जसें तें सपादसप्ताध्यायींत प्रवृत्त होतें तसें तें त्रिपादींत देखील प्रवृत्त होईल. प्रकृत सूत्र स्वतंत्र विधिसूत्र किंवा अधिकारसूत्र मानलें असतां, त्या सूत्रान्वयें सपादसप्ताध्यायीच्या दृष्टीनें जशी त्रिपादी असिद्ध ठरत होती व त्यामुळें 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें सापादिक परिभाषारूप सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नव्हतें तशी, प्रकृत सूत्र परिभाषा मानल्यानें, सपादसप्ताध्यायीच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध ठरत नसल्यामुळें, 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होण्यास कोणताहि प्रत्यवाय राहणार नाहीं आणि हें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त झाल्यास, जसें त्याच्या सामर्थ्यानें प्रकृत सूत्र सपादसप्ताध्यायींत प्रवृत्त होऊ शकत नाहीं—व हें शंकाकारास देखील कबूल आहे—तसेंच त्या सूत्राच्या सामर्थ्यानें प्रकृत सूत्र त्रिपादींत देखील प्रवृत्त होऊं शकणार नाहीं. सारांश 'विप्रतिषेधे परं कार्यम्' या सूत्रासारखें प्रकृत देखील परिभाषा मानल्यास, या दोन्ही परिभाषा संपूर्ण अष्टाध्यायींत प्रवृत्त होतील व या दोन परिभाषांपैकीं कोणती परिभाषा प्रवृत्त करावी हें जाणण्यास कोणतेंहि गमक नसल्यामुळें, वाटेल तेथें वाटेल ती परिभाषा प्रवृत्त केल्यानें स्वरूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.

प्रकृत सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत 'सकलशास्त्रव्यापित्वनिरासार्थं तु परिभाषात्वं नाश्रितम्' असें कैयटानें म्हटलें आहे व या पंक्तींतील 'परिभाषात्वम्' हें प्रतीक घेऊन त्यावर उद्योतकारानें 'लिङ्ग-विशेषानुपादानाच्चेत्यपि बोध्यम् । शास्त्रत्वस्यैव लिङ्गत्वे तु सपादस-प्ताध्याय्यामपि पूर्वं प्रति पराऽसिद्धत्वापत्तिः । मध्ये पाठसामर्थ्या-श्रयणे तु त्रिपाद्यामपि अप्रवृत्तिः स्यादिति भावः ।' असें म्हटलें आहे आणि याच पंक्तीचा शब्दरत्नांत अनुवाद केला आहे. सारांश प्रकृत सूत्र स्वतंत्र विधिसूत्र किंवा अतिदेशविधायक सूत्र किंवा परिभाषा मानल्यानें वर दाखविलेले दोष उद्भवत असल्यामुळें, तें अधिकारसूत्र मानणेंच योग्य आहे आणि म्हणूनच त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं असें म्हटलें आहे कीं, 'पूर्वत्रासिद्धमित्यधिकारोऽयं द्रष्टव्यः । किं प्रयोजनम् ।...परः परो योगः पूर्वं पूर्वं योगं प्रति असिद्धो यथा स्यात्.' हें भाष्य पूर्वीं दिलेंच आहे व त्याचा अर्थ तेथें सांगितलाच आहे.) 'रो रीत्यस्य प्रसङ्गात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, जें सिद्ध आहे त्याचेच ठिकाणीं असिद्धत्वाचा आरोप करतां येतो, म्हणजे कार्य झाल्या-नंतरच तें कार्य जणूं काय झालेंच नाहीं असा त्या कार्याच्या ठिकाणीं आरोप करणें शक्य आहे. म्हणून 'पूर्वत्रासिद्धम्' या सूत्राची प्रवृत्ति होण्यास उदाहरण मिळावें या करितां लक्ष्याचे ठिकाणीं प्रथम त्रैपादिक परसूत्रानें कार्य करणें आवश्यक आहे. त्रैपादिक परसूत्रानें तें कार्य प्रथम केल्यावर जरी तें कार्य झालें नाहीं असा त्या कार्याचे ठिकाणीं आरोप करतां येतो तरी, ज्या 'रु' संज्ञक स्थानीचे जागीं उकारादेश करणें आहे त्या स्थानीचा ('रो रि' सू. १७३ या त्रैपादिक परसूत्रानें नाश होऊन) अभाव झाला असल्यामुळें, देवदत्तहन्तृहतन्यायान्वयें 'हशि च' सू. १६६ या सूत्राची प्राप्तीच होऊं शकत नाहीं. ('मनस्+रथ' या उदाहरणांत 'मनस्' यांतील अन्त्य सकाराचें 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें रुत्व केल्यावर

'मनरु+रथ' अशी स्थिति झाली असतां, 'हशि च' सू. १६६ या सापादिक सूत्राची व तसेंच 'रो रि' सू. १७३ या त्रैपादिक सूत्राची प्राप्ति होते. कार्यासिद्धत्वपक्षांत सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक शास्त्र असिद्ध ठरत नसल्यामुळें व त्रैपादिक सूत्रानें प्रथम कार्य केल्यावर तें कार्य सापादिक कार्य करतेवेळीं असिद्ध ठरत असल्यामुळें आणि 'हशि च' या सूत्राच्या मानानें 'रो रि' हें परसूत्र असल्यामुळें, त्या पर त्रैपादिक सूत्रानें प्रथम कार्य करून 'मनर्' यांतील अन्त्य रुचा, म्हणजे रकाराचा, लोप केल्यास, 'मन+रथ' अशी स्थिति होईल व हें रुलोपरूप कार्य त्रैपादिक सूत्रानें झालें असल्यामुळें, तें 'हशि च' या सापादिक सूत्रानें होणाऱ्या कार्याच्या दृष्टीनें असिद्ध मानतां येईल, म्हणजे त्या सिद्ध कार्याचे ठिकाणीं असिद्धत्वाचा आरोप करतां येईल. सारांश कार्यासिद्धत्वपक्षांत कार्य झाल्यावरच तें असिद्ध मानतां येतें. कार्य जर केलेंच नाहीं तर त्याच्या अभावीं त्याचे ठिकाणीं असिद्धत्वाचा आरोप कसा करतां येणार, म्हणजे तें कार्य कसें असिद्ध मानतां येणार ? म्हणून त्रैपादिक परसूत्रानें कार्य प्रथम करणें भाग आहे व तें कार्य प्रथम केल्यावर जरी 'पूर्वत्रासिद्धम्' या सूत्रानें तें प्रथम केलेलें कार्य असिद्ध मानतां आलें तरी, तें कार्य केल्यानें 'रु=र्' या स्थानीचे जागीं 'रो रि' या सूत्रानें लोपरूप आदेश होऊन 'रु' हा स्थानी नष्ट झाला असल्यामुळें, 'हशि च' या सापादिक सूत्रानें 'रु' चे जागीं उत्वकार्य करतेवेळीं त्या नष्ट झालेल्या 'रु' स्थानीचा पुन्हा कसा प्रादुर्भाव होऊं शकणार, म्हणजे ज्या 'रु' चा लोपरूप कार्यानें नाश झाला आहे त्या 'रु' चें पुनरुज्जीवन कसें होऊं शकणार ? एखाद्या मनुष्यानें देवदत्ताचा प्राण घेतल्यावर देवदत्ताचा वध करणाऱ्या त्या पुरुषाचा प्राण घेतला तरी त्यामुळें जो देवदत्त एकदां मरून गेला आहे तो पुन्हा जीवन्त होऊं शकत नाहीं. देवदत्ताचा वध करण्यास प्रवृत्त झालेल्या त्या पुरुषाचा त्यानें देवदत्तास मारून टाकण्यापूर्वीं नाश केला तरच देवदत्ताचे प्राण वाचूं शकतात व हाच

देवदत्तहन्तृहतन्याय होय. हा न्याय वरील उदाहरणास लावल्यास, 'रो रि' या त्रैपादिक उत्तरसूत्रानें 'रु=र्' या स्थानीचा लोप प्रथम केल्यास तो नेहमीकरितां नाहींसा होत असल्यामुळें, 'हशि च' या सापादिक सूत्रानें 'रु' चे जागीं उकारादेश करतेवेळीं तो नेहमीकरितां नष्ट झालेला 'रु' विद्यमान आहे असें मानतां येणें शक्य नाहीं व त्यामुळें उत्व होऊं शकणार नाहीं व 'ढ्लोपे पूर्वस्य दीर्घोऽणः' सू. १७४ या सूत्रानें 'मन' यांतील अन्त्य अकार दीर्घ होऊन 'मनारथ' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. सारांश कार्यासिद्धत्वपक्ष मानल्यास, 'मनोरथ' हें इष्ट रूप सिद्ध होऊं शकत नाहीं. शास्त्रासिद्धत्वपक्ष मानला तरच तें रूप सिद्ध होऊं शकतें; कारण त्या पक्षांत 'रो रि' हें त्रैपादिक शास्त्र वरील उदाहरणांत उपस्थित होताक्षणींच 'हशि च' हें सापादिक शास्त्र त्याचा बाध करून त्याला प्रवृत्त होऊं न देतां स्वतःच प्रवृत्त होतें व अशा रीतीनें 'रु' या स्थानीचे प्राण वाचत असल्यामुळें, त्या 'रु' चें उत्व होऊन 'मन+उ+रथ' अशी स्थिति झाली असतां, 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'मनोरथः' या इष्ट रुपाची सिद्धि होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. म्हणून कार्यासिद्धत्वपक्ष न मानतां शास्त्रासिद्धत्वपक्ष मानणेंच योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. हाच पक्ष भाष्यकारांना मान्य आहे हें सिद्ध करण्याकरितां शब्दरत्नकार पुढील पंक्ति लिहितात.) प्रकृत सूत्रावरील भाष्यांत व 'अचः परस्मिन्' १–१–५७ या सूत्रावरील भाष्यांत आणि तसेंच 'षत्वतुकोरसिद्धः' ६–१–८६ या सूत्रावरील भाष्यांत हेंच स्पष्ट केलें आहे, म्हणजे शास्त्रासिद्धत्वपक्षच मानला आहे. (प्रकृत सूत्रावरील भाष्यांत–८–२–१–भाष्यकार म्हणतात- 'अथाऽसिद्धवचनं किमर्थम् ?...पूर्वत्रासिद्धवचनमादेशलक्षणप्रतिषेधार्थमुत्सर्गलक्षणभावार्थं च । आदेशलक्षणप्रतिषेधार्थं तावत्–राजभिः तक्षभिः राजभ्यां तक्षभ्याम् राजसु तक्षसु इति । नलोपे कृतेऽत

इत्यैस्भावादयः प्राप्नुवन्ति। असिद्धत्वान्न भवन्ति। उत्सर्गलक्षण-भावार्थं च–अमुष्मै अमुष्मात् अमुष्य अमुष्मिन्निति। अत्र मुभावेऽत्त इति स्मायादयो न प्राप्नुवन्ति, असिद्धत्वाद्भवन्ति।' या भाष्याचा थोडक्यांत भावार्थ हा आहे कीं, प्रकृत सूत्रांत 'असिद्धम्' हें पद अशाकरितां घातलें आहे कीं, आदेशाच्या निमित्तानें जें कार्य प्राप्त होतें त्याचा निषेध व्हावा, म्हणजे तें होऊं नये, व उत्सर्गाच्या–स्थानीच्या–निमित्तानें जीं कार्यें प्राप्त होतात तीं व्हावींत. या भाष्यावरील कैयटाची टीका अत्यन्त महत्त्वाची आहे व त्या टीकेंत कैयटानें भाष्याचा गूढार्थ स्पष्ट केला आहे. त्या टीकेंत 'किं शास्त्रस्यासिद्धत्वमथ कार्यस्येति प्रश्नः......सिद्धस्यासिद्धत्ववचनादतिदेश आश्रीयते। शास्त्रस्य चाऽसिद्धवद्भाव आश्रीयते, न तु कार्यस्य। अन्यथोत्सर्गलक्षणकार्यं न सिध्येत्...राजभिरिति। नलोपशास्त्रमैसादिषु कर्त्तव्येष्वसिद्धत्वात्स्वकार्यं न प्रदर्शयतीत्यैसाद्यभावः। अमुष्मा इति। अदसो विभक्तौ त्यदाद्यत्वे कृते परत्वान्नित्यत्वाद्वोत्वप्रसङ्गादकारान्तत्वनिबन्धनस्मायाद्यप्रसङ्गः। उत्वशास्त्रस्याऽसिद्धत्वादप्रवर्तनात्पूर्वं स्मायादयः पश्चादुत्वम्।' असें कैयटानें म्हटलें आहे. कैयटाच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, 'अथाऽसिद्धवचनं किमर्थम्' असा जो वरील भाष्यांत भाष्यकारांनीं प्रश्न केला आहे तो अशा हेतूनें केला आहे कीं, प्रकृत सूत्र शास्त्रासिद्धत्वाचें प्रतिपादन करणारें सूत्र आहे किंवा कार्यासिद्धत्वाचें प्रतिपादन करणारें सूत्र आहे व या प्रश्नाचें उत्तर देतांना भाष्यकारांनीं जें म्हटलें आहे त्याचा अर्थ विशद करितांना कैयटानें 'शास्त्रस्य चाऽसिद्धत्वभाव आश्रीयते न तु कार्यस्य' असें स्पष्ट म्हटलें आहे. 'राजन् भिस्, राजन् भ्यस्' इत्यादि स्थलीं 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रानें 'राजन्' या अङ्गाला पदसंज्ञा होत असल्यामुळें, 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या ज्या त्रैपादिक शास्त्रानें 'राजन्' यांतील अन्त्य नकाराचा लोप होतो तें त्रैपादिक शास्त्र 'अतो भिस ऐस्' सू. २०३ व 'बहुवचने झल्येत्'

सू. २०५ या सापादिक शास्त्रांच्या दृष्टीनें प्रकृत सूत्रान्वयें असिद्ध ठरत असल्यामुळें व अशा रीतीनें त्या असिद्ध शास्त्रानें झालेला नकारलोप झालाच नाहीं व 'राज' असें अदन्तअङ्ग नसून 'राजन्' असें नकारान्तच अङ्ग आहे असें मानावें लागत असल्यामुळें, त्या असिद्ध शास्त्रानें झालेल्या नकारलोपकार्याच्या निमित्तानें प्राप्त होणारें ऐस्त्व व एत्व होत नाहीं आणि 'राजैः राजेभ्यः' अशीं अनिष्ट रूपें न होतां 'राजभिः राजभ्यः' अशीं इष्ट रूपें सिद्ध होतात. त्याचप्रमाणें 'अदस् ङे, अदस् ङसि, अदस् ङस्, अदस् ङि' या स्थलीं 'त्यदादीनामः' सू. २६५ या सूत्रानें 'अदस्' यांतील अन्त्य सकाराचे जागीं अकारादेश होऊन व 'अतो गुणे' सू. १९१ या सूत्रानें पररूप एकादेश होऊन जेव्हां त्या सापादिक सूत्रांन्वयें 'अद' असें अदन्त अङ्ग होतें तेव्हां 'सर्वनाम्नः स्मै' सू. २१५, 'ङसिङ्योः स्मात्स्मिनौ' सू. २१६, 'टाङसिङसामिनात्स्याः' सू. २०१ या सापादिक शास्त्रांनीं 'ङे, ङसि, ङस्, ङि' या विभक्तिप्रत्ययांचे जागीं अनुक्रमें 'स्मै, स्मात्, स्य, स्मिन्' या आदेशांची प्राप्ति होते आणि तसेंच 'अदसोऽसेः' सू. ४१९ या उत्तर त्रैपादिक सूत्रानें 'अद' यांतील 'द' चे जागीं मुत्वाची प्राप्ति होते. उत्तर त्रैपादिक सूत्रानें मुत्वकार्य प्रथम केल्यास अङ्गाचें अदन्तत्व नष्ट होऊन उदन्त अङ्ग होत असल्यामुळें, त्या पुढील विभक्तिप्रत्ययांचे जागीं वरील सापादिक सूत्रांनीं होणारे आदेश होऊं शकणार नाहींत व इष्ट रूपें सिद्ध न होण्याची आपत्ति येईल. परंतु वरील सापादिक शास्त्रांच्या दृष्टीनें 'अदसोऽसेः' हें त्रैपादिक शास्त्र प्रकृत सूत्रान्वयें असिद्ध असल्यामुळें, म्हणजे त्या सापादिक शास्त्रांच्या दृष्टीनें 'अदसोऽसेः' या त्रैपादिक शास्त्राचा अभाव असल्यामुळें, तीं सापादिक शास्त्रें प्रथम प्रवृत्त होतात व त्या सापादिक शास्त्रांन्वयें विभक्तिप्रत्ययांचे जागीं आदेश केल्यावर असिद्ध 'अदसोऽसेः' हें त्रैपादिक मुत्वशास्त्र नंतर प्रवृत्त होऊन 'अमुष्मै, अमुष्मात्, अमुष्य,

अमुष्मिन्' या इष्ट रूपांची सिद्धि होते. सारांश वरील भाष्यावरून व कैयटवृत्तीवरून हें स्पष्ट होतें कीं, भाष्यकारांनीं कार्यासिद्धत्वपक्ष मानला नसून शास्त्रासिद्धत्वपक्षच मानला आहे. 'अचः परस्मिन्पूर्वविधौ' व 'षत्वतुकोरसिद्धः' या दोन्ही सूत्रांवरील भाष्यांत देखील भाष्यकारांनीं जसें प्रकृत सूत्रावरील भाष्यांत व्याख्यान केलें आहे तसेंच व्याख्यान केलें आहे. म्हणून त्या दोन सूत्रांवरील भाष्य येथें देण्याची आवश्यकता नाहीं. कार्यासिद्धत्वपक्ष मानल्यास, त्रैपादिक परशास्त्र असिद्ध ठरत नसल्यामुळें आणि त्यामुळें 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ या सूत्राची त्रिपादींत प्रवृत्ति बंद करणें अशक्य असल्यामुळें, तें विप्रतिषेधसूत्र त्रिपादींत प्रवृत्त होईल व त्या सूत्राच्या बलावर पर त्रैपादिक शास्त्र सापादिक शास्त्राला व पूर्व त्रैपादिक शास्त्राला बाधून प्रथम प्रवृत्त होण्याची आणि त्यामुळें अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल. ही आपत्ति टाळण्याकरितां शास्त्रासिद्धत्वपक्षच मानणें आवश्यक आहे. या पक्षांत सापादिक शास्त्राच्या व पूर्व त्रैपादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक पर शास्त्र असिद्ध ठरत असल्यामुळें व अशा रीतीनें हीं दोन पूर्व व पर शास्त्रें तुल्यबल ठरत नसल्याकारणानें त्या दोहोंमध्यें विरोध उत्पन्न होत नसल्यामुळें, 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नाहीं व त्रैपादिक शास्त्र पर असून देखील पूर्व शास्त्राच्या दृष्टीनें असिद्ध असल्यामुळें, तें असिद्ध शास्त्र प्रथम प्रवृत्त न होतां सिद्ध शास्त्र प्रथम प्रवृत्त होऊन व नंतर असिद्ध शास्त्र प्रवृत होऊन शास्त्रासिद्धत्वपक्षांत इष्ट रूपांची सिद्धि होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. म्हणून कार्यसिद्धित्वपक्ष मानल्यानें उत्पन्न होणाऱ्या अनेक आपत्ति टाळण्याकरितां व इष्ट रूपांची सिद्धि होण्याकरितां शास्त्रासिद्धत्वग्क्ष मानणेंच योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'तथा च....इति सिद्धान्तो व्याकुप्येत' या मनोरमेच्या पंक्तींतील 'तथा च' या पदांचा त्रैपादिक

शास्त्र व तसेंच त्या शास्त्रानें ज्ञात होणारें कार्य यांचे ठिकाणीं, त्या त्रैपादिक शास्त्राच्या अर्थाचा बोध होतेवेळीं, असिद्धत्वाचा अभाव मानल्यानें, 'रो रि' इत्यादि त्रैपादिक शास्त्राची प्रवृत्ति होण्याचा प्रसङ्ग आला असतां' असा अर्थ आहे. (सारांश कार्यासिद्धत्वपक्षांत सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक शास्त्र असिद्ध ठरत नसल्यामुळें, तें पर त्रैपादिक शास्त्र प्रथम प्रवृत्त होऊन त्या सूत्रानें होणारें कार्य प्रथम होईल व अनिष्ट रूपें सिद्ध होण्याची आपत्ति येईल.) 'सिद्धान्तो व्याकुप्येत' असें जें वरील मनोरमेच्या पंक्तींत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ हें) विप्रतिषेधशास्त्र प्रवृत्त होण्यास निमित्त होणारें त्रैपादिक परशास्त्र किंवा त्या त्रैपादिक परशास्त्रानें बोधित होणारें कार्य असिद्ध आहे असें तुम्हाला (कार्यासिद्धत्वपक्ष मानणाऱ्या वादीला) म्हणतां येणें शक्य नाहीं; पण तुम्हाला एवढेंच म्हणतां येणें शक्य आहे कीं, एखाद्या उदाहरणांत त्रैपादिक सूत्रानें झालेलें कार्य पुढें प्रवृत्त होऊं पाहणाऱ्या सापादिक शास्त्रानें होणाऱ्या कार्याच्या दृष्टीनें असिद्ध आहे. त्यामुळें 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नाहीं या संबंधानें भाष्यांत (पूर्वत्रासिद्धे नास्ति विप्रतिषेधोऽभावादुत्तरस्य' असा) जो हेतु दिला आहे तो हेतु तुमच्या पक्षांत (कार्यासिद्धत्ववादीच्या पक्षांत) सिद्ध होऊं शकत नाहीं. ('विप्रतिषेधे परं कार्यम्' या सूत्राचा 'द्वयोः शास्त्रयोः तुल्यबलयोः एकस्मिन् लक्ष्ये युगपत् प्राप्तौ सत्यां, परमेव शास्त्र प्रवृत्तिमर्हति' असा अर्थ आहे. या अर्थान्वयें विप्रतिषेधशास्त्र प्रवृत्त होण्यास पर शास्त्र असणें, तें पर शास्त्र तुल्यबल असणें, व त्या परशास्त्राची एकाच लक्ष्याचे ठिकाणीं जेथें पूर्व शास्त्र प्रवृत्त होऊं पाहतें तेथें युगपत् उपस्थिति होणें, हीं निमित्तें आवश्यक आहेत. जर पर शास्त्र विद्यमानच नसलें, किंवा विद्यमान असून तें विद्यमानच नाहीं असा त्याचे ठिकाणीं आरोप होत असला, किंवा पूर्व शास्त्र

नित्य अथवा अन्तरङ्ग अथवा अपवादरूप असल्यामुळें पर शास्त्र बलहीन होतें, तशा ठिकाणीं विप्रतिषेधशास्त्र–सू. १७५–प्रवृत्त होऊं शकत नाहीं. कार्यासिद्धत्वपक्षवादी सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक शास्त्र असिद्ध आहे, म्हणजे विद्यमान नाहीं, किंवा पूर्व पूर्व त्रैपादिक शास्त्राच्या दृष्टीनें उत्तरोत्तर त्रैपादिक शास्त्र असिद्ध आहे, म्हणजे विद्यमान नाहीं, असें मुळींच म्हणत नाहीं. म्हणून त्याच्या पक्षांत सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक शास्त्र विद्यमान आहे व तसेंच पूर्व पूर्व त्रैपादिक शास्त्राच्या दृष्टीनें उत्तरोत्तर त्रैपादिक शास्त्र विद्यमान आहे असेंच मानलें पाहिजे. त्यामुळें एखाद्या उदाहरणांत पूर्व सापादिक शास्त्र व पर त्रैपादिक शास्त्र एकेच वेळीं उपस्थित झाले असतां, सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें पर त्रैपादिक शास्त्र असिद्ध आहे, म्हणजे विद्यमान नाहीं, असें त्याला म्हणतां येणें शक्य नसल्यामुळें, विप्रतिषेधसूत्र–सू. १७५–प्रवृत्त होईल व पर त्रैपादिक सूत्रानें प्रथम कार्य करणें भाग पडेल. तें कार्य प्रथम केल्यावर तसें झालेलें कार्य पूर्व सापादिक सूत्रानें पुढें होणाऱ्या कार्याच्या दृष्टीनें असिद्ध आहे एवढेंच तो म्हणूं शकतो. पण भाष्यकारांनीं तर 'पूर्वत्रासिद्धे नास्ति विप्रतिषेधोऽभावादुत्तरस्य' असें म्हटलें आहे. भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, एखाद्या उदाहरणांत पूर्व सापादिक शास्त्राची व पर त्रैपादिक शास्त्राची किंवा पूर्व व पर त्रैपादिक शास्त्रांची युगपत् प्राप्ति झाल्यास, सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक शास्त्राचा व तसेंच पूर्व त्रैपादिक शास्त्राच्या दृष्टीनें उत्तर त्रैपादिक शास्त्राचा अभाव असल्यामुळें, विप्रतिषेधे परं कार्यम्' हें सूत्र अशा ठिकाणीं प्रवृत्त होऊं शकत नाहीं. सारांश विप्रतिषेधसूत्र प्रवृत्त न होण्यासंबंधानें 'अभावादुत्तरस्य' असा जो भाष्यकारांनीं हेतु दिला आहे तो हेतु कार्यासिद्धत्ववादीच्या पक्षांत सिद्ध होत नाहीं, म्हणजे चूक ठरूं पाहतो; कारण कार्यासिद्धत्वपक्षवादी सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक

शास्त्र व पूर्व पूर्व त्रैपादिक शास्त्राच्या दृष्टीनें उत्तरोत्तर त्रैपादिक शास्त्र असिद्ध आहे, म्हणजे तें विद्यमान नाहीं, असें मुळींच म्हणत नाहीं हें वर सांगितलेंच आहे. म्हणून त्याच्या म्हणण्यात व भाष्य-कारांच्या म्हणण्यांत उघड विरोध येत असल्यामुळें, त्याचें म्हणणें बरोबर मानतां येत नाहीं व त्यामुळें कार्यासिद्धत्वपक्ष न मानतां शास्त्रासिद्धत्वपक्षच मानणें योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां कार्यासिद्धत्वपक्ष मानला असतां त्रिपादींत विप्रतिषेधसूत्र–सू. १७५–प्रवृत्त होण्याची आपत्ति येते, व तें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नाहीं या संबंधानें भाष्यकारांनीं 'अभावादुत्तरस्य' असा जो हेतु दिला आहे तो हेतु सिद्ध होऊं शकत नाहीं असे जे दोन दोष त्या पक्षावर दिले आहेत ते दोष वास्तविक त्या पक्षांत येत नाहींत हें सिद्ध करण्याकरितां कार्यासिद्धत्वपक्षवादी असें म्हणतो कीं,) आमच्या पक्षांत देखील 'पूर्व' या शब्दाचा 'पूर्वशास्त्रबोध्यकार्य' व 'पर' या शब्दाचा 'परशास्त्रबोध्यकार्य' असा लक्षणेनें अर्थ मानल्यानें, परशास्त्रबोध्य कार्याचें ज्ञान होते-वेळींच त्या कार्याचें असिद्धत्व स्पष्ट होतें (व त्यामुळें पर त्रैपादिक-शास्त्रबोध्य कार्याची व्यावृत्ति होते, म्हणजे असिद्ध ठरणारें तें कार्य न होतां, सापादिकसूत्रविहित किंवा पूर्वत्रैपादिकसूत्रविहित कार्यच होतें. कार्यासिद्धत्वपक्षवादीच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'पूर्वत्रा-सिद्धम्' या सूत्रांत आक्षिप्त होणाऱ्या 'पर' या शब्दाचा 'परशास्त्र-बोध्यकार्य' असा लक्षणेनें अर्थ केल्यास आणि त्याचप्रमाणें त्या सूत्रांत उपात्त–गृहीत–असलेल्या 'पूर्व' या शब्दाचा 'पूर्वशास्त्रबोध्य-कार्य' असा लक्षणेनें अर्थ केल्यास, 'पूर्वत्रासिद्धम्' या अधिकारसू-त्राचा 'पूर्वसापादिकशास्त्रबोध्यकार्यं प्रति त्रैपादिकशास्त्रबोध्यकार्यम-सिद्धम्, पूर्वपूर्वत्रैपादिकशास्त्रबोध्यकार्यं प्रति उत्तरोत्तरत्रैपादिकशास्त्र-बोध्यकार्यमसिद्धम्' असा अर्थ होतो. त्यामुळें एखाद्या उदाहरणांत सापादिक व त्रैपादिक शास्त्रांची एकेच वेळीं उपस्थिति झाल्यास,

सापादिकशास्त्रबोध्यकार्याच्या दृष्टीनें त्रैपादिकशास्त्रबोध्यकार्य, वर दिलेल्या अर्थान्वयें, असिद्ध ठरत असल्यामुळें, त्रैपादिकशास्त्रबोध्यकार्याची व्यावृत्ति होऊन, म्हणजे तें कार्य न होतां, सापादिकशास्त्रबोध्यकार्यच प्रथम होतें. त्याचप्रमाणें एखाद्या उदाहरणांत पूर्व व पर त्रैपादिक शास्त्रांची युगपत् प्राप्ति झाल्यास, वरील अर्थान्वयें, पूर्वत्रैपादिकशास्त्रबोध्यकार्याच्या दृष्टीनें परत्रैपादिकशास्त्रबोध्यकार्य असिद्ध ठरत असल्यामुळें, त्या परसूत्रानें पावलेलें कार्य न होतां पूर्व सूत्रानें पावलेलेंच कार्य प्रथम होतें. 'पूर्वत्रासिद्धम्' या सूत्राचा जसा वर अर्थ केला आहे त्या अर्थान्वयें विप्रतिषेधसूत्र–सू. १७५–त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नाहीं, आणि म्हणून कार्यासिद्धत्वपक्षांत विप्रतिषेधसूत्र त्रिपादींत प्रवृत्त होण्याची आपत्ति येते असा जो दोष वर दिला आहे तो दोष मुळींच उद्भवत नाहीं. त्याचप्रमाणें भाष्यवचनांतील 'अभावादुत्तरस्य' या पदांचा 'अभावादुत्तरशास्त्रबोध्यकार्यस्य'–म्हणजे सापादिकशास्त्रबोध्यकार्याच्या दृष्टीनें त्रैपादिकशास्त्रबोध्यकार्याचा अभाव असल्यामुळें व तसेंच पूर्वत्रैपादिकशास्त्रबोध्यकार्याच्या दृष्टीनें परत्रैपादिकशास्त्रबोध्यकार्याचा अभाव असल्यामुळें–असा अर्थ केल्यानें भाष्यकारांनीं विप्रतिषेधसूत्र त्रिपादींत प्रवृत्त न होण्यासंबंधानें जो हेतु दिला आहे तो हेतु कार्यासिद्धत्वपक्षांत देखील सारखाच लागू पडतो. म्हणून कार्यासिद्धत्वपक्ष सदोष व भाष्यविरुद्ध असल्यामुळें स्वीकारार्ह नाहीं हें म्हणणें अयोग्य ठरतें असा कार्यासिद्धत्वपक्षवादीच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं कार्यासिद्धत्वपक्षवादीनें 'पूर्व' व 'पर' या शब्दांचा वर सांगितल्याप्रमाणें जसा लक्षणेनें अर्थ केला आहे तसा) लक्षणेनें अर्थ करण्यास कोणताहि आधार नसल्यामुळें व तसा लाक्षणिक अर्थ केल्यानें कोणतेंहि अधिक फल निष्पन्न होत नसल्यामुळें आणि लक्षणेनें अर्थ करण्यांत गौरव असल्यामुळें, तसा लक्षणेनें अर्थ करून कशा तरी रीतीनें कार्यासिद्धत्वपक्ष स्थापित करणें अयोग्य आहे. ('पूर्व' व 'पर' या

शब्दांचा त्यांच्या अभिधाशक्तीनें बोधित होणारा (पूर्वशास्त्र व परशास्त्र असाअर्थ आहे व त्यामुळें 'पूर्वत्रासिद्धम्' या अधिकारसूत्राचा 'पूर्वशास्त्रं प्रति परशास्त्रमसिद्धम्' असाच अर्थ होतो. तसा अर्थ केल्यानें सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक शास्त्र असिद्ध ठरतें व पूर्व-त्रैपादिकंशास्त्राच्या दृष्टीनें परत्रैपादिकशास्त्र असिद्ध ठरतें. त्यामुळें एखाद्या उदाहरणांत सापादिक व त्रैपादिक शास्त्रांची किंवा पूर्व व पर त्रैपादिकशास्त्रांची युगपत् प्राप्ति झाल्यास, पूर्व शास्त्राच्या दृष्टीनें पर शास्त्र असिद्ध–विद्यमानच नाहीं असें–ठरून पूर्व शास्त्रच प्रवृत्त होतें व त्या योगानें सर्व इष्ट रूपांची सिद्धि होते. सारांश 'पूर्व' व 'पर' या शब्दांचा जो अभिधाशक्तिवाच्य अर्थ आहे तो मानल्यानें सर्व इष्ट रूपें सिद्ध होऊं शकत असल्यामुळें, त्या शब्दांचा पूर्वशास्त्र-बोध्यकार्य व परशास्त्रबोध्यकार्य असा लक्षणेनें अर्थ करण्याची गरज काय ? भाष्यकारांदिकांनीं त्या शब्दांचा तसा लक्षणेनें अर्थ केला नसल्यामुळें, तसा अर्थ करण्यास कोणतेंहि प्रमाण नाहीं. अभिधा-शक्तिवाच्य अर्थ मानल्यानें सर्व इष्ट रूपें सिद्ध न होतां, लक्षणेनें अर्थ केल्यानेंच सर्व इष्ट रूपें सिद्ध होऊं शकत असतीं तर, अगतिक-गतिन्यायानें लक्षणा करणें योग्य झालें असतें. पण वर सांगितल्या-प्रमाणें तशी वस्तुस्थिति प्रकृत स्थलीं नाहीं. तसेंच लक्षणा करण्यांत गौरवरूप दोष मानला आहे. म्हणून अभिधाशक्तिवाच्य अर्थ मानल्यानेंच सर्व काम भागत असल्यामुळें, 'पूर्व' व 'पर' या शब्दांचा लक्षणेनें अर्थ करून कसा तरी कार्यासिद्धत्वपक्ष स्थापित करण्याचा अट्टाहास करणें अनुचित आहे. सारांश कार्यासिद्धत्वपक्ष न मानतां, शास्त्रासिद्धत्वपक्ष मानणेंच योग्य आहे असा शब्दरत्न-कारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न–ननु मनोरथे दर्शनाभावरूपे लोपेऽभावारोपस्य दर्शनारोपरूपत्वेन न दोषः, अभावाभावस्य प्रतियोगिरूपत्वादित्यत 'अद अ औ' 'अद अ अस्' इत्यवस्थायां आहअमू इत्यादि ।

जातस्योत्वस्य सपादसप्ताध्यायीस्थकार्यदृष्ट्याऽसिद्धत्वेऽपि पूर्वरीत्याऽकाराभावेन पररूपाद्यनापत्तिः। मुत्वस्यासिद्धत्वनिषेधसामर्थ्यादितद्विषये उक्तन्यायाप्रवृत्तिरिति चेत्? तेन शास्त्रासिद्धत्वमेव ज्ञापयितुं युक्तम्। एवं शीभावात्पूर्वम् "अदसोऽसेः" इति मुत्वे दात्परैकाराभावेन "एत ईत्" इति सूत्रमपि व्यर्थं सदत्रैव ज्ञापकमस्तु। न च "तौ सत्" इत्यादिनिर्देशैर्देवदत्तहन्तृहतन्यायोऽनित्य इति वाच्यम्, 'हते देवदत्ते तद्धन्तरि हतेऽपि नोन्मज्जनम्, हतत्वारोपे तु सुतराम्, हन्तुमुद्यतस्य हनने तूज्जीवनमस्त्येव' इति न्यायशरीरम्, 'तौ' इत्यादौ वृद्धिहन्तुः पूर्वसवर्णदीर्घस्य हननोद्यमसजातीयं प्रसङ्गमात्रम्, न तु हननस्थानीया लक्ष्ये प्रवृत्तिरिति न तत्रास्य न्यायस्य विषय इति तेनास्यानित्यत्वबोधनासम्भवात्। स्पष्टं चेदम् "स्वादिष्वसर्व" इति सूत्र कैयटे। प्रकृते तु निरधिष्ठानारोपासम्भवेन हननसजातीयं प्रयोगे कार्यप्रवर्तनमावश्यकमेवेत्यन्यत्र विस्तरः। परास्त इति। 'विहिनं कार्यम्' इत्यध्याहारे गौरवाच्च। किञ्च, त्रिपादी शास्त्रं तद्धि विधाने करणं न त्वधिकरणम्। त्रिपाद्यां विद्यमानेन शास्त्रेण विहितं कार्यमिति व्याख्याने त्वत्यन्तं क्लिष्टतेत्यपि बोद्धव्यम्।

'मनोरथः' या उदाहरणांत ('रो रि' सू. १७३ या सूत्रानें झालेल्या 'रु' च्या–रेफाच्या–) अदर्शनरूप लोपाचे ठिकाणीं त्या दर्शनाभावाच्या अभावाचा, म्हणजे दर्शनाचा, आरोप केल्यानें (कार्यासिद्धत्वपक्षांत देखील) 'मनोरथः' हें रूप सिद्ध होण्यांत कांहीं दोष येत नाहीं, कारण अभावाचा अभाव प्रतियोगिरूप भावच असतो, असें कदाचित् कार्यासिद्धत्वपक्षवादीचें म्हणणें असल्यास, दीक्षितांनीं 'अमू, अमी इत्यादि च न सिद्ध्येत' असें मनोरमेच्या पुढील पंक्तींत म्हटलें आहे. ('अदर्शनं लोपः' सू. ५३ या सूत्रान्वयें अदर्शनास लोप असें म्हणतात. 'अदर्शन' या शब्दाचा दर्शनाभाव असा अर्थ आहे. जेथें 'लोप = दर्शनाभाव' शास्त्रदृष्ट्या असिद्ध ठरतो, म्हणजे दर्शनाभाव झालाच नाहीं असें मानावें लागतें, तेथें त्या दर्शनाभावाचे ठिकाणीं

अभावाचा आरोप करणें भाग पडतें. तसा आरोप केल्यानें दर्शनाभावाभाव फलित होतो. 'यस्याभावो विवक्ष्यते स प्रतियोगी' या वचनान्वयें, दर्शनाभावाचें प्रतियोगि दर्शन आहे व त्यामुळें दर्शनाभावाभाव या शब्दाचा प्रतियोगीरूप दर्शन असाच अर्थ होतो. म्हणून 'मनस् + रथ = मनरु + रथ' या उदाहरणांत 'रो रि' सू. १७३ या त्रैपादिक सूत्राची प्रथम प्रवृत्ति केली तरी, त्या त्रैपादिक सूत्रानें 'मनरु' यांतील अन्त्य 'रु = र्' चें ठिकाणीं जें लोपरूप = दर्शनाभावरूप कार्य होतें तें 'हशि च' सू. १६६ या सापादिक शास्त्रानें होणाऱ्या उत्वकार्याच्या दृष्टीनें कार्यासिद्धत्वपक्षांत असिद्ध ठरत असल्यामुळें, 'रु = र्' चा लोप = दर्शनाभाव झालाच नाहीं असें मानलें पाहिजे, म्हणजे रुच्या दर्शनाभावाचे ठिकाणीं अभावाचा आरोप करणें भाग आहे. तसा आरोप करणें म्हणजेच दर्शनाभावाभाव कल्पिणें होय, व तशी बुद्धि केल्यानें ज्या 'रु' च्या दर्शनाचा अभाव झाला आहे तो 'रु' विद्यमानच आहे असें मानावें लागत असल्यामुळें, 'हशि च' हें सापादिक सूत्र नंतर प्रवृत्त होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं, व तें सूत्र प्रवृत्त होऊन रुचें उत्व झाल्यावर 'मन + उ + रथ' अशी स्थिति झाली असतां, 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें 'अ + उ' यांचे जागीं 'ओ' असा गुणरूप एकादेश केल्यानें 'मनोरथः' असें इष्ट रूप कार्यासिद्धत्वपक्षांत देखील सिद्ध होऊं शकतें. म्हणून 'यद्यत्र कार्यासिद्धत्वमिष्येत...रो रि इत्यस्य प्रसङ्गात्' असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे तें अयोग्य ठरतें असा कार्यासिद्धत्वपक्षवादीच्या म्हणण्याचा आशय आहे. ही शंका योग्य मानली तरी, शास्त्रासिद्धत्वपक्ष स्थापित करण्याकरितां 'अमू अमी इत्यादि च न सिद्ध्येत्' ही दुसरी पंक्ति दीक्षितांनीं मनोरमेंत लगेंच पुढें लिहिली आहे. 'अमू, अमी' हीं उदाहरणें अशीं आहेत कीं, यांत त्रैपादिक सूत्र प्रथम प्रवृत्त केल्यास लोपरूप–अभावरूप–कार्य होत नसून, 'द' चें 'अदसोऽसेः' सू. ४१९ या त्रैपादिक सूत्रानें भावरूप मुत्व होतें. त्यामुळें 'मनोरथः' या

उदाहरणांत 'रो रि' या त्रैपादिक सूत्रानें प्रथम केलेलें रुलोपरूप–रेफदर्शनाभावरूप–कार्य, 'हशि च' या सापादिक सूत्रानें उत्वकार्य करतेवेळीं, असिद्ध ठरत होतें व त्यामुळें दर्शनाभावाचे ठिकाणीं अभावाचा आरोप केल्यानें 'रु' विद्यमानच आहे असें ज्याप्रमाणें मानतां येत होतें तसें 'अमू, अमी' या वरील दोन उदाहरणांत मानण्याचा प्रसङ्गच येत नाहीं. म्हणून कार्यासिद्धत्वपक्ष मानल्यानें जरी 'मनोरथः' हें रूप सिद्ध होऊं शकतें असें मानलें तरी, त्या पक्षांत 'अमू, अमी' हीं रूपें सिद्ध होऊं शकत नाहींत आणि म्हणूनच दीक्षितांनीं तीं उदाहरणें मनोरमेंत मुद्दाम पुढें दिलीं आहेत असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे व आतां ते पुढील पंक्तींत तीं रूपें कार्यासिद्धत्वपक्षांत कशीं सिद्ध होऊं शकत नाहींत याचें विवरण करितात.) 'अद+अ+औ' व 'अद+अ+अस्' अशा स्थितींत त्रैपादिक सूत्रानें झालेलें उत्व सापादिक सूत्रानें होणाऱ्या कार्याच्या दृष्टीनें जरी असिद्ध ठरतें तरी, अकाराचा अभाव झाला असल्यामुळें, पूर्वीं सांगितलेल्या रीतीनें, म्हणजे देवदत्तहन्तृहतन्यायान्वयें, पररूप इत्यादि कार्यें न होण्याची आपत्ति येते. ('अदस्+औ' किंवा 'अदस्+जस्' या स्थलीं 'त्यदादीनामः' सू.२६५ या सूत्रानें 'अदस्' यांतील अन्त्य सकाराचे जागीं अकार होऊन 'अद+अ+औ' व 'अद+अ+अस्' अशी स्थिति झाल्यावर 'अदसोऽसेः' या त्रैपादिक सूत्राची व तसेंच 'अतो गुणे' सू. १९१ या सापादिक सूत्राची प्राप्ति होते. त्रैपादिक सूत्र पर असल्यामुळें व कार्यासिद्धत्वपक्षांत तें सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत नसल्यामुळें तें त्रैपादिक सूत्र प्रथम प्रवृत्त केल्यास, 'अद' यांतील दकाराचे जागीं मकार व त्या पुढील अकाराचे जागीं उकार होऊन 'अमु+अ+औ' व 'अमु+अ+अस्' अशी स्थिति झाली असतां, 'अतो गुणे' या सापादिक सूत्रानें होणाऱ्या कार्याच्या दृष्टीनें जरी त्रैपादिक शास्त्रानें झालेलें मुत्वकार्य असिद्ध मानलें तरी, 'अद' यांतील अन्त्य अकाराचे जागीं उकारादेश होऊन अकार नाहींसा झाला असल्यामुळें,पूर्वीं सांगितलेल्या देवदत्तहन्तृहतन्यायान्वयें त्या नष्ट

झालेल्या अकाराचें पुनरुज्जीवन होणें अशक्य आहे, आणि अशा रीतीनें 'अतो गुणे' हें सापादिक सूत्र प्रवृत्त होण्यास ज्या निमित्ताची, म्हणजे पूर्व अकाराची, आवश्यकता आहे तें निमित्त नाहींसें झालें असल्यामुळें, तें सूत्र प्रवृत्त होऊ शकत नाहीं व त्यामुळें पररूप एकादेश होऊं शकत नसल्यामुळें, 'अमू अमी' हीं इष्ट रूपें कार्यासिद्धत्वपक्षांत सिद्ध होऊं शकत नाहींत. पण शास्त्रासिद्धत्वपक्ष मानल्यास, 'अदस् + औ = अद + अ + औ' अशी स्थिति झाली असतां, 'अतो गुणे' व 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सापादिक शास्त्रांच्या दृष्टीनें 'अदसोऽसेः' सू. ४१९ हें त्रैपादिक शास्त्र असिद्ध–म्हणजे विद्यमानच नाहीं असें–ठरत असल्यामुळें, तीं सापादिक शास्त्रें प्रथम प्रवृत्त होऊन व पररूप एकादेश आणि नंतर वृद्धिरूप एकादेश होऊन 'अद + अ + औ = अद + औ = अदौ' अशी स्थिति झाल्यावर 'अदसोऽसेः' हें त्रैपादिक शास्त्र नंतर प्रवृत्त केल्यानें 'अदौ' यांतील दकाराचे जागीं मकार व त्यापुढील 'औ' चे जागीं दीर्घ ऊकार होऊन 'अमू' असें प्रथमेच्या द्विवचनाचें इष्ट रूप सिद्ध होतें. तसेंच 'अदस् + जस् = अद + अ + अस्' अशा स्थितींत 'अतो गुणे,' 'जसः शी' व 'आद्गुणः' या सापादिक शास्त्रांची व तसेंच 'अदसोऽसेः' या त्रैपादिक शास्त्राची प्राप्ति झाली असतां, शास्त्रासिद्धत्वपक्षांत सापादिक शास्त्रांच्या दृष्टीनें त्रैपादिक शास्त्र असिद्ध ठरत असल्यामुळें, तीं सापादिक शास्त्रें प्रथम प्रवृत्त होऊन 'अद + अ + ई = अद + ई = अदे' अशी स्थिति झाल्यावर 'एत ईद्बहुवचने' सू. ४३८ हें त्रैपादिक शास्त्र नंतर प्रवृत्त केल्यानें 'अदे' यांतील दकाराचे जागीं मकार व त्या पुढील एकाराचे जागीं ईकार होऊन 'अमी' असें प्रथमेच्या बहुवचनाचें इष्ट रूप सिद्ध होतें. सारांश कार्यासिद्धत्वपक्ष मानला असतां 'अमू, अमी' हीं इष्ट रूपें सिद्ध होत नसून शास्त्रासिद्धत्वपक्ष मानल्यानेंच तीं रूपें सिद्ध होऊ शकत असल्यामुळें, शास्त्रासिद्धत्वपक्ष मानणेंच योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. यावर कार्यासिद्धत्वपक्ष-

वादीअसें म्हणतो कीं, ज्या देवदत्तहन्तृहतन्यायाचा आधार घेऊन कार्यासिद्धत्वपक्ष अयोग्य ठरविला जातो तो) वरील न्याय, 'न मु ने' सू. ४३९ या सूत्रानें मुत्वाच्या असिद्धत्वाचा निषेध केला असल्यामुळें त्या निषेधक सूत्राच्या आरंभ सामर्थ्यानें, या विषयांत, म्हणजे मुत्वाच्या विषयांत, प्रवृत्त होत नाहीं. ('अदस् + टा = अद + अ + आ' या स्थलीं 'आङो नाऽस्त्रियाम्' सू. २४४ या सूत्रानें 'आ' या तृतीयेच्या एकवचनाच्या प्रत्ययाचे जागीं 'ना' हा आदेश करतेवेळीं मुत्व असिद्ध ठरत नाहीं असें 'न मु ने' या सूत्रांत सांगितलें आहे. घिसंज्ञक शब्द असला तरच त्यापुढील 'टा = आ' या प्रत्ययाचे जागीं 'ना' हा आदेश होऊं शकतो. 'अद + अ + आ' अशा स्थितींत 'अदसोऽसेः' हें पर त्रैपादिक सूत्र प्रथम प्रवृत्त करून 'द' चें मुत्व केल्यास, 'अमु + अ + आ' अशी स्थिति होते व अशा स्थितींत 'अमु' या घिसंज्ञक शब्दाच्या व 'आ' या प्रत्ययाच्या मध्यें अकाराचें व्यवधान राहत असल्यामुळें, 'आङो नाऽस्त्रियाम्' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व अशा रीतीनें 'न मु ने' हें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. तें सूत्र चरितार्थ ठरण्याकरितां, मुत्वाच्या विषयांत देवदत्तहन्तृहतन्याय लागू पडत नाहीं हें मानणें आवश्यक आहे. तसें मानलें म्हणजे, 'अद + अ + आ = अमु + अ + आ' या स्थलीं 'अदसोऽसेः' या त्रैपादिक सूत्रानें प्रथम केलेलें मुत्वकार्य 'अतो गुणे' या सापादिक सूत्रानें होणाऱ्या कार्याच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें, तें मुत्वकार्य झालेंच नाहीं व दकारापुढील अकार विद्यमान आहे असें मानल्यानें, 'अतो गुणे' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकतें व त्या सूत्रानें पररूप एकादेश होऊन 'अद + आ' अशी स्थिति झाल्यावर 'अदसोऽसेः' या सूत्राची पुन्हा प्रवृत्ति करून 'अमु + आ' अशी स्थिति झाली असतां, तें मुत्व, "आ" चे जागीं 'ना' हा आदेश करतेवेळीं 'न मु ने' या सूत्रान्वयें असिद्ध ठरत नसल्यामुळें व अशा रीतीनें 'अमु' हा शब्द 'शेषो घ्यसखि' सू. २४३ या सूत्रान्वयें घिसंज्ञक ठरत असल्यामुळें व त्याच्या लगेंच पुढें 'आ' हा तृतीयेच्या

एकवचनाचा प्रत्यय आला असल्यामुळें, ‘आङो नाऽस्त्रियाम्’ या सापादिक सूत्रानें ‘आ’ चे जागीं ‘ना’ असा आदेश होऊन ‘अमुना’ हें इष्ट रूप सिद्ध होऊं शकतें. पण मुत्वाच्या विषयांत देवदत्तहन्तृहतन्याय लागू पडतो असें मानलें तर, दकारापुढील ज्या अकाराचे जागीं उकारादेश झाला आहे तो अकार नेहमीकरितां नाहींसा झाला आहे व त्याचें पुनरुज्जीवन होणें शक्य नाहीं असें मानावें लागेल व तसें मानल्यास, ‘अतो गुणे’ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकणार नाहीं व पररूप एकादेश होऊं शकणार नाहीं व त्यामुळें ‘अमु’ व ‘आ’ या दोहोंमध्यें अकाराचें व्यवधान राहील, आणि ‘आङो नाऽस्त्रियाम्’ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकणार नाहीं व ‘न मु ने’ हें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. म्हणून मुत्वाच्या विषयांत वरील न्याय लागू पडत नाहीं हें ‘न मु ने’ या निषेधक सूत्राच्या आरम्भसामर्थ्यानेंच सिद्ध होतें असा कार्यासिद्धत्वपक्षवादीच्या म्हणण्याचा आशय आहे. यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, मुत्वाच्या विषयांत वरील न्याय लागू पडत नाहीं याचें ‘न मु ने’ हें सूत्र ज्ञापक आहे असें मानण्यापेक्षां) तें सूत्र शास्त्रासिद्धत्वपक्षाचें ज्ञापक आहे हेंच मानणें अधिक योग्य आहे. म्हणजे असें मानण्यांतच लाघव आहे. (‘अमू, अमुना’ हीं रूपें, मुत्वाच्या विषयांत सार्वत्रिक देवदत्तहन्तृहतन्याय प्रवृत्त होत नाहीं एवढेंच मानल्यानें, कार्यासिद्धत्वपक्षांत सिद्ध होऊं शकत नाहींत. त्या पक्षांत तीं रूपें सिद्ध होण्याकरितां हें मानणें देखील आवश्यक आहे कीं, मुत्वाच्या विषयांत ‘लक्ष्ये लक्षणस्य सकृत् प्रवृत्तिः’ हा सार्वत्रिक न्याय देखील लागू पडत नाहीं. उदाहरणार्थ ‘अदस्+औ=अद+अ+औ’ अशा स्थितींत ‘अदसोऽसेः’ या पर त्रैपादिक सूत्रानें प्रथम मुत्व करून ‘अमु+अ+औ’ अशी स्थिति झाली असतां, पररूप एकादेशाचें निमित्त जो दकारापुढील अकार तो नष्ट झाल्यामुळें तो अकार विद्यमान आहे हें मानण्याकरितां, देवदत्तहन्तृहतन्याय मुत्वाचे विषयांत लागू पडत नाहीं असें मानावें लागतें. तसें मानून

परस्प एकादेश केल्यावर 'अद+औ' अशी स्थिति झाली असतां, पुन्हा 'द'चें मुत्व करावें लागतेंच व 'लक्ष्ये लक्षणस्य सकृत् प्रवृत्तिः' या न्यायाचें उल्लंघन करून 'अदसोऽसेः' हें सूत्र पुन्हा प्रवृत्त करावें लागतें. तें सूत्र प्रवृत्त करून 'अमु+औ' अशी स्थिति झाली असतां, 'प्रथमयोः पूर्व सवर्णः' सू. १६४ या सापादिक शास्त्रानें होणाऱ्या कार्याच्या दृष्टीनें त्रैपादिक मुत्वकार्य असिद्ध असल्यामुळें, पूर्वसवर्णदीर्घकार्य होऊं शकत नाहीं. म्हणून दकारापुढील अकार विद्यमान आहे हें मानण्याकरितां पुन्हा देवदत्तहन्तृहतन्यायाचें उल्लंघन करणें भाग पडतें व 'अद औ' अशी पुन्हा स्थिति करावी लागते; कारण तसें केल्याशिवाय 'वृद्धिरेचि' सू. ७२ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं. तें सूत्र प्रवृत्त करून 'अद+औ=अदौ' अशी स्थिति झाल्यावर पुन्हा 'लक्ष्ये लक्षणस्य सकृत् प्रवृत्तिः' या न्यायाचें उल्लंघन करून 'अदसोऽसेः' हें सूत्र प्रवृत्त करावें लागतें आणि तें सूत्र प्रवृत्त केल्यानें 'अमू' असें रूप कार्यासिद्धत्वपक्षांत अखेरीस सिद्ध होतें. सारांश वरील दोन न्यायांचें पुनः पुन्हा उल्लंघन केलें तरच 'अमू' हें रूप कार्यासिद्धत्वपक्षांत सिद्ध होऊं शकतें हें उघड आहे. कार्यासिद्धत्वपक्ष मानून एवढा सर्व क्लेश व वरील दोन सार्वत्रिक न्यायांचें उल्लंघन सहन करण्यांत गौरव असून त्यापेक्षां शास्त्रासिद्धत्वपक्ष मानण्यांत लाघव आहे; कारण त्या पक्षांत 'अतो गुणे', व 'वृद्धिरेचि' या सापादिक शास्त्रांच्या दृष्टीनें 'अदसोऽसेः' हें त्रैपादिक शास्त्र असिद्ध असल्यामुळें, तें प्रथम प्रवृत्त होऊंच शकत नाहीं व वरील दोन सापादिक शास्त्रें प्रथम प्रवृत्त होऊन 'अदस्+औ = अद+अ+औ = अद+औ = अदौ' अशी स्थिति झाल्यावरच 'अदसोऽसेः' हें त्रैपादिक शास्त्र अखेरीस प्रवृत्त होऊं शकतें व तें प्रवृत्त केल्याने 'अमू' हें इष्ट रूप सिद्ध होतें व अशा रीतीनें तें रूप सिद्ध करण्यांत कोणत्याहि न्यायाचें उल्लंघन होत नाहीं. म्हणून असा सदोष कार्यासिद्धत्वपक्ष स्थापित करण्याकरितां

मुत्वाच्या विषयांत 'देवदत्तहन्तृहत' न्याय प्रवृत्त होत नाहीं याचें 'न मु ने' हें सूत्र ज्ञापक आहे असें मानण्यापेक्षां, तें सूत्र शास्त्रासिद्ध-त्वपक्षाचें ज्ञापक आहे हेंच मानणें अधिक योग्य आहे ; कारण त्या पक्षांत 'अदस्+टा = अद+अ+आ = अद+आ' अशा स्थितींत 'आ' हा तृतीयेच्या एकवचनाचा प्रत्यय 'अद' या अदन्त शद्बापुढें आला असून घिसंज्ञक शद्बापुढें आला नसल्यामुळें, 'आङो नाऽस्त्रियाम्' या सूत्राची प्राप्तीच होत नाहीं व 'आ' या प्रत्ययाचे जागीं 'ना' हा आदेश होऊं शकत नाहीं आणि 'टाङसिङसामिनात्स्याः' सू. २०१ या सूत्रानें त्या प्रत्ययाचे जागीं 'इन' या आदेशाची प्राप्ती होते. पण 'इन' आदेश न होतां 'ना' हा आदेश होणेंच इष्ट आहे व तसा आदेश होण्याकरितां 'आ' या प्रत्ययाचे पूर्वीं घिसंज्ञक शद्ब असणें आवश्यक आहे. तसा घिसंज्ञक शब्द 'आ' या प्रत्ययाच्या लगेंच मागें येण्याकरितां 'अद' यांतील 'द' चें मुत्व करणें आवश्यक आहे. पण त्रैपादिक शास्त्र सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें शास्त्रासिद्ध-त्वपक्षांत असिद्ध ठरत असल्यामुळें, 'टाङसिङसाम्' हें सापादिक शास्त्र प्रवृत्त होण्यापूर्वीं 'अदसोऽसेः' हें त्रैपादिक शास्त्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं. परंतु तें त्रैपादिक शास्त्र प्रथम प्रवृत्त केल्याशिवाय 'अमुना' हें इष्ट रूप सिद्ध होऊं शकत नाहीं. म्हणून तें इष्ट रूप सिद्ध होण्याकरितां 'अदसोऽसेः' हें त्रैपादिक शास्त्र असून देखील प्रथम प्रवृत्त व्हावें व त्या शास्त्रानें होणारें मुत्व 'आङो नाऽस्त्रियाम्' या सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरूं नये या हेतूनें पाणिनीनें 'न मु ने' हें सूत्र मुद्दाम केलें आहे व अशा रीतीनें तें सूत्र शास्त्रासिद्ध-त्वपक्षाचें ज्ञापक ठरतें हें मानणें उचित असून तसेंच मानण्यांत लाघव आहे असा शद्बरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) याचप्रमाणें ('अदस्+जस्' या स्थलीं 'जसः शी' सू. २१४ या सूत्रानें 'जस' चे जागीं) 'शी = ई' असा आदेश करण्यापूर्वीं 'अदसोऽसेः' या सूत्रानें मुत्व प्रथम केल्यास, दकारापुढें एकार येत नसल्यामुळें, 'एत

ईद्बहुवचने' सू. ४३८ हें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. म्हणून तें सूत्र देखील शास्त्रासिद्धत्वपक्षाचेंच ज्ञापक ठरतें असें मानणें योग्य आहे. (अदस्+जस् = अद+अ+अस्' अशा स्थितींत 'जस् = अस्' प्रत्ययाचे जागीं 'जसः शी' या सापादिक सूत्रानें ईकारादेश करण्यापूर्वी 'अद' यांतील 'द' चें 'अदसोऽसेः' या त्रैपादिक पर सूत्रानें प्रथम मुत्व करून 'अमु+अ+अस्' अशी स्थिति झाल्यावर नंतर 'जस्' प्रत्ययाचे जागीं इकारादेश केल्यास आणि 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें 'अ+ई' यांचा 'ए' असा सन्धि केल्यास, 'अमु+ए' अशी स्थिति होईल व या स्थितींत दकारापुढें एकार नसल्यामुळें, 'अदसो दात्परस्य एत ईत्स्यात्' असें विधान करणाऱ्या 'एत ईत्' या सूत्रान्वयें एकाराचे जागीं ईकारादेश होऊं शकणार नाहीं व तें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. ती आपत्ति टाळण्याकरितां शास्त्रासिद्धत्वपक्ष मानणेंच योग्य आहे. तो पक्ष मानल्यास, प्रकृत स्थलीं लागू पडणारीं सर्व सापादिक सूत्रें प्रथम प्रवृत्त करून ' अदस् + जस्=अद + अ + अस्=अद + अस्=अद + ई=अदे' अशी स्थिति झाल्यावर नंतर 'एत ईत्' हें त्रैपादिक शास्त्र प्रवृत्त केल्यास, दकारापुढें एकार येत असल्यामुळें, त्या सूत्रानें दकाराचे जागीं मकार होऊन व एकाराचे जागीं ईकार होऊन 'अमी' असें इष्ट रूप सिद्ध होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं व अशा रीतीनें तें सूत्र शास्त्रासिद्धत्वपक्षाचेंच ज्ञापक मानणें योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'तौ सत्' सू. ३१०६ इत्यादि सूत्रांत 'तौ' असा निर्देश असल्यामुळें 'देवदत्तहन्तृहत' न्याय अनित्य ठरतो असें कार्यासिद्धत्वपक्षवादीचें म्हणणें असल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं. त्या न्यायाचें स्वरूप असें आहे कीं, म्हणजे त्या न्यायाचा वास्तविक अर्थ असा आहे कीं, एखाद्यानें देवदत्ताचा प्राण घेतल्यावर त्या वध करणाऱ्या पुरुषाचा जरी प्राण घेतला तरी देवदत्त पुन्हा जीवंत होऊं शकत नाहीं. त्या वध करणाऱ्या पुरुषाचा

प्राण न घेतां तो मेला आहे असा त्याचे ठिकाणीं केवळ आरोप केल्यास, देवदत्त जीवंत होऊं शकत नाहीं हें तर अगदींच उघड आहे. परंतु तो पुरुष देवदत्ताचा वध करण्यास प्रवृत्त झाला असतां त्या वध करूं पाहणाऱ्या पुरुषाचा वध केला तरच देवदत्ताचे प्राण वाचूं शकतात. 'तौ' इत्यादि स्थलीं 'वृद्धिरेचि' या सूत्राचें हनन करणाऱ्या 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या सूत्राची प्रवृत्ति हनन करण्याच्या उद्योगांत आहे व हनन होण्याची केवळ प्राप्ति आहे अशा प्रकारची असून, लक्ष्याचें हनन केलें आहे अशा प्रकारची नाहीं. म्हणून 'तौ' इत्यादि उदाहरणें या न्यायाचे विषयच नव्हत आणि त्यामुळें तो न्याय अनित्य आहे असें ज्ञापित होऊं शकत नाहीं. ('तद्+औ' या स्थलीं 'त्यदादीनामः' सू. २६५ या सूत्रानें 'तद्' यांतील दकाराचे जागीं अकार होऊन व 'अतो गुणे' सू. १९१ या सूत्रानें पररूप एकादेश होऊन 'तद्+औ=त+अ+औ=त+औ' अशी स्थिति झाली असतां, 'त' यांतील अन्त्य अकारापुढें 'औ' हा एच् असल्यामुळें 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्राची प्राप्ति होते. त्याचप्रमाणें 'त' यांतील 'अ' या 'अक्' पुढें 'औ' हा प्रथमेच्या द्विवचनाचा प्रत्यय असल्यामुळें 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' सू. १६४ या सूत्राची प्राप्ति होते, व तसेंच 'त' यांतील अकारापुढें इच्प्रत्याहारान्तर्गत वर्णानें सुरू होणारा 'औ' हा प्रत्यय असल्यामुळें 'नादिचि' सू. १६५ या पूर्वसवर्णदीर्घनिषेधक सूत्राची प्राप्ति होते. 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' हें परसूत्र 'वृद्धिरेचि' या पूर्व सूत्राचें बाधक असून, 'नादिचि' हें सूत्र 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या सूत्राचें निषेधक सूत्र आहे. 'वृद्धिरेचि' हें सूत्र वरील उदाहरणांत प्रवृत्त होऊं पाहतांच, त्या सूत्राचा वध–बाध–करण्याकरितां 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' हें प्रवृत्त होऊं पाहतें. पण या पर सूत्रानें त्या पूर्व सूत्राचा वध करण्यापूर्वींच 'नादिचि' हें निषेधक सूत्र प्रवृत्त होऊन 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या सूत्राचा वध करतें. त्यामुळें 'वृद्धिरेचि' या

सूत्राचे प्राण वांचतात व तें सूत्र प्रवृत्त होऊन आणि त्या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश होऊन 'त+औ=तौ' असें इष्ट रूप सिद्ध होतें. जर 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या सूत्रानें 'वृद्धिरेचि' या सूत्राचा वध केल्यानंतर 'नादिचि' हें सूत्र प्रवृत्त होऊन त्यानें 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या सूत्राचा वध केला असता आणि त्यानंतर जर 'वृद्धिरेचि' या सूत्राचें पुनरुज्जीवन होऊन तें प्रवृत्त झालें असतें तर देवदत्तहन्तृहतन्याय अनित्य मानतां आला असता. पण वर दिलेल्या प्रक्रियेवरून हें स्पष्ट होतें कीं, 'तौ' या उदाहरणांत तशी वस्तुस्थिति नसून 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या सूत्रानें 'वृद्धिरेचि' या सूत्राचा वध करण्यापूर्वींच 'नादिचि' हें सूत्र त्या वध करूं पाहणाऱ्या सूत्राचा वध करून 'वृद्धिरेचि' या सूत्राचा प्राण वाचवितें व त्यामुळें तें सूत्र प्रवृत्त होतें आणि म्हणून 'तौ' या उदाहरणानें वरील न्याय अनित्य आहे असें मुळींच ज्ञापित होत नाहीं. वास्तविक तें उदाहरण त्या न्यायाचा विषयच नाहीं.) 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. १·४·१७ या सूत्रावरील भाष्याच्या टीकेंत कैयटानें हा विषय स्पष्ट केला आहे. (त्या टीकेंत 'यथा वृक्षावित्यत्र नादिचोति प्रतिषेधारम्भात्तद्विषये पूर्वसवर्णदीर्घस्याऽभावाद् वृद्धिं प्रति बाधकत्वाऽभावाद् वृद्धिः प्रवर्तते, तथेह सुबन्तं पदमिति पदसंज्ञेत्यर्थः।' कैयटानें असें म्हटलें आहे. 'वृक्षौ' व 'तौ' हीं उदाहरणें एकच प्रकारचीं आहेत व या उदाहरणांना देवदत्तहन्तृहतन्याय लागू पडत नाहीं व त्या न्यायाचे तीं उदाहरणें विषय नव्हत हें वर सांगितलेंच आहे. परंतु 'अमू, अमी' इत्यादि उदाहरणें त्या न्यायाचे विषय आहेत हें सिद्ध करण्याकरितां शब्दरत्नकार पुढील पंक्ति लिहितात.) परंतु अधिष्ठानाशिवाय आरोप करणें संभवत नसल्यामुळें, कार्यासिद्धत्वपक्षांत 'अमू, अमी' इत्यादि प्रकृत उदाहरणांत त्रैपादिक सूत्रानें प्रथम कार्य करणें आवश्यक आहे व तें कार्य हनन करणाऱ्या कार्यासारखें आहे. या विषयासंबंधानें इतर ग्रन्थांत–शब्देन्दुशेखरांत–विस्तृत चर्चा केली

आहे. ('पूर्वत्रासिद्धम्' या सूत्रावरील शेखरांत नागेश म्हणतात 'अत्र कार्यासिद्धत्वेऽमू इत्याद्यसिद्धिः। अद अ औ इति स्थिते परत्वान्मुत्वे तस्य सपादसप्ताध्यायीस्थकार्यदृष्ट्याऽसिद्धत्वेऽपि देवदत्त-हन्तृहतन्यायेनाकाराभावेन पररूपाद्यनापत्तिः। अतिदेशस्याऽऽरोप-रूपत्वान्नीरधिष्ठानारोपासम्भवेन कार्यप्रवृत्तेरत्र पक्षे आवश्यकत्वात्।' याच पंक्तीचा शब्दरत्नांत अनुवाद केला आहे व या पंक्तीचा असा भावार्थ आहे कीं, शुक्तिकादि असल्याशिवाय रजताचा आरोप करणें व तसेंच रज्वादि असल्याशिवाय सर्पाचा आरोप करणें संभवत नाहीं. सारांश आरोप करण्याकरितां अधिष्ठानाची आवश्यकता आहे. कार्यासिद्धत्वपक्षांत कार्य प्रथम केल्याखेरीज असिद्धत्वाचा आरोप करतां येत नाहीं. तें कार्य केल्यावरच तें असिद्ध आहे असा त्या कार्याचे ठिकाणीं असिद्धत्वाचा आरोप करतां येणें शक्य आहे. म्हणून 'अद+अ+औ' या स्थलीं कार्यासिद्धत्वपक्षांत प्रथम मुत्वकार्य करणें आवश्यक आहे व तें मुत्वकार्य केल्यानंतरच त्याचे ठिकाणीं असिद्ध-त्वाचा आरोप करतां येणें शक्य आहे; कारण जर प्रथम कार्य केलेंच नाहीं तर असिद्धत्वाचा आरोप कशाचे ठिकाणीं करतां येऊं शकणार? आतां हें मुत्वकार्य असें आहे कीं तें करतेवेळीं दकारापुढील अकाराचे जागीं उकारादेश होऊन अकाराचा नाश होतो. 'स्थानिवदादेशः' १·१·५६ या सूत्रावरील भाष्यांत स्थानी व आदेश यांची व्याख्या सांगतांना भाष्यकारांनीं 'स्थानी हि नाम यो भूत्वा न भवति। 'आदेशो हि नाम योऽभूत्वा भवति,' म्हणजे जो पूर्वी असून मागून नाहींसा होतो त्याला स्थानी म्हणतात व जो पूर्वी नसून मागाहून उत्पन्न होतो त्याला आदेश म्हणतात असें म्हटलें आहे. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, आदेश हा स्थानीचा नाश करतो. म्हणून 'द्' पुढील अकाराचे जागीं उकारादेश केल्यावर अकार नेहमी-करितां नाहींसा होत असल्यामुळें, उत्वाचे ठिकाणीं जरी असिद्ध-त्वाचा आरोप केला तरी, अकाराचें पुनरुज्जीवन होणें शक्य नाहीं व त्यामुळें 'अमू, अमी' इत्यादि उदाहरणांत देवदत्तहन्तृहतन्याय

लागू पडतो, व तो न्याय लावल्यास, पररूप एकादेशाचें निमित्त जो अकार तो नेहमीकरितां नष्ट झाला असल्यामुळें, पररूप एकादेश होऊं शकत नाहीं व त्यामुळें कार्यासिद्धत्वपक्षांत 'अमू, अमी' इत्यादि रूपें सिद्ध होऊं शकत नाहींत. म्हणून तसा दोषयुक्त पक्ष न मानतां शास्त्रासिद्धत्वपक्ष मानणेंच योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) मनोरमेंत जीं कारणें देऊन 'प्राचां ग्रन्थः परास्तः' असें म्हटलें आहे त्या कारणांशिवाय (कार्यासिद्धत्वपक्षाचें खण्डन करण्याकरितां) दुसरें असेंहि कारण देतां येतें कीं, 'विहितं कार्यम्' असा अध्याहार करण्यांत गौरव आहे. ('पूर्वत्रासिद्धम्' या सूत्रांत जेवढे शब्द पठित आहेत तेवढ्यांनींच त्या सूत्राचा अर्थ स्पष्ट होऊन शास्त्रासिद्धत्वपक्ष सिद्ध होतो. पण कार्यासिद्धत्वपक्ष सिद्ध करण्याकरितां 'सपादसप्ताध्याय्यां विहितं कार्यं प्रतीह त्रिपाद्यां विहितमसिद्धं ज्ञेयम्। इतः परमप्युत्तरोत्तरं कार्यं पूर्वं पूर्वं कार्यं प्रत्यसिद्धं ज्ञेयम्।' असा 'विहितं कार्यम्' या पदांचा अध्याहार करून वरील सूत्राचा अर्थ करावा लागतो व तसें करण्यांत गौरव असून 'सपादसत्पाध्यायीं प्रति त्रिपाद्यसिद्धा। त्रिपाद्यामपि पूर्वं प्रति परं शास्त्रमसिद्धम्।' असा कोणत्याहि पदाचा अध्याहार न करितां त्या सूत्राचा जसा कौमुदींत अर्थ केला आहे तसा अर्थ करण्यांतच लाघव आहे व असा स्वाभाविक रीत्या होणारा त्या सूत्राचा अर्थ केल्यानें शास्त्रासिद्धत्वपक्षच सिद्ध होत असल्यामुळें, कार्यासिद्धत्वपक्ष मानणें अयोग्य आहे.) दुसरें असें कीं, त्रिपादी हें शास्त्र आहे व तें विधानाचें 'अधिकरण' नसून 'करण' आहे. म्हणून ('पूर्वत्रासिद्धम्' या सूत्राचा अर्थ करितांना प्रक्रियाकौमुदीकारांनीं त्रिपादी हें अधिकरण मानून वर सांगितल्याप्रमाणें जसा 'त्रिपाद्यां विहितं कार्यम्' असा अर्थ केला आहे तसा अर्थ न करितां त्या सूत्राचा) 'त्रिपाद्यां विद्यमानेन शास्त्रेण विहितं कार्यं सपादसप्ताध्याय्यां विद्यमानेन शास्त्रेण विहितं कार्यं प्रति असिद्धम्' असा अर्थ करावा लागेल व असा अर्थ करण्यांत अत्यन्त क्लिष्टता आहे

हें देखील उघड आहे. (सपादसप्ताध्यायी जसें शास्त्र आहे त्याच-प्रमाणें त्रिपादी देखील जरी असिद्धकाण्ड आहे तरी शास्त्रच आहे. या दोन्ही शास्त्रांतील प्रत्येक सूत्र शास्त्रच आहे; कारण त्या प्रत्येक सूत्रानें कशाचें तरी विधान केलें जातें आणि 'शिष्यते अनेनेति शास्त्रम्' अशी 'सर्वधातुभ्यः ष्ट्रन्' उणादि सू. ५९८ या सूत्रान्वयें 'शास्' धातूहून 'ष्ट्रन्' हा औणादिक प्रत्यय होऊन 'शास्त्र' या शब्दाची व्युत्पत्ति होत असल्यामुळें, तो शब्द प्रत्येक विधायक सूत्राला लागू पडतो. अशा रीतीनें प्रत्येक सूत्रानें कार्यादिकांचें विधान केलें जात असल्यामुळें, प्रत्येक सूत्र–शास्त्र–त्या विधानाचें साधन–करण–ठरतें. उदाहरणार्थ 'इको यणचि' सू. ४७ हें शास्त्र यणादेशाचें विधान करणारें असल्यामुळें, तें त्या कार्याचें करण–साधन–ठरतें. असें असल्यामुळें, 'त्रिपाद्यां विहितं कार्यं प्रति' असा जो अधिकरणरूप अर्थ प्रक्रियाकौमुदीकारांनी केला आहे तसा अर्थ करणें योग्य नसून, 'त्रिपाद्यां विद्यमानेन शास्त्रेण विहितं कार्यं प्रति' असा करणरूप अर्थ वास्तविक केला पाहिजे. पण तसा अर्थ करतेवेळीं किती तरी शब्दांचा अध्याहार करून कार्यासिद्धत्वपक्ष सिद्ध करण्याकरितां प्रकृत सूत्राचा ओढून ताणून अर्थ करावा लागतो व तसा अर्थ करण्यांत अत्यन्त क्लिष्टता असून गौरवरूप दोष येतो. म्हणून अशा रीतीनें, कार्यासिद्धत्वपक्ष स्थापित करण्याकरितां, प्रकृत सूत्राचा क्लिष्टतऱ्हेनें अर्थ करण्यापेक्षां त्या सूत्राचा सहज रीतीनें होणारा अर्थ केल्यानें बोधित होणारा शास्त्रासिद्धत्वपक्ष मानणेंच उचित आहे. येथें हें सांगणें आवश्यक आहे कीं, शास्त्रासिद्धत्वपक्षांत सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक शास्त्र व पूर्व त्रैपादिक शास्त्राच्या दृष्टीनें परत्रैपादिक शास्त्र असिद्ध ठरत असल्यामुळें, या पक्षांत देखील सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें पूर्वीं झालेलें किंवा युगपत् प्राप्त होणारें त्रैपादिक कार्य व तसेंच पूर्व त्रैपादिक शास्त्राच्या दृष्टीनें पूर्वीं झालेलें किंवा युगपत् प्राप्त होणारें पर त्रैपादिक कार्य असिद्ध ठरतेंच. पण या पक्षांत तें स्वतंत्र रीतीनें असिद्ध ठरत नसून

असिद्धशास्त्रद्वारा, म्हणजे शास्त्राच्या असिद्धत्वामुळें, त्याचें असिद्धत्व फलित होतें. या विषयासंबंधानें भैरवीकारांनीं प्रकृत सूत्रावरील शब्दरत्नाची टीका करितांना 'न च शास्त्रासिद्धत्वस्वीकारेऽपि राजभ्याम्, वृक्ष इह, इत्यस्यासिद्धिरेव, शास्त्रस्याऽसिद्धत्वेऽपि कार्यस्य सिद्धतया दीर्घादिः प्रवृत्त्यापत्तेर्दुर्वारत्वादिति वाच्यम्, शास्त्रस्यासिद्धत्व-प्रतिपादनद्वारा कार्यासिद्धत्वस्य प्रतिपादनात् । एवं च यत्र सपादस-त्पाध्यायीस्थशास्त्रस्य त्रैपादिकस्य च युगपत् प्राप्तिस्तत्र परं शास्त्रम-सिद्धम् = अवृत्तमित्यनेन बोधने सति परशास्त्रेण लक्ष्ये कार्यसंस्कार-बुद्धिर्न भवति । यत्र तु न द्वयोर्युगपत् प्राप्तिस्तत्र त्रैपादिके जातेऽपि शास्त्रेऽभावारोपे तन्निष्पाद्यकार्येऽप्रवृत्तत्वज्ञानेन प्रसक्तं सपादसप्ताध्या-योस्थं कार्यं भवत्येव ।' असें म्हटलें आहे.)

मनोरमा–विवृण्वते कण्ठमिति । विवार एषां प्रयत्न इति भावः । वर्गयमगा इति । वर्गगाः, यमगाश्चेत्यर्थः । कादय इति । लोकप्रसिद्धपाठापेक्षमिदम्, चतुर्दशसूत्र्यां मावसानत्वायोगात् । अर्द्ध-विसर्गेति । सादृश्यमुच्चारणे, लेखने च बोध्यम् । ऋॢवर्णयोरिति । आ च आ च रॢौ, तौ च तौ वर्णौ चेति विग्रहः । उश्च उॢ च ऋॢोः, तयोर्वर्णयोरिति वा, प्रथमान्तेन, परिनिष्ठितविभक्त्या वा विग्रह इति सिद्धान्तात् । "ऋत्यकः" इति प्रकृतिभावः ।

('पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या सूत्रावरील कौमुदींत ज्या दोन कारिका पठित केल्या आहेत त्यांतील) 'विवृण्वते कण्ठम्' या पदांचा 'यांचा विवार हा बाह्य यत्न आहे, असा अर्थ आहे. तसेंच त्या कारि-कांतील 'वर्गयमगाः' या पदाचा ('द्वन्द्वान्ते श्रूयमाणं पदं प्रत्येकं सम्बध्यते' या न्यायान्वयें) 'वर्गगाः, यमगाः' असा अर्थ होतो. या सूत्रावरील कौमुदींत 'कादयो मावसानाः स्पर्शाः' असें जें म्हटलें आहे तें लौकिक व्यवहारांत प्रसिद्ध असलेल्या वर्णपाठाला अनुसरून म्हटलें आहे; कारण चतुर्दश शिवसूत्रांत (ककारानें सुरू होणारा व) मकारानें संपणारा स्पर्शवर्णांचा पाठ नाहीं. (शिवसूत्रांत स्पर्शवर्णांचा

पाठ इष्ट प्रत्याहार सिद्ध होण्याकरितां भिन्न क्रमानें केला आहे व
तो ञकारानें सुरु होत असून पकारानें संपतो.) 'अर्धविसर्गसदृशौ
जिव्हामूलीयोपध्मानीयौ,' म्हणजे जिव्हामूलीय व उपध्मानीय अर्ध-
विसर्गासारखे आहेत, असें जें या सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे
त्याचें कारण हें कीं, उच्चारण्यामध्यें व लिहिण्यामध्यें त्यांचें अर्ध-
विसर्गाशीं सादृश्य आहे. (विसर्ग लिहिताना एक वर व दुसरा त्याचे
खालीं अशा दोन वर्तुलांचा उपयोग केला जात असून, जिव्हामूलीय
व उपध्मानीय लिहितांना एक वर व एक खालीं अशा दोन अर्ध
वर्तुलांचा उपयोग केला जात असतो. तसेंच विसर्गाच्या उच्चारणास
जो काल लागतो त्याच्या अर्धाकाल जिव्हामूलीय व उपध्मानीय
यांच्या उच्चारणास लागतो. म्हणून त्यांना 'अर्धविसर्गसदृशौ' असें
म्हणतात. प्रकृत सूत्रावरील कौमुदींत पठित केलेल्या) 'ऋऌवर्णयोः
मिथः सावर्ण्यं वाच्यम्' या वार्तिकांतील 'ऋऌवर्णयोः' यां पदाचा
'आ च आ च रऌौ, तौ च तौ वर्णौ च ऋऌवर्णौ' असा, किंवा 'उश्च
उऌ् च ऋऌोः, तयोर्वर्णयोः' असा विग्रह होतो; कारण प्रथमान्त
पदांचा उपयोग करून विग्रह करावा किंवा समास करून सिद्ध
होणाऱ्या सामासिक शब्दाला ज्या विभक्तीचा प्रत्यय पुढें लावला
जातो त्या विभक्तीचा प्रत्यय सामासिक शब्दांतील दोन पदांना
लावून व तशा दोन विभक्त्यन्त पदांचा उपयोग करून विग्रह करावा
असा सिद्धान्त सांगितला आहे. (वर दिलेल्या वार्तिकांत 'ऋऌवर्णयोः'
अशा षष्ठ्यन्त मामासिक पदाचा उपयोग केला आहे. या पदाचा
दोन तऱ्हेनें विग्रह करतां येतो. 'रऌौ वर्णौ ऋऌवर्णौ' असा विग्रह
करण्याचा एक प्रकार आहे, व लौकिक व्यवहारांत हाच प्रकार
सर्वत्र उपयोगांत आणला जातो. असा विग्रह करतेवेळीं 'रऌौ, वर्णौ'
या दोन प्रथमान्त पदांचा उपयोग करून 'ऋऌवर्णौ' असें जें सामासिक
रूप सिद्ध होतें त्याहून षष्ठीच्या द्विवचनाचा प्रत्यय करून
'ऋऌवर्णयोः' असें रूप सिद्ध केलें जातें. विग्रह करण्याची दुसरी
अशी देखील तऱ्हा आहे कीं, 'ऋऌवर्णयोः' हा षष्ठ्यन्त शब्द

असल्यामुळें, 'रलौ वर्णौ' असा प्रथमान्त पदांचा उपयोग न करतां, एकदमच 'ऋलोः वर्णयोः' असा षष्ठ्यन्त पदांचा उपयोग करून विग्रह करावा. असा विग्रह केल्यानें षष्ठ्यन्त सामासिक रूप सिद्ध होत असल्यामुळें, पुन्हा त्या सामासिक रूपाहून षष्ठीचा प्रत्यय करण्याची गरज पडत नाहीं. 'ऋ+सु' किंवा 'ऌ+सु' या स्थलीं 'ऋदुशनस्' सू. या २७६ सूत्रानें 'ऋ' व 'ऌ' यांचे जागीं 'अनङ्= अन्' आदेश होऊन 'अन्+सु' अशी स्थिति झाली असतां 'सर्वनामस्थाने चासम्बुद्धौ' सू. २५० या सूत्रानें उपधा दीर्घ होऊन 'आन्+सु' अशी स्थिति झाल्यावर 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लोप होऊन व नंतर 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें अन्त्य नकाराचा लोप होऊन, 'ऋ' व 'ऌ' या प्रातिपदिकांचे 'आ' असें प्रथमेच्या एकवचनाचें रूप होतें. 'ऋऌ+औ' या स्थलीं संदेह उत्पन्न न व्हावा म्हणून, 'ऋ' व 'ऌ' यांचा सवर्णदीर्घरूप सन्धि न करितां, 'ऋत्यकः' सू. ९२ या सूत्रानें विकल्पानें होणारा प्रकृतिभाव कायम ठेवला आहे हें लक्षांत असूं द्यावें. 'आ च आ च रलौ = ऋऌ औ' या स्थलीं 'ऋऌ' या प्रातिपदिकापुढें 'औ' हा प्रथमा विभक्तीचा सर्वनामस्थानप्रत्यय आला असल्यामुळें, 'ऋतो ङिसर्वनामस्थानयोः' सू. २७५ या सूत्रानें ऌकाराचा 'अ' असा गुण होऊन व 'उरण्रपरः' सू. ७० या सूत्रानें त्या अकारापुढें लकार होऊन 'ऋ अल् औ' अशी स्थिति झाली असतां, 'इको यणचि' सू. ४७ या सूत्रानें 'ऋ' चा रकार होऊन 'र्+अल्+औ = रलौ' असें रूप होतें. 'रलौ वर्णौ = ऋऌवर्णौ' या स्थलीं, 'ऋऌ+ औ+वर्ण+औ' अशा अलौकिक विग्रहवाक्यांत 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'औ' या दोन अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययांचा लुक् होऊन 'ऋऌवर्ण' असें सामासिक प्रातिपदिक झाल्यावर त्याहून 'औ' हा विभक्तिप्रत्यय केला असतां, 'ऋऌवर्णौ' असें रूप होतें. 'उः' हें 'ऋ' चें व 'उल्' हें 'ऌ' चें षष्ठीचें एकवचन आहे व हीं रूपें खालीं दिलेल्या प्रक्रियेप्रमाणें

सिद्ध होतात:– 'ऋ + ङस' अथवा 'ऌ + ङस्' या स्थलीं, 'ऋत उत्' सू. २७९ या सूत्रान्वयें 'ऋ' व 'ङस्' यांतील अकार आणि तसेंच 'ऌ' व 'ङस्' यांतील अकार या दोहोंचे जागीं 'उ' असा एकादेश होतो व 'उरण्रपरः' सू. ७० या सूत्रान्वयें तो एकादेश अनुक्रमें रपर व लपर होऊन 'उर्स्' व 'उल्स्' अशीं रूपें होतात, व 'रात्सस्य' सू. २८० या सूत्रानें 'उर्स्' यांतील अन्त्य सकाराचा लोप होऊन व 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें रकाराचा विसर्ग होऊन 'उः' असें 'ऋ' चें षष्ठीचें एकवचन होतें; आणि 'उल्स्' या स्थलीं 'संयोगान्तस्य लोपः' सू. ५४ या सूत्रान्वयें सकाराचा लोप होऊन 'उल्' असें 'ऌ' चें षष्ठीच्या एकवचनाचें रूप होतें.) 'ऋत्यकः' या सूत्रान्वयें, 'ऋऌवर्णयोः' या स्थलीं, प्रकृतिभाव झाला आहे, म्हणजे 'ऋऌ' या संधि केला नाहीं.

शब्दरत्न–लोकप्रसिद्धेति । "त्रिभिश्च मध्यमैर्वर्गैः" इति भाष्यपर्यालोचनया क–ख–ग–घ–ङेत्यादीनामप्यनादित्वमिति भावः। उच्चारणेति । पादमात्रिकाविमाविति भावः। लेखने चेति । अर्द्ध-वृत्तद्वयात्मकलिपित्वादिति भावः। रलाविति । "ऋ ऌ औ इति स्थिते "ऋत्यकः" इति प्रकृतिभावेन दीर्घाभावे, गुणे, यणि च रलावित्यस्य सिद्धिः। उश्च उल् च ऋलोरिति पाठः। रलोरिति पाठे आगन्तुना ऽकारेण निर्देश इति बोद्धचम्। तयोर्वर्णयोरिति। "पूरणगुण" इति निषेधस्तु षष्ठीसमासस्य न तु कर्मधारयस्य' बहुलग्रह णेन तदभावो भाष्योदाहृतविषय एव नान्यत्रेति भावः। प्रथमान्तेनेति। प्रथमोपस्थितत्वादिति भावः। अयं पक्षः 'अनेकमन्यपदार्थे" इति सूत्रे भाष्ये। परिनिष्ठितेति। अत्र च "एकविभक्ति चापूर्वनिपाते" इति ज्ञापकम्। अन्यथा 'मालामतिक्रान्तः' इति विग्रहेऽतिपदस्यापि नियत विभक्त्यन्तत्वेनैकविभक्तीत्यस्य व्यावर्त्यालाभः। एकस्यानियतविभक्तित्वे हि तद्वारणाय "एकविभक्ति" इति सार्थकम् परिनिष्ठितविभक्त्या समासे त्वतिक्रान्तमतिक्रान्तेनेत्यादिक्रमेण तस्यानियतविभक्तिकत्वं

स्पष्टमेव । अत एव "तत्पुरुषे तुल्यार्थः" इति सूत्रे भाष्ये परमे कारके, परमेण कारकेणेत्यादावतिप्रसङ्गमाशङ्कच प्रतिपदोक्त-परिभाषया समाहितमिति भावः ।

'कादय इति लोकप्रसिद्धपाठापेक्षमिदम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'त्रिभिश्च मध्यमैर्वर्गैः' अशा रीतीनें भाष्यांत वर्गांचा उल्लेख केला असल्यामुळें, त्या भाष्यावरून हें सिद्ध होतें कीं, 'क, ख, ग, घ, ङ' इत्यादि वर्णपाठ देखील (शिवसूत्रांतील वर्णपाठाप्रमाणें) अनादि आहे. (तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' १.१.९ या सूत्रावरील भाष्यांत 'त्रिभिश्च मध्यमैर्वर्गैर्ल-शसैश्च व्यवायेन,' म्हणजे आदि कवर्ग व अन्त्य पवर्ग या दोन वर्गांच्या मध्यें चवर्ग, टवर्ग व तवर्ग हे जे तीन वर्ग आहेत त्यांतील वर्णांचें; किंवा लकाराचें किंवा शकाराचें अथवा सकाराचें व्यवधान असल्यास णत्व होत नाहीं, हें वचन पठित आहें व याच अर्थाचें 'चुटुतुलशर्व्यवाये नेति वक्ष्यामि' हें वचन देखील तेथेंच पठित आहे, आणि त्या भाष्यांत बाह्य यत्न कोणते आहेत हें सांगतांना भाष्य-कारांनीं 'तत्र वर्गाणां प्रथमद्वितीया विवृतकण्ठाः श्वासानुप्रदाना अघोषाः...तृतीयचतुर्थाः संवृतकण्ठा नादानुप्रदाना घोषवन्तः...तथा तृतीयास्तथा पञ्चमा आनुनासिक्यवर्ज्यम् ।' असें म्हटलें आहे. साराश भाष्यकारांनीं लोकांत प्रसिद्ध असलेल्या वर्गांचा व त्या वर्गांतील वर्णक्रमाचा भाष्यांत ठिकठिकाणीं उल्लेख केला असल्यामुळें, ककारादि मकारान्त वर्णपाठ देखील माहेश्वरसूत्रांतील वर्णपाठा-सारखा अनादि आहे हें सिद्ध होतें.) जिव्हामूलीय व उपध्मानीय यांचें उच्चारण अर्धविसर्गसदृश असल्यामुळें, त्यांची एकचतुर्थांश मात्रा समजावी. ('हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं विसर्गादि अयोगवाहांचा, 'शर्षु जश्भावषत्वे' हें वार्तिक पठित करून, शर्प्रत्याहारांत पाठ केला असल्यामुळें व अशा रीतीनें विसर्ग हा हल् ठरत असल्यामुळें आणि हल् हा अर्धमात्रिक असल्यामुळें, अर्धविसर्ग-सदृश जिव्हामूलीय व उपध्मानीय यांची एकचतुर्थांश मात्रा होते.)

'लेखने च' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, जिव्हामूलीय व उपध्मानीय हे दोन अर्ध वर्तुलांनीं दर्शविले जातात. (विसर्ग दोन पूर्ण वर्तुलांनीं दर्शविला जात असल्यामुळें व हे अर्ध-विसर्गसदृश असल्यामुळें, हे दोन अर्ध वर्तुलांनीं दर्शविले जातात.) 'ऋ ऌ औ = रलौ' अशा स्थितींत 'ऋत्यकः' सू. ९२ या सूत्रानें प्रकृतिभाव केला असल्यामुळें, ('अकः सवर्णे दीर्घः' सू. ८५ या सूत्रानें होणारें) दीर्घकार्य न होतां, गुण व यणादेश होऊन 'रलौ' असें रूप सिद्ध झालें आहे. (याची प्रक्रिया पूर्वीं मनोरमेंत दिलीच आहे. शब्देन्दुशेखरांत 'आ च आ च रलौ, तौ वर्णौ ऋऌवर्णौ' असा विग्रह केला नसून 'आ च ऌवर्णश्च ऋऌवर्णौ' असा विग्रह केला आहे व तसा विग्रह करण्याचें कारण 'ननु आ च आ च रलौ इति मनोरमोक्तं विहाय किमिति द्वितीयः प्रकार आश्रीयते इति-चेच्छृणु, न पदान्ताः परेऽणः सन्तीति भाष्यप्रामाण्येन ऌका-रान्तानामनभिधानेन आ च आ चेति विग्रहस्य वक्तुमशक्य-त्वात्' असें अभिनवचन्द्रिकेंत दिलें आहे.) 'उश्च उल् च' अशा रीतीनें विग्रह केल्यास, 'ऋलोः' हाच पाठ बरोबर आहे. जेथें मनोरमेच्या कांहीं प्रतींत 'रलोः' असा पाठ आढळतो तेथें आगन्तुक अकारानें निर्देश केला आहे असें समजावें. ('उश्च उल् च ऋलोः' या विग्रहवाक्याचें 'ऋ ङस् ऌ ङस् ओस्' असें अलौकिक-प्रक्रियावाक्य होत असल्यामुळें, 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें अन्तर्वर्ति 'ङस्' या दोन विभक्तिप्रत्ययांचा लुक् केला असतां, 'ऋ ऌ ओस्' अशी स्थिति होऊन व 'ऋ ऌ' या स्थलीं 'ऋत्यकः' या सूत्रानें प्रकृतिभाव केला असल्यामुळें सन्धिकार्य न होतां केवळ 'ऌ' चे जागीं 'इको यणचि' सू. ४७ या सूत्रानें लकारादेश होऊन 'ऋल्+ओस्=ऋलोः' असेंच षष्ठीच्या द्विवचनाचें रूप होतें, 'रलोः' असें रूप मुळींच होऊं शकत नाहीं. प्रकृतिभाव न केल्यास, 'ऋऌवर्णयोः मिथः सावर्ण्यं वाच्यम्' या वार्तिकान्वयें

'अकः सवर्णे दीर्घः' या सूत्रानें सवर्णदीर्घ होऊन 'ऋ ओस्=रोः' असें रूप होऊं शकतें. तथापि मनोरमेच्या क्वचित् प्रतींत 'रलोः' असा जो पाठ आढळतो त्याचें कसें तरी समर्थन करण्याकरितां शब्दरत्नकार असें म्हणतात कीं, 'ऋ ऌ ओस्' या स्थलीं ऋकारापुढें आगन्तुक अकार घातला आहे असें समजावें. तसें मानल्यास, ऋ अ ऌ ओस्' अशी स्थिति होते व अशा स्थितींत 'इको यणचि' या सूत्रानें ऋकाराचे जागीं रकार व ऌकाराचे जागीं लकार होऊन 'रलोः' असें रूप सिद्ध होऊं शकतें हें खरें. पण असा आगन्तुक अकार मध्यें घालण्याची गरज काय ? असा आगन्तुक अकार मध्यें घालणें हें 'आगन्तूनामन्ते सन्निवेशः' या न्यायाच्या विरुद्ध देखील असल्यामुळें, 'रलोः' हा पाठ वास्तविक अशुद्धच ठरतो, व तसा अशुद्ध पाठ न मानतां, 'ऋलोः' हा सांप्रदायिक पाठ मानणेंच योग्य आहे असें शब्दरत्नकार वरील पंक्तींत ध्वनित करितात.) 'पूरणगुण' सू. ७०५ हें सूत्र कर्मधारयाचा निषेध करणारें नसून षष्ठीसमासाचा निषेध करणारें असल्यामुळें, 'ऋलोः वर्णयोः ऋऌवर्णयोः' हा समास साधु ठरतो. ('विशेषणं विशेष्येण बहुलम्' सू. ७३६ या सूत्राचा 'विशेषणं विशेष्येण सामानाधिकरण्येन समस्यते । बहुल-ग्रहणात् क्वचिन्न' असा अर्थ आहे, व विशेषणविशेष्यांचा अशा रीतीनें सामानाधिकरण्यानें समास होत असल्यामुळें, 'तत्पुरुषा समानाधिकरणः कर्मधारयः' सू. ७४५ या सूत्रान्वयें त्या सूत्रानें होणारा समास कर्मधारय ठरतो. 'पूरणगुण' हें सूत्र २–२–११ असून 'षष्ठी' हें सूत्र २–२–८ आहे व 'विशेषणं विशेष्येण बहुलम्' हें सूत्र २–१–५७ आहे. सारांश 'पूरणगुण' या सूत्राच्या थोडेंच पूर्वीं 'षष्ठी' हें सूत्र अष्टाध्यायींत पठित असून, 'षष्ठी' या सूत्राच्या बरेंच पूर्वीं 'विशेषणं विशेष्येण बहुलम्' हें सूत्र पठित आहे म्हणून 'अनन्तरस्य विधिर्वा भवति प्रतिषेधो वा'–परि. ६२–या न्यायान्वयें 'पूरणगुण' हें सूत्र 'षष्ठी' सू. ७०२ या सूत्राचें निषेधक ठरतें,

'विशेषणं विशेष्येण बहुलम्' या सूत्राचें निषेधक ठरत नाहीं. म्हणून 'ऋलोः वर्णयोः ऋऌवर्णयोः' असा जो सामानाधिकरण्यानें समासांतील दोन्ही पदें षष्ठींत, उच्चारून समास केला आहे तो वास्तविक षष्ठीसमास नसून कर्मधारयसमास असल्यामुळें, त्या समासाला 'पूरणगुण' हा निषेध लागू पडत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'विशेषणं विशेष्येण बहुलम्' या सूत्रांत) 'बहुलम्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें भाष्यांत जीं उदाहरणें दिलीं आहेत तशाच स्थलीं तसा समास होत नाहीं; इतर स्थलीं तसा विशेषणविशेष्यसमास होऊं शकतोच. ('समानाधिकरणेन षष्ठी न समस्यते' म्हणजे समानाधिकरणाबरोबर षष्ठ्यन्ताचा समास होत नाहीं, असा निषेध 'पूरणगुण' २·२·११ या निषेधक सूत्रांत सांगितला असल्यामुळें व 'ऋलोः वर्णयोः ऋऌवर्णयोः' या उदाहरणांत षष्ठीसामानाधिकरण्य असल्यामुळें तसा समास होऊं शकत नाहीं अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'विशेषणं विशेष्येण बहुलम्' या सूत्रांत 'बहुलम्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें व त्या पदाचा 'क्वचित् प्रवृत्तिः क्वचिदप्रवृत्तिः क्वचिद्विभाषा क्वचिदन्यदेव' असा अर्थ असल्यामुळें, 'समानाधिकरणेन षष्ठी न समस्यते' हा निषेध 'पूरणगुण' २·२·११ या सूत्रावरील भाष्यांत 'सर्पिषः पीयमानस्य, यजुषः क्रियमाणस्य' इत्यादि जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांनाच लागू पडतो, इतर उदाहरणांना तो निषेध लागू पडत नाहीं. म्हणून प्रकृत उदाहरणांत 'ऋलोः' हें विशेषण असून 'वर्णयोः' हें विशेष्य असल्यामुळें, या स्थलीं जरी षष्ठीसामानाधिकरण्य आहे तरी, 'बहुल'पदग्रहणसामर्थ्यानें, तसा विशेषणविशेष्यसमास करतेवेळीं, वरील निषेध लागू पडत नाहीं. 'पूरणगुण' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतातः– 'समानाधिकरणे किमुदाहरणम्? । राज्ञः पाटलिपुत्रकस्य, शुकस्य माराविदस्य, पाणिनेः सूत्रकारस्य । नैतदस्ति ।

असामर्थ्यादत्र न भविष्यति । कथमसामर्थ्यम् ? । समानाधिकरणमसमर्थवद्भवतीति । इदं तर्हि सर्पिषः पीयमानस्य, यजुषः क्रियमाणस्येति । ननु चात्रापि असामर्थ्यादेव न भविष्यति । कथमसामर्थ्यम् ? । समानाधिकरणमसमर्थवद्भवतीति । अधात्वभिहितमित्येवं तत् ।' या वरील भाष्यांतील 'राज्ञः पाटलिपुत्रकस्य' हें प्रतीक घेऊन कैयटानें असें म्हटलें आहे कीं, 'विशेषणसमासोऽत्र भवत्येव, ततो विशेषणस्यैव पूर्वनिपातः सिद्धो भवति । षष्ठीसमासे तु पूर्वनिपाताऽनियमः स्यादिति स प्रतिषिध्यते । विशेषणसमासे च वचनसामर्थ्यात्समानाधिकरणमसमर्थवदिति नाश्रीयते ।' आतां 'प्रथमान्तेन परिनिष्ठितविभक्त्या वा विग्रहः' या मनोरमेंतील पंक्तीत इतर विभक्तींचा निर्देश न करितां केवळ प्रथमाविभक्तीचा निर्देश करून) 'प्रथमान्तेन' असें जें म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, प्रथमा विभक्ति प्रथम उपस्थित होते. हा प्रथमान्त पक्ष 'अनेकमन्यपदार्थे' सू. २·२·२४ या सूत्रावरील भाष्यांत सांगितला आहे. (शब्दरत्नांतील 'प्रथमोपस्थितत्वात्' या पदाचा भावप्रकाशकारांनीं 'प्रागुपस्थितनिमित्तकत्वेनान्तरङ्गत्वात्' असा अर्थ केला आहे व त्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रथमा विभक्ति होण्यास 'प्रातिपदिकार्थलिङ्गपरिमाणवचनमात्रे प्रथमा' सू. ५३२ या सूत्रान्वयें केवळ प्रातिपदिकार्थरूप निमित्ताची अपेक्षा असून तें निमत्त प्रथम उपस्थित होत असल्यामुळें आणि द्वितीयादि विभक्ति होण्यास प्रातिपदिकाखेरीज 'कर्मणि द्वितीया' सू. ५३७, 'कर्तृकरणयोस्तृतीया' सू. ५६१ इत्यादि सूत्रांन्वयें कर्मादिकांची देखील अपेक्षा असून तीं निमित्तें मागून पुढें उपस्थित होत असल्यामुळें 'पूर्वोपस्थितनिमित्तकमन्तरङ्गम् परोपस्थितनिमित्तकं बहिरङ्गम्' या न्यायान्वयें प्रथमा विभक्ति अन्तरङ्ग ठरून प्रथम उपस्थित होते, आणि म्हणूनच 'अनेकमन्यपदार्थे' सू. ८३० या सूत्रांतील 'अनेकम्' या पदाचा 'अनेकं सुबन्तम्' असा सामान्य अर्थ न करितां दीक्षितांनीं कौमुदींत 'अनेकं प्रथमान्तम्' असा अर्थ केला

आहे व हा प्रथमान्त पक्ष 'अनेकमन्यपदार्थे' सू. २·२·२४ या सूत्रावरील
भाष्यांत सांगितला आहे. त्या भाष्यांत भाष्यकारांनीं त्या सूत्रांतील
'अन्य, अनेक, पद. व अर्थ' हीं चार पदें कशीं आवश्यक आहेत
याचीं कारणें सांगून नंतर 'उक्तं वा' हें वार्तिक पठित केलें आहे
आणि त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात:–
'किमुक्तम् ? । कर्मादीनामनुक्ता एकत्वादय इति कृत्वा साङ्ख्या
भविष्यन्तीति । प्रथमा तर्हि न प्राप्नोति । समयाद्भविष्यति । यदि
सामयिकी न नियोगतः, अन्याः कस्मान्न भवन्ति ? । कर्मादीनामभावात् ।
षष्ठी तर्हि प्राप्नोति ? । शेषलक्षणा षष्ठी, अशेषत्वान्न भविष्यति ।
एवमपि व्यतिकरः प्राप्नोति–एकस्मिन्नपि द्विवचनबहुवचने प्राप्नुतः,
द्वयोरप्येकवचनबहुवचने, बहुष्वप्येकवचनद्विवचने । अर्थतो व्यवस्था
भविष्यति । अथ वा सङ्ख्या नामेयं परप्रधाना । सङ्ख्येयमनया
विशेष्यम् । यदि चात्र प्रथमा न स्यात्, सङ्ख्येयमविशेषितं स्यात् ।
अथ वा वक्ष्यत्येतत्तत्र वचनग्रहणस्य प्रयोजनम्–उक्तेष्वप्येकत्वादिषु
प्रथमा यथा स्यात् ।' अशा रीतीनें प्रथमान्त पक्ष या भाष्यांत स्थापित
केला असल्यामुळें, चित्रा गावो यस्य सः चित्रगुः, शबला गावो यस्य
सः शबलगुः' इत्यादि स्थलीं प्रथमान्त पदांनींच विग्रह केला जातो
आणि या भाष्याला अनुसरूनच दीक्षितांनीं 'रलौ वर्णौ ऋलृवर्णौ तयोः
ऋलृवर्णयोः' असा प्रथमान्त पदांनीं प्रथम विग्रह केला आहे.)
'परिनिष्ठतविभक्त्या वा विग्रहः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे
त्याचें 'एकविभक्ति चापूर्वनिपाते' सू. ६५५ हें सूत्र, म्हणजे या
सूत्रांतील 'एकविभक्ति' हें पद, ज्ञापक आहे. परिनिष्ठितविभक्तीनें
देखील विग्रह होतो असें न मानलें व 'मालामतिक्रान्तः' या विग्रहांत
'अति = अतिक्रान्तः' अशा प्रथमान्त पदानेंच विग्रह होतो असें मानलें
तर, 'अति' हें पद देखील ('माला' या पदासारखेंच) नियत-
विभक्तिक ठरून वरील सूत्रांतील 'एकविभक्ति' या पदाला कोणतेंहि
व्यावर्त्य मिळणार नाहीं, म्हणजे त्या पदानें विग्रहांतील दोन पदांपैकी

कोणतेंहि पद वगळलें जाणार नाहीं (आणि अशा रीतीनें विग्रहांतील, दोन्ही पदें नियतविभक्तिक ठरल्यानें, वरील सूत्रांतील 'एकविभक्ति' हें पद व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल.) परंतु विग्रहांतील दोन पदांपैकीं एका पदास वाटेल ती विभक्ति करतां येते असें मानल्यानेंच, विग्रहांतील जें पद नियतविभक्तिक नसतें, म्हणजे ज्याची विभक्ति बदलवितां येते, त्याला उपसर्जनसंज्ञा न व्हावी याकरितां 'एकविभक्ति' हें पद अन्वर्थक ठरतें. 'मालामतिक्रान्तम्, मालामतिक्रान्तेन' इत्यादि भिन्न भिन्न विभक्त्यन्त पदानें विग्रह होऊं शकतो असें मानल्यानें, 'अति' हें पद अनियतविभक्तिक आहे हें स्पष्ट होतें. परिनिष्ठित विभक्तीनें देखील विग्रह करतां येतो असें असल्यामुळेंच, 'तत्पुरुषे तुल्यार्थ' सू. ६–२–२ या सूत्रावरील भाष्यांत 'परमे कारके, परमेण कारकेण' इत्यादि स्थलीं अतिव्याप्ति होण्याची आपत्ति येईल अशी शंका उपस्थित करून भाष्यकारांनीं लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा –प. ११४–प्रवृत्त करून त्या शंकेचें समाधान केलें आहे. ('एक-विभक्ति चापूर्वनिपाते' सू. ६५५ या सूत्रांतील 'एकविभक्ति' या पदाचा 'एकैव विभक्तिर्यस्य तत्=नियतविभक्तिकम्,' म्हणजे विग्रहांतील ज्या पदाला एकच प्रकारची विभक्ति होते व भिन्न भिन्न विभक्ति होत नाहींत तें नियतविभक्तिक पद होय, असा अर्थ असून, त्या सूत्राचा 'विग्रहे यन्नियतविभक्तिकम् तदुपसर्जनं स्यात्, न तु तस्य पूर्वनिपातः' असा कौमुदींत अर्थ दिला आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, विग्रहांतील दोन्ही पदें नेहमी नियतविभक्तिक असतात असें नसून केव्हां केव्हां त्या दोन पदांपैकीं एक पद अनियतविभक्तिक असतें, म्हणजे त्याची विभक्ति बदलवितां येते व त्याला भिन्न भिन्न विभक्तिप्रत्यय करतां येतात. विग्रहांतील दोन्ही पदें जर नेहमी नियतविभक्तिकच असतीं तर पाणिनीनें वरील उपसर्जनसंज्ञाविधायक सूत्रांत 'एकविभक्ति' हें पद घातलें नसतें. पण विग्रहांतील नियत-विभक्तिक पदालाच उपसर्जनसंज्ञा व्हावी व अनियतविभक्तिक

पदाला ती संज्ञा होऊं नये याकरितां तें पद वरील सूत्रांत मुद्दाम घातलें असल्यामुळें हें आपोआपच सिद्ध होतें कीं, केव्हां केव्हां विग्रहांतील एक पद अनियतविभक्तिक असतें. उदाहरणार्थ 'चित्रा गावो यस्य सः चित्रगुः' या स्थलीं जरी 'चित्रगु' या अन्य पदार्थाची विभक्ति बदलवितां येते व त्याला भिन्न भिन्न विभक्ति करतां येतात तरी विग्रहांतील 'चित्रा' व 'गौः' या दोन्ही पदांची विभक्ति केव्हांहि बदलवितां येत नसून ते नेहमी प्रथमान्तच असतात. अशा रीतीनें तीं दोन्ही पदें नियतविभक्तिक असल्यामुळें त्यांना उपसर्जन-संज्ञा होते व 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' सू. ६५६ या सूत्रानें त्यांना ऱ्हस्वकार्य होऊन 'चित्रगुः' असें इष्ट रूप सिद्ध होतें. तसेंच 'माला-मतिक्रान्तः अतिमालः' या स्थलीं 'अत्यादयः क्रान्ताद्यर्थे द्वितीयया' —सू. ७८० वरील वार्तिक—या वार्तिकान्वयें द्वितीयातत्पुरुष होत असून विग्रहांतील 'माला' व 'अति' या दोन पदांपैकीं 'माला' हें पद नेहमी द्वितीया विभक्तींतच राहतें. पण 'अति = अतिक्रान्तः' या पदाची वाटेल तशी विभक्ति बदलवितां येते, म्हणजे सामासिक पदाची जी विभक्ति असेल ती देखील विभक्ति त्याला करतां येते. त्यामुळें 'अति' हें अनियतविभक्तिक पद उपसर्जनसंज्ञक न ठरतां, 'माला' हें नियतविभक्तिक पद उपसर्जनसंज्ञक ठरून, 'गोस्त्रियोरुप-सर्जनस्य' या सूत्रानें त्याला ऱ्हस्वकार्य होतें व 'अतिमालः' इत्यादि इष्ट रूपें सिद्ध होतात. त्याचप्रमाणें 'राजकुमारी' या स्थलीं विग्रहां-तील 'राज्ञः' हें पद नेहमी षष्ठी विभक्तींतच राहत असून 'कुमारी' या द्वितीय पदाला वाटेल ती विभक्ति करतां येत असल्यामुळें, म्हणजे सामासिक पद ज्या विभक्तींत असेल ती देखील विभक्ति त्याला करतां येत असल्यामुळें, त्या 'कुमारी' पदाला उपसर्जनसंज्ञा होत नाहीं व त्यामुळें त्याला 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' या सूत्रानें होणारें ऱ्हस्वकार्य होत नाहीं. जर परिनिष्ठित विभक्तीनें विग्रह होत नाहीं असें मानलें व 'मालामतिक्रान्तः' व 'राज्ञः कुमारी' अशा रीतीनें

उत्तर पद नेहमी प्रथमान्त करूनच विग्रह करतां येतो असें मानलें तर, विग्रहांतील दोन्ही पदें नियतविभक्तिक ठरतील व अशा रीतीनें 'एकविभक्ति चापूर्वनिपाते' या सूत्रांतील 'एकविभक्ति' या पदाला कोणतेंहि व्यावर्त्य मिळणार नाहीं व तें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल, व तसेंच 'राजकुमारी' या स्थलीं 'कुमारी' या शब्दाला 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' या सूत्रानें ऱ्हस्वकार्य होण्याची आपत्ति येईल. परिनिष्ठित विभक्तीनें विग्रह करतां येतो असें मानल्यानेंच वर दर्शविलेल्या आपत्ति टळूं शकतात. म्हणून 'परिनिष्ठितविभक्त्या वा विग्रहः' हा द्वितीय पक्ष देखील मानणें आवश्यक आहे आणि वर सांगितल्याप्रमाणे या द्वितीयप क्षाचें 'एकविभक्ति चापूर्वनिपाते' या सूत्रांतील 'एकविभक्ति' हें पद ज्ञापक ठरतें. परिनिष्ठित विभक्तीनें देखील विग्रहकरतां येत असल्यामुळेंच, 'तत्पुरुषे तुल्यार्थ' सू. ६·२·२ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'परमकारक' या सामासिक शब्दाचा 'परमं कारकं परमकारकम्, परमेण कारकेण परमकारकेण, परमे कारके परमकारके' असा विग्रह केला आहे. परिनिष्ठित विभक्तीनें विग्रह करतां येत नसता तर भाष्यकारांनीं वर सांगितल्याप्रमाणें विग्रह न करितां 'परमश्चासौ कारकः परमकारकः' असा प्रथमान्त पदांनींच विग्रह केला असता. म्हणून परिनिष्ठित विभक्तीने देखील विग्रह करतां येतो याला वरील भाष्य प्रमाण ठरतें. त्या भाष्यावरील टीकेंत कैयटानें 'विशेषणसमासो न प्रथमान्तानामेव भवत्यपि तु द्वितीयाद्यन्तानामपि' असें स्पष्ट म्हटलें आहे. त्या भाष्यांत असें म्हटलें आहे कीं, 'परमे कारके परमकारके' या तत्पुरुषसमासांत 'परमे' ही सप्तमी असल्यामुळें व तसेंच 'परमेण कारकेण परमकारकेण' या तत्पुरुषसमासांत 'परमेण' ही तृतीया असल्यामुळें, 'तुल्यार्थ' सू. ३७३६ या सूत्रान्वयें त्यांना पूर्वपदप्रकृतिस्वराची प्राप्ति होते. पण तसा स्वर होणें इष्ट नसून 'समासस्य' सू. ३७३४ या सूत्रानें सामासिक शब्दास

अन्तोदात्त स्वर होणें इष्ट असल्यामुळें, भाष्यकारांनीं 'तत्पुरुषे विभक्तिप्रकृतिस्वरत्वे कर्मधारये प्रतिषेधः' हें वार्तिक प्रथम पठित केलें आहे व त्याच्या लगेंच पुढें त्या वार्तिकाचें प्रत्याख्यान करणारें 'सिद्धं तु लक्षणप्रतिपदोक्तयोः प्रतिपदोक्तस्यैव ग्रहणात्' हें द्वितीय वार्तिक पठित केलें आहे, व त्या द्वितीय वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतातः–'सिद्धमेतत् । कथम् ? । लक्षणप्रतिपदोक्तयोः प्रतिपदोक्तस्यैवेति प्रतिपदं यो द्वितीयातृतीयासप्तमीसमासस्तस्य ग्रहणम् । लक्षणोक्तश्चायम् ।' या भाष्यांतील 'लक्षणोक्तः' या पदाचा 'विभक्तिविशेषमनुपादाय सामान्यलक्षणेनायं समासो विहित इत्यर्थः' असा कैयटानें अर्थ केला आहे. या वरील भाष्याचा आशय हा आहे कीं, 'परमं कारकं परमकारकम्, परमेण कारकेण परमकारकेण, परमे कारके परमकारके' हे अनुक्रमें प्रतिपदोक्त द्वितीयातत्पुरुष, तृतीयातत्पुरुष व सप्तमीतत्पुरुष नव्हत. जे समास-शास्त्रांतील 'द्वितीया,' 'तृतीया' व 'सप्तमी' या अधिकारांत पठित असलेल्या सूत्रांन्वयें समास होतात त्यांनाच प्रतिपदोक्त द्वितीया-तत्पुरुष, तृतीयातत्पुरुष व सप्तमीतत्पुरुष म्हणतां येतें. वर जीं तीन उदाहरणें दिलीं आहेत ती 'द्वितीया,' 'तृतीया' व 'सप्तमी' या अधिकारांत पठित असलेल्या कोणत्याहि सूत्रान्वयें झालीं नसल्यामुळें, त्यांना प्रतिपदोक्त द्वितीयातत्पुरुष, तृतीयातत्पुरुष, सप्तमीतत्पुरुष म्हणतां येत नाहीं. वास्तविक वरील तीन्ही समास 'विशेषणं विशेष्येण बहुलम्' सू. ७३६ या सूत्रान्वयें झाले आहेत व त्या सूत्रांत अमुकच विभक्त्यन्त पदांनीं विग्रह करावा असें सांगितलें नसल्यामुळें, त्या सूत्रानें बनलेल्या सामासिक शब्दाचा विग्रह करतेवेळीं त्या सामासिक शब्दाची जी विभक्ति असेल तशा विभक्त्यन्त पदांनीं देखील विग्रह करतां येतो. म्हणूनच 'परमकारकम्' हें द्वितीयान्त सामासिक पद असल्यामुळें, त्याचा 'परमं कारकं परमकारकम्' अशा द्वितीयान्त पदांनीं सामानाधिकरण्यानें विग्रह केला आहे. तसेंच 'परमकारकेण'

व 'परमकारके' हीं सामासिक पदें अनुक्रमें तृतीयान्त व सप्तम्यन्त असल्यामुळें, त्यांचा 'परमेण कारकेण परमकारकेण' व 'परमे कारके परमकारके' अशा तृतीयान्त व सप्तम्यन्त समानाधिकरणपदांनीं विग्रह केला आहे. सारांश वरील तीन सामासिक पदांचा विग्रह करतेवेळीं जरी द्वितीयान्त, तृतीयान्त व सप्तम्यन्त पदांचा सामानाधिकरण्यानें उपयोग केला आहे तरी तेवढ्यावरून ते प्रतिपदोक्त द्वितीयातत्पुरुष, तृतीयातत्पुरुष व सप्तमीतत्पुरुष ठरत नाहींत; कारण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ते द्वितीया, तृतीया व सप्तमी या अधिकारांत पठित असलेल्या कोणत्याहि सूत्राच्या कक्षेंत येत नाहींत, आणि ते 'विशेषणं विशेष्येण बहुलम्' या सूत्रान्वयें सिद्ध झाले असल्यामुळें ते केवळ तसे लाक्षणिक तत्पुरुष होत. म्हणून 'लक्षणप्रतिपदोक्तयोः प्रतिपदोक्तस्यैव ग्रहणम्'–परि. ११४–ही परिभाषा असल्यामुळें, 'तत्पुरुषे तुल्यार्थतृतीया' सू. ३७३६ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या द्वितीया तत्पुरुष तृतीया तत्पुरुष व सप्तमीतत्पुरुषांनीं तशा लाक्षणिक तत्पुरुषांचें ग्रहण करतां येत नसून, प्रतिपदोक्त तत्पुरुषांचेंच ग्रहण करतां येतें व त्यामुळें वरील तीन सामासिक शब्दांत पूर्वपदप्रकृतिस्वर होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं व 'समासस्य' सू. ३७३४ या सूत्रानें होणारा अन्तोदात्त स्वरच होतो, आणि म्हणून 'तत्पुरुषे विभक्तिप्रकृतिस्वरत्वे कर्मधारये प्रतिषेधः' हें वार्तिक असण्याची कांहीं गरज नाहीं असें भाष्यकारांचें म्हणणें आहे. या वरील भाष्यावरून हें सिद्ध होतें कीं, परिनिष्ठित विभक्तिनें देखील विग्रह करतां येतो. म्हणून 'ऋऌवर्णयोः' हें सामासिक पद षष्ठ्यन्त असल्यामुळें, त्याचा 'ऋऌोः वर्णयोः' असा जो परिनिष्ठित विभक्तीनें दीक्षितांनीं मनोरमेंत विग्रह केला आहे तो वरील भाष्यान्वयें योग्य ठरतो असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा–"ना ज्झलौ। आकारसहितइति। अत्र च "कालसमयवेलासु" इत्यादिनिर्देशाः प्रश्लेषे लिङ्गम्। न चैवमपि 'यिया२

सो' इत्यादौ "गुरोरनृतः" इति प्लुतादाकारात्परस्य सनः सस्य षत्वं स्यादेवेति वाच्यम्, आश्च, आ ३ श्चेति द्वन्द्वे सवर्णदीर्घेण दीर्घात्परत्र प्लुतोऽपि प्रश्लिष्यत इति व्याख्यानात्। यणादिकमिति। शीतलशब्दे सवर्णदीर्घ आदिशब्दार्थः।

('नाज्झलौ' सू. १३ या सूत्रांत 'न अज्झलौ' असा पदछेद
न करितां, 'न आज्झलौ' असा दीक्षितांनीं पदछेद केला आहे व
'आज्झलौ' या पदांतील 'आच्' या शब्दाचा 'आकारसहितः अच्
आच्' असा मध्यमपदलोपीसमास करून नंतर 'आच् च हल् च
आज्झलौ' असा द्वन्द्वसमास केला आहे. या सूत्रांत आकारप्रश्लेष कां
केला आहे व तसें करण्यास काय प्रमाण आहे हें आतां दीक्षित
सांगतात.) 'कालसमयवेलासुतुमुन्' सू. ३१७९ इत्यादि सूत्रांत
असलेले निर्देश प्रकृत सूत्रांत आकारप्रश्लेष करणें आवश्यक आहे
याचें ज्ञापक आहेत. ('अणुदित्' सू. १४ या सूत्राच्या अर्थाचें ज्ञान
होईपर्यंत प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अच्' प्रत्याहारानें दीर्घ
आकाराचें ग्रहण न होतां शिवसूत्रनिर्दिष्ट ऱ्हस्व अकाराचें ग्रहण होतें.
म्हणून 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष न केल्यास, त्या सूत्रा-
न्वयें जरी अकार व हकार हे सवर्ण होऊं शकत नाहींत तरी,
'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' सू. १० या सूत्रान्वयें आकार व ऊष्मवर्ण
हकार हे सवर्ण होण्याची आपत्ति येते; कारण 'अकुहविसर्जनीयानां
कण्ठः' या वचनान्वयें त्या दोन्ही वर्णांचें कण्ठ हें उच्चारणस्थान
असून, 'विवृतमूष्मणां स्वराणां च' या वचनान्वयें त्या दोहोंचा
आभ्यन्तरप्रयत्न देखील एकच-विवृत-आहे, आणि पर णकारानें
साधलेल्या अण्प्रत्याहारांत हकार अन्तर्भूत असून तो इण्प्रत्याहारा-
न्तर्गत वर्ण असल्यामुळें, 'अणुदित्' या सूत्रान्वयें हकारानें आकाराचें
ग्रहण होऊन व अशा रीतीनें 'आ' हा इण् ठरून, 'आदेशप्रत्यययोः'
सू. २१२ या सूत्रानें 'वेलासु' यांतील 'आ' पुढें असलेल्या 'सु' या
विभक्तिप्रत्ययांतील सकाराचें षत्व होण्याची आपत्ति येते. ही आपत्ति

व 'परमकारके' हीं सामासिक पदें अनुक्रमें तृतीयान्त व सप्तम्यन्त असल्यामुळें, त्यांचा 'परमेण कारकेण परमकारकेण' व 'परमे कारके परमकारके' अशा तृतीयान्त व सप्तम्यन्त समानाधिकरणपदांनीं विग्रह केला आहे. सारांश वरील तीन सामासिक पदांचा विग्रह करतेवेळीं जरी द्वितीयान्त, तृतीयान्त व सप्तम्यन्त पदांचा सामानाधिकरण्यानें उपयोग केला आहे तरी तेवढ्यावरून ते प्रतिपदोक्त द्वितीयातत्पुरुष, तृतीयातत्पुरुष व सप्तमीतत्पुरुष ठरत नाहींत; कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणें ते द्वितीया, तृतीया व सप्तमी या अधिकारांत पठित असलेल्या कोणत्याहि सूत्राच्या कक्षेंत येत नाहींत, आणि ते 'विशेषणं विशेष्येण बहुलम्' या सूत्रान्वयें सिद्ध झाले असल्यामुळें ते केवळ तसे लाक्षणिक तत्पुरुष होत. म्हणून 'लक्षणप्रतिपदोक्तयोः प्रतिपदोक्तस्यैव ग्रहणम्'–परि. ११४–ही परिभाषा असल्यामुळें, 'तत्पुरुषे तुल्यार्थतृतीया' सू. ३७३६ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या द्वितीया तत्पुरुष तृतीया तत्पुरुष व सप्तमीतत्पुरुषांनीं तशा लाक्षणिक तत्पुरुषांचें ग्रहण करतां येत नसून, प्रतिपदोक्त तत्पुरुषांचेंच ग्रहण करतां येतें व त्यामुळें वरील तीन सामासिक शब्दांत पूर्वपदप्रकृतिस्वर होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं व 'समासस्य' सू. ३७३४ या सूत्रानें होणारा अन्तोदात्त स्वरच होतो, आणि म्हणून 'तत्पुरुषे विभक्तिप्रकृतिस्वरत्वे कर्मधारये प्रतिषेधः' हें वार्तिक असण्याची कांहीं गरज नाहीं असें भाष्यकारांचें म्हणणें आहे. या वरील भाष्यावरून हें सिद्ध होतें कीं, परिनिष्ठित विभक्तिनें देखील विग्रह करतां येतो. म्हणून 'ऋऌवर्णयोः' हें सामासिक पद षष्ठ्यन्त असल्यामुळें, त्याचा 'ऋऌोः वर्णयोः' असा जो परिनिष्ठित विभक्तीनें दीक्षितांनीं मनोरमेंत विग्रह केला आहे तो वरील भाष्यान्वयें योग्य ठरतो असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा–"ना ज्झलौ। आकारसहितइति। अत्र च "कालसमयवेलासु" इत्यादिनिर्देशाः प्रश्लेषे लिङ्गम्। न चैवमपि 'यिया३

सो' इत्यादौ "गुरोरनृतः" इति प्लुतादाकारात्परस्य सनः सस्य षत्वं स्यादेवेति वाच्यम्, आश्च, आ ३ श्चेति द्वन्द्वे सवर्णदीर्घेण दीर्घात्परत्र प्लुतोऽपि प्रश्लिष्यत इति व्याख्यानात्। यणादिकमिति। शीतलशब्दे सवर्णदीर्घ आदिशब्दार्थः।

('नाज्झलौ' सू. १३ या सूत्रांत 'न अज्झलौ' असा पदछेद न करितां, 'न आज्झलौ' असा दीक्षितांनीं पदछेद केला आहे व 'आज्झलौ' या पदांतील 'आच्' या शब्दाचा 'आकारसहितः अच् आच्' असा मध्यमपदलोपीसमास करून नंतर 'आच् च हल् च आज्झलौ' असा द्वन्द्वसमास केला आहे. या सूत्रांत आकारप्रश्लेष कां केला आहे व तसें करण्यास काय प्रमाण आहे हें आतां दीक्षित सांगतात.) 'कालसमयवेलासुतुमुन्' सू. ३१७९ इत्यादि सूत्रांत असलेले निर्देश प्रकृत सूत्रांत आकारप्रश्लेष करणें आवश्यक आहे याचें ज्ञापक आहेत. ('अणुदित्' सू. १४ या सूत्राच्या अर्थाचें ज्ञान होईपर्यंत प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अच्' प्रत्याहारानें दीर्घ आकाराचें ग्रहण न होतां शिवसूत्रनिर्दिष्ट ऱ्हस्व अकाराचें ग्रहण होतें. म्हणून 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष न केल्यास, त्या सूत्रान्वयें जरी अकार व हकार हे सवर्ण होऊं शकत नाहींत तरी, 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' सू. १० या सूत्रान्वयें आकार व ऊष्मवर्ण हकार हे सवर्ण होण्याची आपत्ति येते; कारण 'अकुहविसर्जनीयानां कण्ठः' या वचनान्वयें त्या दोन्ही वर्णांचें कण्ठ हें उच्चारणस्थान असून, 'विवृतमूष्मणां स्वराणां च' या वचनान्वयें त्या दोहोंचा आभ्यन्तरप्रयत्न देखील एकच-विवृत-आहे, आणि पर णकारानें साधलेल्या अण्प्रत्याहारांत हकार अन्तर्भूत असून तो इण्प्रत्याहारा-न्तर्गत वर्ण असल्यामुळें, 'अणुदित्' या सूत्रान्वयें हकारानें आकाराचें ग्रहण होऊन व अशा रीतीनें 'आ' हा इण् ठरून, 'आदेशप्रत्यययोः' सू. २१२ या सूत्रानें 'वेलासु' यांतील 'आ' पुढें असलेल्या 'सु' या विभक्तिप्रत्ययांतील सकाराचें षत्व होण्याची आपत्ति येते. ही आपत्ति

टळावी म्हणून, 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष केला आहे, व तसा प्रश्लेष केला असल्यामुळें, जसा 'नाज्झलौ' या निषेधक सूत्रान्वयें अकार हकाराचा सवर्ण होत नाहीं तसाच आकार देखील हकाराचा सवर्ण ठरत नाहीं व त्यामुळें हकारानें आकाराचें ग्रहण होत नाहीं आणि अशा रीतीनें 'आ' हा इण् ठरत नसल्यामुळें, 'वेलासु' या स्थलीं षत्व होत नाहीं. 'वेलासु' या स्थलीं पाणिनीनें षत्व केलें नसल्यामुळें, तो निर्देश 'नाज्झलौ' या सूत्रांत आकाराचा प्रश्लेष केला आहे याचा ज्ञापक ठरतो.) पण वर सांगितल्याप्रमाणें 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष केला तरी 'यिया३सो' इत्यादि स्थलीं 'गुरोरनृतः' सू. ९७ या सूत्रानें प्लुत झालेल्या आकारापुढें असलेल्या 'सन्' प्रत्ययांतील सकाराचें षत्व होणें टाळतां येत नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण प्रकृत सूत्रांत ज्या 'आ' चा प्रश्लेष केला आहे त्याचा 'आश्च आ३श्च' असा द्वन्द्वसमास केल्यानें व ('अकः सवर्णे दीर्घः' सू. ८५ या सूत्रानें) सवर्णदीर्घ केल्यानें आणि दीर्घ 'आ' पुढें प्लुत आ३चा देखील प्रश्लेष आहे असें व्याख्यान केल्यानें, 'यिया३सो' या स्थलीं षत्व होण्याची आपत्ति येत नाहीं. (वर सांगितल्याप्रमाणें दीर्घ व प्लुत आकाराचा द्वन्द्व केला असल्यामुळें, जसा हकाराचा दीर्घ आकार सवर्ण होत नाहीं तसाच प्लुत आकार देखील हकाराचा सवर्ण होत नाहीं व अशा रीतीनें हकारानें प्लुत आकाराचें देखील ग्रहण होऊं शकत नसल्यामुळें व तो इण् मानतां येत नसल्यामुळें, 'यिया३सो' या स्थलीं प्लुत आकारापुढें असलेल्या 'सन्' प्रत्ययांतील सकाराचें, 'आदेशप्रत्यययोः' या सूत्रानें होणारें, षत्व होत नाहीं. 'तेन दधीत्यस्य हरति शीतलं षष्ठं सान्द्रमित्येतेषु परेषु यणादिकं न' अशी जी 'नाज्झलौ' या सूत्रावरील कौमुदींत पंक्ति आहे त्या पंक्तींतील) 'यणादिकम्' या पदांत जो 'आदि' शब्द आहे (त्यानें सवर्णदीर्घाचें देखील ग्रहण होतें व त्यामुळें 'दधि' या शब्दापुढें)

'शीतल' हा शब्द आला असून देखील सवर्णदीर्घ होत नाहीं असा त्या 'आदि' शब्दाचा अर्थ आहे. ('दधि शीतलम्' या वाक्यांत 'दधि' यांतील अन्त्य इकारापुढें शकार हा ऊष्मवर्ण आला आहे. इकार व शकार या दोहोंचेंहि 'इचुयशानां तालु' या वचनान्वयें तालु हें उच्चारणस्थान असून, त्यांचा 'विवृतमूष्मणां स्वराणां च' या वचनान्वयें 'विवृत' हा आभ्यन्तरप्रयत्न आहे. सारांश या दोन वर्णांत स्थानसाम्य व आभ्यन्तरप्रयत्नसाम्य असल्यामुळें, 'तुल्यास्य-प्रयत्नं सवर्णम्' सू. १० या सूत्रान्वयें ते सवर्ण होतात, व 'अकः सवर्णे दीर्घः' सू. ८५ या सूत्रान्वयें वरील उदाहरणांत सवर्णदीर्घ होण्याची आपत्ति येते. परंतु 'नाज्झलौ' हें निषेधक सूत्र असल्यामुळें व इकार अच् असून शकार हल् असल्यामुळें, ते सवर्ण होऊं शकत नाहींत व त्यामुळें सवर्णदीर्घकार्य होत नाहीं. तसेंच 'दधि हरति' या वाक्यांत 'दधि' यांतील अन्त्य इकारापुढील हकार आकाराचा सवर्ण असल्यामुळें, व 'दधि षष्ठम्' या वाक्यांत 'दधि' यांतोल अन्त्य इकारापुढोल षकार ऋकाराचा सवर्ण असल्यामुळें, आणि 'दधि सान्द्रम्' या वाक्यांत 'दधि' यांतील अन्त्य इकारापुढील सकार ऌकाराचा सवर्ण असल्यामुळें, 'इको यणचि' सू. ४७ या सूत्रानें वरील तीन्ही स्थलीं इकाराचे जागीं यणादेश होण्याची आपत्ति येते. परंतु हकार, षकार व सकार हे हल् असून अकार, ऋकार व ऌकार अच् असल्यामुळें, 'नाज्झलौ' या निषेधक सूत्रान्वयें ते सवर्ण होऊं शकत नाहींत व त्यामुळें यणादेश होण्याची आपत्ति टळते)

शब्दरत्न–व्याख्यानादिति । एवं व्याख्याने मानं तु प्रयत्नभेदेन "नाऽज्झलौ" इत्येतत्प्रत्याख्यानपरं भाष्यम् । तद् ध्वनयन्वक्ष्यति–सूत्रं मास्त्विति भाष्ये स्थितमिति । शीतलशब्दे इति । शस्य ईकारे परे, दधीतीकारस्य शकारे परे चेत्यर्थः । न च शीङः शकारोच्चारणेन तच्छकारस्येकारे न दीर्घ इति वाच्यम्, शीतलशब्दे शीङोऽभावात् ।

किन्तु श्याधातोः क्ते "द्रवमूर्तिस्पर्शयोः श्यः" इत्यनेन सम्प्रसारणे, "श्योऽस्पर्शे" इत्युक्तेर्नत्वाभावे च निष्पन्नाच्छीतशब्दात्सिध्मादित्वाल्लचि शीतलशब्द इत्यदोषात्। शीतशब्दो हि सिध्मादिषु गणरत्ने, वृत्तौ च पठ्यते। किं च तेनापूर्ववचनकल्पनापेक्षया सूत्रोदाहरणत्वमेव तस्य युक्तमिति भावः।

'नाज्झलौ' या सूत्रांत दीर्घ व प्लुत आकाराचा प्रश्लेष करून दीक्षितांनीं त्या सूत्राचें जें व्याख्यान केलें आहे त्याला, प्रयत्नभेद मानून 'नाज्झलौ' या सूत्राचें ज्या भाष्यांत प्रत्याख्यान केलें आहे तें भाष्य प्रमाण आहे. (स्वरांचा विवृत प्रयत्न आहे व ऊष्मवर्णांचा ईषद्विवृत प्रयत्न आहे असा प्रयत्नभेद मानल्यानें, 'नाज्झलौ' हें सूत्र आवश्यक नाहीं असें सांगून भाष्यकारांनीं त्या सूत्राचें प्रत्याख्यान केलें आहे. 'अ, इ, ऋ, ऌ' हेच चार अच् आहेत कीं, ज्यांचे 'ह्, श्, ष्, स्' हे ऊष्मवर्ण अनुक्रमें स्थानसाम्यामुळें व आभ्यन्तरप्रयत्नसाम्यामुळें सवर्ण होऊं शकतात. इतर कोणत्याहि अचाचा कोणताहि हल् सवर्ण होऊं शकत नाहीं. 'अ, इ, ऋ, ऌ, व 'ह्, श्, ष्, स्' हे अनुक्रमें सवर्ण न व्हावे एवढ्याचकरितां 'नाज्झलौ' हें सूत्र केलें आहे. पण ऊष्मवर्णांचा विवृत हा आभ्यन्तरप्रयत्न न मानतां ईषद्विवृत हा आभ्यन्तरप्रयत्न मानल्यास, ते कोणत्याहि अचाचे आभ्यन्तरप्रयत्नभेदामुळें सवर्ण होऊं शकत नाहींत. म्हणून शौनकीय प्रातिशाख्यांत सांगितल्याप्रमाणें, तसा प्रयत्नभेद मानल्यानें काम भागत असल्यामुळें व मनोरमेंत दर्शविलेल्या सर्व आपत्ति टाळतां येत असल्यामुळें, 'नाज्झलौ' हें सूत्र अनावश्यक ठरतें असा भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'नाज्झलौ' १·१·१० या सूत्रावरील भाष्यांत तें सूत्र नसलें तर काय आपत्ति येतात हें प्रथम सांगून व त्या आपत्तींचें निवारण करण्याकरितां 'सिद्धमनच्त्वात्' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतातः—'सिद्धमेतत्। कथम्?। अनच्त्वात्। कथमनच्त्वम्?। स्पृष्टं स्पर्शानां करणम्।

ईषत्स्पृष्टमन्तःस्थानाम् । विवृतमूष्मणाम् ईषदित्येवानुवर्तते । स्वराणां विवृतम्, ईषदिति निवृत्तम् ।' व त्या भाष्यावरील प्रदीपांत 'प्रयत्न-भेदादज्झलोः सवर्णसंज्ञायाः प्राप्तिरेव नास्ति' असें कैयटानें म्हटलें असून, 'दीर्घप्लुताकारहकारयोः सावर्ण्यन्यावृत्तये इदमपि तस्यावश्यक-मिति भावः' असें उद्योतांत म्हटलें आहे. परंतु 'छन्दोवत्सूत्राणि भवन्ति' या भाष्यवचनान्वयें पाणिनीय सूत्रें वेदतुल्य मानलीं असल्यामुळें, ज्याप्रमाणें वेदांतील एकहि अक्षर निरर्थक मानतां येत नाहीं त्याच-प्रमाणें पाणिनीय सूत्रांतील देखील एकहि अक्षर निरर्थक मानतां येत नाहीं, मग संपूर्ण सूत्र निरर्थक मानतां येत नाहीं हें सांगणें नकोच. 'वृद्धिरादैच्' १-१-१ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'प्रमाणभूत आचार्यो दर्भपवित्रपाणिः शुचाववकाशे प्राङ्मुख उपविश्य महता यत्नेन सूत्रं प्रणयति स्म, तत्राशक्यं वर्णेनाप्यनर्थकेन भवितुं किं पुनरियता सूत्रेण' असें स्वतःच स्पष्ट म्हटलें आहे. म्हणून भगवान् भाष्यकारांनीं जरी प्रकृत सूत्राचें प्रत्याख्यान केलें आहे व 'उत्तरोत्तरं मुनीनां प्रामाण्यम्' या वचनान्वयें भाष्यकारांनीं केलेलें प्रत्याख्यान अयोग्य मानतां येत नाहीं तरी प्रत्येक पाणिनीय सूत्राची व त्यांतील प्रत्येक पदाची आवश्यकता सिद्ध करून दाखविणें हें वृत्तिकाराचें कर्तव्य आहे व त्या कर्तव्यास अनुसरूनच दीक्षितांनीं प्रकृत सूत्राचें प्रत्याख्यान करणें टळावें याकरितां, त्या सूत्रांत दीर्घ व प्लुत आकाराचा प्रश्लेष केला आहे, व प्रयत्नभेद मानून भाष्यकारांनीं ज्या फलांची सिद्धि केली आहे त्या फलांची दीक्षितांनीं दीर्घ व प्लुत आकाराचा प्रश्लेष मानून सिद्धि केली आहे. आकारप्रश्लेष करण्यास वरील भाष्य प्रमाण आहे असें जें शब्दरत्नकारांनीं म्हटलें आहे त्याचा आशय एवढाच आहे कीं, सूत्रप्रत्याख्यानपक्षांत ज्या फलांची सिद्धि करून दाखविली असते तीं फलें सूत्रारम्भपक्षांत देखील सिद्ध होऊं शकत असलीं पाहिजेत असा नियम असल्यामुळें, भाष्यकारांनीं प्रकृत सूत्राचें प्रत्याख्यान करून जें फल साधलें आहे तें फल

प्रकृत सूत्रांत दीर्घ व प्लुत आकाराचा प्रश्लेष केल्याशिवाय सिद्ध होऊं शकत नसल्यामुळें, त्या फलाची सिद्धि करण्याकरितां तसा प्रश्लेष करणें याचें वरील भाष्य ज्ञापक ठरतें) प्रयत्नभेद मानल्यास प्रकृत सूत्र आवश्यक नाहीं असें दीक्षित स्वतःच पुढील सूत्राच्या वृत्तींत सांगणार आहेत. 'शीतलशब्दे सवर्णदीर्घ आदिपदार्थः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा अर्थ असा आहे कीं, 'दधि शीतलम्' या वाक्यांत 'शीतलम्' या स्थलीं शकारापुढें ईकार व तसेंच 'दधि' यांतील अन्त्य इकारापुढें शकार आला असल्यामुळें दोन सवर्णदीर्घकार्यांची प्राप्ति आहे. (पण 'नाज्झलौ' हें निषेधक सूत्र असल्यामुळें तीं कार्यें होत नाहींत.) धातुपाठांत 'शीङ स्वप्ने' असा धातु पठित असल्यामुळें (व सवर्णदीर्घ करून 'ईङ' असा तो धातु पठित केला नसल्यामुळें) त्या धातूंतील शकारापुढें इकार आल्यास सवर्णदीर्घकार्य होत नाहीं (व 'शीतलम्' या स्थलीं सवर्णदीर्घ होऊन 'ईतलम्' असें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं) याचा तो पाठ ज्ञापक आहे असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं: कारण 'शीतल' या शब्दांत 'शीङ' धातु नाहीं, म्हणजे 'शीतल' हा शब्द 'शीङ' धातूपासून निष्पन्न झालेला शब्द नाहीं. ('श्यैङ गतौ' या धातूहून 'क्त' प्रत्यय केला असतां, 'आदेच उपदेशेऽशिति' सू. २३७० या सूत्रानें त्या धातूचें 'श्या' असें रूप होतें व त्यापुढें 'क्त' हा कित् प्रत्यय आला असल्यामुळें 'द्रवमूर्तिस्पर्शयोः श्यः' सू. ३०२० या सूत्रानें 'श्या' यांतील यकाराचें संप्रसारण होतें व 'श्योऽस्पर्शे' सू. ३०२१ या सूत्रांत 'अस्पर्शे' असा निषेध असल्यामुळें, 'क्त' प्रत्ययांतील तकाराचा नकार न होतां 'शीत' असें जें रूप सिद्ध होतें त्याहून 'सिध्मादिभ्यश्च' सू. १९०४ या सूत्रानें 'लच्' प्रत्यय केला असतां 'शीतल' असें रूप सिद्ध होतें व त्यामुळें प्रकृत स्थलीं वर दाखविलेला दोष येत नाहीं. ('श्यै + क्त = श्या + क्त' अशा स्थितींत 'श्या'

यांतील यकाराचें संप्रसारण करून, म्हणजे 'इग्यणः संप्रसारणम्' सू. ३२८ या सूत्रानें यकाराचे जागीं इकार करून, 'श्या = श् इ आ' अशी स्थिति झाली असतां, 'सम्प्रसारणाच्च' सू. ३३० या सूत्रानें पूर्वरूप एकादेश होऊन व 'हलः' सू. २५५९ या सूत्रानें 'इ' या सप्रसारणाचें दीर्घ होऊन 'शि आ क्त = शि क्त = शीत' असें रूप होतें व त्याहून लच् प्रत्यय केल्यानें 'शीतल' असें रूप सिद्ध होतें. सारांश 'शीतल' हा शब्द 'शीङ' धातूपासून निष्पन्न झाला नसून 'श्यैङ' धातूपासून निष्पन्न झाला असल्यामुळें शंकाकाराचें म्हणणें अनुपपन्न ठरतें हें उघड आहे.) 'शीत' हा शब्द गणरत्नांत व तसेंच काशिकावृत्तींत सिध्मादिगणांत पठित केला आहे. (या पंक्तीवरून असें दिसून येते कीं, पाणिनीय गणपाठाच्या कांहीं प्रतींत 'शीत' हा शब्द सिध्मादिगणांत पठित नाहीं व तो त्या गणांत नाहीं असें मानल्यास, त्याहून 'सिध्मादिभ्यश्च' या सूत्रानें होणारा लच् प्रत्यय होऊं शकणार नाहीं व 'शीतल' हें रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. म्हणून शब्दरत्नकारांनीं 'शीत' हा शब्द सिध्मादिगणांत पठित आहे हें सिद्ध करण्याकरितां गणरत्न व काशिकावृत्ति या दोन मान्य ग्रन्थांचा आधार दिला आहे.) दुसरें असें कीं, ('शीङ स्वप्ने' या धातूचें 'शीत' हें क्तप्रत्ययान्त रूप आहे असें मानलें तरी, 'शीतल' हें रूप सिद्ध होण्याकरितां 'शीङ' या ज्ञापकान्वयें त्या धातूंतील शकारापुढें ईकार आल्यास, सवर्णदीर्घ होत नाहीं असें मानणें व 'शकारोऽच्कार्यानिष्पादकः' अशा) अपूर्व वचनाची कल्पना करणें यापेक्षां 'शीतल' हें रूप 'नाज्झलौ' या सूत्राचें उदाहरण आहे असेंच मानणें योग्य आहे. (सारांश जें पाणिनीय सूत्रांनीं सिद्ध होतें त्याच्याकरितां ज्ञापक धुंडण्याचो व मानण्याची गरज काय व तसें मानण्यांत गौरव असून प्रकृत पाणिनीय निषेधक सूत्र असल्यामुळें 'शीतल' या स्थलीं सवर्णदीर्घकार्य झालें नाहीं हें मानण्यांतच लाघव आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा–अत्रेति । अत्रैवेत्यर्थः । यद्यपीति । ग्रहणकशास्त्रस्याद्याप्यनिष्पत्तेरिति भावः ॥

"हो ढः" इत्युपलक्षणम्, रमास्वित्यत्र षत्वम्, वागाशीरित्यत्र "झयो: हः" इत्याकारस्य घकारः, दासीष्टेत्यादौ "दादेः" इति घत्वं च नेति बोध्यम् । यदि तु विवृतमूष्मणामित्यत्र ईषदित्यनुवर्त्य, स्वराणां चेत्यत्र निवर्त्य, प्रयत्नभेदो व्याख्यायते, तदा "नाज्झलौ" इति सूत्रं माऽस्त्विति भाष्ये स्थितम् ॥

('अणुदित्' सू. १४ या सूत्रावरील कौमुदींत 'अत्राण् परेण णकारेण' अशी जी पंक्ति लिहिली आहे त्या पक्तींतील) 'अत्र' या पदाचा 'अत्रैव' असा अर्थ आहे, म्हणजे याच सूत्रांत 'अण्' हा प्रत्याहार पर णकारानें साधला आहे असें समजावें. (अष्टाध्यायींतील इतर सर्व सूत्रांत जेथें जेथें अण्प्रत्याहाराचा निर्देश केला आहे तेथें तेथें तो प्रत्याहार पूर्व णकारानेंच साधलेला प्रत्याहार आहे असें समजावें. 'नाज्झलाविति निषेधो यद्यप्याक्षरसमाम्नायिकानामेव' असें जें प्रकृत सूत्रावरील कौमुदीच्या पंक्तींत म्हटलें आहे त्या पंक्तींत) 'यद्यपि' हीं पदें अशाकरितां घातलीं आहेत कीं, अझून ग्रहणकशास्त्र म्हणजे 'अणुदित्' हें सवर्णग्राहक सूत्र, निष्पन्न–बुद्ध्यारूढ–झालें नाहीं. (अक्षरसमाम्नायांत, म्हणजे माहेश्वरसूत्रांत, जे अच् व हल् साक्षात् पठित आहेत त्यानांच 'नाज्झलौ' हा सवर्णसंज्ञानिषेध लागू पडतो. 'अ' हा वर्ण जरी अक्षरसमाम्नायांत पठित आहे तरी 'आ' हा वर्ण त्यांत पठित नाहीं व म्हणून तो निषेध 'आ' ला लागू पडत नाहीं आणि आकार व हकार या दोन वर्णांत स्थानसाम्य व आभ्यन्तरप्रयत्नसाम्य असल्यामुळें, 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' सू. १० या सवर्णसंज्ञाविधायक पूर्व सूत्रान्वयें हकारानें आकाराचें ग्रहण होण्याची आपत्ति येते. ती टाळण्याकरितांच 'नाज्झलौ' या उत्तर सूत्रांत दीक्षितांनीं आकारप्रश्लेष केला आहे. पण 'अणुदित्सवर्णस्य' या ग्रहणकशास्त्रान्वयें अक्षरसमाम्नायांत पठित असलेल्या अकारानें आकाराचें ग्रहण

होऊं शकतेंच, व अशा रीतीनें 'नाज्झलौ' या निषेधान्वयें जसा हकार अकाराचा सवर्ण होऊं शकत नाहीं तसा तो आकाराचा देखील सवर्ण होऊं शकत नाहीं आणि म्हणून 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष करण्याची कांहीं गरज नाहीं अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर दीक्षितांनीं मनोरमेंत 'ग्रहणकशास्त्रस्याद्याप्यनिष्पत्तेः' हें उत्तर दिलें आहे. दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रथम वर्णांचा उपदेश, नंतर इत्संज्ञा, नंतर प्रत्याहारसिद्धि, नंतर सवर्णसंज्ञा, आणि अखेरीस 'अणुदित्' या सूत्रानें सवर्णांचें ग्रहण असा जो क्रम 'नाज्झलौ' या सूत्रावरील भाष्यांत सांगितला आहे त्या क्रमान्वयें सवर्णांचें ग्रहण होणें हें सर्वांच्या शेवटीं होऊं शकत असल्यामुळें, 'अणुदित्' या सूत्राचा उपयोग, त्याच्या पूर्वीं पठित असलेल्या 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' व 'नाज्झलौ' या सूत्रांनीं होणाऱ्या सवर्णसंज्ञेचे ठिकाणीं, करतां येत नाहीं. त्यामुळें 'तुल्यास्य-प्रयत्नं सवर्णम्' या सूत्रानें, 'नाज्झलौ' हें निषेधक सूत्र असून देखील, हकारानें आकाराचें ग्रहण होण्याची जी आपत्ति येते ती टाळण्याकरितां, 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष करणें आवश्यक आहे. सारांश 'नाज्झलौ' या सूत्रावरील भाष्यांत जो वाक्यापरिसमाप्तिन्याय सांगितला आहे त्याला अनुसरूनच दीक्षितांनीं वरील उत्तर दिलें आहे. त्या न्यायाचें विवरण पूर्वीं केलेंच आहे व पुढें शब्दरत्नांत करण्यांत येईल.) 'हो ढः' सू. ३२४ हें सूत्र केवळ उदाहरणरूपानें सांगितलें आहे. (म्हणून 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष केला असल्यामुळें, ज्याप्रमाणें विश्वपा + भिस्=विश्वपाभिः' या स्थलीं 'विश्वपा' यांतील अन्त्य आकारापुढें 'भिस्' प्रत्ययांतील भकार हा झल् असून देखील त्या आकारप्रश्लेषामुळें हकारानें आकाराचें ग्रहण होत नसल्याकारणानें 'हो ढः' या सूत्रानें 'विश्वपा' यांतील अन्त्य आकाराचें ढत्व होत नाहीं त्याचप्रमाणें) 'रमासु' या उदाहरणांत षत्व होत नाहीं, व तसेंच 'वागाशीः' या उदाहरणांत 'झयो होऽन्यतरस्याम्' सू. ११९ या सूत्रानें आकाराचा घकार होत नाहीं, आणि 'दासीष्ट' इत्यादि

उदाहरणांत 'दादेर्धातोर्घः'. सू. ३२५ या सूत्रानें हाणारें घत्व होत नाहीं हें जाणावें. (इण्प्रत्याहारान्तर्गत हकारानें आकाराचें ग्रहण झाल्यास 'रमासु' या उदाहरणांत आकारापुढें 'सु' प्रत्यय आला असल्यामुळें, त्या प्रत्ययांतील सकाराचें 'आदेशप्रत्यययोः' सू. २१२ या सूत्रानें षत्व होण्याची आपत्ति येते. तसेंच 'वाग्+आशीः= वागाशीः' या उदाहरणांत 'ग्' या झय्पुढें आकार आला असल्यामुळें, हकारानें त्या आकाराचें ग्रहण केल्यास्, 'झयो हः' सू. ११९ या सूत्रानें त्या आकाराचें वैकल्पिक घत्व होण्याची आपत्ति येते. त्याच-प्रमाणें 'दा+सीयुट्+सुट्+त=दासीष्ट' दासीष्ट या उदाहरणांत 'दा' हा धातु दकारानें सुरु होणारा असल्यामुळें व त्या दकारापुढें आकार असून त्या आकारापुढें 'स्' हा झल् असल्यामुळें, हकारानें आकाराचें ग्रहण केल्यास, 'दादेर्धातोर्घः' या सूत्रानें आकाराचें घत्व होण्याची आपत्ति येते. वर दर्शविलेल्या सर्व आपत्ति टाळण्याकरितांच 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष केला आहे व त्यामुळें हकारानें जसें अकाराचें ग्रहण होत नाहीं तसें आकाराचें देखील ग्रहण होत नाहीं. आतां हकारानें आकाराचें ग्रहण न व्हावें याकरितां 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष करण्याची जशी दीक्षितांस आवश्यकता वाटली तशी शकार व षकार यांनीं दीर्घ व प्लुत ईकार, दीर्घ व प्लुत ॠकार यांचें अनुक्रमें ग्रहण न व्हावें याकरितां तशा दीर्घ व प्लुत ईकाराचा व ॠकाराचा प्रश्लेष करण्याची त्यांना आवश्यकता कां वाटली नाहीं असा कोणी प्रश्न केल्यास, त्याला उत्तर हें आहे कीं, 'अणुदित' या सूत्रांतील पर णकारानें साधलेल्या अण्प्रत्याहारांत जसा 'ह्' या ऊष्मवर्णाचा अन्तर्भाव होतो तसा श्, ष् या ऊष्मवर्णांचा अन्तर्भाव होत नसल्यामुळें व त्या सूत्रान्वयें अण् हाच सवर्णांचा संग्राहक होऊं शकत असल्यामुळें दीक्षितांना तसा प्रश्लेष करण्याची कांहींच गरज वाटली नाहीं. दीर्घ ॡकार संस्कृत भाषेंत नाहींच आणि ऱ्हस्व ऌकार व सकार यांचें उच्चारणस्थान व आभ्यन्तरप्रयत्न जरी एकच

आहे तरी ते वर्ण अनुक्रमें अच् व हल् असल्यामुळें 'नाज्झलौ' या निषेधकसूत्रान्वयें ते सवर्ण होऊं शकत नाहींत हें उघड आहे. तसेंच 'ऋ, र्' यांचें जरी स्थानसाम्य आहे तरी त्यांचा आभ्यन्तरप्रयत्न भिन्न असल्यामुळें, ते सवर्णच ठरत नाहींत व हेंच इतर अन्तःस्थ वर्णसंबन्धानें देखील समजावें. जर 'विवृतमूष्मणाम्' या वचनांत 'ईषत्' या पदाची अनुवृत्ति केली व 'स्वराणां च' या स्थलीं त्या पदाची निवृत्ति केली व अशा रीतीनें ऊष्मवर्ण व स्वर यांचा आभ्यन्तरप्रयत्न भिन्न आहे असें व्याख्यान केलें तर, 'नाज्झलौ' हें सूत्र असण्याची कांहीं आवश्यकता नाहीं असें (त्या सूत्रावरील) भाष्यांत सांगितलें आहे. (पाणिनीय शिक्षेंत वास्तविक 'स्वराणामूष्मणां चैव विवृतं करणं स्मृतम्' असें वचन आहे. 'नाज्झलौ' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं या वचनाचा उल्लेख केला नसून, 'स्पृष्टं करणं स्पर्शानाम्, ईषत्स्पृष्टमन्तःस्थानाम्, विवृतमूष्मणाम्, स्वराणां च' हीं चार शौनक प्रातिशाख्यांतील सूत्रें पठित केलीं आहेत व द्वितीय सूत्रांतून तृतीय सूत्रांत 'ईषत्' हें पद अनुवृत्त होत नाहीं व त्या सूत्रांत तृतीय सूत्रांतून 'विवृतम्' एवढेंच पद अनुवृत्त होतें असें त्यांनीं म्हटलें आहे. तें भाष्य पूर्वीं दिलेंच आहे. त्या भाष्यांत भाष्यकारांनीं ऊष्मवर्णांचा आभ्यन्तरप्रयत्न ईषद्विवृत व स्वरांचा आभ्यन्तरप्रयत्न विवृत मानून 'नाज्झलौ' या सूत्राचें प्रत्याख्यान केलें आहे. या भाष्यान्वयें ऊष्मवर्ण व स्वर या दोहोंत आभ्यन्तरप्रयत्नसाम्य राहत नसल्यामुळें, ह्, श्, ष्, स् हे ऊष्मवर्ण जसे अ, इ, ऋ, ऌ या ऱ्हस्वस्वरांचे सवर्ण होऊं शकत नाहींत तसेच ते त्या दीर्घ व प्लुत स्वरांचे देखील सवर्ण होऊं शकत नाहींत व त्यामुळें 'नाज्झलौ' या सूत्रांत दीर्घ व प्लुत आकाराचा प्रश्लेष करण्याची कांहीं गरज राहत नाहीं. पण दीक्षितांनीं शिक्षेंतील पाणिनीय वचन प्रमाण मानून, हकारानें दीर्घ व प्लुत आकाराचें ग्रहण न व्हावें याकरितां त्या आकारांचा 'नाज्झलौ' या सूत्रांत प्रश्लेष केला आहे.)

शब्दरत्न–अत्रैवेति। ग्राहकसूत्र एवेत्यर्थः। अत्र च "उऋृत्" इति सूत्रे तपरत्वं मानम्––तद्धि चुरादिण्यन्तात्कृतधातोर्लुङ्यचीकृतदित्यत्र दीर्घाकारस्य स्थाने ह्रस्व एव यथा स्यादित्यर्थम्। पूर्वेणात्राग्रहणे तूद्देश्येन, विधेयेन च ऋकारेणानत्वाद्भिन्नकालाग्रहणेन न तस्य स्थानित्वं न वा आदेशत्वं प्रसक्तमिति व्यर्थं तत्स्यात्। न च तपरसूत्रेण ऌकारग्रहणार्थं तत्, स्थानेऽन्तरतमपरिभाषया ऋकारस्थाने तस्य वारणेन तद्ग्रहणे फलाभावात्। न चैवं ज्ञापितेऽपि भाव्यमानत्वात्सवर्णग्रहणाप्रसक्तेस्तद्वैयर्थ्यम्, तपरत्वाभावे आदेशान्तरनिवृत्त्यर्थत्वेन स्वरूपाभ्यनुज्ञानार्थतयाऽपूर्वबोध्यत्वाभावेनाविधेयत्वात्। कृते तु तपरत्वे भाव्यमानताऽपीत्यन्यदेतत्।

'अत्रैव' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा 'ग्राहकसूत्रे एव,' म्हणजे 'अणुदित्सवर्णस्य' या ग्रहणक शास्त्रामध्येंच, असा अर्थ आहे. 'अणुदित्सवर्णस्य' या सूत्रांत निर्दिष्ट असलेला अण्प्रत्याहार पर णकारानें साधला आहे याला 'उऋृत्' सू. २५६७ या सूत्रांतील तपरकरण प्रमाण आहे. तें तपरकरण अशाकरितां केलें आहे कीं, चुरादिगणांत पठित असलेल्या णिजन्त 'कृत्' धातूचा लुङ् केला असतां, 'अचीकृतत' या स्थलीं दीर्घ ऋकाराचे जागीं ऱ्हस्व ऋकार व्हावा. जर 'अणुदित्' या सूत्रांत निर्दिष्ट असलेला अण्प्रत्याहार पूर्व णकारानें म्हणजे 'अइउण्' या प्रथम शिवसूत्रांतील णकारानें, साधला आहे असें मानलें तर, 'उऋृत्' या सूत्रांतील उद्देश्य ऋकार व विधेय ऋकार हे दोन्ही अण्भिन्न ठरून ऱ्हस्व ऋकार भिन्नकालिक ऋकाराचा, म्हणजे दीर्घ ऋकाराचा, ग्राहक होऊं शकणार नाहीं व त्यामुळें ('कृत्' धातूंतील) दीर्घ ऋकार स्थानी होऊं शकणार नाहीं व अशा रीतीनें त्याचे ठिकाणीं जर स्थानित्वच येत नाहीं तर त्याचे ठिकाणीं आदेश होण्याचा प्रसंगच येऊं शकत नाहीं आणि त्यामुळें 'उऋृत्' हें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. ('उऋृत' या सूत्रांत 'उः' ही 'ऋ' ची षष्ठी आहे. पूर्व णकारानें 'अणुदित्' या सूत्रांत

निर्दिष्ट असलेला अण्प्रत्याहार साधल्यास, 'अ, इ, उ' एवढेच अण् होतील व ऋकार अण् होणार नाहीं आणि त्यामुळें ग्रहणक शास्त्रान्वयें तो ऋकार सवर्णाचा–दीर्घ ऋकाराचा–ग्राहक होऊं शकणार नाहीं. त्यामुळें 'उर्ऋत्' या सूत्राचा 'ऱ्हस्वऋकारस्थाने ऱ्हस्वऋकारादेशो भवति' असा अर्थ करावा लागेल व तसा अर्थ केल्यास कोणतेंहि फल निष्पन्न होणार नाहीं व ज्या धातूच्या उपधेंत दीर्घ ऋकार आहे तो वरील अर्थान्वयें स्थानी ठरूं शकत नसल्यामुळें, तशा दीर्घ ऋकाराचे जागीं ऱ्हस्व ऋकारादेश होऊं शकणार नाहीं आणि त्यामुळें 'अचीकृतत्' हें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. ही आपत्ति टाळण्याकरितां 'अणुदित्' या सूत्रांत निर्दिष्ट असलेला अण्प्रत्याहार पर णकारानें साधला आहे असें मानणें आवश्यक आहे. तसें मानलें म्हणजे, 'उर्ऋत' या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या उद्देश्य ऋकारानें दीर्घ ऋकाराचें ग्रहणक शास्त्रान्वयें ग्रहण होऊन दीर्घ ऋकार ऱ्हस्व ऋकारादेशाचा स्थानी ठरत असल्यामुळें, 'अचीकृतत्' हें इष्ट रूप सिद्ध होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं आणि अशा रीतीनें 'उर्ऋत्' या सूत्रांतील तपरकरण, 'अणुदित्' या सूत्रांत निर्दिष्ट असलेला अण्प्रत्याहार 'लण्' या शिवसूत्रांतील पर णकारानें साधला आहे याचें, ज्ञापक ठरतें. 'अ + कृत् + णि + चङ + त्' या स्थलीं 'कृत्' धातु णिजन्त असल्यामुळें 'णिश्रिद्रुस्रुभ्यः कर्तरि चङ' सू. २३१२ या सूत्रानें 'च्लि' चे जागीं चङ होऊन व 'उर्ऋत्' या सूत्रानें 'कृत्' यांत उपधेंत असलेल्या दीर्घ ऋकाराचे जागीं ऱ्हस्व ऋकार होऊन व 'चङि' सू. २३१५ या सूत्रानें द्वित्व होऊन व 'उरत्' सू. २२४४ या सूत्रानें अभ्यासांतील ऋकाराचे जागीं अकार व 'कुहोश्चुः' सू. २२४५ या सूत्रानें अभ्यासांतील ककाराचे जागीं चकार होऊन व या स्थलीं 'सन्वल्लघुनि' सू. २३१६ या सूत्रानें सन्वद्भाव होत असल्यामुळें, 'सन्यतः' सू. २३१७ या सूत्रानें अभ्यासांतील अकाराचे जागीं इकार होऊन व 'दीर्घो लघोः'

सू. २३१८ या सूत्रानें तो ऱ्हस्व इकार दीर्घ होऊन व 'णेरनिटि' सू. २३१३ या सूत्रानें णिलोप होऊन 'अचिकृतत्' असें इष्ट रूप सिद्ध होतें हें लक्षांत ठेवावें. आतां 'उरृत्' या सूत्रांतील तपरकरण, 'अणुदित्' या सूत्रांत निर्दिष्ट असलेला अण्प्रत्याहार पर णकारानें साधला आहे यांचें, ज्ञापक आहे असें जें शब्दरत्नकारांनीं म्हटलें आहे त्यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, तें तपरकरण इतर रीतीनें चरितार्थ ठरत असल्यामुळें, 'अत्राण् परेण णकारेण' याचें तें ज्ञापक मानतां येत नाहीं. तें तपरकरण इतर रीतीनें कसें चरितार्थ ठरतें हें तो पुढील पंक्तींत सांगतो.) 'तपरस्तत्कालस्य' सू. १५ या तपर सूत्रान्वयें ऋकारानें लृकाराचें ग्रहण व्हावें याकरितां तें तपरकरण केलें आहे. पण (शब्दरत्नकार म्हणतात कीं,) हें म्हणणें वरोबर नाहीं; कारण 'स्थानेऽन्तरतमः' सू. ३९ या परिभाषेनें ऋकाराचे ठिकाणीं लृकारादेशाचें वारण होत असल्यामुळें, ऋकारानें लृकाराचें ग्रहण केल्यानें कांहींच फलनिष्पत्ति होत नाहीं. ('तपरस्त-त्कालस्य' १–१–७० या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारानीं असा प्रश्न केला आहे कीं, तें सूत्र नियमार्थ सूत्र आहे किंवा प्रापक–स्वतंत्र विधायक–सूत्र आहे व या प्रश्नाचें उत्तर देतांना भाष्यकार असें म्हणतात कीं, जर 'अणुदित्' या पूर्व सूत्रांतून 'अण्' या पदाची या उत्तर सूत्रांत अनुवृत्ति केली तर हें सूत्र नियमार्थ ठरतें, आणि जर या सूत्रांत 'अण्' या पदाची अनुवृत्ति केली नाहीं तर हें स्वतंत्र विधिसूत्र ठरतें. हें स्वतंत्र विधिसूत्र ठरल्यास, अणाखेरीज इतर कोणताहि वर्ण तपर केल्यास, जरी 'अणुदित्' या सूत्रानें त्या वर्णानें कोणत्याहि सवर्णाचें ग्रहण होऊं शकत नाहीं तरी, 'तपरस्तत्कालस्य' या सूत्रान्वयें त्या वर्णानें तत्कालिक सवर्णाचें ग्रहण होऊं शकतें. शंकाकारानें 'तपरस्तत्कालस्य' हें विधिसूत्र मानूनच वरील शंका उपस्थित केली आहे. त्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'उरृत' या सूत्रांत अण्भिन्न ऱ्हस्व ऋकार

तपर केला असल्यामुळें, त्या तपरकरणाच्या सामर्थ्यानें, 'ऋऌवर्णयोः मिथः सावर्ण्यं वाच्यम्' या वार्तिकान्वयें ऱ्हस्व ऋकाराचा सवर्ण जो तत्कालिक ऱ्हस्व ऌकार आहे त्याचें ग्रहण होऊं शकतें व त्यामुळें 'उरॄत्' या सूत्राचा 'ऱ्हस्वऋकारस्य स्थाने ऱ्हस्वऋकारादेशः स्यात्' असा अर्थ न होतां, 'ऱ्हस्वऋकारस्य स्थाने ऌकारादेशोऽपि भवति' असा त्या सूत्राचा अर्थ होतो. त्यामुळें तें सूत्र व्यर्थ ठरत नाहीं आणि धातूच्या उपधेंतील ऋकाराचे जागीं ऌकारादेश देखील व्हावा याकरितां तें तपरकरण केलें असल्यामुळें व अशा रीतीनें तें तपरकरण चरितार्थ ठरत असल्यामुळें, 'अत्राण् परेण णकारेण' याचें तें ज्ञापक मानतां येत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'तपरस्तत्कालस्य' हें जरी विधिसूत्र मानलें व त्या सूत्राच्या आधारावर 'ऋत्' यांतील तपरकरणामुळें ऋकारानें जरी ऌकाराचें ग्रहण केलें तरी, ऋकार व ऌकार यांचें उच्चारणस्थान भिन्न असल्यामुळें व अशा रीतीनें त्या दोन वर्णांत आन्तरतम्य–अत्यंत सादृश्य–नसल्यामुळें आणि 'स्थानेऽन्तरतमः' या परिभाषेनें स्थानीचे जागीं अन्तरतम आदेश होणें सांगितलें असल्यामुळें, ऋकाराचे जागीं ऌकारादेश होऊंच शकत नाहीं आणि त्यामुळें ऌकारग्रहण हें तपरकरणाचें फल आहे असें मानलें तरी त्यापासून कोणतेंहि फल निष्पन्न होऊं शकत नाहीं. सारांश तें तपरकरण इतर रीतीनें चरितार्थ ठरत नसल्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणें 'अत्राण् परेण णकारेण' याचें तें ज्ञापक आहे हेंच मानणें उचित आहे.)

'उरॄत्' या सूत्रांतील तपरकरणानें 'अणुदित्' या सूत्रांतील अण्-प्रत्याहार पर णकारानें साधला आहे असें जरी ज्ञापित होत असलें तरी, ऋकार हा भाव्यमान–विधीयमान किंवा पुढें होणारा–आदेश असल्यामुळें, म्हणजे तसा आदेश होण्याचें त्या सूत्रांत विधान केलें असल्यामुळें, ('भाव्यमानेन सवर्णानां ग्रहणं न'–परि. १९–या परिभाषान्वयें) तो ऋकार सवर्णाचा ग्राहक होऊंच शकत नाहीं

आणि त्यामुळें त्या सूत्रांतील तपरकरण व्यर्थ ठरतें असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण तपरकरण न केल्यास, त्या सूत्राचा एवढाच अर्थ होईल कीं, आदेशान्तराची, म्हणजे अर्, इर्, आर् या आदेशांची, निवृत्ति होऊन स्थानी आपलें मूळ स्वरूपच कायम ठेवितो, व असा अर्थ केल्यानें कोणत्याहि प्रकारचा अपूर्व बोध होत नसल्यामुळें, ऋकाराचे ठिकाणीं विधीयमानत्व–भाव्यमानत्व येऊं शकत नाहीं. (व त्यामुळें त्या ऋकाराला भाव्यमानपरिभाषा –परि. १९–लागू पडणार नाहीं.) तपरकरण केल्यानें ऋकाराचे ठिकाणीं भाव्यमानता देखील येते ही गोष्ट वेगळी. (शंकाकाराचें असें म्हणणें आहे कीं, 'भाव्यमानेन सवर्णानां ग्रहणं न' ही परिभाषा असल्यामुळें, अण्प्रत्याहार पर णकारानें साधला आहे व त्यामुळें ऋकार हा अण् आहे असें जरी मानलें तरी, 'उरृत्' या सूत्रांत ऋकारादेशाचें विधान केलें असल्यामुळें, तो विधीयमान् ऋकार वरील परिभाषान्वयें व 'अणुदित्' या सूत्रांतील 'अप्रत्ययः अविधीयमानः' या निषेधान्वयें सवर्णाचा ग्राहक होऊंच शकत नाहीं. त्यामुळें त्या सूत्रांतील तपरकरण व्यर्थ ठरतें व अशा रीतीनें तें तपरकरण 'स्वांशे'–स्वविषयांत–चरितार्थ ठरत नसल्यामुळें, 'अत्राण् परेण णकारेण' याचें तें ज्ञापक मानतां येत नाहीं; कारण 'स्वांशे चारितार्थ्यम, वचनसिद्धिः, फलमन्यस्थलेष्वपि' असें ज्ञापकाचें लक्षण असल्यामुळें, ज्याला ज्ञापक मानणें आहे तें स्वांशे चरितार्थ असणें आवश्यक आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, ज्या भाव्यमानपरिभाषेच्या आधारावर शंकाकार 'उरृत्' या सूत्रांतील तपरकरण व्यर्थ ठरवूं पाहतो ती परिभाषा अशाच ठिकाणीं लागू पडते कीं, जेथें भाव्यमान–विधीयमान–आदेशाचे ठिकाणीं अपूर्वबोध्यत्व आहे. जेथें स्थानीच्या स्वरूपाहून भिन्न अशा आदेशाचें विधान केलें असेल तेथेंच आदेशाचे ठिकाणीं अपूर्वबोध्यत्व आहे असें म्हणतां येतें व तशाच आदेशाचे ठिकाणीं भाव्यमानपरिभाषा लागू

पडते. पण जसा स्थानी आहे त्याच स्वरूपाचा आदेश त्याचे जागीं व्हावा असें जेथें विधान केलें असेल तेथें आदेश स्थानीच्या स्वरूपांत कोणताहि फरक करत नसून आदेश झाल्यावर देखील स्थानीचें मूळ स्वरूप जसेचें तसेंच कायम राहत असल्यामुळें, तशा आदेशाचे ठिकाणीं पूर्वीं जें ज्ञात नाहीं त्याचें ज्ञान करून देणारें अशा प्रकारचें अपूर्वबोध्यत्व येत नाहीं व त्यामुळें तशा आदेशाला भाव्यमान–परिभाषा लागू पडत नाहीं. उदाहरणार्थ 'त्यदादीनामः' सू. २६५ या सूत्रानें 'त्यद्' इत्यादि सर्वनामांच्या अन्त्य वर्णाचे जागीं अकारादेश होणें सांगितलें आहे. हा आदेश स्थानीहून भिन्न स्वरूपाचा असल्यामुळें त्याचे ठिकाणीं अपूर्वबोध्यत्व आहे आणि त्यामुळें त्या आदेशाला भाव्यमानपरिभाषा लागू पडते. म्हणून 'इदम्,' या सर्वनामाहून विभक्तिप्रत्यय केला असतां, 'इदम्' यांतील अन्त्य मकार अनुनासिक असून देखील त्याचे जागीं अनुनासिक अकारादेश न होतां निरनुनासिक अकारादेशच होतो; कारण अनुनासिक अकार जरी निरनुनासिक अकाराचा सवर्ण आहे तरी, 'त्यदादीनामः' या सूत्रांत निरनुनासिक अकाराचें ग्रहण केलें असल्यामुळें त्या भाव्यमान निरनुनासिक अकारानें, भाव्यमान–परिभाषान्वयें, अनुनासिक अकाराचें ग्रहण करतां येत नाहीं. आतां 'उरृत' या सूत्रांत जर तपरकरण केलें नाहीं व तें सूत्र केवळ कार्यान्तरव्यावृत्ति–म्हणजे अर्, इर्, आर्, या आदेशांची निवृत्ति–व्हावी व स्थानी जसाचा तसाच कायम राहावा याकरितां केलें आहे असें शंकाकाराच्या म्हणण्याप्रमाणें मानलें तर, आदेशाचे ठिकाणीं अपूर्वबोध्यत्व येत नसल्यामुळें, तशा आदेशाला भाव्यमान-परिभाषा लागू पडत नाहीं व त्यामुळें उद्देश्य ऋकारानें जसें दीर्घ ऋकाराचें ग्रहण करतां येतें त्याचप्रमाणें विधेय ऋकारानें देखील त्याचा सवर्ण जो दीर्घ ऋकार आहे त्याचें ग्रहण होईल आणि 'स्थानेऽन्तरतमः' या परिभाषान्वयें, 'ऱ्हस्वऋकारस्य स्थाने ऱ्हस्व

ऋकारादेशः स्यात्, दीर्घ ऋकारस्य स्थाने दीर्घऋकारादेशः स्यात्' असा त्या सूत्राचा अर्थ होईल व तसा अर्थ केल्यानें कोणतेंहि विशेष फल निष्पन्न होणार नाहीं. पण त्या सूत्रांतील ऋकार तपर केला असल्यामुळें, त्या सूत्राचा असा अर्थ होतो कीं, स्थानी ऱ्हस्व ऋकार असो किंवा दीर्घ ऋकार असो त्याचे जागीं ऱ्हस्व ऋकारादेशच होतो. अशा रीतीनें दीर्घ ऋकाराचे जागीं जें ऱ्हस्व ऋकारादेश होण्याचें विधान केलें आहे त्या योगानें आदेशाचे ठिकाणीं अपूर्व-बोध्यत्व येतें व तें अपूर्वबोध्यत्व तपरकरणाच्या सामर्थ्यानेंच येत असल्यामुळें, तें तपरकरण 'स्वांशे' चरितार्थ ठरतें हें उघड आहे. म्हणून शंकाकाराचें जें म्हणणें आहे कीं, तें तपरकरण स्वांशे चरितार्थ ठरत नसल्यामुळें 'अत्राण् परेण णकारेण' याचें तें ज्ञापक मानतां येत नाहीं तें त्याचें म्हणणें चूक ठरतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न–अनिष्पत्तेरिति । 'वर्णानामुपदेशस्तावत्, तदुत्तरकालमित्सञ्ज्ञा, तदुत्तरम् "आदिरन्त्येन" इति प्रत्याहारः, तदुत्तरकाला सवर्णसञ्ज्ञा, तदुत्तरकालं "अणुदित्" इति, एतेन समुदितेनान्यत्र सवर्णानां ग्रहणम्' इति वाक्यापरिसमाप्तिन्यायादित्यर्थः । अयं भावः–"आदिरन्त्येन" इति प्रत्याहारसिद्धौ "नाऽज्झलौ" इत्येतद्वाक्यार्थबोधे सति, निर्णीतैतद्विषयपरिहारेण सवर्णपदबोध्यत्वनिश्चये "अणुदित्" इत्यनेन तावतां ग्रहणं बोधनीयम् । अन्यथा बाधकसम्भावनया तुल्यास्यसूत्रजशक्तिग्रहेऽप्रामाण्यसन्देहेन तच्छास्त्रजबोधानापत्तिः । न चैतद्वाक्यार्थबोधात् प्राक् तन्निश्चय इति । यत्तु–निषेधवाक्यार्थबोधात्पूर्वं विधेर्वाक्यार्थबोध एव नेति, तन्न, पदार्थोपस्थितौ वाक्यार्थबोधे बाधकाभावात्, निषेधस्य प्रतियोगिज्ञानोपपादकतया विध्यपेक्षत्वेऽपि विधेस्तदपेक्षत्वे मानाभावाच्च । रमास्वित्यत्र षत्वमिति । सर्वस्याप्येकया युक्त्या वारणेनापाद्यमानेऽर्थे न्यायानादरादेवमुक्तम् ॥

भाष्ये स्थितमिति । अनेनाऽकारप्रश्लेषे मानं दर्शितम् ।

'ग्रहणकशास्त्रस्याद्याप्यनिष्पत्तेः' असा जो मनोरमेंत हेतु दिला आहे त्याचें कारण हें कीं, 'वर्णानामुपदेशस्तावत्, तदुत्तरकालमित्संज्ञा, तदुत्तरमादिरन्त्येन इति प्रत्याहारः, तदुत्तरकाला सवर्णसंज्ञा, तदुत्तरकालं अणुदित् इति, एतेन समुदितेनान्यत्र सवर्णानां ग्रहणम्' असा वाक्यापरिसमाप्तिन्याय ('नाज्झलौ' १·१·१० या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं सांगितला) आहे. याचा भावार्थ हा आहे कीं, 'आदिरन्त्येन सहेता' सू. २ या सूत्रानें प्रत्याहारांची सिद्धि झाल्यावर 'नाज्झलौ' (या सूत्रांतील अच् व हल् या पदांच्या अर्थाचा बोध होऊन) या संपूर्ण सूत्राच्या अर्थाचा बोध झाल्यानंतर अच् व हल् हें सवर्णसंज्ञक होत नाहींत असें त्या निषेधक सूत्रानें ज्ञान होऊन ('तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' सू. १० या सूत्रांतील) 'सवर्ण' या पदानें कोणत्या सवर्णांचें ग्रहण करतां येतें व कोणत्या सवर्णांचें ग्रहण करतां येत नाहीं याचा निश्चित बोध झाल्यावर 'अणुदित्' या सूत्रानें अण्प्रत्याहारान्तर्गत वर्णांनीं त्या वर्णांचे जे वर्ण सवर्ण ठरतात तेवढ्यांचें ग्रहण होतें. 'नाज्झलौ' या निषेधक सूत्राच्या अर्थाकडे लक्ष न देतां 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' या सवर्ण-संज्ञाविधायक सूत्रान्वयें जे जे सवर्ण ठरतात त्या सर्वांचें ग्रहण केल्यास, त्यांपैकीं कांहीं वर्णांचे ठिकाणीं 'नाज्झलौ' या निषेधक सूत्रानें सवर्णसंज्ञेचा बाध होण्याचा संभव असल्यामुळें, 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' या सूत्रान्वयें ज्यांना सवर्ण मानलें आहे ते वास्तविक सवर्ण आहेत किंवा नाहींत याबद्दल संदेह उत्पन्न होऊन, त्या सूत्राच्या अर्थाचा निश्चित बोध न होण्याची आपत्ति येते. 'नाज्झलौ' या निषेधक सूत्राच्या अर्थाचा बोध होण्यापूर्वी 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' या सूत्राच्या अर्थाचा निश्चित बोध होऊं शकत नाहीं. (वर जो वाक्यापरिसमाप्तिन्याय सांगितला आहे त्याचें पूर्वी विस्तृत विवेचन केलेंच आहे व त्या न्यायाचा थोडक्यांत भावार्थ हा आहे कीं, जेथें

अनेक पोटवाक्यांनीं महावाक्य बनलें असतें तेथें त्या पोटवाक्यांपैकीं एक पोटवाक्य प्रधान असून बाकीचीं पोटवाक्यें त्याचीं अङ्गभूत असतात व त्या अङ्गभूत पोटवाक्यांचा अर्थ सिद्ध झाल्याशिवाय प्रधान–मुख्य–पोटवाक्याचा अर्थ सिद्ध होऊं शकत नाहीं, आणि या अङ्गभूत पोटवाक्यांचा अर्थ करतेवेळीं प्रधान पोटवाक्याच्या अर्थाचा उपयोग करतां येत नाहीं. अशा अर्थाचा हा न्याय असल्यामुळें व महावाक्यांत 'अणुदित्' हें मुख्य पोटवाक्य असून 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' व 'नाज्झलौ' हीं पोटवाक्यें त्याचीं अङ्गभूत असल्यामुळें, 'नाज्झलौ' या अङ्गभूत पोटवाक्याचा अर्थ करतेवेळीं 'अणुदित्' या मुख्य पोटवाक्याच्या अर्थाचा उपयोग करतां येत नाहीं, म्हणजे प्रथम वर्णांचा उपदेश, नंतर इत्संज्ञा, नंतर प्रत्याहारसिद्धि, नंतर सवर्णसंज्ञा व अखेरीस सवर्णांचें ग्रहण असा क्रम असल्यामुळें व या क्रमाप्रमाणें सवर्णांचें ग्रहण हें सर्वांच्या शेवटीं असल्यामुळें, 'नाज्झलौ' या अङ्गभूत व पूर्वीं असणाऱ्या पोटवाक्याचा अर्थ करतेवेळीं सर्वांच्या अखेरींस असणाऱ्या 'अणुदित्' या मुख्य पोटवाक्याच्या अर्थाचा उपयोग करतां येत नाहीं. त्यामुळें 'नाज्झलौ' या निषेधक सूत्रान्वयें जरी हकारानें अक्षरसमाम्नायांत साक्षात् पठित असलेल्या अकाराचें ग्रहण होऊं शकत नाहीं तरी दीर्घ व प्लुत आकार अक्षरसमाम्नायांत पठित नसल्यामुळें व अशा रीतीनें 'नाज्झलौ' या निषेधक सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या अच्प्रत्याहारानें त्यांचें ग्रहण होऊं शकत नसल्यामुळें. हकारानें त्यांचें ग्रहण होण्याची आपत्ति येते. हें खरें कीं, 'अणुदित्' या ग्रहणकशास्त्रान्वयें अकारानें दीर्घ व प्लुत आकाराचें ग्रहण करतां येतें, व तसें केल्यास, हकारानें जसें अकाराचें ग्रहण होऊं शकत नाहीं तसेंच दीर्घ व प्लुत आकाराचें देखील ग्रहण होऊं शकणार नाहीं. पण वर सांगितलेल्या वाक्यापरिसमाप्तिन्यायान्वयें 'नाज्झलौ' या सूत्राचा अर्थ करतेवेळीं 'अणुदित्' या सूत्राच्या अर्थाचा उपयोग

करतां येत नसल्यामुळें, वर दर्शविलेली आपत्ति टाळतां येत नाहीं. ती आपत्ति टाळण्याकरितांच 'नाज्झलौ' या सूत्रांत दीक्षितांना दीर्घ व प्लुत आकाराचा प्रश्लेष करणें भाग पडलें असा शब्दरत्न-कारांच्या म्हणण्याचा आशय आहे. तसेंच, 'प्रकल्प्य चापवादविषयं तत उत्सर्गोऽभिनिविशते'–परि. ६४–, म्हणजे प्रथम अपवादाच्या कक्षेंत येणारीं उदाहरणें वगळून नंतर उरलेल्या उदाहरणांतच सामान्य शास्त्र प्रवृत्त होतें, अशी परिभाषा असल्यामुळें, एखाद्या विधिसूत्राच्या अर्थाचा निश्चित बोध होण्याकरितां, म्हणजे तें सूत्र कोठें प्रवृत्त करावें व कोठें प्रवृत्त करूं नये याचें निश्चित ज्ञान होण्याकरितां, त्या सूत्राची जीं निषेधक व अपवादक सूत्रें आहेत त्यांचें ज्ञान असणें आवश्यक आहे. तसें ज्ञान असलें म्हणजेच, निषेधक व अपवादक सूत्रांच्या कक्षेंत जीं उदाहरणें येतात तीं वगळून इतर स्थलीं सामान्यशास्त्राचा उपयोग करावा हें निश्चित ज्ञान होऊं शकतें. तसें ज्ञान पूर्वीं करून न घेतां सामान्यशास्त्राचा सर्वत्र उपयोग केल्यास, अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल. उदाहरणार्थ 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' सू. १६४ या सूत्राचें 'नादिचि' सू. १६५ हें निषेधक सूत्र आहे. या निषेधक सूत्राच्या अर्थाचें प्रथम ज्ञान करून न घेतां, 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' हें सामान्यशास्त्र सर्वत्र प्रवृत्त केल्यास, 'राम + औ=रामा, विश्वपा + औ = विश्वपा' इत्यादि अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल. तसेंच 'झोऽन्तः' सू. २१६९ या सूत्राचें 'अदभ्यस्तात्' सू. २४७९ हें अपवादक सूत्र आहे. या अपवादक शास्त्राच्या अर्थाचें प्रथम ज्ञान करून न घेतां, 'झोऽन्तः' हें सामान्यशास्त्र सर्वत्र प्रवृत्त केल्यास, 'ददन्ति, दधन्ति, नेनिजन्ति' इत्यादि अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल. म्हणून सामान्यशास्त्र व त्याची जीं निषेधक व अपवादक शास्त्रें आहेत त्या सर्वांची एकवाक्यता करून सामान्यशास्त्राच्या अर्थाचा निश्चित बोध करून घेणें योग्य आहे. तसें केल्यानेंच सामान्यशास्त्राच्या अर्थाचा निश्चित बोध होऊं शकतो व तें सामान्यशास्त्र कोठें प्रवृत्त करावें व कोठें

प्रवृत्त करूं नये याचें निश्चित ज्ञान होऊं शकतें. म्हणून 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' या सूत्राचें 'नाज्झलौ' हें निषेधक सूत्र असल्यामुळें, त्या दोन्ही सूत्रांची एकवाक्यता करून 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' या सूत्राच्या अर्थाचें निश्चित ज्ञान करून घेणें योग्य आहे. तसें न केल्यास व 'नाज्झलौ' या निषेधक सूत्राकडे दुर्लक्ष करून 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' हें सवर्णसंज्ञाविधायक सूत्र सर्वत्र एकदम प्रवृत्त केल्यास, हकारानें अकाराचें, शकारानें इकाराचें, षकारानें ऋकाराचें व सकारानें ऌकाराचें ग्रहण होण्याची आपत्ति येईल. सारांश निषेधक व अपवादक शास्त्रांच्या अर्थाचा प्रथम बोध करून घेतल्याशिवाय सामान्यशास्त्राच्या अर्थाचा निश्चित बोध होऊं शकत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) निषेधक सूत्राच्या अर्थाचा बोध होण्यापूर्वीं विधिसूत्राच्या अर्थाचा बोध मुळींच होऊं शकत नाहीं हें म्हणणें मात्र बरोबर नाहीं; कारण विधिसूत्रांतील सर्व पदांच्या अर्थाचा बोध झाल्यावर त्या विधिसूत्राच्या अर्थाचा बोध होण्यांत कांहींच बाधक–अडचण–येत नाहीं. दुसरें असें कीं, निषेधक शास्त्र ज्या विधिसूत्राचा निषेध करतें त्या प्रतियोगिस्वरूप विधिसूत्राच्या ज्ञानाचें उपपादन करणारें तें निषेध शास्त्र असल्यामुळें, म्हणजे विधिसूत्रांत जें विधान केलें आहे त्या विधानाला अनुलक्षूनच त्याचा विशिष्ट स्थलीं निषेध करणारें तें निषेधक सूत्र असल्यामुळें, जरी निषेधशास्त्राला विधिसूत्राची अपेक्षा असते, म्हणजे विधिसूत्राचा अर्थ कळल्याशिवाय निषेधक सूत्राच्या अर्थाचा बोध होऊं शकत नाहीं, तरी विधिसूत्राच्या अर्थाचा बोध होण्याकरितां निषेधक सूत्राच्या अर्थाच्या ज्ञानाची आवश्यकता आहे असें मानण्यास कोणतेंहि प्रमाण नाहीं. (सारांश शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जरी विधिसूत्र उच्चारल्याबरोबर त्याचा अर्थ निषेधक सूत्राच्या अर्थाच्या सहायाशिवाय स्वतंत्रपणें कळूं शकतो, तरी तो निश्चित बोध नव्हे. निषेधक सूत्राचा अर्थ जाणल्याशिवाय

व त्या सूत्राची विधिसूत्राशीं एकवाक्यता करून त्या दोन सूत्रांचा मिळून अर्थ केल्याशिवाय आणि निषेधक सूत्रानें विधिसूत्राच्या कक्षेंतून काय वगळलें जातें हें कळल्याशिवाय, विधिसूत्राच्या अर्थाचा निश्चित बोध होऊं शकत नाहीं. तरी पण विधिसूत्रांत निर्दिष्ट असलेल्या पदांच्या अर्थाचा बोध झाल्यावर जसा विधिसूत्राच्या अर्थाचा निषेधक सूत्राच्या सहायाशिवाय स्वतंत्रपणें बोध होऊं शकतो–तो निश्चित बोध नव्हे ही गोष्ट वेगळी–तसा निषेधक सूत्रांच्या अर्थाचा विधिसूत्राच्या सहायाशिवाय स्वतंत्रपणें बोध होऊं शकत नाहीं; कारण विधिसूत्रानें होणाऱ्या कार्याच्या अभावाचें प्रतिपादन करणारें निषेधक सूत्र असल्यामुळें, व अभावज्ञान भावज्ञानाधीन असल्यामुळें, अभावाचें ज्ञान होण्याकरितां ज्याचा अभाव सांगितला आहे त्याचा प्रतियोगी जो भाव त्याचें जसें पूर्व ज्ञान असणें आवश्यक आहे त्याचप्रमाणें निषेधक सूत्राच्या अर्थाचा बोध होण्याकरितां, ज्या विधिसूत्राचा तें निषेध करतें त्या प्रतियोगिविधिसूत्राच्या अर्थाचें पूर्व ज्ञान असणें आवश्यक आहे. उदाहरणार्थ ज्याला घट ही वस्तु मुळींच माहीत नाहीं त्याला जसें घटाभावाचें ज्ञान होणें शक्य नाहीं त्याचप्रमाणें ज्याला 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या विधिसूत्राच्या अर्थाचें ज्ञान नाहीं त्याला त्या विधिसूत्राचें 'नादिचि' हें जें निषेधक सूत्र आहे त्या सूत्राच्या अर्थाचें ज्ञान होणें शक्य नाहीं; कारण 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' हें सूत्र उच्चारतांक्षणींच त्या सूत्रांतील पदांच्या अर्थाचा बोध झाल्यावर जसा त्या सूत्राचा अर्थ कळू शकतो तसा 'नादिचि' हे सूत्र उच्चारलें असतां विधिसूत्राच्या सहायाशिवाय त्याच्या अर्थाचा बोध होऊं शकत नाहीं- 'नादिचि' या सूत्राचा 'अवर्णात् इचि परे न' असा अक्षरार्थ आहे. पण 'न' म्हणजे काय ? 'न' या अभावार्थक पदाचा अर्थ कळण्याकरितां 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या विधिसूत्राच्या अर्थाचें पूर्व ज्ञान असलें पाहिजे व तसें ज्ञान असलें तरच 'न' या पदाचा 'पूर्व-

सवर्णदीर्घो न' असा अर्थ करतां येतो व अवर्णात् प्रथमाद्वितीययोः इचि परे पूर्वसवर्णदीर्घो न स्यात्' असा त्या निषेधक सूत्राचा अर्थ आहे हें ध्यानांत येऊं शकतें, आणि म्हणूनच 'निषेधस्य...माना-भावाच्च' असें शब्दरत्नकारांनीं म्हटलें आहे.) 'रमास्वित्यत्र षत्वम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें, ज्या ज्या कार्यांची प्राप्ति आहे त्या सर्व कार्यांचें निवारण एकाच युक्तीनें, म्हणजे 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष केल्यानें, होत असल्यामुळें, 'पूर्वत्रासिद्धम्' या न्यायाकडे लक्ष न देतां, म्हटलें आहे. ('रमा+सु' या उदाहरणांत, हकारानें आकाराचें ग्रहण केल्यास, वास्तविक प्रथम षत्व पावत नाहीं; कारण 'आदेशप्रत्यययोः' सू. २१२ हें षत्वविधायक सूत्र त्रैपादिक उत्तरसूत्र असून, 'हो ढः' सू. ३२४ व 'षढोः कः सि' सू. २९५ हीं त्रैपादिक पूर्व सूत्रें असल्यामुळें, 'पूर्वत्रासिद्धम्' या न्यायान्वयें त्या पूर्व सूत्रांची प्रथम प्राप्ति आहे. म्हणून दीक्षितांनीं वास्तविक असें म्हणावयास हवें होतें कीं, 'रमासु' या उदाहरणांत हकारानें आकाराचें ग्रहण केल्यास, म्हणजे आकार हकार मानल्यास, त्या आकाराचा प्रथम ढकार होऊन व नंतर ढकाराचा ककार होऊन त्यानंतर 'सु' प्रत्ययांतील सकाराचें षत्व होण्याची आपत्ति येते. परंतु 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष केल्यानें व अशा रीतीनें हकार जसा अकाराचा सवर्ण होत नाहीं तसा तो आकाराचा देखील सवर्ण होऊं शकत नसल्यामुळें त्या एकाच प्रश्लेषरुप युक्तीनें ढत्व, कत्व व षत्व हीं सर्व कार्यें टाळतां येतात आणि म्हणून दीक्षितांनीं मनोरमेंत अखेरीस होणाऱ्या कार्याचीच आपत्ति दाखविली आहे.) 'नाज्झलौ इति सूत्रं माऽस्त्विति भाष्ये स्थितम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें, 'नाज्झलौ' या सूत्रांत आकारप्रश्लेष करण्यास तें भाष्य प्रमाण आहे हे दर्शविण्याच्या हेतूनें म्हटलें आहे. (आकारप्रश्लेष करण्यास तें भाष्य कसें प्रमाण ठरतें याचें पूर्वीं विवेचन केलेंच आहे.)

मनोरमा–"वृद्धिरादैच्" ऐजिह द्विमात्र एव, तात्परत्वात्,

तेन 'कृष्णैकत्वम्' इत्यत्र त्रिमात्रो न । एवमुत्तरसूत्रेऽपि । तेन 'गङ्गोदकम्' इत्यादौ त्रिमात्रो न ॥

'वृद्धिरादैच्' सू. १६ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'ऐच्' नें, म्हणजे 'ऐ, औ' या वर्णांनीं, द्विमात्रिक 'ऐ औ' चेंच ग्रहण होतें; कारण त्या सूत्रांत 'आत्' यांतील तकारानंतर 'ऐच्' चें उच्चारण केलें आहे. त्यामुळें 'कृष्ण+एकत्वम्=कृष्णैकत्वम्' या स्थलीं होणारा वृद्धिरूप एकादेश जो 'ऐ' होतो तो त्रिमात्रिक होत नाहीं. याच-प्रमाणें उत्तर सूत्रांत, म्हणजे 'अदेङ गुण': सू. १७ या सूत्रांत, देखील समजावें. त्यामुळें 'गङ्गा+उदकम्=गङ्गोदकम्' इत्यादि स्थलीं होणारा गुणरूप एकादेश त्रिमात्रिक होत नाहीं. ('तपर-स्तत्कालस्य' या सूत्रांतील 'तपरः' या पदाचा भाष्यकारांनीं 'तः परो यस्मात्' व 'तात् परः' असा दोन तऱ्हेनें विग्रह केला आहे. त्यामुळें ज्या वर्णापुढें तकार जोडला आहे–जसें अत्, इत्, उत् इत्यादि–किंवा ज्या वर्णांपूर्वी तकार उच्चारला आहे अशा दोन्ही प्रकारच्या वर्णांनीं तत्कालिक वर्णांचेंच ग्रहण होतें. 'वृद्धिरादैच्' या सूत्रांत 'आत्' यांतील तकारापुढें 'ऐच्' पठित केला आहे व तसेंच 'अदेङ गुणः' या सूत्रांत 'अत्' यांतील तकारापुढें 'एङ' पठित केला आहे. म्हणून 'तपरस्तत्कालस्य' या सूत्रान्वयें वरील दोन सूत्रांत पठित असलेले एङ व ऐच्, म्हणजे ए, ओ, ऐ, औ हे वर्ण, द्विमात्रिक ए, ओ, ऐ, औ यांचेंच वाचक होतात, आणि या वर्णांनीं त्रिमात्रिक किंवा चतुर्मात्रिक ए, ओ, ऐ, औ यांचें ग्रहण होत नाहीं. सारांश वृद्धिरूप किंवा गुणरूप एकादेश त्रिमात्रिक किंवा चतुर्मात्रिक न होतां द्विमात्रिकच होतो. म्हणूनच 'कृष्ण+एकत्वम्' या स्थलीं अकाराची एक मात्रा असून 'ए' द्विमात्रिक आहे तरी, 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्रानें त्यांचे जागीं होणारा वृद्धिरूप 'ऐ' हा एकादेश आन्तरतम्यानें, म्हणजे स्थानेऽन्तरतमः' या सूत्रान्वयें, त्रिमात्रिक न होतां, द्विमात्रिकच होतो. त्याचप्रमाणें 'खट्वा+ओदनः'

या स्थलीं जरी आ, ओ हे प्रत्येक द्विमात्रिक आहेत तरी त्यांचे जागीं होणारा 'औ' हा वृद्धिरूप एकादेश आन्तरतम्यानें चतुर्मात्रिक न होतां द्विमात्रिकच होतो. याचें कारण हेंच कीं, वर सांगितल्याप्रमाणें 'वृद्धिरादैच्' या सूत्रांत द्विमात्रिक ऐ, औ यांनाच वृद्धिसंज्ञा होणें सांगितलें आहे आणि त्याचप्रमाणें 'अदेङ गुणः' या सूत्रांत द्विमात्रिक ए, औ यांनाच गुणसंज्ञा होणें सांगितले आहे. 'वृद्धिरादैच्' १-१-१ या सूत्रावरील भाष्यांत 'अथ किमर्थमाकारस्तपरः क्रियते' असा प्रश्न करून त्या प्रश्नाचें अखेरीस उत्तर देतांना भाष्यकार म्हणतात– 'इदं तर्हि प्रयोजनम् । आन्तर्यतस्त्रिमात्रचतुर्मात्राणां स्थानिनां त्रिमात्रचतुर्मात्रा आदेशा मा भूवन्निति । खट्वा इन्द्रः खट्वेन्द्रः । खट्वा उदकं खट्वोदकम् । खट्वा ईषा खट्वेषा । ...अथ क्रियमाणेऽपि तकारे कस्मादेव त्रिमात्रचतुर्मात्राणां स्थानिनां त्रिमात्रचतुर्मात्रा आदेशा न भवन्ति । तपरस्तत्कालस्येति नियमात् । ननु तः परो यस्मात्सोयं तपरः । नेत्याह । तादपि परस्तपरः ।' या भाष्याच्या अनुरोधानेंच दीक्षितांनीं प्रकृत सूत्राचें मनोरमेंत वर सांगितल्या-प्रमाणें व्याख्यान केलें आहे.)

मनोरमा–"भूवादयो धातवः" भूश्च वाश्चेति द्वन्द्वः । आदिशब्दयोर्व्यवस्थाप्रकारवाचिनोरेकशेषः । भूवौ आदी येषामिति बहुव्रीहिः । भूप्रभृतयो वासदृशाः । सादृश्यञ्च क्रियावाचकत्वेनेत्यभि-प्रेत्याह–क्रियावाचिन इति । क्रियावाचिनः किम् ? "याः पश्यसि" इत्यादौ धातुत्वं मा भूत् । सति हि तस्मिन्, "आतो धातोः" इति स्यात् । भ्वादयः किम् ? 'हिरुक्' 'पृथक्' इत्याद्यव्ययानाम्, 'शिश्ये' इति भावार्थतिङन्तस्य च मा भूत् स्तम्भ्वादीनामुदित्करणेन सौत्राणां धातुत्वं ज्ञाप्यते । चुलुम्पादीनां तु "बहुलमेतन्निदर्शनम्" इति गणसूत्रेण सङ्ग्रहः ॥

'भूवादयो धातवः' सू. १८ या सूत्रांतील 'भूवादयः' या पदाचा 'भूश्च वाश्च' असा प्रथम द्वन्द्वसमास करून व नंतर व्यवस्था-

वाचक आणि प्रकारवाचक अशा दोन 'आदि' या पदांचा एकशेष करून अखेरीस 'भुवौ आदी येषाम्' असा बहुव्रीहिसमास केल्यानें 'भूवादयः' हा शब्द सिद्ध झाला आहे, व असा समास केल्यानें त्या पदाचा 'भूप्रभृतयो वासदृशाः' असा अर्थ होतो. ('व्यवस्था' या पदाचा 'प्रभृति' व 'प्रकार' या पदाचा 'सादृश्य' हा अर्थ आहे. व प्रथम 'आदि' पद 'प्रभृति' या अर्थाचें वाचक असून द्वितीय 'आदि' पद 'सादृश्य' या अर्थाचें वाचक आहे. म्हणून 'भू आदि= भूप्रभृति, वा आदि=वासदृश' असा अर्थ होत असल्यामुळें, त्या संपूर्ण पदाचा 'भूप्रभृतयो वासदृशाः' असा अर्थ होतो. 'आदि' या दोन भिन्नार्थवाचक पदांचा 'सरूपाणामेकशेष एकविभक्तौ' सू. १८८ या सूत्रान्वयें एकशेष झाला आहे. 'वासदृशाः' असें जें म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'वा गतिगन्धनयोः' या धातूंत व धातुपाठांत पठित असलेल्या भूप्रभृति इतर धातूंत) क्रियावाचकत्वरूप सादृश्य आहे. (म्हणून 'वासदृशाः' या पदाचा 'क्रियावाचिनः' असा अर्थ होतो.) हें सर्व लक्षांत धरूनच 'क्रियावाचिनो भ्वादयो धातुसंज्ञाः स्युः' असा प्रकृत सूत्राचा कौमुदींत अर्थ केला आहे. (सारांश प्रकृत सूत्राचा असा अर्थ आहे कीं, 'भू' पासून सुरू होणारे जे शब्द धातुपाठांत पठित केले आहेत त्यांनाच धातुसंज्ञा होते, परंतु ती संज्ञा त्यांना तेव्हांच होते कीं, जेव्हां ते क्रियेचे वाचक असतात. जे शब्द क्रियेचे वाचक नाहींत ते शब्द धातुपाठांत पठित असले तरी त्यांना धातुसंज्ञा होत नाहीं, आणि तसेंच जे शब्द क्रियेचे वाचक असून धातुपाठांत पठित नाहींत त्यांना देखील धातुसंज्ञा होत नाहीं.) 'क्रियावाचिनो भ्वादयो धातुसंज्ञाः स्युः' या कौमुदींतील पंक्तींत 'क्रियावाचिनः' हें पद अशाकरितां घातलें आहे कीं, 'याः पश्यसि' इत्यादि स्थलीं 'या' या शब्दाला धातुसंज्ञा होऊं नये. ('यद्' शब्दापुढें विभक्ति-प्रत्यय आला असतां, 'त्यदादीनामः' सू. २६५ या सूत्रानें 'यद्' यांतील अन्त्य दकाराचे जागीं अकार होऊन व 'अतो गुणे' सू. १९१

या सूत्रानें पररूप एकादेश होऊन 'यद्=य+अ=य' असें अदन्त रूप होतें व त्याहून 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें 'टाप्=आ' हा स्त्रीप्रत्यय केला असतां 'य+आ=या' असें स्त्रीप्रत्ययान्त रूप होतें. 'या प्रापणे' हा धातु धातुपाठांत अदादिगणांत पठित आहे. म्हणून वर सांगितल्याप्रमाणें 'यद्' शब्दाहून सिद्ध केलेल्या 'या' या शब्दाला धातुसंज्ञा होण्याची आपत्ति येते. परंतु हा शब्द जरी धातुपाठांत पठित आहे तरी 'याः पश्यसि' या उदाहरणांत 'या' हा शब्द क्रियावाचक नसल्यामुळें त्याला धातुसंज्ञा होत नाहीं आणि अशा रीतीनें 'क्रियावाचिनः' हें पद अन्वर्थक व आवश्यक ठरतें.) त्याला धातुसंज्ञा झाली असती तर ('या+शस्=या+अस्=याः' या स्थलीं 'या' हें 'यचि भम्' सू. २३१ या सूत्रान्वयें भसंज्ञक अङ्ग ठरत असल्यामुळें) 'आतो धातोः' सू. २४० या सूत्रानें 'या' या भसंज्ञक अङ्गांतील अन्त्य आकाराचा लोप होण्याची आपत्ति आली असती (आणि 'याः' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकलें नसतें. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत १-३-१ 'पाठेन धातुसंज्ञायां समानशब्दप्रतिषेधः' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतातः–'पाठेन धातुसंज्ञायां समानशब्दानां प्रतिषेधो वक्तव्यः। या इति धातुः, या इत्याबन्तः। वा इति धातुः; वा इति निपातः। नु इति धातुः, नु इति प्रत्ययश्च निपातश्च। दिव् इति धातुः, दिव् इति प्रातिपदिकम्। किं च स्याद्यद्येतेषामपि धातुसंज्ञा स्यात्?। धातोरिति तव्यदादीनामुत्पत्तिः प्रसज्येत। नैष दोषः। साधने तव्यदादयो विधीयन्ते साधनं च क्रियायाः। क्रियाऽभावात् साधनाऽभावः। साधनाभावात् सत्यामपि धातुसंज्ञायां तव्यदादयो न भविष्यन्ति इदं तर्हि याः पश्य, आतो धातोरिति लोपः प्रसंज्येत।' त्याच भाष्यांत पुढें भाष्यकार म्हणतात– 'तद्यदा तावत् क्रियावचनो धातुरित्येष पक्षस्तदा भू इत्यत्र य आदिशब्दः स व्यवस्थायां वर्तते, वा इत्यत्र य आदिशब्दः स प्रकारे, भू इत्येवमादयो वा इत्येवं प्रकारा इति ...यदि तर्हि लक्षणं क्रियते,

नेदानीं पाठः कर्तव्यः । कर्तव्यश्च । किं प्रयोजनम् ? । भूवादि पाठः प्रातिपदिकाणवयत्यादिनिवृत्यर्थः । भूवादिपाठः कर्तव्यः । किं प्रयोजनम् ? । ..प्रातिपदिकनिवृत्यर्थः, आणवयत्यादिनिवृत्यर्थश्च । के पुनराणवयत्यादयः ? । आणवयति वट्टति वड्ढतीति ।' या वरील भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, धातुपाठामध्यें जे शब्द पठित आहेत त्यांना धातुसंज्ञा होते असें म्हटलें तर, धातुपाठांतील शब्दासारखे जे शब्द आहेत त्यांना प्राप्त होणाऱ्या धातुसंज्ञेचा निषेध केला पाहिजे. उदाहरणार्थ, 'या' असा धातु आहे व त्यासारखा 'या' असा आबन्त शब्दहि आहे. तसेंच 'वा' असा धातु आहे व 'वा' असा निपातहि आहे. 'नु' असा धातु आहे आणि 'नु' असा प्रत्यय आहे व निपातहि आहे. तसेंच 'दिव्' असा धातु आहे व 'दिव्' असें प्रातिपदिक देखील आहे. परंतु धातूसारख्या या वरील शब्दांना धातुसंज्ञा झाली तरी काय हरकत आहे ? 'धातोः' सू. २८२९ या अधिकार सूत्रान्वयें त्या शब्दांहून 'तव्यत्' इत्यादि प्रत्यय उत्पन्न होण्याची आपत्ति येईल. पण हा दोष येत नाहीं; कारण 'कर्म' इत्यादि कारकांच्या अर्थामध्यें 'तव्यत्' इत्यादि प्रत्यय होणें सांगितलें आहे आणि कारक हें क्रियेवर अवलंबून असतें. वरील धातुसदृश 'या, वा, नु' हे शब्द क्रियावाचक नसल्यामुळें व अशा रीतीनें त्यांचे ठिकाणीं कारकाचा संबंध येत नसल्यामुळें, त्यांहून 'तव्यत्' इत्यादि प्रत्यय उत्पन्न होऊं शकणार नाहींत. तर मग 'याः पश्य' या स्थलीं 'या' या आबन्ताला धातुसंज्ञा झाली तर 'आतो धातोः' सू. २४० या सूत्रानें 'या' यांतील आकाराचा लोप होण्याची आपत्ति येईल. जो क्रियेचा बोधक आहे त्यालाच धातुसंज्ञा होते हा पक्ष मानला तर, प्रकृत सूत्रांतील 'भू' या शब्दापुढील 'आदि' हा शब्द 'व्यवस्था'–प्रभृति किंवा मर्यादा–या अर्थाचा वाचक मानावा व प्रकृत सूत्रांतील 'वा' या शब्दापुढील 'आदि' या शब्दाचा 'प्रकार'–सादृश्य–असा अर्थ करावा. तसें केल्यानें प्रकृत सूत्राचा असा अर्थ होतो कीं, 'भू' इत्यादि जे शब्द

धातुपाठांत पठित आहेत ते 'वा' धातूसारखे क्रियावाचक असतांनाच त्यांना धातुसंज्ञा होते....पण जो क्रियेचा वाचक आहे तो धातु होय असें जर 'धातु' या संज्ञेचें लक्षण केलें तर, धातुपाठ पठित करण्याची गरज काय ? धातुपाठ पठित केलाच पाहिजे व त्याचें प्रयोजन हें कीं, प्रातिपदिकांना, म्हणजे हिरुक्, पृथक् इत्यादि क्रियावाचक अव्ययरूप प्रातिपदिकांना आणि तसेंच 'आणवयति, वट्टति, वड्ढति' इत्यादि अपभ्रंश शब्दांना धातुसंज्ञा न व्हावी. या वरील भाष्याला अनुसरूनच मनोरमेंत प्रकृत सूत्राचें विवरण केलें आहे व या भाष्या-वरून हें स्पष्ट होतें कीं, जे शब्द धातुपाठांत पठित आहेत ते जेव्हां क्रियेचे वाचक असतात तेव्हांच त्यांना धातुसंज्ञा होते व जे शब्द क्रिया-वाचक असून देखील धातुपाठांत पठित नाहींत त्यांना धातुसंज्ञा होत नाहीं.) वर दिलेल्या कौमुदींतील पंक्तींत 'भ्वादयः' हें पद अशाकरितां घातलें आहे कीं, 'हिरुक्, पृथक्' इत्यादि अव्ययांना व तसेंच 'शिश्ये' या भाववाचक तिङन्ताला धातुसंज्ञा होऊं नये. ('हिरुक्, पृथक्' हे शब्द स्वरादिगणांत पठित असल्यामुळें 'स्वरादिनिपातमव्ययम्' सू. ४४७ या सूत्रान्वयें त्यांना अव्ययसंज्ञा आहे. हे दोन्ही शब्द वर्जनरूप क्रियेचे वाचक आहेत. मनोरमेंतील अव्ययप्रकरणांत दीक्षितांनीं 'पृथक् भिन्ने, हिरुक्, वर्जने' असा या अव्ययांचा अर्थ दिला आहे व प्रसादकारांनीं या दोन्ही शब्दांचा 'वर्जने' हाच अर्थ दिला असून 'त्वत्तः पृथक् नास्ति बन्धुः, हिरुक् कर्मणा मोक्षः' हीं उदाहरणें दिलीं आहेत. अशा रीतीनें हे दोन्ही शब्द जरी क्रियेचे वाचक आहेत तरी भूपासून सुरु होणाऱ्या धातुपाठांत ते पठित नसल्यामुळें त्यांना धातुसंज्ञा होत नाहीं. त्यांना धातुसंज्ञा झाली असती तर त्या शब्दांहून 'धातोः' सू. २८२९ या अधिकारसूत्रान्वयें तिबादि व तव्यदादि प्रत्यय होण्याची आपत्ति आली असती. 'शिश्ये' हें 'शीङ स्वप्ने' या अकर्मक धातूचें लिटाचें प्रथमपुरुषाचें एकवचन आहे व तें 'शि + शी + ए' अशी स्थिति झाली असतां 'एरनेकाचः' सू. २७२ या

सूत्रानें यणादेश होऊन सिद्ध झालें आहे. 'शिश्ये' हा शब्द जरी क्रियावाचक आहे तरी तसा शब्द धातुपाठांत पठित नसल्यामुळें त्याला धातुसंज्ञा होत नाहीं. जर त्याला धातुसंज्ञा झाली असती तर वर सांगितल्याप्रमाणें त्याहून तिबादि व तव्यदादि प्रत्यय होण्याची आपत्ति आली असती. वर दर्शविलेल्या सर्व आपत्ति टाळण्याकरितांच दीक्षितांनीं 'क्रियावाचिनो भ्वादयो धातुसंज्ञाः स्युः' असा प्रकृत सूत्राचा कौमुदींत अर्थ केला आहे व तो अर्थ वर दिलेल्या भाष्याला अनुसरूनच केला आहे.) 'स्तम्भु' इत्यादि सूत्रनिर्दिष्ट धातु उदित् केले असल्यामुळें ते धातु आहेत हें ज्ञापित होतें. ('स्तम्भु' इत्यादि सुमारें वीस धातु धातुपाठांत पठित केले नसून पाणिनीय सूत्रांत त्यांचा निर्देश केला आहे. 'स्तम्भु' इत्यादि धातु उदित् पठित केले असल्यामुळें त्यांचें उदित्करण ते धातु आहेत याचें ज्ञापक ठरतें. उदित् धातूंपुढें 'क्त्वा' प्रत्यय आल्यास त्या प्रत्ययाला विकल्पेंकरून इडागम होतो या अर्थाचें 'उदितो वा' सू. ३३२८ हें सूत्र आहे. जर 'स्तम्भु' इत्यादि सूत्रनिर्दिष्ट शब्द धातुसंज्ञक नसते तर त्यांना उदित् करून पठित करण्याची कांहींच गरज नव्हती. पण ते मुद्दाम उदित् करून पाणिनीय सूत्रांत पठित केले असल्यामुळें ते धातुसंज्ञक आहेत हें ज्ञापित होतें.) 'बहुलमेतन्निदर्शनम्' या गणसूत्रान्वयें 'चुलुम्प' इत्यादि धातुसंज्ञक ठरतात. ('बहुलमेतन्निदर्शनम्' हें गणसूत्र असल्यामुळेंच दीक्षितांनीं 'श्वयतेरः' सू. २४२१ या सूत्रावरील कौमुदींत 'भ्वादित्वाकृतिगणः । तेन चुलुम्पतीत्यादिसंग्रहः' असें म्हटलें आहे. 'चुलुम्प' हा धातु 'लोप' या अर्थाचा वाचक आहे. सारांश 'चुलुम्प' इत्यादि शब्द जरी धातुपाठांत साक्षात् पठित नाहींत तरी ते क्रियावाचक असल्यामुळें व वरील गणसूत्रान्वयें त्यांचा धातूंत संग्रह करतां येत असल्यामुळें, ते शब्द धातुसंज्ञक ठरतात असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न–सादृश्यं चेति । वाधातौ वासादृश्यं च प्रयोगभेदेन बोध्यम् । आतो धातोरिति । न च स्त्र्यर्थनिमित्तकटापो बहिरङ्गा-

सिद्धत्वम् । "नाजानन्तर्ये" इति निषेधात्, ततोऽपि बहिर्भूतसंख्यानिमित्तकविभक्तिनिमित्तकभसञ्ज्ञानिमित्तकत्वेन लोपस्य बहिरङ्गत्वाच्च अर्थनिमित्तकबहिरङ्गत्वस्याभावाच्च । नाप्ययं लाक्षाणिकः,

"नकारजावनुस्वारपञ्चमौ झलि धातुषु ।
सकारजः शकारश्चेषाट्टवर्गस्तवर्गजः" ॥ १ ॥

इत्यभियुक्तोक्तेर्भ्वादिषु लाक्षाणिका नामपि दर्शनेन तद्विषये तत्परिभाषाया अप्रवृत्तेः । "आतो धातोः" इत्यत्र प्रतिपदोक्त आकारो गृह्यते इति तु वक्तुमप्यशक्यम्, 'पशुषः' इत्यसिद्धचापत्तेः । पशुं सनोतीति विट्, "विड्वनोः" इत्यात्वम् । "आतोऽनापः" इति वार्त्तिकमते तु विकल्पार्थकनिपातवाशब्दस्य धातुत्वे प्रातिपदिकत्वाभावात्सुबभावे पदत्वानापत्तिर्दोषः । क्रियात्वम्—साध्यत्वेन प्रतीयमानत्वम् । साध्यत्वञ्चोत्पाद्यमानत्वमेवेत्यन्यत्र विस्तरः । हिरुगित्यादि । एषां क्रियासमानाधिकरणत्वात्, लिङ्गाद्यनन्वयित्वाच्च तदर्थस्य क्रियात्वमित्यभिमानः । एषामव्ययेषु पाठस्तु अप्रातिपदिकत्वेऽप्यकजर्थः स्यात् । एतेन तेषु पाठसामर्थ्याद्धातुत्वाभाव इत्यपास्तम् । नन्वेषां क्रियाऽकाङ्क्षादर्शनेन न क्रियावाचकत्वमत आह—शिश्ये इति। कालोऽपि धात्वर्थ एवेति न क्रियावाचकत्वहानिः । तस्य च धातुत्वे "आदेच उपदेशे" इत्यात्वं स्यात् । तद्धि अनैमित्तिकम्, धातुत्वनिमित्तकञ्चेति-स्पष्टमेव । अत्र च प्रत्ययस्यैव धातुत्वापत्तिर्बोध्या, तिङन्तस्य तूपदेशाभावान्नात्वप्रसक्तिरित्याहुः ।

'वा' हा धातु भिन्न भिन्न प्रयोगांत आढळत असल्यामुळें, एका प्रयोगांतील 'वा' धातु इतर प्रयोगांतील 'वा' धातु सदृश आहे असें मानतां येतें. (भ्वादि इतर धातु 'वा' धातूहून भिन्न असल्यामुळें, ते क्रियावाचकस्वरूप धर्मसादृश्यामुळें 'वा' सदृश आहेत असें मानतां येतें; पण 'वा' धातु जो धातुपाठांत एकदाच पठित आहे तो 'वा' सदृश आहे असे कसें म्हणतां येणार, कारण 'भेदनिबन्धनं सादृश्यम्' असा न्याय असल्यामुळें व 'तद्भिन्नत्वेसति तद्गतभूयो-

धर्मत्वत्वं सादृश्यम्' अशी 'सादृश्य' या शब्दाची व्याख्या असल्यामुळें, सादृश्य होण्याकरितां दोन पदार्थांची आवश्यकता आहे; एखादा पुरुष स्वतः सारखा आहे असा प्रयोग जसा होऊं शकत नाहीं त्याचप्रमाणें 'वा' धातु 'वा' सदृश आहे असें म्हणतां येत नाहीं अशी शंकाकाराची शंका आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, भाषेंत 'वा' धातूचे 'वाति, वाता' इत्यादि अनेक प्रयोग आढळत असल्यामुळें व 'प्रत्युच्चारणं शब्दो भिध्यते' असा सिद्धान्त असल्यामुळें, एका प्रयोगांतील 'वा' धातु इतर प्रयोगांत आढळणाऱ्या 'वा' धातुसदृश आहे असें मानतां येतें व त्यामुळें वरील शंका अनुपपन्न ठरते. 'याः पश्यसि' या उदाहरणांत आकारलोप करते वेळीं 'अर्थनिमित्तकं बहिरङ्गत्वम्' या न्यायान्वयें) स्त्रीरूप अर्थाचा बोध होणें या निमित्तामुळें होणारा 'टाप्' प्रत्यय बहिरङ्ग असून त्यामुळें असिद्ध आहे असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'नाजानन्तर्ये बहिष्ट्वप्रक्लुप्तिः' –परि. ५१ ही बहिरङ्गत्वाची निषेधक परिभाषा आहे. दुसरें असें कीं, लिङ्गाच्या मानानें संख्या बहिर्भूत–बहिरङ्ग–असल्यामुळें, म्हणजे लिङ्गाचा बोध प्रथम होत असून संख्येचा बोध नंतर होत असल्यामुळें (व अशा रीतीनें लिङ्गकार्य प्रथम उपस्थित होत असून संख्यानिमित्तक कार्य नंतर उपस्थित होत असल्यामुळें) तशा बहिरङ्ग संख्येचा बोध करून देणें या निमित्तामुळें होणारा जो संख्याबोधक विभक्तिप्रत्यय त्या विभक्तिप्रत्ययाच्या निमित्तामुळें जी भसंज्ञा होते ती आकारलोप होण्याचें निमित्त असल्यामुळें, तें आकारलोपरूपकार्य 'टाप्' प्रत्ययरूपकार्याच्या मानानें बहिरङ्ग ठरतें. तिसरें असें कीं, 'अर्थकृतं बहिरङ्गत्वम्' असा न्यायच नाहीं. ('याः पश्यसि' या स्थलीं 'यद्' या सर्वनामाचें पूर्वी सांगितल्याप्रमाणें 'य' असें अदन्त रूप झाल्यावर 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें जो स्त्रीत्वरूप अर्थाचा बोधक 'टाप्' प्रत्यय होतो तो, 'अर्थनिमित्तकं बहिरङ्गम्,' म्हणजे अर्थाच्या निमित्तामुळें होणारें

कार्य बहिरङ्ग ठरतें, या न्यायान्वयें, बहिरङ्ग ठरतो; कारण तो 'टाप्' प्रत्यय स्त्रीवाचक अर्थाचा बोध करून देणें या निमित्तामुळें झाला असून 'आ'लोपकार्य अर्थाच्या निमित्तामुळें होणारें कार्य नसल्यामुळें व अशा रीतीनें 'आ'लोपकार्याच्या मानानें टाप्प्रत्यय-रूपकार्य बहिरङ्ग ठरत असल्यामुळें, 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे'— परि–५०–या परिभाषान्वयें अन्तरङ्ग आलोपकार्य करतेवेळीं बहिरङ्ग टाप् प्रत्यय असिद्ध ठरतो, म्हणजे तो झालाच नाहीं असें मानावे लागतें. तसें मानलें म्हणजे, 'आ'लोपकार्य पावतच नाहीं; कारण जर 'आ'लोपकार्याच्या दृष्टीनें टाप्प्रत्यय विद्यमानच नाहीं तर त्याचा लोप कसा होणार ? म्हणून शंकाकार म्हणतो कीं, 'क्रियावाचिनः किम् याः पश्यसि ..आतो धातोरिति स्यात्' असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे तें बरोबर नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'तुष्यतु दुर्जनः' या न्यायान्वयें शंकाकाराच्या म्हणण्या-प्रमाणें 'आ'लोपकार्याच्या मानानें 'टाप्' प्रत्ययरूपकार्य बहिरङ्ग आहे असें मानलें तरी, 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे' या परिभाषेचा निषेध करणारी 'नाजानन्तर्ये' ही परिभाषा असल्यामुळें, आलोप-कार्य करतेवेळीं 'टाप्' प्रत्यय बहिरङ्ग असून देखील बहिरङ्ग ठरत नाहीं. अचाच्या लगेंच पुढें असणाऱ्या निमित्तामुळें अन्तरङ्ग-कार्य करणें प्राप्त झाल्यास पूर्वीं झालेलें बहिरङ्गकार्य बहिरङ्ग मानूं नये असा त्या निषेधक परिभाषेचा अर्थ आहे. 'याः पश्यसि' या प्रकृत उदाहरणांत 'या+शस्' या स्थलीं जो 'टाप्' प्रत्यय विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वीं झाला आहे तो बहिरङ्ग आहे असें मानलें तरी, त्याच्या लगेंच पुढें असणाऱ्या 'शस्=अस्' या विभक्ति-प्रत्ययाच्या निमित्तामुळें 'आतो धातोः' या सूत्रानें त्या 'टाप्=आ' प्रत्ययाचा लोप करतेवेळीं वरील निषेधक परिभाषान्वयें तो टाप्-प्रत्यय बहिरङ्ग ठरत नाहीं. त्यामुळें 'टाप्=आ' विद्यमानच आहे असें मानणें भाग आहे व तसें मानल्यास, आकारलोप होण्याची

आपत्ति येते. म्हणून 'या' हा शब्द प्रकृत स्थलीं क्रियावाचक नसून देखील केवळ धातुपाठांत पठित आहे या कारणामुळें धातुसंज्ञक मानल्यास दीक्षितांनीं जो आकारलोप होण्याची आपत्ति दर्शविली आहे ती योग्य ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. येथपर्यंत शब्दरत्नकारांनीं 'आ'लोपकार्याच्या मानानें पूर्वी झालेलें टाप्प्रत्ययरूप कार्य बहिरङ्ग आहे असें शंकाकाराच्या म्हणण्याप्रमाणें गृहीत धरून त्याच्या शंकेचें निरसन केलें आहे. परंतु शब्दरत्नकार पुढें असें म्हणतात कीं, वास्तविक टाप्प्रत्ययाच्या मानानें 'आ'लोपरूपकार्य अन्तरङ्ग नसून बहिरङ्ग आहे; कारण 'पञ्चकं प्रातिपदिकार्थः' या वचनान्वयें जाति, व्यक्ति, लिङ्ग, संख्या, व कारक असे प्रातिपदिकाचे पांच अर्थ आहेत व या अर्थांचा वर जो क्रम दिला आहे त्या क्रमान्वयेंच त्या अर्थांचा बोध होत असतो, म्हणजे प्रातिपदिक ऐकल्याबरोबर त्यापासून प्रथम सामान्य अर्थ मनांत येतो, तसा सामान्य अर्थ मनांत आल्यानंतर त्या सामान्य अर्थानें युक्त अशी व्यक्ति मनांत येते, त्यानंतर त्या व्यक्तिच्या लिङ्गाचा आणि नंतर संख्येचा बोध होतो आणि अखेरीस त्या व्यक्तीचा दुसऱ्या पदार्थाशीं असलेला कारकरूप संबंध मनांत येतो. अशा क्रमानें प्रातिपदिकाच्या वर सांगितलेल्या पांच अर्थांचा बोध होत असल्यामुळें, ज्या क्रमानें हे अर्थ ध्यानांत येतात त्याच क्रमानें त्या अर्थांना अनुलक्षून होणारीं कार्यें होतात. 'अचः परस्मिन्' १-१-५७ या सूत्रावरील भाष्यांत 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे' ही परिभाषा लौकिकन्यायसिद्ध आहे हें सांगतांना भाष्यकारांनीं वर दिलेला सिद्धान्त सांगितला आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतातः—'सा चाप्येषा लोकतः सिद्धा। कथम् ? प्रत्यङ्गवर्ती लोको लक्ष्यते। तद्यथा । पुरुषोऽयं प्रातरुत्थाय यान्यस्य प्रतिशरीरं कार्याणि तानि तावत्करोति, ततः सुहृदां, ततः सम्बन्धिनाम्। प्रातिपदिकं चाप्युपदिष्टं सामान्यभूतेऽर्थे वर्तते। सामान्ये वर्तमानस्य व्यक्तिरूप-

जायते । व्यक्तस्य सतः लिङ्गसंख्याभ्यामन्वितस्य बाह्येनार्थेन योगो भवति । यथैव चानुपूर्व्याऽर्थानां प्रादुर्भावस्तथैव शब्दानामपि तद्वत्कार्यैरपि भवितव्यम् ।' या भाष्यकारीय सिद्धान्तान्वयें लिङ्गकार्य प्रथम उपस्थित होत असून संख्याबोधक विभक्तिरूप कार्य नंतर उपस्थित होत असल्यामुळें, 'पूर्वोपस्थितमन्तरङ्गं परोपस्थितं बहिरङ्गम्' या न्यायान्वयें लिङ्गबोधक टाप्‌रूप कार्य, विभक्तिप्रत्ययाच्या निमित्तामुळें होणाऱ्या 'आ'लोपकार्याच्या मानानें, अन्तरङ्ग ठरतें. म्हणून 'या + शस् = या + अस्' या स्थलीं प्रथम टाप्‌प्रत्यय झाल्यानंतरच तशा स्त्रीप्रत्ययान्त शब्दाहून 'ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रान्वयें 'शस्' हा द्वितीयेच्या बहुवचनाचा प्रत्यय होतो. हा प्रत्यय असर्वनामस्थान अजादि प्रत्यय असल्यामुळें, 'या' या अङ्गाला 'यचि भम्' सू. २३१ या सूत्रानें भसंज्ञा होते, व 'या' हा शब्द क्रियावाचक नसून देखील धातुसंज्ञक मानल्यास, 'आतो धातोः सू. २४० या सूत्रानें 'या' यांतील अन्त्य आकाराचा लोप होण्याची आपत्ति येते. हें आकारलोपरूप कार्य टाप्‌प्रत्ययरूप कार्याच्या मानानें वर सांगितल्याप्रमाणें बहिरङ्ग असल्यामुळें, बहिरङ्ग 'आ'-लोपरूप कार्य करतेवेळीं प्रथम झालेला अन्तरङ्ग 'टाप् = आ' विद्यमान आहे असें मानणें भाग आहे व तसें मानलें म्हणजे, दीक्षितांनीं मनोरमेंत जी आपत्ति दाखविली आहे. ती योग्य ठरत असून शंकाकाराची शंका व्यर्थ ठरते. तिसरें असें कीं, 'अर्थनिमित्तकं बहिरङ्गत्वम्' या ज्या न्यायाच्या आधारावर शंकाकारानें वरील शंका उपस्थित केली आहे तसा वास्तविक न्यायच नाहीं. या विषयासंबंधानें परिभाषेन्दुशेखरांत 'अर्थनिमित्तकस्य न बहिरङ्गत्वम् । अत एव न तिसृचतसृ इति निषेधश्चरितार्थः । अन्यथा स्त्रीत्वरूपार्थनिमित्तकतिस्रपेक्षयान्तरङ्गत्वात् त्रयादेशे तदसङ्गतिः स्पष्टैव । अत एव त्रयादेशे स्रन्तस्य प्रतिषेध इति स्थानिवत्सूत्रस्थभाष्यवार्तिकादि सङ्गच्छते ।' असें नागेशांनीं म्हटलें आहे. या पंक्तीचें विस्तृत विवेचन

परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरांत पान १६७ ते १७० मध्यें केलें आहे. तें वाचल्यास व तसेंच 'नाजानन्तर्ये' परि–५१ आणि प. ५० या परिभाषेंचें जें विवरण त्या ग्रन्थांत केलें आहे तें वाचल्यास शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ उत्तम रीतीनें ध्यानांत येईल. सारांश वर जीं तीन कारणें दिलीं आहेत त्या कारणांवरून हें स्पष्ट होतें कीं, शंकाकाराची शंका व्यर्थ असून दीक्षितांनीं जी मनोरमेंत आपत्ति दर्शविली आहे ती योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां शंकाकार पुन्हा अशी शंका करतो कीं, 'आतो धातोः' सू. २४० या सूत्रानें ज्या आदन्त धातूच्या अन्त्य आकाराचा लोप होणें सांगितलें आहे त्या धातूनें, 'लक्षणप्रतिपदोक्तयोः प्रतिपदोक्तस्यैव ग्रहणम्'–परि. ११४–या परिभाषान्वयें, प्रतिपदोक्त आदन्त धातूचेंच ग्रहण होऊं शकतें, लाक्षणिक आदन्त धातूचें ग्रहण होऊं शकत नाहीं, म्हणजे ज्या आकाराचा लोप होणें सांगितलें आहे तो प्रतिपदोक्त आकार असला पाहिजे व तो लाक्षणिक आकार नसावा. म्हणून 'याः पश्यसि' या उदाहरणांत 'यद्' या सर्वनामाचें 'य+अ=य' असें जें अदन्त रूप होतें त्याहून 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या लक्षणानें–सूत्रानें–'टाप्=आ' हा स्त्रीवाचक प्रत्यय झाल्यावर 'या' असें आदन्त रूप होत असल्यामुळें, तशा लाक्षणिक –लक्षणसपन्न–आदन्त 'या' या शब्दाला धातुसंज्ञा झाली तरी, त्यांतील अन्त्य आकार, 'या प्रापणे' या धातूतील अन्त्य आकारासारखा प्रतिपदोक्त–मूळचा स्वतःसिद्ध–नसून, लाक्षणिक–सूत्र प्रवृत्त केल्यानें उत्पन्न झालेला–असल्यामुळें, तशा आकाराचा 'आता धातोः' या सूत्रानें लोप होऊं शकत नाहीं, आणि म्हणून वरील उदाहरणांत दीक्षितांनीं जी आकारलोप होण्याची आपत्ति दाखविली आहे ती अयोग्य ठरते. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं,) धातूंच्या विषयांत लक्षणप्रतिपदोक्त परिभाषा–परि. ११४–मुळींच लागू पडत नाहीं. ('नाप्ययं लाक्षणिकः' असें जें

शब्दरत्नांत म्हटलें आहे त्यांतील 'लाक्षणिकः' या पदांत असणारा 'लक्षण' हा शब्द लक्षणावृत्तीचा किंवा सूत्र अथवा वार्तिक या अर्थाचा वाचक नसून, जसा 'भामा' हा शब्द एकदेशन्यायानें सत्यभामेचा वाचक आहे त्याचप्रमाणें त्या न्यायान्वयें तो 'लक्षण' शब्द 'लक्षण-प्रतिपदोक्तपरिभाषा' या अर्थाचा वाचक आहे, व या शब्दाहून 'अर्हति' या अर्थामध्यें 'तदर्हति' सू. १७२८ या सूत्रानें 'ठञ्' प्रत्यय होऊन 'लाक्षणिकः' हा शब्द सिद्ध झाला आहे. या शब्दरत्नांतील वरील पंक्तींतील 'अयम्' या पदाचें 'धातुः' किंवा 'आकारः' असें दोन अर्थ होऊं शकतात. म्हणून या पंक्तीचा 'धातुसंज्ञाविषये लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा न प्रवर्तते' असा किंवा 'आतो धातोरिति सूत्रेण आकारलोपे कर्तव्ये लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा न प्रवर्तते' असा अर्थ होऊं शकतो. आतां प्रथम अर्थ मानल्यास, धातूच्या विषयांत लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा प्रवृत्त होत नाहीं याचें कारण शब्दरत्नकार पुढील पंक्तींत सांगतात.) मान्य वैयाकरणांनीं 'नकार-जावनुस्वारपञ्चमौ झलि धातुषु। सकारजः शकारश्चेषाट्टवर्गस्त-वर्गजः' अशी कारिका पठित केली असल्यामुळें व अशा रीतीनें धातुपाठांत पठित असलेल्या भ्वादि अनेक धातूंत लाक्षणिक वर्ण देखील आढळत असल्यामुळें, धातूंच्या विषयांत लक्षणप्रतिपदोक्त-परिभाषा लागू पडत नाहीं. (वरील कारिकेचा असा अर्थ आहे कीं, झल् पुढें असतां त्याच्या लगेंच मागें धातूंत आढळणारा अनुस्वार किंवा पञ्चमवर्ण नकाराचे जागीं झाला आहे असें समजावें; तसेंच धातूंत चकारापूर्वी आढळणारा शकार सकाराचे जागीं झाला आहे असें समजावें; त्याचप्रमाणें धातूंतील रकाराच्या किंवा षकाराच्या पुढें टवर्ग आढळल्यास तो तवर्गाचे जागीं झाला आहे असें समजावें. उदाहरणार्थ, धातुपाठांत तुम्प, तुम्फ, अञ्च, ध्वंस, भ्रन्श इत्यादि धातु पठित आहेत. या सर्व धातूंत झल् वर्णापूर्वी जो अनुस्वार किंवा पञ्चम वर्ण आढळतो तो वास्तविक 'नश्चापदान्तस्य झलि' सू.

१२३ या सूत्रानें नकाराचे जागीं अनुस्वार झाला असून, जेथें त्या अनुस्वारापुढें यय् प्रत्याहारान्तर्गत वर्ण आला आहे तेथें 'अनुस्वारस्य ययि परसवर्णः' १२४ या सूत्रानें त्या अनुस्वाराचे जागीं परसवर्ण पञ्चम वर्ग झाला आहे. सारांश या धातूंत आढळणारा अनुस्वार किंवा पञ्चम वर्ण मूळचा नसून लक्षणान्वयें झाला आहे, म्हणजे लाक्षणिक आहे. तसेंच 'व्रश्च' असा जो धातु धातुपाठांत पठित आहे त्यांत वास्तविक मूळचा सकार असून त्या सकारापुढें चकार आला असल्यामुळें, 'स्तोः श्चुना श्चुः' सू. १११ या सूत्रानें त्या सकाराचे जागीं शकार झाला आहे. त्याचप्रमाणें 'ऊर्णु' असा जो धातु धातुपाठांत पठित आहे त्यांत वास्तविक मूळचा नकार असून तो नकार रेफापुढें आला असल्यामुळें, 'रषाभ्यां नो णः' सू. २३५ या सूत्रानें त्या नकाराचे जागीं णकार झाला आहे. तसेंच 'ष्ठा' हा जो धातु धातुपाठांत पठित आहे त्यांत वास्तविक मूळचा थकार असून तो षकारापुढें आला असल्यामुळें 'ष्टुना ष्टुः' सू. ११३ या सूत्रानें त्या थकाराचे जागीं ठकार झाला आहे. वर जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यां खेरीज धातुपाठांतून प्रकृत कारिकेचीं अनेक उदाहरणें देतां येतील. पण विस्तारभयास्तव तीं दिलीं नाहींत. सारांश धातुपाठांतील कित्येक धातूंत लाक्षणिक वर्ण आढळत असून देखील त्यांना धातुसंज्ञा होते व धातूला होणारीं कार्यें त्यांना होतात. यावरून हें सिद्ध होतें कीं, धातूंच्या विषयांत लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा लागू पडत नाहीं. त्यामुळें 'याः पश्यसि' या उदाहरणांतील 'या' हा शब्द धातुपाठांत पठित असलेल्या 'या प्रापणे' या धातूसारखा प्रतिपदोक्त आदन्त शब्द नसून वर सांगितल्याप्रमाणें लाक्षणिक आदन्त शब्द आहे तरी, 'क्रियावाचिनो भ्वादयो धातुसंज्ञाः स्युः' असें जें प्रकृत सूत्राचें कौमुदींत व्याख्यान केलें आहे त्यांतून 'क्रियावाचिनः' हें पद गाळल्यास, त्या 'या' शब्दाला धातुसंज्ञा होण्याची आपत्ति येते. पण अशा रीतीनें त्या शब्दाला जरी धातुसंज्ञा

झाली तरी, 'आतो धातोः' सू. २४० हें सूत्र प्रतिपदोक्त आदन्त धातूला लागू पडणारें सूत्र असल्यामुळें, आकारलोप होण्याची आपत्ति येत नाहीं असें जें शंकाकाराचें द्वितीय अर्थान्वयें म्हणणें आहे त्यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं,) 'आतो धातोः' या सूत्रांतील आकारानें प्रतिपदोक्त आकाराचेंच ग्रहण होतें असें म्हणतां येणें अशक्य आहे; कारण तसें मानल्यास, ('असिद्धवदत्राभात्' ६-४-२२ या सूत्रावरील भाष्यांत दिलेलें) 'पशुषः' हें रूप सिद्ध न होण्याची आपत्ति येईल. 'पशुं सनोतीति पशुषा' या स्थलीं ('जनसनखनक्रमगमो विट्' सू. ३४१३ या सूत्रानें) 'विट्' प्रत्यय होऊन 'विड्वनोरनुनासिकस्याऽऽत्' सू. २९८२ या सूत्रानें 'सन्' धातूंतील नकाराचे जागीं आकार झाला आहे (व 'सनोतेरनः' सू. ३६४५ या सूत्रानें 'सन्' धातूंतील सकाराचें षत्व होऊन 'पशुषा' असें रूप सिद्ध झालें आहे. याहून 'शस्' प्रत्यय केला असतां, यांतील आकार धातूंत असणारा प्रतिपदोक्त आकार नसून, नकाराचे जागीं झालेला लाक्षणिक आकार असल्यामुळें 'आतो धातोः' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं असें मानल्यास, आकारलोप होणार नाहीं व 'पशुषः' हें द्वितीयेच्या बहुवचनाचें भाष्यांत दिलेलें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. म्हणून 'आतो धातोः' हें सूत्र प्रतिपदोक्त आदन्त धातूलाच लागू पडतें व त्या सूत्रांतील आकारानें प्रतिपदोक्त आकाराचेंच ग्रहण होतें हें मानणें बरोबर नाहीं.) 'आतो धातोः' या सूत्राऐवजीं 'आतोऽनापः'—म्हणजे आबन्त शब्दांतील अन्त्य आकार खेरीज करून इतर आकाराचा लोप होतो—असें वार्तिककाराच्या मताप्रमाणें सूत्र पठित केल्यास, (जरी 'याः पश्यसि' या स्थलीं 'या' या आबन्त शब्दांतील आकारलोप होण्याची आपत्ति टळते व 'पशुषः' या स्थलीं आकारलोप होऊं शकतो आणि अशा रीतीनें वर दाखविलेल्या दोषांचें निवारण होऊं शकतें तरी, 'क्रियावाचिनो भ्वादयो धातुसंज्ञाः स्युः' असें जें प्रकृत सूत्राचें कौमुदींत व्याख्यान केलें आहे त्यांतून

'क्रियावाचिनः' हें पद गाळल्यास, 'वा गतिगन्धनयोः' हा शब्द धातुपाठांत पठित असल्यामुळें आणि मूळ पाणिनीय धातुपाठांत धातूंचे अर्थ पठित केले नसून केवळ धातूच पठित केले असल्यामुळें,) 'वा' या विकल्पवाचक निपाताला धातुसंज्ञा होईल व ('अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्' सू. १७८ या सूत्रांत 'अधातुः' असा प्रतिषेध असल्यामुळें) त्याला प्रातिपदिकसंज्ञा होणार नाहीं आणि त्यामुळें ('ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रान्वयें प्रातिपदिकाहून होणारें) सुबादि प्रत्यय होऊं शकणार नाहींत व त्यामुळें 'वा' या निपाताला ('सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें होणारी) पदसंज्ञा न होण्याची आपत्ति येईल हा दोष येतोच. (त्यामुळें भैरवींत सांगितल्याप्रमाणें 'देवदत्तः पचति वा गच्छति वा' या उदाहरणांतील 'गच्छति' या तिङन्त पदापूर्वीं असणारा 'वा' हा निपात धातुसंज्ञक मानल्यास, 'तिङ्ङतिङः' सू. ३९३५ या सूत्रानें होणारा अनुदात्त स्वर 'गच्छति' या तिङन्ताला होणार नाहीं आणि तसेंच 'नृपतिस्तत्र त्वा वा मा वा प्रेषयिष्यति' या उदाहरणांत 'त्वामौ द्वितीयायाः' सू. ४०७ या सूत्रानें 'माम्' चे जागीं होणारा 'मा' हा आदेश न होण्याची आपत्ति येईल; कारण वर दिलेल्या उदाहरणांत 'मा' चे पूर्वीं असलेला 'वा' हा निपात धातु मानल्यास, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होणार नाहीं व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति होणार नाहीं व त्याला पदसंज्ञा होणार नाहीं आणि म्हणून 'त्वामौ द्वितीयायाः' या सूत्रानें पदाच्या पुढें असणाऱ्या 'माम्' चे जागीं 'मा' असा आदेश होणें सांगितलें असल्यामुळें, वरील उदाहरणांत तसा आदेश होऊं शकणार नाहीं. शब्दरत्नांत जो वर दोष दाखविला आहे तो प्रकृत सूत्रावरील भाष्यांत दाखविला आहे व त्या भाष्याचा शब्दरत्नांत अनुवाद केला आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतातः–'इदं तर्हि–याः पश्य–आतो धातोरिति लोपः प्रसज्येत । नैष दोषः । अनापः इत्येवं सः । अस्य तर्हि वाशब्दस्य निपातस्याऽधातुरिति प्रातिपदिकसंज्ञायाः प्रतिषेधः

प्रसज्येत । अप्रातिपदिकत्वातस्वाद्युप्तत्तिर्न स्यात् ।' सारांश प्रकृत सूत्राचें दीक्षितांनीं जें व्याख्यान केलें आहे त्यांत 'क्रियावाचिनः' हें पद असणें आवश्यक आहे व तें पद घातलें असल्यामुळेंच, क्रियावाचक नसणाऱ्या 'वा' या निपाताला धातुसंज्ञा होत नाहीं व त्यामुळें वर दर्शविलेल्या सर्व आपत्ति टळतात असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. यावर शंकाकार पुन्हा अशी शंका करतो कीं, 'क्रियावाचिनो भ्वादयो धातुसंज्ञाः स्युः' असा जरी प्रकृत सूत्राचा अर्थ केला तरी, 'वा' या निपातानें विकल्परूप क्रिया प्रतीयमान–बोधित–होत असल्यामुळें, म्हणजे 'वाति' याचा 'विकल्पयति' असा अर्थ होणें शक्य असल्यामुळें, 'वा' या निपाताला धातुसंज्ञा होणें टाळतां येत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं) जिचा साध्यत्वरूपानें बोध होतो, म्हणजे जी सिद्ध नसून साध्यावस्थेंत आहे, तिला क्रिया म्हणतात व 'साध्यत्वम्' या पदाचा 'उत्पाद्यमानत्वम्'–म्हणजे ज्याची उत्पत्ति होणें चालू आहे–असा अर्थ आहे. या विषयासंबधानें इतर ग्रन्थांत–मञ्जूषेंत व उद्योतांत–विस्तृत चर्चा केली आहे. ('वा' या निपाताचा 'विकल्प' असा अर्थ आहे. तो साध्य नसून सिद्ध आहे. म्हणून विकल्पार्थवाचक 'वा' या निपाताला क्रियावाचक मानतां येत नाहीं आणि त्यामुळें त्याला धातुसंज्ञा होऊं शकत नाहीं. सारांश प्रकृत सूत्राचें व्याख्यान करितांना 'क्रियावाचिनः' हें पद घालणें आवश्यक आहे आणि दीक्षितांनीं तें पद व्याख्यानांत घातलें असल्यामुळेंच, 'वा' या निपाताला धातुसंज्ञा होण्याची आपत्ति टळते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. या विषयासंबंधानें 'क्रियावाचिनः किम्? । विकल्पार्थकवाशब्दस्य निपातस्य धातुत्वेऽप्रातिपदिकत्वात् सुबभावे पदत्वानापत्तेः, तदुक्तौ तु न दोषः, वार्थस्य विकल्पस्य भूतभविष्यत्कालसम्बन्धाभावेन क्रियात्वाभावात् ।' असें शब्देन्दुशेखरांत म्हटलें आहे. आतां 'भ्वादयः किम्? । हिरुक्, पृथक् इत्याद्यव्ययानां...मा भूत्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यावर

शंकाकार अशी शंका करतो कीं, 'हिरुक्, पृथक्' हे निपात क्रिया-वाचक नसल्यामुळें त्यांना धातुसंज्ञा होऊं शकत नाहीं आणि म्हणून ते शब्द जरी 'क्रियावाचिनः' याचें प्रत्युदाहरण मानतां येऊं शकतात तरी 'भ्वादयः किम्' याचें ते शब्द प्रत्युदाहरण ठरूं शकत नाहींत. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं,) 'हिरुक्, पृथक्' इत्यादि अव्ययांचें क्रियेशीं सामानाधिकरण्य होत असल्यामुळें, व हे निपात लिङ्ग, संख्या इत्यादिकांशीं अन्वित होत नसल्यामुळें त्याच्या अर्थाचे ठिकाणीं क्रियात्व आहे असें (दीक्षितांनीं) मानलें आहे. हे शब्द क्रियावाचक मानले असल्यामुळें जरी यांना प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं तरी ('अव्ययसर्वनाम्नामकच्' सू. २०२६ या सूत्रानें होणारा) 'अकच्' प्रत्यय त्यांना व्हावा एवढ्याकरितां त्यांचा अव्ययांत पाठ केला असावा. म्हणून त्या अव्ययांत केलेल्या पाठाच्या सामर्थ्यानें या निपातांना धातुसंज्ञा होऊं शकत नाहीं हें म्हणणें चूक ठरतें. (सारांश दीक्षितांच्या मताप्रमाणें जरी 'हिरुक्, पृथक्' इत्यादि निपात क्रियावाचक ठरतात तरी, ते धातुपाठांत पठित नसल्यामुळें त्यांना धातुसंज्ञा होत नाहीं आणि म्हणून 'भ्वादयः किम्' याचें ते शब्द प्रत्युदाहरणरूपानें मनोरमेंत दिले आहेत. 'क्रियावाचिनो भ्वादयो धातुसंज्ञाः स्युः' असें जें प्रकृत सूत्राचें कौमुदींत व्याख्यान केलें आहे त्यांतून 'भ्वादयः' हें पद गाळल्यास, वरील क्रियावाचक निपातांना धातुसंज्ञा होण्याची आपत्ति येते. पण तें पद त्या व्याख्यानांत घातलें असल्यामुळें ती आपत्ति टळते. आतां येथें अशी शंका करण्यांत येते कीं, दीक्षितांनीं प्रकृत सूत्राचें व्याख्यान करितांना 'भ्वादयः' हें जें पद घातलें आहे तें गाळल्यास, जर 'हिरुक्' इत्यादि निपातांना धातुसंज्ञा होण्याची आपत्ति येईल हें बरोबर मानलें तर, हे निपातधातुसंज्ञक ठरल्यानें, 'अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्' सू. १७८ या सूत्रांत 'अधातुः' असा प्रतिषेध असल्यामुळें, त्यांना प्रातिपदिकसंज्ञा होणार नाहीं व त्यामुळें त्यांहून

आपोआपच सुबुत्पत्ति होणार नाहीं. मग असें असून देखील त्यांचा अव्ययांत पाठ कां केला आहे ? या शंकेवर असें उत्तर देण्यांत येतें कीं, त्या शब्दांना अव्ययसंज्ञा व्हावी व त्यायोगानें त्या शब्दांहून 'अकच्' प्रत्यय व्हावा एवढ्याच करितां त्यांचा अव्ययांत पाठ केला आहे. परंतु त्यांचा अव्ययांत पाठ केला असल्यामुळें त्या पाठाच्या सामर्थ्यानें त्या शब्दांना धातुसंज्ञा होत नाहीं हें जें कित्येक वैयाकरणांचें म्हणणें आहे तें बरोबर नाहीं. त्यांना धातुसंज्ञा होत नाहीं याचें खरें कारण हें आहे कीं, तें धातुपाठांत पठित नाहींत आणि अशा रीतीनें ते शब्द 'भ्वादय: किम्' याचें प्रत्युदाहरण मानतां येतात असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे असें शब्दरत्नकार म्हणतात. या वरील पंक्तींत 'इत्यभिमान:' हीं जीं अरुचिप्रदर्शक पदें घातलीं आहेत त्याचें कारण शब्दरत्नकार पुढील पंक्तींत देतात.) 'हिरुक्' इत्यादि अव्ययांना क्रियान्तराची अपेक्षा असल्यामुळें ते क्रियावाचक आहेत असें मानतां येत नाहीं असें कोणी म्हटल्यास, दीक्षित मनोरमेंत 'शिश्ये' हें दुसरें उदाहरण देतात (सारांश 'हिरुक्' इत्यादि शब्दांच्या अर्थापासून साध्यरूप क्रियेचा बोध होत नसल्यामुळें व त्यांना क्रियान्तराची आकांक्षा असल्यामुळें, ते शब्द देखील 'क्रियावाचिन: किम' याचेंच प्रत्युदाहरण मानतां येतात आणि म्हणून ते शब्द क्रियावाचक ठरत नसल्यामुळें 'भ्वादय: किम्' याचें ते शब्द योग्य प्रत्युदाहरण ठरूं शकत नाहींत; जर ते शब्द क्रियावाचक असते तरच ते 'भ्वादय: किम्' याचें योग्य प्रत्यदाहरण मानतां येऊं शकले असते, आणि ही अरुचि मनांत धरूनच दीक्षितांनीं 'शिश्ये' हें दुसरें उदाहरण दिलें आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'काल' हा देखील धातूचा अर्थ असल्यामुळें 'शिश्ये' हा शब्द क्रियावाचक मानण्यांत कांहीं अडचण येत नाहीं, म्हणजे त्या शब्दानें जरी परोक्षभूत कालाचा देखील बोध होतो तरी त्यायोगानें त्याचें क्रियावाचकत्व नष्ट

होत नाहीं. (शंकाकाराची शंका अशी आहे कीं, जो शब्द केवळ क्रियावाचक असतो त्यालाच धातुसंज्ञा होते. पण 'शिश्ये' हा शब्द केवळ क्रियावाचक नसून परोक्षभूतकालाचा देखील वाचक आहे आणि म्हणून त्याला धातुसंज्ञा होण्याची आपत्तीच येत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'क्रियात्वक्रियाकालसङ्ख्या-कारकेति पञ्चकं धात्वर्थः, तिङ तु द्योतकः' या वचनान्वयें 'काल' देखील धातूचा अर्थ ठरतो. म्हणून 'शिश्ये' या शब्दानें जरी क्रियेचा व तसेंच कालाचा देखील बोध होतो तरी, त्यायोगानें त्याचें क्रियावाचकत्व नाहींसें होत नाहीं व प्रकृत सूत्राचें जें व्याख्यान केलें आहे त्यांतून 'भ्वादयः' हें पद गाळल्यास, 'शिश्ये' या शब्दाला धातुसंज्ञा होण्याची आपत्ति येते. परंतु व्याख्यानांत तें पद घातलें असल्यामुळें व धातुपाठांत 'शिश्ये' हा शब्द पठित नसल्यामुळें, त्याला धातुसंज्ञा होण्याची आपत्ति टळते आणि अशा रीतीनें 'भ्वादयः किम्' याचें 'शिश्ये' हें योग्य प्रत्युदाहरण ठरतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'शिश्ये' हा शब्द धातु मानल्यास, 'आदेच उपदेशेऽशिति' सू. २३७० या सूत्रानें त्या शब्दांतील अन्त्य एकाराचे जागीं आकारादेश होण्याची आपत्ति येते. वरील सूत्रानें होणारें आत्वकार्य कोणत्याहि परनिमित्तामुळें होणारें नसून धातुसंज्ञानिमित्तक कार्य आहे हें अगदीं स्पष्ट आहे. ('शिश्ये' हें परिनिष्ठित लिट्लकाराचें रूप असल्यामुळें त्याच्यापुढें शिद्भिन्न प्रत्यय येण्याचा संभवच नाहीं व त्यामुळें त्यांतील अन्त्य एकाराचे जागीं आकारादेश होण्याची आपत्तिच येत नाहीं असें कोणी म्हटल्यास, त्यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, वरील सूत्रान्वयें आत्व होण्याकरितां शिद्भिन्न प्रत्यय पुढें असण्याची मुळींच आवश्यकता नाहीं; कारण भाष्यकारांनीं त्या सूत्रांतील 'अशिति' हा पर्युदास मानला नसून प्रसज्यप्रतिषेध मानला आहे व 'अशिति' या पदाचा 'शिद्भिन्ने प्रत्यये परे' असा अर्थ न करितां 'शिति न' असा त्या

पदाचा अर्थ केला आहे त्यामुळें 'आदेच' सू. २३७० या सूत्राचा असा अर्थ होतो कीं, उपदेशांत–धातुपाठांत–पठित असलेल्या एजन्त धातूपुढें शित् प्रत्यय आल्यास, त्यांतील अन्त्य एच्चे जागीं आकारादेश होत नाहीं, पण एजन्त धातूपुढें शिद्भिन्न प्रत्यय असो वा नसो, त्यांतील अन्त्य एच्चें आत्व होतेंच. त्यामुळें 'शिश्ये' या शब्दापुढें जरी शिद्भिन्न प्रत्यय न आला तरी त्यांतील अन्त्य एकाराचे जागीं आकारादेश होण्याची आपत्ति येतेच. आतां येथें अशी शंका करण्यांत येते कीं, 'शिश्ये' या क्रियावाचक तिङन्ताला धातु मानलें तरी, 'उक्तार्थानामप्रयोग:' या न्यायान्वयें 'शिश्ये' या शब्दाहून पुन्हा तिबादि प्रत्यय होण्याची मुळींच आपत्ति येत नाहीं व उपदेशांत–धातुपाठांत–'शीङ स्वप्ने' असा धातु पठित असून 'शिश्ये' हा शब्द धातुपाठांत पठित नसल्यामुळें व अशा रीतीनें 'शिश्ये' हा शब्द उपदेशाचा–आद्योच्चारणाचा–विषय ठरत नसल्यामुळें आणि 'आदेच उपदेशे' या सूत्रांत 'उपदेशे' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें, 'आदेच उपदेशे' हें सूत्र 'शिश्ये' या शब्दाला लागू पडत नाहीं व त्यामुळें त्याच्या अन्त्य एकाराचें आत्व होण्याची आपत्तीच येत नाहीं (अशी कोणी शंका केल्यास, ती शंका योग्य मानून) कित्येक वैयाकरण असें म्हणतात कीं, 'शिश्ये' या उदाहरणांत वास्तविक 'ए' या प्रत्ययालाच धातुसंज्ञा होण्याची आपत्ति येते; 'शिश्ये' या तिङन्ताला उपदेश–आद्योच्चारण मानतां येत नसल्यामुळे, त्याचे ठिकाणीं आत्वाची प्राप्तीच होत नाहीं. (सारांश 'शिश्ये' हा शब्द धातुपाठांत पठित नसल्यामुळें, जरी तो उपदेशाचा–आद्योच्चारणाचा –विषय होऊं शकत नाहीं तरी, 'लिटस्तझयोरेशिरेच्' सू. २२४१ या सूत्रांत 'एश् = ए' हा पठित असल्यामुळें तो आद्योच्चारणाचा विषय ठरतो आणि 'भावे' या अर्थामध्यें झालेला तो प्रत्यय क्रियावाचक असल्यामुळें, त्यालाच धातुसंज्ञा होऊं शकते आणि त्याला व्यपदेशिवद्भावानें एजन्त मानतां येत असल्यामुळें त्याचेंच आत्व होण्याची

आपत्ति येते. परंतु 'ए' हा शब्द प्रत्यय धातुपाठांत पठित नसल्यामुळें व अशा रीतीनें तो 'भ्वादि' ठरत नसल्यामुळें, त्याला, प्रकृत सूत्राचें जें व्याख्यान केलें आहे त्या व्याख्यानान्वयें, धातुसंज्ञा होण्याची आपत्ति टळते. म्हणून 'भ्वादयः किम्' याचें 'शिश्ये' हें प्रत्युदाहरण न ठरतां त्याच्या अन्तीं असलेला 'ए' हा प्रत्ययच प्रत्युदाहरण मानतां येतो असा त्या वैयाकरणांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.)

शब्दरत्न–ननु षष्ठे प्रकृतसूत्रे धातुग्रहणासम्बन्ध उक्तो भाष्ये, इति न तद् धातुत्वनिमित्तकम्, किं चाशितीति प्रसज्यप्रतिषेधेऽपि शित्परत्वयोग्यस्यैवात्वविधानान्नात्रात्वप्रसक्तिः । अपि च वासादृश्यमन्यानभिहितक्रियावाचकत्वेनेति न दोषोऽत आह–चेति । सूत्रशेषभाष्योक्तेषु 'आणवयति' 'वट्टयति' इत्यादिषु च धातुत्वे शास्त्रविषयतया साधु त्वापत्तिरिति तद्व्यावृत्तये तदिति भावः । उदित्करणेनेति । इदमुपलक्षणम्, तत्प्रकृतिकच्ल्यनुवादेनाङविधानेन, सार्वधातुके परे विकरणविधानेन च धातुत्वम् । "जुचङक्रम्य" इत्यत्र पठितजोः' "जपजभ" इत्यत्र पठित 'पसः' ऋतिप्रभृतीनां च केषाञ्चिद्धात्वधिकारविहितकार्योद्देश्यत्वाद् बोध्यम् । एतैश्च स्थितस्य तेषां पाठस्य भ्रंशोऽनुमीयते इति भावः । मैत्रेयाद्यन्यसंमतं समाधिमाह––बहुलमिति ॥

(आता 'धातुत्वनिमित्तकञ्चेति स्पष्टमेव' व 'अत्रच प्रत्ययस्यैव धातुत्वापत्तिर्बोध्या' असें जें वर शब्दरत्नांत म्हटलें आहे त्यावर अशी शंका करण्यांत येते कीं,) षष्ठाध्यायांत पठित असलेल्या 'आदेच उपदेशे' या सूत्रांत भाष्यकारांनीं 'धातोः' या पदाचें ग्रहण होऊं शकत नाहीं असें म्हटलें असल्यामुळें, त्या सूत्रानें आत्व होण्यास धातुरूप निमित्ताची आवश्यकता आहे असें मुळींच मानतां येत नाहीं. ('आदेच उपदेशे' ६–१–४५ हें सूत्र तृतीयाध्यायांत पठित असलेल्या 'धातोः' सू. २८२९ या अधिकारांत पठित नसून षष्ठाध्यायांत पठित आहे. 'धातोः' हा अधिकार तृतीयाध्यायाच्या

अखेरपर्यंतच चालू आहे. म्हणून तें सूत्र धात्वधिकाराच्या बाहेर पठित असल्यामुळें, त्यांत 'धातोः' हें पद अनुवृत्त होऊं शकत नाहीं. 'लिटि धातोरनभ्यासस्य' या पूर्व सूत्रांतून 'धातोः' या पदाची अनुवृत्ति करतां येईल; पण त्या सूत्राच्या व 'आदेच उपदेशे' या सूत्राच्यामध्यें 'ष्यङः सम्प्रसारणम्' हें सूत्र पठित असल्यामुळें व सूत्रांत 'धातोः' हें पद अनुवृत्त करणें अशक्य असल्यामुळें, 'आदेच उपदेशे' या पुढील सूत्रांत त्या पदाची मण्डूकप्लुतीनेंच अनुवृत्ति करतां येणें शक्य आहे. पण तशा रीतीनें अनुवृत्ति करणें हा दोष मानला असून भाष्यकारांनीं तशा रीतीनें त्या सूत्रांत 'धातोः' या पदाची अनुवृत्ति केली नाहीं. त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'प्रातिपदिकप्रतिषेधः'–म्हणजे 'प्रातिपदिकानां प्रतिषेधो वक्तव्यः' असें वार्तिक पठित करून पुढें भाष्यकार असे म्हणतात कीं, तसा प्रतिषेध करण्याची कांहीं गरज नाहीं व त्याचें कारण सांगतांना भाष्यकार 'धात्वधिकारात् प्रातिपदिकस्याप्राप्तिः' हें वार्तिक पठित करूत असें म्हणतात कीं, 'धात्वधिकारात् प्रादिपदिकस्यात्वं न भविष्यति। धातोरिति वर्तते। क्व प्रकृतम्?। लिटि धातोरनभ्यासस्येति। अथापि निवृत्तम्। एवमप्यदोषः। उपदेश इत्युच्यते, उद्देशश्च प्रातिपदिकानां नोपदेशः।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'आदेच' या सूत्रांत 'धातोः' हें पद अनुवृत्त किंवा संबद्ध नाहीं आणि म्हणून आत्व होण्यास धातुरूप निमित्ताची आवश्यकता आहे, म्हणजे ज्याला धातुसंज्ञा आहे त्यालाच होणारें आत्वकार्य आहे, असें मानतां येत नाहीं. त्यामुळें प्रकृत सूत्राच्या व्याख्यानांतून 'भ्वादयः' हें पद गाळल्यास, जरी 'शिश्ये' या तिङन्ताला धातुसंज्ञा होण्याचा संभव असला तरी, धातुसंज्ञानिमित्तक आत्वकार्य नसल्यामुळें, त्या संज्ञेच्या निमित्तामुळें 'शिश्ये' यांतील अन्त्य एकाराचें आत्व होण्याची आपत्ति येते हें म्हणणें योग्य ठरत नाहीं. त्या एकाराचें आत्व कां होत नाहीं याचें कारण पुढील

पंक्तींत सांगतात.) दुसरें असें कीं, 'आदेच उपदेशेऽशिति' या सूत्रांतील 'अशिति' हा (पर्युदास न मानतां) प्रसज्यप्रतिषेध मानला तरी. ('विप्रयोगस्यापि संयोगवत् तादृशार्थोपस्थितिजनकत्वमेव' या न्यायान्वयें) ज्याच्यापुढें शित् प्रत्यय येण्याचा संभव असतो तशाचेंच ठिकाणीं आत्व होण्याचें विधान केलें असल्यामुळें, 'शिश्ये' या उदाहरणांत आत्वकार्याची प्राप्तीच होत नाहीं; (कारण 'शिश्ये' हें तिङन्त पद असल्यामुळें व तसेंच 'ए' हा प्रत्यय असल्यामुळें, त्यांच्यापुढें सार्वधातुक शित् प्रत्यय येणें असंभवनीय आहे आणि म्हणून 'ए' चें आत्व होण्याचीं प्राप्तीच नाहीं) आणखी असें कीं, वासादृश्य–क्रियावाचकत्व–अशाचेंच ठिकाणीं संभवतें कीं, जो इतर शब्दानें सांगितलेल्या क्रियेचा अनुवाद करणारा नसून स्वतः क्रियावाचक असतो. ('शिश्ये' हा तिङन्त किंवा त्यांतील 'ए' हा लिटाचा प्रत्यय क्रियावाचक नसून, 'शीङ' धातु क्रियावाचक आहे व त्या क्रियावाचक धातूच्या अर्थाचा केवळ अनुवाद करणारें 'शिश्ये' हा तिङन्त व त्यांतील 'ए' हा प्रत्यय आहेत. म्हणून त्यांना वास्तविक धातुसंज्ञा होऊंच शकत नाहीं. त्यामुळें व तसेंच वर सांगितल्याप्रमाणें त्यांच्यापुढें सार्वधातुक शित् प्रत्यय येणें असंभवनीय असल्यामुळे, 'ए' चें आत्व होण्याची आपत्तीच येत नाहीं असा शंकाकाराच्या म्हणण्याचा अभिप्राय आहे. ही शंका अयोग्य नाहीं, आणि ही अरुचि मनात धरूनच दीक्षितांनीं 'भावार्थतिङन्तस्य च मा भूत्' या मनोरमेंतील पंक्तींत 'च' हें पद मुद्दाम घातलें आहे असें शब्दरत्नकार पुढील पंक्तींत सांगतात व त्या पदाची अन्वर्थकता दाखवितात.) 'भूवादयो धातवः सू. १–३–१' या सूत्रावरील भाष्याच्या अखेरीस 'आणवयति, वट्टयति' इत्यादि ज्या शब्दांचा निर्देश केला आहे त्यांना धातुसंज्ञा झाल्यास ते शब्द व्यकरणशास्त्राचे विषय होऊन तसे (प्राकृत भाषेंत रूढ असलेले अशुद्ध) प्रयोग साधू ठरण्याची आपत्ति येईल आणि म्हणून त्या आपत्तीचें निवारण करण्याकरितां व तशा

असाधु प्रयोगांना धातुसंज्ञा न व्हावी याकरितां 'भूवादयो धातवः' सू. १८ या सूत्रांत 'भूवादयः' हें पद व त्या सूत्राचें व्याख्यान करितांना कौमुदींत 'भ्वादयः' हें पद मुद्दाम घातलें आहे असा मनोरमेच्या वरील पंक्तींतील 'च' या शब्दाचा भावार्थ आहे. (प्रकृत सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात: 'भूवादिपाठः' कर्तव्यः । किं प्रयोजनम् ? । प्रातिपदिकाणव-यत्यादिनिवृत्त्यर्थः । प्रातिपदिकनिवृत्त्यर्थं, आणवयत्यादिनिवृत्त्यर्थश्च । के पुनराणवयत्यादयः ? । आणवयति, वट्टति, वड्ढतीति ।' सारांश 'हिरुक्, पृथक्' हीं अव्ययें व तसेंच 'शिश्ये' हें तिङन्त पद 'भ्वादयः किम्' याचीं योग्य प्रत्युदाहरणें ठरत नसली तरी 'आणवयति, वट्टति, वड्ढति' इत्यादि प्राकृत भाषेंतील क्रियावाचक शब्द त्याचीं योग्य प्रत्युदाहरणें ठरतात व या हेतूनेंच दीक्षितांनीं 'भावार्थतिङन्तस्य च मा भूत्' या मनोरमेंतील पंक्तींत 'च' हें पद मुद्दाम घातलें आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ आहे.) 'स्तम्भादीनामुदित्करणेन सौत्राणां धातुत्वं ज्ञाप्यते' या मनोरमेंतील पंक्तींत 'उदित्करणेन' हा जो हेतु दिला आहे तो उपलक्षणार्थक आहे, म्हणजे सौत्र धातूंना धातु म्हणण्यास तेवढाच एक हेतु नसून इतर कारणें देखील आहेत. (जृस्तम्भु' सू. २२९१ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या) 'स्तम्भु' या सौत्रधातूच्या प्रकृतीपुढें येणाऱ्या 'च्लि' चा अनुवाद करून त्या 'च्लि' चे जागीं (विकल्पेंकरून) 'अङ' व्हावा असें विधान केलें असल्यामुळें आणि तसेंच ('स्तन्भुस्तुन्भु' सू. २५५५ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'स्तन्भु, स्तुन्भु, स्कन्भु, स्कुन्भु' या सौत्र धातूंपुढें) सार्वधातुकप्रत्यय आला असतां त्यांना ('श्नु' किंवा 'श्ना' हें) विकरण व्हावें असें विधान केलें असल्यामुळें, वरील दोन सूत्रांत पठित असलेल्या त्या वर दिलेल्या शब्दांना धातुसंज्ञा होते. ('च्लि लुङि' सू. २२२१ या सूत्रात 'धातोरेकाचः' या पूर्व सूत्रांतून 'धातोः' हें पद अनुवृत्त होत

असल्यामुळें व तसेंच विकरणविधायक सूत्रांत देखील त्या पदाची अनुवृत्ति असल्यामुळें, ज्याहून 'च्लि' होणें सांगितलें आहे किंवा विकरण होण्याचें विधान केलें आहे ते धातु असलेच पाहिजेत. वर दिलेल्या सौत्र धातूंच्या विषयात तसें विधान केलें असल्यामुळें ते धातुसंज्ञक आहेत हें सिद्ध होतें.) त्याचप्रमाणें 'जुचङ्क्रम्य' सू. ३१३० या सूत्रांत पठित असलेल्या 'जु' या सौत्र धातूस व तसेंच 'जपजभ' सू. २६३८ या सूत्रांत पठित असलेल्या 'पस्' या सौत्र धातूस आणि तसेंच ('ऋते रीयङ' सू. २४२२ या सूत्रांत पठित असलेल्या) 'ऋति' या सौत्र धातूस आणि पाणिनीय सूत्रांत पठित असलेल्या इतर सौत्र धातूंस उद्देशून धात्वधिकारांत पठित असलेलीं कार्यें होणें सांगितले असल्यामुळें, ते धातुसंज्ञक ठरतात हें जाणावें. ('जु' या सौत्र धातूहून 'युच्=अन' हा कृत् प्रत्यय होणें सांगितलें आहे. 'पस्' या सौत्र धातूहून 'यङ' किंवा 'यङ्लुक्' केला असतां, त्याच्या अभ्यासाला 'नुक्' आगम होणें सांगितलें आहे. 'ऋति' या सौत्र धातूहून 'स्वार्थे ईयङ' होणें सांगितलें आहे. धात्वधिकारांत पठित असलेलीं व धातूंना होणारीं हीं कार्यें त्यांना उद्देशून सांगितलीं असल्यामुळें, ते सूत्र पठित शब्द जरी धातुपाठांत पठित नाहीत तरी धातु आहेत हें स्पष्ट होतें. हेंच इतर सौत्र धातूंच्या संबंधानें देखील जाणावें) हे सौत्र धातु पूर्वी धातुपाठांत पठित असून त्यांचा पाठ पुढें नष्ट झाला असें अनुमान करतां येतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. (पण असें अनुमान करण्यात गौरव असल्यामुळें) दीक्षितांनीं मनोरमेंत 'बहुलमेतन्निदर्शनम्' हें दुसरें समाधान सांगितले आहे, व ते मैत्रेय इत्यादि वैयाकरणांना संमत असलेल्या पक्षाला धरून सांगितलें आहे. ('बहुलमेतन्निदर्शनम्' याचा अर्थ असा आहे कीं, धातुपाठांत पठित असलेले भ्वादि धातु हेच केवळ धातु नसून त्याखेरीज इतर धातु देखील आहेत. त्यामुळेंच सूत्रनिर्दिष्ट व वार्तिकनिर्दिष्ट धातूंना धातुसंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं.

उदाहरणार्थ 'कण्ड्वादिभ्यो यक्' सू. २६७८ या सूत्रानें कण्ड्वादिगणांत पठित असलेल्या धातूंहून 'यक्' प्रत्यय होणें सांगितलें आहे. हे धातु धातुपाठांत पठित नाहींत. तरी पण त्या ३-१-२७ सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं कण्ड्वादि हे धातु मानले आहेत. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात:-'उभयं कण्ड्वादीनि, धातवश्चैव प्रातिपदिकानि-च । आतश्चोभयम्, कण्डूयतीति हि क्रियां कुर्वाणे प्रयुज्यते, अस्ति मे कण्डूरिति वेदनामात्रस्य सांनिध्ये । अपर आहे–धातुप्रकरणाद्धातुः कस्य चासञ्जनादपि । आह चायमिमं दीर्घं मन्ये धातुर्विभाषितः इति ।' तसें च 'कास्प्रत्ययादाम्' ३-१-३५ या सूत्रावरील भाष्यांत 'कास्यनेकाज्ग्रहणञ्चुलुम्पाद्यर्थम्' हें वार्तिक पठित केलें आहे. 'चुलुम्प' इत्यादि धातु धातुपाठांत पठित नाहींत. तरी पण वार्तिककारानें त्यांना धातु मानलें आहे यावरून हें स्पष्ट होतें कीं, धातुपाठांत पठित असलेल्या धातुखेरीज इतर धातु देखील आहेत आणि म्हणूनच कैयटानें प्रकृत सूत्रावरील भाष्याच्या वृत्तीत 'ये धातुपाठे पठितास्तेषामेव धातुसंज्ञा । तेषां च पाठो नोपलक्षणार्थः, अदि तु इयत्ताप्रतिपादनार्थः । तत्र यदि क्रियावाचो धातुरित्येतल्लक्षणं क्रियेत तर्हि आणवयति वट्टयतीत्यादीनामपि धातुसंज्ञा स्यात् । अथ सूत्रपठितानामनन्तरं ते धातव इत्युच्येत, तदा तत्राऽपठितानां न स्यात् । तस्माद्भूवादय इत्युक्तम् । तत्र सूत्रवार्तिकभाष्यगणेषु ये पठ्यन्ते तेऽपि सूत्रकारादिप्रामाण्याद्धातुत्वेनाश्रयणीयाः ।' असे म्हटलें आहे. सारांश 'बहुलमेतन्निदर्शनम्' या गणसूत्रान्वयें धातुपाठांत पठित नसलेल्या पण सूत्रकार, वार्तिककार व भाष्यकार यांनीं मानलेल्या धातूंना धातुसंज्ञा करता येते.)

मनोरमा–"चादयः" अद्रव्यार्थाः किम् ? 'पशुः' लिङ्गसंख्यान्वितं द्रव्यम् । इह तु स्यादेव–'लोधं नयन्ति पशु मन्यमानाः' । 'पशु' इति सम्यगर्थे ॥

('चादयोऽसत्वे' सू. २० या सूत्राचा 'अद्रव्यार्थाश्चादयो

निपातसंज्ञाः स्युः' असा कौमुदींत अर्थ केला आहे व या पंक्तींत) 'अद्रव्यार्थाः' हें पद अशाकरितां घातलें आहे कीं, 'पशुः' या शब्दाला निपातसंज्ञा होऊं नये. जें लिङ्ग व संख्या यांशीं अन्वित होतें त्याला द्रव्य म्हणतात. 'लोधं नयन्ति पशु मन्यमानाः' या श्रुतींतील 'पशु' या शब्दाला निपातसंज्ञा होतेच व त्या 'पशु' शब्दाचा 'सम्यक्' असा अर्थ आहे. (चादिगणांत 'पशु' हा शब्द पठित आहे व तो शब्द जेव्हां द्रव्याचा वाचक नसतो तेव्हांच त्याला निपातसंज्ञा होते. पण 'पशुः' या पुल्लिङ्गी व एकसंख्यावाचक शब्दाला निपातसंज्ञा होऊं शकत नाहीं; कारण लिङ्ग व संख्या यांशीं अन्वित झालेला तो शब्द द्रव्यवाचक आहे.)

शब्दरत्न– सम्यगर्थे इति। न च "लुब्धमृषिं नयन्ति पशुं मन्यमानाः" इति निरुक्ते 'पशुम्' इति सानुस्वारपाठात् तत्र पश्विति लुप्तविभक्तिकं सत्त्ववाचीति वाच्यम्। 'लोधम्' इत्यनवगतमिति तद्भाष्योक्त्या तन्मात्रनिर्णायके निरुक्ते, पशुशब्दांशेऽन्यथापाठे मानाभावात्। स्पष्टं चेदं प्रकृतसूत्रे हरदत्तग्रन्थे, दृशधातौ माधवग्रन्थे चेति दिक्।

'लुब्धमृषिं नयन्ति पशुं मन्यमानाः' या निरुक्तांतील पाठांत 'पशुं' असा अनुस्वारयुक्त पाठ असल्यामुळें मनोरमेंत दिलेल्या श्रुतींतील 'पशु' हा शब्द लुप्तविभक्तिक, म्हणजे त्यांत द्वितीया विभक्तीच्या प्रत्ययाचा लोप झाला आहे, व तो शब्द द्रव्यवाचक आहे असें समजूं नये; कारण त्या निरुक्तावरील भाषांत 'लोधम्' या शब्दाचा अर्थ अज्ञात आहे असें म्हटलें असल्यामुळें व त्या शब्दाचा अर्थ निश्चित करण्यापुरतेंच तें निरुक्त प्रमाण असल्यामुळें, 'पशु' या शब्दाचा 'पशुम्' असा भिन्न सानुस्वार पाठ मानण्यास कांहीच प्रमाण नाहीं. प्रकृत सूत्रावरील हरदत्ताच्या व्याख्यानावरून व तसेंच माधवीय धातुवृत्तींत 'दृश्' धातूचें व्याख्यान करितांना माधवानें जें म्हटलें आहे त्यावरून देखील हेंच सिद्ध होतें. ('लोधं

नयन्ति पशु मन्यमानाः' ही ऋग्वेदाच्या तृतीय मण्डलांतील ५३ व्या सूक्तांतील तेविसावी ऋचि आहे. या ऋचीवर 'लुब्धमृषिं नयन्ति पशुं मन्यमानाः' असें निरुक्त आहे. या निरुक्तावरील भाष्यांत 'लोधम् इति एतदनवगतम् । लुब्धम् इत्यवगमः ।' असें म्हटलें आहे. या भाष्याचा अर्थ हा आहे कीं, 'लोधम्' या शब्दाचा अर्थ अज्ञात असल्यामुळें, निरुक्तकारानें त्या शब्दाचा 'लुब्धम्' असा अर्थ सांगितला आहे. त्या भाष्यांत असें मुळींच म्हटलें नाहीं कीं, 'पशु' या शब्दाचा देखील अर्थ अज्ञात असल्यामुळें, निरुक्तकारानें त्या शब्दाचा 'पशुम्' असा अर्थ सांगितला आहे. त्या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, वरील निरुक्त 'पशु' या शब्दाच्या अर्थाचें निर्णायक नसून, केवळ 'लोधम्' या शब्दाच्या अर्थाचेंच निर्णायक आहे व तेवढ्यापुरतेंच तें निरुक्त प्रमाण आहे. म्हणून त्या निरुक्तांत आढळणारा 'पशुं' असा सानुस्वार पाठ प्रमाण मानतां येत नाहीं व लेखकाच्या प्रमादामुळें तसा अशुद्ध सानुस्वार पाठ झाला असावा असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'दृशिर् प्रेक्षणे' या धातूवरील वृत्तींत माधवानें 'पशुः । अर्जिदृशि'—उणादिसू. २७—इत्युप्रत्ययः पशादेशश्च । यदायमसत्त्ववचनस्तदा चादित्वान्निपातत्वं, यथा लोधं नयन्ति पशुमन्यमाना इति, पशु सम्यगिति ह्यत्रार्थः' असें म्हटलें आहे. तसेंच प्रकृत सूत्रावरील पदमञ्जरींत हरदत्तानें देखील 'क्व तर्हि वर्तमानः पशुशब्दोऽसत्त्ववचनो भवति, दृश्यर्थे, लोधं नयन्ति पशु मन्यमाना इत्यत्र दृश्यर्थेन मननं विशेष्यते दर्शनमेतन्मननम्, सम्यक् मन्यमाना इत्यर्थः' असें म्हटलें आहे. या वरील दोन्ही ग्रन्थांत मनोरमेंत दिलेल्या श्रुतींतील 'पशु' हा शब्द लुप्तविभक्तिक द्रव्यवाचक मानला नसून अद्रव्यवाचि निपातच मानला आहे व त्या शब्दाचा 'सम्यक्' असाच अर्थ दिला आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, निरुक्तांत आढळणारा 'पशुं' असा सानुस्वारपाठ लेखकप्रमादामुळें झाला आहे. सारांश 'लुब्धमृषिं नयन्ति पशु मन्य-

माना:' असा निरुक्ताचा शुद्ध पाठ समजावा असें शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे.)

मनोरमा–"उपसर्गाः" निस्, दुस् इति सान्तौ, "निसस्तपतौ" इति निर्देशात् अयोगवाहानामविशेषेणेति प्रकरणे 'निष्कृतम्' 'दुष्कृतम्' इत्युदाहृत्य "इदुदुपधस्य सकारस्य यो विसर्जनीयः" इति भाष्यकारोक्तेश्च। "उपसर्गस्यायतौ" इति सूत्रे वामनोऽप्येवम्। "निरः कुषः" "सुदुरोरधिकरणे" इति निर्देशाद्रेफान्तावपीति तत्रैव सूत्रे हरदत्तः॥

('गतिश्च' सू. २३ या सूत्रावरील कौमुदींत पठित केलेले) 'निस्, दुस्' हे उपसर्ग सान्त आहेत; कारण 'निसस्तपतौ' सू. २४०३ या सूत्रांत 'निस्' असा सान्त निर्देश केला आहे, आणि तसेंच 'अयोगवाहानामविशेषेण' या प्रकरणांत 'निष्कृतम्, दुष्कृतम्' हीं उदाहरणें देऊन भाष्यकारांनीं 'इदुदुपधस्य सकारस्य यो विसर्जनीय:' असें म्हटलें आहे. ('हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यांत अयोगवाहांचा 'अट्' व 'शर्' प्रत्याहारांत पाठ करावा असें प्रथम सांगून पुढें भाष्यकार म्हणतात–:' अथवाऽविशेषेणोपदेशः कर्तव्यः। किं प्रयोजनम्?। अविशेषेण संयोगोपधासंज्ञालोऽन्त्यद्विर्वचनस्थानिवद्भावप्रतिषेधाः'। व हीं जीं पांच प्रयोजनें सांगितलीं आहेत त्यांपैकीं द्वितीय प्रयोजनाचें, म्हणजेऽपधासंज्ञेचें, व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात–:'उपधासंज्ञा च प्रयोजनम्। दुष्कृतम् निष्कृतम्। निष्पीतम् दुष्पीतम्। इदुदुपधस्य चाप्रत्ययस्य इति षत्वं सिद्धं भवति। नैतदस्ति प्रयोजनम्। नेदुदुपधग्रहणेन विसर्जनीयो विशेष्यते। किं तर्हि। सकारो विशेष्यते। इदुदुपधस्य सकारस्य यो विसर्जनीय इति।' या वरील भाष्यांत 'दुष्कृतम्, निष्कृतम्, दुष्पीतम्' हीं जीं चार उदाहरणें दिलीं आहेत त्यांत असलेले उपसर्ग 'निर्, दुर्' असे रेफान्त मानल्यास, रेफाचे जागीं झालेल्या विसर्गाचें षत्व होणार नाहीं, कारण सकाराचे जागीं झालेल्या विसर्गाचेंच 'इदुदुपधस्य' सू. १५५ या सूत्रान्वयें

षत्व होऊं शकतें असें वरील भाष्यांत सांगितलें आहे. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'निस्, दुस्' असे सान्त उपसर्ग आहेत.) उपसर्ग-स्यायतौ' सू. ८–२–१९ या सूत्रावरील काशिकावृतींत वामनानें देखील असेंच म्हटलें आहे. (त्या वृत्तींत वामनानें 'दुस् निस् इत्येत-योस्तु रुत्वस्यासिद्धत्वाल्लत्वेन नैव भवितव्यम् । निरयणम् दुरयणम्' असें म्हटलें आहे. या वृत्तींत देखील 'निस् दुस्' असा सान्त उपसर्गांचा निर्देश केला आहे. यावरूनहि हें सिद्ध होतें कीं, 'निस् दुस्' असे सान्त उपसर्ग देखील आहेत.) 'निरः कुषः' सू. २५६० या सूत्रांत व तसेंच 'सुदुरोरधिकरणे'–सू. २९६५ वरील वार्तिक–या वार्तिकांत 'निर् दुर्' असा अनुक्रमें निर्देश असल्यामुळें, 'निर् दुर्' असे रेफान्त उपसर्ग देखील आहेत असें त्याच सूत्रावरील पदमञ्जरींत हरदत्तानें म्हटलें आहे. ('उपसर्गस्यायतौ' सू. ८–२–१९ या सूत्रावरील पदमञ्जरींत 'ननु च निरः कुषः, सुदुरोरधिकरणे इति निर्देशात् रेफान्तावप्युपसर्गौ स्तः, तौ वचनस्यावकाशा इति कथं व्यवधाने भवति' इत्यादि हरदत्तानें म्हटलें आहे. सारांश 'निस्, दुस्, निर्, दुर्' असे दोन्ही प्रकारचे, म्हणजे सान्त व रेफान्त, उपसर्ग आहेत हें मनोरमेंतील व्याख्यानावरून स्पष्ट होतें.)

शब्दरत्न–वामनोऽप्येवमिति । तत्र हि 'दुस् सान्तः' इति तेनोक्तम् ॥

'वामनोऽप्येवम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'उपसर्गस्यायतौ' ८–२–१९ या सूत्रावरील काशिकावृत्तींत 'दुस् सान्तः' असें वामनानें म्हटलें आहे. (वामनाचें म्हणणें वर मनोरमेंत दिलेंच आहे.)

॥ संज्ञाप्रकरणं समाप्तम् ॥